
मानस गूढार्थ चंद्रिका

लंकाकाण्ड (मराठी)

खंड -२

लेखक
श्री. प. प. ब्र. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती



श्रीरामचरित
मानस गूढार्थ चंद्रिका
उत्तरकाण्ड
खण्ड २

'रामचरितमानस' यावरील मराठी बृहत् टीकेचा अंश

लेखक: प.पू. प्रज्ञानानंद सरस्वती

प्रकाशक:
रामचरितमानस प्रेमी मंडळ
डोंबिवली

मानस गूढार्थ चंद्रिका

उत्तरकाण्ड खंड - २

प्रथम आवृत्ती : ३ सप्टेंबर २००४

श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ, डोंबिवली

प्रकाशक :
श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ,
४, श्री गणेश अनंतराज सोसायटी, नेहरु रोड,
जलाराम मंदिर जवळ, डोंबिवली (पू.) ४२१ २०१

मुद्रक :
ओमेगा पब्लिकेशन्स
२व३, एमराल्ड कॉर्नर
मराठा कॉलनी, टिळकवाडी
बेळगाव ५९०००६
फोन : ५२०२४२४, ९४४८१-४४१२४

मूल्य : रु.३०० /- फक्त

उत्तरकाण्ड खण्ड २

अनुक्रमणिका

***

क्र	परिशिष्ट	पृष्ठ
१.	सीता परित्यागाचे मूळ कारण (रजक पूर्वजन्म कथा)	३१३
२.	ज्ञानदीप व भक्ति चिंतामणी कोष्टक	३१५
३.	महादेवकृत रामस्तुती.	३१७
४.	कुदान घेणे.	३२०
५.	श्री रामचरितमानसोपलब्ध राम-सपाद सहस्रनाम	३२१
६.	श्रीरामचरित मानसोपलब्ध श्री शिवनामस्त्तोत्रम्	३५३
७.	अथ श्री भवानी शतनामस्त्तोत्रम्	३५९
८.	श्री लक्ष्मणाष्टोत्तर शतनाम स्त्तोत्रम्	३६४
९.	श्री हनुमत्सार्ध शतनाम स्त्तोत्रम्	३६८
१०.	श्री सीताष्टोत्तर शतनाम स्त्तोत्रम्	३७३
११.	सन्त विटप सरिता गिरि धरणी	३७७
१२.	श्री मानसा मधील - 'हरियान'	३८७
१३.	श्री मानसात छंदाचे सहेतुक, सार्थ व सापेक्ष उपयोग.	३९७
१४.	श्री राम लक्ष्मण भरत शत्रुघ्न.	४२७
१५.	बालराम रूपाचे वर्णन बालकांड व उत्तरकांड तुलनात्मक कोष्टक	४३७

***

उत्तरकाण्ड खण्ड २

प्रस्तावना

भावुक वाचकहो,

उत्तरकांडातील ११०चं. या दोह्यापासून लोमश-मुनी प्रसंगास या दुसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेस प्रारंभ होत आहे. मेरूपर्वतावर एका वटवृक्षाखाली बसणारे हे लोमश 'मुनिजी' - यांचा सविस्तर परिचय टीकेत. प.पू. स्वामी करून देतात. वि.ल.ले. (विशेष लक्षात ठेवा) या तळटीपेतून या मुनींचा विशेष परिचय देण्यात स्वामींच्यातील सूक्ष्म अभ्यासक दिसतो. तसेच त्यांना जिज्ञासू प्रश्न विचारणारा शिष्यही तितकाच विनयशील व आदरभावाने विचारणारा आहे हे ही स्वामी तत्काल स्पष्ट करतात.

काक भुशुंडीचे परम अधिकारीत्व प.पू.स्वामी जसे उलगडून सांगतात, तितकेच सखोल व सूक्ष्मपणे निर्गुण निराकार ब्रह्म अन् महावाक्योपदेशही सहजपणे उकलून उघड करतात. त्यानंतर लोमश आणि काकभुशुंडी यांच्यातील झालेल्या वाग्युध्दाचे मर्म कोठे आहे ते टीकेतून स्वामी स्पष्ट करतात.

तसेच त्यानंतर लोमशांच्या क्रोधाचे मूळ स्पष्ट करून संतांना किंवा ज्ञानी भक्तांना (विशुध्द संतांना) ओळखणे किती कठीणतम आहे हे टीकेद्वाराच कळू शकते. काकभुशुंडींच्या मौनावर ही लोमशांची प्रतिक्रिया काय व कशी झाली हे स्वामी सिध्दांतिक रूपाने स्पष्ट करून सांगतात.

तर त्यानंतर लोमशांची परहितकारक वृत्ती स्पष्ट करून, दारिद्र्य दोन प्रकारचे कसे असते ते विवेचन करून सांगतात. अन् त्याचा परिणाम म्हणून काकभुशुंडीला लोमश मुनी एक शिक्षा करतात पण तीही काकभुशुंडी कशी आनंदाने स्वीकारतात ते टीकेतून वाचून 'प्रत्येक प्रतिकूलतेतून अनुकूल अर्थ कसा काढावा' हे सूत्र स्वामींनीं कसे सहजपणे पचनी पाडले आहे ते लक्षात येते. अन् इथे काकभुशुंडीचे परम अधिकारत्वही प्रकर्षाने जाणवते. 'सिय राममय सब जग जानी' (सर्व जग सीताराममय पाहणे) याचे आचरण आदर्शत्वाने पहावयास मिळते. अन् यानंतर

काकभुशुंडीना राममंत्र कसा कसून परीक्षेस उतरल्यावरच मिळतो, हे ही पहायला मिळते. त्याचा सर्व क्रम सविस्तर सांगण्यात स्वामींचे 'सद्‌गरुत्व' पणास लागले आहे. अन् त्यापुढे भगवान शिवजींनी लोमशांना कसे माध्यम बनविले आहे ते सांगून पुन्हा लोमशांचा महान अधिकार ध्यानी आणून द्यायला स्वामी मुळीच विसरत नाहीत. अन् सद्‌गरुकृपेचा वर्षाव वा बरसात म्हणजे काय याचे दर्शन स्वामी घडवितात. त्याचबरोबर गुरु प्रसन्न झाले की प्रभु - आपले इष्ट वा परब्रह्मही - त्यावर कसे शिक्कामोर्तब करते ते १३व्या अध्यायाअखेरपर्यंत सविस्तर समजावून देतात.

यानंतर १४व्या अध्यायाच्या प्रारंभी रामरहस्य म्हणजे भक्तीचा महिमा वर्णन करून त्याची प्रस्तावना करतात व त्यापुढे गरुड ज्ञान व भक्ती यातील फरक व अंतर काय असे प्रश्न काकभुशुंडीस विचारतो. आणि त्याचे उत्तर देताना काकभुशुंडी जे महत्त्वाचे सिध्दांत सांगतात ती ही अंतिम 'भुशुंडी-गीता' होय. ज्ञान व भक्ती यातील अभेद स्पष्ट करण्यासाठी अबला, पुरुष व पुरुषांना निर्बल करण्याच्या 'प्रबला'-अशा युक्तिप्रयुक्तीने खुबीने हे भक्तीचे रहस्य स्वामी टीकेतून सुस्पष्ट करतात. त्यानंतर 'अती प्रवीण' असे संबोधन गरुडाला वापरून रामभक्तीची श्रेष्ठता अधिक स्पष्ट करून काकभुशुंडी सांगतात. 'अकथ कहाणी' हा शब्द वापरून अनिर्वचनीय ब्रह्माचे विवरण प.पू.स्वामी अतिशय सुंदर करतात.त्यानंतर ईश्वराचा अंश असलेला जीव त्याचे सविस्तर साक्षात शब्द-दर्शन घडवितात. अन् हा जीव मायेमुळे कसा भयभीत होतो व बंधनात पडतो ते शुक म्हणजे पोपट व माकड या दोन उदाहरणांनी सुरेख शिक्षकी ढंगानी समजावून देतात. तसेच त्यानंतर 'जड' व 'चैतन्य' यांची पडलेली ही गाठ 'मृषा' का व कशी ते ही सुकरतेने वाचकाचे गळी उतरवतात. मग तो जीव जसजसा स्वप्रयत्नाने ही मृषा गाठ सोडू-सोडवू पाहतो तसतसे ती गाठ सुरगाठ न होता उलट निरगाठ कशी होते ते फारच सुलभ करून सांगतात. ही गाठ कुठे, कशी, का पडते, ती वेदादि उपायांनीही कशी सुटत नाही, हे सांगून 'ईश संयोग वशात्'च केवळ कशी सुटू शकते ते सांगण्यासाठी पुढे ज्ञानदीपाचे रूपक स्वामी उलगडून सांगू लागतात.

सात्विक श्रध्दा रूपी शोभन धेनूपासून हे सांग रूपक सुरू करून तेजराशी विज्ञानमय दीपापर्यंत सविस्तर समजावून देतात. आणि त्यानंतरही ग्रंथी-भेद करून कृतार्थ झालेला जीव व अविद्या मायेच्या अनेक विघ्नांना कसा बळी पडतो, बुध्दि भ्रमित कशी होते ते सुरेख समजावून देतात. परम शहाणी बुद्धी नसेल तर तिचे अहित=अकल्याण करण्यास कोण कोण कस-कसे पुढे सरसावतात अन् त्या जीवाला मायेच्या आवर्तात-भोवऱ्यात पुन्हा कसे फेकून देतात ते स्वामी अत्यंत चपलखतेने समजावून सांगतात.

म्हणून शेवटी ज्ञानमार्ग हा 'कृपाणधार' आहे हे सांगून कैवल्य हे कसे 'दुर्लभ' आहे हे व्यवस्थित-क्रमश: सांगतात. अन शेवटी ह्या सिध्दान्तास संत, पुराणे, निगम, आगम यांची पुष्टी देऊन हा ज्ञानमार्ग कसा अतिदुर्गम आहे ते अत्यंत कठिण जवळजवळ अशक्य असे समजावून देताना वाळवीचे उदाहरणाने पक्के बिंबवतात.

अन् शेवटी रामभक्तीची श्रेष्ठता, महत्ता वर्णन करण्याची प्रस्तावना करून भक्तिचिंतामणी रूपकाचा प्रारंभ १५व्या अध्यायापासून करतात. तत्पूर्वी भक्ती किती सहज सुलभ, सुगम, सर्व सुखे देणारी असून तिच्या आश्रयाला ज्ञान-मुक्ती कशा आपोआप येतात ते सुंदर सुंदर उदाहरणांनी पटवून देतात.

भक्तिचिंतामणी कसा सुंदर, स्वयंप्रकाशी आहे हे सांगून, 'गरल सुधासम अरि हित होती' हे स्पष्ट करताना मानसातीलच अनेक उदाहरणे देऊन सिध्दांताचे पूर्णत: स्पष्टीकरण व तुष्टीपुष्टीकरण स्वामी करतात.

अशा भक्तिचिंतामणीसाठी प्रयत्न करणारे 'चतुर शिरोमणी' कोण व कसे असतात याचेही स्वामी सुरेख रेखाटन करतात. अशा या भक्तीच्या प्राप्तीचे मार्ग सुगम कसे होतात, ते मार्ग दाखवणारे कोण, त्यामुळे हा भक्तिचिंतामणी कसा हाती येतो अन् तो हाती येताच काय काय चमत्कार घडतात ते सांगताना स्वामींचे आत्म-गुरु व शास्त्र प्रचितीचे बोल मनी ठसतात.

भक्तीला सब सुख खाणी पेक्षा सब सुख दानी म्हणणेच कसे योग्य आहे या पाठभेदाचीही चर्चा स्वामी सांगोपांग करतात.

त्यानंतर 'रामदास रामाहुनि मोठे' हा सिध्दांत सिध्द करताना तर स्वामींमधील सूक्ष्म संशोधक, अभ्यासक व टीकाकार प्रकर्षाने जाणवतो अन् हळूच त्यांच्यातील 'रामदास' व 'सद्गुरू' 'संत' यांचे आपोआप दर्शन घडते. अन् त्यानंतर 'सत्संग महिमा' वर्णन करताना त्यांचेतील सिध्दहस्त लेखक सहजी प्रकट होतो.

दो.१२० रा आणि दो.१२० म यांच्यावरील टीका वाचताना तर सागर-मंथनाचे दृश्य डोळ्यासमोर तरळते, आणि वैराग्यरूपी ढाल अन् ज्ञानरूपी तरवारीने षड्रिपूंशी केलेले युध्द साक्षात समोर घडते आहे अन् त्यावर केवळ हरिभक्ती-रामभक्तीच विजय मिळवू शकते ह्यातील अनुभवगम्यता ध्यानी येते.

'सप्तप्रश्न गीता' हे प्रकरण म्हणजे जीवनातील महत्त्वाच्या सात प्रश्नांची उकल होय. मानव देहाची दुर्लभता, ही मानव योनी शिडी कशी बनते, यामध्ये कोणती भगवंताने दिलेली सुंदर देणी-देणग्या आहेत, याची स्वामी सुरेख फोड करून सांगतात. त्यावरून प्रत्येकाने परीसस्पर्श कसा करून घ्यावा हे सुजाणपणे जाणून अनुभवावे असे इतके अनमोल आहे.

दारिद्रय कोणते व ते सर्वात दु:खकारक का हे टीकेतून सूक्ष्मपणे अभ्यासून पहावे.

सर्वात मोठे सुख कोणते व त्याचा लाभ कसा करून घ्यावा, त्याची लक्षणे कोणती हे फारच मधुरतेने स्वामींनी वर्णन करून जणू तुलसीदासांचे हृदगत सुस्पष्टपणे जणू आरश्यात प्रतिबिंब पडावे इतके पारदर्शकतेने दाखवले आहे.

संतांचा उदय इंदुप्रमाणे शीतलता-आल्हाद प्रदान करणारा अन् त्याच वेळी तमारिप्रमाणे हितकारीही कसा होतो ते सुस्पष्ट केले आहे.

'अहिंसा परमो धर्मः' हे वेदवचन पूर्णपणे पटवून सांगीतले आहे. तर परनिंदेसारखे महान पाप नाही हे पटवून देणेसाठी त्याचे परिणाम अनेक तऱ्हेने सांगितले आहेत.

मानस-रोग प्रकरणातून तुलसीदासांमध्ये दडलेला आयुर्वेद, मानसशास्त्र, शरीरशास्त्र इत्यादि शास्त्रांचा अभ्यास प.पू. स्वामींनी टीकेतून स्वत:च्याही त्यातील

सखोल ज्ञानाने अधिक स्पष्टपणे उघड करून दाखविलेला दिसतो. टीका वाचताना अनेक ग्रंथाचे संदर्भ पाहताना स्वामींच्या अभ्यासूवृत्तीचा आवाका सहजी ध्यानी येतो. रोगांची नावे, लक्षणे, त्यांचे बहर, यांचे सांगोपाग वर्णन केलेले आहे. तर त्यावर नेमका रामबाण उपाय, त्याची पथ्ये, कुपथ्ये, अनुपाने सांगण्यापूर्वी या सर्वच्या सर्व रोगांनी सामान्य जीव कसा ग्रासलेला, पीडलेला आहे याचे साद्यंत वर्णन केलेले आहे. अन् शेवटी स्वामी म्हणतात 'कुठवर सांगू कुरोग अनेक'! आणि या सर्व रोगांवर रामबाण, हमखास, रोगमुक्त करणारा उपाय सांगताना पुन्हा ज्ञानापेक्षा भक्तीची श्रेष्ठता, महत्त्व, प्रभाव हे वारंवार ठसविण्याचा प्रयत्न करतात. इतकेच नव्हे तर याच्या सफलतेचा (रोगमुक्तीचा) स्वतःच्या स्वतः पडताळा पाहण्याचाही उपायही स्वामी सांगतात. जणू त्यायोगे भक्तीमार्गी जीवाने आत्मचिंतन, आत्मपरिक्षण, आत्मावलोकन करणे किती अपरिहार्य आहे हेच सूचित केले आहे. अन् वैराग्याचे जसजसे प्रमाण व प्रबलता वाढेल तसतसे ह्रदयातील रामभक्ती स्थिरावेल हा सिध्दांतही स्वामी त्यांचा खास शिक्षकी शैलीने प्रत्येकास पटेल असा सांगतात. अन् या प्रकरणाचा उपसंहार करताना शिव, ब्रह्मा, शुक सनकादिक, नारद या ज्ञान-वैराग्य संपन्नतेने रामभक्तीत आकंठ बुडलेल्यांची उदाहरणे वा निर्वाळा देऊन सिध्दांत चांगला धष्टपुष्ट, सबल वा प्रबल बनविण्यात स्वामी आपले कौशल्य पणास लावतात. इतकेच नव्हे तर याही नंतर मानसातील आणखी ज्ञानी भक्तांची उदाहरणे देऊन या प्रकरणाची सांगता करतात. तसेच यानंतर साहित्यिक अंगांनी अनेक प्रकाराने या रामभक्तीची परम श्रेष्ठता सिध्द करताना शेवटी संस्कृतला शरण जातात. हल्ली जसे इंग्रजी भाषेतली 'कोटेशन्स' घेतली व उद्धृत केली की विषय नेमका वाचक वा श्रोत्यांच्या गळी उतरतो तसे पूर्वीच्या शैलीनुसार संस्कृताश्रयाने हेच ध्येय साध्य करण्याचे तंत्र स्वामी अवलंबतात.

१६व्या अध्याय म्हणजे समग्र ग्रंथाचा उपसंहार होय. ही कथा चार संवादात गुंफलेली असल्याचे प्रथम बालकांडात जसे सांगितले होते तसे आता क्रमशः काकभुशुंडी-गरूड संवाद दो.१२३ ते १२५, उमा-महेश संवाद १२६ ते १२९, आणि याज्ञवल्क्य-भरद्वाज संवाद १३०/१-४ व शेवटी श्री तुलसीदासांनी केलेला या रामकथेचा उपसंहार हे स्वामी टीकेतून उलगडून दाखवितात. चारही वक्ते स्वतःला

रामकथा सांगणेचे निमित्ताने रामनाम-गुण-लीला-यश गायला मिळाल्याची कृतार्थला अत्यंत कृतज्ञतेने नमूद करतात तर सर्व श्रोतेही तसेच अधिकारी असलेने वक्त्यांना धन्यवाद देताना त्यांचे हृदय आदर-आनंद, प्रेम-प्रसन्नता यांनी गद्‌गदून गेलेले दिसते. या वक्त्यांच्या संत-सद्‌गुरूंच्या संतत्वाचा व त्यांचा सत्संगामुळे स्वमोह-नाशाचा प्रत्येक श्रोता आवर्जून प्रामाणिकपणे उल्लेख करून स्वतः 'धन्य', 'कृतार्थ' झाल्याचे अति नम्रपणे कबूल करतात. अन्‌ हा शरण्यभाव नमूद करता करता पुन:पुन्हा रामकृपा, रामभक्ती, संत व सत्संग यांचा महिमा मुक्त कंठाने गातात. संत-लक्षणांचे सर्व बारकावे व कंगोरे स्पष्ट करून दाखवताना स्वामींची लेखणी चांगलीच गतीशील होते.

रामकथेत रमणाराच खऱ्या अर्थाने नीती निपुण व परम शहाणा कसा आहे ते स्वामी सखोलतेने स्पष्ट करतात. इथे त्यांचे रामप्रेम, रामभक्ती, रामकृपा उत्युच्च शिखर, गाठताना दिसते.

'धन्य कोण' यांची यादी सांगताना तुलसीदासांची क्रमवारता सशास्त्र चपखल कशी आहे ते स्वामी समजावून देतात. तर त्यानंतर ही रामकथा कोणास व का सांगू नये याचेही विश्लेषण सांगोपांग करून देतात. आणि पुन्हा रामकथेचे अधिकारी कोण आहेत हे साद्यंत सांगण्याने, अन्वय-आणि व्यतिरेक पध्दतीने दोन्हीही प्रकारे सांगितल्याने वाचक वा श्रोता यांच्या मनात रामकथेच्या अधिकारीतेबद्दल यत्किंचितही संदिग्धता रहात नाही.

पुन्हा ह्या रामकथेचा रसिकतेने आस्वाद घेणारे 'ज्ञानी-विज्ञानी रामभक्त' कसे रामप्रेमी बनतात ते स्वामी सुमधुरतेने समजावून सांगतात.

या कठिण कलिकालात आत्मोध्दार करण्याचे साधे-सोपे-सुलभ-सुगम साधन म्हणजे रामकथा होय हे अनेक उदाहरणांनी सुस्पष्ट करतात. 'कलि केवल मलमूल मलिन' असलेने हा मनोमल धुवून प्रत्येक जीव निर्मल करण्याची सुरेख व हमखास कला या रामकथेतच आहे हे सांगून त्यात ही 'पांच सात चौपाया मनोहर' नेमक्या जाणून त्या उरि धरण्याने- कायम धारण करण्याने कोणते सुंदर फळ मिळते हे स्वामी सिध्दहस्तपणे सामान्य जीवाच्याही नेमके गळी उतरवितात. अन्‌ हे

गुरूप्रचिती, शास्त्रप्रचितीसह आत्मप्रचितीनेही तुलसीदासांनी कसे सिध्द करून 'स्वान्तःसुख' प्राप्त करून घेतले आहे ते सांगताना आपणास या तिन्ही प्रचितींचे सुस्पष्ट दर्शन स्वामींना झाल्याचे अगदी स्वानुभवासिध्दतेने जाणवते.

काम अन् लोभ हे विकारही रघुनाथाकडे वळविले की 'विषय तो त्यांचा झाला नारायण' ही आत्मप्रचिती १३० रा व १३० म या दोह्यातून व टीकेतून साक्षात वाचकापर्यंत भिडते.

गूढ असलेली रामकथा शिवस्पर्शाने कशी सुलभ झाली त्याचे वर्म वा मर्म, टीकेतून स्वामी उलगडून दाखवतात.

'मंगलभवन अमंगलहारी'च्या सतत अतिपुनीत स्पर्शाने (नाम-गुण-लीला-कीर्तीच्या) मानव कसे पुण्यमय-शांत-शीतल बनतात ते अमृत-बीजाने कसे भरून जातात ते 'विशेष'सदरातून स्वामी सांगतात. अन् इथे हा सद्ग्रंथ-मानसाचा सटीक प्रवास रामप्रेमात आकंठ बुडून त्या रामनामामृतात समाप्त होतो.

वाचकहो, तुमच्याशी संवाद साधायला प्रारंभ केला म्हणता म्हणता, निरोपाची वेळ येऊन ठेपली देखील! याचाच अर्थ असा की प्रेम-सुख-संवादातली माधुरी अवर्णनीय आहे. कारण श्रीरामप्रभुचे नाम-गुण-लीला-यश सारेच मधुरातिमधुर. वर्णन करणारा व ऐकणारा कधीही थकतच नाही. कारण ही रामकथा आल्हादकता, प्रसन्नता, अतीव सुख-शांती-परम विश्राम देणारी आहे.

यानंतर उत्तरकांडाची १४-१५ परिशिष्टे- यातून सर्व रामरहस्ये साकल्याने स्वामींनी अगदी पदरन् पदर सोडवून उकलून अगदी पारदर्शिपणाने सुस्पष्ट केलेले आहे. ही १४-१५ परिशिष्टे म्हणजे एक छोटेखानी ग्रंथच म्हणायला हरकत नाही. त्याद्वारे टीकाकार-स्वामींनी आपला कमालीचा विनय, कृतज्ञता, सूक्ष्म अभ्यास व रामभक्तीची सर्व रहस्ये सद्गुरू माउलीच्या वत्सलतेने विशद केली आहेत. त्याचबरोबर 'वाचकांनी न्यून पुरते करून त्यास स्वतःची भर घालून ते सरते (सरस) करावे' अशी प्रामाणिक सविनय प्रार्थनाही करून त्याद्वारे जणू श्रीरामचरितमानसाची सखोलता, गंभीरता अन् व्यापकता यापुढे मानवी बुद्धीची अपूर्णता वा शरण्यता दाखवून दिली आहे.

परिशिष्टे ही अक्षरन् अक्षर वाचून सूक्ष्मपणे अभ्यासावी- म्हणजे त्यातूनच रामप्रेम वा रामकृपेची अखंड संततधार बरसत राहीत ही दृढ धारणा- म्हणून प्रस्तावनेत त्याचा केवळ ओझरता उल्लेख केला आहे-त्याबद्दल वाचकहो-क्षमस्व!

आपल्याशी हा सुख-प्रेम संवाद करतानाच्या आनंदास कायमचे वंचित व्हावे लागणार याची एक बोच सतत राहील. असो. तरीहीआपल्या प्रेमाचा वर्षाव सतत होत राहील ही खात्री आहेच.

शेवटी वाचकहो, तुमचा निरोप घेताना श्रीरामप्रभूस- त्या दीनदयाघन-दीन-भक्तवत्सलाची कृपा सर्वांवरच अखंड बरसत राहो ही सद्‌गुरु चरणीं विनीत प्रार्थना!

- प्रज्ञाशिष्या रामदासी.

* * *

अध्याय तेरावा

लोमशमुनि-प्रसंग (११०म - ११४/१)

मा.दो. ।मेरु सिखर बट छायाँ मुनि लोमस आसीन।।
।।देखि चरन सिर नायउँ बचन कहेउँ अति दीन।।११०म.।।
।सुनि मम बचन बिनीत मृदु मुनि कृपाल खगराज।।
।।मोहि सादर पूँछत भए द्विज आयहु केहि काज।।११०चं.।।
।तब मैं कहा कृपानिधि तुम्ह सर्बग्य सुजान।।
।।सगुन ब्रह्म अवराधन मोहि कहहु भगवान।।११०द्रा.।।

म.दो. ।मेरु-शिखरिं वटछाये मुनि लोमश आसीन।।
।।बघुनि चरणिं शिर नमविले वदलो वचन सुदीन।।११०म.।।
।श्रवुनि वचन मम नम्र मृदु मुनि कृपालु खगराय।।
।।मज सादर पुसले द्विज! हेतु आगमनिं काय।।११०चं.।।
।तैं मी वदलो कृपानिधि! तुम्हि सर्वज्ञ सुजाण।।
।।ब्रह्म सगुण आराधना सांगा मज भगवान।।११०द्रा.।।

अर्थ- मेरु पर्वताच्या शिखरावर वडाच्या सावलींत लोमश मुनि बसले होते. त्यांना पाहून मी त्यांच्या चरणांना नमस्कार केला आणि अति दीन वाणीने काही बोललो.।।दो.११०म.।। माझे नम्र व मृदु भाषण ऐकून अहो पक्षिराज! त्या कृपाळू मुनींनीं आदराने मला विचारले की हे द्विज! तुम्ही कोणत्या कारणास्तव आलात?।।११०चं.।। तेव्हा मी म्हणालो की अहो कृपानिधि! आपण सर्वज्ञ व सुजाण आहात. भगवान! सगुण ब्रह्माची आराधना कशी करावी ते मला सांगावे.।।११०द्रा.।।

टीका. दो.म. (१) तो ब्राह्मण हिंडत हिंडत मेरु पर्वताच्या शिखरावर आला. येथे रावणासारख्यालासुद्धा येतां येत नसे, म्हणून इंद्रादि देव या पर्वताच्या गुहात राहात असत. शंकराच्या प्रसादाने याला अव्याहत गति प्राप्त झाल्यामुळेच हा विप्र येथे येऊ शकला. (क) लोमश मुनि- येथे एका वडाच्या झाडाच्या छायेत राहातात. एक कल्प गेले की त्यांच्या अंगावरील एक लोम

(केस) गळून पडतो. इतके दीर्घ जीवी असून झोपडी न बांधता वडाखालीच राहातात. अंगावर जितके केस तितकीं कल्पे जगणारे असून त्यांना आपला देह क्षणभंगुर वाटतो म्हणून ते झाडाखालीच राहातात (स्कं.पु.) धर्मराज युधिष्ठिर वनवासात असतां त्यांच्याकडे येऊन लोमशांनी नाना प्रकारचा उपदेश त्यास केला. (गी.ल.को.) (ख) जेथून लोमशांचे दर्शन झाले तेथूनच त्या विप्राने दण्डवत प्रणाम केला, त्यामुळे नम्रता दिसली. नंतर हात जोडून म्हणाला असेल की आपल्या सारख्या महा तपोनिधि मुनिश्रेष्ठांचे दर्शन अनंत जन्मांच्या पुण्याईनेच मला झाले, आता मी भवभयातून सुटणार अशी खात्री वाटते. यदृच्छेनेच परम भाग्याने मला येथे आणला. इ.

दो.चं. (१) मुनि कृपाल- मुनीनीं त्याच्याकडे दुर्लक्ष केले असते व डोळे मिटून स्वस्थ बसले असते तर या विप्राला जो लाभ पुढे झाला तो झाला नसता. लोमशांसारख्यांनी एखाद्याकडे पाहणे व त्याच्याशी बोलणे म्हणजे सुद्धा मोठीच कृपा. (क) सादर पुसले. त्यानी चौकशी केली हेच आदराचे लक्षण आहे. हा मनुष्य ज्या अर्थी येथे येऊ शकला त्या अर्थी हा कोणी तरी महासिद्ध पुरुष असला पाहिजे असे वाटले म्हणून आदरबुद्धि उत्पन्न झाली, व जिज्ञासा उत्पन्न झाली की येथे येण्यास याचा काही तरि हेतु असला पाहिजे तो समजला तर त्याचे कार्य करता येण्यासारखे असले तर करु, या भावनेने त्यांनी विचारले की कोणत्या हेतूने तुम्ही येथे आलात?

दो.द्रा. (१) तुम्हिं सर्वज्ञ- मी येथे कशासाठी आलो वगैरे सर्व तुम्ही जाणताच, पण विचारलेत म्हणून सांगणे भाग आहे. (क) सुजाण- माझे जे कार्य आहे त्यात आपण पारंगत आहात म्हणून सांगतो. (ख) भगवान- षड्‌गुणैश्वर्य संपन्न. 'जाण किं संत अनंत समानहि' (१०९।१२) या शंकरांच्या आज्ञेप्रमाणे त्याने या संतांस अनंत = भगवान मानले हे येथे दाखविले. जीव जरी षड्‌गुणैश्वर्य संपन्न झाला तरि तो ईश्वराची बरोबरी करु शकत नाही. 'उत्पत्ति प्रलयं चैव भूतानाम् अगतिं गतिं वेत्ति विद्यामविद्यांच स वांच्यो भगवान् इति' हे षड्‌गुणैश्वर्य जीवाला कधीच मिळत नाही. (ग) ब्रह्म सगुण = सगुण ब्रह्म, आराधना = उपासना. याचा भाव हा आहे की सगुण साकाराची उपासना कशी करावी वगैरे सर्व सांगा.

हिं. *।तब मुनीस रघुपति गुन गाथा ।कहे कछुक सादर खगनाथा।।१।।*
।ब्रह्मग्यान रत नुनि बिग्यानी ।मोहि परम अधिकारी जानी।।२।।
।लागे करन ब्रह्म उपदेसा ।अज अद्वैत अगुन हृदयेसा।।३।।
।अकल अनीह अनाम अरूपा ।अनुभव-गम्य अखंड अनूपा।।४।।
।मन गोतीत अमल अबिनासी ।निर्बिकार निरवधि सुखरासी।।५।।
।सो तैं ताहि तोहि नहिं भेदा ।बारि बीचि इव गावहिं बेदा।।६।।
।।बिबिधि भाँति मोहि मुनि समुझावा ।निर्गुन मत मम हृदयँ न आवा।।७।।

म. *।तैं मुनीश रघुपति-गुण-गाथा ।सादर कांहि कथिति खगनाथा!।।१।।*
।ब्रह्मबोध-रत विज्ञानी मुनि ।मला परम अधिकारी जाणुनि।।२।।
।करु लागले ब्रह्म-उपदेश ।अज अद्वैत अगुण हृदयेश।।३।।
।अकल अनीह अनाम अरूप ।अनुभवगम्य अखंड अनूप।।४।।
।मन गोतीत अमल अविनाशी ।निर्विकार निरवधि सुखराशी।।५।।
।ते तू त्यात तुझ्यात भेद नहि ।वारि-वीचि इव गाती वेदहि।।६।।
।।शिकविति मुनि मज विविधपरीं जरि ।निर्गुण मत उतरे न गळीं तरि।।७।।

अर्थ- तेव्हा हे पक्षिराज! मुनीश्वरानी रघुपतीच्या काही गुणकथा आदराने सांगितल्या.।।१।। मग ते ब्रह्मज्ञान (बोध) परायण विज्ञानी मुनि मला परम अधिकारी जाणून ब्रह्माचा उपदेश करु लागले. जे जन्मरहित, अद्वैत, निर्गुण, आणि हृदयेश्वर आहे.।।२-३।। जे पूर्ण (अकल) इच्छारहित, नामरहित, रूपरहित, स्वानुभवानेच जाणतां येण्यासारखे (स्वसंवेद्य) अखंड आणि उपमारहित (अनूप = अनुपम) आहे.।।४।। जे मनाच्या व इंद्रियांच्या अतीत (पलीकडे) मायारूपी मलरहित, अविनाशी, विकाररहित, सीमारहित व सुखाची राशी (सुखघन) आहे.।।५।। वेद वर्णन करतात की तेच तू आहेस जल आणि तरंग याप्रमाणे त्याच्यांत व तुझ्यात भेद नाही.।।६।। मुनि जरी मला नानापरींनी शिकवीत होते तरी निर्गुण मत माझ्या गळीं उतरेना, (मला मान्य झाले नाही.)।।७।।

टीका. चौ.१ <u>(१)</u> <u>गुणगाथा</u> = गुणकथा, थोडेशा, आदराने सांगितल्या. खरोखर येथेच या विप्राची परीक्षा पाहण्यासाठी मुनींच्या बुद्धींत एकाएकी बदल

केला गेला व त्याचा परिणाम असा झाला की रघुपती कथा सांगण्याचे सोडून मुनि ब्रह्मोपदेश करु लागले व आता त्याचा परिणाम विप्राला शाप देण्यात होणार आहे.

चौ.२-३ (१) ब्रह्मबोधरत = ब्रह्मज्ञानरत. ब्रह्मज्ञानाची आवड असलेले. भाव हा की ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्याची त्यांना फार आवड होती. (क) मला परम अधिकारी जाणुनि- साधन चतुष्टयसंपन्न झालेला असेल तो महावाक्याचा उपदेश देण्यास अधिकारी असतो. हा तर परम अधिकारी आहे हे सर्वज्ञ मुनींनी ओळखले. याच्या ठिकाणी त्रिविध एषणा व कोणत्याही वासना नाहीत. हा जीवन्मुक्तासारखाच आहे, फक्त सगुणाचा ओढा आहे तेवढा काढून टाकला म्हणजे झाले हे त्यांनी जाणले. (क) ब्रह्माचा उपदेश मुख्यतः महावाक्याच्या उपदेशाने केला जातो. म्हणून प्रथम तत्पदलक्ष्य जे ब्रह्म त्याचे निरुपण निषेध पद्धतीने करु लागले. अद्वैत = द्वैतरहित असणारे. 'एकम् एव अद्वितीयं ब्रह्म' (श्रुति). हृदयेश = हृदयस्थ ईश्वर, अन्तर्यामी. याने तत्पद वाच्य ईश्वराचा बोध केला. अर्थात हा सगुण निराकाराचा उल्लेख आहे. 'ईश्वर = सर्वभूतांना हृद्देशेर्जुन तिष्ठति'(भ.गी)

चौ.४-५ (१) अकल = निष्कल, कलातीत = पूर्ण, शंकरांना कलातीत म्हटले आहे. (क) अनुभवगम्य- स्वानुभवानेच जाणले जाणारे. ज्ञाता ज्ञान ज्ञेय ही त्रिपुटी नाहीशी झाल्यावर वृत्तिव्याप्तीने जी केवळ ब्रह्माकार स्थिति तोच अनुभव. ते द्वैतरहित असल्याने दुजेपणाने जाणता येत नाही. (ख) निरवधि = अवधिरहित, अवधि = सीमा, मर्यादा परिच्छेद, देशपरिच्छेद, कालपरिच्छेद व वस्तुपरिच्छेदरहित सुखराशी = सुखधन = सच्चित्सुखघन = सच्चिदानंदघन सत्, चित् व सुख (आनंद) एकमेकांस सोडून कधीच राहु शकत नाहीत.

चौ.६-७ (१) ते तूं आहेस. (तत् त्वं असि) हे सामवेदाचे महावाक्य आहे. (छां.उ.) हा परम अधिकारी असल्याने तत् आणि त्वं पदांच्या वाच्यार्थांचे निरुपण येथे केले नाही, एकदम लक्ष्यार्थाशीच ऐक्य दाखविले. ते = ब्रह्म तू (त्वं) = जीव, यांच्यात भेद नाही. 'जीवो ब्रह्मैव नाऽपरः' वारि- वीचि इव, हा दृष्टान्त दिला. वारि = जल, वीचि = लाटा, तरंग. जल आणि तरंग यांच्यात भेद नसून, तरंग म्हणजे जलच, त्याप्रमाणे जीव म्हणजे ब्रह्मच. अशा नाना

प्रकारच्या दृष्टान्तांनी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण निर्गुण मत त्याच्या गळी उतरले नाही. यात त्या विप्राची चूक नाही, त्याने अगदी स्पष्ट शब्दात सांगितले की मला सगुण ब्रह्माची उपासना सांगा असे असता त्याला निर्गुण ब्रह्मविषयक बोध करणे संत गुरु प्रणालीला सोडून आहे. लोमश काही दंभी गुरु संत नाहीत असे असतां त्यांच्याकडून ही चूक घडली ती शिवमायेने मुद्दाम करविली. आता विप्र पुन्हा विनंति करतो.

हिं. */पुनि मैं कहेउँ नाइ पद सीसा /सगुन उपासन कहहु मुनीसा / /८ / /*
/रामभगति जल मम मन मीना /किमि बिलगाइ मुनीस प्रबीना / /९ / /
/सोइ उपदेस कहहु करि दाया /निज नयनन्हि देखौं रघुराया / /१० / /
/भरि लोचन बिलोकि अवधेसा /तब सुनिहउँ निर्गुन उपदेसा / /११ / /
/मुनि पुनि कहि हरि कथा अनूपा /खंडि सगुन मत अगुन निरूपा / /१२ / /
/तब मैं निर्गुन मत कर दूरी /सगुन निरुपउँ करि हठ भूरी / /१३ / /
/उत्तर प्रतिउत्तर मैं कीन्हा /मुनि तन भए क्रोध के चीन्हा / /१४ / /

म. */मग मी विनवि नमुनि पदिं शीस /सगुण उपासन वदा मुनीश! / /८ / /*
/रामभक्ति जलिं मम मन मीन /होइ अलग कस मुने प्रवीण? / /९ / /
/सदय करा उपदेश असा या /निज नयनीं निरखिन रघुराया / /१० / /
/नेत्र भरुनि कोसलेश पाहिन /मग निर्गुण-बोधा आकर्णिन / /११ / /
/मुनि अनुपम हरिकथा निवेदुनि /अगुण निरूपिति सगुणा खंडुनि / /१२ / /
/मी निर्गुण मत निरसुनि दूरी /सगुण निरुपित हट्टे भूरी / /१३ / /
/प्रत्युत्तर उत्तर मी केले /क्रोध चिन्ह मुनि देहिं उदेले / /१४ / /

अर्थ- मग मी पायांवर डोके ठेऊन विनविले की अहो! मुनीश्वर! मला सगुणाची उपासना सांगावी.।।८।। रामभक्तिजळांत माझे मन मासा झालेले आहे ते अहो! प्रवीण मुनीश्वर! वेगळे कसे करता येईल?।।९।। म्हणून आपण दयेने या ब्राह्मणाला असा उपदेश करा की मी आपल्या डोळ्यांनी रघुराज रामचंद्रांस निरखून पाहू शकेन.।।१०।। मी एकदा डोळे भरुन अयोध्यापति रामचंद्रांस पाहीन आणि मग निर्गुण उपदेश श्रवण करीन.।।११।। मुनींनी (पुन्हा) अनुपम हरिकथा सांगून, सगुणांचे खंडण करून निर्गुणाचे निरुपणाच सुरु केले.।।१२।। तेव्हा मी पण निर्गुण मताचे

खंडण (निरास) करुन फार हट्टाने सगुणाचेच निरुपण केले.।।१३।। जेव्हा मी उत्तराला प्रत्युत्तर देऊ लागलो तेव्हा मुनींच्या देहावर क्रोधाची चिन्हे प्रगट झालेली दिसू लागली.।।१४।।

टीका. चौ.८-९ (१) विनविं नमुनि पदिं शीस- ब्राह्मण अत्यंत नम्रतेने मुनींना मोठेपणा देऊन त्यांस सुचवित आहे की मी निर्गुण ब्रह्माविषयी आपणास विचारलेले नसून सगुण ब्रह्माची उपासना सांगण्याविषयीच विनंती केलेली आहे. निर्गुणाचा उपदेश ऐकण्याची माझी इच्छा नाही, म्हणून कृपा करून सगुणाची उपासनाच मला सांगा. (क) रामभक्ति जलिं मम मन मीन- माशाला पाण्यातून बाहेर काढला, पाण्यापासून निराळा केला तर जशी स्थिती होते तशी माझ्या मनाची स्थिती सगुणभक्तिरसातून त्याला बाहेर काढतांना होते, निर्गुणाचे श्रवण ज्या मनाने करावयाचे त्याला सध्या रामभक्तिशिवाय दुसरे काहीही सुखदायक वाटत नाही, त्यामुळे आपल्या उपदेशाचा माझ्या मनावर व बुद्धीवर काहीच परिणाम होत नाही. आपणही भक्ति मार्गात प्रवीण आहातच माझे मन सध्या ज्या दशेत आहे त्या दशेचा अनुभव आपल्यालाही असेलच.

चौ.१०-११ (१) 'सदय करा उपदेश..... रघुराया'- सदय = दयेसह = दयेने. या दीनावर आपण दया करा. माझे मन असे अनावर झाले आहे की श्रीरघुरायाचे रामाचे दर्शन झाल्याशिवाय त्यास दुसरे काहीच गोड वाटत नाही म्हणून मी पुन्हा विनवित आहे की आपण मला सगुणाची उपासना सांगा, आपल्या आज्ञेप्रमाणे उपासना करुन मला श्रीरघुपति रामाचे दर्शन होईल अशी दया माझ्यावर करा. एकदा श्रीरघुनाथ दर्शनाने मनाची तृप्ति झाली म्हणजे मग माझे मन निर्गुणाच्या श्रवणास पात्र होईल. मग आपणच कृपा करुन मला निर्गुणाचा उपदेश केलात की मी तो श्रवण करीन (आकर्णिन = ऐकेन) विप्राने विनयाने येथे स्पष्ट सूचना दिली की मला आपण आता निर्गुणाचा उपदेश करु नका, तो ऐकण्याच्या स्थितीत मी नाही. असे श्रोत्याने स्पष्टपणे सांगितल्यावर सरळ बुद्धीचे संत सद्‌गुरु एकतर त्या श्रोत्याला सांगतील की सगुण उपासना सांगण्याची इच्छा नाही, तुम्हाला हवे असेल तर निर्गुणाचे निरुपण करतो, नाहीतर तुमच्या इच्छेस येईल ते तुम्ही करा. लोमशही सरळ बुद्धीचे, फार दयाळू, उत्तम संत, सद्‌गुरु आहेत, पण पूर्वी सुचविल्याप्रमाणे शंकरानीच

त्यांच्या वृत्तीत मोह उत्पन्न केला आहे त्यामुळे ते आता काय करतात पहा.

चौ.१२ (१) 'मुनि अनुपम हरिकथा निवेदुनि....खंडुनि' शंकरांनी मुनीची वृत्ति फिरविली असल्याने मुनींनी त्याचे चित्त वेधून घेण्यासाठी निमित्त सुंदर अनुपम हरिकथा-रघुपतीकथा सांगितली खरी, पण त्यांनी तो केवळ पूर्वपक्ष मांडला, आणि मग त्या सगुण हरिकथेचे, सगुण मताचे खंडन करुन निर्गुण मताचे प्रतिपादन सुरु केले. (क) पद्धति अशी आहे की वक्ता आधी आपला पक्ष मांडतो, हेतु दृष्टान्त देऊन तो सिद्ध करु लागतो व असे करतांना पूर्वपक्ष स्वतःच पुढे करुन त्याचे खंडन करतो आणि मग आपला पक्ष सिद्धान्तरुप आहे असे ठरवितो, पण लोमशांच्या शिवमाया मोहित मनाला वाटले की निर्गुणमतच आरंभी प्रतिपादन करु लागलो तर हा विप्र कदाचित निघून जाईल, म्हणून त्याला फार प्रिय असणारी रघुपतिकथा सांगितली व सगुणाचे खंडन केले.

चौ.१३-१४ (१) विप्राचे मन रामभक्ति जलांत मासा झालेले असल्याने मुनींचे निर्गुण मत मान्य करणे म्हणजे सगुण भक्तीला आपल्या हातानेच तिलांजलि देण्यासारखे आहे असे विप्राला वाटले ते योग्यच वाटले. त्याने ही निर्गुणाचे खंडन व सगुणाचे मंडन करण्यास हट्टाने प्रारंभ केला. 'भक्तिपक्षि हठ शठता नाही' (७।४६।८) वाग्युध्दासारखेच सुरु झाले. हा भेदभक्ति प्रतिपादन करु लागला व ते अद्वैत प्रतिपादन करुन सगुणाचे खंडन करु लागले. त्यानी मांडले मुद्दे की याने खंडन करावे व याने मांडलेल्याचे त्यानी-मुनींनी खंडन करावे. भुशुंडी भेदभक्ति करणारा आहे हे पूर्वीच स्पष्ट झाले आहे. 'भेदभक्ति वाढे विहंगवर' (७।७९।३) लोमशानी दिलेल्या उत्तराचे हा प्रत्युत्तर = उलट उत्तर देऊन खंडन करु लागला तेव्हा मात्र मुनींच्या मनांतच नव्हे तर शरीरात सुद्धा क्रोधाचा संचार झालेला दिसू लागला. आवाज एकदम चढला, ओठ कंप पावू लागले, चेहरा लाल झाला व कदाचित डोळेही लाल झाले असतील. या क्रोधाबद्दल मुनींना दोषी न ठरविता दोष स्वतःकडे घेतला व एक सिद्धान्त आता सांगतात-

हिं. ।सुनु प्रभु बहुत अवग्या किएँ।उपज क्रोध ग्यानिन्ह के हिएँ।।१५।।
।अति संघरषन जौं कर कोई।अनल प्रगट चंदन ते होई।।१६।।
दो. ।बारंबार सकोप मुनि करइ निरुपन ग्यान।।

।।मैं अपने मन बैठ तब करउँ बिबिधि अनुमान।।१११रा.।।
।क्रोध कि द्वैत बुद्धि बिनु द्वैत कि बिनु अग्यान।।
।।मायाबस परिछिन्न जड जीव कि ईस समान।।१११म.।।

म. *।बहुत अवज्ञा प्रभु जैं घडे।ज्ञान्यांचे मन रोषा चढे।।१५।।*
।करता कोणी अति संघर्षण।करी प्रगट अनलास हि चंदन।।१६।।
दो. *।वारंवार सकोप मुनि ज्ञान चि निरुपितात।।*
।।तैं बसल्या मम मानसीं विविध तर्क उठतात।।१११रा.।।
।द्वैतबुद्धिविण कोप की द्वैत विना अज्ञान।।
।।मायावश परिछिन्न जड जीव किं ईश-समान।।१११म.।।

अर्थ- प्रभु! फार अपमान केला गेल्यावर ज्ञान्यांच्या मनात रोष उत्पन्न होतो (त्याचे मन कोपास चढते)।।१५।। कोणी अतिशय संघर्षण केले तर चंदनांतून सुद्धा अग्नि प्रगट होतो.।।१६।। मुनि वारंवार क्रोधाने ज्ञानाचेच निरुपण करु लागले, तेव्हा मी बसल्या बसल्या तर्क (अनुमान) करु लागलो की.।।दो.१११रा.।। द्वैत बुद्धिशिवाय कोप का येणार आहे? अज्ञानावाचून द्वैत का असू शकेल? मायेला वश होणारा परिच्छिन्न जड जीव ईश्वरासारखा का होणार आहे? (शक्यच नाही).।।१११म.।।

टीका. चो.१५ (१) 'प्रभु' तुम्ही पक्ष्यांचे प्रभु आहात. जर एखाद्या खगाने तुमच्या देखत तुमचा पुष्कळ अपमान केला तर तुम्हाला क्रोध येईल की नाही? जरि गरुड या नात्याने न आला तरि पक्षिराजा या नात्याने येईल व येणे जरुर आहे. तसाच ज्ञानी लोकांचा अति अपमान केला म्हणजे त्याना क्रोध येतो. (क) ल.ठे. या चौपाईच्या प्रत्येक चरणांत १।१ मात्रा कमी आहे. भाव आश्चर्याचा आहे. ज्ञानी माणसाला क्रोध येत नाही, असा सर्व साधारण समज असल्याने ज्ञान्यांना क्रोध येतो हे ऐकून आश्चर्य वाटेल. (ख) येथे संत, साधु, भक्त असा उल्लेख न करतां 'ज्ञानी' असे म्हटल्याने भाव निघतो की संतांना, भक्तांना क्रोध येत नाही. भक्तिप्रधान ज्ञानी संतांना क्रोध येत नाही, कारण ते सर्व जग निज प्रभुमय पाहतात, व ज्ञानी जग मिथ्या मानतात. पण अशा संतांना क्रोध येत नाही असा निरपवाद सिद्धान्त नाही. शंकरांसारखे रामभक्त

व ज्ञानी कोणी नाहीत, पण त्यांनीच क्रोधाने शाप दिला. 'नारद विष्णुभक्त नी ज्ञानी' पण त्यांनी भगवंतास शाप दिला व नंतर ही नलकुबरांस दिला. वसिष्ठ भागवतोत्तम संत, पण त्यांनीही निमि राजाला शाप दिला. सनकादिक विज्ञानी, ब्रह्मलीन, पण त्यांनी जय विजयांस शाप दिले आहेत, परंतु अशा ज्ञान्यांना किंवा भगवद्भक्तांना क्रोध येतो तो भगवंताच्या प्रेरणेने येत असतो, म्हणूनच अशा विभूतींच्या क्रोध मोहादिकांबद्दल शंकरच म्हणाले आहेत की 'कोणि मूढ ना ज्ञानि।। रघुपति करि जैं ज्या जसा होइ तसा तैं प्राणि' (१।१२४). पण हे विद्यामायावश झालेल्या विषयी आहे, अविद्यावश झालेल्यांबद्दल नाही, म्हणून ही उदाहरणे पुढे करून आपल्या क्रोधावर पांघरूण घालणे हिताचे नाही. ज्ञानी व्यक्तीला व ज्ञानी भक्तांना क्रोध येत नाही हा सर्व साधारण नियम आहे. नुसत्या ज्ञान्यांना, ज्ञानी भक्तांपेक्षा क्रोध येण्याची शक्यता जास्त हे मागे अनेक वेळा दाखविले आहे. ज्याला क्रोध आला तो ज्ञानी किंवा संत नाही असे इतरांनी ठरविणे मात्र धोक्याचे आहे. 'प्रकाशंच प्रवृत्तिंच मोहमेव च पाण्डव। न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति' (भ.गी.१४।२२ व २३) यांवरील श्रीज्ञानेश्वरी व यथार्थ दीपिका पहावी. आता दृष्टान्त देतात.

चौ.१६ (१) चन्दनाचें अति संघर्षण करण्याचा दृष्टान्त दिला. चंदन शीतल असतो, त्याचे घर्षण उत्तम प्रकारे केले तरि त्यांतून पिंपळांच्या अरणीप्रमाणे अग्नि प्रगट होणार नाही असा सर्वसाधारण नियम व समज असला तरि अति संघर्षण केले तर त्यांतून सुद्धां अग्नि निघतो. तो अति संघर्षाचा परिणाम आहे, तो चंदनाचा सहज स्वभाव नाही. या दृष्टान्ताने भुशुंडीने सुचविले की लोमशांना त्यावेळी क्रोध आला ही त्यांची चूक नाही, मीच फार हट्टाने उत्तरास प्रत्युत्तर दिले म्हणून त्यांना क्रोध आला. ते चंदनासारखे शीतल पण मीच मर्यादेच्या बाहेर विवाद केला ही चूक माझीच. चंदनाचे संघर्षण करतांना प्रथम ऊष्णतेचा व धुराचा अनुभव जसा येईल तशी क्रोधाची चिन्हे प्रगट झाली. आता शापरूपाने क्रोधाग्नि प्रगट होईल.

दो.रा. (१) मुनि रागा रागाने ज्ञानाचेंच निरुपण करीत राहिले. मुनींनां बराच क्रोध आला आहे असे पाहून त्या विप्राने प्रत्युत्तरे देण्याचे बंद केले व

स्वस्थ बसला, पण त्याचे मन स्वस्थ बसले नाही. नाना प्रकारचे तर्क मन करु लागले. मुनींचे क्रोधाने चाललेले निरुपण कानांत शिरत आहेच. विप्राचे श्रवणाकडे लक्ष राहिले नाही. फार रागावलेल्या माणसाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन तेथेच स्वस्थ बसून राहणे सुद्धां त्या क्रोधाग्नींत तेल ओतण्याचे काम पुष्कळ वेळा करते. असेच झाले हे पुढे दिसेल. (क) खरे पाहिले असतां जिज्ञासु श्रोता वादविवादाला प्रवृत्त झालेला दिसला की वक्त्याने त्यास तसे बजावून तो विषय तेथेच सोडून देणे दोघांच्याही हिताचे असते. मुनींनी असे केले नाही पण ब्राह्मणाने खंडन मंडन बंद केले व स्वस्थ बसला आहे हे पाहून मुनीनींही आपले भाषण बंद करुन उठून जरा पाय मोकळा केला असता, पण शंकरांच्या प्रेरणेने मुनींच्या बुद्धीत मोह उत्पन्न केलेला असल्याने, मुनि ज्ञान बडबडत राहिले व विप्र त्यांच्या भाषणाकडे दुर्लक्ष करुन तर्क करीत बसला. त्या तर्कांचे, अनुमानाचे नमुने पुढे दिले आहेत. पुढील अनेक (२०।२२) अनुमानांपैकी काहीं सिद्धान्तभूत सत्य वचने आहेत तर काही भ्रामक आहेत.

दो.म. <u>(१)</u> द्वैतबुद्धिविण कोप कीं? लोमशमुनि अद्वैत सिद्धान्त प्रतिपादित होते, व त्यांना क्रोध आलेला दिसला त्यावरुन विप्र तर्क करतो की सर्व जर एकच आहे व दुसरे काही नाही तर रागावणार कोणावर? 'यत्र सर्व आत्मा एव अभूत्, तत्र केन कं पश्मेत्, केन कं विजानीयात्' (बृ.उ.) कोण कोणाला पाहणार व कोण कोणाला जाणणार? दोन असल्याशिवाय क्रोध येणार नाही असे त्या विप्राला वाटत आहे. वसिष्ठ, शंकर, सनकादि, नारद, इ. सर्व अद्वैती आहेत, तरि त्यांचे अद्वैत न भंगता, द्वैत उत्पन्न होउ न देता त्यांच्या ठिकाणी क्रोध उत्पन्न झाला म्हणून <u>हे वचन सिद्धान्त मानता येत नाही.</u> <u>(क) द्वैत किं विण अज्ञान? हे वचन सुद्धा सिद्धान्त मानता येत नाही.</u> व्यावहारिक सत्तेत व्यावहारिक भेद अद्वैत्याच्या ठिकाणी असतोच. माती आणि साखर, गंगाजळ आणि दारु, स्वतःचे जोडे आणि पागोटे अशा प्रकारचा भेद (द्वैत) ज्ञान्यांच्या ठिकाणी असतोच. त्या विप्राला वाटले की हे मुनि नुसते शब्दज्ञानी आहेत, अज्ञानी आहेत, म्हणून याना क्रोध आला. <u>(ख) मायावश परिछिन्न जड जीव किं ईश</u>- समान जीव मायेला वश होऊ शकतो हे पूर्वी विस्तारपूर्वक दाखविले आहे. परिछिन्न = परिच्छिन्न, सीमत, मर्यादित. देश काल वस्तु यानी मर्यादित जीव = असतो. ईश्वर मायेचा नियंता आहे, विविध

परिच्छेदरहित आहे. जीव जड अज्ञानी, किंवा अल्पज्ञ असतो. ईश्वर केवळ ज्ञाप्तिमात्र, सर्वज्ञ आहे, म्हणून जीव आणि ईश्वर समान असणे शक्य नाही, हा सिद्धान्त आहे. वाच्यार्थाने जीव व ईश्वर समान नाहीत हे अद्वैती सुद्धा मानतातच, लक्ष्यार्थाने समान आहेत जीवाच्या उपाधीचा व ईश्वराच्या उपाधीचा विचार बाजूस ठेवला की ईश्वर ब्रह्म आहे व जीव ही ब्रह्म आहे. भाग त्याग लक्षणेने समान आहेत. (१।७०।१-२) विप्राचा गैर समज झाला की जीव आणि ईश्वर वाच्यार्थाने सुद्धा समान आहेत असे मुनी म्हणतात.

हिं. *।कबहुँ कि दुख सब कर हित ताकें।तेहि कि दरिद्र परस मनि जाकें।।१।।*
।परद्रोही की होहिं निसंका।कामी पुनि कि रहहिं अकलंका।।२।।
।बंस कि रह द्विज अनहित कीन्हें।कर्म कि होहिं स्वरूपहि चीन्हें।।३।।
।काहू सुमति कि खल सँग जामी।सुभ गति पाव किं परत्रिय गामी।।४।।

म. *।त्या किं दुःख कधिं, इच्छि सकलहित।तो किं दरिद्रि परीस करीं स्थित।।१।।*
।परद्रोहि कीं निर्भय वसती।कामी कधिं अकलंकित असती।।२।।
।वंश किं उरे द्विजाहित करतां।कर्म होति कीं स्वरूप जाणतां।।३।।
।खलसंगें कधिं उपजे सुमति किं।परदारग कधिं पावे सुगति किं।।४।।

अर्थ- जो सर्वांचे हित इच्छितो त्याला (त्यामुळें) कधीं दुःख होतें काय? ज्याच्या हातांत परीस आहे तो कधीं दरिद्री असूं शकेल काय?।।१।। परद्रोही कधीं निर्भय राहूं शकतात काय? कामी कधीं कलंकरहित राहूं शकतात काय?।।२।। ब्राह्मणाचें अहित केल्याने कधीं वंश उरतो (शिल्लक राहातो) काय? स्वरुपाचें ज्ञान (आत्मज्ञान) झाल्यावर कर्मे होतात काय?।।३।। खलांच्या संगतीने कधीं कोणास सुबुद्धि उत्पन्न झाली आहे काय? परस्त्रीगामी कधीं उत्तमगति-सद्गति पावतो काय?।।४।।

टीका. चौ.१ <u>(१) त्या किं दुःख कधिं इच्छि सकलहित</u>- या हिंदी वाक्यांत क्रियापद नाही, म्हणून इच्छितो, चिंतितो हे क्रियापद घेणे योग्य. कारण त्यामुळे हा चरण लोमशांकडे लावता येतो. त्यांची इच्छा विप्रांचे हित व्हावे अशी असल्याने त्याचा अधिकार पाहून उपदेश करण्यास प्रारंभ केला, पण त्यामुळे पुढें त्यास दुःख झाले, म्हणून क्रोध आला, पण लोमशांनी हित करण्याचा

प्रयत्न केला, नुसती इच्छा केली नाही. कवींचा भाव हा आहे की दुसऱ्यांचे, सर्वांचे, हित चिंतण्याने कधीं कोणास दुःख होणार नाही म्हणून परोपकार, परहित करतां न आले तरि परहित व्हावे अशी इच्छा तरि असावी. 'संत सहति दुख परहित लागी' (७।१२१।१५) परहित करणाऱ्या संतांना सुद्धां दुःख सहन करावें लागते. म्हणून येथे हित करणे घेता येत नाही. कलियुगांत 'मानस पुण्य होते' म्हणून मनुष्यानें निदान सर्वांचे हित तरि चिंतावें.

(२) तो किं दरिद्रि परीस करीं स्थित- दारिद्र्य दोन प्रकारचे, मोह-अज्ञानरुपी द्रारिद्र्य आणि धनाचा अभावरूपी दारिद्र्य. ज्ञानरूपी परीस ज्याच्याजवळ असेल त्याच्याजवळ मोह-अज्ञानरुपी दारिद्र्य असू शकणार नाही. मोह-अज्ञान असेल तरच क्रोध येईल असा विचार तो विप्र लोमशांविषयी अद्याप करीत आहे. 'द्वैत किं विण अज्ञान' असे म्हणून अज्ञान कल्पिले व येथे त्याचे कारण विचारांत घेतले. या दृष्टीने हा सिद्धान्त भ्रामक आहे. ज्याच्या हातात परीस आहे तो दरिद्री राहणे शक्य नाही. त्याला लोखंड न मिळाले तरि परीस विकून विपुल धन मिळेल. (क) दुसरा भाव हा आहे की रामभक्तीरुपी परीस शंकराच्या कृपेने माझ्या हातात आहे, तो मला आत्मज्ञान वगैरे सर्व प्रकारचे धन सहज देईल, मग मी त्याच्यासाठी निराळी खटपट का करु? भक्तीला परिसाची उपमा मानसांतच दिलेली आहे. भरताला भरद्वाज सांगतात 'तुम्ही कीर्ति विधु अनुपम केला। रामप्रेम जिथे मृग वसला।। तात वृथा ग्लानी मनिं करतां। करिं परीस दारिद्र्या डरतां।। (२।२१०।१-२)' रामप्रेम = रामभक्ति हा परीस आहे आणि आत्मग्लानिरुपी दारिद्र्य भरत जवळ बाळगीत आहेत. इ.टी. पहावी. रामभक्ती परीस असेल तेथे आत्मज्ञानासाठी प्रयत्न करावा लागत नाही हा सिद्धान्त सत्य आहे.

चौ.२ (१) परद्रोही कीं निर्भय वसती- परद्रोह करणारांना निदान एक तरि भीति असतेच कीं ज्याचा ते द्रोह करतात तो उलट सूड घेईल की काय? कामी व्यक्तीच्या कीर्तीला कलंक लागल्याशिवाय राहात नाही. रावणाचे उदाहरण आहेच. ही वचने सत्य आहेत. येथून लोमशांबद्दलचा विचार सुटला आणि नाना तर्क मन करु लागले.

चौ.३ (१) वंश किं उरे द्विजाहित करतां- द्विज+अहित = ब्राह्मणाचे

अहित. ब्राह्मणाचे अहित करणाऱ्या माणसांच्या आयुष्यात हे फळ न दिसले तरि कालांतराने ते घडतेच. (क) कर्म होति की स्वरुप जाणतां. स्वरुपाचे ज्ञान झाल्यावर कर्मे घडत नाहीत, करता येत नाहीत, असा त्या विप्राचा आशय दिसतो. ज्ञान झाल्यानंतर कर्मे घडत नाहीत म्हणजे करता येत नाहीत हा अर्थ घेतल्यास तो केवळ भ्रम आहे. ज्ञान झाल्यानंतर जे कर्म घडते ते बंधक होत नाही असा अर्थ घेतल्यास हे सिद्धान्तवचन ठरते. 'नहि कश्चित क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्।। कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः' (भ.गी.) देह असे पर्यंत काही ना काही कर्म घडणारच. प्रारब्ध क्षय होईपर्यंत कोणी कितीही ज्ञानी असला तरि कर्म घडतेच. जनक याज्ञवल्क्य, सनकादि, नारद, वसिष्ठ इ. सर्व ज्ञानी होते, पण दगड होऊन राहिले नव्हते, कर्मे करीतच होते.

चौ.४ (१) खलांच्या संगतीने कधीं कोणाला सुबुद्धि उपजत नाही. परस्त्रीगमन करणारास शुभ गति, सद्गति प्राप्त होणे शक्य नाही, त्यानां दुर्गतिच मिळते.

हिं. *।भव किं परहिं परमात्मा बिंदक।सुखी कि होहिं कबहुँ हरिनिंदक।।५।।*
।राजु कि रहइ नीति बिनु जानें।अघ कि रहहिं हरिचरित बखानें।।६।।
।पावन जस कि पुन्य बिनु होई।बिनु अघ अजस कि पावइ कोई।।७।।
।लाभु कि किछु हरिभगति समाना।जेहि गावहिं श्रुति संत पुराना।।८।।

म. *।भविं किं पडति परमात्माविंदक।सुखी होति की कधिं हरि निंदक।।५।।*
।राज्य किं राही नीति न जाणुनि।अघ किं राहि हरिचरित्र वर्णुनि।।६।।
।पुण्याविण किं मिळे यश पावन।अपयश लाभ किं जेथे पाप न।।७।।
।लाभ किं जगिं हरिभक्ति-समान।जी गाती श्रुति संत पुराण।।८।।

अर्थ- परमात्मा = ब्रह्म जाणणारे कधीं भवांत (जन्ममरण चक्रात) पडतात काय? हरिची भगवंताची निंदा करणारे कधीं सुखी होतात काय?।।५।। नीति न जाणतां कधीं राज्य टिकलें आहे काय? हरिचरित्र वर्णन केल्यानंतर कधीं पाप शिल्लक राहते काय?।।६।। पुण्यावाचून कधी पवित्र यश प्राप्त होते काय? आणि पापाशिवाय कधीं अपयश प्राप्त होते काय?।।७।। जिला श्रुती संत पुराणादि वाखाणतात त्या हरिभक्तिसारखा

दुसरा लाभ जगांत आहे काय?।।८।।

टीका. चौ.५-६ (१) भवि किं पडति परमात्मा विंदक- ज्याला वेदांती ब्रह्म म्हणतात, त्यालाच योगी परमात्मा म्हणतात व भक्त भगवान म्हणतात. 'योग दे ज्ञाना। ज्ञान मोक्ष दे श्रुती करि गाना' (३।१६।१) ज्यांनी योगाने ब्रह्मसाक्षात्कार करून घेतला म्हणजेच ब्रह्म जाणले ते मुक्त होतात, ते भवसागरांत पडत नाहीत. 'ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति' 'तुम्हीच होत तो तुम्हा जाणतां' (२।१२७।३). (क) सुखी होति.... हरिनिंदक? भगवंताची निंदा करणारे कधीं सुखी होत नाहीत. या जन्मांत ते फार सुखी दिसत असले तरि मेल्यावर त्यांना अनंत दुःखे भोगावी लागतात. 'हरि गुरू निंदक दर्दुर होतो। जन्म सहस्त्र तीच तनु लभतो।।' (१२१।२३) (ख) राज्य किं राही नीति न जाणुनि- ज्याला राजनीतीचे ज्ञान नसेल त्याचें राज्य फार दिवस टिकत नाही, ते शत्रू जिंकून घेतात. 'राज्य नीति विण.... श्रम फळ पावुनी' (१।२१।८-९) (ग) अघ किं राहि हरि चरित्र वर्णुनि? हरिचरित्रगान, कथन, वर्णन केल्याने सर्व पापांचा संहार होतो, पण सदा सर्व काळ हेच करीत राहिल्याने हे घडते. 'डोंगराला दुखणे व शिंपीत ओखद' असे करुन भागणार नाही. 'रामचरित....। शमन पाप संतापा शोका' (१।३२।५). 'रामकथा कलिकलुष विभंजनि' (१।३१।५) 'एतद् देवदेवस्य विष्णोः कर्माणि जन्म च। कीर्तयेच्छ्रद्धया मर्त्यः सर्व पापैः प्रमुच्यते'(भाग)

चौ.८ (१) लाभ किं जगिं हरिभक्तिसमान- ज्या भक्तीची प्रशंसा वेदपुराणे व संत यानी केली आहे ती वैराग्य ज्ञान संयुत प्रेमभक्ति होय. 'श्रुतिसंमत हरिभक्ति पथ संयुत विरति विवेक' (१००म) अशा भक्तीच्या लाभासारखा लाभ जगात दुसरा नाही. 'सकल फलहि हरिभक्ति सुशोभन' (१२०।१८) 'तव पदपद्मीं प्रीति निरंतर। सकल साधनां हे फल सुंदर' (४९।४) 'साधन जितकी श्रुतिवाखाणी। सर्वां फल हरिभक्तिभवानी।'(१२६।७) म्हणूनच सगुण साक्षात्कार झाल्यावर. रघुपती दर्शन झाल्यावर अत्रि, भरद्वाजादि मुनि, विदेही जनक, वसिष्ठ इत्यादिकानी व भुशुंडीने प्रेमभक्तिच भगवंताजवळ मागितली. हरिभक्ती किती दुर्लभ आहे याचे वर्णन दो.५४च्या चौपायात पाहावे.

हिं.।हानि कि जग एहि सम किछु भाई।भजिअ न रामहि नर तनु पाई।।९।।

।अघ कि पिसुनता सम कछु आना।धर्म कि दया सरिस हरि जाना।।१०।।
।एहि बिधि अमिति जुगति मन गुनऊँ।मुनि उपदेस न सादर सुनऊँ।।११।।
।पुनि पुनि सगुन पच्छ मैं रोपा।तब मुनि बोलेउ बचन सकोपा।।१२।।

॥ ।या सम हानि असे कीं जगतीं।नरतनु मिळुनिहि राम न भजती।।९।।
।पाप पिशुनते सम कीं आन।धर्म कि दयासदृश हरियान।।१०।।
।असे तर्क मनिं करुं भाराभर।मुनि उपदेश न ऐकूं सादर।।११।।
।सगुण-पक्ष घडि घडि मी स्थापित।तैं मुनिवर वदले क्रोधान्वित।।१२।।

अर्थ- मनुष्य देह मिळून सुद्धां श्रीरामाचें भजन न करणें या सारखी दुसरी हानि जगांत आहे काय?।।९।। चहाडखोरपणासारखे दुसरे पाप आहे काय? हे हरिवाहना! दयेसारखा दुसरा धर्म आहे काय?।।१०।। असे भाराभर तर्क मी करीत बसलो आणि मुनींचा उपदेश आदराने श्रवण केला नाही.।।११।। मी घडोघडी सगुणाचा पक्षच सिद्ध करीत राहिलो, तेव्हा मुनिश्रेष्ठ क्रुद्ध होऊन म्हणाले की—।।१२।।

टीका. चौ.९-१० (१) श्रीरामभक्ती सारखा परम श्रेष्ठ लाभ दुसरा नाही. असा जो परमोत्तम लाभ व जो मनुष्य जन्मांतच मिळू शकतो, आणि जीवाने जो मिळवावा म्हणून ईश्वराने सुर दुर्लभ मनुष्यदेह दिला आहे तो रामभक्तीरुपी लाभ मिळविण्याचा प्रयत्न मनुष्याने न करणे यासारखी दुसरी हानी मनुष्य देह मिळालेल्या जीवाची नाही. रघुपतीला शरण जाऊन त्याचे भजन न करणे ही सर्वांत मोठी हानी आहे. (क) पाप पिशुनते सम कीं आन- पिशुनता = चाहडी करणे, परदोषांचे वर्णन करणे याच्यासारखे पाप नाही. येथे पिशुनतेत परनिंदेचा अन्तर्भाव केलेला आहे कारण की सर्वांत अति घोर पाप कोणते या प्रश्नांचे उत्तर भुशुंडीनेंच 'परनिंदा अघ अधिक गिरीशा' (१२१।२२) परनिंदेत असत्य आणि परदोष वर्णन ही दोन्ही पातकें असतात. 'नहिं असत्य सम पातकपुंजा.' येथे परनिंदेचा अंतर्भाव केला तरच या तिन्ही वचनांचा समन्वय होतो १२१।२२ टीका पहावी. (ख) धर्म किं दया सदृश हरियाना, 'दया धरमका मूल है' 'धर्ममूळ आहे दया' (प्रज्ञा). 'परम धर्म वेदोक्त अहिंसा' असे पुढे भुशुंडीनेच सांगितले आहे. दया असेल तर अहिंसेचे पालन करतां येते

म्हणून येथे अहिंसेच्या कारणांत दयेत अहिंसेचा अंतर्भाव होतो. "भूतांची दया हे भांडवल संता" रामभक्ति लाभ होण्यास पिशुनतेचा त्याग व दयेचे पालन केले पाहिजे हे येथे सुचविले आहे. (ग) हरियान = गरुड, हरिवाहन हा एक अर्थ आहेच पण यान = जाणे, गमन. हरिकडे, हरिजवळ गमन करण्यास दयारूपी धर्माचे पालन केले पाहिजे. हिंसा करता नये, दया असेल तरच क्षमा करता येते.

चौ.११-१२ (१) अशा प्रकारचे अगणित तर्क करीत तो ब्राह्मण काही वेळ स्वस्थ राहिला होता मुनीच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते, कारण त्या विषयाबद्दल आदर वाटत नव्हता. पण पुन्हा पूर्वीप्रमाणे सगुणाचा पक्ष सिद्ध करण्यासाठी निर्गुणपक्षाचे खंडन करु लागला. हे अति संघर्षणानंतर पुन्हा अत्यंत संघर्षण केले गेल्याबरोबर धुमसणाऱ्या क्रोधाग्नीतून ठिणग्या उडू लागल्या. मुनी क्रोधाने म्हणाले-

हिं. /*मूढ परम सिख देउँ न मानसि /उत्तर प्रत्युत्तर बहु आनसि ।।१३।।*
/सत्य बचन बिस्वास न करही /बायस इव सबही ते डरही ।।१४।।
/सठ स्वपच्छ तव हृदयँ बिसाला /सपदि होहि पच्छी चंडाला ।।१५।।
/लीन्ह श्राप मैं सीस चढाई /नहिं कछु भय न दीनता आई ।।१६।।

म. /*मूढ सुबोधा करु न मानसी /उत्तर प्रत्युत्तर बहु करसी ।।१३।।*
/सत्य वचनिं विश्वास न धरसी /वायस इव सर्वा घाबरसी ।।१४।।
/शठ तव हृदीं स्वपक्ष विशाल /हो सपदीं पक्षी चांडाल ।।१५।।
/मी मस्तकिं धृत मुनिशापाला /भय न दीनता जरा मनाला ।।१६।।

अर्थ- मूढा! मी तुला उत्तम प्रकारचा उपदेश करीत असतां तू मानीत नाहीस आणि उत्तर प्रत्युत्तर करतोस.।।१३।। सत्य वचनावर(सुद्धा) विश्वास ठेवीत नाहीस आणि कावळ्या सारखा सर्वांनाच घाबरतोस.।।१४।। अरे शठा! तुझ्या हृदयांत स्वतःचाच पक्ष फार विशाल आहे, म्हणून तू आताच्या आता चांडालपक्षी (= कावळा) हो!।।१५।। मी मुनींचा शाप शिरोधार्य मानला (शिरसामांन्य केला) त्याने मला जरा सुद्धा भय वाटले नाही कीं दैन्य वाटलें नाही.।।१६।।

टीका. चौ.१३-१४ (१) <u>'मूढ सुबोधा करुं न मानसी'</u> विप्राने स्पष्ट सांगितले असता त्याच्या इच्छेविरुद्ध हट्टाने मुनि सुबोध = उत्तम उपदेश, म्हणजे ब्रह्मज्ञानाचा उपदेश करीत राहिले हेच फार चुकले व उलट त्यालाच दोष दिला जात आहे! हा मायाप्रेरित क्रोधाचा परिणाम आहे. उत्तम पंचपक्वाने असली व वाढणारा उदार असला तरि जो म्हणतो की मला पचत नाहीत, त्याला आग्रह करणे चुकीचेच. विप्रानेही अशा समर्थ महामुनींशी वादविवाद करणे योग्य नव्हते. निर्गुण उपदेश ऐकण्याची इच्छा नव्हती तर महामुनींची क्षमा मागून वंदन करुन परत जाणे हाच सरळ मार्ग होता, पण दोघेही हट्टास पेटले. लोमशांकडून हे जे घडत आहे ते विप्राची परीक्षा घेण्यासाठी शंकर खेळवीत आहेत. त्याने पुन्हा उत्तरास प्रत्युत्तर देण्यास प्रारंभ करताच मुनींचा कोप अनावर झाला. <u>(क)</u> <u>सत्य वचनिं विश्वास न धरसी</u>- तुला सत्य सिद्धांत सांगत असतां त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाहीस. आणि कावळा जसा त्याचे हित करण्यास प्रवृत्त झालेल्या त्याला भाकरीचे तुकडे घालणाऱ्यास सुद्धा घाबरतो तसा तू तुझ्या हिताचे सिद्धांत मान्य करण्यास घाबरत आहेस.

चौ.१५ <u>(१)</u> शठ = पढत मूर्ख, लबाड. स्वपक्ष = आपला पक्ष. येथे भक्तिपक्ष 'भक्तिपक्षि धरिला हट' (११४म) असे भुशुंडी पुढे सांगतो. पक्ष = बाजू, प्रमेय, मत. आपले मत आपला सिद्धांत सोडण्यास तू तयार नाहीस. मुनींनी त्याच्या पक्षाचे खंडन केले तरीही हा अशास्त्रीय, भ्रामक, अर्धसत्य विधानें पुढे करून स्वतःचाच पक्ष मत प्रस्थापित करीत राहिला. पक्ष = पंख. पक्ष आहेत ज्याला तो पक्षी. <u>(क)</u> <u>सपदीं</u>- तत्क्षणीं, ताबडतोप. दुरभिमानाने स्वपक्षाचा हट्ट धरला म्हणून पक्षी होण्याचा शाप दिला. हितकर्त्याला घावरणाऱ्या चांडाल पक्ष्यासारखा वागला म्हणून चाण्डालपक्षी = कावळा हो असा शाप दिला. कावळा पक्ष्यात चांडाल आहे.

चौ.१६ <u>(१)</u> शाप शिरसावंद्य मानून मान्य केला. आनंदाने स्वीकारला. शंकराच्या आशीर्वादाने कोणत्याही देहांत राहून मनुष्य देहाचे मुख्य कर्तव्य त्याला करता येत असल्यामुळे आपल्याला दैन्यावस्था प्राप्त झाली असे वाटले नाही व भयही वाटले नाही. उलट आनंदच वाटला असेल की आता वस्त्र, पात्र,अन्न इत्यादींचा संग्रह करायला नको, आश्रम = झोपडी नको, दुष्ट

चांडाळपक्षी म्हणून कोणाचा उपसर्ग होणार नाही, इत्यादि कितीतरी फायदे होणार!

हिं.दो. ।तुरत भयउँ मैं काग तब पुनि मुनि पद सिरु नाइ।।
।।सुमिरि राम रघुबंसमनि हरषित चलेउ उडाइ।।११२रा.।।
।उमा जे राम चरन रत बिगत काम मद क्रोध।।
।।निज प्रभुमय देखहिं जगत केहि सन करहिं बिरोध।।११२म.।।

म.दो. ।तत्क्षणीं झालो काक मी मुनि पदिं शिर नमवून।।
।।स्मरुनि राम रघुवंशमणि उडत निघें हर्षून।।११२रा.।।
।रामचरणिं रत जे उमे! गत मद काम-क्रोध।।
।।निज प्रभुमय जग पाहती करिति कुणाशिं विरोध।।११२म.।।

अर्थ- त्याच क्षणीं मी कावळा झालो आणि मुनिचरणीं मस्तक नमवून, रघुवंशशिरोमणी श्रीरामाचे स्मरण करुन हर्षित होउन उडत निघालो.।।११२रा.।। उमे! श्रीरामचरणीं रत असून जे अभिमान, काम क्रोध इत्यादि रहित असतात ते सर्व जग आपल्या प्रभुने भरलेले (प्रभुमय) पाहतात. मग विरोध कोणाशी करणार?।।११२म।।

टीका. दो.रा. <u>(१)</u> <u>झालो काक मी.</u> एका क्षणांत त्या ब्रह्मदेहाचे रुपांतर काक देहात झाले. मनुष्य देह अदृश्य होऊन त्याच्या जागी कावळा दिसू लागला. मनुष्य देह मरुन पडला व काक देह धारण केला असे झाले नाही. हे जसे शापामुळे घडले त्याप्रमाणेच अनेकांनी आपल्या इच्छेने अशाच प्रकारे निरनिराळी रुपे घेतली आहेत. कालकेतु, सती, अयो.कां.<u>सीता</u> स्वतःच अनेकरूप झाली, शूर्पणखा, रावण, मारीच, हनुमान, सुरसा, रावणाचे गुप्तहेर, अशी उदाहरणे प्रत्येक काण्डांत आहेत. <u>वाटेल त्या पदार्थाचे वाटेल त्या पदार्थात रुपांतर करु शकणारे सूर्यविज्ञान श्रीस्वामी विशुद्धानंद यांस अवगत होते</u>. कल्याण मासिकाच्या योगांकांत 'सूर्यविज्ञान' विषयी माहिती महामहोपाध्याय गोपिनाथ शास्त्री कविराज एम्.ए.डी.लीट् यांनी दिलेली पाहावी. पण त्यास एक स्फटिकाचे यंत्र व सूर्यप्रकाश यांची मदत लागत असे. <u>येथे</u> <u>घडले हे मनोविज्ञानशास्त्राच्या प्रभावाचे कार्य आहे</u>. मन = संकल्पविकल्प.

संकल्प शब्दाच्या आधारानेच असतो. <u>हा शाप हे अचिंत्य शब्द शक्तीचे उदाहरण</u> आहे. <u>(क)</u> <u>मुनिपदिं शिर नमवून</u>- ज्या मुनीने मूढ, शठ, अविश्वासी, भित्रा, अभिमानी वगैरे म्हणून क्रोधाने कावळा होण्याचा शाप दिला त्याच्या पायांना त्या काकाने भुशुंडीने आदराने नमन केले! हे अक्रोधता, निरभिमानता, परमनम्रता यांचे आदर्शरुप आहे. अमुक देह असावा असे वाटले नाही हे अमानिता व यदृच्छालाभसंतोष यांचे निदर्शक आहे. काक देह प्राप्त झाल्यावर हर्ष झाला, नमन केले व श्रीराम स्मरण केले. याने दिसले की काक देह असून काक स्वभाव नाही. हे सर्व ऐकून उमेच्या मुखावर आश्चर्याची छटा दिसली म्हणून महेश मधेच सांगतात.

दो.म. <u>(१)</u> निज प्रभुमय जग कोणाला दिसते हे येथे सांगितले आहे. श्रीरामचरणीं रति-दृढप्रेम असून जे कामक्रोध लोभ मोहादि विकाररहित असतील त्यांना जग निज प्रभुमय दिसू लागते, व कोणाशी विरोध वगैरे करण्याची वृत्तीच उत्पन्न होत नाही. तथापि निज प्रभुमय जग पाहण्याचा अभ्यास सदा सावध राहून करणे हे कामक्रोधादिकांना जिंकण्याचे सहज सोपे प्रभावी साधन आहे, व त्यायोगे रामप्रेमाची ही प्राप्ती होते. लोमशांसारख्या मुनीला क्रोध येऊन त्यांनी शाप का दिला याचे रहस्य आता भुशुंडी गरूडास सांगतो ते त्याच्या राममय भावनेस धरूनच सांगतो. सूचना- काक देह कसा मिळाला या प्रश्नाचे उत्तर येथ पर्यंत दिले.

हिं. *।सुनु खगेस नहिं कछु रिषिदूषन।उर प्रेरक रघुबंस बिभूषन।।१।।*
।कृपासिंधु मुनि मति करि भोरी।लीन्ही प्रेम परीच्छा मोरी।।२।।
।मन बच क्रम मोहि निज जन जाना।पुनि मुनि मति फेरी भगवाना।।३।।
।रिषि मम महत सीलता देखी।राम चरन बिस्वास बिसेषी।।४।।
।अति बिसमय पुनि पुनि पछिताई।सादर मुनि मोहि लीन्ह बोलाई।।५।।
।मम परितोष बिबिध बिधि कीन्हा।हरषित राम मंत्र तब दीन्हा।।६।।

म. *।श्रुणु खगेश काहि न ऋषि दूषण।प्रेरक हृदिं रघुवंश विभूषण।।१।।*
।कृपासिंधु मुनिमतिस भुलविती।माझी प्रेम-परीक्षा घेती।।२।।
।मनवचकृतिं मज निज जन जाणति।मग भगवान् फिरविती मुनिची मति।।३।।
।ऋषि मम महच्छीलता पाहति।रामचरणिं विश्वास तसा अति।।४।।

।अति विषण्ण घडिघडि पस्तावति।सादर मुनि मजला बोलावति।।५।।
।मम परितोष परोपरिं करुनी।राममंत्र मज दिला हर्षुनी।।६।।

अर्थ- हे खगेश! ऐक, त्यात ऋषींचा काही सुद्धा दोष नाही. रघुवंशविभूषण श्रीराम सर्वांच्या हृदयांत प्रेरक आहेत.।।१।। त्या कृपासागराने मुनींच्या बुद्धीला भूल पाडून माझ्या प्रेमाची परीक्षा घेतली.।।२।। मी मनाने वाणीने व कृतीने निजदास आहे असे जाणले आणि भगवंतानी पुन्हां मुनींची बुद्धि फिरविली.।।३।। ऋषींनी माझे महापुरुषांसारखे शील पाहिले आणि रामचरणी अत्यंत विश्वास पाहिला.।।४।। तेव्हा ते अति खिन्न होऊन पुनःपुन्हां पश्चात्ताप करु लागले, नंतर मुनींनी मला आदराने जवळ बोलावला.।।५।। त्यानी परोपरीनीं मला संतुष्ट केला आणि हर्षित होऊन मला राममंत्र दिला.।।६।।

टीका. चौ.१ (१) लोमशांनी शाप दिला यात कोणालाही मुख्य दोष त्यांचाच दिसतो, म्हणून भुशुंडी सांगतो की 'काहीं न ऋषिदूषण' ऋषींचा काहीही दोष नाही, कारण की ते त्यांच्या मूळ स्वभावानुसार घडले नाही, 'प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण.' रघुवंशशिरोमणी राम सर्वांच्याच हृदयांत प्रेरक आहेत. एखाद्या व्यक्तीकडून आपल्या स्वभावाविरूद्ध गोष्ट घडते तेव्हा ती रघुपतीच्या प्रेरणेने घडली आहे, त्या व्यक्तीने केलेली नाही असे समजावे. राममय जग पाहण्याचा अभ्यास करीत असतां इतरांच्या आचरणाकडे पाहतानां भावना कशी ठेवावी हे येथे दाखविले आहे. (ल.ठे.) मुनींच्या बुद्धीत जो मोह उत्पन्न केला तो वास्तविक पाहतां रघुपतीनी केलेला नसून शंकरांनी उत्पन्न केला होता व प्रेम परीक्षा पाहण्याच्या हेतूने न करता हा संतांना अनंतासमान मानतो की नाही? की त्यांचा अपमान करतो ही परीक्षा पाहण्यासाठी केला होता. शाप देणाऱ्या संताला सुद्धा नमन केले यावरून संत अनंतासमान मानीत असल्याचे सिद्ध झाले व मुनींचा काहीच अपमान केला नाही हे दिसले तेव्हा शंकरांनी मुनींच्या बुद्धीतील मोह काढून घेतला. त्या विप्राला काकाला वाटले ते राम उपासकाच्या भावनानुसार योग्यच वाटले. शंकरांनीच हा बुद्धीभेद केला हे पुढे साधार सिद्ध केले आहे.

चौ.२ (१) माझी प्रेमपरीक्षा घेती- माझ्या प्रेमाची परीक्षा घेण्यासाठी बुद्धि

प्रेरक श्रीरघुपतींनी मुनींच्या बुद्धीत मोह उत्पन्न केला. त्यामुळे मी पाया पडून विनंत्या केल्या तरी सगुणोपासना न सांगता हट्टाने अगदी उलटच करु लागले. मुनि क्रुद्ध झालेले पाहून मी सगुण भक्तीचा त्याग करुन निर्गुणाचे चिंतन मानापमानाच्या आधारे करु लागतो की काय इ. पाहण्यासाठी प्रभूनींच ते सर्व करविले.

चौ.३-४ (१) मनवचकृतिं मज निज जन जाणति- मनाने सगुणाचा पक्ष मुळीच सोडला नाही, वाणीने त्याचेच मंडन केले, मुनी क्रुद्ध झालेले दिसले तरी सगुणाचा हट्ट सोडला नाही. सगुणाच्या दर्शनासाठी विनवण्या केल्या, आणि कृतीने शाप देणाऱ्या मुनींना सुद्धा रामरूप मानून वंदन केले. याप्रमाणे मनवचकृतिने या परीक्षेत उत्तीर्ण होताच मुनींची बुद्धि पुन्हा फिरविली तेव्हा ते स्वाभाविक स्थितीत आले. (क) महच्छीलता- महतां शीलं महच्छीलं, तस्य भावः अस्तित्व = महच्छीलता. महापुरुषांचे शील- स्वभाव असलेला पाहिला. निर्भयपणा, अक्रोधता, धैर्य, यथालाभ संतोष, अत्यंत लीनता, अभिमानाचा पूर्ण अभाव इ. (ख) रामचरणिं विश्वास तसा अति- तसा = महापुरुषांचा असतो तसा अति विश्वास- रामचरण शब्दाने सगुण साकाराचा बोध केला. इतका अत्यंत दृढ विश्वास दिसला की मुनींनी सगुण उपासनेचे नाना प्रकारे खंडन केले. अपशब्द बोलले, रागावले खूप, तरि विश्वास तिळमात्र कमी झाला नाही.

चौ.५-६ (१) 'अति विषण्ण घडि घडि पस्तावति' महाभगवद्भक्त, परमविरागी, जितेंद्रिय महापुरुषाचा अपमान माझ्याकडून झाला याबद्दल मुनींना फार वाईट वाटू लागले अशा महापुरुषाला मी क्रोधाने शाप दिला! किती मोठा अपराध मी केला! बरे आता तो वाग्बाण परत घेता येत नाही, बदलता येत नाही, काय केले हे! इ. प्रकारे पश्चात्ताप करु लागले, व त्याला मुनींनी आदराने बोलावून घेतला. (क) 'मम परितोष.... हर्षुनी' त्याला जवळ घेऊन वात्सल्यपूर्ण हृदयाने त्याच्या अंगावरुन हात फिरविला. तू वाईट वाटून घेऊ नकोस, तुझी काहीच चूक नाही. मीच काहीतरी वेडेवाकडे कसे बोललो व क्रोध कसा आला याचे भानही राहिले नाही, क्रोध का आला व मी हट्टास कसा पेटलो याचा उलगडाच होत नाही. पण आता काय उपयोग? व्हायचे ते होऊन गेले. तुला सगुण ब्रह्माची उपासना पाहिजे ना? सर्व काही सांगतो बरं

जे झाले त्याचा वचपा चांगलाच भरुन काढतो बघ! चल ये पाहू. आधी मी तुला श्रीराममंत्राची दीक्षा देतो, मंत्र देतो हं! असे म्हणून श्रीराम षडक्षर मंत्र रामबीज असलेला दिला. अशा महामुनीश्वराकडून अशा परम अधिकारी रामप्रेममय हृदय झालेल्या साधकाला मंत्र मिळाल्यावर मग काय! दक्षिण कर्णात मंत्राक्षरें शिरतांच हृदयांत श्रीबालरघुपतीचे सचेतन दर्शन झाले असेल. ल.ठे. गुरु अनुग्रहसमर्थ मंत्रसिद्ध झालेले, मंत्रोपदेशविधिमर्मज्ञ, शिष्य वत्सल व निःस्वार्थी असतील आणि शिष्य सत्वगुणसंपन्न, प्रेमळ, विश्वास श्रद्धावान व सरळ हृदयांचा असेल तर या कलिकालातही असे सहज घडते हे अनुभवसिद्ध आहे.

हिं. *।बालकरूप राम कर ध्याना।कहेउ मोहि मुनि कृपानिधाना।।७।।*
।सुंदर सुखद मोहि अति भावा।सो प्रथमहिं मैं तुम्हहि सुनावा।।८।।
।मुनि मोहि कछुक काल तहँ राखा।रामचरितमानस तब भाषा।।९।।
।सादर मोहि यह कथा सुनाई।पुनि बोले मुनि गिरा सुहाई।।१०।।

म. *।बालरूप रामाचें ध्यान।शिकविती मज मुनि कृपानिधान।।७।।*
।सुंदर सुखद मला अति रुचलें।तें मीं पूर्विंच तुम्हांस कथिलें।।८।।
।काहिं काल मुनि मजसी राखति।रामचरितमानस तैं भाषति।।९।।
।सादर मज ही कथा ऐकवुनि।मग वदले सुंदर वचना मुनि।।१०।।

अर्थ- कृपानिधान मुनीनीं मला बालरूप रामचंद्रांचे ध्यान (व ते कसे करावे हे) शिकवले.।।७।। सुंदर आणि सुखदायक हे ध्यान मला फार फार आवडले. ते मी तुम्हाला पूर्वीच (म्हणजे रामचरितमानस कथा सांगतानां, म्हणजे १।१९९।१-१२ मध्ये जे वर्णिले आहे ते सांगितले आहे.)।।८।। मुनीनीं मला काही काळ आपल्याजवळ ठेऊन घेतला, तेव्हा (त्या काळात) रामचरितमानस मला सांगितले.।।९।। ही कथा मला आदराने सांगून मग मुनि सुंदर वचन बोलले.।।१०।।

टीका. चौ.७-८ <u>(१)</u> <u>कृपानिधान</u>- ज्या मुनीनीं स्वखुषीने, उत्साहाने व आनंदाने नाममंत्रोपदेश केला त्यांनीच आधी सगुणाचे खंडन करून संक्रुद्ध होऊन घोर शाप देणे स्वाभाविक नव्हते. इष्ट देवतेच्या सिद्ध मंत्राची यथाविधी दीक्षा उपदेश देणे व इष्ट देवतेचे ध्यान सांगून ते कसे कोठे (शरिरातील

...(कोणत्या रचनी) करावे वगैरे जे शिकवितात ते फार मोठी कृपा करतात हा ...गेश 'कृपानिधान' शब्दाने सुचविला आहे. या दोन गोष्टी देणे ... म्हणजे मनुष्य जन्माचे सार्थक करण्यास लागणारे सर्व निधान सर्व ... देण्यासारखे आहे. ल.ठे. मंत्रोपदेश करण्याचे कार्य ज्यांचा मंत्र चेतन ... अशांनीच योग्य अधिकारी पाहून करण्याची परंपरा तुटली. ...च्या पुत्रपौत्रादि नातेवाइकांनी किंवा थोडीशी तपश्चर्या केलेल्या इतरांनी ...उदरभरणाचे, कुटुंब पोषणाचे, चैनी करण्याचे व धनपूजा सन्मान मिळवण्याचे ... साधन म्हणून मंत्र देण्याचा धंदा सुरु झाला आहे, अनुभव येत नाहीसे झाले, अंध परंपरेने चालत आलेल्या भ्रमांचा सुळसुळाट झाला, दंभ वाढले, ...इत्यादि अनेक <u>अनर्थ कलिराजाच्या प्रभावाने सुरु आहेत!</u>

(२) ध्यान- ज्या मंत्राचे जे ध्यान श्रुती पुराणादि ग्रंथात सांगितले आहे त्या विशिष्ट रूपाचे ध्यान यथाविधी केले असता त्या मंत्रमूर्तीच्या कृपेने पंचक्लेशांचा नाश सहज होतो. उपासकाचा दास्यादि जसा भाव असेल त्याप्रमाणे ध्यानाची रीति बदलते. मानसांतच पायांचा तळव्यांपासून केसांपर्यंत, केसांपासून पायांच्या तळव्यापर्यंत, कमरेपासून मुखापर्यंत असे अनेक प्रकार ...लेले आहेत ते त्या त्या ठिकाणी गूढार्थ चंद्रिकेत स्पष्ट दिसतील. <u>(क) ते मी पूर्वीच तुम्हास कथिले</u>- पूर्विच रामचरितमानस कथा काकाने गरुडास सांगितली तेव्हा. तिची अनुक्रमणिका शंकरानी 'अति अनुरागें प्रथम भवानी। रामचरितसर सुंदर वानी' (७।६४।७) पासून 'कथा समस्त भुशुंडी वानी।जी मी वदलो तुम्हां भवानी' (७।६८।७) पर्यंत सांगितली. तीच सविस्तर कथा शंकरांनी भवानीस सांगितली. व 'उमे कथा मी सकल वर्णिली। भुशुंडीने जी गरुडा कथिली' (७।५२।६) असा उपसंहार केला, म्हणून लोमशाने भुशुंडीस जे सांगितले ते ध्यान म्हणजे शंकरांनी भवानीस सांगितलेल्या कथेंत वर्णन केलेले बालरूपाचे ध्यान. त्याचे वर्णन बा.कां.१९९।१-१२ या चौपायांत आहे. म्हणून ते ध्यान म्हणजे १।१९९।१-१२ मध्ये वर्णिलेले बालरूपाचे ध्यान. ते ज्याला हृदयांत दिसू लागेल त्याला ते किती सुंदर व सुखदायक ठरते वाटते हे दुसऱ्याला सांगता येणे त्याला सुद्धा शक्य नसते. ।।त्याचें तोच जाणतो सुख तें।।प्रज्ञा।। <u>(ख)</u> ध्यान धरणें किंवा ध्यान करणे म्हणजे डोळे मिटून ध्यानाच्या वर्णनाचा श्लोक वगैरे नुसता मनात उच्चारणे नव्हे. श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणे मूर्तीच्या

अवयवांची निर्मिती मनाने करुन अंतर्दृष्टीने त्यांच्याकडे बघत स्थिर राहणे हेच ध्यानाचे लक्षण आहे. (ग) काक भुशुंडी नीलगिरीवर जे भजन करीत असतो त्यात ध्यान, जपयज्ञ, मानसपूजा व रामकथा सांगणे या चार साधनांचाच उल्लेख केलेला आहे. (७।५६।४-८) त्यातील ध्यानास व मानसपूजेस आवश्यक अशा रूपाचे ध्यान व ते करण्याचा विधि लोमशांच्या कृपेने समजला, जपयज्ञास आवश्यक असलेला राममंत्र लोमशांकडूनच मिळाला. रामकथा सांगण्यास आधारभूत असलेली रामचरितमानस कथा त्याला कशी कोणाकडून श्रवण करण्यास सापडली हे आता सांगतात.

चौ.९-१० (१) लोमश मुनींनी काकाला काही दिवस आपल्या जवळ ठेऊन घेतला व त्या काळात त्याला श्रीरामचरितमानस सांगितले. रामचरितमानस सांगण्यास प्रारंभ केला हे 'रामचरितमानस तैं भाषति' याने सुचविले. (क) सादर मज ही कथा ऐकवुनि- ही कथा = रामचरितमानस कथा संपूर्ण सांगितली व ती सांगून झाल्यानंतर 'मग वदले सुंदर वचना मुनि'- जी कथा सांगितली ती कपोल कल्पित सांगितली की काय इत्यादि शंकेला जागा राहू न देणारे व त्या कथेविषयी आदर उत्पन्न करणारे (= सुंदर) वचन लोमश मुनि बोलले-

हिं. *।रामचरित सर गुप्त सुहावा।संभु प्रसाद तात मैं पावा।।११।।*
।तोहि निज भगत राम कर जानी।तातें मैं सब कहेउँ बखानी।।१२।।
।रामभगति जिन्ह कें उर नाहीं।कबहुँ न तात कहिअ तिन्ह पाहीं।।१३।।

म. *।रामचरित-सर गुप्त मनोहर।मज लाभलें प्रसादें शंकर।।११।।*
।तूं निज रामभक्त हें जाणुनि।मी ही कथित सर्व वाखाणुनि।।१२।।
।रामभक्ति ज्यांचे हृदिं नाहीं।त्यांस न वदणे तात! कदा ही।।१३।।

अर्थ- हे गुप्त आणि मनोहर रामचरितमानस मला शंकरांच्या कृपाप्रसादाने मिळाले.।।११।। तू रामचंद्रांचा निज भक्त आहेस हे जाणून मी ही सगळी कथा (तुला) विस्तार पूर्वक (वाख्राणुनि) सांगितली.।।१२।। हे तात! ज्यांच्या हृदयांत रामभक्ति नाही त्यांना ही कथा केव्हाही सांगू नये.।।१३।।

टीका- चौ.११-१२ (१) <u>रामचरित</u>- सर = रामचरितमानस. सर = सरोवर. (क) गुप्त- गुप्त ठेवलेले व गुप्त रीतीने मिळालेले. लोमशांना गुप्त रीतीने मिळालेले ते कोणाला सांगितले नव्हते, शंकराच्या मानसांतच होते. 'रामचरितमानस मुनिभावन। बिरचित शंभु सुशोभन पावन।। रचुनी महेश मानसि राखले' (१।३५।९।११) शंकरांनी हंस रूपाने भुशुंडीच्याजवळ श्रवण केल्यानंतर मग 'सुसमय येतां शिवेस भाषति' (१।३५।११). भुशुंडीजवळ श्रवण केलेली कथा शंकरांनी उमेला सांगितली. (१।१२०म, ७।५२।६, ७।६८।७ पहा). लोमश म्हणतात 'मज लाभलें प्रसादें शंकर' = मज शंकर प्रसादे लाभले. शंकराच्याजवळ श्रवण केले असे म्हटले नाही. शंकरांनी सांगितले असेही म्हटले नाही. बालकांडात उल्लेख आहे की 'शंभुचरित हें सुंदर रचिली।.....। तें शिव काकभुशुंडिस अर्पिति। रामभक्त अधिकारि परीक्षिति।। (१।३०।) जो शंकरांनी रचले ते त्यांनीच काकभुशुंडीला दिले, पण रामभक्त अधिकारी आहे अशी परीक्षा घेतल्यावर दिले.' ही परीक्षा दुसरीकडे कुठे झाली नसून लोमशसंवादातच झाली हे स्पष्ट आहे, म्हणून असे मानणे भाग आहे की शंकरांनी आपल्या इच्छेने लोमशांच्या बुद्धीत मोह उत्पन्न करुन काकभुशुंडीची परीक्षा घेतली. नंतर शंकरांनी लोमशांत प्रवेश करून, लोमशानां माध्यम करुन लोमशांच्या मुखाने रामचरितमानस सांगितले. स्वतः प्रत्यक्ष सांगितले नसल्याने 'ते शिव काक भुशुंडिस अर्पिति' असे म्हणावे लागले व लोमशच प्रत्यक्ष सांगत असल्याने भुशुंडी म्हणतो की लोमशांनी रामचरितमानस मला सांगितले, ते त्याचे म्हणणे चुकीचे नाही. बालकांडातील मानसपरंपरा वर्णनात लोमशांचे नाव नाही. जशी रामचरितमानसकथा शंकरांनी तुलसीदासजींच्या गुरूस स्वप्नांत सांगितली. तसाच हा एक निराळा प्रकार केला. वर वर्णन केल्याप्रमाणे न मानल्यास बालकांडातील वचन व येथील वचन यातील विसंगती टाळता येत नाही. शंकरांनी हृदयांत राहून जे उच्चारले ते लोमशांनी वैखरीने सांगितले, म्हणून ते म्हणतात शंकरांच्या प्रसादाने मिळाले.

<u>(२)</u> <u>तू निज रामभक्त हें जाणुनि</u>- जाणुनि = जी परीक्षा मला न कळत घेतली गेली त्या परीक्षेने निश्चितपणे कळल्यावर. <u>(क)</u> निज = चिरस्थायी, नित्य, (गी.ल.को.) 'स्वके नित्ये निजं, त्रिषु' (अमरे ३।३।३२ त्रिषु = त्रिषु लिंगषु) = कधीही कशानेंही भक्तिपासून च्युत न होणारा. लोमशांत प्रविष्ट

झालेल्या शंकरांनीही जाणले व लोमशांनीही जाणले. म्हणून हा चरण देहली दीपाप्रमाणे दोन्हीकडे लागतो. शिवानी लोमशांस फक्त माध्यम केले (पण त्यामुळे लोमशांनाही त्या गुप्त रामचरिताचा सहज लाभ झाला) म्हणूनच १।३०।४ मध्ये भुशुंडीचे रामचरितमानस गुरु शिव असे म्हटले. रेडिओने जे ऐकले जाते त्यात वक्ता यंत्राहून निराळा असतो. तसेच येथे लोमश हे यंत्र झाले व वक्ते शंकर बनले. पण हे भुशुंडीला कळले नाही.

चौ.१३ (१) रामभक्ती ज्यांचे हृदिं नाहीं- परंपरा सांगितल्यानंतर श्रवणाचा अधिकारी सांगितला. हे उत्तम अधिकाऱ्याचे लक्षण सांगितले असे मानणे भाग आहे. कारण कावळ्याजवळ नील पर्वतावर इतर अधिकारी जाणेच शक्य नाही. शंकरांनीच पुढे या कथेच्या श्रवणाचे अधिकारी सांगितले त्यात सामान्य आणि विशेष असा भेद केला आहे. 'विशेषता ही त्यां सुखदायक। प्राणप्रिय ज्यां श्रीरघुनायक' (१२८।८) हेच लक्षण निराळ्या शब्दांत येथे सांगितले आहे. सामान्य अधिकारी लक्षणें १२८।६-७ यांत सांगितली आहेत. 'स्वामी रामरचित सर नामी। प्राप्त कुठे सांगा नभगामी' (९४।४) या गरुडाच्या दुसऱ्या प्रश्नांचे व 'सुंदर हें प्रभुचरित पुनीत। कुठे कृपालु वायसा प्राप्त' (५५।१) या पार्वतीच्या शेष राहिलेल्या तिसऱ्या प्रश्नांचे उत्तर येथपर्यंत दिले गेले. आता भुशुंडी मुनीचा निरोप घेऊन परत जाण्यास निघेल.

हिं. ।मुनि मोहि बिबिधि भाँति समुझावा।मैं सप्रेम मुनिपद सिरु नावा।।१४।।
।निज कर कमल परसि मम सीसा।हरषित आसिष दीन्ह मुनीसा।।१५।।
।राम भगति अबिरल उर तोरे।बसिहि सदा प्रसाद अब मोरे।।१६।।
दो. ।सदा राम प्रिय होहु तुम्ह सुभ गुन भवन अमान।।
।।कामरूप इच्छा मरन ग्यान बिराग निधान।।११३रा.।।
।जेहिं आश्रम तुम्ह बसब पुनि सुमिरत श्रीभगवंत।।
।।ब्यपिहि तहँ न अबिद्या जोजन एक प्रजंत।।११३म.।।

म. ।समजाविति मुनि विविधा मजला।मी प्रेमे नमिले पद-कमलां।।१४।।
।कर-कमला ठेउनि मम शीर्षा।देति मुनीश मुदित आशीषा।।१५।।
।रामभक्ति अविरल हृदयीं तव।नित्य वसेल मदीय कृपेस्तव।।१६।।
दो. ।व्हा राम-प्रिय सदा तुम्हिं शुभगुणभवन अमान।।

।।कामरूप इच्छा-मरणि ज्ञान-विराग-निधान।।११३रा.।।
।।जेथे रहाल ज्या आश्रमीं स्मरतां श्रीभगवंत।।
।।व्यापे तिथें न अविद्या चार कोस पर्यंत।।११३म.।।

अर्थ - मुनींनी मला नाना प्रकारे उपदेश केला (समजाविले), तेव्हा मी प्रेमाने मुनींच्या चरण कमलांवर मस्तक ठेवले.।।१४।। आपले हस्त कमल माझ्या डोक्यावर ठेऊन मुनीश्वरांनी हर्षाने आनंदाने मला आशीर्वाद दिला की।।१५।। माझ्या कृपेने रामचंद्रांची प्रगाढ भक्ती नित्य तुमच्या हृदयांत राहील.।।१६।। तुम्ही सदा श्रीरामास प्रिय व्हाल, शुभ गुणांचे माहेर घर, अमान, इच्छेप्रमाणे रूप धारण करणारे, ज्ञाननिधान वैराग्यनिधान आणि इच्छामरणी व्हाल.।।दो.११३रा.।। श्रीभगवंताचे स्मरण करीत तुम्ही ज्या आश्रमात रहाल तिथे चार कोसपर्यंत अविद्या व्यापणार नाही.।।११३म.।।

टीका. चौ.१४-१५ (१) '<u>मुनि विविधा समजाविती</u>' शिष्य वत्सल गुरु शिष्याला निरोप देतांना जसा विविध उपदेश करतात, आश्वासने देतात, धीर देतात तसेच लोमशांनी केले, तेव्हा निरोप घेऊन निघण्यापूर्वी कृतार्थ झालेला शिष्य जसे प्रेमाने श्रीगुरुचरणांवर डोके ठेवील व पाय धरील तसे प्रेमाने काकाने नमन केले. (क) तेव्हा शिष्याच्या मस्तकावर हात ठेऊन लोमशांनी प्रसन्न हृदयाने अनेक आशीर्वादांचा पाऊसच पाडला असे आता दिसेल.

चौ.१६ (१) अविरल = घनदाट, प्रगाढ. मदीय कृपेस्तव = माझ्या कृपेमुळे. या पूर्वी 'रामभक्तिजलिं मम मन मीन' असे होते, पण ती साधन भक्ती होती. आता प्रेमभक्ति दिली. ती संतकृपेने मिळते हे पूर्वी अनेक वेळा दाखविले आहे. पण 'ज्ञान विमल जलिं करी स्नान जैं। रामभक्ति उरिं करि स्थान तैं' (१२२।११) हे मुनीनां माहीत असल्याने ते आता ज्ञान वैराग्यही देतील, पण त्याला भक्तीची फार आवड असल्याने हा आशीर्वाद प्रथम दिला. याच्या हृदयांत भक्ति असली तरि रामप्रभूनी प्रेम केले नाही तर पूर्ण आनंद मिळणार नाही म्हणून तो आशीर्वाद देतात.

<u>दो.रा</u>. (१) <u>व्हा रामप्रिय सदा तुम्ही</u>- हा आशीर्वाद पाठीमागून देऊन सुचविले की जो जीव भक्तिमान असेल त्याच्यावर राम सदा प्रेम करतात, तो

प्रभूला प्रिय होतो. प्रभु स्वतःच म्हणाले आहेत की 'जीव भक्तिमान् नीच जरि महा। प्राणप्रिय मज बाणा मम हा (८६।१०)' दोनच आशीर्वाद दिले असते तरि काकाचे पूर्ण समाधान झाले असते, पण सद्‌गुरु कृपाधन वर्षू लागला की तेथे मोजमापाचा विचारच राहात नाही. (क) शुभ गुणभवन- सर्व सद्‌गुणांचे = संतगुणांचे निवासस्थान बनविला. पण जरासा अभिमान उत्पन्न झाला की सर्वस्वाचा विनाश करतो व अभिमान प्रभूला मुळीच आवडत नाही म्हणून (ख) अमान = अभिमान व मान प्रतिष्ठेची इच्छा तुमच्या हृदयांत उत्पन्न होणार नाही असा आशीर्वाद देणे ओघानेच आवश्यक होते. (ग) कामरूप = इच्छेप्रमाणे, देह धारण करण्याची शक्ति दिली. या शक्तीचा उपयोग करुन शंकरांच्या बरोबर ब्राह्मणरुपाने कौसल्येच्या मंदिरात जाऊन शिशुरूप रघुनाथाचे दर्शन घेऊ शकला व लघुवायस बनून बाललीला पाहू शकला. हे फक्त दोन नमुने एका कल्पांतले मानसांत दिले आहेत. (घ) ज्ञान-विराग-निधान ज्ञानाचे व वैराग्याचे भांडार. येथे ज्ञान = 'ब्रह्मसमान सकल जगिं पाही' (३।१५।७) व विराग = परम विराग ३।१५।८ मध्ये ज्याचे वर्णन केले आहे ते वैराग्य. 'अमान' शब्दाने 'ज्ञान, जिथे मानादिक नाही' (३।१५।७) मध्ये सुचविलेली ज्ञानाची अमानित्व अदंभित्वादि सर्व लक्षणे सुचविली आहेत. (ङ) इच्छामरणि = स्वतः इच्छा केली तरच मरण येणारा, स्वतः इच्छा न केल्यास ज्याला मरण येत नाही असा. इतके दिले तरि कृपेची वृष्टी थांबली नाही.

दो.म. (१) ज्या आश्रमांत = स्थानांत हा कावळा राहील त्याच्या सभोवती चार कोसांच्या मर्यादेत अविद्येचा प्रभाव चालणार नाही, अविद्या प्रवेश करु शकणार नाही असा परम अद्‌भुत आशीर्वाद दिला. याचा अनुभव गरुडास आल्याचे वर्णन (७।६३।२, ९४म) पूर्वी केले आहे. ल.ठे. येथील तिसऱ्या चरणांत १ मात्रा कमी आहे, आश्चर्याचे भाव सुचविले आहेत. भुशुंडी सुचवितो की हा आशीर्वाद ऐकून तर मी आश्चर्याने स्तंभितच झालो. ब्रह्मलोकांतसुद्धा अविद्येचा प्रभाव चालतो. आणि मृत्यु लोकांत एका स्थानाच्या सभोवती चार कोसांत अविद्या प्रभाव बंद होणार! किती अद्‌भुत, अचाट संकल्प शक्ति! अशी संकल्पशक्ति असणाराच्या बुद्धींत शंकर भ्रम उत्पन्न करु शकतात व ते हरिमायेला भितात! सूचना- ७।९४म मध्ये गरुडाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर या (११३म) दोह्यांत दिले. 'व्यापी तुम्हा न काल अति कराल कारण कवण'

(५४१) या गरुडाच्या प्रश्नाचे उत्तर 'इच्छामरणि' शब्दाने अंशतः दिले आहे ते आता पुढील आशीर्वादाने पूर्ण केले जात आहे.

मो काल कर्म गुन दोष सुभाऊ।कछु दुख तुम्हहि न ब्यापिहि काऊ।।१।।
राम रहस्य ललित बिधि नाना।गुप्त प्रगट इतिहास पुराना।।२।।
बिनु श्रम तुम्ह जानब सब सोऊ।नित नव नेह राम पद होऊ।।३।।
जो इच्छा करिहहु मन माहीं।हरि प्रसाद कछु दुर्लभ नाहीं।।४।।
सुनि मुनि आसिष सुनु मतिधीरा।ब्रह्मगिरा भइ गगन गँभीरा।।५।।
एवमस्तु तव बच मुनि ग्यानी।यह मम भगत कर्म मन बानी।।६।।
सुनि नभगिरा हरष मोहि भयऊ।प्रेम मगन सब संसय गयऊ।।७।।

म काल कर्म गुण दोष स्वभावहि।जनित दुःख कधिं काहिं तुम्हां नहि।।१।।
राम रहस्य ललित विध नाना।प्रगट गुप्त इतिहास-पुराणां।।२।।
कळे श्रमांविण सर्व तुम्हां हो!।स्नेह रामपदिं नित्य नवा हो।।३।।
जी इच्छा मनिं कराल काहीं।हरि-प्रसादें दुर्लभ नाहीं।।४।।
ऐकुनि मुनि-आशीस् मतिधीरा!।ब्रह्मगिरा नभिं होइ गभीरा।।५।।
तव वच तथास्तु हे! ज्ञानी मुनि!।हा मम भक्त कर्म मन भाषणिं।।६।।
श्रवुनि नभगिरा प्रहर्ष मजला।प्रेममग्न, संशय सब सरला।।७।।

अर्थ काल, कर्म, त्रिगुण, दोष आणि स्वभाव यांच्यापासून उत्पन्न होणारे दुःख तुम्हाला कधीही होणार नाही.।।१।। अनेक प्रकारचे सुंदर राम रहस्य, जे इतिहास-पुराणादिकांत प्रगट वा गुप्त आहे ते सर्व, काहीहीं श्रम न करता तुम्हाला कळेल. अहो! श्रीरामचरणीं तुमचा नित्य नवा (अधिकाधिक) स्नेह होवो. (हो).।।२-३।। (फार काय) तुम्हीं मनांत जी काही इच्छा कराल ती हरिकृपेने तुम्हाला दुर्लभ नाही.।।४।। अहो! धीरमति पक्षिराज! मुनीचा आशीर्वाद ऐकून आकाशात गंभीर ब्रह्मवाणी झाली की.।।५।। हे! ज्ञानी मुनि! तुम्हीं जें म्हणालात तें तसें होवो हा कर्माने वाणीने व मनाने माझाच भक्त आहे.।।६।। ती आकाशात झालेली भगवंताची वाणी ऐकून मला फार हर्ष झाला, मी प्रेममग्न झालो, माझे सर्व संशय लयास गेले.।।७।।

टीका. चौ.१ (१) काल जनित दुःख = जन्म दुःख, जरा दुःख, मरण दुःख. त्याला काळाच्या सत्तेतून कायमचा सोडविला. (७।८८।१टी.पहा) (क) कर्मजनित दुःख = कर्मांचे अनिष्ट फळ. आधि, व्याधि इ. त्रिविध ताप, कर्मांचे फळ म्हणून भोगावे लागतात. त्याला कर्मातीत केला. (ख) गुण दोष जनित दुःख- गुण = त्रिगुण आणि दोष म्हणजे त्रिगुणांपासून उत्पन्न होणारे विकार, यांची बाधा तुला होणार नाही. (ग) स्वभावजनित दुःख- स्वभाव = देहाच्या बरोबर उत्पन्न झालेले सहज धर्म. उदा. कावळ्याच्या देहामुळे असणारे काकस्वभाव-धर्म = कर्कश आवाज, भित्रेपणा अपवित्रता, मलिनता, अभक्ष्य भक्षण इ. 'काकस्वभावादि' प्रस्तावना खंड पृ.६३५पहा. सार हे की कोणत्याही प्रकारचे दुःख तुमच्याजवळ सुद्धा येणार नाही.

चौ.२-५ (१) नानाविध ललित रामरहस्य- तात्विक स्वरुपाचे, अवताराचे, रामस्वभावाचे, रामदेहरहस्य, चरित्र रहस्य इत्यादि अनेक गोष्टींचे रहस्य = मर्म सहज कळेल. इतिहास पुराणादि सद्ग्रंथात काही रहस्य प्रगट केलेले असते, काही गुप्त असते ते सर्व, ग्रंथावलोकन, श्रवण, विचार इत्यादि काहीं परिश्रम न करतां तुम्हाला कळेल. (७।८५।६-८ व दोहा सटीक पाहणे). (क) ब्रह्मगिरा = भगवंताची वाणी, भाषण.

चौ.६-७ (१) ज्ञानीमुनि- लोमश मुनि ज्ञान प्रधान भक्त होते हे सुचविले. (क) नभगिरा आकाशवाणी. मुनींने जे आशीर्वाद दिले त्यावर भगवंतानी आपल्या मान्यतेचा शिक्का आकाशवाणीने मारला. रामप्रिय झाल्याची ही प्रतीति तत्काळ दिली. म्हणून तो प्रेममग्न झाला. (ख) सब संशय सरला- मुनीने दिलेले अद्भुत, अलौकिक आशीर्वाद खरे होतील की नाही असा संशय काही आशीर्वादांच्या बाबतीत त्याच्या मनात शिरला होता, त्यामुळे ते आशीर्वाद ऐकल्यावर त्याला हर्ष झाला नाही. चार कोसांच्या मर्यादेत अविद्येचा प्रवेश होणार नाही व काळाच्या सत्तेतून कायमची सुटका या विश्वात कधी न घडलेल्या, न ऐकलेल्या दोन गोष्टी विषयी संशय वाटणे स्वाभाविक आहे. स्वतः लोमश सुद्धा काळसत्तेतून सुटलेले नाहीत. आकाशवाणी कानी पडताच संशय लयास गेले तेव्हा फार हर्ष झाला. आता काक मुनींचा निरोप घेऊन निघेल.

हिं. ।करि बिनती मुनि आयसु पाई।पद सरोज पुनि पुनि सिरु नाई।।८।।
।हरष सहित एहिं आश्रम आयउँ।प्रभु प्रसाद दुर्लभ बर पायउँ।।९।।
।इहाँ बसत मोहि सुनु खग ईसा।बीते कलप सात अरु बीसा।।१०।।
।करउँ सदा रघुपति गुन गाना।सादर सुनहिं बिहंग सुजाना।।११।।
।जब जब अवधपुरी रघुबीरा।धरहिं भगत हित मनुज सरीरा।।१२।।
।तब तब जाइ राम पुर रहऊँ।सिसु लीला बिलोकी सुख लहऊँ।।१३।।
।पुनि उर राखि राम सिसुरूपा।निज आश्रम आवउँ खगभूपा।।१४।।

म. ।विनति करुनि मुनि-आज्ञा घेउनि।पदपंकजिं घडि घडि शिर ठेउनि।।८।।
।या आश्रमिं आलो मी हर्षुनि।प्रभुकृपें दुर्लभ वर पाउनि।।९।।
।येथें बसतां श्रुणु पक्षीश।गेले कल्पसात नी वीस।।१०।।
।करीं सदा सादर गुणगान।सादर ऐकति विहग सुजाण।।११।।
।अयोध्येंत जैं जैं रघुवीर।धरिति भक्तहित मनुजशरीर।।१२।।
।तदा रामपुरिं जाउनि वसतो।शिशुलीला पाहुनि सुख लुटतो।।१३।।
।मग हृदिं धरुनि राम-शिशुरूपा।निजाश्रमीं येतो खगभूपा।।१४।।

अर्थ- मग मुनींची प्रार्थना (स्तुती) करुन, त्यांच्या चरण कमलांवर वारंवार मस्तक ठेऊन.।।८।। हर्षित होऊन या आश्रमात आलो. प्रभुच्या कृपेने मला दुर्लभ वर मिळाले.।।९।। अहो पक्षिराज मी येथे राहू लागल्यापासून सत्तावीस कल्प निघून गेले. (अठ्ठाविसावा कल्प चालू आहे).।।१०।। येथे मी नित्य नियमाने (सदा) रघुपतीचे गुणगान (चरित्रकथन) आदराने करीत असतो, व शहाणे पक्षी आदराने श्रवण करतात.।।११।। जेव्हा जेव्हा श्रीरघुवीर भक्तांच्यासाठी अयोध्येत मनुज शरीर धारण करतात (अवतरतात) तेव्हा तेव्हा मी जाऊन रामपुरींत राहतो आणि शिशुलीला अवलोकन करुन सुख लुटतो.।।१२-१३।। मग रामचंद्रांचे बालरूप हृदयांत धारण करुन मी (या) आपल्या आश्रमांत येतो.।।१४।।

टीका. चौ.८-९ <u>(१)</u> <u>विनति करुनि</u>- अशी विनंती प्रार्थना केली असेल. अभंग- प्रभु दीनावरि थोर उपकार। केले मी पामर काय वानूं।।१।। तुम्हांसम नाथ! कोण जगीं दाता। उपमे पाहतां कोणी नाही।।२।। काय देऊ तुम्हां होऊ

उतराई। जगीं नाहीं काई देण्या जोगें।।३।। तुम्ही नाही दिला शाप जो मिळाला। रामाने पाहिला भक्तिकस।।४।। तुम्ही जे दिधले कोणी ना पाहिले। जगीं ना ऐकिले आजवरी।।५।। प्रज्ञा! गुरु दाता नान्य त्रिभुवनीं। भक्ति जो देऊनी सुखदाता।।६।। इत्यादि प्रकारे लोमशांची स्तुती करुन वारंवार आदराने पायांवर डोके ठेवले व सुचविले की 'मज करवे ना प्रत्युपकारा। पाया पडतो वारंवारा' (१२५।४टी.प.) (क) 'प्रभुकृपे दुर्लभ वर पावुनि' भाव हा की हे सर्व दुर्लभ वर मुनीला निमित्त करुन प्रभुंनीच दिले. चांगले किंवा वाईट समजले जाणारे जे काही घडते ते भगवंताच्या इच्छेने माझ्या कल्याणासाठीच घडते अशी दृढभावना भक्तांच्या ठिकाणी असते. (ख) या आश्रमीं आलो- नील पर्वतावरील त्याच्या सध्यांच्या निवासस्थानी प्रथम आला. मेरुपर्वताच्या उत्तरेस नील पर्वत आहे इत्यादि त्या आश्रमाचें वर्णन (७।५६।७-५७।९) शंकरांनी केलेले पहावे.

चौ.१०-११ (१) गेले कल्प सात नी वीस- त्या नील पर्वतावर राहूं लागल्यानंतर २७ कल्पे निघून गेली व अठ्ठाविसावे कल्प चालू असतां गरुड भुशुंडीकडे गेला. भुशुंडीने ही कथा २७ कल्पांपूर्वी लोमशांकडून श्रवण केली, व ती कथा श्रवण करुन दुर्लभ वर मिळाल्यावर जो रामावतार झाला त्यावेळी तो प्रथम अयोध्येत गेला ती कथा त्यानेच स्वतःच्या मोहाची कथा सांगताना पूर्वी सांगितली आहे. (क) करीं सदा रघुपती....सुजाण- सदा = नित्य नियमाने असा अर्थ घेणे जरुर आहे. कारण की तो ध्यान, जपयज्ञ, मानसपूजा व रामकथा सांगणे म्हणजेच रामगुणगान करणे या चार गोष्टी करतो. विहंग भक्त कथा श्रवणास येतात, वगैरे वर्णन ५७।५-९ मध्ये पहावे. (ख) सुजाण- 'रघुपतिभक्ति विना सुख नाहीं' व ती भक्ति या रामचरितमानसाच्या सादर श्रवणाने मिळते हे ते जाणतात म्हणून सुजाण म्हटले. अशा दृढ विश्वासाने जे आदराने श्रवण करतील ते सुजाण शाहणे हे येथे सुचविले.

चौ.१२-१४ (१) अयोध्येत....मनुज शरीर- 'जैं जैं राम मनुज तनु धरती। भक्तास्तव बहुलीला करती।। अयोध्येत मी तैं तैं जातो। बालचरित्रा बघुनि हर्षतो।।... वर्षे पांच लुब्ध मी वसतो' (७५।२-७) यावरील टीका पाहावी. तेच वर्णन थोडक्यात येथे केले आहे. (क) रामपुरिं- राम जन्मानंतर अयोध्येला

रामपुरी हे नाव मिळते. (ख) <u>मग हृदिं धरुनि रामशिशुरूपा</u>- मग म्हणजे रघुपतीचे पाय नमोन झाले की तो अयोध्येतून निघून परत आपल्या त्या निवासस्थानी गेला. प्रत्येक कल्पांत एकदा रामावतार होतो, म्हणजे भुशुंडीने असे अनेक श्रीबालरघुपतीच्या लीला पाहिल्या व पुढेही अनंत कल्पामध्ये तो अनेक रामावतारांत बाललीला पाहणार! आता गरुडाच्या प्रश्नांच्या उत्तरांचा समाहार करतात.

चौ. *।।कथा सकल मैं तुम्हहि सुनाई।काग देह जेहि कारन पाई।।१५।।*
।।कहेउँ तात सब प्रश्न तुम्हारी।राम भगति महिमा अति भारी।।१६।।
दो. *।।तातें यह तन मोहि प्रिय भयउ रामपद नेह।।*
।।निज प्रभु दरसन पायउँ गए सकल संदेह।।११४।।

चौ. *।।कथा सकल मी कथित तुम्हांला।काक-काय मज कसा मिळाला।।१५।।*
।।कथित तात सब तव प्रश्नांसिहि।रामभक्ति-महिमा अति भारि हि।।१६।।
दो. *।प्रिय ही तनु मज, की मिळे रामपदीं सुस्नेह।।*
।।निज प्रभु-दर्शन पावलो विगत सकल संदेह।।११४रा।।

अर्थ- काकदेह (काय) मला कसा मिळाला या विषयींची सर्व कथा मी तुम्हास सांगितली.।।१५।। हे तात, तुमच्या (इतर) सर्व प्रश्नांविषयींही सांगितले आणि रामभक्तिचा महिमा अति भारी आहे हे ही सांगितले.।।१६।। ही काकतनु मला प्रिय वाटण्याचे कारण हेच की (तिच्यात) मला रामचरणिं शुद्धस्नेह (भक्ति) प्राप्त झाला, माझ्या प्रभुचे दर्शन (याच तनुनें) झाले आणि सर्व संशय नष्ट झाले.।।११४रा.।।

टीका. चौ.१५-१६ <u>(१)</u> <u>कथित सकल....मिळाला</u>- 'कारण काय काय हा पावां' (९४।३) याचे सविस्तर उत्तर देतांना गरुडाच्या इतर सर्व प्रश्नांची उत्तरे कुठे कुठे दिली गेली हे या टीकेत त्या त्या ठिकाणी स्पष्ट दाखविले आहे. पार्वतीचे प्रश्न व गरुडाचे प्रश्न आणि त्यांची उत्तरे याविषयी कोष्टक रूपाने माहिती प्रस्तावना खंडात पृ.१४५-१४७ मध्ये दिलेली आहे. <u>(क)</u> रामभक्ति महिमा अति भारिहि' वरील गरुडाच्या प्रश्नांची उत्तरे देतांना रामभक्तीचा अत्यंत थोर महिमा ही सहज वर्णिला गेला आहे. सगुणभक्तीच्या प्रभावानेच

भुशुंडीला वरील सर्व अद्‌भुत लाभ झाले.

दो.रा. (१) 'प्रिय ही तनु....सुस्नेह'- 'रामभक्ति या तनुने मिळली। यास्तव ममता मम अति जडली' (९५।७) पासून 'रामभक्ति या तनुंत उपजली। स्वामि! म्हणुन ही प्रिय अति गमली' (९६।५) पर्यंत उपक्रमांत जे सविस्तर सांगितले. तेच येथे संक्षेपाने उपसंहारात सांगितले. (क) निज प्रभु दर्शन पावलो- 'इष्ट देव मम बालक रामहि' त्या बाल रामप्रभूचे प्रथम दर्शन या काक देहातच घेता आले हे ही काक देह विशेष प्रिय वाटण्याचे कारण आहे. काक देहांतच प्रभूच्या बाललीला विषयी संशय आले व त्यांची निवृत्तीही काकदेहातच झाली.

येथपर्यंत पार्वतीच्या बालकांडांतील प्रश्नांसह एकंदर वीस प्रश्नांचे विवरण झाले. गरुडाच्या चार स्वतंत्र प्रश्नांचे विवरण येथे संपले.

श्रीमानस गूढार्थचंद्रिका उत्तरकाण्ड अध्याय तेरावा समाप्त.

अध्याय १४वा

रामरहस्य प्रकरण (भक्तिमहिमा)

सूचना आता प्रथम गरुडाच्या नव्या प्रश्नाची पार्श्वभूमि व प्रस्तावना असून ज्ञान व भक्ति यांत अंतर किती हा प्रश्न गरुड विचारील. ११५।५ पासून-श्रीभुशुंडीगीता हे प्रकरण सुरु होईल त्यातच प्रथम रामरहस्य सांगितले जाईल, नंतर ज्ञानदीप व भक्तिचिंतामणी वर्णन करतील. या भागास या टीकेंत 'श्रीभुशुंडीगीता' हे नाव दिले आहे.

।हि.दो. ।भगति पच्छ हठ करि रहेउँ दीन्हि महारिषि साप।।
।।मुनि दुर्लभ बर पायउँ देखहु भजन प्रताप।।११४म.।।

।म.दो. ।भक्तिपक्षिं धरिला हठ झाला महर्षि-शाप।।
।।मुनि दुर्लभ वर पावलो भजनीं पहा प्रताप।।११४म.।।

अर्थ- भक्ति-पक्षाचा हट्ट धरला म्हणून महर्षीचा शाप झाला (त्यांनी दिला, तरी सुद्धा) मुनीनांही दुर्लभ असे वर मिळाले. हा भजनाचा (भक्तीचा) प्रताप तर पहा! ।।दो.११४म.।।

टीका. <u>(१)</u> भजनाचा भक्तीचा प्रतापच असा आहे की इतका घोर शाप मिळाला तरि त्याने काहीं सुद्धां अकल्याण न होतां अनेक वर न मागतां मिळाले. ते वर इतके अलौकिक व अद्‌भुत आहेत कीं आजपर्यंत मोठमोठ्या मुनींना सुद्धां ते मिळाले नाहीत, आणि ते मला एका कावळ्याला मिळाले. <u>(क)</u> असा अद्‌भुत प्रभाव असलेल्या भक्तीचा जे त्याग करतात त्यांच्याविषयी आतां सांगतात.

।हि. ।जे असि भगति जानि परिहरहीं।केवल ग्यान हेतु श्रम करहीं।।१।।
।ते जड कामधेनु गृह त्यागी।खोजत आकु फिरहिं पय लागी।।२।।
।सुनु खगेस हरि भगति बिहाई।जे सुख चाहहिं आन उपाई।।३।।
।ते सठ महासिंधु बिनु तरनी।पैरि पार चाहहिं जड करनी।।४।।

म. *।अशी भक्ति जाणुनि परिहरती।ज्ञाना केवळ जे श्रम करती।।१।।*
।ते जड गृहिं सुर धेनू त्यजिती।दुधासाठिं अर्कांस धुंडिती।।२।।
।श्रुणु खगपति हरिभक्ती त्यागिति।अन्य साधनीं सुख जे इच्छिति।।३।।
।ते शठ महासिंधु विण तरणी।तरुनि पार कांक्षिति जड करणी।।४।।

अर्थ- भक्ति अशी (प्रभावी) आहे हे जाणून सुद्धां जे तिचा त्याग करतात तिला दूर ठेवतात व केवळ ज्ञानासाठी श्रम करतात ते जड = पढतमूर्ख होत, ते घरीं आलेल्या कामधेनूचा त्याग करुन दुधासाठीं रुइची झाडें सोधीत भटकतात.।।१-२।। खगेश! ऐक, हरिभक्तीचा त्याग करुन जे इतर साधनांनीं सुख मिळविण्याची इच्छा करतात ते शठ होत, ते नावे शिवायच वेड्यासारखे पोहून महासागराच्या पार जाण्याची इच्छा करतात.।।३-४।।

टीका. चौ.१-२ <u>(१)</u> <u>अशी भक्ति जाणुनि परिहरती</u>- भक्तीचा प्रभाव ज्यांनी कधी ऐकला नाही, ज्यांना तो समजला नाही त्यांनी भक्तीचा त्याग केला तिचा आश्रय घेतला नाहीं तरि त्यांना मूर्ख म्हणतां येणार नाही, पण भक्तीचा हा असा अचिंत्य अनुपम महिमा कळल्यावर, जाणल्यावर सुद्धां जे तिचा स्वीकार न करतां केवळ ज्ञानासाठी परिश्रम करतात ते पढत मूर्ख होत. श्रीमद्भागवतांत याच अर्थाचा श्लोक आहे. 'श्रेयः सृतिं भक्तिमुदस्य ते विभो। क्लिश्यन्ति ये केवलबोधलब्धये।। तेषामसौ क्लेशल एव शिष्यते। नान्यद्यथा स्थूल तुषावघातिनाम्' (भाग.१०।१४।४) यावरील मराठी- ।।श्रेय सुखांची जननी जगतीं। जीव न जी विण पावे सुगती।।१।। माते सम जी सदा रक्षिते। रिपु कामादिक महा भक्षिते।।२।। भीषण भवरोगास रसायन। महापतित जी करि पुण्यायन।।३।। त्यजुनि अशी भक्ती तव, मानव। श्रमति सतत केवळ बोधास्तव।।४।। तप्त असुनि ते स्वहित विसरले। चंडकिरण करिं चकोर शिरले।।५।। भक्ति चंद्रिकेमाजिं न वसती। सती पतीवीण पुत्र नवसती।।६।। भूस कांडुनी कण वाढवती। श्रमबिंदू परि भूवरि गळती।।७।। भूक न शमते श्रम अपाड ते। श्वान चघळतां जेविं हाड तें।।८।। जरी जलज वाढेल भूवरी। अनल जरी लाभेल जलधरीं।।९।। गगन सकल जरि येइल निजकरिं। भक्ति विना नच बोध लाभ तरि।।१०।। <u>(क)</u> ज्ञानासाठींच असे व्यर्थ श्रम करणारे जड = पढत

मूर्ख होत. 'अभाग्याचे घरीं बाबा कामधेनु आली। ओढाळ म्हणूनि तेणे हाकलून दिली।।' (एक संत) एवढेच नव्हे तर दुधासाठी रानांत (अर्कास = रुईच्या झाडात) रुईची झाडे सोधीत भटकू लागला तर त्याला जसा लोक महामूर्ख, तसा समजतील तसाच हा. फार काय 'हृदयीं हरिभक्ति न आणिति जे। जीत शवसमान प्राणि ते' (१।११३।५) या शिव वचनानुसार जड जिवंत असून म्हणून भक्तीवाचून ज्ञानासाठी प्रयत्न करणारांस असे जड ठरविले. आता इतर साधनांनी सुख मिळविण्याचा प्रयत्न करणारांबद्दल दृष्टांन्तासह वर्णन करतात.

चौ.३-४ <u>(१)</u> <u>अन्य साधनीं सुख जे इच्छिति</u>- भक्तीचा त्याग करुन इतर साधनांनी सुखासाठी जे प्रयत्न करतात त्यांना सुख तर नाहींच मिळत पण त्यांचे प्रयत्न मरणासारखे दुःखदायक ठरतात. जहाज न घेतां आपल्या बाहुबलाने महासागर पोहून तरुन जाण्याचा प्रयत्न करणारास त्या सागरांतच बुडावे लागते किंवा जलचरांचे भक्ष्य बनावे लागते म्हणजे दुर्मरणच येते व ते अधोगतीला जातात. बाहुबलानेंच सागर तरुन जाण्याचा प्रयत्न करणारास कोणी शाहणा म्हणणार नाहींत. त्याचप्रमाणे सर्व सुखांचे मूळ, सर्व सुख देणारी हरिभक्ति रुपी नौका न घेतां जे सुख मिळविण्याचा प्रयत्न करतात 'ते शठ महा' ते महामूर्ख होत. ज्ञानाने मिळणारा 'मोक्ष सकल सुखखाण' (दो.८३) आहे तरि सुद्धां केवळ ज्ञानासाठीं भक्तीचा त्याग करुन प्रयत्न करणारे जड, जिवंत शव, पुच्छविषाणहीन पशु (७८रा) मग इतर साधनांनी सुख मिळणेंच शक्य नसतां मिळविण्याचा प्रयत्न करणें महामूर्खपणा ठरतोच. <u>(क)</u> भुशुंडीने येथे केवळ ज्ञानापेक्षां भक्तीला अधिक महत्त्व दिले. 'गरुड महाज्ञानी गुणराशी। हरिसेवक अति निकट निवासी' गरुडाचा ओढा भक्तीपेक्षा ज्ञानाकडे जास्त, त्यामुळे भुशुंडीने केलेले वरील विधान ऐकून त्याला तें मत खवखवू लागले, म्हणून आता एक प्रश्न विचारतो तो त्याचा पाचवा प्रश्न होय.

श्रीभुशुंडि गीता (११५।५ - १२०म)

हिं. *।सुनि भुसुंडी के बचन भवानी।बोलेउ गरुड हरषि मृदु बानी।।५।।*
।तव प्रसाद प्रभु मम उर माही।संसय सोक मोह भ्रम नाहीं।।६।।
।सुनेउँ पुनीत राम गुन ग्रामा।तुम्हरी कृपाँ लहेउँ बिश्रामा।।७।।

।एक बात प्रभु पूँछउँ तोही।कहहु बुझाइ कृपानिधि मोही।।८।।
।कहहिं संत मुनि बेद पुराना।नहिं आदरेहु भगति की नाई।।१०।।
।ग्यानहि भगतिहि अंतर केता।सकल कहहु प्रभु कृपानिकेता।।११।।

म. *।श्रवुनि भुशुंडीवचन भवानी!।वदे गरुड हर्षे मृदु वाणी।।५।।*
।प्रभो! प्रसादें तव, हृदयीं मम।संशय शोक न मोह नसे भ्रम।।६।।
।पावन रामगुणग्रामां श्रुत।चित्त तवकृपें विश्रामें युत।।७।।
।प्रभु पुसतो आपणां कृपाकर।गोष्ट एक मज वदा सविस्तर।।८।।
।वेद पुराण संत मुनि सांगति।ज्ञानासम जगिं दुर्लभ ना अति।।९।।
।मुनिनें तेंच तुम्हाला कथिलें।तुम्हिं न भक्तिसम तें आदरिलें।।१०।।
।ज्ञानभक्ति यांमधिं किति अंतर।सकल सांगणें प्रभो! कृपाकर।।११।।

अर्थ- भवानी! भुशुंडीचें वचन ऐकून गरुड हर्षाने व मृदु वाणीने म्हणाला की।।५।। हे प्रभो! तुमच्या कृपेनें माझ्या हृदयांत संशय नाही, शोक नाही, मोह नाही किंवा भ्रम नाही.।।६।। रामचंद्रांचे पावन गुणसमुह (चरित्र) श्रवण केले आणि तुमच्या कृपेनें माझ्या चित्ताला विश्राम (सुख समाधान) प्राप्त झाला आहे.।।७।। हे प्रभु! कृपासागरा! मी आपणांस एक गोष्ट विचारीत आहे तिच्याबद्दल मला सविस्तर सांगावे.।।८।। वेद, पुराण, संत व मुनि असे म्हणतात कीं ज्ञानासारखें अति दुर्लभ जगांत काहीं नाही.।।९।। तेच ज्ञान लोमशमुनींनी तुम्हाला सांगितले तथापि तुम्हीं त्याला भक्तीसारखा आदर दिला नाहीत.।।१०।। (म्हणून विचारतो की) ज्ञान आणि भक्ती यांत अंतर किती ते सगळे हे प्रभो! कृपाकरा! मला सविस्तर सांगावे.।।११।।

टीका. चौ.५-६ <u>(१) वदे गरुड हर्षे</u>- भुशुंडीने चारी प्रश्नांची उत्तरे दिली व त्यांच्या उपसंहारात जे सांगितले ते ऐकून गरुडास हर्ष झाला. 'वायस वचना रुचिर ऐकिलें गरुडें हर्षे पंख फुलविले' (७।९३।१) हाच भाव येथे आहे. दोन्ही ठिकाणी गरुड शब्दच वापरला आहे. गरुत् = पंख, त्यांनी उयते = उडतो तो गरुड (अ.व्या.सु.) भक्तीपेक्षां ज्ञानाला कमी लेखलेले ऐकून त्याला उत्साह वाटू लागला ती या निमित्ताने प्रश्न विचारुन श्रीगुरुमुखाने आणखी श्रवण

[illegible] केलेल्या श्रवणाचा फायदा काय झाला व कशाने [illegible] प्रगट करुन मग प्रस्तावनापूर्वक प्रश्न विचारील. (क) [illegible]....भ्रम- असा अन्वय आहे. संशयादि मुळींच नाहीत [illegible] इतकाच आहे की जो प्रश्न विचारावयाचा आहे तो संशय [illegible] आहे असे वाटू नये. केवळ जिज्ञासा बुद्धीने विचारीत आहे हे [illegible] आहे.

चौ.७-९ (१) पावन रामगुणग्रामांश्रुत....युत- गुणग्राम = गुणसमूह, कथा, [illegible] पावन करणारे, त्यातही तुमच्या मुखाने श्रवण करण्यास [illegible] आणि शिवाय तुम्ही कृपा केलीत म्हणून मी विश्राम पावलो. (क) येथे [illegible] की पावन रामकथेचे श्रवण संतांच्या समीप राहून दीर्घकालपर्यंत [illegible] आणि त्या संतगुरुंनी कृपा केली तरच संशय मोहादि जाऊन, [illegible], विश्राम = स्वान्तःसुख प्राप्त होते. 'तदा सकल संदेहां भंग' (७।।,११४) पासून दो. ६१ पर्यंत शंकरांनी गरुडास जे सांगितले त्याप्रमाणे [illegible] कबूली गरुडाने येथे दिली. (ख) 'ज्ञानासम जगिं दुर्लभ नाहीं'- [illegible] समजत कठिन साधत कठिन विवेक। घुणाक्षरें न्यायें घडे तरि [illegible] अनेक' (११८म.) 'ज्ञानपंथ तलवार धार अति' 'क्षुरस्य धारा निशिता [illegible] पथः तत् कवयो वदन्ति' (श्रुति)

चौ.१०-११ (१) असे जे दुर्लभ ज्ञान ज्याचा 'आश्चर्यः वक्ता [illegible]ऽस्यलब्धा। आश्चर्यः श्रोता कुशलानुशिष्टः' (श्रुति) कुशल वक्ता मिळणे [illegible] आश्चर्य आहे, असे असतां लोमशांसारखे परम अधिकारी वक्ते तुम्हाला [illegible], आणि त्यांनी ते आपणास उपदेशिले. पण तुमच्या एकंदर संगण्यावरुन असे दिसले की तुम्हाला त्याबद्दल विशेष आदर वाटला नाही, व नुसत्या [illegible]पेक्षां नुसत्या भक्तीलाच तुम्हीं फार महत्त्व दिलेत. म्हणून ज्ञान आणि भक्ति [illegible] काही अंतर आहे की काय? असल्यास काय अंतर आहे ते मला सविस्तर समजाऊन सांगावे. आता उत्तर देतात.

[illegible]. ।सुनि उरगारि बचन सुख माना ।सादर बोलेउ काग सुजाना ।।१२ ।।
।भगतिहि ग्यानहि नहिं कछु भेदा ।उभय हरहिं भव संभव खेदा ।।१३ ।।
।नाथ मुनीस कहहिं कछु अंतर ।सावधान सोउ सुनु बिहंगबर ।।१४ ।।

।ग्यान बिराग जोग बिग्याना।ए सब पुरुष सुनहु हरिजाना।।१५।।
।पुरुष प्रताप प्रबल सब भाँती।अबला अबल सहज जड जाती।।१६।।

म. *।उरगारी वचनें सुख झालें।सादर काक सुजाण म्हणाले।।१२।।*
।भक्ती ज्ञानामधिं नहिं भेद।उभय हरिति भव-संभव खेद।।१३।।
।नाथ! कथिति मुनि काहीं अंतर।सावधान तें श्रुणु विहंगवर।।१४।।
।बोध विराग नि योग विबोधहि।श्रुणु हरियान पुरुष हे सर्वहि।।१५।।
।पुरुषप्रताप सगळा प्रबलहि।सहज जातिजड अबला अबलहि।।१६।।

अर्थ- उरगारी गरुडाच्या वचनाने भुशुंडीला सुख झाले, आणि तो सुजाण म्हणाला कीं.।।१२।। भक्ती आणि ज्ञान यांत काही भेद नाही, कारण की संसारजनित दुःखाचे हरण दोन्ही मिळून करतात.।।१३।। तरी पण नाथ! मुनि म्हणतात की काही अंतर आहे ते हे खगश्रेष्ठा! अवधान देऊन श्रवण करा.।।१४।। विराग, योग, बोध (= ज्ञान) आणि विबोध (विज्ञान) हे सर्वच हे हरिवाहना! पुरुष आहेत.।।१५।। पुरुषांचा सगळाच प्रताप प्रबल असतो आणि अबला (स्त्रिया) स्वभावताच अबल (बलहीन, दुर्बल) आणि जातीने (जन्मतःच) जड (मूर्ख) असतात. (हे खरे असले तरी-) ।।१६।।

टीका. चौ.१२ (१) उरगारी = सर्पशत्रु. गरुड सर्पशत्रु असून त्याला संशय सर्पांनी ग्रासला होता, पण त्याचा नाश झाल्यामुळे तो आता खराखुरा उरगारि झाला. संशय शोकमोहमुक्त होऊन विश्राम पावल्याचा त्याचा अनुभव ऐकून भुशुंडी सुखी झाला.

चौ.१३-१४ (१) गरुडाने 'ज्ञानभक्ति यामधिं किती अंतर' असे म्हटले, व ज्ञानाला प्राधान्य दिले. याने सुचविले आहे कवीनीं कीं त्याचा ओढा ज्ञानाकडे विशेष आहे. तो ज्ञानप्रधान भक्त आहे. याच्या उलट भुशुंडीने 'भक्तीज्ञानामधिं' असा उल्लेख केला. याने तो सुचवितो की ज्ञानापेक्षा भक्तीच अधिक श्रेष्ठ आहे. (क) उभय हरिति भवसंभव खेद- भक्ति व ज्ञान या उभयांच्या योगाने भवजनित खेदाचा नाश होतो. भक्तीविहीन ज्ञान किंवा ज्ञानविहीन भक्ती भवदुःख निवारण करु शकत नाहीत म्हणून म्हटले की दोघांत भेद नाही. असा अर्थ न घेतल्यास भुशुंडीच्याच पूर्वापर वचनांशी विरोध उत्पन्न होतो. 'रामचंद्रभजनाविण इच्छी

पद निर्वाण।। ज्ञानवंत अपि तो नर पशु विण पुच्छविषाण' (७८रा.) चौ.१-२ मध्ये नुकतेंच म्हटले कीं भक्तीचा त्याग करुन केवळ ज्ञानासाठी श्रम करील तो जड = जिवंत शव. पुढे ११९रा मध्ये म्हणतात की सेवकसेव्य भावाशिवाय (= भक्तिशिवाय) 'भवतरण न उरगारी' म्हणून केवळ ज्ञानाने भवसंभव खेद नष्ट होतो असे म्हणता येत नाही. ज्ञानविहीन भक्तीनेही भवदुख नष्ट होत नाही हे पुढे 'ज्ञानविमल जलिं करीं स्नान जै। रामभक्ति उरिं करी स्थान तैं' या वचनानें भुशुंडीनेच (१२२।११) दाखविले आहे. इतर वचनांची आवश्यकता नाहीं. (ख) 'ज्ञान मोक्ष दे' असे (३।१६।१) म्हटले असलें तरि तेथे सांगितलेल्या ज्ञानाच्या लक्षणांत 'भक्तिरव्यभिचारिणी'चा अंतर्भाव केलेला आहे (३।१५।७ टी.प.) आणि त्याच प्रकरणांत प्रभूंनीच सांगितले की 'ज्ञान अधीन तिच्या विज्ञानहि' (३।१६।३) तिच्या = भक्तीच्या. ज्ञान व भक्तिविषयक मानसवचनांचा येथे समन्वय केलेला आहे. भक्ती स्वतंत्र आहे हे प्रभुंनी पूर्वीच ३।१६।३, ७।४५।५ मध्ये सांगितले आहे. आता दोहोंतील अंतर दाखवून भक्तीची ती श्रेष्ठता विविध प्रकारे दाखवित आहेत.

चौ.१५-१६ (१) 'ज्ञान विराग योग विज्ञान' हे चारी शब्द हिंदीत पुल्लिंगी आहेत परंतु मराठीत ज्ञान व विज्ञान पुल्लींगी नाहीत, म्हणून समानार्थक बोध व विबोध हे पुल्लींगी शब्द मराठीत वापरले आहेत. विराग योग, बोध, व विबोध हे सर्व पुरुष आहेत, भक्ती स्त्री आहे. ज्ञान व भक्ती यातील अंतर दाखवावयाचे आहे ते या रूपकाच्या आधारे दाखवित आहेत. (क) 'पुरुष प्रताप सगळा प्रबल हि' पुरुष निसर्गतःच, स्वभावताच, प्रतापाच्या बाबतीत विशेष बलवान असतात. धैर्य, धाडस, कठोरपणा, निर्दयपणा, ममता त्याग, स्वतंत्रवृत्ती इ. अनेक बाबतीत पुरुषांचा प्रताप स्त्रियांच्यापेक्षा जास्ती असतो तसाच वैराग्य, योग, ज्ञान, विज्ञान याचा प्रताप जास्त असतो हे खरे. हा येथे पूर्व पक्ष मांडला जात आहे हे लक्षात ठेवावे. उलट स्त्रिया 'अबला' या त्यांच्या नावाप्रमाणे जन्मतःच अबल = बलहीन असतात आणि जड असतात हे ही खरे पण असे प्रबल प्रताप असलेले पुरुष अबलांना वश होतात हे पुढे सांगावयाचे आहे. प्रबल प्रतापी पुरुषाला अबलेचा त्याग करणे फार कठीण जाते.

हिं.दो. ।पुरुष त्यागि सक नारिहि जो बिरक्त मतिधीर।।
।।न तु कामी विषयाबस बिमुख जो पद रघुबीर।।११५रा.।।

सो. *।सोउ मुनि ग्यान निधान मृगनयनी बिधुमुख निरखि।।*
।।बिबस होइ हरिजान नारि बिष्नु माया प्रगट।।११५म.।।

म.दो. *।शके पुरुष अबले त्यजूं जो विरक्त मतिधीर।।*
।।न तु कामी विषयां वश विमुख चरण रघुवीर।।११५रा.।।
सो. *।मुनि ते ज्ञाननिधान मृगनयनी-विधुमुख बघुनि।।*
।।विवश होति हरियान नारि विष्णुमाया प्रगट।।११५म.।।

अर्थ- जो पुरुष वैराग्यसंपन्न आणि धीरबुद्धि (सात्विक धृतिसंपन्न) असेल (आणि रघुवीर चरणविमुख नसेल) तो अबलेचा- स्त्रीचा त्याग करु शकतो. पण कामी, विषयांना वश झालेला आणि रघुवीरचरणविमुख (भक्तिहीन) असलेला पुरुष (स्वभावतः प्रबल प्रतापी असला तरी) अबलेचा त्याग करु शकत नाही.।।११५रा.।। (फार कशाला) ते (= रघुवीरचरणविमुख असणारे) ज्ञाननिधान मुनि (सुद्धा) हरिणीसारखे सुंदर नेत्र असलेल्या स्त्रीचे चंद्रासारखे मुख पाहून तिला अत्यंत वश होतात, (कारण) हे हरिवाहना स्त्री (अबला) म्हणजे प्रगट दिसणारी विष्णुची माया आहे.।।११५म.।।

टीका. दो.रा. <u>(१) शके पुरुष अबले त्यजुं-</u> विराग योग ज्ञान विज्ञान हे पुरुष मायारूपी नारि (३।४३) चा त्याग करु शकतील, पण ते रघुवीरचरण विमुख असतील तर त्यांनाही मायेच्या पाशांतून सुटता येणार नाही हा गूढार्थ आहे. मतिधीर = सात्विक धृतिसंपन्न परिपक्वज्ञानी. मन आणि प्राणेंद्रिय यांच्या क्रियांस जी धृती दृढ धरते।। अव्यभिचारी निजात्मयोगें म्हणती कीं धृति सात्विक ते।। (सं.स.गी.१८।३३). मन प्राण आणि इंद्रिये यांच्या सर्व क्रिया जिच्या पूर्ण ताब्यात आहेत अशी आत्मयोगाने अव्यभिचारिणी झालेली जी धृति (धीरबुद्धी) ती सात्विक धृति होय. ज्ञान परिपक्व झाल्याशिवाय, दृढज्ञान विज्ञान संपन्न झाल्याशिवाय अशा धृतीची प्राप्ती होतच नाही. म्हणूनच महाभारतात धृतीलाच ज्ञान म्हटले आहे. 'एतज्ज्ञानं विदुर्विप्राः दृढमिंद्रियधारणम्' (महा.५।६९।२०) 'काम क्रोधग्राहवतीं पञ्चेद्रियजलांनदीम्। नावं धृतिमयीं कृत्वा जन्म दुर्गाणि संतर' (महा.५।४०।२२). असा जो परिपक्व

…विज्ञान संपन्न असेल व विरक्त = परम विरागी असेल तोच अबलेचा त्याग …रुं शकेल, परंतु उत्तरार्धातच सांगितले आहे की रघुवीर चरण विमुख असेल …ला करतां येणार नाही. अबला जिला म्हणतात तिचा प्रताप पुरुषांच्यापेक्षां …मी असला तरि एका बाबतींत अबलांच्यापुढें पुरुषांचा प्रबल प्रताप लंगडा …डतो. त्याग कोणाला करता येत नाही हे आता सांगतात. तीन कारणे आहेत.

(२) (क) कामी विषयांवश- स्त्रीविषयाशिवाय इतर विषय पुरुषांच्याजवळ …ऊन त्याला मोहित करु शकत नाहीत, ते सर्व जड विषय आहेत. 'कामाचे …ळ' स्त्री हा विषयच असला तरि तो सचेतन जंगम विषय आहे. 'मायारूपी …ारि' अबला हे कामाचें मुख्य बळ आहे. 'लोभा इच्छा दंभ बल कामा केवल …ारि' (३।३८), म्हणून कामी आणि विषयांवश असे दोन प्रकार सांगून '…ामी'चा उल्लेख प्रथम केला. इतर सर्व विषयांचा त्याग केलेला विरक्त …सणारा त्यागी पुरुष जर कामी असेल तर त्याचा त्याग व प्रबल प्रताप अबले …ढे चालणार नाही. (ख) विषयांवश = विषयासक्त. कामी नाही पण …षयासक्त असेल तरीही त्याचा प्रबल प्रताप, व योग, ज्ञान इ.चा प्रताप लंगडा …डेल. (ग) जो कामी ही नाही व विषयासक्तही नाही म्हणजे जो विराग, योग, …ान विज्ञानसंपन्न, पूर्वार्धात वर्णिला तसा असला तरीही तो जर श्रीरघुवीर …रणविमुख = भक्तिहीन असला तर तोहि अबलेचा त्याग करु शकणार नाही. …ारण भक्तिहीन असणाराला स्वतःच आपले संरक्षण कामक्रोधादिरिपू पासून …हणजे मायेच्या परिवारापासून करावे लागते आणि ते अशक्य असते प्रभूच …हणतात की 'काम कोप हे रिपु उभयांनां। हे जाणुनि पंडित मज भजती। ज्ञानलाभिं हि न भक्ती त्यजती' म्हणूनच भुशुंडीने म्हटले आहे कीं 'रामचंद्र भजनाविण इच्छि पद निर्वाण। ज्ञानवंत अपि तो नर पशु विण पुच्छविषाण।' (७८रा) आणखी अवतरणांची जरुर नाही. भक्तीविहीन विरागयोगज्ञानविज्ञान …पन्न इतर मानवांची गोष्ट कशाला.

दो.म.(१) ते = रघुवीरचरणविमुख = रामभक्तिविहीन असलेले- ज्ञाननिधान = विराग योग ज्ञान विज्ञान संपन्न अगदीं परिपक्वज्ञानी, ज्यांनी अबलेचा- नारीचा त्याग केला असेल असे अरण्यांत राहणारे मुनि सुद्धां पुन्हा स्त्री या विषयाला विशेष वश होतात, होऊ शकतात. विश्वामित्रांचे उदाहरण

प्रसिद्धच आहे आणि ज्याने प्रत्यक्ष कामदेवाचा मदनाचा पराभव केला त्या नारदांच्या मोहाची कथा मानसांतच आहे, ते तर भक्तही होते. मग भक्तिहीन ज्ञाननिधानमुनि मोहित होतील तर नवल काय? (क) याचे कारण 'नारि विष्णुमाया प्रगट.' भगवंताच्या मायेचे प्रत्यक्ष प्रगट झालेले रूप म्हणजे जिला अबला असे म्हणतात ती नारी, स्त्री. 'मायारूपी नारी' (३।४३टी.प.) असे अरण्यकाण्डांत म्हटले. ती माया कोणाची हे येथे स्पष्ट सांगितले. ही माया कोणाला का बाधा करु शकत नाही याची मीमांसा त्या रुपकाधारेंच करतात. सार हे आहे की 'ज्या रक्षिति रघुवीर ते बचले त्या अवसरिं' (१।८५) म्हणून रघुवीरभक्ति पाहिजे.

हिं. *।इहाँ न पच्छपात कछु राखउँ।बेद पुरान संत मत भाषउँ।।१।।*
।मोह न नारि नारि के रूपा।पन्नगारि यह रीति अनूपा।।२।।
।माया भगति सुनहु तुम्ह दोऊ। नारिबर्ग जानइ सब कोऊ।।३।।
।पुनि रघुबीरहि भगति पिआरी।माया खलु नर्तकी बिचारी।।४।।
।भगतिहि सानुकूल रघुराया।तातें तेहि डरपति अति माया।।५।।
।रामभगति निरुपम निरुपाधी।बसइ जासु उर सदा अबाधी।।६।।
।तेहि बिलोकि माया सकुचाई।करि न सकइ कछु निज प्रभुताई।।७।।

म. *।पक्षपात मुळिं इथें न करतो।वेदपुराण-संत-मत वदतो।।१।।*
।मोहे नारि न नारी-रूपा।पन्नगारि ही रीति अनूपा।।२।।
।माया भक्ति ऐक या दोनी।नारिवर्ग जाणेही कोणी।।३।।
।प्रिय रघुवीरा भक्तिच भारी।माया खलु नर्तकी बिचारी।।४।।
।सानुकूल भक्तिस रघुराया।म्हणुन घाबरे तिज अति माया।।५।।
।निरुपम निरुपाधिक हरिभक्ती।सदा अबाधित हृदिं करि वस्ती।।६।।
।तया बघुनि माया संकुचते।प्रभुता कार्य न निज करुं शकते।।७।।

अर्थ- इथे मी पक्षपात मुळींच करीत नाही. वेदपुराण व संत यांचे मत सांगतो.।।१।। हे सर्प (पन्नग) शत्रु! अशी अनुपम रीत आहे की नारी नारीच्या रुपावर मोहित होत नाही.।।२।। हे लक्षांत घ्या कीं माया आणि भक्ति या दोन्ही स्त्रीवर्गातील आहेत हे कोणीही (सर्व) जाणतात.।।३।। (त्यांत) रघुवीराला भक्तिच भारी प्रिय आहे. माया बिचारी नटी आहे

खरोखर.।।४।। रघुराया भक्तीलाच अनुकूल असल्यामुळे माया तिला घाबरते.।।५।। निरुपम व उपाधिरहित अशी हरिभक्ति ज्याच्या हृदयांत सदा अबाधितपणे राहते.।।६।। त्याला पाहूनच माया संकोच पावते (लाजते) आणि आपल्या प्रभुतेचे कार्य करुं शकत नाही.।।७।।

टीका. चौ.१-२ (१) पक्षपात मुळिं इथें न करतो- भाव हा कीं लोमश संवादात मी 'भक्तिपक्षिं धरिला हठ' व भक्तिविषयीं जसा पक्षपात केला तसा येथे करीत नाही, वेदपुराणादि सद्ग्रंथ व संत यांचे या विषयीं जे मत आहे तेच सांगतो. (क) मोहे नारि न नारीरूपा- मागील सोरठ्यांत सांगितल्याप्रमाणे ज्ञाननिधान मुनि सुद्धां जसे नारीरूपावर मोहित होतात तशा स्त्रिया स्त्रियांच्या रूपावर मोहित होत नाहीत, अशी ही अनूपा = अनुपमरीति आहे. (ख) पन्नगारि- पन्नग अरि- जो गळून पडल्यासारखा जातो तो पन्नग (सर्प) त्याचा अरि = सर्पशत्रु. स्त्रीरूपाला पाहून स्त्रिया गलीत होत नाहीत, त्यांच्यात काम विकार उत्पन्न होत नाहीत. पण भक्तीहीन ज्ञान निधान मुनि सुद्धां सुंदर स्त्रियांना पाहून गलित होतात, आरुढ पतित होतात.

चौ.३ (१) माया आणि भक्ति या दोन्ही स्त्रिया आहेत. मायारूपी स्त्री परम सुंदर आहे. पण भक्ति स्त्रीच असल्याने मायारूपी नारीच्या सुंदर रुपावर मोहित होत नाही. विराग योग ज्ञान विज्ञान हे पुरुष असल्यामुळे मोहित होतात. पण भक्तिमान ज्ञानी नारी- रूपावर मोहित होत नाहीत, अशी स्वाभाविक रीत आहे. भक्तिरूपीनारी ज्या विराग योग बोधवान पुरुषाजवळ असते तो मायारूपी स्त्रीच्या रूपावर मोहित होत नाही अशी स्वाभाविक अनुपम रीति आहे. शिवाय-

चौ.४-५ (१) प्रिय रघुवीरा भक्तिच भारी माया....बिचारी- माया आणि भक्ति या दोन भगवंताच्या स्त्रिया आहेत. दोघीही फार प्रबल व फार सुंदर आहेत, पण भक्ति भगवंताची फार लाडकी आहे. 'वेगे जिनें द्रवें मी भाई। ती मम भक्ति.' (३।१६।२) ती अशी राम वल्लभा आहे कीं, 'भक्ति अवशा वश करी' (३।२६।छं) भगवान इतर कोणालाही वश होत नाहीत, पण भक्तीला ते वश झालेले आहेत. (क) माया भगवंताला अप्रिय नाही, पण ते तिला कधीच

वश होत नाहीत ते मायाचालक आहेत आणि 'माया खलु नर्तकी' तिचा उपयोग भगवान विश्वनाटकांतील एक नटी या नात्यानेच करतात. ती भक्तीसारखी रामप्राणवल्लभा नाही. 'रघुवीराची दासि ती' (७१म.) ती बिचारी = दीन, स्वातंत्र्यहीन केवळ एक दासी आहे. (ख) भक्तिस सानुकूल रघुराया, रघुराया तिला इतके अनुकूल, तिच्या तंत्राने वागतात की भक्तीला पाहिल्या बरोबर तिचे स्मरण झाल्याबरोबर ते द्रवतात व ती म्हणेल ते करतात. वर दोन अवतरणे आधीच दिली आहेत. (३।१६।२ व ३।२६छं). रघुवीर भक्तीच्या मुठींत आहेत हे नटींचे काम करणाऱ्या मायेला चांगले माहीत आहे. ती जीवाला, विधिहरिशंभूंना नाचविणारी आहे, पण ती भक्तीला सदा घाबरते. कौसल्येला विश्वरूपात असें प्रत्यक्षच दिसलें. 'माया विविधा प्रबल पाहिली। सभय जुळुनि कर उभी राहिली।। पाहि जीव नाचवि ती ज्याला। दिसे भक्ति सोडी जी त्याला' (१।२०२।४-५) ग्रंथाच्या उपक्रमांत जो सिद्धान्त प्रत्यक्ष दाखविला, तोच येथे उपसंहारात, व्यावहारिक रूपकाने सांगितला. मायेला माहीत आहे कीं भक्तीकडे वाकड्या नजरेने नुसते पाहिले तरि थप्पड खावी लागेल. ती नेहमी रघुराजाला हात जोडून सेवेला उभी असते. याचा परिणाम असा होतो.

चौ.६-७ (१) निरुपम निरुपाधिक....वस्ती। .... संकुचते. निरुपाधिक = उपाधिरहित, 'उपाधिर्धर्मचिन्तायां कुटुम्बव्यापृते छले.' (विश्वमेदिन्यौ) धर्म अर्थ, काम, मोक्ष, अन्यसाधनांची आशा, इतरांचा भरवसा या सर्व गोष्टी भक्तीला बाधक उपाधि आहेत. मोक्षाची सुद्धा इच्छा नसून या उपाधि जिच्यांत नाहींत ती निरुपाधिक, परमशुद्ध. (क) अबाधित = बाधरहित, निषेधरहित. जिचा अभाव कधीं होत नाही अशी व कधी कमी न होणारी = अनपायिनी व अविरल. ज्या ज्या वेळी भक्ति ज्ञानाने बाधित होते, बाजूस सारली जाते, त्या त्या वेळी माया त्याला व्यापते हे मानसांत सतीमोह, गरुडमोह व वसिष्ठादिकांची वचने यांवरुन आधींच सिद्ध झालें आहे. (ख) अशी हरिभक्ति ज्याच्याजवळ असेल त्याला पाहून माया संकुचते, संकोच पावते. चंद्र उगवला म्हणजे सूर्य विकासी कमलें जशीं संकोचतात, व त्यातील सुगंध वगैरे पसरत नाहीत त्याप्रमाणे मायेला आपला प्रभाव पाडतां येत नाही. दाखविले की अनपायिनी, अविरल प्रेमभक्ति असेल तेथे मायेचा प्रभाव पडत नाही. अशी भक्ति नसेल तेथे माया प्रबल होते व प्रभाव पडतो. 'मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां

नोति ते' (भ.गी.)

।अस बिचारि जे मुनि बिग्यानी।जाचहिं भगति सकल सुखदानी।।८।।
।यह रहस्य रघुनाथ कर बेगि न जानइ कोइ।।
।।जो जानइ रघुपति कृपाँ सपनेहुँ मोह न होइ।।११६रा.।।
।औरउ ग्यान भगति कर भेद सुनहु सुप्रबीन।।
।।जो सुनि होइ रामपद प्रीति सदा अविछीन।।११६म.।।

।हें समजुनि मुनि जे विज्ञानी।याचिति भक्ति सकल सुखदानी।।८।।
।हें रघुनाथ-रहस्य ना कळतें शीघ्र कुणास।।
।।जो जाणे रघुपति-कृपें स्वप्निंहि मोह न त्यास।।११६रा.।।
।ज्ञानभक्ति-भेदा दुजा ऐका अती प्रवीण!।।
।।तो ऐकुनि रति रामपदिं होइ सदा अक्षीण।।११६म.।।

अर्थ- हें (रामरहस्य) समजल्यावर जे मुनि विज्ञानी (ब्रह्मलीन, ब्रह्मपर) असतात ते सुद्धा सकल (पूर्ण) सुख देणारी भक्ति मागतात.।।८।। परंतु हे रघुनाथाचें रहस्य कोणालाच लवकर कळत (उमगत) नाहीं. जो कोणी रघुपतीच्या कृपेने हे रहस्य जाणतो त्याला स्वप्नांतसुद्धां मोह होत नाही.।।दो.११६रा.।। अहो अति प्रवीण पक्षिराज! ज्ञान आणि भक्ति यांतील आणखी भेद (अंतर) सांगतो तो ऐका, त्याच्या श्रवणाने श्रीरामचरणांच्या ठिकाणी कधींही क्षीण न होणारी भक्ति प्राप्त होते.।।११६म.।।

टीका. चौ.८ <u>(१)</u> हें = वरील सात चौपायांत वर्णन केलेले रघुवीर आणि भक्ति यांच्या संबंधी मर्म म्हणजेच रामरहस्य. यालाच 'रघुनाथरहस्य' असे दोह्यांत म्हटलें आहे. या तीन ओळींत रामरहस्य प्रकरणाचा उपसंहार करीत आहेत. <u>(क)</u> <u>मुनि जे विज्ञानी</u>- 'ब्रह्मलीन दुर्लभ विज्ञानी.' सनकादिकासारख्या सदा ब्रह्मानंदात लीन असणारांनी भगवंताजवळ अनपायिनी भक्तीची याचना केलीच आहे. (७।३४।१- दो.३५ पर्यंत पहा.) <u>(ख)</u> <u>भक्ति सकल सुखदानी- सूचना</u> प्रचलित हिंदी रामायणांत येथे 'सुखखानी' पाठ आहे. तो चुकीचा आहे हे पूर्वी (४५।५, ८५।३) दाखविले आहेच. 'मोक्ष सकल सुखखाण' (८३म) असे

प्रभूंनी म्हटले, पण तो मोक्ष म्हणजे तें मोक्षदायक ज्ञान भुशुंडीने मागितले नाही. येथे दाखविले कीं सुखखाण असणारा जो मोक्ष तो भक्तीतील उपाधि-मल आहे. असे असतां भक्तीला सुद्धा सुखखाण भुशुंडीनेच म्हणणे शक्य नाही. पुढे (११९।१०) 'असि हरिभगति- सुगम सुखदाई' असे भुशुंडीनेंच म्हटले आहे, आणि ते भुशुंडीगीता प्रकरणांतच म्हटले आहे, म्हणून सुखखानी पाठ चुकीचा आहे. (ग) याचिति- सुचविले कीं ही प्रेमभक्ति कोणी कृपेने दिली तरच मिळते. भक्ति देणारे फक्त संत किंवा भगवान हें मागें अनेक वेळां साधार सांगितले आहे, पुढें दिसेलच. हे रहस्य केव्हा कळतें ते आता दोह्यांत सांगतात.

दो.रा. (१) हे रघुनाथ रहस्य- 'राम रहस्य ललित विध नाना। प्रगट गुप्त इतिहास पुराणां' (११४।२) नानाविध रामरहस्यांपैकीं एक येथे सांगितले. हे ज्याला उमजले त्याला रामभक्तीशिवाय दुसरे काहीं सुचत नाही व कशाचें महत्त्व वाटत नाही. पण हे (क) ना कळते शीघ्र कुणास- ज्ञान मोक्ष दे, मोक्ष सकल सुखखाण, इत्यादि सर्वांना माहीत असते, कळते, पण वळत नाही. परंतु हे रहस्य क्वचित कोणा एखाद्याला समजते व समजून उमजते. लवकर कळतच नाही. (ख) जो जाणे रघुपतिकृपें- रघुपतिकृपेनेंच हे कोणी एखादा जाणतो. हे 'जो' या एकवचनाने सुचविले. ज्याच्यावर रघुपती कृपा करतात त्यालाच हे अथवा कोणतेही रामरहस्य, मर्म जाणतां येते. 'मर्म न तुमचें त्यांसहि कळतें। तुम्हां जाणतिल अन्य कवण ते।। तो जाणे ज्या जाणूं देतां' (२।१२७।२-३) त्यासहिं = विधिहरिशंभूंना. इतरांना हे समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला तरि तें त्यांच्या गळीं उतरत नाही. ज्याला हे रहस्य उमजले 'स्वप्निंहि मोह न त्यास' ज्या विषयांतील रामरहस्य कळेल स्मरणांत राहील त्याला त्या बाबतीत रघुनाथ चरित्राविषयीं मोह होणार नाही. 'मोह न होणे' हे रहस्य उमजल्याचे लक्षण आहे.

सूचना- भक्ति आणि ज्ञान यांत भेद नाही असें म्हणून व काही अंतर आहे असे सांगून आतापर्यंत भक्ति आणि ज्ञान यांतील एक (रहस्य) भेद = फरक दाखविला. तो जाणल्याने भक्तिमार्गाविषयीं आदर उत्पन्न होईल. आता आणखी काहीं फरक सांगून ज्ञानापेक्षां भक्ति आदरणीय का हे दाखवावयाचे आहे.

दो.म. (१) ज्ञानभक्ति भेदा दुजा ऐका- ज्ञानाचा उल्लेख प्रथम करुन

सांगितले की प्रथम ज्ञानाचें विवरण केले जाणार आहे. स्वरूप, साधन, अधिकारी आणि फल या बाबतीत ज्ञान आणि भक्ति यांत भेद = फरक कोणता हे दाखविले जाईल. (क) अती प्रवीण (सुप्रवीण)- ज्ञानापेक्षा भक्ति अधिक आदरणीय आहे हे रहस्य नुकतेच सांगितले आहे. म्हणून येथे प्रवीण = भक्तिमार्गात प्रवीण असा अर्थ घेणे जरुर आहे. 'प्रभु विरंचि मशका करि मशकाहीं अज हीन।। हे जाणुनि संशय तजुनि रामहि भजे प्रवीण' (१२२म.) ही भक्तिमार्ग प्रवीणाची व्याख्याच आहे. गरुडाने सांगितले आहे की 'प्रभो प्रसादें मन, हृदयी मम। संशय शोक न मोह नसे भ्रम' (११५।६) असा गरुड आता झाला आहे. पूर्वी तो हरिभक्त होताच पण प्रवीण नव्हता म्हणून त्याला संशयादिकांनी ग्रासला होता, आतां संशयरहित झाला तेव्हा, तो प्रवीण [illegible] झाला हे योग्यच आहे पण अती प्रवीण म्हणण्याचे कारण हेच की, 'मिटला तव कृपें विश्रामे युत' असे झाल्यानंतर सुद्धा श्रवणाची इच्छा उत्पन्न झाली आणि विशेषतः भक्तिज्ञानाविषयींच प्रश्न विचारला म्हणून अती प्रवीण. (ख) रामपदिं अक्षीण रति होइ- अक्षीण = क्षीण न होणारी, कमी न होणारी व नाश न पावणारी. रति = अति प्रीति. सर्व मुनिश्रेष्ठांनी सुद्धा अनपायिनी, अविरल रामभक्तिच मागितली आहे. अनपायिनी अति प्रीति प्राप्त होणे ही फल श्रुती, आता जो ज्ञानभक्तीतील भेद सांगणार आहेत त्याच्या श्रवणाची फलश्रुती आधीच सांगितली. हा भेद ज्ञानदीप व भक्ति चिंतामणी या दोन प्रकरणांनी दाखविला आहे.

रामरहस्य प्रकरण समाप्त झालें.

<u>ज्ञानदीप-प्रकरण</u> (११७।१ - ११९।३)

या प्रकरणांत ज्ञान प्राप्तीची साधन परंपरा, ज्ञानप्राप्ति आणि त्याचे फळ यांचे वर्णन दीपाच्या धृतदीपाच्या रूपकाने केले आहे, म्हणून याला 'ज्ञानदीप' असे म्हणतात. भ.गीतेंत ज्ञानाला दीप म्हटलेच आहे. '<u>ज्ञानदीपेन भास्वता</u>' '<u>अंतरिचा ज्ञानदिवा मालवू नको रे</u>' असे मराठी संतांनी म्हटले आहे. 'तेजराशि विज्ञानमय दीप' (११७द्रा) असे येथे म्हटले आहे.

हि. ।सुनहु तात यह अकथ कहानी।समुझत बनइ न जाइ बखानी।।१।।

म. *।अकथ-कहाणी तात! ऐकणें।शक्य समजणे शक्य न वदणें।।१।।*

अर्थ- हे तात! अकथनीयाची काहणी ऐक, हिच्यामुळे त्याचा समज होणे शक्य आहे पण ते (मुखाने, शब्दानी) सांगता येण्यासारखे नाहीं.।।१।।

टीका. (१) अकथ = अकथनीय = अनिर्वचनीय. कहाणी = काहणी, कल्पित कथा. 'शक्य न वदणे' याचा संबंध काहणीशी घेतल्यास काहणी सांगता येणे शक्य नाही असा अर्थ होईल, पण काहणी तर सांगितली जात आहे, त्यामुळे वदतो व्याघात दोष होईल म्हणून जे शक्य न वदणे, जे अकथनीय आहे त्याची काहणी ऐक. जरी वदणें शक्य नसले तरि काहणीच्या आधारे समजणे शक्य आहे. अकथनीय काहणी असा अर्थ घेणे प्रमाद आहे. अकथनीय असलेले जे ब्रह्म, आत्मतत्व इत्यादि त्यांची काहणी = अकथ काहणी. (क) अकथ = अनिर्वचनीय. ब्रह्म, ईश्वर, जीव, व माया ही सर्वच अनिर्वचनीय आहेत. शब्दांनी यांचे यथार्थ वर्णन करता येणे शक्य नाही. ब्रह्म, राम, ईश्वर माया ही सर्व मन बुद्धीवाणी व इतर इंद्रिये यांनी जाणतां येत नसली तरि ब्रह्म = राम (निर्गुण) निराकार जाणता येते. 'जरिही ब्रह्म अखंड अनंतहि। अनुभवगम्य भजति जें संतहि।। (३।१३।१२)' 'अनुभव गम्य अखंड अनूप।। मन गोतीत अमल अविनाशी।। निर्विकार निरवधि सुखराशी' (७।१११।४-५) इत्यादि वचनें प्रत्येक काण्डांत आहेत, आणि त्या त्या ठिकाणी भरपूर विस्तार टीकेत केला आहे. 'नामरूप युग ईश उपाधी। अकथ अनादि विवेकी साधी' (१।२१।२) ईश्वराचे नाम व रूप सुद्धा अकथनीय आहेत.

(२) कहाणी = काहणी, कल्पित कथा. काही सिद्धान्त पटवून देण्यासाठी जी कल्पित कथा सांगतात ती. आकाशाकडे बोट दाखवून द्वितीयेचा चंद्र दिसला नाही म्हणजे योग्य त्या झाडाच्या शाखेकडे बोट दाखवून तिच्या टोकाजवळ, टोकावर चंद्र आहे तो पहा असे सांगितले म्हणजे त्या शाखेच्या साह्याने जसें चंद्राचे ज्ञान होते तसेंच मनोवाचादिकांना अगम्य असलेल्या ब्रह्माचें परोक्षज्ञान काहणीच्या योगाने करुन देता येते. मनवाणीद्रियांनी जें अनुभविता येते ते जग सत्य नाही व जे ब्रह्म मनवाणींद्रियादिकांनी अनुभवता येत नाही ते सत्य आहे हे म्हणणे अज्ञानी जीवास पटत नाही, म्हणून ते पटवून देण्यासाठी जसा अध्यारोप व अपवाद या प्रक्रियेचा अवलंब करावा लागतो

तशीच काहणी सुद्धां मननास, चिंतनास फार उपयोगी पडते. श्रीदासबोधांत सुद्धां एक कहाणी अशाच हेतुस्तव सांगितलेली आहे. आता काहणी सांगण्यास प्रारंभ करतात.

हिं. ।ईस्वर अंस जीव अबिनासी।चेतन अमल सहज सुखरासी।।२।।

म. ।ईश्वर-अंश जीव अविनाशी।चेतन अमल सहज सुखराशी।।२।।

अर्थ- जीव ईश्वराचा (ब्रह्माचा) अंश असल्याने अविनाशी, चेतन, अमल व सहज सुखराशी आहे.।।२।। (ईश्वर शब्द सर्व मत संग्राहक म्हणून वापरलेला आहे.)

टीका. (१) ईश्वर- ब्रह्म आणि ईश्वर यांच्यात तात्त्विक भेद नाही. मायारूपी उपाधिरहित असणारे जे निर्गुण निराकार ब्रह्म ते मायोपाधियुक्त झाले की त्यालाच ईश्वर, परमेश्वर म्हणतात. 'कार्योपाधिरयं जीवः कारणोपाधिरीश्वरः' ब्रह्माला उपाधि नाही, ते निरुपाधि आहे. तेच विद्यामायारूपी कारण- उपाधिमान झाले की ईश्वर व अविद्यामायारूपी कार्य- उपाधिमान झाले की जीव म्हणतात.

(क) अंश- ईश्वर अंश म्हणण्यात विशिष्टाद्वैतादि सर्व मतांचा संग्रह करणे हा हेतू आहे. जसे ब्रह्माचे अंश कलादिविभाग असू शकत नाहीत तसेच ईश्वराचे. पण जीवांचे तात्त्विक स्वरूप समजण्यासाठी ही काहणी सांगितली. महदाकाश व घटाकाश हा भेद जसा सत्य नसून भासतो म्हणून वर्णन केला जातो तसेच हे आहे. ब्रह्म जीव, ईश्वर जीव हा भेद कल्पित आहे. 'जीव अनेक एक माकान्त' ईश्वर एक आहे पण जीव अनेक आहेत. जीवांच्या अविद्येत भेद आहेत, म्हणूनच एक जीव अविद्यामुक्त झाला तरि बाकीचे होत नाहीत. ईश्वर मूळ अविद्येचा आश्रय साक्षी असतो. मूल अविद्या एक आहे व ईश्वर एकच आहे. ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः (भ.गी.) केवलाद्वैती येथे ईश्वर = ब्रह्म असें म्हणतील व बाकीचे ईश्वराचा अंश म्हणतील.

(२) जीव- अविद्येंत ब्रह्माचें प्रतिबिंब पडते तेव्हा त्या मलिनसत्वा मायेत तिच्या मालिन्यामुळे अनंत प्रतिबिंबे तयार होतात आणि ती अविद्याच त्या त्या

प्रतिबिंबांचे देह बनते या देहालाच कारण शरीर व त्याचा अभिमानी जो जीव त्याला प्राज्ञ म्हणतात. थोडक्यात लक्षण द्यावयाचे म्हणजे बुद्धि प्रतिबिंबित जो चिदाभास तो जीव. अविद्यामाया, मलिन सत्वामाया, कारण देह, अज्ञान नामरूपात्मिका इत्यादि सर्व पर्यायवाची शब्द आहेत. मानसांत ब्रह्माला, ईश्वराला गंगाजलाची उपमा दिली आहे व जीवाला गंगाजलाने केलेल्या दारुची उपमा दिली आहे. 'जाणुनि गंगाजल कृत वारुणि। पान करिति ना संत तया कुणि।। गंगे मिळतां पावन जैसें। ईश अनीशी अंतर तैसें' (१।७०।१-२) टीका मुद्दाम पहावी. तेथे ईश = ब्रह्म हाच अर्थ आहे. जीवाला मलिन झालेल्या वर्षाजलाची उपमाही दिली आहे. 'भूवर पडतां पाणि गढुळलें। जणुं मायेनें जीव वेष्टले' (४।१४।६ टीका पहावी.)

(३) अविनाशी- जीव ब्रह्माचा, ईश्वराचा अंश आहे असे ठरल्याबरोबर ईश्वर जसा अविनाशी म्हणजे सद्रूप आहे, तसाच जीव सद्रूप आहे हे ठरलेंच. 'जीव नित्य' (४।११।५) जीवाचा विनाश कधीच होत नाही. सुवर्णाच्या अंशाच्या ठिकाणी जशीं सुवर्णाची लक्षणें असावयाचीच, त्याप्रमाणे ब्रह्माचा अंश जो जीव त्याच्याठिकाणी ब्रह्माची स्वरूप लक्षणें सत् चित् आनंद (सुख) ही असावयाचीच. कापुराच्या अति विशाल वडीचे स्वभावधर्म अगदीं लहानशा वडीच्या ठिकाणीं असतात. अंश आणि अंशी यांच्यात उपाधिभेदाने विषमता पुष्कळ असली तरि वस्तुस्वभाव दृष्टीने भेद असणे शक्य नाही. तसेच ब्रह्म जीव यांचे (ईश्वर जीव यांचे) आहे. (क) चेतन = चिद्रूप, ज्ञानरूप आणि 'सहजसुखराशी'ने आनंदरूप सुखरूप, जसे ब्रह्म आहे, ईश्वर आहे तसाच प्रत्येक जीव सच्चिदानंदघन = सच्चित् सुखघन आहे. अविनाशी = सत्, चेतन = चित् सुखराशी = आनंदघन आहे. हे दाखविले. जडाशी अविद्येशी संबंध झाला तरि जीव सच्चिदानंदघन आहेच आहे. 'प्रज्ञानघनः एव आनन्दमयः आनन्दभुक् प्राज्ञः' (मां.उ.) सुषुप्तीचा अभिमानी जो जीव तो असा सच्चिदानंदघन आहे. कारण शरीराचा अभिमानी असला तरि तो आनन्दभुक् = आनंदाचा भोक्ता आहे. म्हणूनच कारण शरीराला आनंदमय कोष म्हणतात. (ख) अमल- याच प्रकरणांत ममतेला मळ म्हटलें आहे. सुषुप्तींत, गाढ निद्रेंत कारण शरीराभिमानी जीवाच्या ठिकाणी ममता नसते, म्हणूनच जीवाला 'अमल' = ममतामलरहित म्हटले. गाढनिद्रेत आनंदभोगाशिवाय इतर

गोष्ट, कोणताही विकार (कामक्रोधादि) नसतो. रागद्वेषांचे पोषण करणारा ममतारुपी मल झोपेंत नसतो. दुःखांचा विषयांचा अभाव असतो. प्राज्ञ सुखांत मग्न असतो. ते सुख ममतामलरहित असल्याने सर्व प्राण्यांनां कोणत्याही विषयापेक्षां झोप फार प्रिय असते. (ग) जीवाचें तात्विक असे असतां, मायापति ईश त्याचा सखा जवळ असतां 'दुःख दैन्य जग भारी' (१।२३।७) असे कां घडते?

दो. *।सो माया बस भयउ गोसांई।बँध्यो कीर मर्कट की नांई।।३।।*

।तो प्रभु मायेला वश झाला।शुक मर्कट सम बंधनिं पडला।।३।।

अर्थ तो प्रभु असून मायेला वश झाला आणि शुक-मर्कटांप्रमाणे बद्ध झाला (बंधनात पडला).।।३।।

टीका. (१) गोसाई- शब्द मानसांत प्रभू या अर्थानेंहि वापरला आहे. सामान्य अर्थ स्वामी, मालक असा आहेच. माण्डुक्य श्रुति या अर्थाला पूर्ण पोषक आहे. 'एषः सर्वेश्वरः एषः सर्वज्ञः एषः योनिः सर्वस्य, प्रभवाप्ययौ हि भूतानाम्' (मां.उ.) असे प्राज्ञाचें वर्णन आहे. वस्तुतः तो असा समर्थ आहे पण बंधनात पडला आहे. 'निज सहज अनुभव रूप तव खल भूलि अब आयो तहां।। निरमल निरंजन निरविकार, उदार सुख तैं परिहऱ्यो। निःकाज राज विहाय नृप इव सपन कारागृहं पऱ्यो।।' (वि.प. १३६।२) जीवानेंच जड जगापासून मोक्षापर्यंत सर्व संसाराची कल्पना केली आहे. (क) माया- सत्व रजतम यांच्या साम्यावस्थेलाच प्रकृति म्हणतात, ही ईश्वराची शक्ति माया नावाने प्रसिद्ध आहे. 'ती हरिमाया सब गुण खाणी,' 'दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया.' मायेला ब्रह्माहून निराळी स्वतंत्र सत्ता नाही म्हणून तिला सत् म्हणतां येत नाही, पण ब्रह्माहून निराळें मायेचे कार्य दिसते म्हणून असत् म्हणतां येत नाही, म्हणून मायेला अनिर्वचनीय म्हणतात. ती ब्रह्माहून अगदी विलक्षण आहे. ब्रह्म सच्चिदानंदघन आहे तर माया मिथ्या, जड व दुःखरूप आहे. 'रघुवीराची दासि ती जरि मिथ्या ज्ञानास' (७१स.) 'यत्सत्यत्वें जड जी माया' (१।११७।८) 'एक दुष्ट जी सुदुःखरुपी' (३।१५।५) मिथ्या, जड आणि दुःखरुप हे गुण सत्, चित् आणि आनंद यांच्या अगदी विरुद्ध आहेत. (ख)

सत्व रज तम या त्रिगुणांच्या न्यूनाधिक मिश्रणानें अविद्या मायेचे अनंत भेद होतात. पण शुद्ध सत्वात्मिका जी विद्या माया ती एकच आहे, ती जीवांच्या दुःखांचे कारण नाही. जी मलिन सत्वात्मिका, अविद्या आहे तीच जीवांना फार दुःख देते व भव कूपांत पाडते. 'ऐका वदूं तिचे भेदांना। विद्या अपर अविद्या जाणा।। एक दुष्ट जी सुदुःखरूपी। जी वश जीव पडे भव कूपीं।। एक रचि जग गुण वश जीतें। प्रभु प्रेरिता स्वबल न तीतें' (३।१५।४-६ टी.प.)

(२) मायेला वश झाला- मायेची अघटित घटना पटीयसी शक्ति अशी विलक्षण आहे कीं ती छायेच्या द्वारांसुद्धा आकाशात विहार करणाऱ्या स्वतंत्र जीवांना देखील वश करू शकते. 'ती मायेनें नभग खगां धरि।।... छाया धरतां उडुं न शकति ते। सदा गगनचर असे भक्षिते' (५।३।१-३) कूटस्थ, अविद्या माया व प्रतिबिंब मिळून जीव होतात. जो प्रभु, अविनाशी, चेतन अमल सहज सुखराशी कूटस्थ तोच एकदां अविद्येला वश झाला म्हणजे ती त्याला जसा नाचवील तसा जीव नाचतो. 'माया विविधा प्रबल पाहिली।।... पाहि जीव नाचवि ती ज्याला' (१।२०२।३-४) 'नाचतही निसि दिवस मऱ्यो।। तबही ते न भयो हरि थिर जब, ते जिव नाम धऱ्यो।। (वि.प.९१)' जीव हे नाव धारण केल्यापासून हे हरि! कधीं स्थिर झालो नाही, आणि रात्रंदिवस नाचत नाचतच मेलो. (क) बंधनि पडला- जो स्वतंत्र आनंदमय, आनंद भोक्ता होता तो प्रतिबिंबद्वारा अविद्येने बद्ध झाला. वस्तुतः बद्ध झाला नसून बद्ध झाल्यासारखा भासू लागला. 'जणु मायेने जीव वेष्टले' (४।१४।६). सूर्याचे प्रतिबिंब पाण्यांत पडले म्हणजे जलाच्या दोषांमुळे ते दूषित होते. पाणी चंचल असेल तर चंचल, पाणी मलिन असेल तर मलिन, उसळणारे असेल तर उसळणारे, पाणी पडत असेल तर पडणारे, धावत असेल तर धावणारे, लहान, मोठे इ. प्रकारचे प्रतिबिंब होते निदान झालेले दिसते. इतर दोष पाण्यांत नसले तरी तें पाण्याने बद्ध होते, पाण्याला सोडून ते स्वतंत्रपणे राहू शकत नाही. तसाच बुद्धिरूपी जलांत कुटस्थ प्रतिबिंबित झाल्याने तो त्या बुद्धीच्या गुणदोषादिकांनी बद्ध होतो. बुध्यादि सर्व अविद्या कार्य आहे. अज्ञान म्हणजेच अविद्या. ती दोरीसारखी दृश्य जड नाही, म्हणून दोन दृष्टान्त 'शुक-मर्कट' दिले-

(३) शुकसम बंधनि पडला- पोपटासारखा, राघूसारखा, बंधनात पडला.

पोपटांना पकडण्यासाठी फासेपारधी दोन बाजूला दोन उंच काठ्या पुरून त्यांच्या वरच्या बाजूस त्या दोन काठ्यांमध्ये एक पोकळ हलकी नळी अशी बसवितात की ती गरगर फिरु शकेल. त्या वरच्या नळीच्या खाली जमिनीवर धान्याचे कण, दाणे टाकून दिलेले असतात. पोपट एका ठिकाणावरुन उडाले की तावडतोप जमिनीवर न येता जवळपास असलेल्या उंच ठिकाणी बसतात आणि मग तेथून भक्ष्याजवळ जातात. पोपट प्रथम त्या नळीवर बसतो व तिला आपल्या पायांनी घट्ट धरतो. नंतर मान खाली करुन त्या धान्याकडे पाहू लागतो तोच, त्याची मान खाली झुकल्यामुळे ती नळी गरकन फिरते. पडण्याच्या भीतीने ते स्वतःच त्या नळीला आपल्या पायांनी आणखी घट्ट धरतो. भीतीने त्या नळीला धरण्याचा प्रयत्न करतो. तशी ती नळी आणखी गरकन फिरते तसा हाहि फिरतो व त्याला भ्रम होतो की कोणी तरि मला बांधून ठेवला आहे. त्याला खरोखर कोणीच बांधलेला नसतां बंध भ्रमाने तो उडून जात नाही. इतक्यांत तो पारधी त्यास पकडतो व मग खरोखरच बंधनात पिंजऱ्यात पडतो, नाहीतर ठार मारला जातो. वास्तविक पाहतां त्याचे अज्ञानच त्याच्या भ्रमाचे कारण आहे व तेच त्यास बंधनात पाडते. 'अज्ञानमेवात्र हि मूल कारणम्' लोभ हे गौण कारण आहे, नळी फिरु लागतांच तिला चटकन सोडून देऊन १।२ दाणे उचलून तो सहज पळू शकला असता.

एका साधूने हे पाहिले व पोपटांच्या या अज्ञान मूलक बंधनाची दया आली, म्हणून त्याने फासे पारध्याकडून तो पोपट विकत घेतला व त्याला पढविला की अरे राघू! धान्याच्या कणांच्या लोभाने नळीवर बसू नकोस. कदाचित बसलास तरि ती नळी फिरु लागतांच निर्भयपणे तिला सोड आणि भुर्रकन जा उडून, म्हणजे तू बंधनात पिंजऱ्यात पडणार नाहीस. हा उपदेश (त्या राघूला उत्तम प्रकारे बोलतां येऊ लागला) तो राघू चांगला शिकला व हा आता दुसऱ्या पोपटांना शिकवील व पोपट बंधनात पडणार नाहीत असे वाटल्यावर साधूने त्याला मोकळा सोडून दिला. त्या पोपटाची ती वाक्ये ऐकून ऐकून इतर शुकही त्यात पंडित झाले. एक दिवस त्यातला एक पंडित झालेला पोपट 'राघू! नळीवर बसू नकोस' असे म्हणतच एका नळीवर बसला. नळी गरकन फिरुन तो खाली डोके वर पाय असा लोंबकळू लागला पण नळी सोडून न देता पुढील मंत्र अरखलितपणे उच्चारू लागला. शब्दज्ञानी पंडितांची

व्यवहारात अशीच फजीती होते. म्हणून हा दृष्टान्त विशेषतः मूर्ख पंडितांसाठी म्हणजे पढत मूर्खाविषयी आहे. 'क्रियेविण वाचाळता वेर्थ आहे.' (समर्थ).

(४) मर्कटसम- माकडे सुद्धा अशाच एका प्रकारे बंधनात पडतात. माकडाचा हात जेमतेम आत जाईल अशा एका बारीक तोंडाच्या कळशीत भांड्यात हरभरे चणे मुठीत घेता येतील इतके भरुन ते पात्र जमिनीत गळ्यापर्यंत पक्के पुरतात, व बाहेर थोडेसे चणे पेरून ठेवतात. माकड ते बाहेर दिसणारे चणे खाण्यास येते भांड्यातील चणे पाहून त्या भोकातून हात कसा तरि आत घालून मुठीत चणे घेते व हात बाहेर काढण्याचा प्रयत्न करते, पण मूठ भरलेली असल्याने हात काही बाहेर येत नाही. ते माकड जोराजोराने प्रयत्न करीत असते, अशावेळी पारधी येऊन त्याच्या गळ्याला बांधतात. असे माकड बांधले जाते. लोभाने आकर्षित झाले असले तरि मुठीतील चणे सोडून दिले तर हात बाहेर येईल हे न कळल्यामुळेच ते बद्ध झाले. येथेहि अज्ञानच बंधाचे कारण आहे. पण हा मर्कट पोपटपंची करणारा पंडित नसून केवळ मूर्ख आहे. असा या दोन दृष्टान्तांत फरक आहे. याप्रमाणे हे दाखविले की जीव स्वकल्पनाजनित अज्ञानरूपी बंधानेंच बांधला गेला आहे. हे बंधन असे चमत्कारिक आहे की नाना प्रकारचे प्रयत्न करुन सुद्धा सुटू शकत नाही याचे कारण आता सांगतात.

हिं. ।जड चेतनहि ग्रंथि परि गई।जदपि मृषा छूटत कठिनई।।४।।

म. ।जड चेतनि पडली ग्रंथी जी।जरी मृषा सुटणें कठिण ती।।४।।

अर्थ- जड आणि चेतन यांची जी गाठ पडली ती जरी खोटी आहे तरी सुटणे कठीण आहे.।।४।।

टीका. (१) जडचेतनिं- जड आणि चेतन हे दोन्ही अगदीं परस्पर विरुद्ध स्वभावाचे पदार्थ आहेत एक सत्य दुसरा मिथ्या, एक चेतन दुसरा जड, एक केवळ आनंदरूप तर दुसरा दुःखरूप आहे. अशा परस्पर विरुद्ध धर्मी पदार्थांची गांठ पडणें शक्य नाही. म्हणून जी गाठ पडल्यासारखी वाटते ती मिथ्याच असली पाहिजे. पाणी आणि आकाश, आकाश आणि दोरी यांची गाठं मारणे किंवा पडणे जसें अशक्य तशीच जड चेतन ग्रंथि पडणे अशक्य पण

(क) पडली ग्रंथी- गांठ पडली आहे. गांठ मारण्यास एका दोरीचे टोक दुसरीच्या टोकांवर व दुसरीचे पहिलीवर एकमेकांत अडकून पडावे, ठेवावे लागते. त्या प्रमाणेच जडाचे गुणधर्म चेतनावर व चेतनाची लक्षणें जडावर आरोपित केली जाणे म्हणजेच जडचेतन ग्रंथि पडणे. आत्मा नित्य, जन्ममरणरहित असून मी मरेन, मला जन्म आहे असे वाटणे म्हणजे मर्त्य देहाचे धर्म आत्म्यावर आरोपित करणे, देह अज्ञानी असून मी अज्ञानी आहे असे वाटणे, व देहमर्त्य असून त्याला अमर करण्याचा प्रयत्न करणे, इत्यादि प्रकारे देहत्रयांचे गुणधर्म आत्म्यावर आरोपित करणे व आत्म्याची लक्षणे देहांवर आरोपित करणे म्हणजेच जड चेतन ग्रंथि (गाठ) पडणे होय. ही ग्रंथी केव्हा पडली कशी पडली याचा मागमूस लागत नाही. (ख) ल.ठे. या चौपाईच्या प्रत्येक चरणांत १।१ मात्रा कमी आहे, त्यामुळे होणाऱ्या गतिभंगाने परम आश्चर्याचे भाव सुचविले आहेत. अशक्य असणारी गोष्ट घडली व ही गांठ मिथ्या असून सुटणे फार कठिण हे ही आश्चर्यच. (ग) मृषा- खोटी. ही गांठ खोटी आहे. केवळ भ्रम मात्र आहे, तरि हा परस्पराध्यास दूर करण्याचा कितीही प्रयत्न केला तरि तो सुटणे फार कठीण आहे. ग्रंथी पडल्याचा परिणाम असा झाला की-

हिं. *।तब ते जीव भयउ संसारी।ग्रंथि न छूट न होइ सुखारी।।५।।*
।श्रुति पुरान बहु कहेउ उपाई।छूट न अधिक अधिक अरुझाई।।६।।
।जीव हृदयँ तम मोह बिसेषी।ग्रंथि छूट किमि परइ न देखी।।७।।

म. *।तैंहुनि जीव होइ संसारी।ग्रंथि सुटे न सुख न लवभारीं।।५।।*
।श्रुति पुराण बहु उपाय वदती।न सुटे, अधिकाधिक च घट्ट ती।।६।।
।जीव हृदयीं तम विशेष मोहो।ग्रंथि सुटे कशि, शके न पाहों।।७।।

अर्थ- (ग्रंथि पडली) तेव्हा पासून जीव संसारी झाला. ग्रंथि (काही केल्या) सुटत नाही व लेशमात्र (लवभार) सुख त्याला मिळत नाही.।।५।। वेद पुराणादिकांनीं पुष्कळ उपाय सांगितले आहेत पण त्यांनी ग्रंथि सुटत तर नाहीच परंतु ती अधिकाधिक घट्ट होत जाते.।।६।। (कारण) जीवाच्या हृदयांत मोहरूपी अंधार विशेषच असतो, व त्यामुळे तो त्या ग्रंथीला पाहू शकत नाही (ती त्याला दिसत नाही) मग ती सुटणार कशी?

टीका. चौ.५ (१) तेहुनि = तेव्हापासून. जडचेतनाची ग्रंथि (गांठ) पडल्यापासून. ही जडचेतन (चिदचित्) ग्रंथि अनादि अनंत काळापासून पडलेली आहे. (क) होइ संसारी- जन्ममरणरूपी चक्रांत भ्रमण करु लागला. चार खाणी आणि ८४लक्ष योनींत 'फिरे सदा मायेने प्रेरित। प्रकृति काल गुण कर्मे घेरित' (४४।४-५). कारण (ख) ग्रंथि सुटे न- सुचविले की ही ग्रंथि सुटल्या शिवाय जीवाचे संसरण चुकत नाही व या संसार चक्रातून सुटल्याशिवाय सुख होत नाही. ग्रंथिभेद झाल्याशिवाय दुःखनाश व सुखप्राप्ति होणे शक्य नाही हे येथे सांगितले. ग्रंथिभेद हे साधन व सुख फल आहे.

चौ.६ (१) श्रुतिपुराण- वेदपुराणांपेक्षा दुसरे मोठे प्रमाण नाही, कारण की वेदपुराणादि ईश्वराचे सहज श्वास आहेत. 'वेद, पुराण इतिहास, विद्या, उपनिषदे श्लोक, सूत्रें, अनुव्याख्यानें व्याख्यानें ही सर्व त्या एका परमेश्वराची निःश्वसित आहेत' (बृहउ.२।४।१०). वेदपुराणइतिहासादिकांनी 'जप तप योग याग निजधर्म। श्रुति संभव नाना शुभकर्म' इत्यादि अनेक उपाय सांगितले आहेत. ही ग्रंथि सोडण्यासाठी, पण वेद स्वतः त्रिगुणात्मकच आहेत. 'त्रैगुण्यविषयावेदाः निस्त्रैगुण्यो भवार्जुन' (भ.गी.) वेद स्वतःच सगुण परमेश्वराला प्रार्थना करतात की 'जय जय जह्यजां अजित! दोषगृभीतगुणान्' (भाग. १०।८७।१४) हे अजित परमेश्वरा! गुणांचे सोंग घेतलेल्या पण दोषांनी भरलेल्या या आपल्या अजेला अविद्या मायेला ठार मारा. असे असल्यामुळे वेदपुराणादिकांनी सांगितलेले नाना उपाय नुसते (भक्तीचा आधार न घेता) केले, तरि ही गाठं काहीं सुटत नाही. (क) अधिकाधिकच घट्ट ती- ती गाठं अधिक घट्ट होत जाते म्हणजेच अज्ञान व अहंकार अधिक वाढतात, व त्या कर्मांचे फळ भोगण्यासाठी संसृति चक्रांत अधिकच भ्रमावे लागते. 'इष्टापूर्तादि कर्माणि सुबहुनि कृतान्यपि। जन्म हेतूनि तान्येव हरे र्नाम तु मुक्तिदं।।' (बौद्धायन संहिता). असे का होते?

चौ.७ (१) जीवहृदयिं- ही गाठं जीवाच्या हृदयांत पडलेली आहे. आणि हृदयांत 'तम विशेष मोहो.' मोहरुपी तम अंधकार हृदयांत फारच असतो. जेव्हा मायेला वश झाला व गाठं पडली तेव्हांच हृदय मोहांधकारानें व्यापलें गेले, आणि संसृतीत भटकत राहिल्याने मोहरूपी अंधार अविद्यारूपी रात्रींत

…शेषच वाढला. (क) ग्रंथि सुटे काशि- गांठ अंधारात सोडतां येत नाही. ही …ग्गा रेशमाची पक्की घट्ट झालेली गांठ आहे! गांठ हृदयांत असून तेथे गडद …धार आहे, त्यामुळे गांठ दिसतच नाही व त्यामुळे सोडतां येत नाही. …दिसल्यावर सोडतां येण्याची शक्यता असते, ती केव्हा असते हे आतां सांगतात.

…दो. ।अस संजोग ईस जब करई।तबहुँ कदाचित सो निरुअरई।।८।।

ग. ।ईश असा संयोग आणि जैं।शके कदाचित सुटूं ग्रंथि तैं।।८।।

अर्थ- ईश्वर जेव्हां असा (पुढे वर्णिलेला) संयोग जुळवून आणतो तेव्हा(च) कदाचित ग्रंथि सुटूं शकते.।।८।। (ज्ञानमार्गात सुद्धां ईश्वरकृपा पाहिजेच).

टीका. (१) असा संयोग = पुढील ११७।९ चौपाईपासून ११८।२ पर्यंत दीपाच्या रूपकाने वर्णिलेल्या अनेक गोष्टी प्राप्त होणे व घडणे त्या अनेक गोष्टी प्राप्त होणे व उत्तम प्रकारे क्रमशः निर्दोष घडणें जीवाच्या हातांत नाही. ते ईश्वराच्या रघुनाथाच्या हाती आहे. ईश्वराने कृपा केली तरच असा संयोग जुळून येतो, अन्यथा ते साधन सुद्धा घडणे शक्य नाही. म्हणूनच पूर्वी म्हटले की श्रुतिपुराणोक्त नुसत्या उपायांनी ग्रंथी सुटणे अशक्य आहे. आधी या ज्ञानमार्गाची इच्छा होणे सुद्धा ईश्वरानुग्रहाशिवाय शक्य नाही. 'ईश्वरानुग्रहादेव पुंसामद्वैतवासना' (अव.गी.) अवधूत गीता हा अगदी शुद्ध ज्ञानमार्गी ग्रंथ आहे, व त्यातील प्रारंभीचेंच हे वचन आहे. श्रीमदाचार्य म्हणतात 'दुर्लभं त्रयेमेतद्दै देवानुग्रहहेतुकम्। मनुष्यत्वं मुमुक्षत्वं महापुरुषसंश्रयः' (वि.चू.) येथे सुचविले की ज्ञानमार्गात सुद्धां आरंभापासून शेवटपर्यंत ईश्वरकृपा लागतेच. (क) शके कदाचित सुटूं ग्रंथि तैं- सर्व संयोग ईश्वरकृपेने व्यवस्थित जुळत गेला व ज्ञानदीप हृदयांत पेटविता आला व त्याच्या प्रकाशांत ग्रंथि दिसली तरि ती सोडता येईलच अशी खात्री नाही, कदाचित सुटेल, म्हणजे सोडता येणे कठीणच आहे. कारण त्या दीपाला विझवून टाकणारी विघ्ने फार येतात. पुढे मानसरोग प्रकरणांत भक्तिमार्गाचें साधन सांगण्यापूर्वी असाच उल्लेख केला आहे पण त्यात 'कदाचित' शब्द नाही. 'रामकृपें सब रोग विनाशति। असा सुयोग कधीं जर लाभति' (१२२।५)

सूचना- पुढल्या चौपाईपासून ग्रंथिभेद करण्याचा ज्ञानमार्गी साधनक्रम दीपाच्या रूपकाने सांगितला जात आहे. दीपाला तूप पाहिजे तर धेनु पासून रूपकांस प्रारंभ करुन दीप प्रज्वलित करुन त्याच्या ज्योतीचा प्रकाश हृदयांत पडण्यापर्यंत क्रमशः फारच सुटसुटीत पण सुंदर वर्णन केले आहे.

हिं. *।सात्विक श्रद्धा धेनु सुहाई।जौं हरिकृपां हृदयँ बस आई।।९।।*
।जप तप व्रत जम नियम अपारा।जे श्रुति कह सुभ धर्म अचारा।।१०।।
।तेई तृन हरित चरै जब गाई।भाव बच्छ सिसु पाइ पेन्हाई।।११।।

म. *।श्रद्धा सात्विक धेनु शोभना।करि हरिकृपें हृदयिं जर सदना।।९।।*
।व्रत जप तप यम नियम अपार।वेदविहित शुभ धर्माचार।।१०।।
।तें तृण हरित गाय जैं चरते।भाव वत्स भेटत पान्हवते।।११।।

अर्थ- सात्विक श्रद्धारूपी व्यायलेली सुंदर गाय जर श्रीहरीच्या कृपेने येऊन हृदयांत राहिली.।।९।। व अपार व्रत, जप, तप, यम, नियम, आणि वेदांनी सांगितलेले शुभ (सात्विक) धर्माचरण हे हिरवे (हरित) तृण (ओला चारा) त्या गाईला (पोटभर) चरण्यास सापडले तर मग भावरूपी वत्स (वासरु) भेटल्यावर ती पान्हवते.।।१०-११।।

टीका. चौ.९ <u>(१)</u> <u>सात्विक श्रद्धा</u>- अनंत काळांत चित्तावर झालेल्या संस्कारांच्या परिणामाने उत्पन्न होणारा विशिष्ट प्रकारचा जो आदर त्याला श्रद्धा म्हणतात. '<u>तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ। ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि</u>' (भ.गी.१६।२४) श्रुतिस्मृतिपुराण शास्त्राला प्रमाण मानून शास्त्रविधिपूर्वक कर्म, जप, यज्ञ, तप, दान, देवपूजन, आहार, इत्यादि सर्व गोष्टी सत्वगुण विशिष्ट पद्धतींच्या करण्याविषयी जो आदर ती सात्विक श्रद्धा. '<u>श्रद्धावाँल्लभते ज्ञानं</u>' (भ.गी.) थोडक्यात असे म्हणतां येईल की <u>कोणतेही कर्म निष्काम बुद्धीने ईश्वरार्पण करुन शास्त्रविधिपूर्वक करण्याविषयी वाटणारी आदरयुक्त आवड म्हणजे सात्विक श्रद्धा</u>. '<u>कवणही सिद्धि कि विश्वासाविण</u>' म्हणून या श्रद्धेला विश्वासाची जोड पाहिजेच. स्वान्तस्थ ईश्वराचा साक्षात्कार करुन घ्यावयाचा आहे आणि '<u>भवानी शंकरौ वंदे श्रद्धाविश्वास रुपिणौ। याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धाः स्वान्तःस्थमीश्वरम्</u>'

(१मं.श्लो.२) म्हणून विश्वास पुढे वर्णिला आहे, म्हणून येथे श्रद्धेपासून आरंभ केला आहे.

(२) धेनु शोभना = 'धेनुः स्थान्नवसूतिका' (अमरे) नवीन व्यायलेली सवत्स गाय म्हणजे धेनु. शोभना = चांगली, सात्विक स्वभावाची.खोड्याळ, खट्याळ रजोगुणी तमोगुणी स्वभाव नसलेली. अशी गाय असली म्हणजे दूध सत्वगुणी व फार कष्ट न पडतां मिळते तशी सात्विक श्रद्धा असली म्हणजे कोणते दूध मिळते हे पुढे सांगतील. (क) हरिकृपें हृदयिं सदना करि- सुचविले की सात्विक श्रद्धा श्रीहरीच्या कृपेशिवाय हृदयांत घर करीत नाही. प्रकाश हे सत्वगुणाचे लक्षण आहे. हृदयांत मोहांधकार फार आहे, तेथे ज्ञानदीपाचा शुद्धसत्वगुणी प्रकाश पाडावयाचा आहे म्हणून प्रथम सात्विक श्रद्धा हृदयांत येऊन राहिली पाहिजे. भाव हा की हृदय सात्विक श्रद्धामय झाले पाहिजे. हे ईश्वराच्या कृपेनें घडले असे समजू. येथे शमादि सहा संपत्तीपैकीं श्रद्धा सांगितली. पुढील दोन चौपायांत या गाईचा चारा व वत्स सांगतात.

चौ.१० (१) गाईला ओला चारा (हिरवे गवत) भरपूर मिळाला तरच ती पुष्कळ दूध देईल, म्हणून प्रथम दीड चौपाईत हिरवे गवत कोणतें ते सांगतात. (क) व्रत जपतप- या तिघांचा अंतर्भाव नियमांत होत असून येथे स्वतंत्र उल्लेख केला आहे, म्हणून व्रत शब्दाने शरीराने धर्माचरण, जप शब्दाने वाचेने धर्माचरण आणि तप शब्दाने मनाने धर्माचरण सुचविले आहे. कायिक वाचिक मानसिक धर्माचरण सुचविले. व्रताचरणांत स्नान पूजा इत्यादींत शरीराचा संबंध जास्त असतो. जप चार वाणीं पैकीं कोणत्या तरी एका वाणीने, वाचेनेच केला जातो व 'मनसश्चेंद्रियाणांच ऐकाग्र्यं परमं तपः' हे मुख्य तप ज्ञानमार्गात साधावयाचे असते, व हे केवळ मानसिक धर्माचरण आहे. (ख) यम- मुख्य पाच आहेत. 'अहिंसा सत्यम् अस्तेय ब्रह्मचर्य अपरिग्रहाः यमाः' (पा.यो.) उपनिषदांत १० व भागवतांत १२ यम व तितकेच नियम सांगितले आहेत. श्रुतिप्रोक्त दहा यमांची व १० नियमांची अंतर्बाह्य लक्षणे 'वेदान्तसार अभंगरामायण' मध्ये (अभंग ८-२६) दिली आहेत. (१) अहिंसा- 'अहिंसा प्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः' (पा.यो.) मनाने वाणीने वा कर्माने कोणाही प्राण्याची हिंसा न करणे म्हणजे अहिंसा. 'परमधर्म वेदोक्त अहिंसा'-

(१२१।२२) च्या टिकेत विस्तार केला आहे. अहिंसेने क्रोध, द्वेष, वैर, विरोध यांचा जय करतां येतो. (२) सत्य- मन आणि इंद्रिये यांनी जे जसे अनुभविले असेल आणि बुद्धीने निश्चय केला असेल तसे वाणीत व मनांत बाळगणे म्हणजे सत्य पालन. सत्य भाषणाने प्राणिहत्या होत असेल तर ते सत्य बोलू नये, कारण 'अहिंसा परमो धर्मः' 'सत्य मूल सब सुकृत शोभती। वेदपुराणविदित मनु वदती' (२।२८।६) 'धर्म न दुसरा जगिं सत्यासम' (२।९५।५). (क) युधिष्ठिरांनी 'नरो वा कुंजरो वा' म्हटले ते वंचक सत्य असल्यानें सत्य म्हणतां येत नाही. स्वतः बोलणारालाच सत् वस्तुस्थितीविषयी शंका, संशय असतां ते संशयित सत्य सत्य म्हणून सांगणे सत्य नव्हे. ज्या शब्दांचा अर्थ बोध ऐकणारास यथार्थ होणार नाही अशा शब्दांत, भाषेत सत्य सांगणे भ्रामक सत्य असल्याने ते सत्य नव्हे. (३) अस्तेय- आपल्या मालकीची नसलेली कोणतीही अगदीं तुच्छ वस्तु सुद्धा (उदा. फुले, तुळशी, माती इ.) त्या वस्तूच्या मालकाच्या अनुज्ञेशिवाय घेणे म्हणजे स्तेय = चोरी, असे मनाने सुद्धा न करणें याचे नाव अस्तेय = चोरी न करणे. 'अस्तेय प्रतिष्ठायां रत्नलाभः' (पा.यो.) अन्न वस्त्राला कधीं कोठेही वाण पडत नाही.सत्य हे फार मोठे मानसिक व वाचिक तप आहे तसें अस्तेय मानसिक व कायिक तप आहे. 'सत्यप्रतिष्ठायां वाक्सिद्धिः अस्तेयाने लोभ व तृष्णा जयाला मदत होते. (४) ब्रह्मचर्य नैष्ठिक असेल तर कामविकार जिंकणे शक्य होते. व अपरिग्रहाने वैराग्य वाढते व यदृच्छालाभसंतुष्ट राहतां येते. अपरिग्रह = संग्रह न करणे, दान न घेणे. ल.ठे. या पांच यमांचे काटेकोरपणे पालन करणे हा धर्माचा पाया आहे. कर्ममार्ग असो, ज्ञानमार्ग असो की भक्तिमार्ग असो, या पांच यमांचे पालन सतत केलेच पाहिजे. 'यमान् अभीक्ष्णं सेवेत.' सूचना- जप, व्रत व विशेषतः तप हे तितिक्षा संपत्तीचे साधन आहे. यमनियमांच्या पालनाने उपरति व समाधान साधतात, म्हणजे येथपर्यंत श्रद्धा तितिक्षा आणि उपरम या तीन संपत्तींची प्राप्ति सुचविली गेली.

(२) नियम- शौच संतोष स्वाध्याय तप व ईश्वर प्रणिधान हे मुख्य पाच नियम आहेत. (पा.यो.) यांचे वर्णन अरण्यकाण्डांत राम गीतेत केले आहे. (क) व्रत जप तप यम नियम यांच्या आचरणाला पार नाही. त्यांचा अंत पावणे कोणालाच शक्य नाही. (ख) वेदविहित शुभ धर्माचार- वेदांच्या आज्ञा

...धिनिषेधात्मक आहेत. विधींचे पालन करुन निवेधांचा त्याग करणे म्हणजेच ...दविहित धर्माचरण करणे होय. ते सर्व वर्णाश्रमधर्माचारांचे पालन शुभ = सात्विक पाहिजे.

चौ.११ (१) 'हे तृण हरित' हरित = हिरवे. व्रत जप तप, यम नियम आणि शुभधर्माचरण हे सहा प्रकारचे तृण हिरवे पाहिजे. हिरव्या ताज्या तृणांत रस व गोडी पुष्कळ असतात, धेनु मनापासून खाते व पुष्कळ दूध देते व वासराचेहि पोषण चांगले करु शकते. वाळलेल्या रसहीन तृणाने असे घडणे शक्य नसतें. (क) गाईचा चारा तृण, औषधी आणि वनस्पती असा तीन प्रकारचा असतो व त्यांत बीजरुह व काण्डरुह असे दोन प्रकार असतात, म्हणजे गाईचा चारा सहाच प्रकारांचा असतो म्हणून येथे श्रद्धाधेनुचा चारा सहा प्रकारचा सांगितला आहे. हिरवे तृण जसे स-रस (रसाळ) असते तसे व्रतजपतपादि सर्व साधन प्रेमाने आनंदाने व उत्साहाने घडले पाहिजे. 'नित्य अधिक मन पदिं अनुरागे। विसरे देह तपीं मन लागे' (१।७४।३) 'अस्थिमात्र तनु होउनि राही। तरि पीडा मनिं मनाग नाहीं' (१।१४५।४) चालू केलेले धर्माचरण केव्हा एकदां संपेल असे वाटत, कष्टाने करीत राहून करें तरि दिवस मोजित संपविणे म्हणजे सात्विक श्रद्धा धेनूला शुष्क नीरस तृण खायला घालण्यासारखे आहे.

(२) गाय जैं चरते- गोठ्यांत बांधून ठेवलेली गाय बाहेर चरण्यास गेली म्हणजे मोठ्या उत्साहाने व आनंदाने ओले गवत वगैरे खात गोचर भूमींत हिंडते त्याप्रमाणे 'गो गोचर जोंवर मन जातें। समजा सकल बंधु! माया ते' (३।१५।३) मायाकार्यरुपी या गोचरभूमींत, शब्द स्पर्शरूपरसगंध कुरणांत, सात्विक श्रद्धारूपी गाईने व्रतजपतपादि धर्माचरण प्रेमाने व नित्य नव्या उत्साहाने करीत राहिले पाहिजे. (क) गाय- वासरुं घरी ठेऊन चरण्यास गेलेली असते म्हणून गाय म्हटले. वासरासह गेली असती तर धेनु म्हटले असते. अशी गाय चरत असली कुरणांत तरि तिचे लक्ष सारखें घरीं ठेवलेल्या वत्साकडे लागलेले असते, तसें सात्विक श्रद्धेने उत्साहयुक्त सप्रेम धर्माचरण 'स्वकर्मि निरती श्रुति रीतीं' (३।१६।६) करीत असतां सात्विक भावरूपी वासराकडे सतत लक्ष लागलेले पाहिजे. (ख) भाव वत्स भेटत पान्हवते- त्या

वासराला पाहिल्या बरोबर, ते जवळ आल्याबरोबर, त्या चरून आलेल्या धेनुला पान्हा फुटतो. तशीच सात्विक श्रद्धा धर्माचरण करुन तृप्त होऊन सत्वभावरूपी वासराच्या पुष्टीसाठी अंतर्मुख होते, त्यावेळी त्या सात्विक श्रद्धेला पान्हा फुटतो, म्हणजेच ती दूध देण्यास उत्सुक होते. सत्व भाव = भाव, हे वत्स आहे.

सूचना- दूध काढतानां धेनु स्थिर राहिली पाहिजे, दूध काढण्यास पात्र (चरवी) पाहिजे, कुशल दुध काढणारा पाहिजे, तेव्हा मग दूध निघेल, म्हणून दूध कोणते काढले हे सांगण्यापूर्वी या तीन गोष्टींचे आधी वर्णन करतात.

हिं. ।नोइ निबृत्ति पात्र बिस्वासा ।निर्मल मन अहीर निज दासा ।।१२।।

म. ।रज्जु निवृत्ति पात्र विश्वास ।निर्मळ मन गौळी निज दास ।।१२।।

अर्थ- निवृत्ति ही भालदोरी (गाईचे मागले पाय बांधण्याची दोरी), विश्वास हे दूध काढण्याचे पात्र-चरवी, आणि आपला दास झालेले निर्मल मन हा गौळी (दूध काढणारा) असला पाहिजे. ।।१२।।

टीका. (१) रज्जु निवृत्ति- दूध काढताना गाईने हालचाल न करतां स्थिर रहावे, लाथ मारु नये म्हणून तिचे मागले पाय ज्या दोरीने बांधतात तिला भाला, शेला किंवा भालदोरी म्हणतात. निवृत्ति हीच सात्विक श्रद्धा धेनुची भालदोरी आहे, असली पाहिजे. सात्विक श्रद्धेला स्थैर्य येण्यासाठी तिला निवृत्तीची जोड दिली पाहिजे. प्रवृत्ति हे रजोगुणाचे कार्य आहे. प्रवृत्ति बंधाचे कारण व भयदायक आहे आणि निवृत्ति मोक्षदायक व अभयदायक आहे. 'प्रवृत्तिंच निवृत्तिंच कार्याकार्ये भयाभये बंध मोक्षंच या वेत्ति बुद्धिःसा पार्थ सात्विकी' = 'बघे प्रवृत्ति बंध भयादिक जडकार्यां मधिं जी बुद्धी।। बघे निवृत्ति मोक्ष अभयही आत्मत्वीं जी सात्विक ती' (सं.स.गी.१८।३०) जर सात्विक श्रद्धेला निवृत्तीचे बंधन घातले नाही तर ती जड कार्यात प्रवृत्त होण्याचे भय असते गाईचे पाय न बांधल्यास ती लाथ मारील ही भीती असते. (क) गाय चांगली पान्हवण्यासाठी प्रथम तिचे वासरुं दूध पिण्यास सोडलेले असते. त्याची साधारण तृप्ति होताच त्याला आखडून गाईच्या स्तनापासून दूर न्यावे लागते. न आखडल्यास सगळें दूध तेच पिऊन टाकील व मालकाला मुळीच मिळणार

...ही. सत्वभाव हे वासरु आहे. सात्विक श्रद्धेपासून प्राप्त होणारे परमधर्ममय ... जर भाव वत्सलाच पिऊ दिले, म्हणजेच सत्वगुणविशिष्ट बुद्धीपासून मिळणाऱ्या सात्विक सुखावरच जीव आसक्त झाला तर बंधाला कारण होते, सत्वभाव सुद्धा बंधाला कारण होतो. 'सुख संगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ (भ.गी)' म्हणून त्या सुखास्वादापासून सत्व भावाला परावृत्त केला पाहिजे. याप्रमाणे निवृत्तीरूपी भालदोरीची आवश्यकता व उपयोग सांगितला.

(२) पात्र विश्वास- दूध काढण्यासाठी पात्र = स्वच्छ चरवी वगैरे भांडे लागतें. तसेंच येथें विश्वास हे पात्र आहे. विश्वासाशिवाय कोणत्याही कार्यांत सिद्धि सफलता प्राप्त होत नाही. 'कवणहि सिद्धि किं विश्वासाविण' (९०।८ टी.प.) 'विश्वासः फलदायकः' (सुभा.) 'सद्गुरु वैद्य वचनिं विश्वास हि' (१२२।६) दृढ विश्वासरूपी पात्र असेल तरच त्या सात्विक श्रद्धारूपी धेनुने भक्षिलेल्या चाऱ्याचा साररुप जो पावन द्रव तो काढून त्याचा ज्ञान घृत मिळविण्यास उपयोग करता येईल. (क) निर्मळ मन गौळी- 'मनो वै द्विविधं प्रोक्तं शुद्धं चाशुद्ध मेवच। अशुद्धं कामसंकल्पं शुद्धं कामविवर्जितय्' (श्रुति) काम संकल्प करणारे मन अशुद्ध होय, कामसंकल्परहित मन शुद्ध निर्मल होय. मन कामसंकल्प युक्त असेल तर सात्विक श्रद्धेला ते धक्का देईल व मग दूध मिळणार नाही. परमधर्माची प्राप्ति होणार नाही. जीवाचे मन कामसंकल्परहित म्हणजे एकाग्र झालेले पाहिजे. मन नुसते निर्मल असून भागणार नाही. (ख) निजदास झालेले म्हणजे स्वतःच्या ताब्यांत राहणारे मन पाहिजे, नाहीतर ते सात्विक सुखासक्त होईल तर अनुष्ठित धर्माचा जो सात्विक परिणाम तो जीव मालकाला व बुद्धिमालकिणीला मिळणार नाही. दूध काढणारा गौळी जरि कामसंकल्परहित असला तरि तो मालकाच्या ताब्यात नसेल, मालकाचे हित पाहणारा नसेल तर दूध पात्रांत न काढतां आपल्या मुखपात्रांतच पिळील बरेचसे, नाहीतर वासरालाच जास्त पाजील. 'करी स्वामिहित सेवक तो ही.' येथे शम = मनोनिग्रह सांगितला.

हिं. ।परम धर्ममय पय दुहि भाई।अवटै अनल अकाम बनाई।।१३।।

म. ।परम धर्ममय पया काढुनी।तापवि अनल अकाम बनवुनी।।१३।।

अर्थ- परमधर्ममय दूध काढून, अकाम अग्नि सिद्ध करून त्यावर ते तापवितो.।।१३।।

टीका. (१) परमधर्ममय पय- पय = दूध, रस. व्रतजपतपादिकांचा सात्विक श्रद्धेचा ठिकाणी तयार झालेला जो सात्विक रसरुप परिणाम तेच दूध. यालाच परमधर्ममय म्हटले. 'परमधर्म वेदोक्त अहिंसा' म्हणून परमधर्ममय = अहिंसामय पय म्हटले. पय = रस, जल असा अर्थही आहे. सर्व धर्मांचे सार म्हणजे अहिंसा. 'अहिंसा परमो धर्मः' (क) परमधर्म पय न म्हणतां परमधर्ममय म्हणण्यात हेतु आहे की या दुधांत पुष्कळसा भाग परमधर्म आहे. मयट् (मय) प्रत्यय प्रचुरता, किंवा तन्मयता दर्शक असतो. येथे प्रचुरता दर्शक आहे कारण या दुधांत कामनेचा व ममतेचा थोडासा अंश असतो हे पुढील वर्णनावरुन ठरते. (ख) तापवि- दूध काढल्यावर त्यातील अनावश्यक जलाचा भाग व स्वाभाविक दोष काढून टाकण्यासाठी ते तापवावे लागते, त्याला मंदाग्नि लागतो. हे परमधर्ममय दूध तापविण्यास अकाम अनल- काम = कामना, अकामना रूपी अग्नी तयार करुन त्यावर हे दुध तापविले पाहिजे. या परमधर्ममय दुधांत जो काही कीर्ति, परलोकसुखभोग इ. कामनांचा अंश असेल तर तो साफ काढून टाकून पूर्ण निष्काम झाले पाहिजे.

सूचना- आता या दुधापासून तूप प्राप्त होण्यास दुधाचे दही केले पाहिजे व दह्याचे ताक करुन लोणी काढले पाहिजे.

हिं. ।तोष मरुत तब छमा जुडावै।धृति सम जावनु देइ ज़मा वै।।१४।।

म. ।क्षमा तोष मरुतें तें निववी।करि दधि धृति सम विर्जण लावी।।१४।।

अर्थ- (अकामाग्नीने तापलेल्या दुधाला) क्षमा व संतोषरुपी वाऱ्याने निववितो आणि धृतिरुपी विर्जण सारखे लाऊन त्याचे दही करतो.।।१४।।

टीका. (१) दूध फार तापलेले असतां विर्जण लावले तर दही चांगले विर्जत नाही. छितड्या पाणी होते. व फार गार दुधाला विर्जण लावले तर त्याला लाळ सुटते, म्हणून ते निववून कोमट करावे लागते. वारा घातल्याने निवते. परमधर्ममय दुधांत अकामाग्नीने फार उष्णता येते. कामना भंग झाला,

आपणी इच्छेच्या विरुद्ध वागले, की संताप येतो. तो संताप कमी करण्यास यदृच्छालाभ संतोष पाहिजे. प्राप्त परिस्थितीत समाधान टिकविले पाहिजे. ते टिकण्यास क्षमा पाहिजे. इच्छेच्या विरुद्ध वागून संताप उत्पन्न होण्यास कारण बनणाराला क्षमा मनाने केली तरच संतोष टिकेल. संतोष नसेल तर प्राप्त परिस्थितीत समाधान टिकणार नाही म्हणून संतोष व क्षमारुपी वारा घातला पाहिजे. पंख्याने वारा घालतांना तो दोन बाजूंनी घातला जातो म्हणून संतोष व क्षमा या वाऱ्याच्या दोन बाजू आहे. दुसऱ्यांनी केलेला विरोध, क्रोध जर संताप उत्पन्न करील तर अहिंसारुपी दुध नासेल, मनाने वाणीने किंवा कृतीनेही हिंसा करण्याची बुद्धि होईल. अहिंसा कार्यक्षम होण्यास संतोष व क्षमा पाहिजेत हे आहे सार.

(२) करि दधि धृति सम विर्जण लावी- धृति = धैर्य, ही सात्विक धृति पाहिजे. 'धृत्या यथा धारयते मनः प्राणेंद्रियक्रियाः। योगेनाऽव्यभिचारिण्या धृतिःसा पार्थ सात्विकी' (११५ रा 'मतिधीर'टी.पाहावी). दुधाला दह्याचेच विर्जण लावले तर पाणी सुटत नाही. विर्जण एकाच पदार्थाचे लावतात म्हणून सम = शम असा अर्थ घेणे चुकीचे ठरेल. दह्याची कवडी नुसती दुधांत टाकली तर दहीसारखे विर्जत नाही. म्हणून जे दहीं विर्जण लावावयाचे ते सम = सारखे मिसळून लावले पाहिजे. आणि दुधाच्या प्रमाणात विर्जणाचे प्रमाण सम = योग्य तेवढेच पाहिजे. याप्रमाणे अहिंसा, निष्कामता, तोष, क्षमा व धृति यांचा सात्विक संयोग योग्य प्रकारे झाला पाहिजे. आता या दह्यांतून लोणी काढले पाहिजे. दह्याचे मंथन = घुसळण केल्याने ते निघते. मंथन करण्यास लागणाऱ्या साधनांचे व लोण्याचे वर्णन आता दोन चौपायांत करतात.

हिं. *।मुदिताँ मथै बिचार मथानी।दम अधार रजु सत्य सुबानी।।१५।।*
।तब मथि काढि लेइ नवनीता।बिमल बिराग सुभग सुपुनीता।।१६।।

म. *।रवी विचार, मुदिता माथणी।दम धारण, गुण सत्य सुवाणीं।।१५।।*
।मंथुनि काढुनि घे नवनीत।विमल विराग सुभग सुपुनीत।।१६।।

अर्थ- विचार (वस्तु विचार) रूपी रवीनें मुदितारूपी माथणींत दमरूपी आधारस्तंभाच्या साह्याने सत्य व सुवाणीरूपी घुसळदोरीने तो चक्का

मंथन करुन घुसळून निर्मल, सुंदर व अति पवित्र विराग रुपी लोणी काढून घेतो.।।१५-१६।।

टीका. (१) रवी- ताक करतानां दहीं घुसळण्याचे यंत्र. धर्मसार रुपी दुधाचे जे काही झाले आहे त्यातील कामरुपी दोष आधींच दूर केलेला असला व सात्विक धृतीशी त्याची मैत्री केली असली तरि त्यांत काम संस्कार शिल्लक आहेतच. तेच दुःखमूळ असतात, म्हणून ते दही मुदिता रुपी माथणींत घालून खूप घुसळून घुसळून त्याचा कणकण सुटा केला पाहिजे. मुदिता = प्रसन्नता, दुसऱ्यांच्या सुखाने आनंदाने आनंदित होण्याची वृत्ती. सात्विक भावापासून मिळणाऱ्या सुखाच्या आसक्तीचा त्याग केल्यावर दुसऱ्यांचे सुख पाहून किंवा कोणत्याही परिस्थितीत जर वृत्ती प्रसन्न न ठेवता आली तर मत्सर ईर्षा असूया इत्यादि दोष व दुःख उत्पन्न होण्याचा संभव असतो, म्हणून त्या दह्याला मुदिता वृत्तींत घातले पाहिजे. (क) रवी विचार- हा विचार म्हणजे नित्यानित्य वस्तुविचार होय. यालाच साधन चतुष्ट्यांत विवेक म्हणतात. या आत्मानात्मवस्तुविचाररुपी रवीने धर्मसाराचा झालेला तो चक्का पक्का घुसळला पाहिजे. म्हणजेच सदा प्रसन्न वृत्तीने आत्मवस्तूचा व अनात्मवस्तूंचा विचार करीत राहिले पाहिजे, म्हणजे अनात्मवस्तूंवरील प्रेम, आसक्ति नष्ट होईल. त्यांचा त्याग करण्याची वृत्ति बळावेल. पण घुसळण करण्यासाठी घुसळखांब आधाराला पाहिजे व रवीला गरागरां उलट सुलट घुमविण्यासाठी दोऱ्या पाहिजेत.

(२) दम धारण- दम = इंद्रिय निग्रह, धारण = घुसळखांब. इंद्रिये ताब्यांत नसतील तर संतत धारेसारखा अखंड विचार करतांच येणार नाही. विचार करणाऱ्या मनाला इंद्रियें अनात्मवस्तूंकडे ओढून नेतील. घुसळखांबाच्या आधाराशिवाय पुष्कळ दह्याचे ताक करता येत नाही, त्याप्रमाणेच इंद्रिय दमन नसेल तर वस्तुविचार करतांच येणार नाही. व केला तरि तो निष्फळ ठरेल, पोपट पंडितासारखाच तो ठरेल. चांगले लोणी हाती न येता ओषट ताकावरच समाधान मानावे लागेल. येथे दम सांगितला. परंतु माथणी, रवी व घुसळखांब एवढ्यानेच भागत नाही.

(३) गुण सत्य सुवाणी- गुण = दोरी, दोऱ्या. ताक करतांना एकंदर तीन

..गा लागतात. एक रवीच्या माथ्यावर वर, डेऱ्याच्या तोंडापासून थोडी वर व दुसरी रवीच्या दांड्याच्या वरच्या टोकाच्या थोडी खाली. या दोन्ही दोऱ्या ..ड्या सारख्या मोकळ्या असतात व त्यांत रवीच्या दांडा अडकवावा लागतो. तिसरी दोरी रवीच्या मध्यभागाजवळ पुष्कळ वेढे देऊन दांड्याला गुंडाळलेली व दोन्ही टोके हातांत धरतां येतील अशी असते. या घुसळ दोरीचे एकेक टोक प्रत्येक हातांत धरुन क्रमशः पुढे मागे ओढले हातानी, म्हणजे रवी गरागरां फिरुं लागते, व रवीच्या माथ्याने दही घुसळले जात असता डेऱ्यांत घम् घुम् असा आवाज होतो. प्रगट आवाज करणारी वाणी म्हणजे वैखरी ही घुसळदोरी होय, मध्यमा व पश्यन्ती या दोन वाणी म्हणजे दोन मांदेरी, घुसळ खांबाला व रवीला अडकविलेल्या दोऱ्या होत. सत्य हे या दोऱ्यांचे एक टोक व शुद्धता = पावित्र्य हे दुसरे टोक होय. सुवाणी = शुद्ध, पवित्र वाणी. शास्त्रशुद्ध, गुरुवचनशुद्ध अशी पवित्र वाणी. भाव हा की जो वस्तुविचार केला जाईल तो शास्त्रशुद्ध व गुरुवचनाशी सुसंगत असा असला पाहिजे. 'दुस्तर्कात सुविरम्यताम्, श्रुतिमतस्तर्कोनुसंधीवताम्' (साधनपंचक) मांदेऱ्यांची दोन्ही टोके एकत्र घेऊन गांठ मारलेली असते. विचार शब्दांचा म्हणजे वाणीच्या साह्याशिवाय करताच येत नाही. आत्मानात्म वस्तु विचारांची दिशा दाखविणाऱ्या विनय पत्रिकेतील एका (१३६) पदाचा अनुवाद परिशिष्टांत पुढे दिला आहे. याप्रमाणे मंथनाची सर्व सामुग्री जमवून आत्मानात्मवस्तुविचाररुपी मंथन चांगले केले की-

(४) त्या डेऱ्यातील दह्याचे ताक होऊन त्याच्या पृष्ठभागावर नवनीत = लोणी तरंगू लागेल. रवी ताकात खाली वर उचलली असतां लोणी रवीला न चिकटता बाजूस सरु लागले की ते काढून घेण्यास योग्य झाले असे समजावे. कमी घुसळले गेल्यास चांगले शुद्ध लोणी निघणार नाही, व जास्त घुसळले गेल्यास लोणी पातळ होईल व हातानी चटकन काढून घेता येणार नाही हे लोणी म्हणजे- (क) विमल विराग = विमल वैराग्य होय. हे पर वैराग्य (परम विराग) नव्हे. हे अपर वैराग्य होय. यालाच वशीकार संज्ञा वैराग्य म्हणतात. याप्रमाणे आत्मानात्मवस्तु विचाराने (नित्याऽनित्यवस्तुविवेकाने) निर्मल वैराग्याची प्राप्ती होते, (ख) ल.ठे. येथपर्यंत विवेक, वैराग्य, शम, दम, तितिक्षा, उपरम, व मुमुक्षा इतक्यांचा संयोग झाला, म्हणजेच

साधनचतुष्टयसंपन्नता पूर्ण होत आली, फक्त समाधान राहिले. विमल विराग = कोणत्याही विषयांची मनात आशा उत्पन्न न होणे. सुभग = सुंदर, बाह्यत्याग हे अंतर्वैराग्याचे सौंदर्य आहे. सुपुनीत = अति पुनीत. अति पवित्र असे जे ज्ञान त्याची प्राप्ति करून देण्यास योग्य असे. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्र मिह विद्यते' (भ.गी.) (ग) वि.ल.ठे. व्रत जप तपादि धर्माचरणाचा साररूप परिणाम म्हणजे परमधर्ममय पय, व त्या साराचे ही सार म्हणजे विमल सुंदर अति पवित्र असे वैराग्य. 'विरतिस धर्म दे' (३।१६।१) धर्माने वैराग्याची प्राप्ति होते असा सिद्धान्त प्रभूंनी अरण्यकाण्डांत सांगितला. त्याचाच विस्तार येथे केला व धर्मापासून वैराग्याची प्राप्ति कोणाला कशी व कोणत्या साधनक्रमाने होते हे दाखविले. आता 'योग दे ज्ञाना' (३।१६।१) हा तेथील सिद्धान्तच येथे विस्तार करुन सांगतात. वैराग्य व ज्ञान या विषयीं (३।१५।७-८ व ३।१६।१) श्रीरामगीता टीकेत विस्तार केला आहे.

हिं.दो. ।जोग अगिनि करि प्रगट तब कर्म सुभासुभ लाइ।।
।।बुद्धि सिरावै ग्यान घृत ममता मल जरि जाइ।।११७रा.।।

म.दो. ।प्रगटुनि योगाग्नी, द्विविध कर्म शुभा लाऊन।।
।।बुद्धि निवविते ज्ञान घृत ममता मल हि जळून।।११७रा.।।

अर्थ- (लोणी काढून घेतल्यावर) मग योगरूपी अग्नि प्रगट करुन द्विविध (शुभ, अशुभ) कर्मे रुपी शुभारूपी इंधन लाऊन (त्यावर वैराग्य लोणी उकळले) ममतारुपी मळ जळून गेल्यावर बुद्धी त्या लोण्याचे तयार झालेले ज्ञानरूपी तूप (धृत) निववित्ते (तेव्हा ते घट्ट होते).।।दो.११७रा.।।

टीका. प्रगटुनि योगाग्नी- ज्याला विमल विराग सुभग सुपुनीत प्राप्त झाला असेल तोच खरा योगाचा अधिकारी होतो. 'अपान प्राणयोर्योगः, सूर्याचंद्रमसोरपि। रजसोरेतसो योगः योगश्च शिव जीवयोः' 'योगः चित्त वृत्तिनिरोधः' (पा.यो.) अशा योगाच्या अनेक व्याख्या आहेत. योगाग्नि = योग करुन देणारा अग्नि, योगाने उत्पन्न होणारा अग्नि, योग हाच अग्नि, असे योगाग्नी शब्दाचे अनेक अर्थ आहेत. येथे अनल वन्हि हे शब्द न वापरता अग्नि म्हणणे सहेतुक आहे. अगि गतौ (अ.व्या.सु) गतिमान असणारा वन्हि =

अग्नि. म्हणून योगाग्नि = कुण्डलिनी शक्ति, ती जागृत व क्रियाशील करणे म्हणजे योगाग्नि प्रगट करणे आहे. ही शक्ती 'कोटिसौदामनी भासां स्वयंभूलिंगवेष्टिनीम्'(श्रुति) कोटि विद्युल्लतांसारखी देदीप्यमान आहे. ही शक्ती प्राण व अपान यांच्या संघर्षाने जागृत व क्रियाशील होते. म्हणजेच प्राण व अपान यांच्या संघर्षाने योगाग्नि प्रगट होतो. येथे योगाग्नि शब्दाने कुण्डलिनी शक्ति ग्रहण करण्याचे कारण इतकेच की ही प्रगट झालेली शक्ति सुषुम्नेंतून सहस्त्रारांत गमन करते. ही शक्ति गुरुदीक्षेने, गुरुकृपेने सुद्धा सहज प्रगट होते. ही कुंडलीनी शक्ती सुषुम्नेंत प्रविष्ट होताच केवल कुंभक होतो व प्राण जय होण्यास प्रारंभ होतो. प्राण आणि चित्त (मन) यांचा अति निकट संबंध असल्याने चित्त जय साधतो, म्हणजेच चित्ताला सत्स्वरूपी एकाग्र करणे साधते. यात हठयोग व राजयोग यांचा संयोग करावा लागतो. 'जय पवन मन, गो निरस करुनी ध्यान कधिं मुनि पावती' (४।१०छं) जें ध्यान विरति ज्ञान योगानेकिं कधिं मुनि पावती. (३।३२ छं.३) येथे समाधान म्हणजे चित्ताची समाहित स्थिती ही राहिलेली साहवी संपत्ती सांगितली.

(२) द्विविध कर्म शुभा लाऊन- प्रगट झालेल्या योगाग्नीला टिकविण्यास इंधनशुभेंधन = शुभा = शेण्या, गोवऱ्या पाहिजेत. द्विविध = दोन प्रकारचे कर्म = शुभ. पुण्यकर्म व अशुभ कर्म. भाव हा की कुंडलिनीरूपी योगाग्नीने सर्व शुभाशुभ कर्माचा नाश होतो. याप्रमाणे धर्माचरण करून योगाने समाधान प्राप्त करण्यापर्यंतचे सर्व साधन दीर्घकाळ आनंदाने व उत्साहाने करुन जो, उत्तम साधनचतुष्ट्यसंपन्न झाला असेल तोच ज्ञानाचा अधिकारी झाला. त्यालाच सद्गुरु मुखाने महावाक्योपदेश श्रवणाचा अधिकार आहे.

<u>(३) ममता मलहि जळून</u>- त्या वैराग्यात अशी भावना असते कीं इंद्रिये आणि मन माझ्या ताब्यांत आहेत, मी विषयांचा गुलाम नाही, मी वैराग्य संपन्न आहे. हा अहंकार व त्याने त्यागादिकांविषयी उत्पन्न झालेली ममता हा मळ असतो. तो योगाग्नीने जळून जातो. लोणी अग्नीवर उकळले म्हणजे त्यात असलेला मळ जळून तांबूस होऊन भांड्याच्या तळाशी चिकटून बसलेला दिसतो, त्याला बेरी म्हणतात. मळ जळून गेल्यावर शुद्ध तूप राहते. तूप कच्चे राहिले तर नासते व जास्त उकळले गेले तर बेचव होते, सुगंध स्वाद नष्ट

होतात, म्हणून लोणी योग्य तेवढेच उकळावे लागते. वैराग्य लोण्याचे केले जाणारे तूप कच्चे राहिले तर ममता मळ थोडा तरि शिल्लक राहील व जास्त उकळले तर हठ योगाची असंप्रज्ञात समाधि प्राप्त होईल. ज्ञानमार्गात त्या प्रेतवत स्थितीचा, जड समाधीचा काही उपयोग नाही, कारण त्या समाधीने ज्ञान प्राप्त होत नाही. राजयोगात वृत्तींच्या पूर्ण विरोधाला निर्विकल्प समाधि म्हणत नाहीत, ब्रह्माकार वृत्ति सतत गंगेच्या प्रवाहाप्रमाणे अखंड टिकविणे व विकल्प मुळीच न उठणे यालाच निर्विकल्प समाधि म्हणतात. (वि.चू.) हठ योगांत जिला निर्विकल्प (असंप्रज्ञात) समाधि म्हणतात त्या समाधित निश्चल झालेल्यांच्या अंतःकरणांत कधीं अंत न पावणाऱ्या वासना शिल्लक असतात. (वि.चू.)

<u>(४) ज्ञानघृत</u>- बुद्धीने नीट दक्षता बाळगली तर त्या वैराग्य लोण्याचेच एकाग्र वृत्तीने ज्ञानरूपी घृत होते. <u>हे ज्ञान म्हणजे तत्पदाचें परोक्ष ज्ञान होय.</u> ममता मल नष्ट झाल्याने तत् पदाचें शोधन होते. कारण की अवस्था व त्रिगुण यांचा त्याग अद्याप झालेला नाही. त्वंपदाचें शोधन व ज्ञान अद्याप व्हावयाचे आहे. हठयोगाच्या असंप्रज्ञात समाधीचे व्युत्थान झाल्यावर अज्ञान व तत्कार्य शिल्लक असतातच, म्हणून सर्व स्वानुभवी संतानी तिची हेटाळणी केली आहे. 'ताटस्थ्यास म्हणती समाधि। त्यांची ठकलीसे बुद्धि' (एकनाथ) (क) ल.ठे. <u>'जोग दे ज्ञाना'</u> हा श्रीरघुनाथ कथित (३।१६।१) सिद्धान्त येथे स्पष्ट केला जात आहे. या दोह्यांत योगाचा नुसता प्रारंभ झाला आहे तेथे वर्णिलेले 'ज्ञान' हे नव्हे,त्याचे वर्णन पुढे आहे. येथे परोक्षज्ञान निःसंशय दृढ होण्यापर्यंतचे कार्य झाले. 'तुही कृपाळु सब संशय हरले। रामस्वरूप मज आकळलें' (१।१२०।२) हे या ज्ञानप्राप्तीचें उदाहरण आहे. आता ज्ञानदीपाच्या साहित्याचे वर्णन करतात.

हिं.दो. ।तब बिग्यान रूपिनी बुद्धि बिसद धृत पाइ।।
।।चित्त दिआ भरि धरै दृढ समता दिअट बनाइ।।११७म.।।

म.दो. ।तैं विज्ञान रूपिणी मति धृत विशद मिळून।।
।।चित्त पणति भरि ठेवि दृढ समता ठाण करुन।।११७म.।।

अर्थ- तेव्हा मग विज्ञानरुपिणी बुद्धि (मति) ज्ञानरुपी निर्मल धृत मिळतांच, चित्तरुपी पणती त्याने भरुन समता ठाणवई करुन ती पणती अचल राहील अशी त्या ठाणवईवर ठेवते.।।११७म.।।

टीका. (१) विज्ञानरूपिणी मति- विज्ञान हेच आहे रूप जिचे अशी बुद्धि (मति). विज्ञान = विशुद्धज्ञान. गुरुपदिष्ट 'ते तू त्यांत तुझ्यात न भेद हि। बारि वीचि इव गाती वेदहि' (१११।६ टी.प.) या अर्थाच्या महावाक्याच्या मननाने उत्पन्न झालेले जे ब्रह्मात्मैक्य निश्चयरूपी परोक्ष ज्ञान त्याला येथे विज्ञान म्हटले आहे. ब्रह्मात्मैक्य निश्चय दृढ परोक्ष झालेली जी बुद्धी ती विज्ञानरूपिणी बुद्धि निश्चय करणे हे बुद्धीचे कार्य आहे. (क) विशद धृत- तत्पद जे ब्रह्म तेच सर्वत्र आहे दुसरे काही नाहीच असे जे दृढ परोक्ष ज्ञान तेंच निर्मल तूप, विज्ञानरुपिणी बुद्धीला मिळाले आहे. आता सतत अनुसंधान = निदिध्यासन हे चित्ताचे कार्य सुरु होईल. (ख) 'चित्त पणति भरि' पणती = ज्या पात्रांत तूप (किंवा तेल) घालून वात घालून ती पेटवतात ते पात्र. दिवाळीत पणत्या लावतात त्यांची आठवण करावी. चित्तरूपी पणतींत 'ब्रह्मसमान सकल जगिं' ही भावनारूपी तूप ती भरते. (ग) समता ठाण- ठाण = ठाणवई, दिवा लावणे, दगडाचे किंवा लाकडाचे उंच पात्र. ज्यांत शंकराच्या देवळांत गाभाऱ्यांत अद्यापही तेलाची पणती ठेवण्याचा प्रघात आहे तसले स्थिर राहणारे, जड पात्र. समतारूपी ठाणवईवर ती तूप भरलेली चित्तरूपी पणती ठेवते. भाव हा की चित्तांत विषमता उत्पन्न होऊ न देता 'सर्व खलु इदं ब्रह्म न इह नाना अस्ति किंचन' या भावनेने चित्त परिपूर्ण ठेवले जाते. चित्त याचेच निदिध्यासन व्यवहारांत सुद्धां सतत करीत राहते.

(२) 'विज्ञानाविण समता ये ना' (९०।३) म्हणून आधींच विज्ञानरूपिणी बुद्धीचा उल्लेख केला. 'सर्व खलु इदं ब्रह्म' या वृत्तीचें सातत्य म्हणजे बाह्य समाधि. आणि 'ब्रह्म अहम् अस्मि' या वृत्तीचे सातत्य म्हणजे अन्तःसमाधि होय. याप्रमाणे शोधित तत्पदाचें परोक्षज्ञान व शोधित त्वं पदाचें परोक्षज्ञान यांना जवळजवळ एकत्र आणली गेली. ज्ञान दीपाला लागणारी बरीच सिद्धता झाली. आता त्या तुपांत वात घालून ती पेटविली पाहिजे. तेवढे केले म्हणजे ज्ञानदीप प्रज्वलीत होऊन हृदयांत प्रकाश पडेल, तत्पद व त्वंपद यांचे असि

पदीं ऐक्य साक्षात अपरोक्ष होईल व मग तेथे ज्ञान विज्ञान इ. काही न राहता आत्मानुभूति सुखरूपी नुसता प्रकाशच उरेल.

हिं.दो. *।तीनि अवस्था तीनि गुन तेहि कपास तें काढि।।*
।।तूल तुरीय सँवारि पुनि बाती करै सुगाढि।।११७चं.।।

म.दो. *।तीन अवस्था त्रिगुण त्या काढि कपासींतून।।*
।।तूल तुरीया पिंजुनी जाडी वात वळून।।११७चं.।।

अर्थ- त्या (साधकाच्या देहरूपी) कपासींतून तीन अवस्था व त्रिगुण यांना बाहेर काढते, आणि तुरीयावस्थारुपी कापूस पिंजून चांगली जाडी घट्ट वात (ती विज्ञानरूपिणी बुद्धी) वळते (आणि मग)।।दो.११७चं.।।

टीका. (१) त्या कपासीतून- 'साधुचरित शुभ चरित कपासी। निरस विशद गुणमय फल ज्यासी' (१।२।५) साधुचरित्र = कपासीचें चरित्र. म्हणजेच साधुच्या देहाचे चरित्र. म्हणून कपास = कापसाचे बोंड = साधुचा = साधकाचा देह. कारण कीं उत्तम साधकच साधु होतो. कापसाचे बोंड निरस विशद गुणमय असतें. (या १।२।५ चौपाईची टीका व नंतर दिलेली तुलना पहावी, म्हणजे खात्री होईल की येथे वर्णिलेल्या ज्ञानसाधकासारखेच कष्ट त्यांच्या देहादिकांना पडतात.) 'जय पवन मन, गो निरस करुनी ध्यान, कधिं मुनि पावती' इत्यादि वर्णन या साधकाच्या साधन क्रमांत आलेच आहे. येथे तीन अवस्थांचा व तुरीयावस्थेचा उल्लेख आहे व त्यांचा संबंध देहाशीच असतो. या साधकाचे सूक्ष्म शरीर विषयरसरुक्ष = नीरस, विशद = पवित्र व स्थूल देह उज्वल झालाच आहे. तपाने 'तेज तपाविण कधिं कीं पडते' कापसाच्या बोंडातून कापूस काढून वात तयार करावयाची आहे.

(२) तीन अवस्था- जाग्रत, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्था स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन देहांच्या क्रमशः आहेत. तीन देह ही जणू बोंडाची तीन टरफले आहेत, आतील तीन कापसाच्या गड्या जणूं तीन अवस्था आहेत व त्या प्रत्येक गड्डीत असलेल्या कापसाच्या बिया जणूं त्रिगुण आहेत. तीन देह रूपी तीन टरफले निरनिराळी काढली पाहिजेत. म्हणजेच स्थूल देहापासून सूक्ष्मदेह

...गळा झाला पाहिजे. अज्ञानी जीवांचे हे दोन देह नारळातील खोबऱ्यासारखे (करवंटीला) चिकटलेले असतात व त्या खोबऱ्याच्या आतले पाणी त्याला लागलेले असते, पण तोच नारळ गोटा झाला म्हणजे खोबरे करवंटी पासून सुटे होते व आतील पाणी आटून गेल्यामुळे त्याचाही स्पर्श खोबऱ्याला नसतो. तसेच स्थूल सूक्ष्म व कारण हे तीन देह आधीं अगदी सुटे झाले पाहिजेत सुटे झाल्याचा अनुभव आला पाहिजे. (क) चार अवस्थांची लक्षणे 'जणु जीव उरिं चारी अवस्था सह विभु विभ्राजती' (१।३२५ छं.४) च्या टीकेत व नंतर कोष्टकी तुलनेत दिलेली पहावी. तीन देहरूपी टरफले निराळी केली की मग तीन अवस्था रूपी आतल्या गच्या काढून घेतां येतात. 'त्वं अवस्थात्रयातीतः' (ग.अ.उ.) असे जे तत्व आहे त्याच्याशी ऐक्य पावण्यास बुद्धीने अवस्थात्रयातीत झाले पाहिजे. अवस्थात्रयातीत होणे म्हणजेच अवस्था बाहेर काढणे.

(३) त्रिगुण काढून- कापसाच्या गड्डीत बिया असतात त्या काढल्याशिवाय कापूस पिंजून वात करता येत नाही, म्हणून बिया काढाव्या लागतात. तसेच तीन अवस्थांत असलेले सत्व रज आणि तम हे निराळे काढले पाहिजेत म्हणजेच गुणातीत झाले पाहिजे. 'त्वं गुणत्रयातीतः' (ग.अ.उ.) असे जे तत्त्व आहे त्याच्याशी तादात्म्य पावण्यास स्वतः गुणातीत झाले पाहिजे. गुणातीताची लक्षणे भ.गी.च्या १४व्या अध्यायांत दिली आहेत. 'म्हणति तात तो परम बिरागी। तृण सम सिद्धि त्रिगुणां त्यागी'(३।१५।८) टीका पहावी.

(४) तूल तुरीया पिंजुनी- नंतर केवळ कापूस राहिला. बोंडाच्या टरफलांचा वगैरे मल असतो व धागे घट्ट चिकटलेले असतात ते मोकळे केल्याशिवाय लांब व जाडी वात तयार करता येत नाही, म्हणून कापूस पिंजावा लागतो, हीच शुद्ध तुरीया म्हणजेच अवस्थात्रयातीत स्थिती. (क) जाडी वात वळून- भाव हा की या तुरीयावस्थेचा अभ्यास दीर्घकाळपर्यंत सुदृढ झाला पाहिजे. ही शुद्ध सत्वगुणाची अवस्था आहे. तुरीयावस्थेचे संस्कार बुद्धीवर एकत्र व दृढ झाले पाहिजेत. आता दीपज्योति तयार करणे = दिवा लावणे = वात पेटविणे व त्याची फलश्रुती सांगतात. येथे त्वं पदाचे पूर्ण शोधन झाले. शोधित तत्पदज्ञानरूपी तूप व शोधित त्वंपदज्ञानरूपी वात एकत्र झाली आहेत.

'तत् त्वम् असि' या महावाक्यांतील तत् पद ईश्वरवाचक आहे व लक्ष्य ब्रह्म आहे, त्वंपदवाच्च जीव आहे. ईश्वराची उपाधि व जीवाची उपाधि यांचा त्याग करणे म्हणजेच तत् त्वम् पदांचे शोधन करणे आहे. जे शेष राहिले ते ब्रह्म दोहींतील एकच आहे तेच असि पद होय. वात तुपात घालतांच तिच्यात तूप शिरते तसेच तत् त्वं पदांचे ऐक्य होते.

हिं.सो. ।एहि बिधि लेसै दीप तेजराशि बिग्यानमय।।
।।जातहिं जासु समीप जरहिं मदादिक सलभ सब।।११७द्रा.।।

म.सो. ।असा पेटवा दीप तेजराशी विज्ञानमय।।
।।जातां तया समीप जळति मदादिक शलभ सब।।११७द्रा.।।

अर्थ- असा प्रकारे देदिप्यमान (तेजराशी) विज्ञानमय दीप पेटवावा कीं त्याच्या जवळ जाताच मद वगैरे सर्व पतंग (शलभ) जळून जातील.।।११७द्रा.।।

टीका. असा = वर सांगितलेल्या योगाच्या प्रक्रियेप्रमाणे. (क) पेटवा दीप- दीप पेटविण्याचे कार्य योगाग्नीनेंच करावयाचे असतें. त्वंपद लक्ष्यार्थाला तंत्पद लक्ष्यार्थात लीन करणे म्हणजेच दीप पेटविणे, म्हणजेच सानंद समाधि स्थिती प्राप्त करणे होय. (ख) तेजराशि विज्ञानमय- अति तेजोमय. 'विज्ञानं आनंदं ब्रह्म' (श्रुति) हे एक महावाक्य आहे. विज्ञान म्हणजे ब्रह्मच आनंदरूपाने शिल्लक असते म्हणून विज्ञानमय म्हटले. 'ब्रह्मलीन दुर्लभ विज्ञानी' 'ब्रह्मानंदि सदा लय लीन' असे सनकादिकांचे वर्णन केले आहे ते यामुळेच. (ग) जळति मदादिक शलभ सब- झगझगीत प्रकाशमय दिवा दिसला की पतंगाचे समूह त्याच्यावर झडप घालण्यास येतात, हा त्यांचा स्वभाव आहे. दीपाची ज्योती जर फार मोठी असली तर पतंग त्याच्यावर उड्या घालून जळून मरतात. तसे मद मत्सर दंभ, पाखंड वगैरे पतंग या दीपावर झडप घालण्यास येतात पण ते त्याच्या ज्योतीच्या जवळ येताच जळून जातात. भाव हा की मद, मत्सर, दंभ, कपट, पाखंड हे मायेचे सैन्य नाश पावते. काम क्रोध लोभ या माया सेनापतींचा नाश आधी केल्याशिवाय ज्ञान दीप पेटविताच येत नाही म्हणून कामादिकांचा उल्लेख केला नाही. पण मी योगी मी ज्ञानी इत्यादि मद, गर्व, अहंकार, व मग इतरांचा तिरस्कार इत्यादि उत्पन्न होण्याची फार शक्यता असते. पण हा दीप

तेजोमय असेपर्यंत त्यांचा नाश सहज होतो. या ज्ञानविज्ञान दीपाची एक फलश्रुती सांगितली. आता या दीपाची अत्यंत तेजोमय ज्योत कोणती ते सांगतात.

हिं. *।सोहमस्मि इति वृत्ति अखंडा।दीप सिखा सोइ परम प्रचंडा।।१।।*
।आतम अनुभव सुख सुप्रकासा।तब भव मूल भेद भ्रम नासा।।२।।

म. *।सोहमस्मि ही वृत्ति अखंडा।दीपशीखा ती महा प्रचंडा।।१।।*
।आत्म-अनुभव सुख प्रकाश।भेदभ्रम भवमूल विनाश।।२।।

अर्थ- तो मी आहे ही जी अखंड वृत्ति तीच या दीपाची अति प्रचंड ज्योत (शिखा) होय.।।१।। आत्म अनुभव सुख हाच या ज्योतीचा प्रकाश होय. (हा पडला म्हणजे) संसृतीचे मूळ जो भेदरुपी भ्रम त्याचा नाश होतो.।।२।।

टीका. चौ.१ <u>(१)</u> <u>सोहमस्मि</u>- सः अहम् अस्मि = तो मी आहे. नित्यशुद्धबुद्ध सच्चिदानंदघन असा जो आत्मा तोच मी आहे. सद्गुरुनी उपदेशिलेल्या <u>'तत् त्वम् असि'</u> या महावाक्याचें श्रवण व सोपपत्तिक मनन झाल्यानंतर सोऽहम् या रुपकानेच निदिध्यासन केले जाते. कोणी <u>'ब्रह्म अहम् अस्मि'</u> किंवा '<u>अहं ब्रह्म अस्मि</u>' किंवा अशा दुसऱ्या महावाक्याने निदिध्यासन करतील, पण सोहं ही वृत्ती अधिक स्वाभाविक आहे. <u>'हंसःहंसः' इति मंत्रोऽयं जीवो जपति सर्वदा। हकारेण बहिर्याति सकारेण विशेत् पुनः</u>' <u>'घेता सो सांडिता हं। अखंड चाले सोहं सोहं</u>' असा जो अखंड जप सहज होत असतो त्यालाच अजपा जप म्हणतात. सोऽहं मधील सकार व 'ह' कार निघून गेल्यावर जे अक्षर राहते तेच शेवटी सहज सतत अखंड ऐकू येत राहते. हा पंचमवेद (ए.भा.) हा सहज प्रणवध्वनि पुरुषांनाच ऐकू येतो असे नाही, स्त्रियांना सुद्धा ऐकू येऊ शकतो, ऐकू येतो हे अनुभवाने सिद्ध आहे. मात्र साधन चतुष्ट्य संपन्न होण्यापूर्वी या (सोहं) महावाक्याच्या जपाचा काही सदुपयोग न होतां वाचाळता वाढत जाते. 'क्रियेवीण वाचाळता वेर्थ आहे.'

<u>(२)</u> <u>ही वृत्ति अखंडा</u>- सोहं ही वृत्ती अर्थचिंतनासह सतत खंड न पडता,

चालू राहिली पाहिजे. मध्ये लय, विक्षेप कषाय व रसास्वाद ही विघ्नेंहि उत्पन्न होतां नयेत. मडक्यांत ठेवलेल्या दीपाप्रमाणे ही वृत्ती शांतपणे स्थिर राहून तेवत राहिली पाहिजे. (क) दीपशिखा ती महा प्रचंडा- दीपशिखा = दिव्याची ज्योत. सोहं वृत्ति ही ज्ञानदीपाची तेजोमय ज्योत आहे. हिला 'योगशिखा' सुद्धा म्हणतात. योगशिखोपनिषदांत असलेले सविस्तर वर्णन जिज्ञासूनी पाहावे. ही ज्योत अत्यंत प्रचंड पाहिजे कारण, 'विश्वा राही व्यापुनी माया कटक प्रचंड' त्याचा विनाश करण्यास महा प्रचंड दीपज्योति पाहिजे.

चौ. (२) (१) आत्म अनुभव सुख प्रकाश- आत्म अनुभव = आत्मसाक्षात्कार झाल्याने होणारे सुख हाच या दीपज्योतीचा प्रकाश आहे. याने 'मी जीव मज बंधन' इ. दुःखे नष्ट होतात व सुख होते हेच 'सुखमात्यंतिकं यत्तत् बुद्धिग्राह्यमतींद्रियम्। वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः' हे शुद्ध सात्विक सुख असते. 'अनंत सुख तें चिन्मय मतिने मिळे, मिळेना करणांनीं। योगी पावे जया पावतां चळे न तत्त्वापासोनी' (भ.गी.६।२१) ते सुख पावुनी अधिक न मानी सौख्य लाभ तो विषय सुखे। आत्मानंदी सदा राहतां न चळे तो थोरही दुःखे।। (भ.गी.सं.स.६।२२). (क) भेदभ्रम- ब्रह्म आणि जीव यात भेद मानणे हा भ्रम आहे. भ्रम हा तम अंधार आहे, आणि ब्रह्म (राम) 'भ्रमतम प्रबल प्रताप दिवाकर' आहे. प्रकाशाने अंधाराचा नाश होतो, तसा आत्मानुभव सुखाने आनंदाने भेदरुपी भ्रम तमाचा नाश होतो. 'मी जीव मज बंधन। भ्रांतीस्तव भुलले जन' (दा.बो.) (वि.प.पद१२२पहा). (ख) भवमूलविनाश- ब्रह्म आणि जीव यात भेद मानणे हेंच जीवाच्या भवाचें मूळ आहे. भेद भ्रम आहे. ज्याचे मूळ भ्रम आहे ती वस्तु उत्पन्न झालेलीच नसते खरोखर. भ्रमाने उत्पन्न झाल्यासारखी भासते. भ्रम गेला की सहजच नष्ट होते. भवनाश कसा होतो ते आता सांगतात.

हिं. *प्रबल अविद्या कर परिवारा।मोह आदि तम मिटइ अपारा।।३।।*
।तब सोइ बुद्धि पाइ उजिआरा।उर गृह बैठि ग्रंथि निरुआरा।।४।।

म. *।प्रबल अविद्येच्या परिवारा।नाश तमा मोहादि अपारा।।३।।*
।तैं बुद्धि तो प्रकाश मिळुनी।सोडी ग्रंथि हृदय-गृहीं बसुनी।।४।।

अर्थ- अत्यंत प्रबल अशा अविद्येच्या परिवाराचा म्हणजे मोह आदि अपार अंधाराचा नाश होतो.।।३।। तेव्हा ती विज्ञानरूपिणी बुद्धि प्रकाश मिळाल्यावर हृदयरुपी घरांत बसून जडचेतन ग्रंथि सोडू लागते.।।४।।

टीका. चौ.३ (१) प्रबल अविद्येच्या परिवारा- अविद्या माया व तिचा मोहादि सर्व परिवार किती प्रबल आहे याचें वर्णन 'नारद भव विरंचि सनकादिक आत्मवादि जेही मुनिनायक।। मोहें अंध न कृत कोणाला' (७।७०।६) पासून 'हा माया परिवारचि सगळा। प्रबल मिति न कुणि वर्णू शकला।। शिव चतुरानन डरती जीतें' (७।७१।८) पर्यंत केलेले पाहावे. यांत मोह = अज्ञान भ्रम संशय मुख्य आहे. हा सर्व अविद्याजनित अपार अंधकार आहे पण आत्मानुभवसुखरूपी प्रकाशाने याचा नाश होतो. 'महा मोह तमपुंज' (१मं.सो.५). 'भ्रम तम रविकर वचन मम' (१।११५). 'पडे प्रकाश कुठें तम नाहीं, ज्ञानोदयिं कीं संशय राही' (६।४७।४) मायामोहजनित कामादिसकलविकार तमोमयच आहेत.

चौ.४ (१) तैं- तेव्हा, अविद्या व अविद्याजनित मोहादिकांचा नाश झाल्यावर. ती बुद्धि = विज्ञानरुपिणी बुद्धि (११७म पहा) प्रकाश मिळुनी- विज्ञानमय तेजोमय दीप पेटविण्यापर्यंतचे कार्य या बुद्धीने अंधारातच केले. अकामाग्नीचा व योगाग्नीचा थोडा प्रकाश होता पण गांठ सोडण्यास तो पुरेसा नव्हता. पण आता तो = आत्मानुभवसुखप्रकाश तिला मिळाला आहे व सर्व तमाचा नाश झालेला आहे तेव्हा (क) सोडी ग्रंथि- जड चेतन ग्रंथि सोडण्याचा प्रयत्न करु लागले, प्रयत्न कसा करते? (ख) हृदय गृहिं बसुनी- बसणे ही क्रिया उठण्याच्या विरुद्ध आहे. ग्रंथि सोडणे = ग्रंथि भेद करणे. जी सोहं अशी ब्रह्माकार वृत्ति उठत असते ती उठते बसते उठते बसते असे चालले असतां ब्रह्माकार वृत्ती बसल्यावर पुन्हा उठेपर्यंत मधला जो संधि असतो ज्यांत ब्रह्माकार वृत्ती, वृत्ती व्याप्तीने ब्रह्मांत निमिषार्धपर्यंत लय पावलेली असते तो संधि अनुभवास येणे, यालाच ग्रंथिभेद करणे, ग्रंथि सोडणे असे म्हणतात. 'लय विक्षेपयोः संधिर्मनस्तत्र निरामिषं स संधिः साधितो येन स मुक्तो नात्र संशयः' (श्रुति) असे घडेपर्यंत खरोखर तुर्यावस्थाच असते. 'आनंदाचा अनुभव। हाही वृत्तीचाचि भाव' आनंद आणि त्याचा अनुभव हे द्वैतच आहे. हे द्वैत वृत्तीच्या

लयानेच नष्ट होते. येथील बसुनी शब्दाने, वृत्तीचे न उठणेच सुचविले आहे. जी मधली अनिर्वचनीय त्रिपुटीरहित, द्वैतरहित स्थिती तो ब्रह्माकारवृत्तीचा संधि. मात्र हा वृत्तिलय शून्यांत होता नये. अधिक विस्तार श्रीमदाचार्यांच्या लघुवाक्य वृत्तीत व त्यावरील श्री हंसराज स्वामिकृत ओवीबद्ध वाक्यवृत्ति या ग्रंथात पहावा. येथे अधिक खोल जाणे बरे नव्हे. अशा प्रकारे ही ग्रंथि सोडणे, ग्रंथिभेद करणे फार कठिण आहे हे पुढे दाखवितात.

हिं. ।छोरन ग्रंथि पाव जौं सोई।तब यह जीव कृतारथ होई।।५।।
।छोरत ग्रंथि जानि खगराया।बिघ्न अनेक करइ तब माया।।६।।

म. ।ग्रंथिभेद ती करुं शके जर।होइ जीव मग कृतार्थ हा तर।।५।।
।सोडत गाँठ बघुनि खगराया।विघ्न अनेक करी तैं माया।।६।।

अर्थ- ती बुद्धि जर ग्रंथिभेद (गाठं सोडणे) करु शकली तर हा जीव कृतार्थ होतो.।।५।। (परंतु) हे पक्षिराजा! गांठ सोडली जात आहे असे जेव्हा मायेला दिसते, कळते तेव्हा ती अनेक विघ्ने निर्माण करते.।।६।।

टीका. चौ.५ (१) 'जर तर'ने सुचविले की एवढे सगळे कष्ट दीर्घकाळ केल्यानंतर गांठ सुटेलच अशी खात्री नाही. 'ज्ञान अगम्य हि विघ्नें पार न' (७।४५।३) असे श्रीरघुनाथच म्हणाले आहेत त्रेतायुगांतील अयोध्यावासी लोकांना मग कलियुगीन जीवांना तर हे जवळ जवळ अशक्यच. (क) ग्रंथि भेद ती करु शके, पण येणाऱ्या विघ्नांतून ती विज्ञानरूपिणी बुद्धि निभावली व दीप विझला नाही तर. (ख) मग हा जीव कृतार्थ होइ- ती जडचेतन ग्रंथि बुद्धि सोडू शकली तर जीव कृतकृत्य होतो. भवबंधातून सुटतो. येथे स्पष्ट दाखविले की जीवाची सुटका होणे न होणे त्याच्या हाती नसून बुद्धीच्या हाती आहे. सर्व साधन बुद्धीपर्यंतच आहे कारण 'यो बुद्धेः परतस्तु सः' (भ.गी.) ज्ञान अज्ञान इत्यादींचा संबंध बुद्धीशीच असतो पण बुद्धिमुळें जीवाला संसृतींत भ्रमावे लागते व बुद्धीच जीवाला त्या भ्रमणातून सोडवू शकते.

चौ.६ (१) खगराया- तुम्ही खगराज आहांत, तुम्ही जाणतांच की भ्रमाने, मोहाने गमावलेले स्वराज्य आणि स्वातंत्र्य परत मिळविणे फार कठीण आहे, कारण ज्या सत्तेच्या ताब्यांत ते गेले असेल ती सत्ता नाना प्रकारे विरोध करते

...। अडथळे आणण्याचा प्रयत्न करते. त्याप्रमाणेच जडचेतन ग्रंथि सोडली जात आहे असे मायेला कळते. गांठ सुटली तर हा जीव माझ्या पाशांतून सुटणार व मला जुमानणार नाही असे मायेला वाटते व <u>'विघ्न अनेक करी तैं माया'</u> तैं = तेव्हा, आपल्या कामादि सेनापतींचा व दंभकपटपाखंडादि वीर सैनिकांचा प्रताप व पुरुषार्थ या बुद्धीपुढे चालत नाही. असे मायाला वाटलें म्हणजे ती स्वतः विघ्नें उत्पन्न करते. ही विद्या माया नसून अविद्या माया विघ्ने करते कारण ती 'दुष्ट सुदुःखरूपी' आहे. आता विघ्नांचे वर्णन करतात.

हिं. *।रिद्धि सिद्धि प्रेरइ बहु भाई।बुद्धिहि लोभ दिखावहिं आई।।७।।*
।कल बल छल करि जाइ समीपा।अंचल बात बुझावै दीपा।।८।।

म. *।ऋद्धि सिद्धि बहु दे बा! धाडुनि।मतिला प्रलोभ दाविति येउनि।।७।।*
।कळ बळ छळ करि समीप जाते।विझवी दीपा अंचल वातें।।८।।

अर्थ- अरे बाबा! ती अविद्या माया पुष्कळ ऋद्धि आणि (आणिमादिक) पुष्कळ सिद्धि याना धाडून देते, आणि त्या बुद्धीजवळ येऊन प्रलोभ दाखवितात.।।७।। (मग) नाना कळा (युक्त्या) करुन बळाने किंवा छळाने माया स्वतः जवळ जाते व पदराच्या वाऱ्याने तो दिवाच मालवून टाकते.।।८।। ('बुझावै' पाठ त्रिपाठीजींचा घेतला आहे.)

चौ.७ <u>(१)</u> <u>येउनि-</u> त्या अणिमादिक सिद्धि कुमारिकारूपाने किंवा सौभाग्यवती स्त्रियांच्या रूपाने समोर येतात, आणि खरोखरच वंदन करुन बोलतातही. अणिमादि महासिद्धींची लक्षणें व मानसांतील उदाहरणे ३।१५।८च्या टीकेंत व इतर काही सिद्धींचे वर्णन १।२२।३च्या टीकेत दिलेले पाहावे. <u>(क)</u> <u>प्रलोभ दाविति-</u> तुम्हाला आमची आवश्यकता नसली तरी आम्ही दासी म्हणून तुमच्या सेवेला राहणार आहो, त्यामुळे आमचे कल्याण होईल आणि 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती,' 'परोपकाराय सतां विभूतयः' आपण अनेकांचे ऐहिक व पारमार्थिक कल्याण आमच्या पदतीने करु शकाल इत्यादि सांगून बुद्धीला लोभांत पाडण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या प्रार्थनांना बुद्धी बळी पडली की ती ब्रह्माकार वृत्ति खंडित होते, ज्ञानदीप विझतो. पण त्यांच्या फंदांत बुद्धि पडत नाही असे वाटतांच-

चौ.८ (१) अविद्यामाया स्वतःच येते. कळ = युक्ती, कला. युक्ती प्रयुक्तीने साम, दाम भेद नीतीचा आश्रय करुन बुद्धीच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करते. बळाचाही उपयोग करण्यास कमी करीत नाही. तेवढ्याने न भागल्यास छळाने कपटरूप घेऊन जवळ जाते व पदराने वारा घालून तो दीप मालवून टाकते. भाव हा की सुंदर प्रमदेच्या रूपाने बुद्धीच्यापुढे हृदयांत प्रगट होते, व मधुरवाणी, देहाचा अद्‌भुत सुगंध इत्यादि विषयरुपी वाऱ्याने त्या अखंड वृत्तीत खंड पाडते, तो दिवा मालवते. अशा वेळी या मार्गात रघुवीर संरक्षक नाहीत हे लक्षांत ठेवावे.

हिं. *।होइ बुद्धि जौं परम सयानी।तेहि तन चितव न अनहित जानी।।९।।*
।जौं तेहि बिघ्न बुद्धि नहिं बाधी।तौ बहोरि सुर करहिं उपाधी।।१०।।

म. *।असे बुद्धि जर परम शहाणी।तिज न लक्षिते अहित जाणुनी।।९।।*
।त्या बुद्धिस जर विघ्न न बाधी।तर नंतर सुर करिती उपाधी।।१०।।

अर्थ- ती बुद्धी जर अत्यंत शाहणी असेल तर अहित जाणून तिच्याकडे लक्षच देत नाही. (तिच्याकडे लक्ष न देता आपल्या सुखांत मग्न राहते.)।।९।। त्या बुद्धीला जर हे विघ्न बाधूं शकले नाही तर मग देव उपाधि करतात.।।१०।।

टीका. चौ.९ (१) सूचना- 'तेहि' पाठ पंडित त्रिपाठीजींचा सापडला, तो अधिक योग्य वाटल्या कारणाने घेतला आहे. (क) असे बुद्धि जर परम शहाणी 'जर' ने सुचविले की ही विज्ञानरूपिणी बुद्धि सुद्धा परम शहाणी नसते आणि मायेच्या छळाला बळी पडते. आपले व जीवाचे हित कशात आहे हे उत्तम प्रकारे जाणणारी असेल तीच परम शाहणी = परम शाहणी बुद्धि. (ख) अहित जाणुनी तिज न लक्षिते- ही दिसणारी बाई माया आहे, माझी जीवाची अहित = शत्रु आहे असें जी जाणते ती तिच्याकडे लक्षच देत नाही. जी दिवा मालविण्यास संधि देईल ती परम शाहणी ठरणार नाही.

चौ.१० (१) त्या बुद्धिस- जिने मायेकडे व तिने दाखविलेल्या प्रलोभनांकडे दुर्लक्ष केले त्या बुद्धीला. (क) जर विघ्न न बाधी = मायेने घातलेल्या पदराच्या

...गूने जर दीप विझला नाही, दीपज्योती तशीच तेवत राहिली, तर ती ...मायाकृत विघ्नांतून बचावली, पण सर्व विघ्ने सरली असे नाही. निर्विकल्प ...समाधींत अंतरांत मायानिर्मित वारा प्रवेश करु शकला नाही आणि सर्व ...इंद्रियद्वारे बंद असल्याने बाह्य विषयांचा वारा सुद्धा आत प्रवेश करु शकत ...नाही असे ठरले. <u>(ख)</u> <u>तर नंतर</u>- माया स्वस्थ बसत नाही, ती इंद्रियांच्या देवतांना चिथावणी देते. सुर स्वार्थीच असल्याने मायेच्या चिथावणीला वश होतात व <u>(ग)</u> <u>सुर करिती उपाधी</u>- दीप विझावा ग्रंथि सुटू नये आणि त्या जीवाकडून मिळणारे विषयभोग बंद पडू नयेत म्हणून देव विघ्ने करतात.

हिं. *।इंद्री द्वार झरोखा नाना।तहँ तहँ सुर बैठे करि थाना।।११।।*
।आवत देखहिं बिषय बयारी।ते हठि देहिं कपाट उधारी।।१२।।
।जब सो प्रभंजन उर गृहँ जाई।तबहीं दीप बिग्यान बुझाई।।१३।।

म. *।गो गोलकें झरोके नाना।स्थित तेथे सुर मांडुनि ठाणा।।११।।*
।येतां पाहुनि विषय समीरण।बळें उघडिती द्वारे सुरगण।।१२।।
।जैं उरगृहिं तो घुसे प्रभंजन।तदा दीप विज्ञान विभंजन।।१३।।

अर्थ- इंद्रियांची द्वारे (गोलके) या अनेक खिडक्या आहेत तेथे देव ठाण मांडून बसलेले असतात.।।११।। विषयरुपी जोराचा वारा येत आहे असे पाहून ते देवगण त्या खिडक्यांची (बंद असलेली) दारे एकदम बळाने उघडतात.।।१२।। त्यातून तो सोसाट्याचा वारा जेव्हा हृदयरुपी घरांत घुसतो तेव्हा विज्ञानदीपाचा नाश होतो (मालविला जातो).।।१३।।

टीका. चौ.११ <u>(१)</u> <u>गो-गोलके</u>- गो = इंद्रिय, गोलके = द्वारे. पांच कर्मे-द्रिये व पाच ज्ञानेंद्रिये यांची द्वारे. <u>(क)</u> <u>झरोके नाना</u>- नाक, कान व डोळे यांची दोन दोन द्वारे आहेत. त्वचेची अगणित द्वारे आहेत, व बाकीच्या इंद्रियांचे १।१ द्वार आहे. इंद्रिये सूक्ष्म असून ती सूक्ष्म देहांत आहेत व इंद्रियद्वारें स्थूल देहांत आहेत. इंद्रिय आणि त्यांचे द्वार यांचा संबंध सुटला असला किंवा मन इंद्रियांत नसले तर कान उघडे असून ऐकू येत नाही व डोळे उघडे असून दिसत नाही. काहीं इंद्रियांची अनेक द्वारे असलीं तरि इंद्रिय १।१ च आहे. <u>(ख)</u> <u>स्थित येथे सुर मांडुनि ठाणा</u>- प्रत्येक इंद्रियांची १।१ देवता आहे व ती त्या त्या इंद्रियाच्या

द्वारांत देह असे पर्यंत निवास करुन राहते. श्रोत्रत्वचाचक्षुजिव्हाघ्राण आणि वाक पाणि पाद पायूपस्थ या दहा इंद्रियांच्या दिशा वायु, सूर्य, वरुण, अश्विनीकुमार, आणि वन्हि, इन्द्र, उपेंद्र मृत्यु आणि प्रजापति या क्रमशः दहा देवता आहेत. या देवतांची सत्ता प्राणिमात्रांच्या त्या त्या इंद्रियावर आहे. तेथे त्यांना ते ते विषय भोग मिळतात. पण वृत्ति उठत नाहींशा झाल्यानें त्यांचे विषयभोग बंद पडले आहेत, म्हणून ते भोग मिळविण्याचा ते ते देव प्रयत्न करणारच.

चौ.१२-१३ (१) विषय-समीरण- विषयरूपी वायूचा जोराचा झोत. (क) बळें उघडिती द्वारें सुरगण- ही इंद्रियद्वारे मुद्रा, ध्यान, धारणा वगैरे योग साधनांनी त्या बुद्धीने बंद करुन ठेविली होती. 'सर्व द्वाराणि संयम्य मनोहृदिनिरुध्यच' (भ.गी.) तीं इंद्रियांच्या देवता जबरीने उघडतात. मायेने पंचविषयांचा समीरण बाहेर तयार केलाच होता. तो त्या त्या इंद्रियांच्या द्वारांतून आत घुसतो. अनेक द्वारांतून अनेक दिशांनी एकाच स्थानाकडे वायूचे जोराचे झोत वाहू लागले म्हणजे 'प्रभंजन' सुरु होतो. प्रभंजन = मोडतोड करणारा सोसाट्याचा वारा. इंद्रियद्वारें एकदम सताड उघडलीं गेल्यामुळे ते ते दिव्य विषय एकदम हृदयांत प्रवेश करतात. (ख) आणि विज्ञान दीपाचे विभंजन (= विनाश) करतात. प्रथम सोहं ही दीपशिखा विझून जाते, त्याबरोबर हृदयांत पुन्हां अंधार पडतो. पणती कुठे उडते, ठाणवई दुसरीकडेच जाते, तूप सांडते व अशाप्रकारे तेजोराशि दीपाचा पूर्ण विध्वंस केला जातो. लयविक्षेप यांचा संधि साधणे तर दूरच राहते पण बुद्धि एकदम गांगरुन जाते त्यामुळे सोहं ज्योति विझते. हेंच आता स्पष्ट सांगतात.

हिं. ।ग्रंथि न छूटि मिटा सो प्रकासा।बुद्धि बिकल भइ विषय बतासा।।१४।।
।इंद्रिन्ह सुरन्ह न ग्यान सोहाई।बिषय भोग पर प्रीति सदाई।।१५।।
।बिषय समीर बुद्धिकृत भोरी।तेहि बिधि दीप को बार बहोरी।।१६।।

म. ।ग्रंथि न सुटली तेज हरपलें।होइ बिकल मति विषयवादळे।।१४।।
।करण-सुरांना ज्ञान नावडे।विषयभोग-अति सदा आवडे।।१५।।
।विषय समीरें बुद्धि बावळी।तसा दीप मग कोण पाजळी।।१६।।

...र्थ- ग्रंथि तर नाहींच सुटली पण प्रकाशही नाहींसा झाला, आणि विषयरूपी वादळाने बुद्धि व्याकुळ झाली.।।१४।। इंद्रियांच्या देवतांना ज्ञान आवडत नाही, आणि विषयभोग सदा फार आवडतात (प्रिय वाटतात).।।१५।। विषयरूपी समीराने बुद्धि भांबावून गेल्यावर (बावळी झाल्यावर) तशा प्रकारचा ज्ञानदीप पुन्हा कोण प्रज्वलीत करणार (पाजळी)! ।।१६।। (पुन्हा घडणे अशक्य)

टीका. चौ.१४ (१) ग्रंथि न सुटली- जी जड चेतन ग्रंथि सुटण्यासाठी निवृत्ति मार्गाचा अवलंब करुन धर्माचरणापासून किती दीर्घकाळ दुःसह परिश्रम केले ती ग्रंथि सुटली नाही, व त्यामुळे जीव कृतार्थ झाला नाही, भवभय नष्ट झाले नाही. ज्या प्रकाशात ग्रंथि सोडावयाची तो आत्मानुभवसुख प्रकाश (तेज) अनेक विषयांचे विक्षेप येऊन नाहीसा झाला, सोहं वृत्ति राहिली नाही, हृदयांत पुन्हा अंधार भरला. यामुळे बुद्धि विषाद, भय, निराशा इत्यादिकानी व्याकुळ होणारच. केलेल्या सर्व प्रयत्नांची एका क्षणात धूळधाण झालेली पाहून बुद्धीचा धीर सुटला, अति दुःखी झाली. बुद्धि दुःखी झाली की जीव दुःखी झालाच. ही खटपट केली नसती तर बरे झाले असते असे ही त्या जीवाला वाटणारच.

चौ.१५ (१) करणसुरांना....आवडे. करण = इंद्रिये. करणसुर = इंद्रियांच्या देवता. त्यांना ज्ञान मुळीच आवडत नाही. ग्रंथि सोडली गेली व जीव कृतार्थ झाला त्या ज्ञानाने, तर त्या जीवाकडून त्या देहाच्या इंद्रियांच्या देवतांना पूर्वीसारखे विषयभोग मिळण्याची आशा नसते व त्या देवतांना तर विषयभोग फार प्रिय वाटतात. म्हणून ज्ञानमार्गी साधकाच्या साधनांत इंद्रिय देवता विघ्ने करतात व त्याला विषयी बनविण्याचा प्रयत्न करीत असतात. भक्तीमार्गात भगवान संरक्षक असल्याने असा विरोध करण्यास इंद्रिय देवता धजत नाहीत हे येथे ध्वनित केले आहे.

चौ.१६ (१) विषयसमीर- विषयरूपी समीर. समीर = सम्यग् = इयर्ति गच्छति, योग्यप्रकारे जाणारा, किंवा सम्यग् ईरयति योग्य प्रकारे प्रेरणा देणारा. हे दोन्ही अर्थ येथे लागू आहेत. एकदा विषयरूपी वायूचा प्रवेश बुद्धीपर्यंत झाला म्हणजे त्याची ती गति इंद्रियदेवतांना अनुकूल पद्धतीने चालूच राहते.

वायु हा एक देव आहेच. आणि विषयरूपी वायु बुद्धीला सारखी प्रेरणा देतच राहतो. भाव हा की आत्मसुख पुन्हा मिळणे अशक्य आहे असे वाटून बुद्धि विषयसुख मिळविण्याचा प्रयत्न पुन्हा करु लागते. <u>(क)</u> <u>बुद्धि बावळी</u>- त्या समीराने परम सुजाण बुद्धीला बावळी करुन टाकली. हित परमहित कशात आहे अहितकारक काय आहे याचा निर्णय करण्याची तिची शक्तीच नष्ट झाली. <u>(ख)</u> <u>तसा दीप</u>- सात्विक श्रद्धेपासून 'सोहमस्मि ही वृत्ति अखंडा' पर्यंत सांगितलेले कष्ट अनेक वर्षे करुन जसा विज्ञानमय तेजोराशी दीप पेटविला होता तसा दीप. <u>(ग)</u> <u>मग कोण पाजळी</u>- वर्षानुवर्षे केलेले कष्ट धुळीस मिळालेले पाहिल्यानंतर व बुद्धि बावळी झाल्यावर तसे कष्ट करणार कोण? परम सुजाण बुद्धीने केले ते मातीत गेले! भाव हा की पुन्हा तसा प्रयत्न केला जाणे अशक्यच. <u>सूचना</u>- भक्तीचा आधार न घेता 'भक्ति ज्ञानाची माउली' असून तिचा अनादर करुन ज्ञानमार्गाने जाणे म्हणजे वस्तऱ्याच्या तीक्ष्ण धारेवर चढून मार्ग आक्रमण करणे आहे असे श्रुति म्हणतातच.

हिं.दो. ।तब फिरि जीव बिबिधि बिधि पावइ संसृति क्लेस।।
।।हरिमाया अति दुस्तर तरि न जाइ बिहगेस।।११८रा.।।

म.दो. ।जीव पुन्हां तै विविध विध भोगि संसृतीक्लेश।।
।।हरिमाया अति दुस्तर तरवे ना विहगेश।।११८रा.।।

अर्थ- (ज्ञानदीपाचा असा विनाश झाला म्हणजे) जीव पुन्हा संसृतीचे (जन्ममरणपरंपरांचे) क्लेश भोगीत राहतो. अहो पक्षिराज! श्रीहरीची (अविद्या) माया (सुद्धा) अशी दुस्तर आहे. जीवाला (या मार्गाने) तरून जाता येत नाही.।।११८रा.।।

टीका. <u>(१)</u> <u>पुन्हां तै</u>- ज्ञानदीपाचा असा विध्वंस झाला म्हणजे मग, जीवाची जी दशा सात्विक श्रद्धा हृदयांत येऊन राहण्यापूर्वी होती ती दशा पुन्हा प्राप्त होते, कारण तो <u>(क)</u> <u>पुन्हां जीव</u>- विज्ञान दीप पेटून जो ब्रह्म झाला असे वाटत होते तो पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' जीवच राहिला. त्यामुळे <u>(ख)</u> <u>विविधविध भोगि संसृति क्लेश</u>- <u>'पुनरपि जननं पुनरपि मरणं। पुनरपि जननी जठरे शयनं</u>' असे जन्ममरणाचे चक्र त्याच्या पाटीस लागलेलेच राहते व विविध

दुःखे भोगीत राहतो. याचे कारण आणि सार हेच की 'हरिमाया अति दुस्तर, तरवे ना' 'दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया' (भ.गी.) प्रभूची अविद्यामाया सुद्धा अति दुस्तर आहे ती जीवाला स्वतःच्या बळावर तरतां येणे शक्य नाही. (ग) लक्ष्मण व हनुमंतासारख्या श्रीरामसमीप वावरणाऱ्या रामभक्तांना रावणाची मायासुद्धा तरतां आली नाही. सुग्रीव म्हणाला की 'निशिचर माया न ये कळोनी' (५।४३।६) हरिमाया प्रभाव अतर्क्य असल्याबद्दल भरपूर विवेचन यापूर्वी झाले आहे. ७१।८, ७१म, ७२।१, ७२।२, ११६।४ पहा. (घ) विहगेश- तुम्हीं विहंगपती असून तुम्हाला सुद्धा जसा आकाशाचा अंत लागत नाही तसा मायेचा अंत कोणास लागत नाही. 'मामेव ये प्रपद्यन्ते मायां एतां तरन्ति ते' हा भक्ति सिद्धान्त पुढें सांगावयाचा आहे त्याची पूर्वतयारी सुरु झाली. 'अशी भक्ती जाणुनि परिहरती। ज्ञाना केवळ जे श्रम करती। ते जड ....' (११५।१-२) त्यांना कसे श्रम करावे लागतात व ते निरर्थक ठरुन ते पुन्हां जड जीवच कसे ठरतात हे या प्रकरणांत सविस्तर दाखविले. का तरवत नाही या मार्गाने ते आता सांगतात.

हिं.दो. ।कहत कठिन समुझत कठिन साधत कठिन बिबेक।।
।।होइ घुनाच्छर न्याय जौं पुनि प्रत्यूह अनेक।।११८म.।।

म.दो. ।वदत कठिण समजत कठिण साधत कठिण विवेक।।
।।घुणाक्षरें न्यायें घडे तरि विघ्नें हि अनेक।।११८म.।।

अर्थ- ज्ञान समजाऊन सांगणे कठीण (व सांगणारा मिळणे कठीण), ते समजणे कठीण, (आणि शब्दांनी समजले तरि) ते ज्ञान (विवेक) साधणे (त्याहून) कठीण, जरि घुणाक्षर न्यायाने कोणाला (सहजासहजी) झाले तरि (ज्ञान झाल्यावर सुद्धा) विघ्नें अनेक असतातच (टिकेल असे नाही).।।११८म.।।

टीका. (१) विवेक = ब्रह्मात्मैक्य ज्ञान = जीवशिवैक्य ज्ञान. (क) वदत कठिण- या ज्ञानाचा उपदेश शब्दानी करणे फार कठीण. कारण, जे शब्दातीत, गुणातीत व मनांतीत आहे ते शब्दानी सांगता येणे फार कठीण आहे. यामुळेच परीक्षितीने श्रीशुकाचार्यास विचारले की 'ब्रह्मन् ब्रह्मण्यनिर्देश्ये निर्गुणे गुणवृत्तयः कथं चरन्ति श्रुतयः साक्षात् सदसतः परे' (भाग.१०।८७।१) जे

शब्दातीत गुणातीत वगैरे आहे त्याचा उपदेश श्रुति तरि कशा करु शकतात? हे परिक्षितीच्या शंकेचे सार आहे. श्रुति म्हणते, 'आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धा। आश्चर्यः श्रोता कुशलोनुशिष्टः' (स्मृति) (भ.गी.) सांगते की 'आश्चर्यवत् पश्चति कश्चिदेनं। आश्चर्यवत् वदति तथैव चान्यः।। आश्चर्यवत् चैनमन्यः श्रुणोति श्रुत्वाऽप्येनं वेद न चैव कश्चित्।' (२।२९) याचा आत्मानुभवी कुशल वक्ता मिळणे आश्चर्यच, याचा साधन चतुष्ट्य संपन्न उत्तम अधिकारी श्रोता मिळणेही आश्चर्यच, आणि असा वक्त व श्रोता मिळाले तरि त्याचे ज्ञान होणे सुद्धां आश्चर्यच, बहुधा कोणाला होत नाही. याप्रमाणे श्रुति स्मृति (भ.गी.) व पुराण यानीं जे सांगितले तेच येथे सांगितले आहे. (क) जे अकथनीय आहे ते 'शक्य न वदणे' (११७।१) असा उपक्रम केला व येथे 'वदत कठिण' असा उपसंहार केला. 'समजणे शक्य' असा उपक्रम केला व येथे 'समजत कठीण ' असा उपसंहार केला. सार हे की समजणे शक्य असले तरि ते फार कठीण आहे. किती कठीण आहे हे आतापर्यंत दाखविले आहे. (ख) विवेक साधत कठिण- साधणे म्हणजे प्राप्त होणे. ब्रह्मात्मैक्य ज्ञान प्राप्त होणे फार कठीण आहे. 'ज्ञान अगम्य हि विघ्नें पार न। साधन कठिण मना आधार न' (७।४५।३) असे प्रभुवचनच आहे. भ.गीतेतील भगवद्वचन (२।२९) वर दिले आहेच.

(२) घुणाक्षरे न्याये घडे तरि- घुणा = एक प्रकारची वाळवी. लाकडाला वाळवी लागली म्हणजे केव्हा क्वचित काहीं अक्षरें त्यावर उठलेलीं दिसतात, पण वाळवीला अक्षरज्ञान नाही, म्हणून ती अक्षरे त्यानी हेतुपूर्वक प्रयत्नाने काढलीं असे ठरत नाही, सहजगत्या अक्षरे उठतात, त्याना घुणाक्षरे म्हणतात. या न्यायानेच हेतुपूर्वक प्रयत्न न करतां सहज कोणाच्या कृपेने किंवा अन्य तऱ्हेने ब्रह्मात्मैक्य ज्ञान जरि झाले तरी ते टिकून राहणे फार कठीण आहे. ज्ञान झाल्यानंतरही अनेकविघ्नें येतात व ज्ञानी पतन पावतात. 'मुनि ते ज्ञाननिधान मृगनयनी विधुमुख बघुनि।। विवश होति हरियान! नारि विष्णुमाया प्रगट' (७।११५) हे एक कारण भक्तिहीन ज्ञान्याविषयीं आधींच सांगितले आहे. 'जे ज्ञान मान विमत्त तव भव हरणि भक्ति न आद्रिती। ते प्राप्य सुर दुर्लभ पदादपि पडत आम्हां अढळती' (७।१३छं.) अशी अनेक विघ्नें आहेत.

हिं. ।ग्यानपंथ कृपान कै धारा।परत खगेस होइ नहिं बारा।।१।।

।जो निर्विघ्न पंथ निर्बहई।सो कैवल्य परम पद लहई।।२।।
।अति दुर्लभ कैवल्य परम पद।संत पुरान निगम आगम बद।।३।।

म. *।ज्ञानाचा पथ कृपाण-धार हि।पडत खगेश! न लागे वार हि।।१।।*
।निभावतो निर्विघ्न पथा जो।तो कैवल्य परम पद लभतो।।२।।
।अति दुर्लभ कैवल्य परम पद।संत पुराण निगम आगम वद।।३।।

अर्थ- अहो पक्षिराज! ज्ञानमार्ग म्हणजे दुधारी तलवारीची धारच आहे, (त्यामुळे) पतन पावण्यास (अधःपात होण्यास) जरासुद्धा वेळ (वार) लागत नाही.।।१।। जो या मार्गाला निर्विघ्नपणे निभावून जाईल तो कैवल्य मोक्षरूपी परम पद पावतो.।।२।। (मधेंच पडला की गेला रसातळाला) म्हणून संत, पुराणें, वेद व इतर शास्त्रे रूपी वक्ते (वद = वक्ता) म्हणतात कीं कैवल्य परमपद अति दुर्लभ आहे.।।३।।

टीका. चौ.१ (१) ज्ञानाचा पथ = ज्ञानमार्ग. 'अशी भक्ति जाणुनि परिहरती। ज्ञाना केवळ जे श्रम करती' (११५।१) अशांचा मार्ग. (क) कृपाण धार हि- कृपाण = दुधारी तलवार-पट्टा. हा पंथ कसला दुधारी तलवारीच्या धारेवरुन दीर्घकाळपर्यंत चालत जाणे आहे. 'क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्ग पथः तत् कवयो वदन्ति' (श्रुति) अत्यंत तीक्ष्ण अशी वस्तऱ्याची धार म्हणजे हा मार्ग आहे, निभावून शेवटास जाणे दुष्कर! मार्ग अति दुर्गम आहे असे कवि = क्रान्तदर्शी पंडित म्हणतात. या श्रुतींत जे सांगितले तेच येथे सांगितले आहे. (क) पडत न लागे वार- आगगाडीचे रुळ बरेच रुंद असतात तरि एका रुळावरुन फार लांब जाववत नाही. तोल जाऊन पडतात. तारेवरून चालणे त्याच्यापेक्षा कठीण मग तलवारीच्या धारेवरुन चालणे दूर राहिले, नुसते दोन पाय तलवारीच्या धारेवर ठेवणे कठीण मग चालतांना पतन पावतील तर नवल काय? कसे पतन पावतात याची दोन उदाहरणे (७।११५म, ७।१३छं.) मागल्या दोह्याच्या टीकेत दिली आहेत.

चौ.२-३ (१) निभावतो निर्विघ्न पथा जो- जरि ज्ञानी जीवन्मुक्त, ब्रह्मलीन विज्ञानी झाला तरि देहपातापर्यंत जो कोणत्याही विकाराला वश न होता, येणाऱ्या विघ्नांतून निभावेल, तोच कैवल्य मोक्षरूपी परम पद देहपातानंतर

पावतो. ब्रह्मांत कायमचा लीन होतो. पण हे असे घडणे फारच दुर्लभ आहे. (क) अति दुर्लभ कैवल्य परम पद- परमपद = सच्चिदानंदमय नित्य, मुक्त असे जे ब्रह्म त्यात लीन होणे. जले जलं, वियद् व्योम्नि तेजः तेजसि वा यथा. पाणी पाण्यांत आकाश आकाशात, तेज तेजांत जसें मिळावे तसे ब्रह्मांत मिळून जाणे = परम पद, यालाच विदेह कैवल्य म्हणतात. हा मोक्ष देहपातानंतर मिळतो. अति दुर्लभ कां हे आतापर्यंत दाखविलेच. आणि (ख) संत पुराण निगम आगम वदः वद = वक्ता. 'वदो वदावदो वक्ता' (अमरे) संतपुराणादि वक्ते हेंच सांगतात.

सूचना- येथे ज्ञानदीप प्रकरण समाप्त झाले. ज्ञानमार्गाने अति दुर्लभ असलेले कैवल्यपद भक्तीने अत्यंत सुलभ आहे असे सांगून भक्ती प्रभाव वर्णन करतील. ते वर्णन भक्ती चिंतामणी प्रकरणाच्या प्रस्तावनेसारखे असल्याने भक्तिचिंतामणी प्रकरणांत घेणेच योग्य. कोणी ज्ञानदीपांत घेतात.

भक्तिचिंतामणी प्रकरण (११९/४ - १२०म.)

हिं. ।राम भजत सोइ मुकुति गोसाई।अनइच्छित आवइ बरिआई।।४।।
।जिमि थल बिनु जल रहि न सकाई।कोटि भाँति कोउ करै उपाई।।५।।
।तथा मोच्छसुख सुनु खगराई।रहि न सकइ हरि भगति बिहाई।।६।।

म. ।स्वामी! राम भजत मुक्तीते।न इच्छितां जबरीने येते।।४।।
।स्थलविण जल कधिं राहूं न शकते।यत्न कोटिहि करुन विविध ते।।५।।
।तसे मोक्ष सुख बघ खगराया।टिकुं न शके हरिभक्ति विना या।।६।।

अर्थ- अहो स्वामी! श्रीरामचंद्रांचे भजन करीत राहिल्याने तीच (अति दुर्लभ) कैवल्यमुक्ति इच्छा न करतांही बळजबरीने (जवळ) येते. (पाठीस लागते).।।४।। नाना प्रकारे कोटि यत्न केले तरि स्थलावाचून जसे जल कधीं राहू शकत नाही.।।५।। तसेंच हे खगराया! या हरिभक्तिवाचून मोक्षसुख टिकू शकत नाही. (हरिभक्तीचा आश्रय असेल तरच टिकतें).।।६।।

टीका. चौ.४ (१) मुक्ती ते = ती मुक्ती. जिची प्राप्ति ज्ञान मार्गाने अत्यंत

...र्लभ आहे असे संतपुराणनिगमागम सांगतात तीच कैवल्यमुक्ति, तेच कैवल्य परम पद रामभजन करीत राहिल्याने सहज मिळते, जरासुद्धा कष्ट करावे लागत नाहीत. रामभजन करीत राहिल्याने रामभक्तीची प्राप्ती होते व भगवंताच्या कृपेने व भक्तीच्या प्रभावाने ब्रह्मात्मैक्य ज्ञान सहज प्राप्त होते व टिकविण्यासाठी रामभजकाला कष्ट करावे लागत नाहीत, कारण श्रीरघुवीर जननीप्रमाणे त्याचे रक्षण करतात व ज्याला कैवल्य मोक्ष पाहिजे त्याला देतात. पण काहीं रामभक्त असे असतात की ते त्या मोक्षाची स्वप्नांत सुद्धा इच्छा करीत नाहीत, अशांच्या विषयी सांगतात की त्यांची इच्छा नसली तरि जबरीने येते. कैवल्य मुक्ति त्याच्याजवळ येऊन राहते. तो भक्त तिला म्हणतो की तुझ्यासाठी जे तळमळत असतील त्यांच्याकडे जा, चालती हो! मला तुझी जरुर नाही. ती म्हणते माझ्यावर जे आसक्त होतात पण मोक्षस्वरूप, ज्ञानस्वरूप, भगवंतावर आसक्त होत नाहीत त्या हरिविमुखांपाशी राहण्यांत मला सुख होत नाही. भक्ति असेल तेथे मुक्ति लोटांगण घालीत येते हे दाखविले. भक्ति नसेल तेथे कसे घडते ते आता पहा.

चौ.५-६ (१) स्थलविण जल कधिं राहू न शकते. जलाचा ईशनिर्मित स्वभावच असा आहे की दृश्यरुपाने द्रवरूपाने राहण्यास त्याला स्थलाचा आधार लागतोच. अग्नि वायु आणि आकाश यांच्या आधाराने जळ कधीं दृश्य जलरूपाने राहू शकत नाही. जिथे कुठे जल दिसत असेल तिथे त्याच्याखाली, तळाला जमीन भूमि असलीच पाहिजे. कोटियत्न केले तरि स्थलाच्या आधाराशिवाय जलाला इतर कुठेच ठेवता येणार नाही. मेघांत बाष्प रूपाने असते, पण त्या बाष्प कणांना जलबिंदूंचे रूप प्राप्त होतांच ते जलबिंदू भूमीच्या आश्रयाला येतात, खाली पडतात. मलिन होतात तरि येतातच खाली. (क) मोक्षसुख- मोक्ष = शुद्ध निर्भेळ नित्य सुख. सुख, मोक्ष आणि ब्रह्म हे समनार्थक शब्द आहेत. सच्चित् सुखधन म्हणजे ब्रह्म. मोक्ष म्हणजे ब्रह्माशिवाय इतर सर्व द्वैतभ्रमाचा विलय, म्हणजेच एकम् एव अद्वितीयम् ब्रह्म शिल्लक राहते. ते सुख स्वरूपच आहे. (ख) टिकुं न शके हरिभक्ति विना या- ही हरिभक्ति म्हणजे प्रेमभक्ती प्रेमयुक्त हरिभक्तीचा आधार नसेल तर मोक्षसुख टिकू शकत नाही. भक्तिरहित मोक्षसुखाला कोणी संरक्षक नसल्यामुळे काम क्रोधादि माया कटक त्या सुखाला खाऊन टाकते. 'मम बल भक्तां स्वबल तयानां। काम कोप हे रिपु

उभयानां।। हें जाणुनि पंडित मज भजती। ज्ञानलाभिं हि न भक्ती त्यजती' (३।४३।९-१०). (ग) खगराया- आकाशांत गमन करणाऱ्या पक्ष्यांचे तुम्हीं राजे आहात, तुम्ही आकाशांत खूप उंच व दूर जाऊ शकतां पण तुम्हालाही भूमीचा आश्रय घ्यावाच लागतो, तसेच मोक्ष सुख प्रेमभक्तीवाचून राहू शकत नाही. भक्तीचा असा अद्‌भुत महिमा असल्यामुळे.

हिं. *।अस बिचारि हरिभगत सयाने।मुक्ति निरादर भक्ति लुभाने।।७।।*
।भगति करत बिनु जतन प्रयासा।संसृति मूल अविद्या नासा।।८।।

म. *।हें समजुनि हरिभक्त सुज्ञ जे।मुक्ति अनाद्रिति भक्ति लुब्ध ते।।७।।*
।भक्ति करत यत्नां विण कष्टां।संसृतिमूल अविद्या नष्टा।।८।।

अर्थ- हें समजून जे शहाणे हरिभक्त असतात ते मुक्तीचा अनादर करुन भक्तीवर लुब्ध होतात.।।७।। (कारण) भक्ति करीत राहिल्याने यत्नांवाचून व कष्टांवाचून संसृतीचे मूळ जी अविद्या ती नष्ट होते.।।८।।

टीका. चौ.७ (१) हें समजुनि- भक्ति असेल तेथे मुक्ति पाया पडत पाठीस लागते, आणि भक्ति नसेल तेथे मोक्षसुख राहू शकत नाही हे समजुन याने ठरले की मोक्षसुख भक्तीवर अवलंबून आहे. म्हणजे भक्ति सुलभ आणि मोक्षसुखापेक्षा श्रेष्ठ सुख देणारी आहे मग त्या मोक्षाची आवश्यकताच कुठें राहिली? विनाकारण मोक्षासाठी व ज्ञानासाठी श्रम करण्यांत काय अर्थ आहे असा निश्चय करुन. (क) हरिभक्त सूज्ञ- आपले हित परमहित अहित कशांत आहे हे जाणणारे ते सूज्ञ. ते मुक्ति अनाद्रिति = मुक्तीचा अनादर करतात, आदर वाटत नाही, व ती जवळ आली तरि तिच्याकडे बघत नाहींत आणि भक्तीचाच त्यांना लोभ सुटलेला असतो. लोभी जसा धनावर लुब्ध होतो ते अधिक साठवीत राहतो, त्याप्रमाणे रामप्रेमधन व रामभजनरुपी संपत्ती अधिकाधिक वाढविण्यातच धन्यता मानतात. केवळ ज्ञानमार्गी साधकांची संगति तो टाळतो. भक्ति शास्त्राचेंच श्रवण करतो.

चौ. ८ (१) भक्ति करत.... अविद्यानष्टा- जन्ममरणाला कारणीभूत आहे. अविद्या. 'एक दुष्ट जी सुदुःखरूपी। जीवश जीव पडे भवकूपी' या

अविद्यामायेचा नाश ज्ञानमार्गाने अनंत कष्ट करुन होत नाही. पण भक्ती करीत राहिल्याने काही यत्न न करतां व कष्ट न पडतां अविद्येचा नाश होतो. का होतो याचे कारण 'व्यापि न हरिसेवका अविद्या' 'विण हरिभजन नाश ना क्लेशां' (८९।५) 'भवभयनाश न हरिभजनाविण' (९०।८) 'सानुकूल भक्तिस रघुराया। म्हणुनि घाबरे तिज अति माया (अविद्या) ज्याच्याजवळ भक्ति असेल तया बघुनि माया संकुचते। प्रभुता कार्य न निज करुं शकते' (११६।५,७) ज्याच्याजवळ भक्ती आहे त्याच्याजवळ अविद्या जातच नाही. म्हणून तिला नष्ट करण्याचा प्रयत्न व कष्ट पडत नाहीत. त्याच्याजवळ अविद्या येत नाही म्हणून मोक्ष जबरीने येतो आणि ज्ञान्याचा ज्ञानदीप मालविण्याला अविद्या त्याच्या हृदयांत शिरते म्हणून मोक्ष तेथे रहात नाही. (क) येथे असे वाटेल कीं प्रपंचातील सर्वांच्या वरची ममता काढून ती रामचरणीं लावणे म्हणजे प्रेमभक्ती, असा सिद्धांत आहे. हे घडण्यास तीव्र वैराग्य पाहिजेच व वैराग्य प्राप्त होण्यासाठी प्रयत्न व कष्ट करावे लागणारच. यावर आता सांगतात.

हिं. ।भोजन करिअ तृपिति हित लागी।जिमि सो असन पचवै जठरागी।।९।।
।असि हरि भगति सुगम सुखदाई।कोअस मूढ न जाहि सोहाई।।१०।।

म. ।तृप्ति-हिता-स्तव करिति भोजना।पचवि जसें जठरानल अशना।।९।।
।तशि हरिभक्ति सुगम सुखदाती।कोण असा जड न रुचे ज्या ती।।१०।।

अर्थ- तृप्तीसाठी व हितासाठी भोजन करतात पण ते अन्न जठरानल जसें पचवतो तशी हरिभक्ती सुगम आहे आणि सुख देणारी आहे. असे असून असा कोण मूढ (जड) असेल की ज्याला ती आवडत नाही?।।९-१०।।

टीका. चौ.९ (१) तृप्ति-हिता-स्तव करिती भोजना- पोट रिकामे झाले की अति गुंतागुंतीच्या व अद्‌भूत अशा शरीर यंत्राला अन्नाची आवश्यकता भासू लागली की जठरांतील अग्नि प्रदीप होतो व पोटात आग झाल्यासारखे वाटून काहीं तरि खावे असे सहज वाटूं लागते व एक प्रकारची अतृप्ति उत्पन्न होते हिलाच भूक लागणे असे म्हणतात. भुकेच्या वेळी अन्न शरीरांत न गेल्यास जठरांतील वैश्वानर नावाचा अग्नि शरीरातील विविध रसांचे शोषण करु लागतो असे घडणे हितावह नसते म्हणून भोजन करण्यांत दोन तीन मुख्य हेतु

असतात. १) क्षुधा शान्ति, क्षुधेने उत्पन्न झालेले असमाधान, अतृप्ति दूर करणे म्हणजे तृप्ति व शरीराचे हित करणे. भोजन करतांना प्रत्येक घासाला क्षुधाशान्ति व तृप्ति अंशतः होतच असते. शरीराचे हित म्हणजे पोषण प्रत्येक घासा घासाला केले जाते पण ते तत्काळ दिसत नाही. (क) पचवि जसे जठरानल अशना- त्या अन्नाचे पचन जठराग्नि करतो व नंतर त्या अन्न रसाचे रक्त मांस वगैरेत रूपांतर करण्याचे कार्य शरीरातील भिन्न भिन्न यंत्रे आपोआप करतात. त्याच्यासाठी मनुष्याला प्रयत्न, कष्ट करावे लागत नाहीत. मनुष्याने सुखदायक व संतोषकारक वाटणारे अगदीं सोपे असे भोजनाचे म्हणजे अन्नजल ग्रहणाचे कार्य वेळच्या वेळी व्यवस्थितपणे व प्रेमाने केले की पुढील शरीर पोषणाचे व शरीर वृद्धीचे कष्टांचे व किचकट कार्य आपोआपच घडते. भोजन करण्यांतही काही कष्ट असतात असे नाही.

चौ.१० (१) तशि हरिभक्ति- जसें भोजन करावयाचे तसेच भजन वेळच्यावेळी व्यवस्थितपणे आवडीने केले की भगवत्प्रेम, आत्मानुभव व त्याला लागणारे वैराग्य या गोष्टी आपोआपच सहज सिद्ध होत जातात. त्याच्यासाठी भजन करणाराला कोणतेच कष्ट व प्रयत्न करावे लागत नाहीत. या अर्थाचा एक श्लोक श्रीभागवतात आहे. 'भक्तिः परेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष त्रिक एककाले।। प्रपद्यमानस्य यथाश्नतःस्युः तुष्टिः पुष्टिः क्षुदपायोऽनुघातम्' (भाग. ११।२।४२) भक्ति = भगवत्प्रेम, परेशानुभव = परंब्रह्मानुभव व विरक्ति हे त्रिक एकाकाळींच घडते. जो भगवंताला शरण जाऊन भजन करतो त्याच्या ठिकाणी (प्रपद्यमानस्य) त्याला या तीन गोष्टी सहज प्राप्त होतात. भोजन करणाराला तुष्टि, पुष्टि व क्षुधाशान्ति या तीन गोष्टी जसा प्राप्त होतात तसेच हे घडते. (क) सुगम सुखदाई- भोजन करणे जसे सोपे, सुखदायक आनंददायक आहे तशीच हरिभक्ती म्हणजे हरिभजन करणे सुगम व सुखदायक आहे. ८९।५-८ या चार चौपायांची टीका पाहावी. हरिभजनाने प्रेमभक्ति कशी मिळते याचा क्रम अगदी थोडक्यांत दाखविला आहे. ल.ठे. येथे हरिभक्ति 'सुखदाई' असे म्हटले आहे सुखखाणी म्हटलेले नाही.

(२) 'कोण असा जड न रुचे ज्यासी' जड = मूढ, मूर्ख. 'विषयि जनांसहि हरिगुण आगर। श्रवण सुखद हृदया प्रसन्नकर' (७।५३।४) असे वाटते.

विषयीजनानां सुद्धा हरिभजन, हरिगुणकथाश्रवण आवडत नाही असे नाही, पण 'सहजशील कीं हे पाप्यांचें। सदा वावडे मम भजनाचें' (५।४४।३) असे श्रीराम वचन आहे. 'आत्मघातकी जीव मूर्ख ते। ज्यानां रघुपति कथा न रुचते' (७।५३।५) रघुपतिकथाश्रवण करणे म्हणजे हरिभजन करणेंच आहे. हरिभक्ति = हरिभजन करणे कोणाला रुचत नाही याचे उत्तर वरील दोन अवतरणांत आहे. आतां या भक्ति चिंतामणीच्या प्रस्तावनेचा उपसंहार करतात.

हिं.दो. ।सेवक सेव्य भाव बिनु भव न तरिअ उरगारि।।
।।भजहु राम पद पंकज अस सिद्धान्त बिचारि।।११९रा.।।

म.दो. ।सेवक सेव्य भाव विण भव तरण न उरगारी।।
।।भंजा राम पद पंकजा या सिद्धान्त विचारिं।।११९रा.।।

अर्थ- अहो उरगारि! (गरुड) मी सेवक असून भगवान सेव्य (स्वामी) आहेत अशा भावा वाचून भवसागर तरुन जाणे शक्य नाही. या सिद्धान्ताच्या विचाराने (विचार करुन) श्रीरामचरणकमलांचे भजन करा. ।।११९रा.।।

टीका. (१) भाव- मनुष्याचें चित्त केव्हा कठिण असते होते तर केव्हा द्रवते. लाख किंवा मेण यांच्याप्रमाणे चित्ताच्या या दोन अवस्था असतात. स्वभावतः चित्त कठिण आहे. परंतु तापाच्या ऊष्णतेच्या संसर्गाने ते द्रवते. दया, करुणा, भय प्रीति इत्यादि चित्ताला द्रवित करण्यास समर्थ असतात. उत्तमप्रकारे विरघळलेल्या, द्रवित झालेल्या लाखेंत ती पातळ असतां जो रंग मिसळावा तो लाख घट्ट झाल्यावर सुद्धां तिच्यांत राहतो, त्या रंगाची ती साख होते, तसें चित्ताचे आहे. ज्या विकारांनी चित्त द्रवेल त्या विकाराचे संस्कार त्या वस्तूचे संस्कार लाखेंत रंगाप्रमाणे, चित्तात पडतात. 'यच्चित्तः तन्मयो भवति गुह्यमेतत्सनातनम्' (श्रुति). ज्याचे जसे चिंतन करावे तसा तो होतो. याचे कारण चित्ताचा वर दाखविलेला स्वभाव हे आहे. द्रवीभूत चित्तावर जो विशेष रंग चढला, जो विशेष संस्कार उत्पन्न झाला त्याला भाव म्हणतात, भक्तिमार्गात दास्य, सख्य, गोपी, कान्ता, राधा इत्यादि अनेक प्रकारचे भाव असू शकतात, पण एका सख्यभावाशिवाय बाकी सर्व भावांत दास्य-सेवक-भाव कमी अधिक प्रमाणात असतोच.

(२) सेवकसेव्य भाव- कोणी सेव्यसेवकभाव म्हणतात, मी सेवक असून भगवान माझे सेव्य आहेत अशी जी चित्ताची भावना तो सेव्यसेवक भाव म्हणजेच दास्यभाव. भगवंतास भजकाने वडील भाऊ, पिता, माता, जावई इत्यादि मानले तरि त्या त्या नात्याने सेवकत्व असतेच. या भावानेच श्रीरघुपतीचे नाम, गुण, चरित्र, धाम, कीर्ति, स्वभाव, प्रभाव इत्यादींच्या चिंतनाने चित्त द्रवू लागते, व त्या त्या गुणांची छाप चित्तावर पडू लागते. 'नाथ! तवाहं' 'नारायण तव दासोऽहं' ही भावना प्रारंभी असणे जरुर आहे. ही सेव्य सेवकभावाची भाषा आहे. पुढे संबंध दृढ होताच 'राम माझा मी रामाचा' ही भावना सहज उद्भवते. प्रेमाची वृद्धि होता होता रामरूपगुणादिकांची छाप चित्तावर पक्की पडून प्रेमोन्मत्त वा प्रेममग्न होऊ लागल्यावर 'दासोऽहं' मधील 'दा' गळून पडतो व 'सोहं भावना' 'रामोहं भावना' जागृत होते. 'सदा रामोहमस्मीति तत्त्वतः प्रवदन्ति ये। न ते संसारिणः नूनं राम एव न संशयः' (रा.उ.उ.) अशी दृढभावना झाली कीं ते भवसागर तरुन गेलेच. 'देहबुद्ध्या तु दासोऽहं, जीवबुद्ध्या त्वदंशकः आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इति मे निश्चलामतिः' असे हनुमंताने श्रीरामचंद्रांस सांगितले आहे, परंतु जोपर्यंत देहबुद्धी निःशेष होत नाही, झाली नसेल, तोपर्यंत सोऽहं रामोहं असे नुसते तोंडाने म्हणण्याने मिथ्या अहंकार मात्र वाढेल, म्हणून प्रारंभी सेव्यसेवक भाव पाहिजेच. तो आपोआपच गळून तादात्म्य भावना सहज उत्पन्न होईल तेव्हा होईल.

(३) भवतरण न- सेव्य सेवकभाव भवतरणाचे मुख्य साधन आहे. ज्ञानमार्गातही सेव्यसेवकभाव लागतोच, कारण सद्गुरुसेवा करावी लागतेच. केवलाद्वैती ज्ञानमार्गात सुद्धां 'यावज्जीवं त्रयो वंद्या वेदान्तो गुरुईश्वरः' (श्रुति) वंदन आहे तेथे दास्यभाव आहेच. 'भावाद्वैतं गुरोरग्रे क्रियाऽद्वैतं न कारयेत्' (श्रुति) म्हणून सेव्यसेवकभावाशिवाय भवसागर तरून जाता येत नाही हा सिद्धात निरपवाद आहे. (क) या सिद्धान्तविचारि- सेव्यसेवकभावाशिवाय भवतरणोपाय नाही हा जो सिद्धान्त सांगितला त्याचा विचार करा आणि (ख) भजा राम पद पंकजा सेवकभावाने रामचंद्रांस शरण जाऊन सेवक भावाने रामभजन करा हेच सांगणे आहे. असे केलेत तरच उरांत गमन करणारे संशयमोह काम क्रोधादि उरग यांचे अरि श्रीराम कृपेने राहू शकाल. आता रामप्रभाव सांगतात.

हिं.दो. ।जो चेतन कहँ जड करइ जडहि करइ चैतन्य।।
।।अस समर्थ रघुनायकहि भजहिं जीव ते धन्य।।११९म.।।

म.दो. ।चेतनास जो करी जड जडा करी चैतन्य।।
।।अशा समर्थ रघुपतिसि भजति जीव ते धन्य।।११९म.।।

अर्थ- जो चेतनाला जड करतो व जडाला चेतन करतो अशा समर्थाला रघुपतीला (रघुनायकाला) जे भजतात ते जीव धन्य होत.।।११९म.।।

टीका. (१) चेतनास जो जड करी- रामप्रभाव असा आहे की त्यांच्या मदन दर्प विमर्दक रूपाचे ध्यान करण्याने चेतन प्राणी जडवत अचल होतात. 'मार्गिच अचल बनुनि मुनि बसले।। राम जागविति बहुपरिं मुनिला।। ध्यानसुखें येत न जागृतिला' (३।१०।१५,१७) चेतनाला जड करण्याचा हा एक प्रकार झाला. (क) 'ईश्वर अंश जीव अविनाशी चेतन अमल सहज सुखराशी' जीव चेतन आहे व तो ईश्वराचा अंश आहे. तो जेव्हा अष्टधा प्रकृति जनित जड देहांत प्रवेश करतो तेव्हा तो ईश्वरांश सुद्धां सर्व प्राणी मात्रांच्या जड देहांना चेतनता देतो. 'जीवयति जडान् इति जीवः' व जेव्हा त्या चेतन देहांना सोडून जातो तेव्हा त्यांना अगदी जड करतो. मग अंशी परमेश्वर रघुनाथ चेतनांना जड व जडांना चेतन करतील यात नवल काय? १।११७।५-६ पहा. (ख) माया जड आहे, पण ती शिवचतुराननांना सुद्धा नाचविते व ब्रह्मांड रचना करते तो राम प्रभावच 'यत्सत्यत्वें जड जी माया। गमे सत्य इव मोहसहायां' जीव ईश्वरांश चेतन अमल असून मायेला वश झाला व शुकमर्कट सम बंधनिं पडला. असे सर्व जीव पशुवत जड झाले आहेत. हा दुसरा प्रकार झाला.

(२) जडा करी चैतन्य- असे जे जड मूढ झाले जीव त्यांच्यावर रघुनायक कृपा झाली की ते चेतन = ब्रह्म होतातच. अहल्या जड शिला होती तिला चेतन केलीच. (क) भाव हा आहे की ज्यांचा असा प्रभाव आहे ते आपल्या कृपेने जीवाच्या हृदयांतील जड चेतन ग्रंथि सोडतील यात नवल काय? (ख) अशा समर्था.... ते धन्य- 'ते धन्य तुलसीदास आस विहाय हरिरंगी रत' (३।४६।छं.) म्हणून सर्व आशा सोडून भजति असा अर्थ घेणे जरुर आहे. 'धन्यास्ते कृतिनः पिबंति सततं श्रीरामनामामृतम्' (४।मं.श्लो.) 'धन्य कोण' हे

प्रकरण प्रस्तावनेंत पाहावे. (पृ.५२७)

सूचना- येथपर्यंत भक्तिचिंतामणी प्रकरणाची प्रस्तावना केली. आतां १९ चौपाया व दोन दोहे (दो.१२०) यांत भक्ति चिंतामणी प्रकरणांचे सुंदर वर्णन आहे. ज्ञानदीप व भक्तिचिंतामणी हे दोनच शब्द ज्ञान व भक्ति यातील फरक सहज दाखवितात.

श्रीमानस गूढार्थ चंद्रिका उत्तरकाण्ड अध्याय १४वा समाप्त.

अध्याय १५वा

हिं. *।कहेउँ ग्यान सिद्धान्त बुझाई।सुनहु भगति मनि कै प्रभुताई।।१।।*

म. *।समजाविला ज्ञान-सिद्धान्त।भक्तिमणी-प्रभुता श्रुणु तात!।।१।।*

अर्थ- ज्ञानसिद्धान्त समजाऊन सांगितला हे तात! भक्तिमण्याची प्रभुता ऐका!।।१।।

टीका. (१) ज्ञानसिद्धान्त- ज्ञानाने भवसंभव खेद नष्ट होतो हे खरे असले तरि 'सेवक सेव्यभाव विण भवतरण न उरगारि' हा सिद्धान्त मागल्या दोह्यांत समजाऊन सांगितला. 'ज्ञानाचा पथ कृपाण-धारहि' (११९।१) पासून ११९ पर्यंत ज्ञानसिद्धान्त सांगून सेव्यसेवकभावानें भक्तीची आवश्यकता दाखवून भक्तीची श्रेष्ठता सिद्ध केली. (क) प्रेमभक्तीला मणि = चिंतामणी म्हटले आहे. का म्हटले आहे हे पुढें दिसेल. प्रभुता = सर्व समर्थता. रघुपति प्रभु आहेत. त्यांची प्रभुता पूर्वी वर्णन केली. आतां भक्तीची प्रभुता प्रभाव महिमा चिंतामणीरुपकाने वर्णन करतील.

हिं. *।रामभगति चिंतामनि सुंदर।बसइ गरुड जाके उर अंतर।।२।।*
।परम प्रकास रूप दिन राती।नहिं कछु चहिअ दिआ धृत बाती।।३।।

म. *।रामभक्ति चिंतामणी सुंदर।वसे गरुड! ज्याचे हृदयांतर्।।२।।*
।परम प्रकाशरूप दिन राती।काहिंच नको दिवा धृत वाती।।३।।

अर्थ- रामभक्ति हा सुंदर चिंतामणी आहे, गरुडा! हा ज्या कोणा (परम भाग्यवंता)च्या हृदयामध्ये वास करतो.।।२।। तो (परम भाग्यवान प्राणी) रात्रंदिवस परम प्रकाशरुप असतो, कारण की (हा चिंतामणी) रात्रंदिवस परम प्रकाशरूप असतो याला दीपपात्र (दिवा-पणती) तूप वाती वगैरे साधनसामुग्रीची मुळीच आवश्यकता नाही.।।३।।

टीका. चौ.२ (१) रामभक्ती = रघुपति (रघुनायका)ची भक्ति. 'अशा समर्था रघुपतिसी भजति जीव ते धन्य' (११८म.) असे नुकतेच म्हटले. (क)

चिंतामणी सुंदर- राजसी तामसी देवतांची भक्ति मणी आहे, पण सुंदर म्हणजे आदरणीय नाही. परमात्म्याची भक्ति आदरणीय चिंतामणी आहे. 'नामचिंतामणीः कृष्णश्चैतन्यरसविग्रहः' (प.पु.) भगवंताच्या नामाला चिंतामणी म्हटले आहे. मग त्या नामाने प्राप्त होणाऱ्या प्रेमभक्तीला चिंतामणी म्हटले तर नवल नाही. यावरुन ठरले की हे रूपक तुलसीदासांचे कपोल कल्पित नाही. सुंदर = चित्ताला द्रव फोडणारा व आदरणीय (अ.ब्या.सु.). भगवान राम जिचा आदर करतात व जी भगवंताच्या हृदयाला द्रव फोडते अशी भक्ति आहे. 'वेगे जिनें द्रवें मी भाई। ती मम भक्ति भक्त सुखदाई' (३।१६।२) सुंदर = शोभामय. रत्नांचे अलंकार ते घालणारांची शोभा वाढवितात. तसा भक्ति चिंतामणी भक्ताची शोभा वाढवितो. भक्तिहीन नर शोभत नाही. 'भक्तिहीन नर शोभे कैसा। दिसे वारिविण वारिद जैसा' (३।३५।६) असे श्रीरामच म्हणाले आहेत. 'शोभे गिरि गिरिजा गृहिं येतां। रामभक्ति जन जसा पावतां' (१।६६।३) (ख) सर्व गुणांत सर्व श्रेष्ठ असल्यामुळे चिंतामणी म्हटले. मण्याच्या ठिकाणी १)जाती, २)पवित्रता, ३)मूल्य, आणि ४)सौंदर्य हे चार गुण पाहवे लागतात. 'मणिगण सुजाति पुर नारी नर। सर्वपरीं शुचि अमोल सुंदर' (२।१।४) चिंतामणी या मृत्युलोकांत नाही. स्वर्गात चिंतामणी आहेत म्हणजे चिंतामणी स्वर्गीय दिव्य जाति = जात आहे, परम दुर्लभ आहे. शुचिता. पवित्रता = 'जाउनि रामभक्ति सुरसरिते। शरयु सुकीर्ती.....मिळते' (१।४०।१) रामभक्ति देवनदी गंगा आहे. 'परम पावन सुरसरी' गंगा परम पावन करणारी आहे, तशी = रामभक्ति परम पावन आहे. तिसरा गुण मूल्य-रामभक्ति- चिंतामणी आर्त जिज्ञासु अर्थार्थी यांना जे पाहिजे ते देतो. ज्ञान्यांचे ज्ञान रक्षण करुन त्यांना मोक्ष देतो आणि 'भक्ति अवशा वश करी' (३।२६ छं.) ज्याला मोक्ष नको असेल त्याला, अवश असलेले भगवान वश होतात, अशा चिंतामणीचे मूल्यमापन करणे अशक्य. जी आपल्या सौंदर्याने भगवंताच्या हृदयाला वेगाने द्रवविते तिचे सौंदर्य कोण वर्णन करणार? 'वेगे जिने द्रवें मी भाइ। ती मम भक्ति....' 'निरुपम निरुपाधिक हरिभक्ति' या प्रमाणे चारी गुणांत रामभक्ति चिंतामणी अनुपम आहे.

(२) वसे हृदयांतर = हृदयांतर् हृदयांच्या आत. रामभक्ति हृदयांत वास करुन राहिली पाहिजे. हृदय रामप्रेममय झाले पाहिजे. बाह्य चिन्हांची काही

..मत नाही. भक्ति स्थिर, अव्यभिचारीणी आणि अनपायिनी पाहिजे. ती जर सदा सर्वकाळ अबाधित राहिली तर मधेंच 'भवचिंता मनिं' उत्पन्न होणारच नाही. प्रेमभक्तीचीं लक्षणे पूर्वी अनेक ठिकाणी वर्णन केली आहेत, ३।१६।११-१२ व दोहा टी.पहा. (क) ज्ञानदीप आर्त जिज्ञासु अर्थार्थी यांना पाहिजे असलेले देऊ शकत नाही, भगवंताला तो वश करु शकत नाहींच, पण नुसता ज्ञानदीप ज्याच्याजवळ असेल तो रघुनाथास प्रिय वाटत नाही. 'भक्तिहीन तो प्रिय नहिं मजला' (७।४५।४) म्हणजे ज्ञानदीप कवडीमोल ठरला. त्याची जात सुद्धा लौकिक, सौंदर्य नाही, फक्त घृतदीप गाईच्या तुपाचा असल्याने पवित्र आहे. पण परम पवित्र नाहीच, कारण घृतदीपाचा धूर निघतोच.

चौ.३ (१) परम प्रकाशरूप- ज्ञानदीप तेजोराशि आहे, पण परम प्रकाशरुप नाही, कारण ज्ञानदीप मालवला जाऊ शकतो, पण चिंतामणीचा परम प्रकाश कशानेही कमी सुद्धा होत नाही, धूर नाही, काजळी येत नाही. राम स्वतः परम तत्त्व आहेत, परमप्रकाशक आहेत, सहज प्रकाशरूप आहेत. 'सर्वा परम प्रकाशकर जे। राम अनादि अयोध्याधिप ते' (१।११७।६) 'सहज प्रकाशरूप भगवाना' (१।११६।६) असे राम असल्याने रामभक्तिमय झालेले हृदय सुद्धा परम प्रकाशरूप होते. भक्तिचिंतामणी ही परम प्रकाशरूप आहे. (क) दिनराती- दीपाचा प्रकाश कितीही मोठा असला तरि दिवसा त्याचे अस्तित्व सुद्धा कळत नाही. रात्रीच फक्त तो प्रकाश देऊ शकतो. 'दीप तेज जसे दिवस उगवतां' नष्ट होते (१।२६३।५) चिंतामणीचा प्रकाश दिवसा सुद्धा कमी होत नाही. तसा भक्ति चिंतामणी रात्रंदिवस परम प्रकाशरूप असतो. ज्ञानरुपी दिवस उगविल्यावर सुद्धा त्याचा प्रकाश मंद होत नाही. (ख) काहिंच नको दिवा धृत वाती. ज्ञानदीप पेटवून ठेवण्यास सात्विक श्रद्धा धेनु घरांत आल्यापासून वैराग्य लोणी मिळेपर्यंत कितीतरी साधनपरतंत्रता आहे. त्याचे तूप करण्यात योगाग्नि पाहिजे तेव्हा तूप मिळेल. नंतर दीपपात्र, ठाणवई, कापूस, वात, ती पेटवणे इत्यादि कितीतरी साधने लागतात. भक्तिचिंतामणी स्वतंत्र आहे. 'भक्ति स्वतंत्र सबसुखदानी' (७।४५।५) 'ती स्वतंत्र अवलंब आन नहि। ज्ञान अधीन तिच्या विज्ञानहि' (३।१६।३) अशी भक्तीची प्रभुता आहे. सुचविले की ज्याच्या हृदयांत भक्ति राहील त्याला ज्ञानविज्ञान प्रकाशाची प्राप्ति आपोआप सहज होते. ११९।८-१० चे सारच सुचविले.

हिं. *।मोह दरिद्र निकट नहिं आवा।लोभ बात नहिं ताहि बुझावा।।४।।*
।प्रबल अविद्या तम मिटि जाई।हारहिं सकल सलभ समुदाई।।५।।

म. *।निकट मोह दारिद्र्य येत ना।त्याला विझवी लोभ वात ना।।४।।*
।प्रबल अविद्या तिमिर नासतो।सकल शलभ समुदाय हारतो।।५।।

अर्थ- मोहरुपी दारिद्र्य या भक्तिचिंतामणीच्याजवळ येत नाही, त्याला लोभ (विषय लालसा) विझवू शकत नाही.।।४।। प्रबल अविद्यारुपी अंधकार विनाश पावतो आणि सगळा शलभांचा (पतंगांचा) समूह हार खातो.।।५।।

टीका. चौ.४ (१) मोह दारिद्र्य- मोह = अज्ञान, भ्रम, संशय हेच दारिद्र्य. धन संपत्ति इत्यादींचा अभाव म्हणजे दारिद्र्य. 'मुनि धन जन सर्वस्व शंभु असु' (१।१९८।२) असे जे श्री रघुनाथ ते मोहाच्या जवळ नाहींत म्हणून मोह हे दारिद्र्य ठरले. 'पुनर्दरिद्री पुनरेव पापी' धनसंपत्ति विहीन झाला कीं स्तेय = चोरी करण्याची दुर्बुद्धी होते, 'मान मोह मद मत्सर तस्कर' (७।३१।६). रामराज्य असले की 'कुठें न चाले यांचे हुन्नर' पण केवळ ज्ञानमार्गांत राम राज्य नसते, हृदयांत रामप्रताप नसतो, त्यामुळे तेथे आपले हुन्नर चालविण्यास यांना जोर येतो. मोह सर्व दुःखांचे संसृतीचे मूळ आहे. 'दारिद्र्यासम जगीं दुःख ना' (१२१।१३) 'मोह सकल रोगांचे मूळ हि' (१२१।२९). भवरोगाचे मूळ मोह अज्ञान आहे. (क) निकट येत ना- मोह जवळ न येण्याचे कारण तात्त्विक आहे. जगांत जे ममतेचे धागेदोरे होते ते काढून त्याची घट्ट दोरी वळून तिने मन रामचरणी घट्ट बांधलेले आहे. मन रामचरण सोडून कोणत्याच विषयाकडे जात नाही, म्हणून मोह जवळ येत नाही. रामचंद्रांचा निवास हृदयांत असल्यामुळे हि तो हृदयांत प्रवेश करण्यास भितो. ज्ञानदीपाच्या जवळ तो जाऊ शकतो.

(२) लोभवात- 'ऋद्धिसिद्धी बहु दे बा! धाडुनि। मतिला प्रलोभ दाविति येऊनि' (११८।७) असा ज्या लोभाचा उल्लेख ज्ञानदीपांत केला तोच लोभ = प्रलोभ येथे घेणे योग्य आहे. ऋद्धिसिद्धिनी मिळणाऱ्या ऐश्वर्यादि विषयांची लालुच, हा वारा ज्ञानदीपाच्या ज्योतीला विझवू शकतो, पण चिंतामणीच्या

प्रकाशावर प्रभंजनाचा सुद्धा काहीं परिणाम होऊच शकत नाही. दाखविले की अशा भक्ताच्या ठिकाणी परम विराग गुलाम झालेला असतो. 'म्हणती तात तो परम विरागी। तृणसम सिद्धी त्रिगुणां त्यागी.' (३।१५।८) ज्याला अष्टमहासिद्धींची सुद्धा इच्छा उत्पन्न होत नाही त्याला इतर विषयांचा लोभ उत्पन्न होणार नाही हे सांगण्याची आवश्यकताच नाही.

चौ.५ (१) प्रबल अविद्यातिमिर नासतो- ज्ञानदीपांत 'प्रबल अविद्येच्या परिवारा। नाश तमा मोहादि अपारा' असे म्हटले. हा अविद्यापरिवाराचा तम जवळ येऊ शकत नाही असे येथे आधींच सांगितले आहे. मायेने अविद्येने पाठविलेल्या ऋद्धिसिद्धीनां ज्ञानदीप विझविता आला नाही तर मग अविद्यामाया 'कळ बळ छळ करि समीप जाते। विझवी दीपा अंचल बातें' (११८।७) तशीच येथे ऋद्धिसिद्धींच्या प्रलोभाची सूचना-चर्चा आधीं करुन नंतरच अविद्येचा उल्लेख केला. ज्ञानदीपाची ज्योत वाऱ्याने विझविता येते, पण चिंतामणीला तशी पदराच्या वाऱ्याने विझविण्यासारखी ज्योतच नाही, म्हणून अविद्या प्रयत्न करुन बघते कशाला? अविद्या म्हणजेच तिमिर, अंधार. तिने या चिंतामणीच्या भोवती अंधार निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास तिचाच नाश होतो. भाव हा की अविद्या व अविद्या कार्य यांचा समूळ नाश होतो. हेच पूर्वी निराळ्या प्रकारे सांगितले आहे. 'निरुपम निरुपाधिक हरिभक्ति। सदा अबाधित हृदिं करि वस्ती।। तया बघुनि माया संकुचते। प्रभुता कार्य न निज करुं शकते' (११६।६-७). येथे अविद्येचा नाश सांगितला. अविद्या नाश होणे म्हणजेच ग्रंथि भेद होणे. 'आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिं इत्थंभूतगुणो हरिः' (भाग.) 'मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजन्ते' असे सर्वज्ञ भाष्यकार नृ.तापिनि भाष्यांत म्हणतात.

(२) सकल शलभ समुदाय हारतो- 'जळति मदादिक शलभ सब' असे ज्ञानदीपांत म्हटले आहे, म्हणून मदमत्सर ईर्षा असूया कपट दंभ पाखंड इत्यादि शलभ-पतंग, असा अर्थ घेणे जरुर आहे. प्रकाश दिसला कीं त्याच्यावर झडप घालणे हा पतंगाचा स्वभाव आहे. त्याप्रमाणे भक्तिचिंतामणीच्या प्रकाशावर हे पतंग झडप घालू लागतात, पण हा उष्ण प्रकाश नसल्यामुळे ते जळत नाहीत, पण उड्या घेऊन शेवटी हार खातात. भाव हा की

भक्तिचिंतामणीजवळ मदमत्सरादि येत नाहीत असे नाही, पण त्या प्रकाशाला नष्ट करु शकत नाहीत. 'तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधाभिमान दंभादिकं तस्मिन् एव करणीयम्' (ना.भ.६५) 'त्यजो न हा अभिमान चुकून मति। कीं मी सेवक रघुपति मम पति' (३।११।२१) असा वर सुतीक्ष्णाने मागितला आहे. हा मद त्यांच्याठिकाणी असतो, पण तो त्यांना बाधत नाही. श्रीमदाचार्य षट्पदीत म्हणतात 'नाथ! तवाहं न मामकीनस्तं' 'नाथ! मी तुझा आहे, तू माझा नाहीस' हृदयांत रामराज्य असल्याने हे मान मद मत्सर तस्कर असले तरि त्यांचे हुन्नर बंद पडते, उलट ते मित्र बनतात. आता कामक्रोधाविषयी सांगतील.

हिं. *।खल कामादि निकट नहिं जाहीं।बसइ भगति जाके उर माहीं।।६।।*
।गरल सुधासम अरि हित होई।तेहि मनि बिनु सुख पाव न कोई।।७।।

म. *।खल कामादि निकट ना वळती।ज्याचे हृदयिं भक्ति करि वसती।।६।।*
।गरल सुधासम अरि हित होती।त्या मणिविण सुख कुणि न पावती।।७।।

अर्थ- ज्याच्या हृदयांत हरिभक्ति वसती करते त्याच्यजवळ काम व क्रोध हे खल जात नाहीत.।।६।। त्याला विष अमृतासारखे होते व शत्रु हितकर्ते (मित्र) बनतात. त्या रामभक्ति चिंतामणी वाचून कोणी सुख पावूं शकत नाही.।।७।।

टीका. चौ.६ (१) खल कामादि- कामादि शब्दानें मानसांत काम, क्रोध व लोभ यांचा बोध होतो पण लोभाचा उल्लेख पूर्वीच केला गेला आहे. मोह व मदादि यांचाही उल्लेख केला गेला आहे, म्हणून येथे कामादि = काम व क्रोध, हे खल दुष्ट आहेत, नर्काची द्वारे आहेत. 'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशन मात्मनः। कामः क्रोधस्तथा लोभः' (भ.गी.) 'काम कोप मद लोभ सब नाथा! नरका पंथ' (५।३८) (क) निकट ना वळती- ज्याच्या हृदयांत भक्ति चिंतामणी असेल त्याच्याजवळ हे येत नाहीत. जोपर्यंत कामक्रोधाचे अस्तित्व हृदयांत असेल तोपर्यंत तेथे भक्ति चिंतामणी नाही असे ज्याचे त्याने ओळखावे. भक्तिजवळ हे न येण्याचे कारण 'विषयान् ध्यायतश्चित्तं विषयेषु विषज्जते। मामनुस्मरताश्चित्तं मय्येव प्रविलीयते' (वि.पु.) विषयांचे ध्यान करणारांचे चित्त विषयांत आसक्त होते, तसेच माझे (भगवंताचे) सतत स्मरण करणारांचे चित्त

गाझ्याच ठिकाणी पक्के लीन होते. (ख) येथपर्यंत भक्तीच्या प्रभुतेतील 'कर्तुं' शक्तीचे वर्णन केले. त्याचा उपक्रम 'रामभक्ति चिंतामणी सुंदर। वसे गरुड! ज्याचे हृदयांतर' (चौ.२) ने केला आहे. आतां अन्यथा कर्तुं = उलट करण्याच्या शक्तीचे निदर्शन करावयाचे आहे म्हणून येथे म्हटले की 'ज्याचे हृदयिं भक्ति करि वसती.' भक्ति सतत हृदयांत राहिली पाहिजे, हृदय भक्तिमय झालेले पाहिजे. ही सूचना वारंवार दिली जात आहे. भक्तीचा प्रभाव जगांतील इतर पदार्थांवर पडून स्वभावाविरुद्ध गोष्टी कशा घडतात पहा.

चौ.७ (१) गरल सुधासम- गरल = जलाल विष. 'विष करि नाशा' मृत्यु आणणे, दुसऱ्यांना ठार मारणे हा विषाचा स्वभाव आहे. परंतु ज्याच्या हृदयांत रामभक्तीने निवास केला त्याच्या बाबतींत विष आपला स्वभाव, मारक धर्म, सोडून तारक बनते. विष अमृतासारखे होते. मीरा व प्रल्हाद यानां त्याच्या जनकांनी जालीम विष प्यावयास दिले, पण काया झाली लखलखीत. 'विषमप्यमृतं क्वचित् भवेत्। अमृतं विषयीश्वरेच्छया' 'काळकुटें फळ सुधा समर्पित' (१।१९।८) 'गरल सुधा अरि करिति मित्रता। गोपद सिंधु अनल शीतलता। गरुड! सुमेरु रेणुसम त्यासी। राम कृपायुत बघती ज्यासी' (५।५।२-३) यातील बाकीच्या गोष्टी येथे गृहीत धरणे जरुर आहे. हा राम प्रभाव पूर्वी वर्णिला आहे. तोच येथे भक्तीचा प्रभाव दाखविला. जड वस्तूंचा स्वभाव बदलण्याची ही भक्तीची प्रभुता दाखविली. (क) अरि हित होती- शत्रु मित्र, हितकर्ते बनतात. ते अहितासाठी जे करतात त्याने हित होते. 'मुनि शापा वदले उत्तम केले। परम अनुग्रह गमे मला' (१।२११।३). बिभीषणास रावणाने लाथा मारुन हाकलून दिला तर त्याचे परम हित झाले. निंदक वंदक बनतात. चेतनांच्या स्वभावात सुद्धां परिवर्तन होते हे दाखविले. ज्ञानदीपाचा प्रभाव असा नाही. (ख) 'त्या मणिविण सुख....पावती'- तो मणि = 'रामभक्ति चिंतामणी सुंदर' जवळ असल्याशिवाय, हृदयांत वस्ती करुन राहिल्याशिवाय कोणाला कुठेहीं सुख मिळत नाही, मिळणार नाही. 'श्रुणु खगेश हरिभक्ती त्यागिति। अन्य साधनीं सुख जे इच्छिति।। ते शठ, महासिंधु विण तरणी। तरुनि पार कांक्षिति, जड करणी' (११५।३-४) यात जे सांगितले तेच या चरणाने सांगितले. 'जो आनंदसिंधु सुखराशी। त्रिजगी पावे लवे सुखारी' (१।१९७।५) असे जे रामचंद्र त्याच्या चरणी चित्त लीन झाले तरच सुख मिळते

कारण ते आनंदसिंधु सुखराशिमय होते, आणि 'जाणे त्याचे तोच सुख परानंद संदोह' (७।४६) 'वैर न विग्रह भीति न आशा। सुखमय तया सदा सब आशा (दिशा)' 'पावती' पावणे = मिळणे, प्रयत्न न करता सहज मिळणे किंवा कोणी दिल्यामुळे मिळणे. विषयांत सुख नाही, त्यामुळे ते सुख देऊ शकत नाहीत. त्यांच्यापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न, कष्ट केले तरि 'सुख सुख म्हणतां हे दुःख ठाकोनि आले.' संसृति दुःख विशेषच पाठीस लागते. 'मोक्ष सकल सुखखाण' (८३) असल्याने मोक्षखाणीतून प्रयत्न करुन सुख मिळवावे लागते. मोक्ष सकल सुख दाता नाही व ते कष्टानी मिळवावयाचे सुख भक्तीशिवाय टिकत नाही पण 'तशि हरिभक्ति सुगम सुखदाती' (११९।१० टी.प.) आहे. दाता भेटल्यावर मिळविण्याचे कष्ट करावे लागत नाहीत. आता भक्तीच्या अकर्तुं शक्तीची उदाहरणे देतात.

हिं. *।ब्यापहिं मानस रोग न भारी।जिन्हके बस सब जीव दुखारी।।८।।*
।राम भगति मनि उर बस जाकें।दुख लवलेस न सपनेहुँ ताकें।।९।।

म. *।व्यापिती मानस रोग न भारी।ज्यावश जीवां दुःखे सारीं।।८।।*
।रामभक्ती मणि ज्या उरिं राही।दुःखलेश त्या स्वप्निंही नाहीं।।९।।

अर्थ- ज्यानां वश झाल्यामुळे (ज्यांच्या योगानें) जीवानां सर्व दुःखे भोगावीं लागतात ते मानसरोग त्याला व्यापीत नाहीत.।।८।। रामभक्ती चिंतामणी ज्याच्या हृदयांत राहतो त्याला स्वप्नांत सुद्धा दुःखाचा लेश ही नसतो (मुळीच दुःख नसते.।।९।।

टीका. चौ.८ (१) भारी मानस रोग- शरिराला जसे मोठमोठे असाध्य (भारी) रोग होतात तसे जीवांच्या मनाला भारी रोग होतात. मानसरोगांचे अगदीं सविस्तर वर्णन पुढे सप्त प्रश्न गीतेत आहे. विषम व अयोग्य आहारविहारादिकांनी त्रिदोष कुपीत होऊन जसे शरिराला रोग होतात तसे वैराग्य ज्ञानभक्ति यांच्या अभावामुळे मोह उत्पन्न होऊन कामक्रोधलोभादि अनेक रोग जीवानां व्यापतात. (क) भारी = असाध्य व पुष्कळ 'बहु असाध्य या व्याधि' (१२२रा.) एकाच वेळी प्रत्येक व्यक्तीला जितके मानस रोग झालेले असतात तितके पुष्कळ देह रोग कोणालाच होत नाहीत. देहरोग निदान देहाच्या

मरणाबरोबर तरि मरतातच. पण मानसरोग लिंगदेहाला झालेले असल्याने ते स्थूल देहाच्या मरणाने मरत नाहीत. जन्मजन्मांतरांत ते लिंग देहाच्या बरोबर असतातच. रामभक्ति चिंतामणी ज्याच्याहृदयांत राहतो त्याला कामक्रोध लोभमदमत्सरादि मानस रोग होत नाहीत. सर्व मानस रोगांचे मूळ मोह आहे आणि रामभक्ति चिंतामणीजवळ मोह जात नाही, काम क्रोध लोभ जवळ जाऊ शकत नाहीत, हे आधीच दाखविले आहे. (ख) ज्या वश जीवां दुःखे सारी- 'मोह सकल रोगांचे मूळ हि' आणि 'सर्व हि मोह निशे निजणारे' (२।९३।२) जन्माला आलेला जीव मोहाने व्याप्त होऊनच जन्मास येतो, त्यामुळे जन्मल्यापासूनच प्रत्येक जीवाला अनेक मानस रोगानीं व्यापलेला असतो. रोग दुःखदायक असतोच व सर्व दुःखाचे मूळ मोह आहे. सर्वच जीव नाना प्रकारच्या दुःखानी गांजलेले असतात आणि 'जन्म दुःखं जरा दुःखं मृत्यु दुःखं' तर फारच तीव्र असते. कोणी कितीही निरोगी धष्ट पुष्ट सुखी दिसला तरि त्याचे हृदय अनेक मानस रोगांनी व्यापलेले असतेच. म्हणून 'जगीं सर्व सुखी असा कोण आहे?' (समर्थ) असा प्रश्न विचारला तर हेच उत्तर द्यावे लागेल की *।।जिथे भक्तिचिंतामणी नित्य राहे।। प्रज्ञा।।*

चौ.९ (१) रामभक्तिमणि ज्या उरिं राही- 'सच्चिद्घन आनंद सुराशी। असुनि असा प्रभु हृदिं अविकारी। दुःख दैन्य जगजीवां भारी' (१।२३।६-७) निराकार ईश्वर हृदयांत असून सुद्धां जगांतील सर्वच जीव भारी दुःखी आहेत, तथापि रामभक्ति चिंतामणी जिथें असेल तिथें तो मोहाला व मानसरोगानां येऊच देत नाही. येथे अकर्तुं सामर्थ्य दाखविले. (क) दुःखलेश त्या स्वप्निहि नाही. दुःखाचे कारण मोह व मानस रोग आहेत. भक्तिचिंतामणीने त्यांचा पूर्ण अभाव केला. त्यांना जवळ सुद्धा येता येत नाही. त्यामुळे ज्याच्या हृदयांत भक्तिचिंतामणी राहतो त्याला लेशमात्र दुःख स्वप्नात सुद्धा नसते. त्याला दुःखदायक स्वप्नेच पडत नाहीत. भाद हा की स्वप्नांत सुद्धा मोह व मानसरोग हृदयांत प्रवेश करू शकत नाहीत, कारण की भक्ति चिंतामणी रात्रंदिवस परम प्रकाशरूप तेथे असतो. याप्रमाणे येथपर्यंत कर्तुं शक्ति, अन्यथा कर्तुं शक्ति व अकर्तुं शक्ति म्हणजेच भक्तिचिंतामणीची प्रभुता वर्णन केली, म्हणून

हिं. ।चतुर सिरोमनि तेइ जग माहीं।जे मनि लागि सुजतन कराहीं।।१०।।
।सो मनि जदपि प्रगट जग अहई।राम कृपा बिनु नहिं कोउ लहई।।११।।

।सुगम उपाय पाईबे केरे।नर हतभाग्य देहिं भटभेरे।।१२।।

म. *।चतुर शिरोमणि तेच किं जगतीं।मण्यासाठिं जे सुयत्न करती।।१०।।*
।प्रगट यदपि तो मणि जगिं आहे।राकृपेविण कोणि न लाहे।।११।।
।सुगम उपाय जरी पावाया।नर हतभागी उडविति पायां।।१२।।

अर्थ- जे या मण्यासाठी सुयत्न करतात तेच या जगांत चतुरशिरोमणी होत.।।१०।। तो मणि जरि जगांत प्रगट आहे (गुप्त नाही) तरी श्रीरामाच्या कृपेशिवाय तो कोणाला मिळत नाही.।।११।। हा मणि मिळण्याचा उपाय सोपा आहे, पण त्या उपायाला हतभागी, दुर्दैवी मनुष्य पायांनी उडवितात.।।१२।।

टीका. चौ.१० (१) चतुरशिरोमणि = चतुरांचा शिरोमणी. अल्प आयासाने महान फल प्राप्त होईल अशा उपायांचा जे अवलंब करतात ते चतुर. आर्त जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानासाठी भक्ति करणारे याना चतुर म्हटले आहे. 'रामभक्त जगिं चतुः प्रकारीं' 'नामाधार चहूं चतुरांप्रति' (१।२२।६-७) त्यानीं आपापल्या मनोरथपूर्तीसाठी साधन म्हणून भक्तीचा सुगम उपाय केला. पण जे भक्तीलाच साधन व भक्तीलाच साध्य (सिद्धि) मानतात ते चतुर शिरोमणी. आर्तादि चौघे भक्तीला साधन व मनोरथसिद्धीला साध्य मानतात, म्हणजे भक्तीचे महत्त्व आपल्या मनोरथापेक्षां कमी लेखतात. भक्ति हेच साधन व भक्ति हेच साध्य अशी ज्यांची दृढ भावना असते म्हणजे ज्यांना मोक्ष नको असतो ते भक्तीशिवाय इतर सर्व अगदीं तुच्छ लेखतात ते चतुरशिरोमणी. 'स्नेह रामपदिं सिद्धि साधन। हे मज दिसे भरतमतलक्षण' (२।२८९।८) 'अर्थ न धर्म न कामरुचि नको पद हि निर्वाण।। जन्म जन्म रति रामपदिं हे वरदान न आन' (२।२०४) अशी ज्यांची भावना असते ते चतुरशिरोमणी. तेच या जगांतील सर्व चतुरांत श्रेष्ठ. पण असे या जगांत फारच थोडे असतात. 'धर्मशील सुविरागी ज्ञानी। जीवन्मुक्त, ब्रह्मपर प्राणी।। याहुनि तो दुर्लभ सुरराया। रामभक्तिरत गत मदमाया।।' (७।५४।६-७) (क) मण्यासाठिं जे सुयत्न करती- रामभक्ति चिंतामणी साठीच जे प्रयत्न करतात ते चतुर शिरोमणी. विषयभोगांनी सुखासाठी प्रयत्न करतात ते शठ. (११५।३-४) भक्तीचा आश्रय न घेतां

ज्ञानासाठी प्रयत्न करतात ते जड (११५।१-२) आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी आपल्या मनोरथ सिद्धीसाठी भजन भक्ति करतात ते चतुर व ज्ञानासाठी व ज्ञान टिकविण्यासाठी जे साधन भक्ति करतात ते चतुर आणि प्रेमभक्ति मिळण्यासाठी जे सुयत्न करतात ते चतुर शिरोमणी.

(२) सुयत्न करती- उत्तम यत्न करतात. दक्षतापूर्वक, शास्त्रविहित मार्गानीं, संत संमत, व विशेषतः भागवत धर्म संमत प्रयत्न सतत करणे म्हणजे सुयत्न करणे. 'भक्ति स्वतंत्र सब सुखदानी। विण सत्संग न पावें प्राणी।। पुण्य पुंजविण भेट न संता।..... पुण्य एक जगिं समान आन न। मन कृति वचनिं विप्रपदपूजन' (७।४५) आणि 'शंकर भजन विना नर भक्ति न मम लभतात' (७।४५). हे भक्ति प्राप्तीचे सुयत्न स्वतः श्रीरघुनाथांनी सांगितले आहेत. शंकर भजन करीत विप्रसेवा केल्याने पुण्यपुंज तयार होतो त्याने संत भेटतात व संतांच्या कृपेनें प्रेमभक्ति मिळते. हा सर्वांत अगदीं सुगम उपाय आहे.

चौ. ११ (१) तो मणि- ज्याची प्रभुता 'रामभक्ति चिंतामणी सुंदर' (चौ.२) पासून 'दुःखलेश त्या स्वप्निंहि नाहीं' (चौ.९) पर्यंत वर्णन केली तो रामभक्ति चिंतामणी. (क) प्रगट जगिं आहे- भक्ति चिंतामणीच्या वर्णनाने वेदपुराणादि ग्रंथ भरले आहेत. 'नामचिंतामणीः कृष्णः चैतन्यरस विग्रहः। नित्यःशुद्धो बुद्धो मुक्तोऽभिन्नत्वान्नामनाभिनोः' (प.पू.) नाम चिंतामणी आहे, ते कृष्ण (राम) स्वरुपच आहे, चैतन्यरसाची मूर्तीच आहे. इ. नाम भक्तीचे एक अंग आहे, ते सुद्धा चिंतामणी आहे. 'रामचरित चिंतामणी चारु' (१।३२।१) मग भक्ति चिंतामणी असेल यांत नवल काय? चिंतामणी (रत्न) पृथ्वीतलावर कोणी पाहिला नाही, कारण तो प्रगट नाही. स्वर्गात प्रगट आहे आणि ग्रंथात त्याचे वर्णन आहे. भक्तिचिंतामणी असा गुप्त नाही. संतभक्तांच्या जवळ तो प्रगट आहे, त्याची प्रभुता संतभक्त चरित्रांत दिसते. (ख) रामकृपेविण कुणाहि लाभ न रामचंद्रांनी म्हटले आहे की 'विण सत्संग न पावे प्राणी' भाव हा आहे की 'विण हरिकृपा भेट नहिं संता' 'भेटति संत विशुद्ध तयाला। राम कृपें अवलोकिति ज्याला' (७।६९।७) 'द्विजसेवा हे व्रत हरितोषण' 'त्यजुनि कपट तनु मन वचनिं जो भूसुर सेवील। मी विधि शिव सुर सर्वही त्याला वश होतील' (३।३३). बाकीचा सुयत्न 'सुयत्न करती' च्या टीकेत दिला आहे.

चौ.१२ (१) सुगम उपाय- भक्ति जरि कृपा साध्य असली तरि वर दाखविल्याप्रमाणे शंकर भजनासह विप्रसेवा पुण्यपुंज, रामकृपा, संतभेट व संतकृपेने भक्तिलाभ असा सरळ सोपा उपाय आहे. (क) नर हतभागी- 'बहुभाग्यें मानुष तनु मिळली। सुर दुर्लभ सद्ग्रंथि गाइली' आणि शंकर भजन करणे व विप्रसेवा करणे अगदी सोपे सुलभ आहे. असे असता जे उडविती पायां- पायाने त्या सुगम साधनाला लाथाडतात. भाव हा की त्या साधनाचा उपयोग करीत नाहीत आणि विषमभोगातच कृतार्थता मानतात ते हतभागी म्हणजे स्वतःच आपल्या भाग्याचे हनन करणारे. ज्या महाभाग्याने मनुष्य देह मिळाला त्याचा विनाश करणारे ठरतात कारण 'नरतनुचे फळ विषय न भाई। स्वर्गही अल्प अंति दुखदाई.' (ख) सूचना- प्रथम नऊ चौपायांत रामभक्ति चिंतामणीची प्रभूता सांगितली. नंतर चतुर शिरोमणी कोण हे सांगितले व प्राप्तीचा उपाय सुगम असून जे करीत नाहीत ते हतभागी असे सांगितले आता संत सज्जन भेट झाल्यानंतरचा सुगम उपाय सांगतात. संतभेट होण्यापर्यंतचा अगदीं सुगम उपाय वर दाखविला आहेच.

हिं. *।पावन पर्बत बेद पुराना।रामकथा रुचिराकार नाना।।१३।।*
।मर्मी सज्जन सुमति कुदारी।ग्यान बिराग नयन उरगारी।।१४।।
।भावसहित खोजइ जो प्रानी।पाव भगति मनि सब सुखदानी।।१५।।

म. *।वेदपुराणें पर्वत पावन।रामकथा रुचिराकर पार न।।१३।।*
।मर्मी सज्जन सुमति पहारी।ज्ञान विराग नयन उरगारी।।१४।।
।शोधिल जो प्राणी सद्भावें।सब सुखदानि भक्तिमणि पावे।।१५।।

अर्थ- वेदपुराणें हे पवित्र पर्वत आहेत, आणि अपार रामकथा त्यातील सुंदर खाणी आहेत (रुचिर, आकर = खाणी).।।१३।। संत सद्गुरु त्या खाणींचे मर्मज्ञ (तज्ज्ञ) आहेत, सुमति ही पहार (कुदळ, पाहरय, टिकाव इ.) होय, आणि हे उरगारी! ज्ञान व वैराग्य हे दोन नेत्र होत.।।१४।। जो प्राणी शुद्ध भावाने (त्या खाणींत) शोधील तो सर्व सुखदायक भक्तिमणी (रामभक्तिचिंतामणी) पावेल.।।१५।।

टीका. चौ.१३ (१) पावन पर्वत- सर्वच पर्वत परोपकारी आहेत,

परहितकारक आहेत. 'संत विटप सरिता गिरि धरणी सर्वांची परहितार्थ करणी' (१२५।६) 'पर्व पुरवणे' (अ.व्या.सु.) अनेक उपयुक्त पदार्थांचा सर्व प्राण्यांना पुरवठा करणारे म्हणून पर्वत म्हणतात. त्यात हिमालय, विंध्य, मलय, सह्याद्रि, नीलगिरी वगैरे पर्वत पावन आहेत, ते इतरांना ही पावन करतात. (क) मण्यांच्या खाणी पर्वतांत असतात. भक्तिचिंतामणी पावन मणि आहे. तो पावन पर्वतातील खाणीतच सापडावयाचा. वेदपुराणें हेच पावन पर्वत आहेत. त्यात नाना प्रकारच्या कथांच्या खाणी आहेत तशाच (ख) रामकथा रुचिराकर पार न- वेदपुराण पर्वतात जशा धर्मार्थ काममोक्षांच्या अपार खाणी आहेत तशाच रामकथांच्याही सुंदर सुंदर खाणी विपुल आहेत. कल्पभेदांमुळे अनेक, अपार असे म्हटले. आकर = खाण, रुचिर = सुंदर. पर्वतात खाणी कुठे आहेत हे सगळ्यांना माहीत नसते. खाणी तज्ञ खाणींचे मर्म जाणणारा असतो तोच दाखवू शकतो. त्याप्रमाणे रामकथा खाणी वेदपुराण पर्वतांत बऱ्याच गुप्त आहेत.

चौ. १४ (१) मर्मी सज्जन- त्या खाणींचे मर्म जाणणारे खाणी तज्ञ, खाणी मर्मज्ञ तसे रामकथाखाणींचे तज्ञ, मर्मज्ञ, संत, सद्‌गुरु असतात. सद्‌गुरु आणि सद्‌गुरुकृपांकित शिष्य सेवक हेच मर्मज्ञ असतात असे बालकाण्डारंभी गुरुवंदनातच सांगितले आहे. श्रीगुरुचरणध्यानाने ज्यानां दिव्य दृष्टि प्राप्त झाली असते तेच वेद पुराणांतील रामकथाखाणी जाणू शकतात. 'श्रीगुरुपद नख मणिगण जोती। स्मरतां दिव्य दृष्टि हृदिं होती।।..... हृदयविलोचन विमल उघडती। दुःख दोष भवशार्वर झडती। रामचरित मणि माणिक दिसती। प्रगट गुप्त जिथ ते खनिं असती।।८।। नेत्रिं सुअंजन घालिता साधक सिद्ध सुजाण।। वनिं पर्वतिं कौतुकिं बघति भूतळीं भूरि निधान' (१।१।५-८ व दो.टी.पहा) (क) सुमति पहारी- पहार, कुदळ,टिकाव वगैरे हत्यार असल्याशिवाय खाणींत खोदतां, खणता येत नाही. तसे रामकथा खाणींत खोदण्याचे साधन, हत्यार, सुमति = शुद्ध बुद्धि. सुमति शिवाय संपत्ति मिळत नाहीत. 'सुमति तिथें संपती नाना। कुमति तिथें किं विपत्ति निदानां।।' (५।४०।६) पहार कुदळ वगैरे खाणीच्या भूमीत आंत शिरुन आतले गुप्त पदार्थ बाहेर दृष्टिगोचर करु शकतात तशीच सुमति त्या कथारुपी खाणींत आंत शिरुन आतील गुप्तार्थ, गूढार्थ बाहेर काढू शकते. येथे सुमति = सारग्राही,

तत्वग्राही कुशाग्र बुद्धी. पाहरीला, कुदळीला तीक्ष्ण अग्र नसेल तर भूमीत जाऊ शकत नाहीत. वाच्यार्था खाली लपलेला लक्ष्यार्थ, परोक्षवादांत गूढ असलेले रहस्य उकलून काढण्याची शक्ति कुशाग्रबुद्धीला संतगुरुकृपेनेच प्राप्त होते. अशी शुद्ध बुद्धि पाहिजे.

(२) कुदळीने पाहरीने भूमी उकरुन काढल्यावर त्यात गारगोट्या, दगड, हिरा इत्यादि अनेक पदार्थ बाहेर पडतील त्यात एकाग्र दृष्टीने सोधले पाहिजे. म्हणजे तो खोदणारा, खणणारा आंधळा असून भागणार नाही चांगला डोळस पाहिजे. तसे येथे ज्ञान व वैराग्य हे दोन डोळे पाहिजेत. वैराग्यरूपी नेत्र नसेल तर त्या रामकथांतील सिद्धींचे वगैरे अद्‌भूत कार्य पाहून त्या सिद्धी म्हणजेच चिंतामणी असे त्यास वाटेल. येथे रामकथा खाणींतून सगुणभक्ति रूपी मणि शोधून काढावयाचा आहे. भरद्वाज व गरुड आत्मज्ञानी विरागी असून रामचरित्रांतून त्याना तो मणि काढून घेता आला नाही. 'अति विचित्र रघुपति चरित जाणे परम सुजाण' रघुपति चरित्रांतील रहस्यांचे ज्ञान ज्याला होऊ शकेल तो परम सुजाण, म्हणून येथे रघुपतीच्या नरनाट्य लीलांतील रहस्यांचे ज्ञान असाच अर्थ घेतला पाहिजे. अन्यथा, गरुड, भरद्वाज व सती यांच्या प्रमाणे भक्तिमणि मिळणे दूरच राहून संशयमोहग्रस्त होण्याची पाळी यावयाची. एवढ्याचसाठी मर्मी सज्जनांची संगती आधी सांगून ठेवली आहे.

चौ.१५ (१) जो प्राणी- भाव हा कीं भक्तिमार्गात वरील लक्षणांनी संपन्न असा कोणीही प्राणी भक्ति मिळवू शकेल. 'रघुपति म्हणति भामिनि वदतो। एक भक्ति नातेंच मानतो।। जात पात कुल धर्म महत्ता। धन बल परिजन सगुण चतुरता।। भक्तिहीन नर शोभे कैसा। दिसे वारिविण वारिद जैसा' (३।३५।४-६ टी.प.) (क) शोधिल सद्‌भावे- शुद्ध भावाने. 'सेवक सेव्य भावविण भव तरण न उरगारी' (११९) सेव्यसेवकभआवाने भक्ति मणि जो सोधित राहील, त्या रामकथा खाणींत त्याला भक्तिचिंतामणी मिळतो. (ख) सब सुखदानि भक्ति मणि पावे. मागील दोन चौपायांत सांगितल्याप्रमाणे जो सेव्य सेवक भावानें प्रयत्न करील त्याला सर्व सुखदायक भक्ति त्या मर्मज्ञ संतांच्या कृपेने मिळेल. या तीन चौपायांतील रूपकाचे सारच पूर्वी शंकरांनी गरुडास सांगितले आहे की 'विण सत्संग न हरिकथा त्याविण मोह न जात।। मोहनाशविण रामपदिं दृढ

<u>अनुराग न तात</u>' (दो.६१) मात्र सत्संगांत दीर्घ श्रवण व त्याचे मनन सेव्य सेवक भावाने केले पाहिजे हे येथे विशेष सुचविले. दीर्घकाळ श्रवण केले पाहिजे हे शंकरांनी त्या पूर्वीच गरुडालाच सांगितले आहे. आणखी हे सुचविले की मर्मी संताच्या मुखाने श्रवण करावयाच्या कथा रूपी खाणी वेदपुराणरुपी पावन पर्वतांतल्या पाहिजेत, म्हणजेच '<u>नानापुराण निगमागमसंमत</u>' पाहिजेत. या रूपकाचा असा भावार्थ न घेतल्यास रुपकांतील कोणीही प्राणी शब्दानें विसंगति उत्पन्न होईल. कारण की मनुष्य प्राणी असा अर्थ घेतला तरि सर्व मनुष्यांनां वेदपुराण पठनाचा, अवलोकन करण्याचा अधिकार नाही. ब्राह्मणांचा अधिकार असला तरि अशिक्षित ब्राह्मणाला वेदपुराण वाचतासुद्धा येणार नाही. भुशुंडीला आत्मज्ञान नव्हतें तरिसुद्धा अनेक मुनींच्याजवळ रामकथा श्रवण त्याने केले होते व त्या विप्राच्या बालपणापासूनच राम प्रेम उत्पन्न झाले होते, वैराग्य मात्र पूर्ण होते. त्या विप्राला तर विद्या अध्ययन यांचा तिटकारा होता व तो त्या बाबतींत अगदीं अशिक्षित होता.

पाठ चर्चा- <u>(१)</u> <u>सबसुखदानि</u>- प्रचलित पाठ सब 'सुखखानी' आहे. पण भक्तिचिंतामणीला सुद्धा सुखखाण म्हटल्यास अनेक विसंगति दोष निर्माण होतात. <u>(अ)</u> या रूपकाप्रमाणे रामकथाखाणींतून भक्तिचिंतामणी काढल्यास किती तरि प्रयास करावे लागले. त्या चिंतामणीला खाण म्हटल्यास त्याच्यातून सुख मिळविण्यासाठी पुन्हा तसेच सर्व कष्ट करावे लागणार , पण हा मणि प्राप्त झाल्यवर '<u>यत्नांविणा कष्टां। संसृतिमूल अविद्या नष्टा</u>' असे भुशूंडीने म्हटले त्याच्याशी विरोध येतो. <u>(ब)</u> पूर्वी भक्ति व ज्ञान यांची तुलना करतांना भुशुंडीनेच '<u>असि हरि भगति सुगम सुखदाई</u>' (११९।१०) भक्तीला सुख देणारी = सुखदाती = सुखदानी म्हटले आहे, त्याच्याशी विरोध येतो कारण की कोणी एखाद्या वस्तूचे पाहिजेल तितके दान करीत असेल, देत असेल तिथे ती वस्तु घेण्यांत कष्ट मुळीच नाहीत पण तीच वस्तु (सुख) त्याच पदार्थाच्या खाणींतून काढून घेण्यास किती कष्ट आहेत हे येथे दाखविले आहेच. <u>(क)</u> '<u>मोक्ष सकल सुखखाण</u>' (८३म) असे भगवंतानी म्हटले व तो सुखखाण मोक्ष भगवान स्वतः वररुपाने देत होते, म्हणजे ते सुख नष्ट होण्याची भीति नव्हती तरि भुशुंडीने मोक्ष सकल '<u>सुखखाण</u>' घेतली नाही. मोक्ष = सुखखाण आहे. आणि भक्ति चिंतामणी = सुखखाण आहे असे येथे म्हटल्यास मोक्ष भक्तिचिंतामणी असे ठरते

व मग 'मुकुति निरादर भगति लुभाने' (११८।७) असे भुशूंडीने याच प्रकरणांत म्हटले ते निरर्थक ठरेल. आणि मोक्ष व प्रेमभक्ति यांची समान किंमत ठरेल. (ड) मोक्ष सकल सुखखाण प्रभु देत असतां भुशुंडीनेच विचार केला की 'वदले प्रभु सुख घे सब जरी। 'घे निज भक्ति' न वदले परी।। भक्तिहीन गुण सब सुख तैसें। विना लवण शाकादिक जैसें' (४।४-५) मोक्ष सुख भक्तिहीन असेल तर ते अळणी भोजनासारखे बेचव, नीरस असे भुशुंडीनेच म्हटले असतां मोक्ष आणि भक्ति या उभयतांना सुखखाण म्हणून समान लेखणे मोठी घोडचूकच ठरते. (इ) बालकांडांतील व इतर ठिकाणच्या वचनांचा विचार ७।४५।५ व ७।८५।३ च्या टीकेत केलेला पहावा.

या सर्व कारणाचा विचार करतां कोणाही निःपक्षपाती, व सांप्रदायाभिमानरहित, विचारवंत व्यक्तीला हे मान्य करावेच लागेल की भक्ति सुखखानी पाठ गोस्वामींचा नसून पोथी लेखकानी अनुप्रासासाठी जाणून बुजून पण परिणामाकडे लक्ष न देता केलेला हा बदल आहे. ही चूक याच कांडात अनेक ठिकाणी केलेली आहे. ७।४५।५, ७।८५।३, ७।११६।८ या व इतर ठिकाणी सुखखानी च्या ऐवजी सुखदानी पाठच असणें जरुर आहे. श्रीगोस्वामींच्या हातची पोथी सापडल्यास तिच्यांत या सर्व ठिकाणी सुखदानी पाठच सापडेल अशी बालंबाल खात्री आहे.

सूचना- भक्तिचिंतामणी सर्व प्रकारचे सुख देणारा व पूर्ण अभय देणारा आहे. याच्यावाचून आणिमादिक सिद्धि, 'ज्ञान विवेक विरति विज्ञान' (८४।१) आणि मोक्ष सकल सुखखाण विनालवण भोजन होय. अशा प्रकारे प्रेमभक्तीचे श्रेष्ठत्व मोक्षापेक्षा अधिक आहे हा श्रीमद्भागवतोक्त व नानापुराणनिगमागम संत संमत मानस सिद्धान्त दो. ११५।१ पासून येथपर्यंत सुव्यवस्थित रीतीने प्रतिपादिला आहे. या भक्तीलाच अनपायिनी, अविरल भक्ति असे अनेक ठिकाणी म्हटले आहे. (क) 'भक्ति मार्गी प्रभुता श्रुणु आता' असे म्हणून उपक्रम केला आहे व 'सबसुखदानि भक्तिमणि पावे' असे म्हणून त्याचा उपसंहार येथे केला. आता असा भक्तिचिंतामणी प्राप्त झालेल्या संतांचा व संत समागमाचा महिमा सांगतील.

हिं. ।मोरे मन प्रभु अस बिस्वासा।राम ते अधिक राम कर दासा।।१६।।

।राम सिंधु घन सज्जन धीरा।चंदन तरु हरि संत समीरा।।१७।।

म. *।हा विश्वास मला प्रभु! वाटे।रामदास रामाहुनि मोठे।।१६।।*
।राम सिंधु घन सज्जन धीर।चंदन तरु हरि संत समीर।।१७।।

अर्थ- हे प्रभु! (गरुडा) मला असा विश्वास वाटतो की रामाचे दास रामापेक्षा मोठे असतात.।।१६।। राम सागर असून धीर संत मेघ होत. श्रीहरि चंदन तरु व संत (रामदास) समीर (वायु) होत.।।१७।।

टीका. चौ.१६ (१) 'महिमा नाम रूप गुणगाथा। सकल अनंत अमित रघुनाथा'(७।९१।३) 'अंत न जेविं राम भगवाना। तथा कथा कीर्तीस गुणानां' (१।११४।४) याप्रमाणे सर्व बाबतीत राम 'निरुपम न उपमा आन' असे आहेत हे तत्वतः खरे आहे. तथापि संतानां जो अनुभव आलेला असतो तो ही या जगांत खोटा म्हणता येत नाही, व साधकाना संताचा अनुभवच मुख्य वाटाव्या असतो. श्रीतुलसीदासांनी आपला अनुभव सांगितला की निर्गुण व सगुण राम या 'दोघांहुनि गुरु (मोठे) नाम मम मते' (१।२३।२) शंकर म्हणाले की 'उमे सांगतो मी अनुभव मम। सत् हरिभजन जगत् स्वप्नासम' (३।३९।५) तसाच भुशुंडी आपला विश्वास सांगत आहे. विश्वास = दृढ अनुभवाने निश्चित झालेला मत. (क) प्रभु! = स्वामी! भाव हा की तुम्ही माझे श्रोते असलात तरि रामाचे दास आहात, आणि मी रामदासांना रामापेक्षां मोठे मानतो, म्हणून तुम्हीं माझे स्वामी आहात. पक्षिराज या दृष्टीनेही तुम्हीं माझे प्रभु आहातच.

(२) रामदास- दास = गुलाम. ज्याने आपलें सर्व जीवित, सुखदुःख इ. आपल्या स्वामीच्या स्वाधीन केलेले असते तो दास. सेवकधर्म सुद्धां फार कठिण आहे, पण सेवक आपल्या इच्छेप्रमाणे सेवानिवृत्त होऊ शकतो. दास कधीं सेवानिवृत्त होऊ शकत नाही.स्वामीकडून कसल्याही मोबदल्याची इच्छा बाळगीत नाही. प्रेमाने दास्य करणे व स्वामीला सुख देऊन, स्वामीची आज्ञा पालन करणे, स्वामींच्या इच्छेप्रमाणे वागणे इतकाच तो आपला धर्म समजत असतो. 'सर्वांप्रिय सेवक ही नीती। दासांवर मम अधिका प्रीती' (७।१६।८) कोणापेक्षां अधिक असते ते प्रभूंनीच सांगितले आहे. 'अनुज, राज्य, वैभव, वैदेही। परिजन, सदने, काया, स्नेही।। सगळें प्रिय, न तुम्हांसम जाणा। भूषा

न वदतो हा मम बाणा' (७।१६।६-७) असे सुग्रीवादि कपींना सांगितले आहे. रामचंद्रांना जो आपल्या स्वतःच्या देहापेक्षा व सर्वस्वापेक्षा प्रिय वाटतो तो रामभक्तांना रामापेक्षां मोठा वाटला तर नवल काय? (क) रामदास रामाहून मोठे वाटण्याचे आणखी कारण- रघुनाथ साधकाला प्रत्यक्ष दिसत नाहीत. रामदास प्रत्यक्ष दिसतात, त्यांच्या नुसत्या दर्शनाने आनंद होतो, पापांचा क्षय होतो, ते रामकृपा संपादनाचा साधकाच्या योग्यतेनुसार मार्ग दाखवितात. निःस्वार्थ प्रेम करतात. म्हणूनच वाल्मिकी म्हणतात श्रीरघुनाथाला- 'मनिं गुरु अधिक तुम्हाहुनि जाणति। सर्वभाविं सेविति सन्मानति' (२।१२९।८) गुरु आणि गोविंद यात प्रथम वंद्य कोण असा प्रश्न एका शिष्याला सगुण साक्षात्काराच्यावेळी उत्पन्न झाला. जेथे गुरु होते तेथे त्यांच्याजवळच भगवान साक्षात प्रगट झालेले दिसले. दोघांचेही मुख शिष्याकडेच होते तेव्हा तो म्हणतो, 'बलिहारी गुरुदेव की गोविंद दिए दिखाइ' ज्यानी गोविंदाची भेट करवून दिली ते गुरुदेव अधिक श्रेष्ठ आहेत, म्हणून ते आधी वंद्य होत. रामदास रामाहून मोठे कसे हे आता तुलनेने रूपकाने दाखवितात.

चौ.१७ (१) रामसिंधु- राम रघुनाथ सर्व प्रकारे सागरासारखे अपार, अगाध, अनंत आहेत. 'व्यापक हरि सर्वत्र समान' असला तरि दिसत नाही. 'व्यापी ब्रह्म एक अविनाशी। सच्चिद्घन आनंद सुराशी।। असुनि असा प्रभु हृदिं अविकारी। दुःख दैन्य जग जीवां भारी' (१।२३।६-७) सागर अपार अगाध असला तरि त्याच्याजवळ जाऊन सुद्धा तो तृषा शमन करु शकत नाही. तसेच राम निराकार रुपाने अंतर्यामी, हृदयस्थ असून सगळे जीव दुःखी दीन आहेत. पुष्कळांना समुद्र नुसता ऐकून माहीत असतो. राम चरित्र ही गूढ रहस्यमय. 'सुगम अगम लीला श्रवुनि जाती मुनिहि मुलोनि' (७।७३) तेथे साधारण माणसाला राम, कृष्ण यांच्या चरित्राचा तरि काय उलगडा होणार? (क) घन सज्जन धीर- सात्विक धृति संपन्न संत, सद्गुरु, मेघांसारखे आहेत. रामसागरांतील गुण, चरित्र, महिमा कीर्तिरुपी जलांतील क्षार काढून टाकून ते पाणी मधुर करुन संतमेघ वर्षाव करतात व आर्त तृषार्तादि सर्वांनाच सागराचे पाणी सुलभ, सुखद होते. एवढा थोरला सागर पण त्याच्या काठाजवळ किंवा त्याचे जल प्रत्यक्ष जाईल तेथे अन्न धान्यादि काही पिकत नाही. पण तेच जल मेघमुखांतून पडले म्हणजे 'सुजलां सुफलां सस्यश्यामलां भूमि पाहूनच सुख

..ते' मग मेघ सागरापेक्षा मोठे अधिक महत्त्वाचे का वाटू नयेत? संतमेघ- '..र्षति रामसुयश वर वारी। मधुर मनोहर मंगलकारी।। विस्तृत लीला सगुण ..निती। करी स्वच्छता कलुषहानि ती।। प्रेमभक्ति शक्य न वर्णाया। ती मधुरता सुशीतलता या।। तें जल सुकृतशालि हित कर्ते। रामभक्त सेवक जीवन ते' (१।३६।४-७) जगांतील जड जीवानां सुखाचा व कल्याणाचा मार्ग यथाधिकार दाखवून निःस्वार्थपणे जगाचे हित जर कोणी केले असेल तर भक्ति प्रधान ज्ञानी संतांनीच. 'जगाच्या कल्याणां संतांच्या विभूति.' जीवांचे हित करण्यात, त्यांस सुख देण्यात संतांचा स्वार्थ काहीच नसतो. निराकाराला साकार व्हावयास लावणारे संतच. मानसांत संत, साधु, सज्जन, बुध, हरिजन, हरिसेवक हे शब्द समानार्थक वापरले आहेत. भक्तिहीन ज्ञानी संत समजला जात नाही.

(२) चंदन तरु हरि- 'रामसिंधु धन सज्जन धीर' या दृष्टान्ताने 'रामदास रामाहून मोठे' कसे हे दाखविण्याचा प्रयत्न केला. त्या दृष्टान्ताने तुष्टि, पुष्टि, तृषाशान्ति, मलहानि इत्यादि लाभ साधकांस होतात हे दाखविले, परंतु आपला मेघपणा किंवा सागराचे सद्‌गुण मेघ देऊ शकत नाहीत, म्हणजे तो एक दृष्टान्त अपुरा पडला, म्हणून आणखी एका दृष्टान्ताने रूपकाने राहिलेला अर्थ सांगतात. (क) मलय पर्वतावर चंदनाच्या वनांत मूळ एकच चंदनाचा वृक्ष असतो, असा कविकुलाचा संकेत आहे. तो वृक्ष फार गहन झाडींत अगम्य अशा ठिकाणी असतो आणि तो मोठमोठ्या भीषण महाविषारी भुजंगानीं वेष्टिलेला असतो. त्याला स्पर्श करणे तर अशक्यच पण दृष्टीपथांत येईल इतक्या जवळ जाणे सुद्धा अशक्यच असते. तसाच हरि एकच आहे. तो घोर विषयारण्यांतच आहे, दिसत नाही चर्मचक्षूंना, आणि अविद्यामायारुपी नागिणीनी घेरुन झाकून ठेवला आहे त्यामुळे जवळ हृदयांत असून सुद्धा त्याचे दर्शन होणे सुद्धा अगदी अशक्य झाले आहे.

(२) संत समीर- चंदनवनांत हजारो दुसरे वृक्ष असतात. मनुष्यांना त्या एका चंदनापर्यंत जाता न आले तरी समीर, सदा वाहणारा वारा, त्या चंदनापर्यंत जाऊ शकतो, त्याला स्पर्श करतो, त्या चंदनाचे सुगंधादि सर्व सद्‌गुण आपल्यांत भरतो व त्या सद्‌गुणानां सुगंधाबरोबर सर्व दिशांस नेऊन आजुबाजुच्या बोरी बाभळी, लिंब, करवंदी, कुटज, इत्यादी वृक्षांच्या त्वचातून

ते सुगंधादि सद्गुण भरुन त्या सर्व वृक्षांना चंदन बनवतो. त्यांची पाने फुले फळे व त्यांचे रूप जरी पालटले नाही तरि त्या वृक्षांची काष्ठे चंदनाच्या गुणांनी पूर्ण होतात, पण बांबू, वेळू, कळक मात्र चंदन बनत नाहीत. संत समीरासारखे आहेत. मलयाद्रिवरील वृक्षासारखे जे कोणी असतील त्यांना हरिरूप बनवितात. दुष्ट बांबू, कळकांसारखे असतात ते चंदन बनू शकत नाहीत. (क) हरि आणि संत या दोघांनांही दिलेल्या उपमा जड वस्तूंच्या आहेत. सागर, चंदन, मेघ, समीर हे सर्व जड आहेत. या उपमानी दाखविले की जडांच्या ठिकाणी जसा आपपरभाव, स्वार्थ इत्यादि नसतात तसेच हरि आणि हरिसेवक हे दोघेही आहेत. 'हेतुरहित जगिं जुग उपकारी। तुम्हि तुमचे सेवक असुरारी' 'संतविटप सरिता गिरि धरणी। सर्वांची परहितार्थ करणी' यांत सुद्धा संतानां जडांच्या पंक्तीत आद्यस्थान दिले आहे.

हिं. ।सब कर फल हरिभगति सुहाई।सो बिनु संत न काहू पाई।।१८।।
।अस बिचारि जो कर सतसंगा।रामभगति तेहि सुलभ बिहंगा।।१९।।

म. ।सकल फल हि हरिभक्ति सुशोभन।संत कृपेविण कुणाहि लाभ न।।१८।।
।हें समजुनि जो करि सत्संगा।रामभक्ति त्या सुलभ विहंगा।।१९।।

अर्थ- सर्व साधनांचे फळ म्हणजे सुंदर हरिभक्ति हेच आहे, पण संतकृपेशिवाय तिचा लाभ कोणाला होत नाही.।।१८।। हें ध्यानात घेऊन हे विहंगा! जो संतसमागम करतो त्याला रामभक्ति सुलभ आहे. (सहज प्राप्त होते).।।१९।।

टीका. (१) सकल फल = सर्व साधनांचे फळ. सर्व साधनें कोणती तें वसिष्ठांनी यापूर्वी प्रभूंनाच सांगितले आहे. 'जपतपनियम योग निजधर्महि। श्रुतिसंभव नाना शुभ कर्महि।। ज्ञान दया दम तीर्थी मज्जन। वदति धर्म जितके श्रुति सज्जन।। आगम निगम पुराण अनेकहि। श्रवुनि पढुनि फल तों प्रभु एकहि।। तव पदपद्मीं प्रीति निरंतर। सकल साधनां हें फल सुंदर।। (७।४९।१-४)' 'नर तनुचे फळ विषय न भाई। स्वर्गही अल्प अंतिं दुखदाई' (७।४४।१). (क) सुशोभन = सुंदर. वसिष्ठांनींही भक्तीला = रामपदप्रीतीला सुंदर फळच म्हटले आहे. 'रामभक्ति चिंतामणी सुंदर' असे प्रकरणारंभी म्हटले

[ख]रेच येथे उपसंहारात म्हटले. (ख) अशी जी सर्व साधनांत श्रेष्ठ, फलरूपा [सुं]दर प्रेमभक्ति तिचा 'संतकृपेविण कुणाहि लाभ न' 'भक्ति स्वतंत्र सब [सु]खदानी। विण सत्संग न पावे प्राणी' (७।४५।५) मूळांत कृपेने या अर्थाचा शब्द नाही. पण संताशिवाय मिळत नाही याचा अर्थ संत कृपेशिवाय मिळत नाही असा आहे. 'मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपा लेशाद्वा' (ना.भ.३८) 'कृपा पुरारि न करिति जयासी। भक्तिलाभ मम मुनि! न तयासी' (१।१३८।७) 'गुरुं शंकर रूपिणम्' म्हणून ठरले की भगवद्भक्तिसंपन्न सद्गुरुकृपेशिवाय हरिभक्ति मिळत नाही. गरुड काक भुशुंडीला गुरु मानतो हें पूर्वी पाहिले आहे. पार्वतीने शंकरानां गुरु मानूनच विनंती केली आहे. पुढे दोघांनी जबानी दिली आहे कीं भुशुंडीच्या व शंकराच्या कृपेनेंच रामभक्ती उपजली. भरद्वाजांनीही याज्ञवल्क्यांना गुरु भावनेने शंका विचारुन विनंती केली आहे. कारण 'गुरुविण भवनिधि कोणि न तरती' आणि भक्तीवाचून भवतरणोपाय नाही, आणि संतकृपेवाचून भक्तीलाभ होत नाही, म्हणून संत = सद्गुरु असा अर्थ घेणेच भाग आहे. (ग) शंका- 'रामकृपेविण कोणि न लाहे' (चौ.११) असे पूर्वी म्हटले, 'संतकृपेविण कुणाहि लाभ न' असे येथे म्हटले हे कसे? रामकृपेवाचून संतांची भेट होत नाही. 'भेटति संत विशुद्ध तयाला। रामकृपें अवलोकिति ज्याला' रामकृपेने संतभेट होते व संतकृपेने भक्तिलाभ होतो, म्हणून विसंगति नाही.

सूचना- 'रामभक्ती चिंतामणि सुंदर' असे या प्रकरणात म्हटले. बा.कां. ३२।१ मध्ये म्हटले की, 'रामचरित चिंतामणी चारु.' बा.कां. नामवंदन प्रकरणांत दो.२१ मध्ये म्हटले की, 'राम नाम मणिदीप.' रामचरित व रामनाम यांचे महत्व अगदीं सारखे असल्याचे बालकांडांत कोष्टकी तुलनेने दाखविले आहे, व पद्मपुराणांत नामाला चिंतामणी म्हटलेच आहे. म्हणून १।२१ मध्ये रामनाम मणिदीप = राम नाम चिंतामणीदीपच समजणे जरुर आहे, किंवा कौस्तुभमणिदीप म्हणावे वाटल्यास रामनाम रामापेक्षा श्रेष्ठ आहे हे बा.कां. सविस्तर वर्णिले आहे. म्हणून रामभक्ती रामापेक्षा श्रेष्ठ व रामचरित रामापेक्षा श्रेष्ठ, रामदास रामापेक्षा श्रेष्ठ असे ठरते. 'भक्ति अवशा वश करी' (३।२६।छं) वश होणारापेक्षा वश करणारा श्रेष्ठ ठरतोच. याप्रमाणे रामनाम, रामचरित, रामभक्ति व रामदास ही चारी व्यक्तीशः रामापेक्षा श्रेष्ठ ठरलीच.

चौ.१९ (१) हें समजुनि- हरिभक्तीशिवाय भवतरणोपाय नाही व संतकृपेशिवाय हरिभक्ती मिळत नाही हे जाणून, ध्यानात ठेऊन (क) करि सत्संगा- सत्संग करणे म्हणजे संतगुरुमुखाने रामकथा- हरिकथा श्रवण पुष्कळ काळ करणे. 'तदा सकल संदेहा भंग। जैं बहुकाळ करिति सत्संग।। तिथें रुचिर हरिकथा ऐकणे। श्रवणें जाति सकल संदेह। रामचरणिं अति उपजे स्नेह।।८।। विण सत्संग न हरिकथा त्याविण मोह न जात।। मोहनाशविण रामपदिं दृढ अनुराग न तात.' (७।६१) (ख) रामभक्ति त्या सुलभ विहंगा- विहंगा! भाव हा की तुम्हाला विहंगानां आकाशात गमन करणे अगदीं सुलभ आहे, पण इतरांना अत्यंत दुष्कर, अशक्य त्याप्रमाणेच संत गुरुमुखाने हरिकथा श्रवण केल्यास रामभक्ती मिळणे सोपे आहे, पण जे असे करणार नाहीत त्यांना रामभक्ति मिळणे शक्य नाही.

हिं.दो. ।ब्रह्म पयोनिधि मंदर ग्यान संत सुर आहिं।।
।।कथा सुधा मथि काढहिं भगति मधुरता जाहिं।।१२०रा.।।

म.दो. ।ब्रह्म पयोनिधि, मंदर ज्ञान, जाण सुर संत।।
।।काढिति मथुनि कथा सुधा भक्तिमाधुरीमंत।।१२०रा.।।

अर्थ- वेद (पुराण) हा क्षीरसागर, ज्ञान हा मंदर पर्वत व संत सुर आहेत असे समजा. ते त्याचे मंथन करुन भक्तीरूपी माधुरी असलेले कथारूपी अमृत काढतात.।।दो.१२०रा.।।

टीका. (१) ब्रह्म पयोनिधि- ब्रह्म म्हणजे वेद पुराणे, ज्यांचा उल्लेख 'वेद पुराणे पर्वत पावन' असा करुन त्यातून रामभक्ति चिंतामणी कसा मिळतो हे सांगितले ते. पण मणि कठिण असतो, त्याला कोणताच स्वाद नसतो व तो नीरस असतो, म्हणून येथे क्षीरसागर मंथनाच्या रुपकाने भक्तीचे रसत्व दाखवीत आहेत. वेदपुराणे इतिहास हा क्षीरसागर आहे. देवांनी व असुरानीं त्याचे मंथन करुन त्यातून अमृत काढले तसे वेदपुराण इतिहासादींचे मंथन करून त्यातून हरिकथामृत काढावयाचे आहे. (क) मंदर ज्ञान- क्षीरसागराचे मंथन करतांना मंदर पर्वताची रवी केली होती. या क्षीरसागराचे मंथन करण्यास ज्ञान हा मंदर पर्वत उपयोगी पडतो. पूर्वी वेदपुराणांतून भक्तिमणि

काढण्यास 'ज्ञान विराग नयन' पाहिजे होते. सार हे की वेदपुराणांतून भक्ति मिळण्यास ज्ञान पाहिजेच. ज्ञान कोणते ते पूर्वी लिहिलेच आहे. येथे फरक इतकाच आहे की भक्तिमधुरता असलेल्या कथा या सागरांतून काढावयाच्या आहेत. पूर्वी त्यातील रामकथांतून भक्तिमणी मिळवावयाचा होता. ते साधक दशेचे वर्णन आहे व येथे भक्तिमणि प्राप्त होऊन संत झालेल्यांचे कार्य सांगत आहेत, म्हणून भक्तिशास्त्राचे ज्ञान, भक्तिरसाचे ज्ञान ही पाहिजेच. संतांच्या ठिकाणी आत्मज्ञान असतेच.

(२) संत सुर- क्षीरसागराचे मंथन देव व असुर यांनी केले पण या मंथनात असुरांचा संसर्ग मुळीच नसावा. संतरूपी सुरच वेदपुराण सागराचे मंथन करतात व हरिकथा, रामकथारुपी सुधा = अमृत त्यातून काढतात. भाव हा आहे की 'नाना पुराण निगमागम' यांचे सूक्ष्म अवलोकन करुन संत त्यातून भक्तिरसप्रधान अशा हरिकथा सोधून सोधून त्या सर्वांचे सार ज्यात असेल अशा भक्तिरसाळ रामकथा वर्णन करतात. अमृताला गोडी असते तशी संतानी काढलेल्या त्या रामकथामृतास भक्तिरस रुपी गोडी = माधुरी = मधुरता असते. 'तव कथामृतं तप्त जीवनं' (भाग. १० ।३१ ।९) या मंथनातून हालाहल, लक्ष्मी, देवांगना, वगैरे इतर काही निघत नाही, कारण की हे संतरुपी देव शुद्धसत्वगुणी आहेत, स्वार्थी नाहीत, आणि असुरांचा संपर्क झालेला नाही. 'स्त्रवत नाथ आनन शशी कथासुधा रघुवीर।। श्रवणपुटीं पिउनिया मन तृप्त नव्हे मतिधीर' (७।५२म) असे या रामचरित मानस कथेविषयी पार्वतीने सांगितले आहे. संतसमागमांत ज्या हरिकथा श्रवण करावयाच्या त्या नाना पुराण निगमागम संत संमत असाव्यात, त्या भक्तिमणि प्राप्त झालेल्या संतानी लिहिलेल्या असाव्यात व त्या कथांत भक्तिमधुरता असली पाहिजे हे येथे सुचविले आहे. अशा कथांचे संत मुखाने आदराने श्रवण केल्यास सकल सुखदाई भक्तिचिंतामणी मिळेल. आता आणखी एका रूपकाने भक्तीचे प्रभुत्व वर्णन करुन हे प्रकरण समाप्त होईल.

हिं.दो. ।बिरति चर्म असि ग्यान मद लोभ मोह रिपु मारि।।
।।जय पाइअ सो हरिभगति देखु खगेस बिचारी।।१२०म.।।

म.दो. ।विरति ढाल, असि बोध, रिपु लोभ मदादि वधून।।

।।जय देते ती हरिभक्ति बघ खगेश चिंतून।।१२०म.।।

अर्थ- वैराग्यरुपी ढाल, आणि ज्ञानरूपी तलवार यानी लोभ मदमोहमत्सरादि (मदादि = मदमोहमत्सर) शत्रूना मारुन जी जय मिळवून देते ती हरिभक्तीच! हे खगपति! नीट विचार करुन पहा.।।दो.१२०म.।।

टीका. (१) या दोह्यांत पुन्हा एकदा भक्तीची प्रभुता सांगून हे प्रकरण समाप्त करीत आहेत. सत्संगांत हरिकथा श्रवण करावयाच्या त्या कशा असाव्यात हे मागल्या दोह्यांत सांगितले व तशा कथांचे श्रवण केले तर भक्ति माधुरी मिळते हे सुचविले. पण 'महा अजय संसार रिपु' यामुळे कसा जिंकता येईल याचे उत्तर येथे दिले आहे. (क) संत मुखाने हरिकथामृत श्रवण केल्याने प्रथम वैराग्यरुपी ढाल मिळते. 'या शुभ महाराज अभिषेका। श्रवत मिळवि नर विरति विवेका' (७।१५।२) विवेक = ज्ञान असा अर्थ तेथे आहे. श्रवणाने वैराग्य प्राप्त झाल्यावर श्रवण केले की बोध = ज्ञान रुपी असि = तलवार प्राप्त होते, नंतर श्रवण केले की लोभ, आणि मदादिकांना मारता येतात. मदादि = मद, मोह मत्सर. ज्ञान झाल्यानंतर सुद्धा भगवंताच्या सगुण चरित्र श्रवणाने जो मोह उत्पन्न होतो तो त्या भक्ति मधुर कथा श्रवणानेच जातो. ज्ञान झाल्यानंतर त्याचा मद व त्यामुळे इतरांचा मत्सर उत्पन्न होण्याचा संभव असतो, त्यांचा नाशही भक्ति मधुर हरिकथा श्रवणानेच होतो. प्रतिष्ठेचा, मानसन्मानाचा लोभ उत्पन्न होतो, तो हि भक्ति मधुर कथा श्रवणाने मारला जातो. पण हे रिपु असे आहेत की एकदा मारले तरि पुन्हा जिवंत होतात. त्यामुळे केवळ ज्ञान व वैराग्य यानी जरी यांना मारता आले तरि संसार रिपुवर जय मिळाला असे घडत नाही, पण भक्तिरसाळ कथा श्रवणाने ज्ञान झाल्यावर म्हणजे जीवन्मुक्त झाल्यावर त्या कथा श्रवण केल्या तर प्रेमभक्ति मिळते. 'मुक्त विरक्त नि विषयी ऐकति। भक्ति सुगति नव वैभव पावति' (७।१५।५) विरक्तांनि श्रवण केल्याने ज्ञान प्राप्त होऊन सुगति = जीवन्मुक्ती मिळते. जीवन्मुक्तानी श्रवण केल्याने भक्ती मिळते असे भुशूंडीनेच रामकथा श्रवणाचे फळ गरुडासच सांगितले आहे. भक्ति मिळाली की ती महा अजय संसार रिपूवर जय मिळवून देते 'श्रुणु खगपति ही कथा पावनी। त्रिविध ताप भवभयनाशनी' (७।१५।१) असे भुशूंडीनेच सांगितले आहे. त्रिविधतापांचा व भवभयाचा नाश होणे म्हणजेच

महा अजय संसाररिपूवर पूर्ण जय मिळणे. हा जय केवळ ज्ञानाने मिळत नाही, हे ज्ञानदीप व ज्ञानसिद्धांत यात आधी सांगितले. भक्तिमणी प्रभूता वर्णन करुन सांगितले की भवविनाश भक्तीनेच होतो पण सत्संगात हरिकथा श्रवण केल्याने संतकृपेनेच भक्ती मिळते. त्या हरिकथा कशा असाव्यात हे मागल्या दोह्यांत सांगितले व तशा भक्तिरसाळ कथा सत्संगात श्रवण केल्याने वैराग्य, ज्ञान प्राप्ती क्रोध मदमोहादि विकारांचा नाश व भक्तीची प्राप्ती क्रमशः हरिकथा श्रवणानेच होते व भवविनाश होतो हे येथे दाखविले. 'भक्ति स्वतंत्र सब सुखदानी। विण सत्संग न पावे प्राणी' (७।४५।५) असे श्रीरघुनाथ म्हणाले त्याचे स्पष्टीकरण येथे चौ.१८ पासून या दोह्यांपर्यंत केले. हरिकथा श्रवण ही साधनभक्ती आहे. भक्ति स्वतंत्र आहे व वैराग्य ज्ञानादि सर्व काही आपोआपच विनाश्रम सहज नुसत्या श्रवणाने सत्संगात मिळते व महा अजय संसाररिपूस जिंकून सदा सुखी व निर्भय राहता येते हे दाखविले.

(२) बध खगेश चिंतून- गरुडाचा प्रश्न होता की 'ज्ञान भक्ति यामधिं किती अंतर' त्यावर भुशुंडीने सांगितले की ज्ञान व भक्ति या उभयांच्यामुळे भवसंभव खेद नष्ट होतो. केवळ ज्ञानाने किंवा केवळ भक्तीने होत नाही, तथापि ज्ञान व भक्ति यात बरेच अंतर आहे. ते अंतर कोणते याविषयी रामरहस्य, ज्ञानदीप, ज्ञानसिद्धान्त व रामभक्तिचिंतामणी या प्रकरणांत जे सांगितले त्याचा विचार करुन पहा, म्हणजे तुम्हीं ही मान्य कराल कीं ज्ञानापेक्षा भक्ति श्रेष्ठ आहे व दोघांत महदंतर आहे.

भक्तिचिंतामणि प्रकरण समाप्त- भुशुंडीगीता समाप्त

भुशुंडी गुरूच्या आज्ञेप्रमाणे खगेशाने त्या सर्व गोष्टींचा सिंहावलोकनाप्रमाणे विचार करुन पाहिला तेव्हा काही प्रश्न उत्पन्न झाले व त्याविषयींचे सिद्धान्त जाणण्याची प्रबळ इच्छा उत्पन्न झाली म्हणून तो आता सात प्रश्न विचारील. त्या प्रकरणास सप्त प्रश्न गीता असे नाव या टीकेत दिले आहे. प्रश्न सात असले तरि ते परस्पर संबद्ध असल्याने हा गरुडाचा साहवा प्रश्न समजला जातो ते योग्यच आहे.

सप्तप्रश्न गीता प्रकरण (१२१/१ - १२२चं)

हे प्रश्न सातच असले तरि त्यांची व्याप्ति विशाल आहे. परमहितासाठी जीवाने जाणण्यासारख्या अत्यंत आवश्यक सिद्धान्ताचा ऊहापोह भुशूंडीने या प्रकरणांत केला आहे. या सात प्रश्नांचे विवरण नीट समजाऊन घेऊन त्याचे नित्य मनन करीत त्यात त्याज्य सांगितलेल्या गोष्टींचा त्याग करुन संग्राह्य व कर्तव्य म्हणून सांगितलेल्या गोष्टींचे ग्रहण व कृति मनुष्य करु लागेल तर या एकाच जन्मांत तो दुःखहीन, निष्कंटक, निर्भय अशा परमानंद साम्राज्याचा अधिपति झाल्याशिवाय राहणार नाही. हे प्रकरण मानसांतील सर्व सिद्धान्ताचे सार सर्वस्व आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. आता गरुड प्रथम प्रार्थना करतो. ल.ठे. या १२१ व्या दोह्यांत ३७ चौपाया आहेत. इतक्या चौपाया मानसांत कोणत्याच दुसऱ्या दोह्यांत नाहीत. पहिल्या सात चौपायांत प्रार्थना व प्रश्न आहेत.

हिं. */पुनि सप्रेम बोलेउ खगराऊ/जौं कृपाल मोहि ऊपर भाऊ//१//*
/नाथ मोहि निज सेवक जानी/सप्त प्रस्न मम कहहु बखानी//२//

म. */मग सप्रेम वदे खगराव/जर कृपालु! मजवरती भाव//१//*
/नाथ! मला निज सेवक जाणुनि/सप्त प्रश्न मम सांगा वर्णुनि//२//

अर्थ- मग खगराज गरुड (भुशुंडीला) प्रेमाने म्हणाला की हे कृपालु! जर माझ्यावर आपला स्नेह (= भाव = भाऊ) आहे तर.।।१।। मला आपला नित्य सेवक जाणून माझ्या सात प्रश्नांचे सविस्तर विवरण (वर्णन) करुन सांगावे.।।२।।

टीका. चौ.१ (१) मग- 'बघ खगेश चिंतून' या भुशुंडीच्या सूचनेप्रमाणे विचार केल्यावर. (क) खगराव = खगराजाने जय प्राप्तीची भाषा ऐकली व राजा असल्यामुळे युद्ध आणि जयापजय यांच्याशी चांगला परिचित असल्यामुळे त्याला माहीत आहे की युद्धांत जराशी चूक, भ्रमाने किंवा अज्ञानाने झाली तरि महा अनर्थ होतात व 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' (तुका.) जीवाला तर मोह काम क्रोधादि मायेच्या सैन्याशी युद्ध करावे लागते. रामकथामृत

श्रवणपुटांनी पान करीत वैराग्य, ज्ञान, व भक्ति प्राप्त करुन भक्तीने महा अजय संसार रिपूवर जय मिळवावयाचा आहे, म्हणून अत्युत्तम साधनांचे भ्रांतिरहित शुद्ध ज्ञान व्हावे या हेतूने प्रश्न विचारण्याचे ठरविले. (ख) जर कृपालु- जर = ज्या अर्थी असा भाव आहे. ज्या अर्थी आपण कृपालु आहात आणि ज्या अर्थी आपला भाव = स्नेह, प्रेम, प्रीति माझ्यावर आहे, त्याअर्थी माझ्यावर असलेल्या आपल्या स्नेहभावामुळे, आपण माझी विनंती अमान्य करणार नाही या भरवश्यावर मी काही विचारणार आहे.

चौ.२ (१) नाथ! = स्वामी. गरुड पक्षिराज हरिवाहन असून कावळ्याला नाथ! म्हणतो. आणि 'नाथ! वदति मुनि काहीं अंतर' (७।११५।१४) असे भुशुंडी गुरु, वक्ता असून गरुडाला म्हणतो. जेथे श्रोता व वक्ता असे एकमेकाशी परम नम्रतेने व प्रेमाने वागतात तेथे दोघेही 'वचन अगोचर सुख अनुभवती' (२।१०८।४पहा) मानसांत ही गोष्ट वारंवार दाखविली आहे. (क) निज सेवक जाणुनि- निज = नित्य 'स्वके नित्ये निजं त्रिषु' (अमरे) भाव हा की आपण मला नाथ, प्रभु! असे म्हणता ते आपल्या मोठेपणाला साजेसेच आहे पण ते शब्द माझ्या कानाला गोड नाही वाटत. मी जरि पक्षिराजा असलो व हरिवाहन असलो तरि मी नित्य निरंतर आपला सेवक आहे हे जाणून माझे, आपल्या नित्य सेवकाचे, कल्याण व्हावे म्हणून माझ्या प्रश्नांचे विवरण करावे.

(२) सप्त प्रश्न- महा अजय संसार रिपुला जिंकून सुख संदोह होण्याच्या मार्गात सातच गोष्टी विचारणीय आहेत. १) शरीर हे भोगायतन- जीवाने भोग भोगण्याचे घर- स्थान आहे. 'शरीरं सुखदुःखानां भोगायतनमुच्यते' २) अनुकूल (सुखदायक) भोग ३) प्रतिकूल (दुःखदायक) भोग. ४)भोक्ता- जीव सद्गुणी, दुर्गुणी, सज्जन, दुर्जन, दैवीसंपत्तिमान्, आसुरी संपत्तिमान, राक्षसी संपत्तिमान, मिश्रसंपत्तिमान इ. असू शकतो. ५) अनुकूल = सुखदायक, भोगाचे कारण (धर्म, पुण्य) ६) प्रतिकूल दुःखद भोगाचे कारण (अधर्म, पाप) ७) भोक्त्याच्या दुःखमय अवस्थेचे कारण (व ते नष्ट करण्याचा व शुद्धसुख प्राप्तीचा उपाय). या सात गोष्टी संबधीच सात प्रश्न विचारले जात आहेत. मानवाला ऐहिक सुखोपभोगार्थ पाचच गोष्टींची आवश्यकता असते. 'आरोग्यं च सुविद्या च संपत्तिः संततिस्तथा। ऐक्येन लभ्यं स्वारथ्यंच नान्यच्छष्टं

कदाचन।।' याप्रमाणे दुःखरहित, पूर्ण, शाश्वत सुखप्राप्तीसाठी वरील सात गोष्टींचाच विचार करण्याने भागण्यासारखे आहे.

हिं. *।प्रथमहिं कहहु नाथ मति धीरा।सब ते दुर्लभ कवन सरीरा।।३।।*
।बड दुख कवन कवन सुख भारी।सोउ संछेपहि कहहु बिचारी।।४।।

म. *।प्रथमहि वदा नाथ! मति धीर।सर्वीं दुर्लभ कवण शरीर।।३।।*
।मोठे दुःख कवण सुख भारी।तें संक्षेपे वदा बिचारीं।।४।।

अर्थ- हे धीर बुद्धि नाथ! पहिल्यानेच हे सांगावे की सर्वांत दुर्लभ शरीर कोणते.।।३।। सर्वांत मोठे दुःख कोणते व सर्वांत मोठे सुख कोणते ते विचार करुन संक्षेपाने सांगा.।।४।।

टीका. चौ.३ (१) मति धीर = सात्विक धृति संपन्न. हा सर्वसाधारण अर्थ आहे पण सगुणभक्तिमार्गाच्या दृष्टीने 'प्रभूप्रभाव विदित मति धीरा' (१।५३।२) प्रभूचा प्रभाव ज्याला माहीत असेल तो धीरमति. भाव हा की आपण प्रभूचा प्रभाव प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेला आहे त्याचे ज्ञान आपल्याला आहे इतके जगांत कोणालाही नाही. (क) नाथ! माझ्या प्रश्नांचे विवरण करुन माझे पूर्ण समाधान करुन मला सनाथ करील असा जगांत दुसरा कोणी नाही, कारण नारद देवर्षींनी मला आश्रय दिला नाही. ब्रह्मदेवांनी शंकरांची वाट दाखविली व शंकरानी तुमच्याकडे बोट दाखविले. दाखविले की आपल्या स्वतःच्या सद्गुरुशिवाय इतर कोणी आपले समाधान करु शकणार नाही अशी अनन्यगतिक निष्ठा गुरुंच्या ठिकाणी शिष्याची पाहिजे.

(२) प्रथमचि वदा- शरीर कोणते श्रेष्ठ हा प्रश्न प्रथम विचारण्याचे कारण हेंच कीं 'शरीरमाद्यं खलु सर्वसाधनम्' सर्व साधन करावयाचे व सुख दुःखभोग भोगण्याचे जे स्थान ते साध्याच्या दृष्टीने जितके जास्तीत जास्त अनुकूल असेल तितके साध्य लवकर सिद्ध होईल. शरीर सर्व साधनांत आद्य = पहिले आहे, म्हणून प्रथम शरीराविषयीं प्रश्न विचारणेच योग्य आहे. (क) सर्वीं दुर्लभ कवण शरीर- श्रीरघुनाथांनी सांगितले की 'बहुभाग्ये मानुष तनु मिळली। सुर दुर्लभ सद्ग्रंथि गाइली' (७।४३।७) हे गरुडाने रामचरितमानसांत श्रवण केले असले तरि प्रभूंनी सर्वांत दुर्लभ असे म्हटले आणि भुशुंडीने प्रभूच्या उदरांत

अनंत ब्रह्मांडे पाहिली त्यांत मनुष्य शरीरापेक्षा श्रेष्ठ शरीर नसेल कशावरुन असे वाटले म्हणून हा प्रश्न विचारला. याप्रमाणे आद्य साधन, भोगायतन जे शरीर त्याविषयीं आद्य प्रश्न विचारला. शरीरगृहांत राहून जीवाला सुखदुःख भोग भोगावे लागतात, म्हणून आता त्या विषयी प्रश्न विचारतात.

चौ.४ (१) मोठे दुःख कवण- सर्वांत मोठे दुःख कोणते? 'पावति दुःख परम ते.' (७।४३) असे श्रीरघुनाथवचन ऐकले. 'दुःसह दुःख जन्मतां मरतां' (७।१०९।७) असे महाकाल शिववचन ऐकले. अशीच अनेक प्रकारची वचने मानसांत ऐकली म्हणून हा प्रश्न विचारला. (क) 'सुखदुःखे समे कृत्वा', 'सुखदुःखानां भोगायतनं' असा 'सुखदुःख' म्हणण्याचा प्रघात असता येथे दुःखाचा उल्लेख आधीं करुन सुचविले की 'सुख पाहतां जवापाडें दुःख पर्वता एवढे' जीवाला सुखापेक्षा दुखःच जास्त भोगावे लागते. (ख) कवण सुख भारी- 'इह पर लोकी सुख वांछा जर' (७।४५।१) 'मोक्ष सकल सुखखाण' (८३) 'असि हरिभगति सुगम सुखदाई' (११९।१०) सुखाविषयी अशी विविध वचने ऐकली म्हणून विचारले की सर्वांत मोठे श्रेष्ठ सुख कोणते? कारण की सर्वांत मोठे सुख कोणते हे ऐकण्यास सापडले नाही. सुख दुःखाचे अनुभव सर्वच जीवांना येतात. पण एक ज्याला मोठे सुख म्हणतो त्याला दुसरा मनुष्य मोठे दुःख समजतो व सर्वांस अनुभव फक्त एकाच देहांतले. तुम्ही अनेक योनींत जन्म घेतलेत व तुम्हाला अनेक जन्मांची आठवण आहे, म्हणून तुम्ही स्वानुभवाने तुलनेने जसे सांगू शकाल तसे इतरांस सांगता येणार नाही. या दोन प्रश्नांची उत्तरे संक्षेपाने दिली तरि चालतील. कारण सुख म्हणजे काय, दुःख म्हणजे काय वगैरे सर्वांना माहीत असतेच. आता तीन चौपायांत आणखी चार प्रश्न विचारतात.

हिं. *।संत असंत मरम तुम्ह जानहु।तिन्ह कर सहज सुभाव बखानहु।।५।।*
।कवन पुन्य श्रुति बिदित बिसाला।कहहु कवन अघ परम कराला।।६।।
।मानस रोग कहहु समुझाई।तुम्ह सर्बग्य कृपा अधिकाई।।७।।

म. *।संत असंत मर्म तुम्हिं जाणां।सहज-स्वभाव त्यांचा बाना।।५।।*
।पुण्य महा श्रुति-विदित कोणते।वदा घोर अति पाप कवण तें।।६।।
।सांगा मानस रोग सविस्तर।तुम्हिं सर्वज्ञ कृपा अति मजवर।।७।।

अर्थ- संत आणि असंत (खल, दुर्जन) यांचे मर्म तुम्हीं जाणतां, म्हणून त्यांचा सहज स्वभाव वर्णन करुन सांगा.।।५।। वेदांनी वर्णिलेले सर्वात मोठे पुण्य कोणते? आणि (वेदानीं वर्णिलेले) सर्वात अति घोर पातक कोणते ते सांगा.।।६।। (आणि शेवटी मानस रोगांचे सविस्तर वर्णन करुन सांगा. तुम्ही सर्वज्ञ आहांत आणि माझ्यावर तुमची अतिशय कृपा आहे (म्हणून विचारले).।।७।।

टीका. चौ.५ (१) संत असंत मर्म- मर्म = रहस्य. संत गुणांचे व असंतांच्या अवगुणांचे विस्तृत वर्णन यापूर्वी केले आहे पण शेवटी शेरा मारला आहे की 'खल अघ अगुण, साधुगुण, वर्णन। दोन अपार पयोधिच ठाव न' (१।६१) संतांचे गुण अगणित व अगाध सागरासारखे आहेत व असंतांचे = खलांचे अवगुण व पापें अगणित व सागराप्रमाणे अगाध आहेत त्यामुळे किती गुण प्राप्त झाले म्हणजे संतपणा येईल व किती दोष त्यागले म्हणजे दुर्जनपणा जाईल हे ठरविणे अशक्य आहे. ईश सृष्टी गुणदोष मिश्रित आहे. प्रत्येक जीवाच्या ठिकाणी काही गुण व काही दोष असतातच. हंसाची पुष्कळ लक्षणें सांगितली तरि ती पूरी पडणार नाहीत पण नीरक्षीर विवेक हे त्याचे मर्म समजले म्हणजे इतर गुणदोष न पाहतां हंस ओळखतां येतो. गुणदोषांवरुन संत असंत कळणे फार कठिण आहे म्हणून मर्म विचारले. (क) तुम्हिं जाणां- तुम्ही स्वतः संत व असंत (खल) यांच्या राहणीचा अनुभव घेतला आहे. 'मी खल मल संकुल मति। नीच जाति वश मोह' (७।१०५) असा स्वतःच्या खल जन्मांतील तुमचा अनुभव आहे व शंकरांनी प्रशंसा करण्यासारखे संत आहांत. त्यामुळे तुम्हीं संत असंत मर्म स्वानुभवाने सांगू शकाल, तसे इतरांस सांगतां येणार नाही. (ख) त्यांचा सहज स्वभाव- सहज स्वभाव म्हणजेच मर्म, भुंकणे व पुच्छ वाकडे असणे कुत्र्याचा सहज स्वभाव आहे, नीरक्षीर विवेक हंसाचा जन्मजात स्वभाव आहे. पंचम स्वरात वसंत ऋतूंत आलाप करणे कोकिळेचा सहज स्वभाव आहे म्हणजेच त्यांचे ते मर्म आहे. तसा संतांचा सहज स्वभाव व असंतांचा सहज स्वभाव सांगा. अभ्यासाने मिळविलेले गुण म्हणजे सहज स्वभाव नव्हे.

(२) भोगायतन शरीर, दोन प्रकारचे भोग म्हणजे दुःखभोग व सुखभोग व ते भोगणारा भोक्ता संत, असंत किंवा मिश्र असू शकतो, म्हणून या चार

गोष्टींविषयी चार प्रश्न विचारले. दुःख भोगांचे कारण 'करिति पाप पावति दुःख भय रुज वियोग शोक' (१००रा.) हे ऐकले आहे आणि 'सुख वांछिति मूढ न धर्मरति' (१०२।२) असे ऐकले आहे, धर्माने सुख होते, धर्म = पुण्य. मोठ्यात मोठे पुण्य केले की मोठ्यात मोठे सुख मिळेल व मोठ्यात मोठे पाप करणाराला मोठ्यात मोठे दुःख होईल असा विचार करुन आता दोन प्रश्न विचारतो.

चौ.६ (१) पुण्य महा श्रुतिविदित कोणते- पुण्य किंवा पाप कशाच्या आधाराने ठरवावयाचे हे येथे 'श्रुतिविदित' शब्दाने सांगितले आहे. श्रुतिस्मृतिपुराण ज्याला पुण्य म्हणतात ते पुण्य व ज्याला पाप म्हणतात ते पाप. श्रुतिस्मतिपुराणोक्त सर्वांत मोठे पुण्य कोणते? हा पाचवा प्रश्न विचारला. (क) वदा घोर अति पाप कवण ते- श्रुतिविदित सर्वात घोर पाप कोणते हा साहवा प्रश्न विचारला. सर्वांत मोठे पाप न म्हणता अति घोर म्हटले कारण घोर-कराल पापाचा परिणाम घोर- भयंकर दुःख भोगावे लागते. (ख) भक्ति चिंतामणि प्रकरणी ऐकले कीं तो ज्याच्या हृदयांत राहिला असेल त्याला 'व्यापिति मानस रोग न भारी। ज्यां वश जीवां दुःखे सारी' भोक्त्याच्या दुःखाचे कारण पाप असते व सर्वांच्या दुःखाचे कारण मानस रोग असतात इतके ऐकले आहे त्यावरुन ठरले की पाप करण्याची जी प्रवृत्ती होते ती मानस रोगामुळेच होत असली पाहिजे. मानसरोग होऊ दिले नाहीत किंवा असतील ते बरे केले म्हणजे दुःख मुळीच होणार नाही. पण मानस रोग कोणते त्यांची लक्षणे काय व ते रोग बरे कशाने होतात हे अनुभवी वक्त्याकडून कळणे जरुर असल्याने आता शेवटचा प्रश्न विचारतात.

चौ.७ (१) तुम्हिं सर्वज्ञ- 'तुम्हिं सर्वज्ञ तज्ञ तमपारहि' (९४।१) असे गरुडाने पूर्वीही भुशुंडीला म्हटले आहे. ज्ञानाचे सर्व प्रकारचे विभाग व त्यांचे भेद तुला साधनांचे कष्ट न करतां कळतील असा वर प्रभूंनी भुशूंडीला दिल्याचे गरुडाने ऐकले आहे. (८५।७-८ टी.पहा.) म्हणून येथे आणि पूर्वी सर्वज्ञ म्हटले. (क) सांगा मानस रोग- भक्ति चिंतामणी निरुपणांत सांगितले गेले की 'व्यापिति मानस रोग न भारी। ज्यावंश जीवां दुःखे सारीं' मानस रोग हे नाव नवीनच ऐकले. ते रोग कोणते याविषयी काहीं कल्पना सुद्धां करता आली नाही, आणि

सर्व जीवांना ते सर्व भारी रोग झालेले असतात हे ऐकून तर आश्चर्यच वाटले कारण १।२ देह रोग माणसांस होतात हे माहीत आहे पण सगळे भारी रोग एकाच वेळी होत नाहीत म्हणून (ख) सविस्तर सांगा- रोगांची नावे कारण, साध्या साध्यता औषध, वैद्य, पथ्य, अनुपान, रोगनिवृत्ति झाल्याची लक्षणें इत्यादि सर्व मला समजेल असा विस्तार करुन सांगा. (ग) कृपा अति मजवर- आपली माझ्यावर अतिशय कृपा आहे हे जाणून मी हे प्रश्न विचारले आहेत. प्रश्नांच्या उपक्रमांत 'जर कृपाल मजवरती भाव' असे म्हटले आहे. आता भुशुंडी या सात प्रश्नांची उत्तरे क्रमशः देतील.

सप्त प्रश्नांची उत्तरे

हिं. *।सुनहु तात सादर अति प्रीती।मैं संछेप कहउँ यह नीती।।८।।*
।नर तन राम नहिं कवनिउ देही।जीव चराचर जाचत तेही।।९।।
।नरक स्वर्ग अपवर्ग निसेनी।ग्यान बिराग भगति सुभ देनी।।१०।।

म. *।श्रुणु ताता! सादर सुप्रीतीं।मी संक्षिप्त वदें ही नीती।।८।।*
।नरतनु सम नहि देह दुजावर।तया याचिती जीव चराचर।।९।।
।नर्क-नाक-अपवर्गा निसणी।ज्ञान विराग भक्ति शुभ देणी।।१०।।

अर्थ- हे ताता! आदराने व अति प्रीतीने श्रवण करा, मी आदराने व अति प्रीतीने ही नीति थोडक्यात (संक्षिप्त) सांगतो.।।८।। नरदेहासारखा किंवा त्याच्याहून श्रेष्ठ (वर) दुसरा देह नाही. त्याची याचना सर्व चराचर जीव करीत असतात.।।९।। नरतनु नर्क स्वर्ग (नाक) व मोक्ष (अपवर्ग) यांची (यांच्याकडे नेणारी) शिडी (निसण = निःश्रेणी) आहे आणि ज्ञान वैराग्य व सुंदर भक्ती (= प्रेमभक्ति) देणारी आहे.।।१०।।

टीका. चौ.८ (१) ताता! येथे हे संबोधन आदर प्रदर्शक आहे. (क) 'सादर सुप्रीती' हे शब्द पुढील चरणांतही घेणे योग्य आहे. सुप्रीती = सु = अति, प्रीती = प्रीतीने. प्रीतीने व आदराने श्रवण केल्याशिवाय श्रवणाचा लाभ पदरांत पडत नाही. 'ऐका मतिमन चित्ता लाउनि' (३।१५।१ टी.प.) (ख) ही नीती- गरुडाने विचारलेल्या सर्व प्रश्नांचा संबंध धर्मनीतीशी आहे, म्हणून सांगतात की तुम्ही जे प्रश्न विचारलेत त्याविषयी जी नीति आहे ती मी आता

संक्षेपाने सांगतो, माझे तुमच्यावर जे प्रेम आहे व तुमच्याबद्दल मला जो आदर वाटतो त्या अत्यंत प्रेमामुळे मी आदराने सांगतो.

चौ.९ (१) देहदुजा- इतर कोणताही देह नाही. दिह = माखणे, लेप देणे या धातूपासून देह = माखणारा, लेप देणारा, केलेल्या कर्मांचा लेप देणारा. इतर सर्व शरीरे भोग योनि आहेत, त्यात नवीन पुण्य किंवा पाप इत्यादि काही करता येत नाही व त्या शरीरानी जे कर्म घडेल त्याचे फळ त्या जीवास भोगावे लागत नाही, त्या शरीरांत केलेल्या कर्माचा लेप जीवाला लागत नाही. नरदेहच धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्र आहे. देवशरीर पुण्याचे फळ भोगण्यासाठी मिळते. इतर शरीरें पापांचे फळ भोगण्यासाठी मिळतात. 'आकरिं चार, लाख चौऱ्यायशी। योनी भ्रमे जीव अविनाशी।। फिरे सदा मायेने प्रेरित। प्रकृति काल कर्म गुण घेरित।। कधिं तरि करुणेने नरदेहीं। धाडि ईश, विण हेतू स्नेही।।' (७।४४।४-६) नरदेह जीवानां आपल्या कर्तृत्वाच्या बळावर मिळत नाही, केव्हा तरि ईश्वर कृपा करुन देतो. हा एकच देह 'साधन धाम दार मोक्षाचें' (७।४३।८) आहे. 'नर तनु भव वारिधींत तारुं' (७।४४।७) यामुळेच नरतनु इतर सर्व शरीरांपेक्षा श्रेष्ठ आहे. (क) तया याचिती जीव चराचर- चर = जंगम, अचर = स्थावर. मनुष्याशिवाय बाकीच्या सर्व योनींतील जीव ईश्वराजवळ याचना करीत असतात की आम्हाला क्षमा करुन, आमच्यावर दया करुन आम्हाला नरदेह दे, आम्ही तुला विसरणार नाही, व नरदेहाचे सार्थक करुन कृतार्थ होऊ. याने येथे सुचविले की नरतनु जीवाला प्रयत्न लभ्य नसून ईश्वरकृपालभ्य आहे. या चौपाईंत सिद्धान्ताचा उपक्रम करुन उपपत्ति व अपूर्वता सांगितली आहे.

चौ.१० (१) नर्क = कोणत्याही योनींत जन्मास घातल्याने ज्या घोर, महापातकादि पापांचे क्षालन होऊ शकत नाही अशा पापांची शिक्षा भोगण्याची जी स्थाने ते नर्क. सर्वांत खालचा अत्यंत कराल असा 'अवीचि' नर्क आहे. त्यावर महाकाल, अंबरीष, रौरव, महारौरव, कालसूत्र व अंध तामिस्त्र असे सात मुख्य नर्क आहेत व या सर्वांत पुन्हा भेद आहेतच. याना महानर्क म्हणतात. (क) नाक = स्वर्ग. असाधारण पुण्याचे फळ भोगण्यासाठी जी स्थाने आहेत ते स्वर्ग लोक. (ख) अपवर्ग = मोक्ष, निर्गुण सायुज्य, अति दुर्लभ कैवल्य परम पद.

(ग) निसणी = निसण, निःश्रेणी (सं.) = शिडी. शिडीचा जसा उपयोग करावा, जिकडे लावावी त्याप्रमाणे ती नीच, उच्च, अत्युच्य ठिकाणी जाण्यास मदत करते. उंच ठिकाणी चढण्यास, किंवा शौच कूपांतल्या घाणीत जाण्यास तिचा उपयोग होतो. नरतनुरूपी शिडी नर्कांत जाण्यास, स्वर्गांत जाण्यास किंवा मोक्षपद गाठण्यास उपयोगी पडते. शिडीचा उपयोग करण्याचे स्वातंत्र्य जसे मनुष्याला आहे तसेच नरदेहाचा उपयोग करण्याचे स्वातंत्र्य नर जीवांना आहे तसे देव व इतर देहधारी जीवांना नाही. प्रारब्ध कर्म, काळ, ईश्वर, यांत ढवळाढवळ करीत नाहीत. भाव हा की नर्कांत जाणे, स्वर्गात जाणे किंवा मोक्ष मिळवणे या गोष्टी मनुष्याच्या प्रयत्नांवर अवलंबून आहेत.

(२) ज्ञान विराग भक्ति शुभ देणी- देणी = देणारी. शुभ भक्ति = प्रेमभक्ति. मोक्षासाठी अत्यावश्यक असलेले ज्ञान व वैराग्य नरदेहांत मिळू शकते. इतर शरीरातील जीवांना या गोष्टी मिळण्यासारख्या नाहीत. ज्ञान वैराग्य व भक्ति यांची प्राप्ति कशी करता येते हे पूर्वी अनेक वेळा सांगितले गेले आहे. 'इतर देह ते काबाड। नरदेह मोठे घबाड। परंतु पाहिजे जाड। विवेक रचना' (दा.बो.) प्रत्येक प्रसिद्ध संताच्या ग्रंथात नरदेहाची महती वर्णिली आहे.

हिं. ।सो तनु धरि हरि भजहि न जे नर।होहिं बिषयरत मंद मंदतर।।११।।
।काँच किरिच बदलें ते लेहीं।कर ते डारि परसमनि देहीं।।१२।।

म. ।ती तनुधर हरि भजति न जे नर।होति विषयरत मंद मंदतर।।११।।
।काचखंड ते बदला घेती।करगत परीस फेकुन देती।।१२।।

अर्थ- ती तनु धारण केलेले जे मनुष्य हरीचे भजन करीत नाहीत व विषयरत होतात ते मंदमति होत व ते अधिकाधिक मंद जड होत जातात.।।११।। ते मनुष्य काचेचे तुकडे बदला घेऊन हातात असलेला परीस (स्पर्शमणि) फेकून देतात.।।१२।।

टीका. चौ.११ (१) ती तनु- देवांना सुद्धा दुर्लभ असलेली व 'ज्ञानविरागभक्ति' शुभ देणी असलेली नरतनु, ईशकृपेने बहुभाग्याने जी मिळते ती मिळून जे हरिला भजत नाहीत आणि विषयांना भजतात ते मूर्ख, मूढ होत.

'नरतनुचे फळ विषय न भाई। स्वर्गहि अल्प अंति दुखदाई।। नरतनु मिळूनि विषयि मन देती। सुधा देति ते शठ विष घेती.' पशू सुद्धां उत्तम भक्ष्य टाकून देऊन धोतरा, तंबाखू, शिताफळीचा पाला इत्यादि विषारी वनस्पती हिरव्यागार असल्या तरि तोंड सुद्धा लावीत नाहीत. ७।११५।३-४ पहा. (क) होती मंदतर- ज्यांनी एकदां ही शिडी विषयभोगांकडे खाली लावली ते दिवसेंदिवस विषयगर्तेत अधिकाधिक खोल जातात, अधिकाधिक मंद मूढ बनत अधोगतीला जातात. या चौपाईत अभ्यास व महतीचे वर्णन आहे.

चौ.१२ (१) ते = हरिभजनाचा त्याग करुन विषयरत होणारे मंद कसा व किती मूर्खपणा करतात ते येथे दृष्टान्ताने सांगितले आहे. (क) परीस- परिसाच्या स्पर्शाने लोखंडासारख्या हलक्या धातूला शुद्ध सुवर्णत्व येते. मनुष्य कितीही हीन अधम असला तरि हरिभजनरूपी परिसाच्या संपर्काने तो सोन्यासारखा निर्मल व मूल्यवान होतो. लोखंडाचे सोने करण्यास परीसच पाहिजे तसा संसारी जीवाला शुद्ध निर्मल करुन नराचा नारायण बनविण्यास हरिभजनाशिवाय दुसरा उपाय नाही. (ख) करगत परीस फेकुन देती- करगत हातात-मुठीत असलेला. परीस मुठींत असावा तसे हरिभजन करणे जीवाच्या अगदी स्वाधीन आहे. परिसाने लोखंडाचे सोने करण्यास जसे कष्ट नाहीत तसे हरिभजनाने भव तरुन जाण्यात मुळीच कष्ट नाहीत. परीस अति दुर्मिळ पण 'बंधु! सुलभ सुखद हा मार्गहि' हरिभजन कोणालाही सुलभ आहे. असे असतां जे हरिभजनाचा त्याग करुन अपूर्व परीस टाकून देऊन विषयासक्त होतात ते काचखंड बदला घेती- काचेचे तुकडे त्याच्या बदलीं घेतात. काचेच्या तुकड्यांनी लोखंडाचे सोने होत नाही. काचेचे तुकडे चकाकतात व सुंदर वाटतात, पण प्रेमाने मुठींत आवळले खाली पडून त्यावर पाय पडला तर हात पाय कापले जाणार, पोटात गेले तर प्राण घेणार, तसेच सर्व विषय हे आकर्षक व सुंदर वाटणारे काचेचे तुकडे आहेत त्या काचेच्या तुकड्यांच्या आशेने हरिभजनरूपी स्पर्श मण्याला फेकून देणारा महामूर्ख, हास्यास्पद ठरतो. 'तया भला कधिं म्हणे न कोणी। गुंजा घेइ परिस टाकोनी' (७।४४।३) 'सर्वी दुर्लभ कवण शरीर' या पहिल्या प्रश्नांचे उत्तर येथपर्यंत दिले. आता एका चौपाईत पुढल्या दोन प्रश्नांची उत्तरे देतील.

हिं. ।नहिं दरिद्र सम दुख जग माहीं।संत मिलन सम सुख जग नाहीं।।१३।।

।पर उपकार बचन मन काया।संत सहज सुभाउ खगराया।।१४।।
।संत सहहिं दुख परहित लागी।परदुख हेतु असंत अभागी।।१५।।

म. *।दारिद्य्रा सम जगीं दुःख ना।संत भेटी सम जगात सुख ना।।१३।।*
।पर-उपकार वचन मन काया।प्रकृतिं सहज संता खगराया!।।१४।।
।संत सहति दुख परहित लागी।परदुःस्वार्थ असंत अभागी।।१५।।

अर्थ- दारिद्र्यासारखे दुसरे दुःख जगांत नाही, आणि संतांच्या भेटीसारखे दुसरे सुख जगात नाही.।।१३।। खगराजा! वाणीने मनाने व कर्माने परोपकार करणे हा संतांचा सहज स्वभाव होय.।।१४।। संत परहितासाठी दुःख सहन करतात व अभागी असंत (खल) दुसऱ्यांना दुःख देण्यासाठी दुःख सोसतात (हा असंतांचा सहज स्वभाव आहे).।।१५।।

टीका. चौ.१३ (१) दारिद्र्यासम दुःख ना- दारिद्र्य म्हणजे धन संपत्तीचा अभाव. धन नसले म्हणजे जीवित कंठणे अति दुःखदायक वाटते असा सर्वसाधारण नियम आहे. दरिद्री माणसाचा समाजांत, नातेवाईकांत अपमान तिरस्कार केला जातो इ. गोष्टीमुळे 'दारिद्र्यात् मरणं वरं वरम्' दरिद्र्यापेक्षा मरण चांगले असे वाटणे ही गोष्ट खरी आहे. या दृष्टीनेच टीकाकार येथेहि दारिद्र्य म्हणजे धनाचा अभाव असा अर्थ घेतात, व हा अर्थ व्यवहारात चूक नाही, पण येथे प्रकरण संदर्भानुसार हा अर्थ योग्य नाही. येथे फार तर गौण अर्थ म्हणून तो घेता येईल.

(२) हरिभजनाचा त्याग करुन विषयासक्त होतील ते महामूर्ख हे मागील दोन चौपायांत दाखविले. धन हे विषय संपादन करण्याचे प्रमुख साधन आहे. असे असता धनाची आवश्यकता सूचित करणे पूर्व संदर्भ-विरोधी आहे. 'संत भेटी सारखे दुसरे मोठे सुख नाही' हा पुढील चरण आहे. दरिद्री माणसाला संत भेटले असतां त्याचे दारिद्र्य दुख नष्ट झाले पाहिजे, कारण की सुख व दुःख या गोष्टी प्रकाश व अंधार यांच्यासारख्या परस्पर विरोधी आहेत. धनाच्या अभावाला जर परम दुःख म्हटले तर भरपूर धन असणे हे परम सुख म्हणावे लागेल, पण व्यवहारात ही तसे घडत नाही. आणि हे दारिद्र्य जर परम दुःख असते तर मनु, सत्यकेतु याच्यासारखे सम्राट साम्राज्याचा त्याग करुन अति

दरिद्री, अकिंचन झाले नसते, म्हणून धनाच्या दारिद्र्याला सर्वांत मोठे दुःख म्हणता येत नाही. 'रमाविलास राम-अनुरागी। त्यजिति वमन सभ जन बहुभागी' 'शोकसमाज राज्य का गणना?' 'अधन भिकारी तुम्हा सम अगृही। होति विरंचि शिवहि संदेही' (१।१६१।४) या मानसांतील इतर ठिकाणच्या वचनांशीही विरोध येतो. तसेच 'अकिंचनो वितृष्णश्च सुखं स्वपिति रात्रौ' 'अर्थमनर्थ भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यं' 'स्तेयं हिंसाऽनृतं दंभः कामः क्रोधः स्मयो मदः। भेदो वैरमविश्वासः संस्पर्धा व्यसनानि (स्त्री, द्यूत मद्य) च।। एते पंचमशाऽनर्था नित्यमर्थेषु संत्रिताः' (भाग.११।२३।१८-१९) इत्यादि संतपुराण वचनें निर्धनतेला व्यवहारात सुद्धा परम दुःख मानीत नाहीत.

(३) सप्तप्रश्न प्रकरण- 'बघ खगेश चिंतून' या सूचनेमुळे ज्ञानदीप व भक्तिचिंतामणी या प्रकरणाचे अपत्य आहे. येथे वक्ता भुशुंडी आहे व श्रोता गरुड आहे. भुशुंडीनेच गरुडालाच दारिद्र्य कोणते ते भक्तिचिंतामणी प्रकरणांतच सांगितले आहे. 'निकट मोहदारिद्र्य येत ना' म्हणून दारिद्र्य = मोह हाच अर्थ घेणे भाग आहे. हा अर्थ घेतला म्हणजे विसंगति पूर्वापार संदर्भ विरोध इ. दोष उत्पन्न होत नाहीत. 'अज्ञान दारिद्र्य माझे सरे ना। तुजविण रामा मज कंठवेना' (समर्थ) मोह असेपर्यंत नवकोटिनारायण सुद्धा दुःखी असणारच. 'मोह सकल रोगांचे मूळहि' निर्मोह झालेला नंगा फकीर, अवधूत सुद्धा दुःखहीन स्वानंद सम्राट असतो. भुशुंडीच म्हणाला आहे की 'प्रथम मोह बहु छळी मलाही। रामविमुख, सुखनिद्रा नाहीं' (७।९६।६) भुशुंडीच म्हणाला की मोह होता तो पर्यंत सुखलेश नव्हता, मोहाने फार दुःख दिले व याच प्रकरणांत म्हणतो की 'मोह सकल रोगांचे मूळहि। जेथुनि बहु उद्भवती शूलहि' मोहरुपी दारिद्र्यासारखे दुसरे मोठे दुःख जगांत नाही. (क) जगीं = जगांत, जग = जंगम, गतिशील, अविचि नरकापासून ब्रह्मलोकापर्यंत असलेले सर्व काही गतिशील आहे, कोणालाहि विश्रांति नाही. जो पर्यंत मोह दारिद्र्य असते तोपर्यंत गमनागमन, जन्ममरण जराव्याधि इत्यादि सर्व दुःखे, त्रिविध ताप असतातच.

(४) संतभेटीसम जगांत सुख ना- संताच्या भेटीसारखे, संत समागमासारखे मोठे सुख जगात नाही. भाव हा आहे की सर्व दुःखाचे मूळ जसे

मोहरुपी दारिद्र्य तसे सर्व सुखाचे मूळ संतभेट, संत समागम. 'गाती वेद पुराण सुख कि होइ हरिभक्तिविण' (७।८९रा.) पण दुःखनाश झाल्याशिवाय सुखलाभ नाही आणि 'भक्ति स्वतंत्र सब सुखदानी' असली तरि 'विण सत्संग न पावे प्राणी' (७।४५।५) सर्व सुखाचे मूळ हरिभक्ती, हरिभक्तीचे मूळ सत्संग आणि सत्संगाचे मूळ संतांची भेट, म्हणून सर्व सुखाचे मूळ संतांची भेट. कारण 'विण सत्संग न हरिकथा त्याविण मोह न जात।। मोहनाशविण रामपदिं दृढ अनुराग न तात.' (७।६१) दृढ अनुराग = अनपायिनी भक्ति. म्हणूनच लंकिनी म्हणाली की 'स्वर्गमोक्ष सुख घालिता एका तुलांगि तात!।। सकल मिळुनि ना तोलवे सुख लव सत्संगात' (५।४।-) 'संतसंग अपवर्गपथ कामी भवाब्धि-पंथ। वदति संत कवि कोविद श्रुतिपुराण सद्ग्रंथ' (७।३३ श्रीरामवचन) 'बहुभाग्ये सत्संग लाभतो। विनाश्रमहि भव भंग पावतो' (७।३३।८) 'मुख दिसतां पातक हरे, स्पर्शे कर्मविनाश।। श्रवणिं वचन मनमोह गत, मिळे पूर्ण भाग्यास' (वै.सं.अनु.) संतमुख दर्शनाने पातक नाश व त्यांच्या स्पर्शाने कर्मनाश होतो, त्यांच्या वचनांच्या श्रवणाने मनांतला मोह नष्ट होतो, पण अशांची भेट पूर्ण भाग्यवंतालाच होते. सर्वांत मोठे सुख कोणते याचे उत्तर दिले. असे संत ओळखता येतील असे त्यांचे व असंतांचे मर्म म्हणजे सहज स्वभाव आतां सांगतात.

चौ.१४ (१) खगराया! पक्षिराजा. भाव हा की तुम्हाला म्हणजे खगांना आकाशात उडण्याची कला शिकावी लागत नाही. तो खगांचा सहज स्वभाव आहे, जन्मानेच प्राप्त झालेला गुण आहे. संबोधनमिषाने सहज स्वभावाचा दृष्टान्त दिला. अभ्यासोपार्जित ज्ञान, गुण, कला इ. सहज स्वभाव लब्ध ज्ञानादिकांची बरोबरी सुद्धा करु शकत नाहीत. इंग्रजीत सुद्धा म्हणतात की, Teachers and orators are born and not made शिक्षक आणि वक्ते जन्माला येतात, तयार करुन होत नाहीत. संस्कृतात म्हटले आहे की शूर, पंडित, वक्ते आणि दाता हे जन्माला येतात. 'शतेषु जायते शूरः सहस्त्रेषुच पंडितः वक्ता शतसहस्त्रेषु दाता भवति वा न वा' (२) पर-उपकार- यात श्लेष आहे. पर = परमात्मा, 'परोऽरि परमात्मनि' उप = समीप, कार = करणारा. परमात्म्याला जवळ करणारा, परमात्म्याची प्राप्ती करुन देणारा. हा उपकार ज्याने स्वतःवर केला नाही तो दुसऱ्यावर हा उपकार कसा करणार? जे पूर्ण

काम पूर्ण निःस्वार्थ असतील त्यांच्याकडूनच हा प्रकार घडू शकेल. इतरांनी परोपकार केला तरि त्यांत काहीं ना काही स्वार्थाचा अंश व ममतेचा व अहंतेचा संबंध असणारच. अनंत कोटि पूर्वजन्मांच्या संचित कर्मातून व भावी अनंत जन्मांच्या दुःख परंपरांतून जो जीवाला कायमचा सोडवितो व परमानंद साम्राज्याचा अधिपति बनवितो त्या सद्‌गुरु (संता) सारखा उपकार कर्ता जगांत कोण असणार? 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती उपकारे' या अभंगात सुद्धा श्लेष व वरच्या सारखाच अर्थ आहे. 'काय वानू मी या संताचे उपकार। मज निरंतर जागविती' 'करोनी सायास शिकविती' 'आपणा सारिखे करिति तात्काळ' इत्यादि वचने या चौपाईचा व वरील अभंगाचा मुख्य गूढार्थ स्पष्ट करतात. पूर्वीच्या संतानी जे उपकार केले त्याचा विचार करतां येथे उपकार शब्दाचा व्यावहारिक सामान्य अर्थ निरुपोगी ठरतो. कारण की त्यानी कुठे पाठशाळा, शाळागृहे, धर्मशाळा, अन्नछत्रे, सदावर्ते, साधकाश्रम, विद्यार्थी वसतिगृहे, अनाथाश्रम योगविद्यालये, योग कॉलेजे स्थापन करुन किंवा करवून उपकार केले नाहीत. ग्राम सुधारणा, लोकवस्तीतील घाण साफ करणे, फुकट औषधालये, वैद्यकीय मदत देणाऱ्या संस्था, फंड जमविणे, थैल्यासमर्पण करणे, इत्यादि प्रकारचे उपकार केले नाहीत पण-

(२) अनेकांच्या ह्रदयांतील शौचकूप साफ केले, त्यांचे भगवत्प्राप्तीचे रस्ते रुंद, सोपे, स्वच्छ व सुखद सुलभ केले. ते स्वतः मानस रोग संहारक सद्वैद्य बनले. (सद्‌गुरु वैद्य) भवमहारोगहारक औषधे प्रेमाने फुकट दिली, आणि अनेकांना सुख संदोह मोहपर केले. 'तुका म्हणे आम्ही मांडले दुकान। देतो मोले विण सर्व वस्तु' याचा अर्थच वर स्पष्ट केला आहे 'सर्व वस्तु' = परमात्मा. 'दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्‌गुरोर्ज्ञानदातुः' परमार्थज्ञान देणाऱ्या सद्‌गुरूला त्रिभुवनात दृष्टान्त नाहीं (श.श्लोकी) मग त्या ज्ञानापेक्षाही श्रेष्ठ अशी हरिभक्ति देणाऱ्या सद्‌गरुविषयी काय सांगावे? इतर परोपकारकर्ते जे सुख देतात किंवा हित करतात ते सुख व ते हित नश्वर क्षणिक असते. 'बंधु! धर्म परहितसा नाही' (७।४१।१) 'परहित मनिं वसतें ज्यांच्याही। तयां काही जगिं दुर्लभ नाही.' (३।३१।९) या दोन्ही ठिकाणी परहित शब्दाचा व्यावहारिक अर्थही ग्राह्य आहेच. येथील या चौपाईत व्यावहारिक अर्थ गौण आहे इतकाच

फरक.

(३) वचन मनकायां- त्यांनी आपल्या वाणीत, मनात व देहाने घडणाऱ्या कृतीत परमात्म्याला जवळ केलेला असतो व इतरांच्या मन वाणी कर्मात ते परमात्मप्रेम-भक्ति भरतात. (क) ते वाणीने मनाने व कृतीनेही परोपकार करीत असतात. दुसऱ्यांचे दुःख निवारण करून त्यास सुख देण्याचा व त्यांचे हित करण्याचा प्रयत्न ते मनाने वाणीने व कृतीनेही करीत असतात, तसे केल्याशिवाय त्यास रहावत नाही. असा त्यांचा उपजत स्वभाव असतो. (ख) प्रकृति सहज संतां- सहज प्रकृति = सहज स्वभाव, उपजतस्वभाव. हा गुण अशा संतांनी अभ्यासाने मिळविलेला नसतो. अभ्यासाने व संगतीने तो उत्कट होतो इतकेच. संतांचा सहज स्वभाव विचारला होता तो सांगितला. आता संतासंतमर्म सांगून मग असंतांचा सहज स्वभाव सांगतील. (ग) संत उपकार करतात ते सुद्धा काही धर्मवीर, धर्म मार्तंड, सनातन धर्माभिमानी म्हणविणारे, देशभक्त, समाजसेवक, धर्मप्रचारक, सत्याग्रही, इत्यादिकांप्रमाणे स्वतः दुःख कष्ट, स्वार्थहानि न सोसतांच करीत असतील, किंवा भावी मोठ्या स्वार्थलाभाच्या आशेने थोडेसे दुःख अल्पकाळ सोसून, सवंग लोकप्रियता, प्रतिष्ठा, पुढारीपणा इ. मिळविण्यासाठी परोपकार करीत असतील अशा दुष्ट संशयास जागा नसावी म्हणून सांगतात.

चौ.१५ (१) संत- असंत-मर्म विचारले आहे म्हणून दोघांमधील साम्य व भेद एकत्र दाखविला जात आहे. संत आणि खल हे दोघेही दुसऱ्यांसाठी स्वतः दुःखे सहन करतात हे साम्य दिसते, तथापि त्यातील हेतु व परिणाम सूर्याचा स्वच्छ प्रकाश व काळरात्रीचा निबिड अंधार याच्यासारखे अगदी भिन्न असतात. (क) परहित लागी- संत परोपकार करतात त्यात त्यांचा हेतु परहित साधणे हा असतो म्हणजेच परोपकार करून जर परहित झाले नाही तर परोपकार घडला नाही असे ठरेल. (ख) संत सहति दुःख- स्वतः दुःखे सोसून दुसऱ्यांचे हित करण्याचा प्रयत्न करतात दुसऱ्यांचे अहित किंवा दुसऱ्यांस होत असलेले दुःख पाहून संतांचे हृदय द्रवते, त्यांच्या हृदयांस दुःख होते व स्वतः मनाने व कृतीने दुःख कष्ट सोसून दुसऱ्यांचे दुःख दूर करण्याचा व त्यांचे हित करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय त्यांच्या मनाला व देहाला स्वस्थ राहवत नाही ते करीत असतां

आपण परोपकार करीत आहोत असे त्यास वाटत नाही व त्यामुळे त्या परोपकाराबद्दल प्रत्युपकाराची अपेक्षा त्यांच्या चित्तास कधीच शिवत नाही. (ग) परहित = श्रेष्ठहित हा दुसरा अर्थ संतांच्या परोपकारांत मुख्य असतो, व क्षणिक, नश्वर दुःख निवारण करणे व तशाच प्रकारचे हित करणे हा हेतु अगदी गौण असतो. जे हित साधल्यावर पुन्हां अहित होणार नाही तेच उत्तमहित = परहित. पर = उत्तम (अमरे)

(२) परदुःखार्थ असंत अभागी- असंत = दुर्जन दुसऱ्यांना दुःख देण्यासाठी स्वतः दुःख सोसतात म्हणून ते अभागी. 'परपीडेसम अधम न काही' अभागी म्हणण्याचे कारण की मनुष्य शरीर भवभयातून सुटण्याचा प्रयत्न करण्यासाठी ईश्वराने दया करुन दिले असता 'नर तनु पावुनि परां पीडिती। सतत महा भवभया सोशिती'(७।४१।३) म्हणून ते अभागी. (क) संत व असंत हे दोघेही दुसऱ्यांसाठी स्वतःच्या दुःखाची तमा बाळगीत नाहीत व असाधारण कष्ट दुसऱ्यांसाठी सोसतात, पण खल आपले नाक कापून दुसऱ्यांस अपशकुन करतात व संत दुसऱ्यांचे नाक कापले जात असता तो घाव आपल्या हातावर झेलून आपला हात गमावून दुसऱ्याचे नाक वाचवितात. असे हे संत असंत स्वभावाचे मर्म आहे. दोघांतील भेद आता दृष्टान्ताने स्पष्ट करतात.

हिं. *।भूर्ज तरू सम संत कृपाला।परहित निति सह बिपति बिसाला।।१६।।*
।सन इव खल पर बंधन करई।खाल कढाइ बिपति सहि मरई।।१७।।

म. *।भूर्ज तरुसम कृपालु संत हि।परहितिं सहति विपद अति सततहि।।१६।।*
।सण इव खल परबंधन करतो।साल काढवुनि विपदीं मरतो।।१७।।

अर्थ- संत भूर्ज तरुसारखे कृपालु असतात आणि सदा दुसऱ्यांच्या हितासाठी मोठ्या (अति) विपत्ति सोसतात.।।१६।। पण खल सणासारखा (सण = शण = ताग) दुसऱ्यांना बंधन करतो, (व तेवढ्यासाठी) आपल्या अंगाच्या साली काढवून विपत्तिनी मरतो.।।१७।।

टीका. चौ.१६ (१) कृपालु संत- दुसऱ्याचे दुःख पाहिल्याबरोबर त्यांचे हृदय द्रवते, दयेचा पाझर फुटतो, मग ती दुःखी व्यक्ती शत्रुमित्र उदासिन,

सुष्ट दुष्ट, राव रंक कशीही असो यांची कृपाशीलता धाव घेतेच. 'वंदे संत समान मन हित अहित ना कोणी।' (१।३रा.टी.प.) 'नारद शिकविति विकल जयन्ता। येइ दया कोमल मन संता'(२।९). (क) भूर्ज तरुसम- भूर्ज नावाचे तरु (वृक्ष) हिमालय पर्वतांत गंगोत्री, जमनोत्री भागात आहेत. त्यांच्या सालींना भूजपत्र म्हणतात. एक नमुना बारीक तुकडा सोबत जोडला आहे. पातळ कागदासारखे, मृदु गुळगुळीत तुळतुळीत असे अनेक पत्रांचे थर-पदर एकावर एक असतात. साल जितकी लांब रुंद व खोल काढली जाईल त्याप्रमाणे पत्रांची लांबी रुंदी व संख्या कमी जास्त असते. जमनोत्री गंगोत्रीच्या भागांत दुकानात पुड्या बांधण्यासाठी कागदासारखा यांचा उपयोग करतात. एकदा मधलीच साल काढली तरि पुन्हा वाढते. पूर्वी यांचा उपयोग पोथ्या लिहिण्यास करीत असत. १) अद्यापही मंत्रशास्त्रानुसार यंत्रे लिहिण्यास यांचा बराच उपयोग केला जातो. खेडेगावातील दुकानात सुद्धा विकत मिळतात, पण या नमुन्याच्या एवढ्या तुकड्याला २।४ आणे घेतात. 'अति परिचयादवज्ञा' असे त्यांच्या जन्मभूमीत होते. याने हा भाव प्रदर्शित केला आहे की १) असे परोपकारी संत ज्या कुटुंबात, गावात होतात तेथील लोक त्यांचा अनादरच करतात. २) सर्व वृक्षांत भूर्जतरुसारखा महा विपत्ति सहन करीत जिवंत राहून, पुन्हा पुन्हा साली काढणारांच्या सुद्धा उपयोगी पडणारा दुसरा वृक्ष नाही.

(२) परहितिं सहति विपद अति सतत हि- सतत शब्दाने सुचविले की सदा सर्वकाळ परहित साधीत असतात, त्यात त्यांना कंटाळा त्रास वाटत नाही. त्यांचे सर्व जीवन ते दुसऱ्यांच्या हितासाठीच वेचतात. परहितासाठी काही काळ विपत्ति सोशीत असतील असे म्हणण्यास जागा ठेवली नाही. (क) अति विपद- पुष्कळ, मोठ्या विपत्ति. आपल्या अंगाची साल काढली जात असता भूर्ज तरु जसे दुःख कष्ट सोसतो तसे महाकष्ट व दुःखे संत सहन करतात पण परहित, परोपकार केल्याशिवाय राहात नाहीत. किरकोळ, क्षुद्र दुःख कष्ट सोशीत असतील इत्यादि म्हणण्यास जागा ठेवली नाही. भूर्जतरुच्या दृष्टान्ताने निःस्वार्थीपणा सुचविला आहे.

चौ.१७ (१) सण इव खल- संण = शण (संस्कृत) = ताग, तागाचे, अंबाडीचे झाड. भूर्जतरु दीर्घायुषी आहे. पण संण तरु नाही ओषधी आहे, फल

परिपक्व होईपर्यंतच जगणारे झाड आहे. एक वर्ष सुद्धा जगत नाही. भूर्जाच्या साली काढल्यातरी तो दुःख कष्ट सोसून परहितासाठी जगतो. ताग (सण) अल्पकाळच जगतो. त्याला उपटून काढला जातो. नंतर गठ्ठे बांधून पाण्यात दगडांखाली दडपून कुजत ठेवतात, नंतर त्याच्या साली = वाख काढतात. त्या वाखाच्या दोऱ्या, दोरखंडे करतात व त्यांचा उपयोग दुसऱ्यांना बांधण्यात, बंधन घालण्यात होतो. बंधन फार दुःखदायक असते. तागाच्या सुताची जाळी विणून निरपराधी लाखो मासे पकडले व मारले जातात. तसाच एक दुष्ट सुद्धा स्वतःचा विनाश करुन वा करवून घेऊन दुसऱ्या अनेकांच्या दुःखास कारण होतो. शूर्पणखेने आपले नाक कान कापवून घेतलेच पण खरदूषणादि चौदा हजार अजिंक्य राक्षसांच्या वधास कारण बनली आणि रावणाला चिथावणी देऊन कोट्यावधि राक्षसांच्या संहाराचे कारण बनली. ताग जसा अनेक प्रकारच्या हाल अपेष्टा सोसून आपला समूळ विनाश करुन घेऊन दुसऱ्यांस दुःख देतो, दुसऱ्यांच्या विनाशांचे कारण बनतो तसा एक खल किंवा खलांचा समूह दुसऱ्यांच्या अकल्याणासाठीच जन्माला येतो, वाढतो व मरतो. आणखी साम्य व भेद पहा.

हिं. *।खल बिनु स्वारथ पर अपकारी।अहि मूषक इव सुनु उरगारी।।१८।।*
।पर-संपदा बिनासि नसाहीं।जिमि ससि हति हिम उपल बिलाहीं।।१९।।

म. *।विना स्वार्थ खल पर अपकारी।अहि मूषकसा श्रुणु उरगारी।।१८।।*
।परसंपत्ति विनाशुनि नासति।पीक विनाशुनि गारा वितळति।।१९।।

अर्थ- हे उरगारी! ऐक, काही स्वार्थावाचूनच खल सर्प व उंदीर यांच्या प्रमाणे दुसऱ्यांना अपकार (अहित, अकल्याण पीडा) करतो.।।१८।। (पावसाच्या) गारा जशा पिकांचा विनाश करुन वितळून जातात (नष्ट होतात) तसे दुष्ट दुसऱ्यांच्या संपत्तीचा विनाश करुन नाश पावतात.।।१९।।

टीका. चौ.१८ <u>(१)</u> <u>उरगारी</u>! तुम्ही सर्पाचे नैसर्गिक शत्रु आहात, त्यांचा खल स्वभाव तुम्ही जाणताच, तरीपण ऐका. <u>(क)</u> <u>पर- अपकारी</u>- दुसऱ्यांना अपकार करणारे. दुसऱ्यांचा नाश, धनहानि, प्राणहानि करणारे खल होत. ते सर्पासारखे असतात. <u>'सर्पः क्रूरः खलः क्रूरः सर्पात् क्रूरतरः खलः। सर्पो दशति</u>

कालेन दुर्जनस्तु पदे पदे' 'अहो खलभुजंगानां विचित्रोऽयं वधक्रमः। अन्यस्य दशति श्रोत्रं अन्यः प्राणैर्वियुज्यते.' सापापेक्षाही खल अधिक क्रूर असतात. साप केव्हा तरि चावतो, पण दुर्जन पावलो पावली दंश करतो. साप चावतो त्यात त्याचा काही स्वार्थ साधतो असे नाही तसेच खल इतरांचा जो विनाश करतात त्यात त्यांचा काही स्वार्थ साधतात असे नाही. (ख) संत स्वार्थरहित परोपकार करतात तर खल स्वार्थरहित परापकार करतात. स्वार्थरहितता हे दोघांत साम्य आहे, एक परोपकारक निःस्वार्थीपणा व एक परापकारक निःस्वार्थीपणा! असा फरक आहे. सर्प मनुष्याला चावतो त्यात त्याचा काही स्वार्थ नसतो हे खरे आहे पण उंदीर, बेडुक इत्यादींना खातो, मारतो त्यात उदरभरण हा स्वार्थ तरि असतो, पण तसा अस्सल खलाचा स्वार्थ नसतो म्हणजे तो अधिक दुष्ट आहे. संतांच्या उपकार परायणतेला जंगम प्राण्यांत दृष्टान्त नाही हे येथे सुचविले. खलांना सणाचा दृष्टान्त दिला तो स्थावराचा तसा संतानां भुर्जतरुचा दिला पण खलांना सर्प व मूषक या जंगमांचा दृष्टान्त दिला तसा संतानां देण्यास दृष्टान्त नाही म्हणून दिला नाही. सणाच्या व सर्पाच्या दृष्टान्तानी दाखविले की शक्यतो दुसऱ्यांकडून बंधनादि दुःख देववितात. तेवढ्याने समाधान न झाले तर सर्पापेक्षाही क्रूर बनून प्राण घेतात.

(२) अहिमूषक इव- सर्प जन्मतःच सर्व प्राण्यांचा निष्कारण वैरी असतो तसेच दुर्जन सर्वांशीच वैर करतात. पण सर्प जसा मूषकांचा विशेष शत्रु तसे खल संतांशी विशेष वैर करतात. (क) मूषक = उंदीर, हे दुसऱ्यांच्या जीवीताची हानी करीत नाहीत म्हटले तरि चालेल. पण दुसऱ्यांच्या संपत्तीची, वस्त्रे, पुस्तके, धान्य, फार काय पंचायतनांतील शाळिग्राम, गणपती इत्यादि देवांना सुद्धा पळवून नेतात. तसेच दुर्जन इतरांच्या विविध वित्ताची हानि करण्यात पटाईत असतात. उंदीर वस्त्रे फाडून तुकडे नेतात त्यात त्यांचा कधीं कधीं स्वार्थ असतो पण तसा थोडासा स्वार्थ ही परवित्त हानी करण्यात खलांचा नसतो. सर्प मूषक बहुधा शिक्षादंडापासून सुटतात, पण दुर्जन तसे सुटू शकत नाहीत म्हणून आणखी दृष्टान्त देतात.

चौ.१९ (१) परसंपत्ति विनाशुनि नासति- दुसऱ्यांची संपत्ती, ऐश्वर्य भरभराट दुर्जनांस बघवत नाही, त्यामुळे त्यांचा जळफळाट होतो. 'ताप विशेष

फार खलचित्ति। सदा बघुनि पर संपद जळती' (७।३९।३) ७।४०।२-३ पहा. (क) संपत्ति म्हणजे धन इतकाच अर्थ नसून धान्य समृद्धि, कीर्ती, विद्या, संतति, प्रतिष्ठा, भरभराट, सुख, समाधान इत्यादि सर्वांचा अन्तर्भाव संपत्ति शब्दांत येतो. (ख) पीक विनाशुनि गारा वितळति- हाच दृष्टान्त बा.कां.४।७ मध्ये खल स्वभाव वर्णनात दिलेला आहे. तेथे विस्तार पाहावा. या दृष्टान्तांतील भाव ध्यानी येण्यास गारा पडण्याच्या वेळेच्या परिस्थितीकडे पाहणे जरुर आहे, त्यामुळे दुर्जनांच्या परापकारी स्वभावाची स्पष्ट कल्पना करता येईल.

(२) प्रथम आकाशांत काळे कुट्ट ढग जमून दिवसाढवळ्या अंधार पडतो, सूर्य दिसत नाहीसा होतो. मोहजनित मत्सरादिकानी खलांचे हृदय व्यापले जाते, विवेक सूर्य झाकला जातो. (क) नंतर सोसाट्याचा वारा सुटतो. तशी यांच्या हृदयांत द्वेषाची वावटळ सुरु होते. (ख) नंतर विजांचा कडकडाट लखलखाट व मेघांचा गडगडाट सुरु होतो तसा खलांचा दर्प वाढतो व गर्जू लागतात, संताची, दुसऱ्यांची निंदा उघड उघड, कठोर शब्दांनी करु लागतात. (ग) मग गारांचा पाऊस पडू लागतो. त्या गारा आपल्या गारठ्याने, जडतेने व आघातानी, शेतात उभ्या असलेल्या पिकाला झोडून त्याचा विनाश करतात. (घ) गारा आकाशातून खाली पडतात हा त्यांचा घोर अधःपातच असतो. आणि त्या कितीही मोठ्या असल्या तरि त्यांना वितळून त्यांचा पूर्ण विनाश करण्याचे काम वातावरणातील उष्णता करतेच. दुर्जन इतरांच्या सुखसंपत्तीचा विनाश करुन सुखी होतात. 'परहित हानी लाभच वाटत। हर्ष विनाशी, विषाद हि नांदत' (१।४।२) परंतु या राक्षसी सुखाचा आस्वाद घेतात न घेतात तोच दुरतिक्रम काळ त्यांचा विनाश करतो. ते काळाच्यापेक्षा बलवान झाले असले तर भगवान स्वतः त्यांचा विनाश करतात. 'काळरूप मी त्यांना भ्राता!'

(३) मागील दृष्टान्तांतील गूढ भाव येथे प्रगट दिसतात.... १) हे खल गारांच्यासारखे जडमूढ असतात. २)गारांच्यासारखे अल्पकाळ अस्तित्व, ३) गारांची जशी भरभराट कधी होत नाही तशी अशा खलांची ही बहुधा भरभराट होत नाही. ४) गारांना अति उच्च विमल रमणीय अशा आकाशातून एकदम फार खाली पडावे लागते व धुळीत घाणीत पडावे लागते. तसेच परापकारी

खल अत्यंत नीच मलिन अशा अवीचि नर्कापर्यंत पतन पावतात हा ध्वनि येथे आहे. येथपर्यंत संत व असंत यांच्या सहज स्वभावाचे मर्म दृष्टान्तांसह विशद करुन सांगितले. या दोघांचा उदय झाला तर काय होते पहा.

हिं. ।दुष्ट उदय जग आरति हेतू।जथा प्रसिद्ध अधम ग्रह केतू।।२०।।
।संत उदय संतत हितकारी।बिस्वसुखद जिमि इंदु-तमारी।।२१।।

म. ।दुष्ट उदय जगदार्ती-हेतू।प्रथित अधम जैसा ग्रह केतू।।२०।।
।संत उदय संतत हितकारी।विश्व सुखद इव इंदुतमारी।।२१।।

अर्थ- प्रसिद्ध नीच ग्रह जो धुमकेतू त्याचा उदय जसा जगाच्या दुःख पीडांचे कारण होतो तसाच दुष्टांचा उदय जगाच्या दुःखाला कारण होतो.।।२०।। चंद्र व सूर्य यांचा उदय जसा विश्वास सुखदायक असतो तसाच संतांचा उदय विश्वाचे सतत हित करणारा व विश्वाला सुखदायक असतो.।।२१।।
पाठभेद- 'हितकारी' 'सुखकारी'

टीका. चौ.२० <u>(१)</u> <u>दुष्ट उदय..... ग्रहकेतू</u>- अधम ग्रह केतू = नीच धूमकेतू नावाचा ग्रह यांना शेंडेनक्षत्र म्हणतात. प्रथित = प्रसिद्ध. बुध शुक्रादि ग्रहांचेही उदय व अस्त होतात पण ते फारसे कोणास माहीत नसतात. धूमकेतूंची संख्या बुध शुक्रादी ग्रहांच्या मानाने फारच मोठी आहे. तसेच जगांत दुष्ट पुष्कळ असतात पण पुष्कळ धूमकेतूपैकी एखादा केव्हा तरि उदयास येतो पण त्याची प्रसिद्धि फार लवकर होते कारण त्याचा उदय सर्व जगालाच दुःखदायक असतो त्यामुळे त्याचा अस्त केव्हा एकदा होईल असे वाटते. धूमकेतूचा उदय पुष्कळ वर्षांनी होतो व अस्त फार लवकर होतो. तरी सुद्धा तो फार प्रसिद्धिस येतो. तसाच एखाद्या दुष्टाचा उदय = भरभराट, सत्ताधीश बनणे फार क्वचित होते पण त्याची प्रसिद्धि मात्र फार लवकर होते कारण तो सर्व जगाला 'त्राहि भगवन्' करावयास लावतो, म्हणून म्हटले की <u>(क)</u> <u>दुष्ट उदय जगदार्ती हेतू</u>- जगत् + आर्ति = संकट, दुष्ट, पीडा जगाला संकटांत दुःखात पाडण्यास जसा धूमकेतूचा उदय कारणीभूत होतो. तशीच हिरण्यकशिपु, रावण, कंस इत्यादि दुष्टांच्या उदयामुळे सर्व जगावर संकटे येतात व सर्व जग दुःखी, भयग्रस्त, दीन होऊन जाते.

(२) धूमकेतूची सूर्याभोवती परिभ्रमणाची गति उलटी असते. तसेच उदयास आलेले खल जगाचा जो सरळ मार्ग म्हणजे वेदमार्ग त्याच्या उलट वागणारे म्हणजे वेदमार्ग विरोधी असतात. धूमकेतू इतर सर्व ग्रहांच्या कक्षांचे अतिक्रमण करीत भ्रमण करतात त्याप्रमाणे उदयास आलेले खल सुर नर मुनि, नाग, गंधर्व, किंन्नर इ. सर्वांच्या सत्तांचे अतिक्रमण करुन त्यांना अत्यंत दुःख देतात, त्यांचे ऐश्वर्य हरण करतात. धुमकेतू सूर्याभोवतीच फिरत असतात त्याप्रमाणे या खलांना फिरविणारा रामसच्चिदानंद दिवाकरच आहे. उदयास आलेल्या अशा दुष्टांच्या छळापासून व भयापासून जगाला सोडविणारा भगवंताशिवाय कोणी नाही हे ध्वनित केले आहे. आता संतांच्या उदयाबद्दल सांगतात.

चौ.२१ (१) संतउदय- संतांचा अभ्युदय भरभराट, संत सत्ताधीश, ऐश्वर्य संपन्न झाले किंवा जगांत प्रसिद्धिस आले तर (क) संतत हितकारी- सदा सर्वदा जगाचे हित करणारे होतात. अशा संतांचा देह जरी गेला तरि त्यांचा अस्त होत नाही. त्यांचे चरित्र, त्यांनी केलेला उपदेश, त्यांचे नाव, कीर्ती इत्यादि रुपाने ते विद्यमान असतातच व त्या रुपाने ते सर्व जगाचे हित करुन जगाला सुखी करतातच. संतांचा उदय होण्यास वेळ लागतो पण एकदा उदय झाला की अस्त होत नाही. संतांचा उदय जगांत नेहमी होतच असतो. संताच्या सकल हितकारी, व विश्वाला सुख देणाऱ्या उदयाला दृष्टान्त देतात.

(२) इंदुतमारी इव- इंदु = चंद्र, शीतलता देणारा असतो. तम + अरि = तमारि = सूर्य. तम आणि तमस हे दोन्ही शब्द शुद्ध संस्कृत आहेत. (अ.व्या.सु.पहा) म्हणून तमारि शब्दाबद्दल पंडितानी नाक मुरडल्यास त्याच्याच अज्ञानाचे प्रदर्शन होईल. चंद्र रात्री सुखकर असतो, वाटतो, पण सर्वांचे हितच करतो असे नाही व चंद्र जरि दिवसा उगवला तरि दिवसा सुखद नसतो. सूर्य फक्त दिवसाच उगवतो. परंतु संत रात्रंदिवस उदित असतात. 'उदित सदा कधिं अस्तिं न जाइल' (२।२०९।२) असे भरताविषयी म्हटले आहे. भरत संत नव्हता असे कोण म्हणेल? सूर्य रात्रंदिवस उगवला तर जगाचा नाश होईल. व सूर्य मुळीच न उगवला व चंद्रच उगवला तरी सुद्धा जगाचा संहार होईल. यावरुन हे ठरले की संतापासून विश्वाला कधी सुद्धा भय

नाही व ते चंद्रसूर्यापेक्षा अधिक हितकर्ते व सुखदायक आहेत.

(३) संतत हितकारी हा पाठ त्रिपाठीजींनी घेतला आहे, व तो अधिक योग्य व संयुक्तिक वाटला म्हणून येथे घेतला आहे. परहित करणे हा संतांचा सहज स्वभाव आहे, व त्यासाठीच ते भूर्जतरुप्रमाणे नाना दुःखे सहन करतात असे जे यापूर्वी म्हटले त्याच्याशी 'हितकारी' पाठ सुसंगत आहे. सुखकारी व विश्वसुखद यात पुनरुक्ति दोष होतो तो हितकारी पाठाने टळतो. शिवाय हितकारी व सुखद यांची सांगड घातल्याने हा भाव निघतो की सुख संयुक्त हित करतात. सुखदायक हित करणे म्हणजेच परोपकार करणे. (क) चंद्र सूर्य दृष्टान्ताने दाखविले की ते ज्ञान रुपी प्रकाश, वैराग्यरुपी ऊष्णता व चंद्रप्रकाशाप्रमाणे शीतलता व प्रसन्नता देणारी रामभक्ति देतात व रामनामरुपी चंद्र देतात. 'राकारजनी भक्ति तव रामनाम तो सोम' (३।४२) 'रामचरित राकेशकर' (१।३२म.) देतात. याप्रमाणे चौथ्या प्रश्नांचे उत्तर थोडेसे सविस्तर दिले. आता महा पुण्य, व घोर पाप कोणते यांचे उत्तर देतात.

हिं. ।परम धर्म श्रुति बिदित अहिंसा।पर निंदा सम अघ न गिरीसा।।२२।।

म. ।परम धर्म वेदोक्त अहिंसा।परनिंदा अघ अधिक गिरीशा।।२२।।

अर्थ- वेदोक्त परम धर्म अहिंसा हा आहे, आणि परनिंदा हे पाप गिरिराजापेक्षाही अधिक मोठे आहे.।।२२।।

टीका. (१) वेदोक्त परमधर्म अहिंसा असा अन्वय करणे जरुर आहे, कारण की श्रुतिविदित (= वेदोक्त) महापुण्य कोणते या प्रश्नाचे हे उत्तर आहे. प्रश्नांत 'पुण्य' शब्द आहे, त्याच्या ऐवजी उत्तरांत धर्म शब्द आहे, सुचविले की वेदोक्त पुण्य = वेदोक्त धर्माचरण. भाव हा की वेदविरुद्ध पद्धतीने अहिंसेचे पालन केले तर ती अहिंसा महापुण्य ठरत नाही. (क) अहिंसा- हिंसेचा अभाव. मनाने वाणीने किंवा कृतीने हिंसा न करणे. जात, देश, काळ आणि परिस्थिती या चार प्रकारातील कोणतीच हिंसा न केल्यास अहिंसा प्रतिष्ठा होईल. उदा. १) जात मच्छिमार = कोळी, जातीत जन्माला आला असेल तर त्याने फक्त मासे मारणे ही वेदोक्त अहिंसाच आहे, पण तीर्थात मासे मारले तर हिंसा ठरेल, इतर ठिकाणी मासे मारले तर हिंसा ठरणार नाही, हा देश व्यभिचार.

एकादशी, दर्श (अमावस्या) इत्यादि काळी त्याने मासे मारणे हा काळ व्यभिचार ठरेल. परिस्थिती- देव ब्राह्मणांशिवाय इतरांच्यासाठी त्याने मासे मारणे अहिंसा आहे. पण जन्माने मच्छिमार कोळी नसलेल्या इतर कोणीही केव्हाही कुठेही व कोणाच्याही साठी मासे मारणे ही हिंसा ठरेल. कारण की ते त्याचे सहज कर्म नाही. २) हिंसेचे कृता, कारिता व अनुमोदिता असे तीन मुख्य प्रकार आहेत स्वतः केलेली हिंसा कृता. दुसऱ्याकडून करविलेली कारिता, आणि आपण न सांगता कोणी करीत असेल त्यास संमति देणे ती अनुमोदिता हिंसा होय. या प्रत्येकांत पुन्हा लोभजनित, क्रोधजनित व मोहजनित असे तीन प्रकार आहेत, म्हणजे ३गुणिले ३ = ९ प्रकार झाले. या प्रत्येकात पुन्हा तीव्र, मध्यम, मृदु असे तीन प्रकार आहेत म्हणजे ९गुणिले ३ = २७ प्रकार झाले. हे स्थूल भेद आहेत. सूक्ष्म भेद असंख्य आहेत. पाचव्या प्रश्नाचे उत्तर दिले.

(२) परनिंदा अघ अधिक गिरीशा- गिरिश = गिरिराजा. परनिंदा हे पाप पर्वतराजापेक्षा सुद्धा मोठे आहे. अतिघोर पाप कोणते या प्रश्नाचे हे उत्तर आहे. निंदा = असत्यमूलक परदोषकथन- जे दोष जी पापे एखाद्या व्यक्तीने केली नाहीत ती त्याने केली असे मनात आणणे, वा वाणीने सांगणे, दुसऱ्यांचे गुण दोष आहेत असे मानणे किंवा भासविणे म्हणजे निंदा होय. दुसऱ्यांचे खरे दोष असतील ते कोणाला तरि सांगणे म्हणजे पिशुनता, चाहडी, 'पिशुन पराविं पाप वदति ते' (२।१६८।१) 'पाप पिशुनते सम कीं आन' (७।११२।१०) म्हणजे परदोषकथन, चिंतन, हा पाप पर्वत आहे. 'नहिं असत्य सम पातक पुंजा। गिरिसम होती कोटि किं गुंजा' (२।२८।५) असत्य भाषण, असत्य वर्तन हा पाप गिरिराज आहे. निंदेत असत्य भाषण व परदोष कथन ही दोन्ही असतात, शिवाय निंदा ही वाचिक हिंसा आहेच म्हणून परनिंदा हे पाप गिरिराजापेक्षांही फार मोठे आहे असे म्हटले ते योग्यच आहे. निंदेत द्वेष, मत्सर, परोत्कर्ष-असहिष्णुता, स्वार्थ, सूडबुद्धी, कपट, कुटिलता इत्यादि अनेक दोष बुडाशी असतातच. कोणाच्या निंदेचे काय फळ मिळते हे आता सांगतात.

हिं. ।हरि गुर निंदक दादुर होई।जन्म सहस्त्र पाव तन सोई।।२३।।

म. ।हरि गुरु-निंदक दर्दुर होतो।जन्म सहस्त्र तीच तनु लभतो।।२३।।

अर्थ- हरि (हर) आणि गुरु यांची निंदा करणारा (पुष्कळ नर्क भोगून) बेडुक होतो आणि हजार जन्म त्याला तो (एक) च देह मिळतो.।।२३।। (पाठभेद-हरगुर)

टीका. (१) ल.ठे. निंदा असत्याश्रित असते व असत्याचे फळ सर्वांत नीच अशा अवीची नर्काची प्राप्ति हे सांगितले आहे, म्हणून या व पुढील चार ओळींत निंदकांना आधीं नर्कभोग भोगावे लागतात असे प्रत्येक प्रकारांत वर्णन केले नसले तरि पुढील दोन चौपायांत केलेला उल्लेख प्रत्येक प्रकारात गृहीत करणे भाग आहे. 'बहु नरकां भोगुनि' व 'रौरव नरकिं पडति' असे पुढे म्हटले आहे.

पाठभेद चर्चा- 'हरगुर' असा पाठ पुष्कळ हिंदी प्रतींत आहे पण तो चुकीचा आहे. 'र'च्या अनुप्रासासाठी कोणी तरि तो मुद्दाम निर्माण केलेला आहे. 'हर'पाठ घेतल्यास या निंदाफलवर्णनात हरिचा स्वतंत्र उल्लेख नसल्याने हरिनिंदा हे फार मोठे पाप नसून सर्व साधारणांच्या निंदेतच हरिनिंदेचा अंतर्भाव करावा लागेल. 'संतशंभु' मापति-अपवादा। ऐकति तेथे अशि मर्यादा।। (१।६४।१) यात संत = गुरु, शंभु व हरि यांचे समत्व दर्शविले आहे. 'हरिहर निंदा ऐकति कानां। गोहत्या सम पाप तयानां' (६।३२।२) असा हरिनिंदेचा स्पष्ट उल्लेख शंकरांच्या बरोबरीने केला असल्याने हरिनिंदेला सर्व जीवांच्या निंदेच्या बरोबरीची म्हणता येत नाही. 'गुरु शंकररूपिणम्' असे बा.कां.मंगलाचरणातच म्हटले असल्याने 'गुरु' शब्दांत हराचा अंतर्भाव करतां येतो, तसा हरि चा अंतर्भाव हर शब्दांत करता येत नाही. हरिपेक्षा कोणी मोठा नाही म्हणून हरिचा उल्लेख प्रथम असणेच अवश्यक आहे. मानसांत या तिघांनाच कृपासिंधु म्हटले आहे. गुरु, हरि (राम) व शंकर यांच्या शिवाय 'कृपासिंधु' कोणास म्हटले नाही. हरिहराशिवाय ज्यांना कृपासिंधु म्हटले आहे तेथे गुरु भावनेनेच म्हटले आहे. पंडित विजयानंदजी त्रिपाठींच्या ग्रंथात (सतपंचचौपाई) 'हरिगुरु'पाठ आढळला व तो वर दाखविल्याप्रमाणे या अल्प मतीला संयुक्तिक वाटला म्हणून घेतला आहे.

(२) हरिगुरुनिंदक दर्दुर होती- प्रथम अवीचि नर्कादि अनेक नर्कांत यातना भोगल्या वर बेडकाचा जन्म मिळतो. गुरु = शंकर व गुरु, असा अर्थ

घेणे जरुर आहे हे वरील पाठभेद चर्चेत दाखविले आहेच. 'सर्वदेवमयो हरिः' 'सर्वदेवमयो गुरुः' आणि गाईच्या शरीरांत हरिहरादि सर्व देवांचा निवास असतो हे हिंदूना तरि सुविदित आहेच. उपमा देण्यांत सुद्धा शास्त्रवचन समन्वय पाहण्यासारखा आहे. याप्रमाणे हरिगुरु = हरिहरगुरु असे मानणे भाग आहे. (क) दर्दुर = मंडूक, बेडुक. बेडूकच का होतात? हरि, हर व गुरु यांची निंदा केली तरि त्यांना व्यक्तिशः त्या निंदेबद्दल काहींच वाटत नाही, किंवा त्यांची काही हानी होत नाही, मात्र निंदकांनी केलेली नुसती शुष्क निरर्थक बडबड अनेकांच्या कानांवर पडते. बेडूक अशीच निरर्थक बडबड करतात, चिखलांत घाणीत राहतात. तसेच हरिहरगुरुनिंदक नर्कांच्या घाणीतून बाहेर पडले तरि त्यांनी तोंडाने घाण चिवडण्याचा व निरर्थक बडबड करण्याचा अभ्यास केलेला असतो. ते करण्यातच त्यांना आनंद वाटतो. चिखलांत, घाणीत गटारांत राहणाऱ्या बेडकाशींच त्यांचे साम्य असते म्हणून बेडकाच्या जन्मास जातात.

(३) जन्म सहस्त्र तीच तनु लभतो- हजारो जन्म ते एकच बेडकाचे तुच्छ शरीर त्यांना मिळते. जलाशयांतील पाणी आटून चिखल सुकून गेला की बेडूक गतप्राण होतो, त्याचा एक जन्म संपतो. त्याची तनु वाळलेल्या त्वचेसारखी दामटी होऊन तशीच मातीत पडलेली असते. तनु = त्वचा अर्थ आहेच. 'तनुः (विश्वमेदिन्यै) जलाशयांतील माती खणतांना बेडकाच्या तनूच्या झालेल्या दामट्या या डोळ्यांनी माहिल्या आहेत. त्यांच्यावर पहिल्या पावसाचे पाणी पडताच पुन्हा ती तनु सजीव होते. याप्रमाणे तेच तेच मंडूक शरीर त्या निंदक जीवाला हजारो वेळा मिळते. टीचभर वीतभर लांबीच्या मोठ्या बेडकांचे सूक्ष्म निरीक्षण ज्यानी केले असेल त्यांच्य लक्षांत असेल की अशा मोठ्या बेडकाच्या नाकाच्या वरच्या दोन्ही बाजूस 888 अशा ठिपक्यांच्या ओळी असतात व त्यांच्यावर डोळे असतात. हे ठिपके त्यांच्या जुन्या डोळ्यांच्या खुणा असतात. मुळीच ठिपके नसलेल्या लहान बेडकापासून ३।३, ४।४ ठिपके प्रत्येक बाजूस असलेले बेडूक या डोळ्यांनी पाहिले आहेत. प्रत्येक जन्मांत शरीर मोठे होत जाते काही जन्मानंतर जुने डोळे पाहिजे तसे उपयोगी पडत नाहीसे होतात, तेव्हा नवे डोळे तयार होतात, व जुन्या डोळ्यांच्या ठिकाणी किंचित उंच कड असलेले तुरीचे डाळकण राहील इतके खोल खाड्यासारखे ठिपके असतात.

'जसे पीन होतात प्रथम पाउसीं प्लव' प्लव = बेडूक. अशाप्रकारे हरिहर गुरु निंदा करणारास हजारो जन्म त्या एकाच देहांत रहावे लागते. सर्वांत अति घोर पातक परनिंदा, त्यात सर्वांत घोर हरिहरगुरुनिंदा! आता उत्तरोत्तर कमी प्रतीच्या निंदेचे फळ सांगतात.

हिं. ।द्विज निंदक बहु नरक भोग करि ।जग जनमइ बायस सरीर धरि ।।२४।।
।सुर श्रुति निंदक जे अभिमानी ।रौरव नरक परहिं ते प्रानी ।।२५।।

म. ।द्विज निंदक बहु नरकां भोगुनि ।जगीं जन्मतो वायस होउनि ।।२४।।
।देव वेद निंदक अभिमानी ।रौरव नरकिं पडति ते प्राणी ।।२५।।

अर्थ- ब्राह्मणांची निंदा करणारा अनेक प्रकारच्या नर्कांत यातना भोगून नंतर या जगांत कावळा होऊन जन्मास येतो.।।२४।। जे अभिमानी मानव प्राणी देवांची व वेदांची निंदा करतात ते रौरव नर्कांत पडतात. (व नंतर कावळ्याच्या जन्माला जातात).।।२५।।

टीका. चौ.२४ <u>(१)</u> <u>द्विजनिंदक</u>- ब्राह्मणांची निंदा करणारा. विद्यमान एका किंवा अनेक ब्राह्मणांचीच नव्हे तर पूर्वकाळी होऊन गेलेल्यांची किंवा ब्राह्मणजातीची सुद्धा निंदा करणे म्हणजे ब्राह्मणनिंदा होय. ब्राह्मणाने जर ब्राह्मणाची निंदा केली तर त्यालाही तेच फल भोगावे लागणार. <u>(क)</u> निरनिराळ्या जातीत, वर्णात जन्मास येणे हे पूर्व कर्म व अंतकाळी असलेली वासना यावर अवलंबून असते. एकाच जातींत पशुपक्ष्यादि योनींत सुद्धा आयुष्य, सुखदुःखलाभ, वगैरे गोष्टी त्या त्या जीवांच्या पूर्व जन्मार्जित पुण्यपापतारतम्यानेच प्राप्त होतात म्हणून <u>'अद्वेष्टा सर्व भूतानां'</u> कोणाही जीवाचा द्वेष इतर कोणी करण्याचे कारण नसते. ज्या जातींत, ज्या वर्णांत भाग्याने मनुष्य देह मिळाला आहे त्याच देहाने मनुष्य जन्माचे सार्थक करणे हे मुख्य कर्तव्य आहे ते न साधले तर ज्या वर्णात जन्म झाला असेल त्या वर्णाच्या देहाचे सार्थक केले तर उत्तरोत्तर उच्च वर्णाच्या देहाची प्राप्ती सहज होईल. व एकदा <u>'चरम देह विप्राचा मिळला'</u> (७।११०।३) असे होईल. व ब्राह्मण देहांत ब्राह्मण्य संपादून हरिभक्ति केली तर भवबंधातून सुटेल. पण असे स्वहित न करतां ब्राह्मण निंदा करणे हे हरिहरगुरुनिंदेच्या खालोखाल घोर पाप आहे.

(२) बालकांडात वंदन प्रकरणांत जसा श्रेष्ठताचा क्रम राखला आहे तसाच येथे सुचविला आहे. हरिहर गुरु यांना सोरठ्यात वंदन करुन गुरुमहिमा वर्णन केल्यावर 'वन्दे प्रथम महीसुरचरणां' (१।२।३टी.पहा) असे वंदन केले आहे तसेच गुरुनिंदकानंतर विप्रनिंदकांचे वर्णन येथे केले आहे व पुढील क्रमही बा.कां.वंदनक्रमानुसारच आहे. (क) बहु नरकां भोगुनि- अविचि प्रमुख अनेक नर्कात नर्क यातना अनंत काळ भोगल्यावर नर्क यातना भोगण्यासाठी यातना शरीर मिळते. कितीही यातना भोगल्या तरि ते शरीर मरत नाही पण त्या जीवाला यातनांचे असह्य दुःख सोसावे लागते. तेथे कितीही पश्चात्ताप केला व यमाला प्रार्थना केल्या तरि त्याचा काही उपयोग होत नाही. (ख) नर्क यातना भोगल्यानंतर 'जगीं जन्मती वायस होउनि' या मृत्युलोकांत कावळ्याचा जन्म मिळतो. (ग) ब्राह्मण निंदकांना कावळ्याचा देहच का मिळतो. द्विजनिंदक स्वपक्षाचा वृथाभिमान बाळगणारे व वेदविरुद्ध पक्षाचा दुरभिमान बाळगणारे असतात. कावळ्यासारखे कठोर कर्कश शब्दांनी ब्राह्मणांची निंदा करतात. वेदशास्त्र इत्यादि कोणावरच विश्वास नसतो. आणि कावळ्यासारखे मति, गति, रीति वगैरेत अपवित्र असतात. दुष्ट असून कावळ्यासारखे भित्रे असतात. इत्यादि अनेक प्रकारे काक स्वभावाशी द्विजनिंदकांच्या स्वभावाचे साम्य असते म्हणून त्याच्या पूर्व स्वभावानुसार गोड वाटणाऱ्या गोष्टी काक देहाने करणेच शक्य असते त्यामुळे कावळ्याचा देह मिळतो. ब्राह्मणांचा विशेष संबंध देव व वेद यांच्याशी असतो. यज्ञयागादि कर्मे वेदपुराणांनुसार करुन ब्राह्मण देवांना संतुष्ट करतात. 'द्विज मख होम करिति पूजा स्तव। त्यांना देव सहज वश त्यास्तव' (१।१६९।२) म्हणून आतां देववेदनिंदकाविषयी सांगतात.

चौ.२५ (१) सर्व विश्वाची सुव्यवस्था लावणारे ब्रह्मदेवादि देव हे ईश नियोजीत अधिकारी आहेत. ते विप्रांना वश असतात. देवांना वश करण्यात मुख्य आधार श्रुति स्मृतिपुराणादि सद्ग्रंथ आहेत. (क) अभिमानी- 'जीव धर्म 'मी' हा अभिमान हि' (१।११६।७) हा सामान्य अभिमान सर्वच जीवांना असतो, पण सर्व मनुष्य प्राणी देववेदशास्त्र निंदा करीत नाहीत. द्विजनिंदक देव व वेद निंदा करतातच. त्यांच्या संगतीने इतर काही प्रथम वेदनिंदा करु लागतात. ज्यांना आपल्या विद्वत्तेचा, सत्तेचा, धनाचा, बळाचा वगैरे विशेष गर्व असतो ते पामर आत्मघातकी प्राणी देवांची व वेदांची निंदा करतात.

वेदपुराणादि भगवंताचे निःश्वास असणारी शास्त्रे अशा अभिमान्याना दुष्ट, दुर्जन, अधम, पापी, आसुरी, संपत्तिमान, राक्षसी स्वभावाचे वगैरे म्हणतात. म्हणून प्रथम वेदांची वगैरे निंदा करु लागतात. वेदविरुद्ध वागल्यामुळे दैव याना वश होत नाहीत म्हणून देवांची निंदा करतात व या निंदेने आपली प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न करतात. देव व वेद प्राणिमात्रांचे हितचिंतक, सुखपथप्रदर्शक, हितकर्ते असून जे कोणी अभिमानाने त्यांचीच निंदा करतात त्यांना योग्य असे निवासस्थान आता सांगतात. 'रौरव नरकिं पडति ते प्राणी' असे मनुष्य प्राणी रौरव नावाच्या नरकांत पडतात. याचा अर्थ 'कल्प कल्प एकैका नर्की। पडति, दूषिति श्रुति जे तर्की' (७।१००।४) त्यांना रौरवादि प्रत्येक नरकांत एकेक कल्पपर्यंत रहावे लागते. याप्रमाणे सर्व मुख्य नर्कांत यातना भोगल्यावर पुढे कोणता जन्म घ्यावा लागतो हे येथे सांगितले नाही. पण वर प्रथमच दाखविले आहे की देव वेद यांचा संबंध मुख्यतः ब्राह्मणांशी विशेष असतो म्हणून मागल्या चौपाईंत सांगितलेला वायस जन्म यानांही शेवटी मिळतो असे मानणे भाग आहे.

हिं. *।होहिं उलूक संत निंदा रत।मोह निसा प्रिय ग्यान भानु गत।।२६।।*
।सब कैं निंदा जे जड करहीं।ते चमगादुर होइ अवतरहीं।।२७।।

म. *।होति उलूक संतनिंदारत।मोह निशा प्रिय बोध भानु गत।।२६।।*
।निंदितात जे जड सर्वांना।वटवाघुळ अवतार तयानां।।२७।।

अर्थ- संतांची निंदा करण्यात जे तत्पर असतात ते मोहरुपी रात्र प्रिय असलेले, व ज्ञानरुपी सूर्य ज्यांच्यापासून निघून गेलेला आहे असे घुबड होतात.।।२६।। जे जड सर्वांचीच निंदा करतात ते वटवाघुळ होऊन लोंबत राहतात.।।२७।।

टीका. चौ.२६ (१) संतनिंदारत- संतांची, हरिभक्तांची निंदा करण्यात रमणारे, संतनिंदा करण्यात आनंद मानणारे. 'संतभेटि सम जगांत सुख ना' असे या प्रकरणांतच सांगितले आहे. 'विधिहरिहर कबि कोविद वाणी। लाजे साधूमहिमा-गानी' (१।३।११) व स्वतः भगवान म्हणतात की 'श्रुणु मुनि साधूंचे गुण जितके। वदूं ना शकति गिरा श्रुति तितके' (३।४६।८) असे संत असून व

संतांची भेट होणे दुर्लभ असून काही दुर्जन संतनिंदा करण्यातच धन्यता मानतात, व स्वतःस लोकहितकर्ते सिद्ध करतात. (क) उलूक होति.. घुबड, दिवाभीत होतात. घुबडांचे ओरडणे किंवा रडणे भयंकर अपशकून आहे. तसेच यांचे भाषण अपशकुनासारखे मानावे हे सुचविले. (ख) घुबडच का होतात? 'खरा ज्यावरी ज्याचा स्नेहो। मिळे तया ते नहिं संदेहो' (१।२५९।६) म्हणून संतनिंदकांना घुबडाचा जन्म मिळतो. घुबडांना दिवसाची भीति वाटते म्हणून त्यास दिवाभीत म्हणतात. त्यांना अंधारी रात्र फार प्रिय असते. 'जसा उलूका तिमिरी स्नेहो' (५।४५।८) उलूक प्रकाशाचा व सूर्याचा द्वेष करतात. स्वतः डोळे मिटून ठेवतात व म्हणतात कीं सूर्य प्रकाशमय आहे असे जे म्हणतात ते साफ खोटे. तसेच संतनिंदारत (ग) मोहनिशा प्रिय असतात त्यांना मोह अज्ञानरुपी रात्र फारच प्रिय असते. 'ममता तरुण तमी अंधारी। द्वेष राग घुबडां सुखकारी' (५।४७।३) तमी = रात्र. या खलानां संतांची काही हानि करता येत नाही व संतानां जगांत लोक यांच्यापेक्षा फार मान देतात व पाठीमागे प्रशंसा करतात ती यांना सहन होत नाही म्हणून हे संतांची निंदा करतात. संतांची निंदा करणे हा आपला एक अत्यंत आवडीचा धंदाच असे त्यांना वाटते. आपल्या वाक्प्रचाराने लोकमत संतांच्या विरुद्ध करुन हे निंदक अर्धवट श्रद्धावंतांचा विश्वास उडवितात व त्यांनाही मोहांधकारातून निघून ज्ञानभानूच्या सुखरूपी सुप्रकाशात जाण्याच्या मार्गापासून परावृत्त करतात. 'आपण पडले त्यासहि पाडिति। जे कुणि सन्मार्गा प्रतिपालति' (७।१०१।३) संत निंदकाच्या या प्रयत्नांमुळे संतांच्या पाठची बरीचशी उपाधि आपोआप कमी होते. मोहान्धकाराचा विनाश करणारे संत असतात. पण या संतनिंदक उलूकापासून.

(२) बोधभानू गत- ज्ञानरूपी सूर्य अत्यंत दूर गेलेला असतो. 'विण सत्संग न हरिकथा त्याविण मोह न जात' (७।६१) परंतु हे संतनिंदक असल्याने यांचा मोहांधकार नष्ट होणे शक्यच नसते. 'बहु नरकां भोगुनि' हे यानां सुद्धा लागू आहेच. ल.ठे. बा.कांडात विप्रवंदनानंतर संतांना वंदन केले आहे त्याप्रमाणे येथे विप्रनिंदक व विप्राशी निगडित असलेले वेद व देव यांचे निंदक यांचे वर्णन केल्यावर संतनिंदकांचे वर्णन केले. संत वंदनानंतर तेथे अनेकांना निरनिराळे वंदन केले, तसे येथे न करतां या सर्वांची निंदा करणाराबद्दल पुढल्या चौपाईत

सांगतात.

चौ.२७ (१) जे सर्वांना निंदितात- हरिहर गुरु, ब्राह्मण, वेद व देव आणि संत या सर्वांचीच निंदा करतात हा एक अर्थ होतो आणि या चार वर्गाशिवाय उरलेले जे इतर त्या सर्वांची निंदा करतात असा दुसरा अर्थ होऊ शकतो. पण हा अर्थ आणि वटवाघुळ होणे यात औचित्य रहात नाही, कारण की वटवाघळाच्या ठिकाणी बेडुक, कावळा व उलूक यांच्यातील स्वभाव दोषांचे एकीकरण झालेले आहे, म्हणून पूर्वी वर्णिलेल्या सर्वांची निंदा व इतरांची निंदा असा तिसरा अर्थ घेणेच योग्य आहे. (क) जड- सर्वांची निंदा करणारे मनुष्य रुप दिसत असले तरि ते जड होत. 'आत्मघातकी जीव हि जड ते। ज्यांना रघुपति कथा न रुचते' (७।५३।६) (ख) वटवाघुळ अवतार तयानां- अवतार = खाली खाली जाणे, अधःपात होणे. वटवाघूळ योनी प्राप्त होऊन त्यांचा अधःपात होतो. 'बहु नरकां भोगुनि' ही शिक्षा यानांही आहेच.

(२) वाघळाचा जन्म कां? बेडकासारखी व्यर्थ बडबड करीत असतात. कावळ्याप्रमाणे 'छली मलीन, न कुठे प्रतीती' व उलूकाप्रमाणे अंधकार प्रिय, निशाचर, रात्रीसंचार करणारे. वटवाघळे खाली डोके वर पाय करुन स्वतःस उलटे टांगून घेतात. ज्या मुखाने फळे वगैरे भक्षण करतात त्याच मुखाने मलत्याग करतात. सर्वांची निंदा रूपी मळ मुखाने बाहेर टाकण्याचा त्यांचा अभ्यास असतो ते करणे आवडते. हे निंदकांचे मुकुटमणी असल्याने यांच्या अधःपाताला अवतार म्हटले. (क) याप्रमाणे गरुडाच्या साहव्या प्रश्नाचे उत्तर थोडा जास्त विस्तार करुन सांगितले. सर्वांत घोर पातक कोणते व त्याचे कमीत कमी फळ नर्क यातना भोगणे व त्यातही अति घोर अशा पाच प्रकारांचे विशेष फळ सांगितले. अशी अत्यंत घोर किंवा अन्य पातकें करण्याची प्रवृत्ती जीवांच्या ठिकाणी का होते हा प्रश्न शिल्लक राहतोच. मानसरोगच या पाप प्रवृत्तीला कारण आहेत असे भक्तिचिंतामणींत ध्वनित केले आहे, आणि मानसरोग सविस्तर सांगा असा सातवा प्रश्न प्रार्थनारूपाने विचारलेला आहे. सहा प्रश्नांची चर्चा ८-२७ या वीस चौपायांत केली. आता पुढील चौपाईपासून १२२।११ पर्यंत मानसरोगांचे सांगोपांग निरुपण आहे व पुढे दो.१२२ चं पर्यंत मानसरोग प्रकरणाचा उपसंहार आहे. हे प्रकरण असे फार विस्तृत असल्याकारणाने स्वतंत्र प्रकरण मानणे चांगले.

मानसरोग- प्रकरण (१२१/२८ - १२२चं.)

हिं. /सुनहु तात अब मानस रोगा/जिन्ह ते दुख पावहिं सब लोगा।।२८।।
/मोह सकल ब्याधिन्ह कर मूला/तिन्ह ते पुनि उपजहिं बहु सूला।।२९।।

म. /तात ऐक मानस-रोगानां/दुःख देति जे सब लोकानां।।२८।।
/मोह सकल रोगांचे मूळ हि/तेथुनि बहु उद्‌भवती शूळ हि।।२९।।

अर्थ- हे तात! जे सर्व लोकानां दुःख देतात त्या मानस रोगांचे श्रवण करा.।।२८।। मोह (अज्ञान) सर्व मानसरोगांचे मूळ आहे. मग त्यांच्यापासून पुष्कळ प्रकारचे दुःखद रोग (शूळ) उत्पन्न होतात.।।२९।।

टीका. चौ.२८ (१) ऐक- अत्यंत महत्वाच्या विषयांचे निरुपण सुरु करणार म्हणून पुन्हा एकदा श्रोत्याला सावधान होण्याची सूचना दिली. (क) मानस रोग = मनाला होणारे रोग. मन हा सूक्ष्मदेहाचा- लिंगदेहाचा एक भाग आहे,म्हणून लिंग देहाला होणारे रोग असा अर्थ घेता येईल. देह रोगांची काही ना काही तरी माहिती, निदान ऐकीव तरी, पुष्कळांना असतेच, अज्ञात विषयांचे प्रतिपादन ज्ञात विषयाशी तुलना करुन केले म्हणजे ते लवकर ठसते. व थोड्या शब्दांत पुष्कळ विस्ताराचे कार्य होते, म्हणून आता शारीरीक रोगांच्या रूपकाने मानसरोगांचे वर्णन करतात. (ख) रोग हा शब्दच अस्वस्थता, दुःख, पीडा वगैरे अनेक गोष्टी दर्शविणारा आहे. 'व्यापिति मानस रोग न भारी' या वचनामुळे 'सांगा मानस रोग सविस्तर' अशी विनंति गरुडाने केली व येथे म्हटले की 'ऐक मानस रोगांना' तिन्ही ठिकाणी रोग शब्दच आहे, कारण तो सर्वांच्या परिचयाचा आहे. (ग) दुःख देति जे सब लोकांनां- देह रोग मुळीच न झालेला असा निरोगी माणूस कदाचित सापडू शकेल पण बहुतेक सर्वच मानसरोग सर्व लोकांना सदा झालेले असतातच. फक्त काहींची तीव्रता काही मानसांत कमी अधिक प्रमाणात असते इतकेच. आता मुख्य मुख्य मानस रोग कोणते ते ऐका.

चौ.२९ (१) मोह सकल रोगांचे मूळ हि- सर्व मानस रोगांचे मूळ, मूळ कारण फक्त एक मोहच आहे. मानसरोगांचे हे वैशिष्ट्य आहे ही गोष्ट फार चांगली आहे. शारीर रोगांचे एकच कारण प्रज्ञापराध आहे असे मानस राजहंस

पंडित त्रिपाठीजींनी म्हटले आहे ती केवळ जाणून बुजून केलेली धूळफेक आहे. असात्म्य- इंद्रियार्थसंयोग, प्रज्ञापराध, आणि परिणाम ही तीन मुख्य कारणे शारीर रोगांची असून गौण कारणे बरीच आहेत. (माधवनिदान पहा). याविषयीं चर्चा पुढे केली आहे. मानसरोग अनंत असले तरि त्या सर्वांची उत्पत्ति मोहापासून (अज्ञानापासून) च होते. मूले कुठार न्यायाने या एका मूळाचा विनाश झाला की मानसरोगरूपी महाविशाल वृक्ष त्याच्या अपरंपार विस्तारासह आपोआपच मरुन जाईल. इतर वृक्ष केव्हा ना केव्हा तरि काळाच्या ओघांत आपोआप मरतात. पण मोहमूल भवरोगविटप आपोआप कधीच मरत नाही. कल्पान्तानंतर सुद्धा शिल्लक असतोच. अणुबॉंब किंवा ब्रह्मास्त्रादि अस्त्रांनी मोह हे मूळ मरत नाही. मोहरूपी मूळाचा संपूर्ण विनाश केल्याशिवाय मानस रोगांचा नाश होणे अशक्य आहे. मुळाचा नाश न करतां शाखापल्लवादि तोडल्याने मानसरोग नाष्ट होणार नाहीत आणि उलट मूळ खोल जाईल हे येथे सुचविले. जेव्हा 'ईश्वर अंश जीव अविनाशी। चेतन अमल सहज सुखराशी' मायेला वश झाला व जड चेतन ग्रंथि पडली तेव्हापासून मोहरूपी मूळ पक्के वाढलेले आहे.

(२) रोग ज्ञानाचे मुख्य पाच प्रकार आहेत निदान, पूर्वरूप, रूप, उपशय आणि संप्राप्ति (भा.नि.) 'निदानं त्वादिकारणम्' निदान = मुख्य कारण, हेतु मानस रोगांचे मुख्य निदान 'मोह' हे सांगितले. देहरोगाच्या निदानाचे (मूळ कारणाचे) १) संनिकृष्ट (जवळचे) २) विप्रकृष्ट (दूरचे) ३) व्यभिचारी ४) प्रधान असे चार प्रकार आहेत. आणखी मुख्य तीन प्रकार आहेत १) अ-सात्म- इंद्रियार्थ संयोग- इंद्रिये व त्यांचे विषय यांचा दुरुपयोग करणे. २) प्रज्ञापराध = बुद्धीचे दोष, यातच अधर्माचरणाचा अंतर्भाव होतो. ३) परिणाम- काल, कालाचा अयोग म्हणजे ज्या ऋतूंत जसे हवामान असावे तसे नसणे. (क) व्याधींचे आणखी तीन हेतु आहेत. दोष हेतु, व्याधिहेतु, व दोषव्याधि हेतु. याशिवाय आणखी पुष्कळ गौण हेतु आहेत. सार हे की देह रोगांची अनेक प्रकारची अनेक कारणे आहेत. तसे मानसरोगांचे नाही. देह रोगांचे अचूक निदान करणे, विविध कारणे जाणणें फार भानगडीचे असते. मानसरोगांचे एकच एक कारण = हेतु = निदान म्हणजे मोह = अज्ञान. (३) तेथुनि बहु उद्‌भवती शूळहि- शूळ = शूल = रोग 'शूलोऽस्त्री रोग आयुधे' (मेदिनी) बहु =

असंख्य, अगणित. (क) तेथुनि = मोहरोगापासून जे मुख्य रोग उद्भवतात त्यांच्यापासून अगणित रोग उद्भवतात. आता मोहोत्पन्न मुख्य तीन दोष ऐका.

हिं. *।काम बात कफ लोभ अपारा।क्रोध पित्त नित छाती जारा।।३०।।*
।प्रीति करहिं जौं तीनिउ भाई।उपजइ सन्यपात दुखदाई।।३१।।

म. *।काम वात कफ लोभ अमित तो।क्रोध पित्त उर नित्य जाळतो।।३०।।*
।प्रीति करिति जर तीन्ही भाई।उपजे सन्निपात दुखदाई।।३१।।

अर्थ- काम हा वात आहे. लोभ हाच कफ असून तो अमित आहे, क्रोध पित्त आहे व तो नेहमी (नित्य) छाती जाळतो.।।३०।। या तीन भावांची प्रीति जमली की अति दुःखदायक सन्निपात (रोग) उद्भवतो- होतो.।।३१।।

टीका. चौ.३० (१) देहरोगांच्या उत्पत्तीची मूळ कारणे जरि अनेक असली तरि प्रत्यक्ष रोग उत्पन्न होण्यास कारण 'सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः। तत्प्रकोपस्य तु प्रोक्तं विविधाऽहित सेवनम्' (वाग्भट), वात पित्त व कफ हे मल = दोष कुपित होणे हे आहे. यातील १।२ किंवा तिन्ही कुपित होण्याची कारणे नाना प्रकारचे आहार विहार निद्रा व्यवहार इत्यादि आहेत. वात, कफ व पित्त हे तीन मल = त्रिदोष आहेत. 'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु युक्त स्वभावबोधस्य योगो भवति दुःखहा' (भ.गी.) या पाच गोष्टीत युक्ताचरण न केल्याने त्रिदोषांपैकी एक, दोन किंवा तिन्ही दूषित होतात व शरिरांत रोग उत्पन्न करतात. म्हणून मानस रोगांत हे त्रिदोष कोणते हे प्रथम सांगतात. शरिरांत वात कफ पित्त मुळीच नसतील तर मरण येईल. पण मानसरोगांत असे नाही. या तीन मलांचे अस्तित्व लेशमात्र मनात असले तरि दुःखनाश व सुखप्राप्ती होणे अशक्य आहे. मानसरोगांतील त्रिदोष नुसते दोष नसून फार दुर्धर रोगच आहेत.

(२) काम वात- काम = कामना इच्छा, कफ व पित्त स्वतः जड आहेत व त्यांना चालना देणारा वात आहे. त्याप्रमाणेच लोभ व क्रोध याना प्रेरणा देणारा काम आहे. सर्व पाप प्रवृत्तीला प्रत्यक्ष कारण कामच आहे. 'काम एष क्रोध एष रजोगुण समुद्भवः' (भ.गी.) काम वातासारखा आहे. वात झाला म्हणजे

पंडित त्रिपाठीजींनी म्हटले आहे ती केवळ जाणून बुजून केलेली धूळफेक आहे. असात्म्य- इंद्रियार्थसंयोग, प्रज्ञापराध, आणि परिणाम ही तीन मुख्य कारणे शारीर रोगांची असून गौण कारणे बरीच आहेत. (माधवनिदान पहा). याविषयीं चर्चा पुढे केली आहे. मानसरोग अनंत असले तरि त्या सर्वांची उत्पत्ति मोहापासून (अज्ञानापासून) च होते. मूले कुठार न्यायाने या एका मूळाचा विनाश झाला की मानसरोगरूपी महाविशाल वृक्ष त्याच्या अपरंपार विस्तारासह आपोआपच मरुन जाईल. इतर वृक्ष केव्हा ना केव्हा तरि काळाच्या ओघांत आपोआप मरतात. पण मोहमूल भवरोगविटप आपोआप कधीच मरत नाही. कल्पान्तानंतर सुद्धा शिल्लक असतोच. अणुबॉंब किंवा ब्रह्मास्त्रादि अस्त्रांनी मोह हे मूळ मरत नाही. मोहरूपी मूळाचा संपूर्ण विनाश केल्याशिवाय मानस रोगांचा नाश होणे अशक्य आहे. मुळाचा नाश न करतां शाखापल्लवादि तोडल्याने मानसरोग नाष्ट होणार नाहीत आणि उलट मूळ खोल जाईल हे येथे सुचविले. जेव्हा 'ईश्वर अंश जीव अविनाशी। चेतन अमल सहज सुखराशी' मायेला वश झाला व जड चेतन ग्रंथि पडली तेव्हापासून मोहरूपी मूळ पक्के वाढलेले आहे.

(२) रोग ज्ञानाचे मुख्य पाच प्रकार आहेत निदान, पूर्वरूप, रूप, उपशय आणि संप्राप्ति (भा.नि.) 'निदानं त्वादिकारणम्' निदान = मुख्य कारण, हेतु मानस रोगांचे मुख्य निदान 'मोह' हे सांगितले. देहरोगाच्या निदानाचे (मूळ कारणाचे) १) संनिकृष्ट (जवळचे) २) विप्रकृष्ट (दूरचे) ३) व्यभिचारी ४) प्रधान असे चार प्रकार आहेत. आणखी मुख्य तीन प्रकार आहेत १) अ-सात्म- इंद्रियार्थ संयोग- इंद्रिये व त्यांचे विषय यांचा दुरुपयोग करणे. २) प्रज्ञापराध = बुद्धीचे दोष, यातच अधर्माचरणाचा अंतर्भाव होतो. ३) परिणाम- काल, कालाचा अयोग म्हणजे ज्या ऋतूंत जसे हवामान असावे तसे नसणे. (क) व्याधींचे आणखी तीन हेतु आहेत. दोष हेतु, व्याधिहेतु, व दोषव्याधि हेतु. याशिवाय आणखी पुष्कळ गौण हेतु आहेत. सार हे की देह रोगांची अनेक प्रकारची अनेक कारणे आहेत. तसे मानसरोगांचे नाही. देह रोगांचे अचूक निदान करणे, विविध कारणे जाणणें फार भानगडीचे असते. मानसरोगांचे एकच एक कारण = हेतु = निदान म्हणजे मोह = अज्ञान. (३) तेथुनि बहु उद्भवती शूळहि- शूळ = शूल = रोग 'शूलोऽस्त्री रोग आयुधे' (मेदिनी) बहु =

असंख्य, अगणित. (क) तेथुनि = मोहरोगापासून जे मुख्य रोग उद्‌भवतात त्यांच्यापासून अगणित रोग उद्‌भवतात. आता मोहोत्पन्न मुख्य तीन दोष ऐका.

हिं. *।काम बात कफ लोभ अपारा।क्रोध पित्त नित छाती जारा।।३०।।*
।प्रीति करहिं जौं तीनिउ भाई।उपजइ सन्यपात दुखदाई।।३१।।

म. *।काम वात कफ लोभ अमित तो।क्रोध पित्त उर नित्य जाळतो।।३०।।*
।प्रीति करिति जर तीन्ही भाई।उपजे सन्निपात दुखदाई।।३१।।

अर्थ- काम हा वात आहे. लोभ हाच कफ असून तो अमित आहे, क्रोध पित्त आहे व तो नेहमी (नित्य) छाती जाळतो.।।३०।। या तीन भावांची प्रीति जमली की अति दुःखदायक सन्निपात (रोग) उद्‌भवतो- होतो.।।३१।।

टीका. चौ.३० (१) देहरोगांच्या उत्पत्तीची मूळ कारणे जरि अनेक असली तरि प्रत्यक्ष रोग उत्पन्न होण्यास कारण 'सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः। तत्प्रकोपस्य तु प्रोक्तं विविधाऽहित सेवनम्' (वाग्भट), वात पित्त व कफ हे मल = दोष कुपित होणे हे आहे. यातील १।२ किंवा तिन्ही कुपित होण्याची कारणे नाना प्रकारचे आहार विहार निद्रा व्यवहार इत्यादि आहेत. वात, कफ व पित्त हे तीन मल = त्रिदोष आहेत. 'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु युक्त स्वभावबोधस्य योगो भवति दुःखहा' (भ.गी.) या पाच गोष्टीत युक्ताचरण न केल्याने त्रिदोषांपैकी एक, दोन किंवा तिन्ही दूषित होतात व शरिरांत रोग उत्पन्न करतात. म्हणून मानस रोगांत हे त्रिदोष कोणते हे प्रथम सांगतात. शरिरांत वात कफ पित्त मुळीच नसतील तर मरण येईल. पण मानसरोगांत असे नाही. या तीन मलांचे अस्तित्व लेशमात्र मनात असले तरि दुःखनाश व सुखप्राप्ती होणे अशक्य आहे. मानसरोगांतील त्रिदोष नुसते दोष नसून फार दुर्धर रोगच आहेत.

(२) काम वात- काम = कामना इच्छा, कफ व पित्त स्वतः जड आहेत व त्यांना चालना देणारा वात आहे. त्याप्रमाणेच लोभ व क्रोध याना प्रेरणा देणारा काम आहे. सर्व पाप प्रवृत्तीला प्रत्यक्ष कारण कामच आहे. 'काम एष क्रोध एष रजोगुण समुद्‌भवः' (भ.गी.) काम वातासारखा आहे. वात झाला म्हणजे

मनुष्य जसा लाज, लज्जा, धर्म, भय, मर्यादा इत्यादींना जुमानीत नाही, बडबड करतो व स्वेच्छाचाराने वागतो, तशीच कामी व्यक्तींची दशा असते. 'कामातुराणां न भयं न लज्जा' कामाची तृप्ती झाली, इच्छेप्रमाणे लाभ झाला की 'लाभात् लोभ प्रवर्तते' 'प्रतिलाभे जशि लोभा भरती' (१।१८०।२, ६।१०२।१) कामाचा उच्छेद झाला की क्रोध. इच्छा पूर्ण झाली नाही की इच्छेच्या आड येणारावर क्रोध येतो. क्रोधाचा वचपा घेता येण्यासारखा नसला की तो क्रोधच शोकाचे व विषादाचे रूप धारण करतो. यावरून ठरले की कामच लोभ, क्रोध, शोक इत्यादींचे प्रत्यक्षकारण असतो. देहरोगांत सुद्धा असे पुष्कळ वेळा घडते. 'निदानार्थकरो रोगो रोगस्याप्युपजायते' (मा.नि.पंचनिदान) उदाहरणे देऊन विस्ताराची आवश्यकता नाही.

(३) कफ लोभ अमित तो- कफ पृथ्वीतत्वप्रधान जल तत्वाचे कार्य आहे, लोभ हा त्रिदोषांपैकी कफ होय. कफाच्या ठिकाणी चिकटपणा, लवकर बाहेर न पडणे, दूषित झाला की दुर्गंधि येणे, जडता इत्यादि गुणधर्म असतात. तसेच लोभी माणसाच्या ठिकाणी चिकटपणा, वित्तबाहेर काढण्याची, कोणास देण्याची वा स्वतः खर्च करण्याची अनिच्छा असल्यामुळे घाणेरडेपणा, मूर्खपणा इ. दोष असतातच व लोभी माणसाला चिकट म्हणतातच. (क) निरोगी माणसाच्या शरीरातील कफाचे सामान्य प्रमाण १) आटक = २ शेर ५३ तोळे ४ मासे असते. 'कफस्याटकम्' (गर्भउ) परंतु लोभ रूपी कफाला मोजमाप नाही तो अमित असतो. लोभ केवळ धनाचाच असतो असे नाही. स्त्रीलोभ, कीर्तिलोभ, सत्तालोभ, प्रतिष्ठा लोभ, भूमिलोभ, ऐश्वर्यलोभ इ. अनेक प्रकारचे लोभ असतात. लोभ किती अपार व किती घातक भयंकर असू शकतो याचे वर्णन स्कंद पुराणात आहे. (ख) एको लोभो महान् ग्राहो लोभात्पापं प्रवर्तते। लोभात् क्रोधः प्रभवति लोभात्कामः प्रवर्तते।।१।। लोभान्मोहश्च मायाच मानः स्तंभः परेप्सुता। अविद्याऽप्रज्ञताचैव सर्वं लोभात्प्रवर्तते।।२।। हरणं परवित्तानां परदाराभिमर्शनम्। साहसानां च सर्वेषां अकार्याणां क्रियास्तथा।।३।। स लोभः सह मोहेन विजेतव्यो जितात्मना। दम्भो द्रोहश्च निंदाच पैशुन्यं मत्सर स्तथा।।४।। भवन्त्येतानि सर्वाणि लुब्धानामकृतात्मनाम्। सुमहन्त्यपि शास्त्राणि धारयन्ति बहुश्रुताः।।५।। छेत्तारः संशयानांच लोभग्रस्ता व्रजन्त्यधः। लोभक्रोधप्रसक्ताश्च शिष्टाचार बहिष्कृताः।।६।। अन्तःक्षुरा वाङ्धुराः

कूपाश्च्छन्नास्तृणैरिव। कुर्वते ये बहून मार्गा तां स्तान् हेतु बलान्विताः।।७।। सर्व मार्ग विलुम्पन्ति लोभात् जातिषु निष्ठुराः। धर्मावतंसकाः क्षुद्रा मुष्णन्ति ध्वजिनोजगत्।।८।। एतेऽति पापिनः सन्ति नित्यं लोभ समन्विता तस्मात्त्यजन्ति ये लोभं तेऽतिक्रामन्ति सागरम्।।९।। (स्कंद. पु.कु.खंड ३।२७७-८७) या श्लोकाचे सार हे आहे की लोभ परवित्तहरण, परस्त्रीहरण, सर्व प्रकारची पापे, चाहडी, निंदा, दंभ, कपट, मत्सर, द्रोह, साहस निष्ठुरपणा, अनाचार, अविद्या, मोह, पढतमूर्खपणा, मान, गर्व इत्यादि अनेक दुर्गुणांची वृद्धि व संग्रह करणारा आहे. मोठमोठे शास्त्रज्ञ, पंडित, संशयनिरास करणारे सुद्धा कसल्या तरि लोभाला बळी पडून अधोगतीस जातात. लोभ धर्माचे आडंबर माजवून अधर्म वाढविणारा आहे. मुखाने मधुर बोलून हृदयांत पाजळलेला वस्तरा तयार करुन ठेवणारा लोभ आहे. तोंडावर हिरवे गार गवत वाढून त्याने आच्छादिलेल्या कूपासारखे लोभी असतात. अमूक पाप लोभ करणार नाही असे नाही, धर्मनिष्ठेच्या दंभाने लोभ जगाला फसवीत असतो. जे लोभाचा संपूर्ण त्याग करतील ते संसार सागराच्या पार जातील, बाकीचे लोभरूपी मकराने ग्रासले जातील यात संशय नाही. (ग) असा लोभाचा प्रभाव आहे म्हणून अमित अपार म्हटले ते योग्यच आहे, शरीरातील कफ एक आटक असून तो कुपित न झाला तर दुःखद होत नाही, पण मनांत हृदयांत जरासुद्धा लोभ असतां उपयोगी नाही. 'गुणसागर नागर नर असला। तिळ लोभे कुणि म्हणति नच भला' (५।३८।८) पृथ्वी तत्त्वाची जडता व जलतत्त्वाची नीच गमनशीलता लोभाच्या ठिकाणी असतात. दान आणि त्याग यांनी तो थोडा कमी होईल इतकेच. पण त्याच लोभाला सत्संग, हरि कथाश्रवण व हरिनामसंग्रह यांच्याकडे वळवला म्हणजे मोहासहित त्याचा नाश होईल.

काम असावा हरिगुरु भजनी। क्रोध असावा इंद्रियदमनी।।
लोभ असावा नामस्मरणीं। द्रोह धरावा पापाचरणी।।प्रज्ञा।।

(४) क्रोध पित्त उर नित्य जाळतो- पित्तरूपी मलावाचून देह जगणार नाही. पण क्रोधरूपी पित्त सूक्ष्म देहांत मुळीच असतां नये. क्रोध तमोगुणी आहे तो रजोगुणी कामाचा पुत्र आहे. क्रोध हा पित्ताप्रमाणे नुसत्या छातीतच नव्हे तर सर्व शरिरांत दाह, संताप, उत्पन्न करुन सर्व शरिराला भाजणारा आहे. (क) पित्त कडु व आंबट असे दोन प्रकारचे असते. क्रोधाचे साधे कार्य म्हणजे कटु

कठोर कर्कश भाषण असते. फार क्रोध आला म्हणजे खरोखरच पित्त उसळते. पित्त हे जलतत्वाचे व तेजतत्वाचे कार्य आहे. शरिरांत पित्त १) प्रस्थ = ४ कुडव = ५३ तो. ४ मासे असते (गर्भ.उ.) म्हणजे पित्ताला मोजमाप आहे, पण क्रोधाला मोजमाप नाही. क्रोध चारी डोळ्यांनी आंधळा असतो. फार क्रोध आला म्हणजे इतका संमोह होतो की तो क्रुद्ध मनुष्य स्वतःस सुद्धा विसरतो. मात्र क्रोध लोभाप्रमाणे सतत प्रगट वा क्रियाशील नसतो. काही काळ प्रगट होऊन पुन्हां निष्क्रिय होऊन हृदयांत राहतो. पण जो पर्यंत मोह, काम व लोभ असतात तोपर्यंत तो केंव्हा तरि प्रगट होतोच.

चौ.३१ (१) प्रीति करिति जर तीन्ही भाई- काम लोभ व क्रोध यांचा जन्म मोहापासूनच असल्याने यांना भाई = भाऊ म्हटले. हे तिघे बहुधा एकेकटे राहूनच आपले कार्य करीत असतात. कधीं जोडीजोडीने राहतात, पण जर वात कफ पित्त हे तिघेही एकाच वेळी कुपित दूषित झाले तर जसे महाभयंकर रोग उत्पन्न करतात तसे काम लोभ क्रोध एकत्र जमले, यांचे एकमत झाले म्हणजे अति असाध्य (क) उपजे सन्निपात दुखदाई- सन्निपात म्हणजे तिन्ही दोष कुपित होऊन झालेला रोग. बहुतेक प्रत्येक रोगांत सन्निपातज हा एक प्रकार असतोच. ज्वरांतच सन्निपाताचे मुख्य १४ प्रकार आहेत. भिषग्भुवन या मराठी वैद्यकीय ग्रंथात नांवे पहावी. कोणताही सन्निपातज व्याधि असाध्य किंवा कष्टसाध्य असतो. सन्निपात ज्वर होणे म्हणजे काळाच्या मुखांत प्रवेश होणेच असते. या तिघांना प्रत्येकी नरकाचे द्वार म्हटले आहे. 'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः। कामः क्रोध स्तथा लोभ स्तस्मादेतत् त्रयं त्यजेत्' (भ.गी.) यातील प्रत्येक नरकाचे द्वार आहे मग तिघेही प्रबल झाले तर काय प्राप्त होत असेल याचा विचार करावा. 'काम कोप मद लोभ सब नाथा! मरका पंथ। सोडुनि सब रघुवीरही भजा भजति ज्या संत' (५।३८). कामापासून उत्पन्न होणाऱ्या शूलांचे आता वर्णन करतात.

हिं. ।विषय मनोरथ दुर्गम नाना।ते सब सूल नाम को जाना।।३२।।

म. ।विषय मनोरथ दुर्गम नाना।सकल शूल ते मिति नामां ना।।३२।।

अर्थ- नाना प्रकारचे दुर्गम विषय मनोरथ केले जातात ते सर्व शूल आहेत त्यांची

नावे अमित आहेत (कोण किती मोजणार!)।।३२।।

टीका. (१) नाना विषय मनोरथ- शब्द स्पर्श रूप रस गंध हे पाचच विषय असले तरि हे पाच ज्या पदार्थापासून मिळतात ते असंख्य आहेत, त्यामुळे विषयांचे मनोरथ व त्यांचे प्रकार असंख्य असू शकतात, म्हणून नाना = अनेक अनंत म्हटले. मनोरथानामगति न विद्यते. मनोरथांची गति अकुंठित असते. मनाच्या गतीला जशी सीमा नाही, तशी मनोरथांना सीमा नाही. मनोरथ = मनरूपी रथांत बसून प्राप्तव्य, कर्तव्य इत्यादींविषयी ज्या कल्पनांच्या भराऱ्या मारल्या जातात त्या. भविष्यकाळी काय काय केव्हा कसे करावयाचे, मिळवावयाचे इत्यादि ज्या इच्छा केल्या जातात. ते मनोरथ यांनाच मनोराज्य म्हणतात. 'इच्छा कांक्षा स्पृहेहा तृड् वाञ्छा लिप्सा मनोरथाः' (अमरे) पद- 'आज मिळविले हे, हे मिळवू उद्या, मनोरथ करिति असे। हे इतके धन आहे पुढतीं उदंडही लाभेल असे।। आज अमुक हा शत्रु मारिला, आणिकांस ही मारीन। यजुनी, दाने, सुख संपादूं भ्रम मोहित हे म्हणति दुजे.' (सं.स.गी.१८।१३-१५) (क) दुर्गम- मनुष्य एका दिवसांत जेवढे मनोरथ करतो त्या सर्वांची पूर्तता होण्यास हजारो जन्म पुरणार नाहीत. एका मनोरथाची पूर्ती होते न होते, तोच दुसरे अनेक मनोरथ उठतात. त्यामुळे त्यांची प्राप्ती एका मनुष्य जन्मात होणे अशक्य असते म्हणून विषयमनोरथाना दुर्गम = मिळण्यास वा मिळविण्यास कठीण असे म्हटले. विषयांच्या प्राप्तीचे मनोरे उठवितांना मनुष्य आपली कुवत, परिस्थिती, वय, आपले आयुष्य इत्यादि गोष्टींचा विचारच करीत नाही, त्यामुळे जसे स्वप्नांतील मनोरथ स्वप्नांतच राहतात तसे जागृतींतील मनोरथ मनातच राहतात. परंतु त्या मनोरथांचे जे सूक्ष्म संस्कार चित्तावर उमटतात त्यामुळे हजारो जन्म घ्यावे लागतात.

(२) विषयमनोरथ दुर्गम- याने ध्वनित केले की विषयातीताविषयी मनोरथ सुगम आहेत. भगवद्‌भजनाविषयींचे, भगवत्प्राप्तीविषयीचे मनोरथ सुलभ व सुखद ठरतात. कारण की बाकीचे सर्व विषय अविद्यामय आहेत, मिथ्या आहेत हरि, हरिभजन सत्य आहे. 'सत् हरिभजन जगत्स्वप्नासम' (३।३९।५).

(३) ते सब शूल- शूल नावाचे काही रोग आहेत, त्यात शूळ, ठणका, कळा वेदना, ठुसठुस लागून होणारे दुःख मुख्य असते. पोटशूळ (पोटदुखी)

मस्तकशूळ, कर्णशूळ, इ. अनेक प्रकारचे 'शूल' नावाचे रोग देहाला होतात तसे विषयमनोरथ हे शूल आहेत. कैकयीने नाना प्रकारचे दुर्गम विषयमनोरथ केले आणि कल्पान्तपर्यंत अंत होणार नाही असे अनेक शूळ तिच्या हृदयांस लागून राहिले. याच्या उलट बिभीषणाने विषयांचा त्याग केला आणि श्रीरामदर्शनाविषयीचे मनोरथ करीत निघाला, व ते सर्व त्याला सुलभ व सुखद झाले. विषय मनोरथ करणे म्हणजे विषयांचे ध्यान, चिंतन करणेच आहे. याचा परिणाम विषयासक्ति व 'ध्यायतो विषयान् पुंसः संगस्तेषूपजायते' (भ.गी.) या श्लोकांत सांगितल्याप्रमाणे शेवटी विनाश पदरांत पडतो. आणि याच्या उलट 'मामनुस्मरतश्चित्तं मय्यैव प्रविलीयते' माझे = भगवंताचे अनुस्मरण चिंतनादि केल्याने भगवंताच्या ठिकाणीच चित्त लीन होते.

(४) शारिरीक शूलाचे मुख्य आठ प्रकार आहेत. वातज, पित्तज, कफज, त्रिदोषज, आमज, द्वंद्वज, (यात तीन प्रकार) परिणाम शूल (यात पाच प्रकार) आणि अन्न द्रवशूल. असे असले तरि 'सर्वेष्येतेषु शूलेषु प्रायेण पवनः प्रभुः' (मा.नि, शूल नि.) या सर्वांत बहुधा वायु = वातच मुख्य दुःख दाता असतो. तसेच हे सर्व दुर्गम विषय मनोरथरूपी शूल कामवाताने प्रेरिलेले असतात. कशाची तरि कामना इच्छा तृष्णा, मुळाशी असतेच. यामुळे असे म्हणता येईल की मोह हे मूळ, काम हा बुंधा, लोभ व क्रोध या त्याच्या मुख्य शाखा, मदमत्सरादि बारिक बारिक फांद्या. मनोरथ ही पाने, फुले, व विविध नर्क यातनादि दुःखे ही फळे असा हा मानसरोगमहावृक्ष आहे.

(५) मिति नामा ना- स्थूल देहांतील शूलानां नावे असून त्यांची मुख्य संख्या आठ आहे. मानस शूलाना नावे नाहीत असे नाही, पण ते शूल अगणित असंख्य असल्याने नावे किती सांगणार? सार हे की मानस शूल अनंत अपार आहेत. अष्टमहासिद्धी मिळविण्याचे मनोरथ व त्या मिळाल्या म्हणजे काय काय कसे करणार इत्यादि मनोरथ, स्वर्ग भोग मनोरथ इ. सर्व शूलच आहेत. एक शूळ उठला देहामध्ये तर किती दुःख होते, मग हे अगणित शूल किती जन्म दुःख देतील याचा विचार करावा. भक्तिमनोरथ केल्याने हे शूळ हळुहळू नष्ट होतात व परमानंदाचा लाभ होतो.

हिं. ।ममता दादु कच्छु इरषाई।हरष बिषाद गरह बहुताई।।३३।।

म. *।ईर्षा कच्छू दद्रू ममता ।हर्ष विषांदा ग्रहां विपुलता।।३३।।*

अर्थ- ईर्षा ही खरुज आणि ममता नायटे, गजकर्ण होत. आणि हर्ष विषाद या ग्रहांची तर विपुलताच असते.।।३३।।

टीका. पाठभेद चर्चा- 'कंडु इरषाई' असा पाठ सर्व प्रचलित रामायणांत आहे. पण माधवनिदान ग्रंथांत पाहतां कंडु हा स्वतंत्र रोग नाही. काही त्वचारोगांतील ते एक लक्षण आहे. कच्छु हा एक स्वतंत्र त्वचेचा रोग आहे. म्हणून 'कंच्छु इरषाई' असा पाठभेद निर्माण करणे भाग पडले. कंडु = कंड, त्वचा खाजविण्याची जी प्रवृत्ती उत्पन्न होते ती.

(१) ईर्षा व ममता यांचे स्वरुप कच्छु = खरुज व नायटे (दद्रु) यावरुन जाणावयाचे आहे. कच्छु व दद्रु हे दोन्ही कुष्टरोगाचेच प्रकार आहेत, पण समाजात त्यास कुष्ट म्हणत नाहीत. 'सूक्ष्मा बह्व्यः पीडकाः स्त्राववत्यः। पामेत्युक्ता कण्डुमत्यः सदाहाः' हे खरजेचे लक्षण आहे. ज्यात बारीक बारीक पुष्कळ फोड उठून, ज्यातून स्त्राव होत असतो, कंड सुटते व आग होते त्याला पामा = खरुज म्हणतात. या रोगाचेच कच्छु, उग्रा, स्फोटक, विचर्चिका इत्यादि भेद आहेत. आता द्रद्रुचे लक्षण पहा- 'सकण्डू राग पिडकं दद्रुमंडलमुद्गतम्' ज्याचे मंडल वर आलेले असून ज्यांत बारीक बारीक पुटकुळ्या पुष्कळ असतात, विशिष्ट राग = वर्ण रंग असतो व कंड सुटते त्यास दद्रुमंडल म्हणतात. म्हणजे कंण्डुयुक्त दाह असणारा त्वचारोगांचा एक वर्ग = कच्छु आणि कण्डुयुक्त मंडलाकार पण दाह नसणारा त्वचारोगांचा दुसरा वर्ग = दद्रु = दद्रुमंडल. गजकर्णाची नायट्यासारखी मंडले असतात व दाह नसतो म्हणून गजकर्ण दद्रुवर्गातच पडेल. ओला इसब नायट्यांच्या वर्गात पडेल कारण त्यात दाह नसतो. कोरड्या इसबाला दाह असतो म्हणून तो खरजेच्या = कच्छूच्या वर्गात पडेल. या दोन्ही प्रकारात कण्डू असतोच, तो स्वतंत्ररोग नाही. 'कच्छु' शब्दाचा अर्थ न समजल्याने पोथीची नक्कल करणाराने केलेला प्रमाद म्हणजे 'कण्डु' हा पाठ आहे.

(२) ईर्षा कच्छू- ईर्षा खरजे सारखी आहे. खरजेत कण्डू व दाह असतो. कण्डू प्रमाणे चित्तांत अस्वस्थता उत्पन्न करणारा, व चित्ताचा दाह करणारा

मानसरोग ईर्षा हा आहे. कोरडी खरुजही असते तिला खरका म्हणतात. खाजवताना सुख वाटते, त्याप्रमाणे दुसऱ्यांचे अहित करण्याच्या व श्रेष्ठांशी स्पर्धा करण्याच्या आकांक्षांत मनोरथांत आनंद वाटतो पण ज्याच्याशी ईर्षा करावयाची त्याची बरोबरी प्रयत्न करुन सुद्धा करता न आल्यने चित्ताचा दाह होतो. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून त्याची बरोबरी करण्याची व त्याला खाली ओढण्याची जी इच्छा ती ईर्षा.

<u>(३)</u> <u>द्रद्रु ममता</u>- नायटे, गजकर्ण यांची मंडले उठतात. ती त्वचेच्या पातळीच्या किंचित वर आलेली व सभोवती कड असलेली अशी असतात. ही मंडले दिवसेंदिवस अधिकाधिक पसरत जातात. पावली एवढे असले तर अधेली, रुपयाएवढे हळुहळू होते. प्रत्येक मंडलांत बारीक बारीक पुष्कळ पुळ्या असतात व त्यांना कंड सुटते. त्याचप्रमाणे घरे, कुटुंब, पशु, वाहने, धन, शेती, बागा, मित्र इ.इ. अनेक मंडले ममता बनवीत असते. नायटे जसे तांबुस राग = वर्णयुक्त असतात तशीच ममता रजोगुणी असते. नायटे गजकर्ण खाजविताना सुख वाटते. त्याप्रमाणे ममत्वाचे सुख भोगण्यात प्रवृत्तींची वाढ कण्डुसारखी असते. नायटे खाजविल्यानंतर जसे दुःख होते तसे ज्यांच्यावर ममता केली जाते त्याना दुःख झाले की ममता करणारा दुःखी होतो. ज्यांच्यावर ममता केली ते शेवटी सुख देत नाहीत असे दिसले तरि, खाजविण्याने नायटे, गजकर्ण वाढतच जातात त्याप्रमाणे ममतेचा विस्तार जीव करीतच राहतो कारण दद्रुमध्ये जसा राग = रंग वर्ण असतो तसा राग = आसक्ति ममता निर्माण करते. <u>(क)</u> श्रीतुलसीदासांनी वैद्यशास्त्राचा किती सूक्ष्म अभ्यास केला याची कल्पना या तुलनेवरुन वाचकांनी करावी.

<u>(४)</u> हर्ष विषादा ग्रहां विपुलता- <u>(क)</u> इष्ट प्राप्तीने किंवा इष्ट प्राप्तीच्या प्रबल आशेने मनाची जी विशिष्ट आनंदयुक्त दशा तो हर्ष. येथे हर्ष विषाद ही जोडी असल्याने हर्ष = उत्साह हा मुख्यार्थ नाही. विषादाच्या विरुद्ध असणारा असा अर्थ येथे आहे. इष्ट वियोग किंवा इष्टवियोगाचा संभव यानी होणारी मनाची जी शोकमय दशा तो विषाद. फार हर्षाने किंवा फार विषादाने मनुष्य उन्मत्त होतो. देहरोगांत उन्माद रोग हर्ष विषादांनी उत्पन्न होतो. तसे मानस रोगांत हर्ष विषाद उन्मादाचे कारण होतात. येथे उन्माद शब्द नसून <u>गरह =</u>

ग्रह शब्द का असा प्रश्न उत्पन्न होतो. पण या ग्रह शब्दानेच कवीच्या आयुर्वेदाच्या सखोल सजीव ज्ञानाची प्रतीति येते. त्यासाठी उन्माद रोगाच्या कारणांचा विचार करणे जरुर आहे.

(५) विरुद्ध दुष्टाशुचि भोजनानि, प्रधर्षणं देव गुरुद्विजानां। अन्माद हेतु र्भयहर्षपूर्वो मनोभिघातो विषमाश्च श्चेष्टाः।। (मा.नि.उन्माद निदान) विरुद्ध भोजन, दूषित, अपवित्र अन्न खाण्याने अथवा देवगुरुब्राह्मण यांचा उपमर्द केल्याने, किंवा अत्यंतभयहर्ष यांनी मनाला धक्का बसल्याने किंवा विषम रीतीने, वाकड्या तिकडया, कसरती केल्याने किंवा वरिष्ठांशी कुस्ती केल्याने उन्माद रोग होतात. मनाला धक्का बसणे हे तात्कालिक कारण आहे. याच्या पूर्व कारणांकडे पाहिल्यास काहीं शारिरीक व काही मानसिक कारणे आढळतात, शिवाय 'प्रघर्षणं देवगुरुद्विजानां' हे एक कारण आहेच. काही शारिरीक वा मानसिक कारणांनी मनाला धक्का बसून होणारा उन्माद आणि देवगुरुद्विजांच्या प्रधर्षणाचे फळ म्हणून होणारा उन्माद असे दोन मुख्य वर्ग पडतात. या दुसऱ्या प्रकारचा उन्माद होण्याचे कारण ग्रहावेश हे आहे. भूतपिशाचादिकांचा प्रवेश सूक्ष्मदेहांत होणे, त्यांनी सूक्ष्म शरीराचा ताबा ग्रहण करणे = ग्रहावेश. असा ग्रहावेश झालेले जसे कारणाशिवाय हसतात, रडतात, ओरडतात व हर्षविषाद भयसूचक विविध चेष्टा करतात, तशा चेष्टा करविणारे हर्षविषाद हे ग्रह आहेत, व ते देव गुरुद्विजांच्या प्रघर्षणाचे फळ असते हे दर्शविण्यासाठी कवींनी ग्रह शब्द वापरला आहे. पहिल्या प्रकारांत मुख्य सहा प्रकाराचे उन्माद आहेत. वात, कफ, पित्त, त्रिदोष, मानसिक व विषजन्य. यांचा विचार येथे कर्तव्य नाही. दुसरा प्रकार जो ग्रहोत्थ उन्माद त्याचा प्रामुख्याने विचार करावयाचा आहे, कारण येथे ग्रह शब्द आहे.

(६) ग्रहोत्थ उन्माद- १)देवग्रह २)असुरग्रह ३)गंधर्वग्रह ४)पितृग्रह ५)सर्पग्रह ६)राक्षसग्रह ७)पिशाचग्रह ८)यक्षग्रह ९)भूतग्रह असे हे नऊ ग्रह आहेत. (क) हे ग्रह कोणाला तरी केव्हा धरतात-पछाडतात? देव पौर्णिमेला, असूर संध्यासमयी, संधिकाळी, गंधर्व बहुधा अष्टमीला, पितृग्रह अमावस्येला, सर्पग्रह पंचमीला, राक्षस रात्री, पिशाच चतुर्दशीला, यक्ष प्रतिपदेला, धरतात ग्रहण करतात. (ख) ग्रहजनित उन्मादांची लक्षणे भिन्नभिन्न व पुष्कळ आहेत.

ती पाहिली म्हणजे हर्षशोकांची कारणे सत्वगुणापासून तमोगुणापर्यंतची अति विचित्र असल्याचे आढळते. माधवनिदानांत उन्मादनिदान श्लो. १७-२५ पाहण्यासारखे आहेत. येथील ग्रह शब्द सूर्यादि नवग्रहसूचक नाही. या देवग्रहादिकांपासून निराळे नऊ बालग्रह आहेत.

(७) बालग्रहोन्माद- स्कंद, शकुनि, रेवती, पूतना, अंधपूतना, शीतपूतना, मुखमंडिका, स्कंदापस्मार व नैगमेयग्रह असे हे नऊ ग्रह बालोन्मादाचे हेतु असू शकतात. (क) या ग्रहांनी पछाडलेल्या बालकांची लक्षणे 'क्षणादुद्विजते बालः क्षणात् त्रस्यति रोदिति। नखैर्दन्तैर्दारयति धात्रीमात्मानमेव वा।।१७।। ऊर्ध्वं निरीक्षते, दन्तान् खादेत् कूजति जृम्भति। भ्रुवौ क्षिपति, दन्तोष्ठं फेनं वमति चासकृत्।।१८।। क्षामोति निशिजागर्ति शूनाक्षो भिन्नविट्स्वरः। मांसशोणितगन्धिश्च नचाश्नाति यथा पुरां।।१९।।'

(८) उन्मादाचे सामान्य लक्षण- धीविभ्रमः सत्वपरिप्लवश्च पर्याकुलादृष्टिरधीरताच। अबद्ध वाक्यं हृदयंच शून्यं सामान्यमुन्मादगदस्य लिङ्गम्।।५६।। (मा.नि.उ.नि.)

(९) या विविध ग्रहानी पछाडलेल्या व्यक्ति जशा क्षणांत हसतात, रडतात, शून्य दृष्टीने पाहतात, व क्षणांत त्रस्त होतात त्याचप्रमाणे भिवया वर चढवून पाहणे, कुजबुजणे, जांभया देणे, दीन बनणे, रात्री झोप न लागणे, डोळे सुजल्यासारखे दिसणे, पूर्वीसारखे अन्न न खाणे, बुद्धिभ्रंश, मनाचे चांचल्य, विस्मरण, कावऱ्याबावऱ्या नजरेने पाहणे, असंबद्ध भाषण करणे, गाणे इत्यादि उन्मादरोगांची लक्षणे हर्ष शोकाकूल झालेल्या व्यक्तींच्या ठिकाणी दिसतात. ग्रहगृहीत व्यक्तीसारखे ते वागतात म्हणून हर्षविषादांना ग्रह म्हटले हर्षशोकाची कारणे या ग्रहाप्रमाणे विपुल आहेत, म्हणून म्हटले की 'ग्रहां विपुलता' हर्ष शोकांचे कारण ममता असते व ममतेची मंडले विपुल असतातच. दद्रूममता असे आधी सांगून मग हर्ष शोकांचा उल्लेख त्यामुळेच केला.

सूचना- मानसरोगवर्णनातील रोगांचा अनुक्रम सहेतुक आहे असे आता ही टीका वाचताना विचारवंताच्या ध्यानी आले असेलच. आतापर्यंत ज्याचे वर्णन केले ते रोग एक, दोन, किंवा क्वचित तिन्ही दोषांनी उत्पन्न होणारे आहेत.

क्षयापासून पुढे वर्णन केलेले बहुतेक सर्व रोग मुख्यत्वे त्रिदोषजन्य असतात, असे सुश्रुताचार्य, चरक व वाग्भट यांची मते पाहिल्याने समजते. सार्थ माधवनिदान ग्रंथांत व सटीक माधवनिदान ग्रंथांत सुश्रुतादिकांची अवतरणे दिलेली आहेत. जिज्ञासूंनी मुद्दाम पाहावी. (क) हर्ष शोकांचे मुख्य कारण ममता हे असते म्हणून ममतेनंतर त्यांचा उल्लेख केला. शोक हे क्षयाच्या अनेक कारणांपैकी एक असू शकते म्हणून आता क्षयाचा उल्लेख करतील.

हिं. ।पर सुख देखि जरनि सोइ छई।कुष्ट दुष्टता मन कुटिलई।।३४।।

म. ।क्षय जळणें पर सुख पाहतां।कुष्ट दुष्टता मन कुटिलता।।३४।।

अर्थ- दुसऱ्यांचे सुख पाहून जळणे (हृदयाचा व अंगाचा दाह होणे) हा क्षय रोग होय. दुष्टपणा आणि मनाचा कुटिलपणा हे (दोन प्रकारचे) कोड रोग होत.।।३४।।

टीका. (१) क्षय जळणे परसुख पाहतां- या व पुढील चरणांत १।१ मात्रा कमी आहे. यामुळे होणाऱ्या गतिभंगाने सुचविले की या दोन चरणांत वर्णिलेले रोग फार भयंकर आहेत, त्या रोग्यांना पाहतांच इतरांच्या मनास धक्का बसतो व त्यांच्यापासून दहा पावले दूर राहण्याची सहज प्रवृत्ती होते. (क) ज्याला दुसऱ्याचे सुख, उत्कर्ष, भरभराट पाहवत नाही व चित्ताचा अंगाचा जळफळाट होतो, दाह होतो त्याला मानस क्षय-रोग झाला आहे असे समजावे. क्षयाच्या कारणांनुसार क्षयरोगांचे अनेक प्रकार आहेत. क्षयांत त्रिदोष कुपित झालेले असतातच. व्यवायक्षय, शोकक्षय, वार्ध्यक्यक्षय, व्यायामक्षय, अध्वक्षय (अतिशय पायीं प्रवास केल्याने होणारा) व्रणक्षय, क्षतक्षय, ग्रंथोक्त नावे व्यवायशोष, शोकशोष वार्धक्यशोष अशी आहेत. शोष = रसांचे शोषण = क्षयच. व्यवाय = स्त्रीविषयसेवन. (ख) खांदे व कुशी तापणे, हातापायांची आग होणे, आणि सर्वांगात ज्वर ही लक्षणे सर्व प्रकारच्या क्षयरोगांत कमी अधिक प्रमाणांत असतातच. क्षयरोगांत ज्वराने जसा दाह होतो सर्वांगाचा व सर्व शरीरातील रक्तादि रसांचे जसे शोषण होते त्याप्रमाणे दुसऱ्यांचे सुख, भरभराट, उत्कर्ष पाहिल्याने हृदयांत विशेष दाह होतो व हातपायादि सर्वांगाची आग होते. यांच्या कल्पनाप्रमाणे गावांत नेहमी कोणी तरी सुखी, श्रीमंत

असतात, कोणाचा तरि उत्कर्ष होतोच, कोणाची भरभराट होतेच यामुळे यांचा हा ज्वर कधी कमी होतच नाही व सदा सर्वदा चित्तांत जळफळाट होत राहिल्याने या क्षयी माणसाच्या हृदयांतील सत्वगुणांचा, प्रेमाचा, स्नेहाचा, सौजन्याचा व इतर अशाच रसांचा शोष होत जातो. त्याचे मनोबल क्षीण होत जाते. क्षय रोगाचे मुख्य सहा प्रकारच आहेत. (मा.नि. क्षयनिदान पहा) तसेच दाह करणारे व सद्‌गुणांचा, ओजाचा, बलाचा व तेजाचा क्षय करणारे शत्रु सहाच आहेत. क्षयाला राजयक्ष्मा म्हणतात, कारण तो रोगांचा राजा आहे. यक्ष्मा = रोग. याला परोत्कर्ष-असहिष्णुताही म्हणतात.

<u>(२) कुष्ट दुष्टता मन कुटिलता</u>- येथे कुष्ट = कोड असे ज्यांना म्हणतात त्यांचे वर्णन आहे. दुसऱ्यांचे सुख उत्कर्षादि पाहून जळणे हे खल लक्षण आहे. <u>'ताप विशेष फार खलचित्तीं। सदा बघुनि परसंपद जळती'</u> (७।३९।३) खलांच्या एका लक्षणाचे वर्णन केल्यानंतर आता दुष्टतेचे वर्णन येथे करतात. दुष्टता = दुष्टपणा. कुष्ट = कोड. त्याचे मुख्य दोन प्रकार आहेत. महारोग, गलित कुष्ट किंवा रक्तपिती असे ज्यास म्हणतात तो एक प्रकार व श्वेत कुष्ठ = पांढरे कोड. कोड असे ज्यास म्हणतात तो दुसरा प्रकार. वैद्यकीय ग्रंथांत यानां महाकुष्ठ म्हणतात. <u>(क) कुष्ट दुष्टता</u>- महारोग रक्तपिती वगैरे ज्यास म्हणतात ते मानसरोगांतील कुष्ठ म्हणजे दुष्टपणा, दुष्टता. दुष्टपणा म्हणजे काय हे सांगण्याची आतां आवश्यकता नाही. संतासंत सहज स्वभाव वर्णन नुकतेच केले आहे. '<u>हाडाचा दुष्ट</u>' हा शब्द प्रयोग हेच सांगतो की दुष्टता हाडीमासी खिळलेली असते. जरासंधाच्या हाडात सुद्धा दुष्टता व कुटिलता होती हे महाभारतांत प्रसिद्धच आहे. या महाकुष्ठाचा प्रसार त्वचेपासून हाडापर्यंत होतो. हाताची व पायांची बोटे सुद्धा झडून झडून नष्ट होतात. त्यातील हाडे सुद्धा कुजून जातात. तशीच दुष्टता हाडापर्यंत सुद्धा पोचते. हा रोग अत्यंत संसर्ग जन्य आहे. <u>(ख) मन कुटिलता</u>- हे दुसऱ्या प्रकारचे कुष्ठ आहे. यास पाढरे कोड, श्वित्र (असे संस्कृतात) म्हणतात. यात क्वचित लाल व काळे कुष्ठही असते. या शरीररोगाची प्रगति हाडापर्यंत नसली तरि मनाची कुटिलता खलांच्या हाडीं मासी खिळलेली असते. पांढरे कोड संसर्गजन्य नाही असे आधुनिक वैद्यशास्त्र म्हणते. पण हे मानसिक श्वेतकुष्ठ, पांढरे कोड = श्वित्र फार संसर्गजन्य रोग आहे. <u>'काम कोप मदलोभपरायण। निर्दय कपटी</u>

कुटिल मलायन' (७।३९।५) हे खल लक्षण आहे व अशांची 'चुकुनही संगति कधी करु नका' (७।३९।१) असे प्रभूंनीच सांगितले आहे. महारोग्यांचे व कोड झालेल्यांचे दर्शन सुद्धा मनाला दुःखदायक, किळस आणणारे असते. तसेच या दोन्ही कुष्ठ्यांचे समजावे. सज्जन कदाचित महारोग्याजवळ जाऊन त्याची सेवा करतील पण या कुष्ट्याची संगती टाळतील.

(३) लोक क्षयरोग्याची संगति टाळतात, महारोग्यांची व कोड झालेल्यांची संगति टाळतात पण या दुष्टांचा संग अधिक विघातक असून टाळीत नाहीत हे आश्चर्य आहे. (क) कुटिलतेची मूर्ति कुबडी मानसांत प्रसिद्धच आहे. तिची संगति कैकयीने टाळली नाही व त्याचा परिणाम भोळी सद्‌गुणी कैकयी कुटिलतेची मूर्ती बनली! (ख) आता अत्यंत क्लेशदायक पण लवकर समजून न येणाऱ्या काही मानस रोगांचा उल्लेख करतात.

हिं. ।अहंकार अति दुखद डमरुआ।दंभ कपट मद मान नेहरुआ।।३५।।

म. ।अहंकार अर्बुद अति दुःखद।नारु दंभहि कपट मान मद।।३५।।

अर्थ- अहंकार हा अति दुःखदायक अर्बुद (कॅन्सर) रोग होय. दंभ कपट मान मद हा नारु नावांचा रोग होय.।।३५।।

सूचना- १) 'डमरुआ' म्हणजे कोणता रोग याविषयीं टीकाकारांत अनेक मतभेद आहेत. मानसराजहंस पंडित त्रिपाठींजीनी एका वृद्ध वैद्याच्या मतानुसार त्यात गलगंड (गालगुंड) म्हटले आहे. कल्याणच्या मानसांकांत त्याला 'गांठीचा रोग' इतकेच म्हटले आहे. मराठी रामचरितमानसाच्या प्रकाशित प्रथमावृत्तींत 'डबा' म्हटले आहे. (या लेखकानेच). गलगंडाची लक्षणे 'माधवनिदान' मध्ये पाहतां अहंकार व गलगंड यात काही साम्य आढळले नाही. 'गाठींचा रोग' हा अगदी मोघम अर्थ झाला, कारण गुल्म, गलगंड, गळवे, प्लेग, अर्बुद हे सर्व गाठीचे रोगच आहेत. 'डबा' हा स्वतः या लेखकाने प्रथमानुवादाचे वेळी केलेला अर्थही अहंकाराचे उपमान करण्यास व रूपक करण्यास योग्य नाही, असे ग्रंथावलोकनानंतर विचारांती ठरले.

(२) अहंकाराचे उगमस्थान जरि एका मेंदूत असले तरि तो सर्व कर्मांना

व्यापणारा व शरिरांत वाटेल त्या ठिकाणी कार्य करणारा आहे हे मान्य करावे लागेल. अहंकार गळ्याला, गालालाच किंवा इतर अमुकच अवयवाला धरुन असतो असे नाही. पुष्कळ काळ विचार करतां करतां असे खात्रीपूर्वक वाटू लागले की डमरुआ = कॅन्सर रोग असला पाहिजे. कारण कॅन्सर शरीरांत कुठेही होतो. अहंकाराचे अस्तित्व ज्याचे त्याला सुद्धा पुष्कळ काळ कळत नाही, व ज्यावेळी तो उघडकीस येतो त्यावेळी तो नाहींसा करण्याच्या स्थितीत नसतो. ही लक्षणे कॅन्सर रोगाशी जुळतात, व अहंकाराचा गड्डा म्हणतात तसा कॅन्सरचा गड्डाच असतो, इतके माहीत होते म्हणून डमरुआ = कॅन्सर असा निश्चय झाला. अंतःकरणाची विशिष्ट काळी उत्पन्न होणारी सहज प्रवृत्ती तेच सांगू लागली पण चासकमान येथे असेपर्यंत वैद्यशास्त्राचा ग्रंथ मिळणे शक्य वाटले नाही. इस्लामपूरला गेल्यावरही बराच काळ तसाच गेला. पण वैद्यशास्त्राचा ग्रंथ मिळाल्यास पाहावा अशी वृत्ती ईशेच्छेने एक दिवस उठली.

(३) अचानकपणे सार्थमाधवनिदान हा (कै.डॉ.श्री.म.वैद्य जे आयुर्वेदाचे ही चांगले अनुभवी तज्ञ होते आणि ज्यांच्या वंशात वैद्यकीय व्यवसाय दोनशे वर्षे अव्याहतपणे चालू होता त्यांचा) ग्रंथ हाती आला. अहंकाराशी व कॅन्सरशी साम्य असलेला रोग कोणता हे जाणण्यासाठी त्या ग्रंथाचे परिशीलन १९५२च्या मार्च महिन्यात डॉ.बा.श्री.वैद्य. एम्.बी.बी.एस यांचे घरी राहात असता सुरु झाले. अर्बुद रोगनिदानाची पाने उघडताच तेथे समासांत (एन द मार्जीन) Cancer व त्याच्या भेदांची इंग्रजी नावे (जी त्यांनी स्वतः त्या त्या वर्णनावरुन नवीन शोधून काढली असावीत ती) प्रत्येक अर्बुदाच्या प्रकाराच्याजवळ (पृ.२०१।२०२ अर्बुदनिदान या उपप्रकरणांत) लिहून ठेवलेली आढळली. 'गलगंड, गंडमाला, अपची, ग्रंथि व अर्बुद यांचे निदान' या मुख्य प्रकरणात शेवटी हे अर्बुदनिदान आहे. ते वाचून पाहिले.

(४) हा आधार सापडल्यावर मात्र अत्यानंद झाला, काया पुलकीत होउन 'अस संजोग ईस जब करई' (७।११७।८) ही पंक्ती आठवली व काही काळ मन मग्न होऊन 'स्तंभ' हा अनुभाव प्राप्त झाला. हे केवळ ईशप्रेरणेने घडले नाही असे कोण म्हणेल? कै.श्रीयुत श्रीपाद महादेव वैद्यांच्या त्या ग्रंथात शेकडो ठिकाणी समासांत इंग्रजी नावे लिहिलेली आहेत. ते आर्याग्लवैद्यकांचे उत्तम

प्रसिद्ध, यशस्वी, अनुभवी डॉक्टर होते, व दोन्हींचा तुलनात्मक अभ्यास त्यांनी चांगलाच केला होता. तुलनात्मक ग्रंथ लिहिण्याविषयी डॉ. भडकमकर वगैरेंनी त्यांना पुष्कळ आग्रह केला पण ते कार्य त्यांच्याकडून झाले नाही. योगरत्नाकर वगैरे दुसऱ्या ग्रंथांत सुद्धा असेच शेरे मारलेले आढळले.

(५) या विलक्षण सुयोगानेच डमरुआ = कॅन्सर = अर्बुद हा अर्थ साधार निश्चित झाला. नंतर 'जीवनशास्त्र व संजीवन चिकित्सा' या नवीन चिकित्सापद्धतीच्या मोठ्या ग्रंथावर अभिप्राय लिहून पाठविण्यासाठी केलेल्या परिशीलनाचे वेळीं त्या ग्रंथात सुद्धा अर्बुद रोगालाच कॅन्सर म्हटलेले आढळले. अशा या दोन स्वतंत्र पुराव्यानीं पूर्वीच्या स्वतःच्या निर्णयास निःसंशय केल्यामुळेच निश्चयात्मक अर्थ करतां आला. स्वतः या बुद्धीस रोगचिकित्सेची किंवा वैद्यशास्त्राची काहीच माहिती नसता केवळ ईशकृपेनेच हे व असले अनेक संयोग ही टीका लिहीत असतां सहज जुळून आले.

टीका. (१) अहंकार अर्बुद अति दुःखद- अर्बुदाचे सामान्य लक्षण माधवनिदानांत दिले आहे ते 'गात्रप्रदेषे क्वचिदेव दोषा संमूर्छिता मांसमसृक प्रदुष्य। वृत्तं स्थरं मंदरुजं महान्तं अनल्पमूलं चिरवृध्यपाकम्।। कुर्वन्ति मांसोच्छयमत्यगाधं तदर्बुदं शास्त्रविदो वदन्ति' (१८।१९) कुपित झालेले वातादिदोष शरिराच्या कोणत्याही भागांत, मांस व रक्त यानां दूषित करून वाटोळा, स्थिर, थोडी कळ आणणारा, मोठा होणारा, ज्याची मुळे फार खोलवर म्हणजे हाडापर्यंत गेली आहेत असा, फार दिवस पर्यंत सावकाश वाढणारा, न पिकणारा व अतिशय खोल भागांतून ज्याची उत्पत्ती आहे असा मांसाचा गोळा तयार करतात त्याला शास्त्रवेत्ते अर्बुद म्हणतात. (क) वरील अर्बुदाचे लक्षण व अहंकार यात किती अद्भूत साम्य आहे हे तुलनेने दाखविण्याची आवश्यकता नाही. कॅन्सरची लक्षणे पाहिली व अहंकाराची तुलना केली की अगदी तंतोतंत जुळतात. गलगंड, गलरोग, गलग्रंथि, गंडमाळा यात ही लक्षणे नाहीत, व त्यांचा संबंध फक्त गळ्याशीच येतो. अहंकार मुख्य आठ प्रकारचा आहे. व तो वाटेल त्या वस्तूबद्दल किंवा गुणाबद्दल होऊ शकतो. (ख) अर्बुदें वात पित्त कफ प्रधान रक्तमांसभेद प्रधान अशी सहा प्रकारची व अध्यर्बुद = एका अर्बुदावरच दुसरे आणि द्विरर्बुद = जोड अर्बुद,

दोन जवळ जवळ होणारी अशी मुख्य आठ प्रकारची आहेत. (मा.नि.) शिवाय स्थानभेदाने व पंचभूतभेदाने त्यांचे अनेक प्रकार होतात. (संजीवन चिकीत्सा पहा).

(२) अहंकाराचा- 'अभिमानाचा गड्डा' हा शब्दप्रयोग प्रसिद्धच आहे. अहंकार = दुरभिमान, कॅन्सर सारखाच शरीराच्या कोणत्याही भागात होणारा, गुप्त, हळुहळू वाढणारा, प्रथम अल्प पीडा करणारा, सहसा लवकर न कळणारा, न पिकणारा, गड्डा मूळे फार खोल गेलेला, हाडी मासीं खिळलेला, काम लोभ व क्रोध यांच्या प्रकोपामुळे होणारा, स्थिर, अंति अति क्लेशदायक, असाध्य असा मानसरोग आहेच. अहंकारी माणसाच्या संगतीत राहणाऱ्यांना सुद्धा सुख होत नाही. दक्षप्रजापती, वाली व रावण ही तीन उदाहरणे मानसांत आहेतच. टीकेत त्या त्या ठिकाणी स्पष्ट दाखविले आहे.

(३) नारु दंभहि कपट मान मद- हिंदी चौपाईत 'नेहरुआ' हे रोगाचे नाव आहे. त्याचा अर्थ 'नसों का रोग' असा मानसाकांत केला आहे, पण त्याने दंभ मान मद कपट यांचे साम्य कसे कळणार? पंडित विजयानंदजी त्रिपाठींनी या रोगांचे प्रचलित नाव न देता जे विस्तृत वर्णन केले आहे त्यावरुन तो नारु रोगच ठरतो. नारुचे दंभ मान मद कपट यांच्याशी भरपूर साम्य आहे व ते दाखवितां येण्यासारखे आहे. नारु रोग म्हणजे काय हे महाराष्ट्रीयांस तरि सांगण्याची आवश्यकता नाही. नारु रोगावर ॲलोपाथींत (इंग्रजी वैद्यशास्त्रांत) औषध नाही. महाराष्ट्रात अनेक औषधे अनेकांस माहीत आहेत पण एकाच औषधाने सगळ्यांना गुण येत नाही. हा रोग पाण्यांतून पोटांत जाणाऱ्या अति अति सूक्ष्म क्रिमी पासून होतो. चौपदरी जाड वस्त्राने गाळलेल्या पाण्यात सुद्धा हे जंतू असू शकतात. पाणी, पाणीदार दूध वगैरे चांगले उकळून पिणे हा एकच रोग प्रतिबंधक उपाय आहे.

(४) हे जंतु शरिरांत गेल्यावर इतके वाढतात की दाभणाच्या इतका किंवा थोडा कमी जाडीचा, पांढरट रंगाचा तीन चार हात लांबीचा जाड दोऱ्यासारखा मोठा जंतु तयार होऊन त्वचेच्या आतल्या बाजूस येऊन बसतो, तरिसुद्धा कळत नाही की नारु झाला आहे. तो बाहेर पडण्याचा प्रयत्न करु लागला की प्रथम सर्वांगास कंड सुटून खूप पित्त उठते. पण ते कशाने उठले हे समजत

नाही कारण की दुसरे काहीच चिन्ह कुठे दिसत नाही की कळत नाही. पुढे जेथे तो बाहेर पडणार असेल तेथील भाग सुजून दुखू लागतो, नंतर केव्हातरी बत्ताशासारखा एक पांढरा फोड येतो. तो फुटला की त्यातील एका छिद्रातून गोधडी शिवण्याच्या जाड दोऱ्यासारखे एक टोक दिसू लागते. पित्त उठून नंतर २।३ दिवसांत असा फोड येणे हे नारु झाल्याचे पहिले लक्षण आहे. ओढून काढून निघत नाही. त्या जागी सूज येते, ताप येतो. गालाला, पोटाला सुद्धा नारु होतात पण फार क्वचित. विशेषे करुन कमरेपासून खालच्या दोन्ही पायातच विशेष होतात. ६।६ नारु एकाच वेळी झालेले लोक या नेत्रांनी पाहिले आहेत व २१ नारु एकाच माणसाला झाल्याचे ऐकले आहे. तो नारु आपोआपच बाहेर पडतो, पण किती महिने लागतील याचा नियम नाही. काढताना किंवा बाहेर पडलेला काडीला गुंडाळून ठेवताना तुटला म्हणजे कल्पनातीत यातना होतात, सूज, ताप फार येतात व ठणका फार लागतो. गुडघा वगैरे सांध्यांत नारु झालेले लोक बहुधा लंगडे होतात. असा हा अति दुःखद, दीर्घकाळ पर्यंत दंभाप्रमाणे अगदी गुप्त राहणारा व प्रगट झाल्यावर दीर्घकाळ छळणारा रोग आहे.

<u>(५)</u> <u>दंभ कपट मद मान</u>- हे मानस रोगांतील नारु आहेत. वात कफ पित्त व त्रिदोष यानी वाढणारे होणारे असे चार प्रकारचे नारु असल्याने एकच औषध सर्व रोग्यास लागू लडत नाही. फक्त एकच वनस्पतींचे औषध आहे त्याने सर्व बरे होतात म्हणजे कुजून बाहेर पडतात, पण ते येथे सांगण्याने भलताच परिणाम होण्याचा संभव असल्याने सांगणे लोकहितावह होणार नाही. दंभ कपट मद मान हे चारच आहेत. <u>(क)</u> <u>दंभ</u>- याचे लक्षण पूर्वी अनेक वेळा या टीकेत दिले आहे. दंभ हा त्रिदोषजन्य नारू आहे. दंभात काम, लोभ, क्रोध हे त्रिदोष गुप्त असतातच व नारूप्रमाणे दंभ बाहेर पडू लागले की असामान्य क्रोध प्रगट होतो तो त्या पित्तासारखा होय. <u>क्रोधपित्त</u>. नारुसारखेच दंभ कपट मान मद दीर्घ काळपर्यंत गुप्त असतात. मद हा वातप्रकृतीचा नारु, कपट कफ प्रकृतीचा नारु, व मान हा पित्त प्रकृतीचा नारु होय. <u>(ख)</u> <u>कपट</u> ही दंभाची पूर्वतयारीच असते. कपटाशिवाय दंभ करताच येत नाही. <u>(ग)</u> <u>मद</u>- गर्व, ताठा. <u>मान</u> = मोठेपणा, प्रतिष्ठा, आदर मिळावा अशी इच्छा. मिळविण्याचा प्रयत्न केला जातो मान मिळाला नाही म्हणजे क्रोध येतो. 'क्रोध पित्त उर नित्य

जाळतो' मान मिळत गेला की मद वाढतो. (घ) हे दंभादि चार नारुसारखे गुप्त राहून सतत वाढत असतात. इतरांना त्यांचे अस्तित्व कळत सुद्धा नाही. पण नारुप्रमाणे जेव्हा प्रगट होतात तेव्हा अति दाह, पित्त उसळणे = क्रोध, वेदना इत्यादि नाना कष्ट होतात. राहूप्रमाणे पुष्कळांना शिक्षाहि भोगावी लागते, कालनेमीप्रमाणे प्राणासही मुकावे लागते किंवा मरणापेक्षाही अति दुःखद अशी अकीर्ती व अपमान कैकईप्रमाणे सोसावा लागतो. आज परमार्थ मार्गात बोवाबाजी म्हणजेच दंभ, कपटादि फार वाढल्याची हाकाटी असून ती पुष्कळशी खरी आहे, पण प्रापंचिक व्यवहारांत तर या नारुंचा प्रसार फारच झाला आहे.

हिं. ।तृस्ना उदरबृद्धि अति भारी।त्रिविधि ईषना तरुन तिजारी।।३६।।

म. ।तृष्णा उदरवृद्धि अति भारी।त्रिविध एषणा तरुण तिजारी।।३६।।

अर्थ- अति भारी विषयतृष्णा हा अति भारी उदरवृद्धि (उदर) रोग आहे. तीन प्रकारच्या एषणा हा तिसऱ्या दिवशी येणारा तरुण ज्वर ताप होय.।।३६।।

टीका. (१) तृष्णा = विषयतृष्णा. पाण्याची तहान लागलेला मनुष्य पाणी मिळविण्यासाठी जशी धावपळ करतो वाटेल ते श्रम करण्यास तयार होतो व ते मिळाले नाही तर प्राण कासावीस होतो त्याप्रमाणे एक किंवा अनेक विषय मिळविण्याची ताहनेसारखी जी प्रबळ कामना तिचे नाव तृष्णा. हा मानसरोगांत अतिभारी उदरवृद्धी = पोट अति मोठे होणे = उदर नावाचा रोग आहे. (क) उदर रोगाचे मुख्य आठ प्रकार आहेत व असाध्य दशेंत गेल्यावर सर्वच प्रकारात पोटांत पाणी होते. उदर रोग आरंभापासूनच कष्ट साध्य असतो. व पोटात पाणी झाल्यावर तर असाध्यच असतो. पाणी झाल्यावर काढले तरि अल्पावधीत पुन्हा भरते, व पोट नगाऱ्यासारखे अति भारी मोठे होते. तशीच विषय तृष्णा आहे. विषयाच्या उपभोगाने कधी त्या विषयाची तहान शमत नाहीच पण उलट वाढतच जाते. 'न जातु कामः कामानां उपभोगेन शाम्यति। हविषा कृष्णं वर्त्मे व भूय एवाभि वर्धते।।' अग्नीत घृताच्या आहुती घातल्याने तो शान्त न होता वाढतच जातो तशी विषय तृष्णा कधीं विषयभोगानी तृप्त होत नाही. (क) शारिरीक उदर झालेला रोगी हांथरुणावरुन उठण्यास सुद्धा समर्थ नसतो पण

विषयाशा, विषयतृष्णा उदराचा प्रभाव फार विचित्र आहे. 'तृष्णा वेड न लावी कुणाला' (७।७०।८) 'आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्य शृंखला। यथा बद्धाः प्रधावन्ते मुक्तास्तिष्ठन्ति पंगुवत्' विषयाशा = विषयतृष्णा ही एक आश्चर्यकारक शृंखला (साखळदंड) आहे. हिने जे बांधलेले असतात ते वेड्यासारखे धावाधाव करतात, आणि जे तिच्यातून सुटलेले असतात ते पांगळ्यासारखे स्वस्थ राहतात. जलोदराचा रोगी जसा बरा न होता दिवसेंदिवस विविध कष्ट भोगीत, पराधीन दशेत क्षीण होत जाऊन शेवटी मरतोच तसा या तृष्णोदराचा रोगी कधी बरा होणे शक्य नसते, विषयांचा गुलाम बनून सदा अतृप्त राहून अनेक वेळा जन्ममृत्युजराव्याधि दुःखे भोगीतच राहतो. अनेक वेळा मरतो व अनेक वेळा जन्म घेतो.

(२) त्रिविध एषणा तरुण तिजारी- तीन प्रकारच्या एषणा वित्तैषणा पुत्रैषणा व लोकैषणा. ७।११०।१३ 'त्रिविध एषणा' टीका पहावी. (क) तिजारी एक दिवसा आड तिसरे दिवशीं येणारा ताप. तरुण म्हणण्याचे कारण हेच की आरंभी काही दिवस ते दोष तारुण्यात = जोमात असतात, थंडी फारच जोराची भरते व तापही फार जोराचा येतो. 'तृतीयकस्तृतीयेन्हि' (मा.नि) या ज्वराचा अंतर्भाव विषमज्वरांत (वैष्णव ज्वरांत) केला जात असला तरि बाकीच्या वैष्णव ज्वरापेक्षा याचा प्रसार निदान हिंदुस्थानात व ऊष्ण कटिबंधात फारच आहे. याचा अर्थ असा नव्हे की इतर कटिबंधातल्या लोकांना एषणा नसतात. रामचरितमानस ग्रंथ भारतातील लोकांच्या साठी लिहिलेला असल्याने या तृतीय ज्वराचा विशेष उल्लेख केला. हा ज्वर सर्वांच्या अति परिचयाचा असल्याने फार भयंकर वाटत नाही. तशाच या तीन एषणा नसलेला मनुष्य सापडणे अपवादात्मक असल्याने या एषणा म्हणजे मानसरोग आहेत, दुःखदायक आहेत असे वाटतच नाही. तारुण्यात असतां या एषणाचा जेवढा जोर असतो तेवढा वृद्ध झालेल्या तृतीयतज्वराप्रमाणे म्हातारपणी नसतो. पुरुषांना ७०।७५ वर्षांच्या वयापर्यंत व स्त्रियांना ६० वर्षांच्या होईपर्यंत पुत्रैषणा असतेच असते. वित्तैषणा कमी न होता वृद्धपणी वाढते.

(३) तृतीयक ज्वराचे तीनच भेद आहेत तशा तीन एषणा आहेत. कफपित्तात्मक = पुत्रैषणा, वातकफात्मक = वित्तैषणा व वातपित्तात्मक =

लोकैषणा होय.

हिं. ।जुगबिधि ज्वर मत्सर अबिबेका ।कहँ लगि कहौं कुरोग अनेका ।।३७ ।।

म. ।दोन्ही ज्वर मत्सर अविवेक ।कुठवर सांगु कुरोग अनेक ।।३७ ।।

अर्थ- मत्सर (वैष्णव) आणि अविवेक (शैव) हे दोन प्रकारचे ज्वर आहेत. असे या कुरोगांचे वर्णन कोठवर व किती करणार! ते अनंत आहेत.।।३७।।

टीका. (१) ज्वर- 'दक्षापमानसंक्रुद्ध- रुद्रनिश्वास संभवः। ज्वरोष्टधा पृथग द्वंद्वसंघातागजः स्मृतः' (मा.नि.) दक्ष प्रजापतीने केलेल्या अपमानामुळे क्रोधाविष्ट झालेल्या रुद्राच्या महेश्वराच्या निःश्वासापासून उत्पन्न झालेला तो ज्वर (महेश्वर ज्वर). त्याचे आठ भेद आहेत. वातादि प्रत्येक दोषापासून मिळून ३, वातादि २।२ दोषांनी मिळून ३, त्रिदोषज आणि आगंतुक मिळून आठ आहेत. 'देहेद्रियमनस्तापी सर्व रोगाग्रजो बली। ज्वरः प्रधानं रोगाणां उक्तो भगवता पुरा.' सर्व रोगांत अग्रणी वडील भावासारखा जो महेश्वर ज्वर तोच अविवेक. या एका माहेश्वरज्वरापासून नानाप्रकारचे दुसरे विशेष दूषित ज्वर उत्पन्न होतात ते विषमज्वर = वैष्णव ज्वर. क्वचित स्वतंत्रपणेंच विषमज्वर उत्पन्न होतात तसेच अविवेकापासून मत्सरादि अनेक मानसरोग उत्पन्न होतात ते वैष्णव ज्वर. मत्सर हा वैष्णव ज्वर होय.

(२) मत्सर- मत्सर, असूया, ईर्षा, परसुखाऽसहिण्णुता इत्यादि शब्द पुष्कळ ठिकाणी पर्याय म्हणूनच वापरले आहेत. शब्द कोषंतही साधारणपणे समान अर्थच आढळले. तथापि त्यात सूक्ष्म भेद आहेत. सवतीमत्सर शब्दावरुन मत्सरादि यथार्थ कल्पना येते. आपणास न मिळणारे सुखादि इतरांस मिळत असल्यास त्यांच्या या त्या सुखादिकांचा विनाश करण्याची किंवा ते त्यास मिळू न देण्याविषयीची भावना म्हणजे मत्सर. (क) स्पर्धा + परोत्कर्ष-असहिष्णुता = ईर्षा. ईर्षा व मत्सर यांचे कार्य सफल न झाल्यास त्या त्या व्यक्तींत असलेल्या पण स्वतःपाशी नसलेल्या सद्गुणांदिकांवर दोषांचा आरोप करणारी जी वृत्ती ती असूया.

ल.ठे.- श्रीराम वनवासाच्या वेळी अयोध्यावासी लोकांना जो विरह ताप

झाला त्याला विषमज्वर म्हटले आहे. 'श्वास घेति जळति विषमज्वरिं। रामाविण जीवन आशातरि' (२।५१।५) 'पाहवती ना व्याकुळ माता। पुरवासी विषमज्वरिं जळतां' (२।२६२।२) विषमज्वर हा वैष्णवज्वर आहे. राम = विष्णु. त्यांचा वियोग होतांच पुरवासी लोकांना जो ज्वर आला. २।५१।५ टीका पहावी म्हणजे श्री गोस्वामींच्या वैद्यशास्त्रज्ञानाची व काव्यप्रतिभेची प्रशंसा करावी तेवढी थोडी असे वाटेल.

(३) कुठवर सांगु कुरोग अनेक- आतापर्यंत अत्यंत तापदायक व असाध्य अशा मुख्य मुख्य काही रोगांचे वर्णन केले. शरीर रोगांचे वर्णन वाग्भट, सुश्रुत, चरक इत्यादींनी आपापल्या ग्रंथात सांगोपांग व सविस्तर केले आहे, कारण त्या रोगांची संख्या मर्यादित आहे. मानसरोग इतके आहेत की त्या सर्वांचे वर्णन कोणालाही करता येणार नाही. मानसरोग असंख्य आहेत. शितावरुन भाताची परीक्षा या न्यायाने अल्पसे म्हणजे प्रसिद्ध ११ रोगांचे वर्णन केले व शेवटी ज्याचा उल्लेख केला तो अविवेक रुद्रज्वर आहे, रुद्र ११ आहेत. हे सर्व रुद्र = भयंकर रोग आहेत. या अकरा व इतर सर्व रोगांची उत्पत्ती करणारे मुख्य त्रिदोष म्हणजे कामलोभक्रोध. (वात कफ पित्त) व या तिघांचे मूळ मोह आहे, म्हणून 'मूलेकुठारः' न्यायाने त्या एकाचा संपूर्ण विनाश केला की बाकीच्या कथित व अकथित अशा सर्वांचाच विनाश होतो. आता या रोगानिदानाचा उपसंहार करुन रोगोपशय कथनास प्रारंभ करतील. उपशय = औषध, अन्न आणि व्यायाम यांचा रोगप्रशमन होईल असा रोग कारणांच्या विरुद्ध उपयोग करणे.

हिं.दो. ।एक ब्याधि बस नर मरहिं ए असाधि बहु ब्याधि।।
।।पीडहिं संतत जीव कहुँ सो किमि लहै समाधि।।१२१रा.।।

म.दो. ।एक रोगवश नर मरति बहु असाध्य या व्याधि।।
।।संतत जीवा पीडिती तो कशि लभे समाधि।।१२१रा.।।

अर्थ- एका रोगाला वश होऊन (सुद्धा) लोक मरतात, आणि या तर पुष्कळ व असाध्य व्याधि (रोग) आहेत आणि या सदा सर्वकाळ जीवाला पीडा देत असतात. मग त्याला समाधि (समाधान, विश्राम) कशी

मिळेल?।।१२१रा.।।

टीका. (१) एक रोगवश नर मरति- रोगवश होणे म्हणजे रोगाच्या ताब्यांत जाणे. रोग असाध्य अवस्थेत गेला म्हणजे मनुष्य त्याच्या पूर्णपणे ताब्यात गेला, त्याला वश झाला असे ठरते व मनुष्य मरतो. असे एका एका असाध्य रोगाने अनेक लोक रोज मरतात. रोग असाध्यावस्थेत जाण्यापूर्वी योग्य उपशय (औषध, पथ्यादिक) केला गेल्यास रोग बरा होतो व मनुष्य मरत नाहीत हे ही पुष्कळ वेळा कळते. देहरोग अल्प आहे असे म्हणून त्याची उपेक्षा करणे हितावह नसते. (क) बहु असाध्य या व्याधि- व्याधि = रोग. मागे वर्णन केलेल १)शूल, २)कच्छू, ३)दद्रू, ४)ग्रहोन्माद, ५)क्षय, ६)कुष्ट (दोन प्रकारचे) ७)अर्बुद (कॅन्सर), ८)नारु, ९)उदर, १०)तृतीयकज्वर, ११)ज्वर (माहेश्वर, व वैष्णव) वगैरे अगणित रोग जीवांना सदा सर्वकाळ पीडा देत असतात आणि याची कारणे मोह (अज्ञान) काम, क्रोध, लोभ, व तिघांचे ऐक्य ही आहेत. हे सर्व रोग असाध्य आहेत व त्यांची कारणेही सहज नष्ट होण्यासारखी नाहीत. असे असतां यांच्या विनाशाचा कसून प्रयत्न न केला तर ते शहाणपणाचे ठरेल काय? तो आत्मघातकीपणा नाही का ठरणार? (ख) तो कशि लभे समाधि? येथे समाधि = समाधान स्थिती, विश्राम. ज्या मनाला अनेक असाध्य रोगांची पीडा सतत होत आहे ते स्थिर राहून समाधान कसे मिळेल? कोणी म्हणतील की या रोगांच्या विनाशासाठी श्रुतिस्मृतिपुराणांनी अनेक उपाय सांगितले आहेत म्हणून आता सांगतात-

हिं.दो. ।नेम धर्म आचार तप ग्यान जग्य जप दान।।
।।भेषज पुनि कोटिन्ह नहिं रोग जाहिं हरिजान।।१२१म.।।

म.दो. ।नेम धर्म आचार तप ज्ञान यज्ञ जप दान।।
।।भेषज कोटि करुन नहि जाति रोग हरियान।।१२१म.।।

अर्थ- नियम, धर्म, आचार. तप, ज्ञान, यज्ञ, जप, दान आणि दुसरी कोट्यावधि औषधे (उपाय) करुन सुद्धा हे हरिवाहना! हे रोग जात नाहीत.।।१२१म.।।

टीका. (१) नेम = नियम, यात यमांचा अंतर्भाव करणे जरुर आहे. कारण

यम आणि नियम यांचे पालन हा धर्माचा पाया आहे. यम, नियम,तप, धर्माचरण इत्यादि विषयी ज्ञानदीप प्रकरणांत पुष्कळ विस्तार केला आहे. येथे जप म्हणजे हरिनाम जपाशिवाय इतर मंत्रांचा जप व पाठ असा अर्थ घेणे जरुर आहे. कारण दहा नियमांत जपाचा अंतर्भाव होतोच. ११७।१० टीका पहावी. (क) दान- 'स्वस्वामित्वनिवृत्तिपूर्वकं परस्वामित्वोत्पादनं दानम्' मोबदला न घेतां आपली मालकी नाहींशी करुन दुसऱ्याचे स्वामित्व (मालकी) उत्पन्न करणे म्हणजे दान. भेषज = औषध. (ख) भेषज कोटि करुन- यमनियमादि वर सांगितलेल्या उपायांशिवाय श्रुतिस्मृतिपुराण, तंत्र इत्यादींनी आणखी पुष्कळ उपाय सांगितले आहेत,पण ते सर्व करुन सुद्धा हे रोग नष्ट होत नाहीत. सर्व सद्ग्रंथाचे ध्येय दुःखांची अत्यंत निवृत्ति व शाश्वत सुखाची प्राप्ति हेच आहे. दुःखरहित शाश्वत सुख असावे, असे कोणाला नाही वाटत? अशीं औषधें असली तरि नुसत्या औषधांच्या सेवनाने रोग बरे होतात असे कोणतेच वैद्य शास्त्र सांगत नाही. रोगाचे अचुक निदान होणे, औषध योजना, रोग्याच्या प्रकृतिधर्मानुसार बिनचूक होणे, पथ्य, अनुपाम व व्यायाम यांची योजना व सेवन रोग्याचा व रोग्याच्या आप्टेष्टांचा वैद्य डॉक्टरांवर विश्वास इत्यादि सर्व गोष्टी व्यवस्थित घडल्यावर तर साध्य व कष्ट साध्य रोग औषधाने बरे होण्याची शक्यता असते. असाध्य रोग बरे होत नाहीत, म्हणूनच माधवनिदान, सुश्रुत, वाग्भट इ. प्रमाणभूत ग्रंथांत स्पष्ट सांगितले आहे की विशिष्ट असाध्य परिस्थितीत वैद्याने रोग्याला औषध देऊ नये. 'व्याधेस्तत्व परिज्ञानं वेदनायाश्च निग्रहः। एतद्वैद्यस्य वैद्यत्वं न वैद्यः प्रभुरायुषः' नुसत्या औषधांनी रोग बरे होतात असे पाश्चात्य वैद्यशास्त्रसुद्धा सांगत नाही. (ग) ग्रंथिभेद झाल्याशिवाय भवभयविनाश होत नाही व 'श्रुति पुराण बहु उपाय वदती। न सुटे अधिकाधिकच घट्टती' (११७।६) असे जे सांगितले तेच येथे मानसरोग या नावाने सांगितले. (घ) 'भवभयनाश न हरिभजनाविण' (७।९०।८) 'विण हरिभजन नाश ना क्लेशा' (८९।५) हे मूळ कारण आहे. हा सिद्धान्त येथे एका शब्दाने ध्वनित केला आहे.

(२) हरियान- हरीचे वाहन,गरुड हे येथे वाच्यार्थाने संबोधन आहे, पण याने ध्वनित भाव हे आहेत. (क) हरिकडे यान = गमन नसेल तर या औषधोपचारानी हे रोग कधींच जाणार नाहीत. 'हरि-यान नहिं रोग नहि जाति'

या रोगाना, जाण्यासाठी तरि यान वाहन पाहिजेच व हे जाणार तरि कुठे? त्यांना हरिभक्तीरूपी हरियानावर बसविले तर ते श्रीहरिचरणांपर्यंत पोचतील, व मग त्या जीवाजवळ येणार नाहीत. 'निकट मोहदारिद्र्य येत ना' यान = वाहन, यान = गमन. (ख) यान = शत्रूवर स्वारी करणे असा एक अर्थ आहे. हरियान शब्दाने अर्थ निघतो की श्रीहरिनेच जर या रोगरूपी अजिंक्य शत्रूंवर स्वारी केली तरच हे कायमचे पळून जातील. 'कामकोपमद-गज-पंचानन। वसां निरंतर जनमनकानन।।मोहामहा घनघटा प्रभंजन। संशयविपिन अनल सुररंजन' (६।११५।४।२) असे म्हणून शंकरांनी रघुनायकास प्रार्थना केली आहे की, 'अनुजजानकी सहित निरंतर। वसा राम नृप मम उर अंतर' (६।१।५।६-८ पहा). या शत्रूंवर हल्ला करण्यास शंकरानी प्रार्थना केल्याप्रमाणे ।।श्री रघुवीर धनुःशरधारी। भक्तिविवश सेवक सुखकारी।। (प्रज्ञा) हृदयांत येऊन राहणे हा एकच एक अमोघ उपाय या समस्त रोगाना समूळ पळवून लावणारा आहे. (ग) आणखी भाव हा की गरुड तुम्हीं 'महाज्ञानी गुणराशी। हरिसेवक अति निकट निवासी' हरियान असून मोह मूल रोगानी तुम्हाला सुद्धा पछाडले होतेच! ल.ठे. एक 'हरियान' हा शब्द वापरून आनंदाची कशी लयलूट करुन ठेवली आहे! यमनियमादि अनंत औषधांनी हे रोग का बरे होत नाहीत आणि कशाने केव्हा बरे होतील हे सांगण्यास आता प्रारंभ करतात.

हिं. ।एहि बिधि सकल जीव जग रोगी।सोक हरष भय प्रीति बियोगी।।१।।
।मानस रोग कछुक मैं गाए।हहिं सब कें लखि बिरलेन्ह पाए।।२।।

म. ।यापरिं सकल जीव जगिं रोगी।शोक हर्ष भी प्रीति वियोगी।।१।।
।मानसरोग काहि मी वर्णित।सकलां असुनि एक कुणी जाणत।।२।।

अर्थ- अशा प्रकारे जगांतील सर्वच जीव रोगी आहेत, शोक, हर्ष, भय, प्रीति, आणि वियोग यानी पीडलेले आहेत.।।१।। मी काहीं मानस रोगांचे वर्णन केले ते सगळ्यांनाच झालेले असले तरि कोणी एखादाच जाणतो (की मी मानसरोगग्रस्त आहे.)।।२।।

टीका. चौ.१ (१) यापरि रोगी- हातापायांना खरुज, कमरेला गजकर्ण, गळ्याला नायटे, ग्रहोन्मादाने बुद्धिभ्रंश झालेला, क्षयाचा खोकला व ताप यानी

क्षीणता आलेली, कॅन्सर घशांत, त्यातच जलोदर झालेले, अशा दशेत आणखी सन्निपात ज्वर आला आहे व त्यात वात झाला आहे अशा रोग्याला कोणते औषध व किती देणार? व त्या मानवजीवाला सुख समाधान कसे व किती मिळत असेल याचा विचार करावा. (क) यापरिं सकल जीव जगिं- अशा प्रकारे जगांतील सगळेच जीव रोगग्रस्त आहेत. मानव दानव देव पशुपक्षी इत्यादि सर्वच जीवांची अशी दुर्दशा आहे. मानवेतर जीवानां या रोगांतून सुटण्याचा प्रयत्न करताच येत नाही, कारण त्या सर्व भोग योनी आहेत हे यापूर्वी मानसांतच वेळोवेळी दाखविले आहे. क्षणांत हर्ष, क्षणांत प्रीति, क्षणांत भय, शोक, चिंता अशी इंद्रादि देवांची दशा भरत चरित्रांत अयोध्या काण्डांत व लंकाकांडात युद्ध वर्णनात दाखविली आहेच. (ख) हर्ष, शोक भी प्रीति वियोगी- भी = भय, भीति. कधीं हर्षोन्माद होऊन हसतो रडतो (आनंदाश्रु गाळतो) कधी शोकग्रहग्रस्त होऊन तसेच करतो, बरळतो, कधी भयाने व्याकुळ होऊन लपतो, तर कधी छाती धडधडते, ओरडतो, थरथर कापतो. कधी नश्वर प्रीतिचे वेग येऊन पशूपेक्षां हीन चेष्टा करतो, तर कधीं त्या प्रेमाचा विरस वा वियोग होऊन खिन्न दुःखी होतो. सार हे की जीवमात्र या रोगांनी ग्रस्त आहेत व त्यामुळे त्यांच्या दुःखाचा कधी अंत होत नाही, मग सुख समाधान कुठले?

चौ.२ (१) काहिं मी वर्णित- मी थोड्याच रोगांचे थोडक्यात सविस्तर वर्णन केले. वर्णन करणे, गाणे वाखाणणे हे शब्द विस्तारपूर्वक तात्विक विवेचन करण्यास वापरले आहेत. सांगणे, वदणे, कथन करणे हे शब्द भक्तीविषयी कथा, इत्यादि कथन करणे या अर्थाने वापरले आहेत. संक्षेपात विस्तार करुन ठेवण्याची, शब्द लाघवांत अर्थ गौरव भरुन ठेवण्याची काव्यकला श्रीगोस्वामीजींच्यासारखी इतरांस साधलेली दिसत नाही. मोठमोठ्या गंभीर गहन तात्विक विषयांचे निरुपण रुपकांचा आश्रय करुन ते करतात. त्यामुळे उपमेय आणि उपमान यांचे गुण, क्रिया, स्वभाव, प्रभाव, संबंध यांचा विस्तार ज्याला जेवढा करतां येईल तेवढा तो आपल्या विविध ज्ञानाच्या व विचाराच्या शक्तीप्रमाणे करु शकतो. नुसत्या एका शब्दाने किती व्यापक व विविध अर्थ सुचविलेला असतो याचे 'हरियान' हे एक उदाहरण नुकतेच दाखविले आहे. (क) तात! ऐक मानस रोगानां (१२१।८) असा उपक्रम केला व 'मानसरोग काहिं मी वर्णित' असा येथे उपसंहार केला.

(२) सकलां असुनि- हे रोग सगळ्यांनाच झालेले असून सुद्धा. (क) एक कुणि जाणत- कोणी एखादाच जाणतो की अमुक अमुक मानसरोग आपल्याला झाले आहेत. हे रोग आपल्याला झाले आहेत हे बहुतेकांना कळतच नाही. भाव हा की काम, क्रोध लोभ, हर्ष प्रीति, विषयाशा हे रोग आहेत असे न वाटता ते मित्र वाटतात. आपल्या दुःखाचे कारण ममता विषयप्रीति, मान, मद, इत्यादि आहेत असे वाटतच नाही व दुःखाची कारणे बाहेर शोधली जातात व इतर कोणास त्या दुःखाबद्दल जबाबदार मानतात. त्यामुळे द्वेष, वैर, निंदा, चाहडी, कलह इत्यादींचे बळ वाढतच जाते व दुःखात भरच पडते. कोणी एखादा विरळा भाग्यवानच जाणतो की हे रोग आपल्याला झाले आहेत व आपल्या सर्व दुःखाचे कारण हे रोगच आहेत. जाणल्यामुळे काय होते ते पहा-

हिं. ।जाने ते छीजहिं कछु पापी ।नास न पावहिं जन परितापी ।।३ ।।
।बिषय कुपथ्य पाइ अंकुरे ।मुनिहुँ हृदयँ नर का बापुरे ।।४ ।।

म. ।जाणत जरा क्षीण, परि पापी ।नाश न पावति जन परितापी ।।३ ।।
।विषय कुपथ्य मिळत धडफुडे ।मुनि हृदयिं हि नर किति बापुडे ।।४ ।।

अर्थ- जाणल्याने ते थोडे क्षीण होतात (इतकेच) पण सर्व बाजूनी लोकानां ताप देणारे ते पापी नाश पावत नाहीत.।।३।। विषयरूपी कुपथ्य मिळतांच मुनींच्या हृदयांत सुद्धा धडधाकट होतात मग बिचाऱ्या (पामर) नरांची कथा ती काय?।।४।।

टीका. चौ.३ (१) जनपरितापी पापी- जे कोणी जीवानां पीडा देतात ते पापी होत. 'परपीडे सम अधम न काहीं' (७।४१।१) दुसऱ्यांना पीडा = ताप दुःख कष्ट देणे ही हिंसा आहे. 'अति हिंसेची प्रीति त्यांच्या पापा कवण भिति' (१।१८३) हे लंकेतील राक्षसांविषयी म्हटले आहे. 'कामादि खल' (३।३२छं.) कामक्रोध लोभ मोह मद मत्सर, दंभ कपट पाखंड, ईर्षा असूया, द्रोह, द्वेष हेच खरे घोर राक्षस होत. परंतु हे हृदयांत राहात असल्याने लवकर दिसत नाहीत, तथापि सर्वांना पीडा देत राहतात, फार काय बलात्काराने जीवाकडून पाप कर्मे करवितात. (क) जाणत जरा क्षीण होतात. हे सर्व शत्रू सुहृदांचे सोंग घेऊन मनुष्यांच्या अगदी अंतरंगात शिरुन बसतात. चोर, लुटारु, असून सावासारखे

वाटतात. हे सावचोर आहेत. न कळत सद्‌गुण आणि सुखसमाधानरुपी धन चोरतात. म्हणून यांना चोर म्हटले आहेत. 'मोह मान मद मत्सर तस्कर' (७।३१।६). सावचोरांना चोर म्हणून ओळखले व त्यांच्यावर जरा नजर ठेवली म्हणजे ते लाजतात, आणि त्यांची शक्तियुक्ति कमी होते व ते दुर्बळ बनून दबून राहतात. रोग झाला आहे असे समजले तरच कदाचित मनुष्य त्याच्या विनाशाच्या प्रयत्नास लागतो, पण वर्तमानपत्रांतील भडक जाहिरातींची औषधे घेतो, कित्येक वेळा आपल्या बुद्धीनेच घेतो, कधीकधी आपल्या प्रकृतीला न झेपणारी, भलतीच औषधे घेतो, तर कधीं रोग झाला आहे हे जाणून सुद्धां चाल ढकल करतो. कधी चांगला वैद्य मिळत नाही, कधी पथ्य पाळीत नाही, तर कधीं अनुपान चुकते. (ख) 'नेमधर्मादि' औषधे घेतली तरि रोग तर जात नाहीच पण अहंकाररूपी अर्बुद कॅन्सर होऊन वाढू लागतो. हे रोग बहुधा प्रसुप्त, तनु, विच्छिन्न व उदार या चार अवस्थापैंकी एखाद्या अवस्थेतच राहतात. पाचव्या 'प्रक्षीण' अवस्थेत जाणे फारच कठीण असते. हे मानसरोग बीजरूपाने असतात तेव्हा ते प्रसुप्त असतात. 'जणु वीररस निद्रित जागे' (२।२३०।१) विरुद्ध भावनांचा मारा सारखा होत राहिला तर तनु = अल्प, स्वरूप होतात. सूक्ष्मावस्थेत जातात. 'नाथ कृपें मम मनचि अलोले।। अतां कृपा प्रभु! अशी करावी। निशिदिन भजनिं तजुनि सब जावीं' (४।७।१५-२१पहा) असे ज्या सुग्रीवाने म्हटले त्याला 'राज्य, कोष, पुर नारी' मिळतांक्षणीं तो इतका विषयांध झाला की अग्निसाक्षिक मैत्री विसरुन रघुवीरास विसरला व नंतर २।३ महिने गेल्यावर हनुमंताने जागृति दिली तेव्हा म्हणतो की, 'ज्ञाना मम विषयानी हरले' गुप्त होऊन पुन्हा प्रगट होणे ही या रोगांची विच्छिन्न = खंडित अवस्था होय. विषयांत संचार करण्यास पूर्ण मुभा असते तेव्हा या रोगांची अवस्था 'उदार' असते व योगाने प्रसुप्त अवस्थेत जातात. पण पाचवी अवस्था प्रक्षीणता प्राप्त होत नाही. भाजलेल्या बीजांवर पुष्कळ पाणी पडले तरि त्यांना अंकुर फुटत नाहीत. अशी जी अवस्था ती प्रक्षीणता. नेमधर्म आचार तपादि औषधांनी किंवा या रोगांचे अस्तित्व जाणल्याने ही प्रक्षीणावस्था प्राप्त होत नाही हे आता सांगतात.

चौ.४ (१) विषय कुपथ्य- कुपथ्य = रोगाचे दोष वाढविण्यास मदत करणारे अन्न, पान, निद्रा, विहार, क्रिया, कर्म, भाषण, इ. कारणे हे कुपथ्य

(अपथ्य) होय. रोग ज्या दोषांमुळे झाला असेल त्या दोषांचे शमन करणारे किंवा त्यांच्या वृद्धीस कारण न होणारे आहारनिद्रादि सेवन करणे याचे नाव पथ्य पालन करणे. शारीर रोगांत हा जसा पथ्यापथ्याचा विचार त्याचप्रमाणे मानस रोगांत विषयांचे सेवन हे कुपथ्य आहे. विषयांचा पूर्ण त्याग करून देह जगणार नाही, म्हणून अनावश्यक व रोगवृद्धीकर विषयांचा त्याग करुन देह रक्षणास लागणाऱ्या अन्न, जल, व वस्त्र या विषयांचा अगदीं आवश्यक तेवढाच उपयोग, त्यांच्यावरील प्रीति सोडून करणे हे मानसरोगांत पथ्यपालन होय. यमनियमांचे पालन हे मुख्य पथ्य आहे. विषयी जनांची संगती सोडणे हे फार महत्वाचे पथ्य आहे. विषयांच्या संगतीपेक्षा विषयीजनांची संगति अधिक घातक असते. (क) मिळत धडफुडे- पाणी न मिळाल्याने प्रतिकूल खत मिळाल्याने मरण्याच्या पंथास लागलेली बागेतील झाडे पाऊस पडताच किंवा पाणी घातले जाताच काही वेळाने जशी टवटवीत व प्रसन्न होऊ लागतात तसेच जाणल्याने तनु = क्षीण झालेले व यमनियमादि साधनांनी विच्छिन्न झालेले कामक्रोधलोभादि मोहमूलक सर्व रोग पुन्हा ताजेतवाने, धट्टे कट्टे (धडफुडे) होतात, म्हणजेच उदार अवस्थेत येतात. विषयरूपी पाऊस पडला की प्रसुप्त रोगबीजेसुद्धा उगवतात. सुकून म्लान झालेले टवटवीत होतात, वठलेल्याना पालवी फुटते.

(२) मुनि हृदयिं हि- मुनींच्या म्हणजे ज्ञानी विषय त्यागी विरागी लोकांच्या हृदयांत सुद्धा विषय कुपथ्याने हे रोग बळावतात. नारदमोहाचे उदाहरण मानसांत आहेच. 'मुनि ते ज्ञाननिधान मृगनयनी विधुमुख बघुनि। विवश होति हरियान....' (११५म.) (क) किती नर बापुडे- अशी जेथे ज्ञानी, ज्ञाननिधान विरागी, विषय त्यागी मुनींची, महामुनींची स्थिती होते, तेथे पामर, दुर्बल, अज्ञानी मानवांची कथा ती काय? त्यांनी जरि या रोगांचे अस्तित्व जाणले व नेमधर्म आचारतपादि उपाय मनापासून केले तरि तेवढ्याने या रोगांचा विनाश होणे शक्य नाही. (ख) आता असा प्रश्न उद्भवतो की यांचा समूळ नाश करण्याचा काही उपाय आहे की नाही? याचे उत्तर आता देतात.

ल.ठे. 'बहु असाध्य या व्याधि' असे म्हटले आणि 'भेषज कोटि करुन नहि जाति रोग....' असे जे म्हटले त्याचे कारण येथपर्यंत सांगितले.

हिं. ।रामकृपाँ नासहिं सब रोगा।जौं एहि भाँति बनै संजोगा।।५।।

म. ।रामकृपें सब रोग विनाशति।असा सुयोग कधीं जर लाभति।।५।।

अर्थ- श्रीरामाच्या कृपेने असा (पुढे सांगितलेला) सुयोग जर जुळून आला तर सर्व (मानस) रोग नाश पावतात.।।५।।

टीका. (१) असा सुयोग कधीं जर लाभति- पुढे सांगितल्याप्रमाणे सुयोग जर जुळून आला तर कार्यसिद्धि होतेच होते. ज्ञानमार्गात आवश्यक असलेला अनेकानेक गोष्टींचा संयोग जरि जुळला ईशकृपेने, तरीसुद्धा ग्रंथिभेदरूपी कार्यसिद्धि अनिश्चित असते. 'ईश असा संयोग आणि जै। शके कदाचित सुटूं ग्रंथि तैं' (११७।८) (क) असा सुयोग- येथे मानसरोग विनाश हे साध्य आहे. १) मी रोगी आहे व या रोगांतून मुक्त झाल्याशिवाय सुख समाधान मिळणे शक्य नाही अशी ज्याची दृढ भावना आहे तो रोगी. २) रोगाचे निदान करुन औषधादि योजना करणारा सद्वैद्य = सद्गुरु. ३) पथ्यपालन. ४) औषधि सेवन आणि ५) अनुपान या पाच गोष्टी एकत्र जमणे जरूर आहे. परंतु मनुष्याच्या, रोग्याच्या प्रयत्नांनी बाकीच्या चार गोष्टी उत्तम प्रकारे एकत्र जमणे अशक्य आहे पण (ख) 'रामकृपे सब रोग बिनाशति' रामकृपेनेच रोगी व बाकीच्या चार गोष्टी यांचा सु-योग होतो. येथे सद्गुरु वैद्याची आवश्यकता आहे आणि रामकृपेवाचून सद्गुरुची = विशुद्ध संतांची भेट होत नाही. पुण्य पुंज असल्याशिवाय रामकृपा होत नाही आणि तनुमनवाणीने कपट त्यागून विप्रसेवा करणे हे पुण्य पुंज संग्रहाचे साधन आहे हे यापूर्वीच्या प्रकरणांत अनेक वेळा स्पष्ट झाले आहे.

(२) सर्व प्राणी मात्रांवर रामकृपा असली तरि त्या सामान्य रामकृपेने भागत नाही. विशेष रामकृपा संपादन करण्याचे साधन 'द्विजसेवा हे व्रत हरितोषण' आहे. पण त्यामार्गाने जाऊन हरिकृपा संपादन करण्याची इच्छा होण्यास प्रथम आत्मकृपा व शास्त्रकृपा व्हावी लागते. रामकृपा झाली की गुरुकृपा होण्यास वेळ लागत नाही. (क) आत्मकृपा- आपल्याला मानस रोग झालेले असून त्यांचा विनाश झाल्याशिवाय दुःखनाश व चिरसुखलाभ होणार नाही आणि भगवंताच्या कृपेशिवाय हे घडणे शक्य नाही असे ज्याला निश्चयाने

वाटू लागेल त्यालाच आत्मकृपा प्राप्त झाली व तोच शास्त्रकृपा संपादन करण्यास अधिकारी झाला. (ख) रामकृपा कशाने होईल व या रोगांच्या विनाशाचे अमोघ साधन काय याचा शोध तो शास्त्राधारे, सद्ग्रंथाधारे करु लागेल. शास्त्रावलोकन श्रवण करुन त्याला कळेल की 'गुरुविण भवनिधि कोणि न तरती' विशेष रामकृपा झाल्याशिवाय अधिकारी संत सद्गुरु भेटत नाहीत. विशेष रामकृपा संपादन करण्याचे सुलभ साधन विप्रसेवा 'प्रथम विप्रपदिं परमा प्रीति' हे आहे. व हे जाणून जो प्रेमाने व श्रद्धापूर्वक विश्वासाने विप्रसेवा करु लागेल त्यानेच शास्त्रकृपा संपादन केली असे ठरेल. एवढे झाले, विप्रसेवा प्रेमाने केली की पुढील सर्व योग सहज जुळतात. 'त्यजुनि कपट तनुमन वचनि जो भूसुर सेवील।। मी विधिशिव सुर सर्वही त्याला वश होतील' (३।३३।-) असे श्री रामवचनच आहे. (ग) आत्मकृपा ज्या प्रमाणात तीव्र, तीव्रतर, तीव्रतम, मध्यम, आणि मंद, मंदतर, मंदतम असेल त्या प्रमाणात विप्रसेवेने रामकृपा संपादन करण्याचा प्रयत्न तळमळीने, चिकाटीने व प्रेमाने केला जाईल, व तो शीघ्रतम, शीघ्रतर, मध्यम व मंदगतीने घडेल सिद्धीस जाईल. पुढील चौपाईत वैद्य अधिकारी रोगी व पथ्य यांचे विवेचन केले आहे.

हिं. ।सदगुर बैद्य बचन बिस्वासा।संजम यह न विषय कै आसा।।६।।

म. ।सद्गुरु वैद्य वचनिं विश्वास हि।संयम हा कीं विषयाशा नहि।।६।।

अर्थ- सद्गुरु हा वैद्य, त्यांच्या वचनावर विश्वास आणि विषयांची आशा नसणे हा संयम = पथ्य (या तीन गोष्टी जुळल्या पाहिजेत).।।६।।

टीका. (१) सद्गुरु- बऱ्याचशा उपनिषदांत सद्गुरु शब्द आढळत नाही, गुरु शब्दच वापरलेला आहे. ज्यावेळी असद्गुरु अस्तित्वात आले असतील तेव्हापासून सद्गुरु शब्द वापरांत आला असला पाहिजे. मानसांत सद्गुरु शब्द फक्त चार वेळा वापरला आहे. 'सदगुरु बोध विरागा योगा' (१।३२।३) 'जाति मिळत सदगुरु जसे भ्रम संशय समुदाय' (४।१७) 'कर्णधार सदगुरु दृढनावे' (७।४४।८) व या (७।१२२।६) चौपाईत बाकी पुष्कळ ठिकाणी 'सद्गुरु' शब्दाचा पर्याय 'संत' शब्द वापरला आहे. गुरु शब्द २३६ वेळा वापरला असला तरि त्यात सद्गुरु या अर्थाने फार ठिकाणी वापरलेला नाही. विद्यागुरु,

कुलगुरु या अर्थाने बऱ्याच ठिकाणी वापरला आहे. गुरु = जड, वजनदार, श्रेष्ठ, मोठा या अर्थानेही कुठे कुठे वापरला आहे. सद्‌गुरु = कर्णधार दृढ नावे = भवसागरातून तारुन नेणारा कर्णधार. प्रस्तुत प्रकरणांत असे म्हणता येईल की भवमहारोगाने व्याकुळ होऊन तळमळत शरण येणाऱ्या विश्वासू रोग्याला भवमहारोगमुक्त करण्याचे औषध देणारा पण पथ्य पालन करुन व योग्य अनुपानांतून ते घेतले जाते किंवा नाही हे पाहणारा रामभक्त ज्ञानी तो सद्‌गुरु. तीव्र तळमळीच्या दृढ विश्वास संपन्न व सात्विक श्रद्धासंपन्न शिष्याला ज्यानी दिलेल्या औषधाच्या सेवनाने व ज्यांच्याकृपेने मोहमुक्त होऊन, रामस्वरूपाचे ज्ञान होऊन रामपदीं दृढभक्ती प्राप्त होईल तो सद्‌गुरु, अशी व्याख्या मानसांतील खालील वचनांच्या समन्वयाने सुनिश्चित होते. (क) पार्वती व गरुड हे दोन्ही श्रोते तीव्रतम तळमळीचे, विश्वास श्रद्धा संपन्न व न कंटाळता त्यांच्या सद्‌गुरुंनी दिलेले औषध प्रेमाने मनापासून सेवन करणारे आहेत. दोन्ही श्रोते अति आर्त बनून शरण गेलेले व पथ्याचे उत्तम पालन करणारे आहेत. हे अवतरणांनी सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. 'श्रुणु गिरिराज कुमारि भ्रमतम रविकर वचन मम' (१।१।५) ते श्रवण केल्यावर पार्वती म्हणाली 'परिसुनि तुमचे वच सम शशिकर। फिटे मोह शरदातप अतितर।। तुम्हिं कृपाळु सब संशय हरले। रामस्वरुप मज आकळले' (१।१२०।१-२) असे म्हणाली तरि मोह व संशय यांची छाया शिल्लक होतीच, ती पुढे आणखी श्रवण केल्यावर गेली तेव्हा पार्वती म्हणाली, 'तुमच्या कृपे कृपायतनू अतां कृतार्थ, न मोह।। विदित राम महिमा प्रभु चिदानंद संदोह' (७।५२रा) कृतार्थ झाल्याचे म्हणाली तरि दृढ रामभक्ति प्राप्त झाली नव्हती ती प्राप्त झाल्यावर म्हणते पार्वती की 'नाथ कृपें मम गत संदेहो। रामचरणिं नव उपजे स्नेहो।।८।। मी कृतार्थ झाले अतां कृपें तवहिं विश्वेश।। रामभक्ति दृढ उपजली गेले सगळे क्लेश' (७।१२९) गरुडाने अशाच प्रकारे आपला अनुभव सांगितला आहे. शंकरासारखे सद्‌गुरु व पार्वती सारखा शिष्य असून संशयमोह गेल्याचा कृतार्थ झाल्याचा व रामभक्ती मिळाल्याचा भास तिला दोनदा झाला! यावरुन समजावे की मोहनाश होऊन दृढ रामभक्ति प्राप्त होणे सुद्धा फार कठीण आहेच. (ख) वर सद्‌गुरुची जी व्याख्या केली तशा प्रकारच्या सद्‌गुरूची लक्षणे अरण्यकांड मंगलाचरणांत 'मूलंधर्मतरोर्विवेकजलधेः पूर्णेन्दुमानन्ददं' या श्लोकात ध्वनित केली आहेत. ती गूढार्थचंद्रिकेत प्रगट झालेली त्या श्लोकाच्या

टीकेत दिसतील. सद्‌गुरु समीप निवास करुन, सद्‌गुरुमुखाने रामकथा श्रवण दीर्घकाळ केल्याशिवाय संशय, भ्रम, मोह नष्ट होत नाहीत. 'विण सत्संग न हरिकथा त्याविण मोह न जात।। मोहनाशविण रामपदिं दृढ अनुराग न तात!' (७।६१) 'गुरुविण भवनिधी कोणि न तरती। जरि विरिंचि शंकर सम असती' (७।९३।५).

(२) वैद्य = सद्वैद्य. चांगला वैद्य प्रथम हे पाहतो की रोग्याचा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे की नाही. विश्वास नसलेल्या रोग्याला औषध देत नाही. सांगितल्याप्रमाणे पथ्याचे पालन करुन औषध मनापासून, कंटाळा न करता, योग्य अनुपानासह घेईल की नाही हे पाहतो व मग योग्य ते औषध रोगाचे निदान करुन देतो. तसेच सद्‌गुरुरूपी सद्वैद्य शिष्याची परीक्षा करुन, त्याच्या प्रकृतीचा व परिस्थितीचा विचार करुन, पथ्य सांगून साधन सांगतात. वैद्याला जर अचूक निदान करता आले नाही तर औषध योजना चुकेल व रोग बरा होणार नाही, शिष्याची प्रकृति, पूर्वजन्मीची उपासना व त्याची परिस्थिती यांचा विचार केला नाही तर त्या शिष्यावर भगवत्कृपा होत नाही किंवा फार वेळ लागतो व लवकर अनुभव न आल्यामुळे साधनांत प्रेम वाढत नाही. पण अधिकारी समर्थ सद्‌गुरु भगवत् कृपेशिवाय भेटत नाहीत व कदाचित भेटले तरि विश्वास बसत नाही. (क) आर्त रोग्याने उत्तम वैद्याकडे जाऊन जशी प्रार्थना करणे जरुर आहे त्याप्रमाणेच भावी साधकाने श्रीसद्‌गुरुस अति विनम्रपणे अनन्यभावाने शरण जाऊन प्रार्थना केली पाहिजे. उदा. १)पार्वती शंकरांस विनविते- 'मजसी प्रसन्न जर सुखरासी। समजा सत्य मला प्रिय दासी। तर हरणे प्रभु मम अज्ञाना....' (१।१०८।१-४पहा) 'पुसते अति आर्ता सुरराया। रघुपती कथा वदावी सदया' (१।११०।३) 'त्रिभुवन गुरु तुम्हि वेद वानती। क्षुद्र जीव किति आन जाणती' (१।१११।५). २)भरद्वाज याज्ञवल्क्यास शरण जाऊन विनवितात- 'पुजुनि मुनि सुयशा वारवाणी।...... नाथ! एक मज संशय भारी। करगत वेदतत्व तुज सारीं।। .....प्रगटीं नाथ! निज मोहा म्हणूनी। हरणें दासा कृपाळु बनुनी' (१।४५।६-७ - ४६।१ पहा). ३)गरुड काकाला शरण जाऊन विनवितो की- 'आतां रामकथा अति पावन। सदा सुखद दुःखाद्रिविनाशन।। तात! ऐकवा सादर मजला। पुनः पुन्हां प्रभु! विनती तुजला.' (७।६४।३-४).

(३) वचनिं बिश्वास- सद्‌गुरुच्या वचनावर पूर्ण विश्वास हे शिष्याचे मुख्य लक्षण सांगितले. 'कवण हि सिद्धि कीं विश्वासाविण' (७।९०।८) 'विश्वासाविण भक्ति ना द्रवति न ती विण राम' (७।९०) सद्‌गुरु वचनावर जितका जास्त दृढ विश्वास असेल तितकी रामकृपा लवकर होते. वैद्यावर व औषधावर रोग्याचा विश्वास नसेल तर औषधादि उपचारांचा काही उपयोग होत नाही. (क) रोगी मनुष्य डॉक्टर वैद्यानां धन देऊन सुद्धा आपले जीवित त्यांच्या हातात देतात. रुग्णालयात (हॉस्पिटलमध्ये) डॉक्टरांच्या वगैरे अज्ञानाने, चुकामुळे व हलगर्जीपणामुळे कित्येक रोग्यांस प्राणास मुकावे लागते. 'शस्त्रक्रिया यशस्वी पण रोगी मेला' असे अनेक वेळा घडते, हे माहीत असून सुद्धा डॉक्टर वैद्यावर पूर्ण विश्वास ठेऊन आपले प्राण त्यांच्या मुठीत देतात आणि वर शेकडो रुपये दक्षणा देतात. परमार्थांत असे प्राणसंकट नसतां, सद्‌गुरुंच्या मुठी धनाने भराव्या लागत नसतां बहुसंख्य लोकांचा सद्‌गुरुवचनावर पाहिजे तेवढा विश्वास नसतो हे परमाश्चर्य आहे! याचे कारण इतकेच की त्यांना परमार्थ नको असतो. प्रपंच अधिक सुखाचा, अधिक ऐश्वर्यसंपन्न करण्याचे एक फावल्या वेळातले साधन म्हणूनच परमार्थाचा उपयोग बहुतेक करतात. अशांना साक्षांत ब्रह्मदेव सद्‌गुरु भेटले तरि एका जन्मांत भवभयमुक्त होता येणार नाही. श्रीसमर्थ म्हणतात, 'जया संसाराचा त्रास। तयासीच उपजे विश्वास। विश्वास बळें कास। धरली सद्‌गुरुंची।।३६।। अविश्वासे कास सोडली। ऐंसी बहुतेक भवीं बुडाली। नाना जलचरीं तोडिली। मध्येचि सुखदुःखे।।३७।। लागतां सद्‌गुरु वचनपंथे। जालें ब्रह्मांड पालथे। तरि जयाच्या शुद्ध भावार्थे। पालट न धरिजे।।५१।। (दा.बो. ५।३)' या शेवटच्या ओवीत सांगितले तेच खऱ्या विश्वासाचे लक्षण आहे.

(४) संयम हा कीं बिषयाशा नहि- संयम म्हणजे मनाचा व इंद्रियाचा निग्रह. रोगी आपल्या मनाचा व इंद्रियांचा संयम करणार नाही तर कुपथ्य त्याग व पथ्याचे पालन त्याच्याकडून होणार नाही. 'विषय कुपथ्य' टीका पहावी. स्नान, पान, भोजन, विहार, वस्त्र, हवा, पाणी, शौच, निद्रा, जागृति, संगति, चिंतन, भाषण इ. बाबतीत वैद्याने घातलेले निर्बंध पाळले गेले तरच औषध व अनुमान यांच्या योगाने असाध्य रोग बरा होण्याचा संभव असतो. त्याप्रमाणेच भवमहारोग झालेल्या रोग्याने सद्‌गुरु वैद्याच्या आज्ञेप्रमाणे विषयांच्या आशेचा

त्याग केला पाहिजे. वर वर्णन केलेल्या स्नानपानादि सर्वच बाबतीत इंद्रिये व मन यांचा संयम केला पाहिजे. अन्नवस्त्रासाठी धन मिळविण्याची इच्छा परमार्थ साधकाने धरणे म्हणजे 'तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्' या सद्‌गुरुनी स्वानुभवसिद्ध सांगितलेल्या भगवद्वचनावर विश्वास नाही असे जाहीर करणे आहे. किंवा विषयांचा लोभ व वित्तैषणा सोडण्याची व यदृच्छालाभ संतुष्ट राहण्याची तयारी नाही असे मान्य करणे आहे. सद्‌गुरु वचनावर पूर्ण विश्वास असला व रामकृपेने अधिकारी सद्‌गुरु भेटले असले तरि विषयांची आशा सोडण्याचा प्रयत्न कसून केलाच पाहिजे. सद्‌गुरूवचनावर निःसंशय पूर्ण विश्वास ठेऊन जो मनापासून आटोकाट प्रयत्न करतो, प्रयत्नांत पूर्ण यश न आले तर रडतो, तळमळतो त्याला प्रभु मदत केल्यावाचून राहत नाहीत. रोग्याने कुपथ्याचा त्याग हेतु पुरःसर केलाच पाहिजे. आशा, निराशा, दुराशा इत्यादि बाळगणाऱ्या मनाला लागलेली विषयांची चटक मोडावयाची तर त्यास दुसरा चांगला दुःख रहित सुख देणारा व विषयातीत करणारा विषय पुनःपुन्हा दिला पाहिजे. असा विषय म्हणजे 'नाना पुराणनिगमागम संमत' श्रीरघुनाथचरित्र हा आहे. 'या मनाचे एक निकें। देखिल्या गोडीच्या ठायां सोके' (ज्ञाने.) म्हणून आता औषध आणि अनुपान ही दोन साधने सांगतात.

हिं. ।रघुपतिभगति सजीवनि मूरी।अनूपान श्रद्धा अति रूरी।।७।।

म. ।रघुपति भक्ति मुळी संजीवनि।अनुपाना श्रद्धा अति पावनि।।७।।

अर्थ- (रामकथाश्रवणरुपी) रघुपति भक्ति ही संजीवनि मुळी आहे (औषध) आहे आणि अनुपानाला अति पावन (सात्विक) श्रद्धा पाहिजे.।।७।।

टीका. (१) सर्व मानस रोगांचे मूळ जो मोह त्याच्या नाशाचे साधन येथे सांगितले आहे. प्रेमभक्ति प्राप्तीचा उल्लेख पुढे आहे. 'मुळी संजीवनि' पूर्वी ग्रंथारंभी श्रीगुरुपदरज हे 'अमृतमुळीमय चूर्ण सुचारु। शमन सकल भवरुज परिवारु' सांगितले. नंतर 'श्रीरामनामामृतं' हे औषध सांगितले येथे सद्‌गुरु वैद्यांजवळ असलेले संजीवनि मुळी हे औषध सांगितले, ही संजीवनि मुळी म्हणजे (क) रघुपति भक्ती- विषयाशा त्यागाने वैराग्याचा अभ्यास सुचविला नंतर मोह नाश प्रथम झाला पाहिजे, मोह = अज्ञान, त्याचा नाश ज्ञानाने होतो.

'गुरुविण नोहे ज्ञान, ज्ञान किं होइ विरागविण' (८९) गुरु भेटले आहेत, वैराग्याची प्राप्ति सुचविली आहे. 'विण सत्संग न हरिकथा त्याविण मोह न जात' सत्संग = सद्‌गुरु संगतीत राहून सद्‌गुरु मुखाने हरिकथा श्रवण केल्याशिवाय मोह जात नाही. म्हणून येथे रामभक्ति = रामकथाश्रवणभक्ती असा अर्थ घेणे जरुर आहे. मोहनाश झाल्याशिवाय रामपदीं दृढ अनुराग रूपी रघुपति भक्ति मिळत नाही. रामकथेलाच संजीवनि मुळी म्हटले आहे. 'संजीवनि मुळि भवरोगा ती। रामकथा, श्रुति सूरी गाती' (७।१२९।२) रोगाने व्याकुळ झालेल्यास वैद्य मुळी उगाळून सेवन करण्यास देतात त्याप्रमाणे सद्‌गुरु रामकथारूपी संजीवनि मुळी उगाळून आपल्या मुखाने शिष्याच्या कर्णपुटांत घालतात. त्या श्रवणाने प्रथम ज्ञानाचे संजीवन होऊन मोहनाश होतो. (ख) 'प्रथमभक्ति संतांची संगति' येथे सद्‌गुरु संगति प्रथम सांगितलीच आहे. 'दुसरी कथा श्रवणिं मम अति रति' (३।३५।८) 'गुरुपदपंकज सेवा तिसरी भक्ति अमान' (३।३५।-) याने प्रसन्न होऊन श्रीसद्‌गुरु कृपा करतील व रामपदीं दृढ अनुराग प्रेमभक्ती देतील, ती कृपासाध्य आहे.

(२) अनुपाना श्रद्धा अति पावनि- औषध संजीवनी मुळी (पाळ, मूळ) आहे. मुळी, मात्रा, कशांत तरी उगाळून घेणे जरुर असते. मध, तूप, दूध, मोरावळ्याचा पाक, माहाळुंगाचा मोरांबा, लिंबाचा रस, आल्याचा रस इ. विविध अनुपाने त्या त्या दोषाच्या शमनास मदत करणारी व औषधाचे तेज वाढविणारी देहरोगाच्या औषधांत वापरावी लागतात. तसे सात्विक श्रद्धा = अति पावन श्रद्धा हे अनुपान पाहिजे. श्रद्धा = आदर, अत्यंत आदराने हिचे सेवन केले पाहिजे. म्हणजेच आदराने श्रवण केले पाहिजे. आदराने म्हणजे 'मति मन चित्ता लाउनि' (३।१५।१ टी.पहा) रामकथेचे श्रवण केले पाहिजे. ल.ठे. 'श्रद्धा मति पूरी' असा पाठ मानसांत आहे. श्रद्धेने परिपूर्ण बुद्धि असा अर्थ होतो पण कोणती श्रद्धा हे निश्चित होत नाही म्हणून पंडित त्रिपाठीजींचा 'श्रद्धा अति रूरी' हा पाठ घेतला.

हिं. ।एहि बिधि भलेहिं सो रोग नसाहीं।नाहिं त कोटि जतन नहिंजाहीं।।८।।

म. ।सुखें याचपरिं रोग नाशती।ना तर कोटि उपायिं न जाती।।८।।

अर्थ- या अशा प्रकारेच सुखाने रोग विनाश होतो (ते नष्ट होतात). नाही तर अनंत (= कोटी) उपाय (यत्न) केले तरि ते जात नाहीत.।।८।।

टीका. (१) याचपरि- याच प्रकाराने याच पद्धतीने. योग्य सद्‌गुरुला अनन्य भावाने, अति आर्त बनून शरण जाईल, सद्‌गुरुवचनावर अति दृढ विश्वास असेल, सद्‌गुरु श्रीरामकथा सांगतील, व शिष्य सर्व विषयांची आशा सोडून देऊन अत्यंत आदराने त्या रामकखेचे दीर्घकाळ पर्यंत सद्‌गुरुजवळ राहून श्रवण करील तर. (क) सुखें रोग नाशती- मोहमूलक सर्व मानस रोगांचा समूळ नाश सुखाने होईल. सद्‌गुरु मुखाने रामकथा श्रवण करण्याशिवाय इतर कोणतेही श्रम करावे लागणार नाहीत, व रोग नाश सहज, सुखाने होईल. (ख) ना तर कोटि उपायिं न जाती- वर सांगितलेल्या गोष्टींत एक किंवा अधिक कमी असल्यास इतर वाटेल ते उपाय वाटेल तितका काळ केले तरी हे मानस रोग नष्ट होणार नाहीत. आता रोग नष्ट झाल्याची लक्षणे पहा.

हिं. ।जानिअ तब मन बिरुज गोसाँई।जब उर बल बिराग अधिकाई।।९।।
।सुमति छुधा बाढइ नित नई।बिषय आस दुर्बलता गई।।१०।।

म. ।जाणा स्वामी! विरुज मन तेव्हां।हृदिं बल विराग वाढे जेव्हा।।९।।
।क्षुधा सुमति दिन दिन वाढतां।विषयाशा दुर्बलता गता।।१०।।

अर्थ- स्वामी! जेव्हा हृदयांत वैराग्यरूपी बल वाढते तेव्हा मन रोगमुक्त झाले असे जाणावे.।।९।। सुमतिरूपी क्षुधा (भूक) दिवसेंदिवस वाढत जाऊन विषयांची आशा रुपी दुर्बलता (हळुहळू) गेली (म्हणजे मग).।।१०।।

टीका. चौ.९ (१) स्वामि! आपण माझे स्वामी आहात. आपण या रोगांतून पूर्णपणे मुक्त झालात तर मला सेवकाला त्यामुळे आनंद होईल, म्हणून रोगमुक्त झाल्याचे लक्षण सांगतो त्यावरून आपण जाणू शकाल. (क) विरुज = रोगविरहित, रोगमुक्त. देहरोग असतो तोपर्यंत शरिरांत बळ नसते. रोग बरा झाला की देहबल वाढत जाते. बळ शक्ति वाढू लागणे हे रोगमुक्त झाल्याचे मुख्य लक्षण आहे. मानसरोगानी हृदय फार दुर्बल झाल्यामुळे विषय गोड वाटतात. हृदयाचे, चित्ताचे बळ वैराग्य हे आहे, ते वाढू लागले, विषयांची प्रीति

नष्ट होऊ लागली म्हणजे समजावे की मानसरोग गेले. येथे एकेंद्रिय वैराग्य समजणे जरूर आहे. कारण की यतमान वैराग्य उत्पन्न झाल्याशिवाय मानसरोग झाल्याचे जाणताच येणार नाही, मग सद्‌गुरु वगैरे गोष्टी कडे तो वळतोच कशाला व व्यतिरेक वैराग्य असल्याशिवाय विषयांच्या आशांचा त्याग बलात्काराने सुद्धां करतां येणार नाही. 'वैराग्य वाढते' असे म्हटले आहे जे पूर्वी असेल तेच पुढे केव्हातरी वाढू शकते. पुढे विषयाशा सुटल्याचा उल्लेख आहे, त्याने अपर वैराग्यातील वशीकारसंज्ञा वैराग्य सुचविले आहे. व्यतिरेक वैराग्य व वशीकार संज्ञा वैराग्य यांच्यामधली पायरी एकेंद्रिय विराग ही आहे, तेच येथे ग्रहण करणे जरुर आहे. वशीकारसंज्ञा वैराग्य असल्याशिवाय आत्मज्ञानाची प्राप्ती होत नाही व आत्मज्ञान प्राप्त झाल्याशिवाय परमविराग प्राप्त होत नाही व रामभक्ति मिळू शकत नाही. यतमान, व्यतिरेक, एकेंद्रिय, वशीकारसंज्ञा व परवैराग्य (परमविराग) याची लक्षणें ३।१५।८च्या टीकेत दिली आहेत ती मुद्दाम पाहावी. (ख) प्रारंभिक वैराग्य प्राप्त झाल्यावर मगच परमार्थमार्गाकडे दृष्टी वळणे शक्य असते. 'प्रथम विप्रपदिं परमा प्रीती। स्वस्वकर्मि निरत श्रुति रीती।। याचे फळ कीं विषयविरागहि। मग ममधर्मि होइ अनुराग हि' (३।१६।६-७) वैराग्य बळ वाढल्याचे व मानस रोग बरा झाल्याचे आणखी लक्षण पुढील चौपाईत सांगतात.

चौ.१० (१) क्षुधा सुमति- रोग्याला दिवसेंदिवस अधिकाधिक भूक लागणे हे रोगमुक्त झाल्याचे दुसरे लक्षण आहे. सुमति ही येथे क्षुधा आहे. 'सुमति तिथें संपत्ती नाना' (५।४०।६) 'चतुर शिरोमणि तेच किं जगतीं। मण्यालागीं जे सुयत्न करती।।' (७।१२०।१०) 'सांडुनि सर्वहि आस भजति राम ते चतुर नर' (३।६।-) येथे आशांचा त्याग आधीं सांगितला आहेच. 'संयम हा कीं विषयाशा नहिं' (चौ.६) रामभजनाने भक्ति चिंतामणी मिळविण्याचाच प्रयत्न करणारी जी मति- बुद्धि तीच सुमति. रामभजनाची रामकथा श्रवणाची आवड दिवसेंदिवस वाढत जाणे हे रोगमुक्त झाल्याचे दुसरे लक्षण आहे. (क) दिन दिन वाढतां- रोग गेला तरि त्याने आलेला अशक्तपणा काही दिवस राहतोच. रोग बरा झाला म्हणजे मी रोगी आहे असे वाटत नाही पण अशक्तपणा फार आला आहे असे वाटते. रोग बरा झाला की खरी भूक लागू लागते, अन्न पचू लागते व त्या प्रमाणात शक्ति वाढत जाऊन दुर्बलता कमी होत जाते, व सात्विक अन्न

सेवनाने व शक्तिवर्धक औषधाने अशक्तपणा नष्ट होतो. तसेच मानसरोगांत घडते. विषयासक्ति हीच दुर्बलता (अशक्तपणा) आलेली असते. सद्‌गुरुमुखाने रामकथा श्रवण रूपी भोजनाची आवड वाढते, जे श्रवण केले त्याचे मनन रुपी चर्वण केले जाते, रामकथेतील नवविधा भक्ति हृदयांत ठसू लागते म्हणजेच अन्न पचू लागते. वैराग्यशक्तिवर्धक औषध रामकथा श्रवण हेच, पण त्याचा कंटाळा येत नाही. आणखी श्रवण करावे असे वाटते. 'रामकथा ऐकुनि जे धाती। त्यां न कळे रस विशेष जाती' 'स्त्रवत नाथ! आननशशी कथा सुधा रघुवीर। श्रवणपुटीं पिउनिया, मन तृप्त नव्हे मतिधीर' (७।५२म) याचेच नाव सुमति क्षुधा वाढणे. असे झाले म्हणजे.

(२) विषयाशा दुर्बलता गता- विषयांची आशारुपी अशक्तता जाते. पूर्वी विषयाशा त्याग हे पथ्य म्हणून पाळले जात होते. म्हणजेच विषयाशानां बलात्काराने दूर ठेवल्या गेल्या होत्या. पथ्य पालनासाठी विषयांची आशा सोडली होती, सुटली नव्हती. रोगी बरे झाल्यावर पूर्ववत सर्व विषयांचे सेवन करू लागतात, तसे येथे घडत नाही. ज्या विषयाशा सोडल्या होत्या त्या आता आपोआप सुटतात. सोडणे आणि सुटणे यात महदंतर आहे. येथे अपरवैराग्य म्हणजे वशीकार संज्ञा वैराग्य प्राप्त झाल्याचे सुचविले. 'दृष्टानुश्रविक विषय वैतृष्ण्यं वशीकार संज्ञावैराग्यम्' (पा.यो) पाहिलेल्या व ऐकलेल्या विषयांच्या तृष्णेचा = आशेचा अभाव होणे, त्या नष्ट होणे म्हणजे वशीकारसंज्ञा वैराग्य. यालाच अपर वैराग्य म्हणतात. हे अपर वैराग्य प्राप्त होते. पूर्वी विषय त्याग केला होता आता विषय वैराग्य उत्पन्न झाले. त्याग असतो तेथे वैराग्य असतेच असे नाही. वैराग्य म्हणजे विषयप्रीति नष्ट होणे. एकादशीचा उपवास करतात त्यांनी त्या दिवसापुरती अन्नाची भोजनाची आशा सोडलेली असते व मनांतही त्या दिवशी इच्छा उत्पन्न होत नाही. पण द्वादशी उजाडताच भोजनाची आशा उत्पन्न होते. पण जो नेहमीच फलाहारावर राहतो त्याला तशी आशा उत्पन्नच होत नाही व फलाहार केव्हा सुटेल असे कधीं स्वप्नांत सुद्धा वाटत नाही. अपर वैराग्य प्राप्त झाले की तो ज्ञानाचा अधिकारी झाला, पण हे सगळे रामकथा श्रवणानेच घडते. ती संजीवनी मुळी आता ज्ञानाचे संजीवन करील व नंतर प्रेमभक्तीचे. सद्‌गुरुकृपा गृहीत आहेच.

हिं. ।बिमल ग्यान जल जब सो नहाई।तब रह राम भगति उर छाई।।११।।

म. ।ज्ञान विमल जलिं करी स्नान जैं।रामभक्ती उरिं करी स्थान तैं।।११।।

अर्थ- विमल ज्ञान रूपी विमल जलांत जेव्हा तो स्नान करील तेव्हा मग रामप्रेमभक्ति हृदयांत ठाण मांडून राहील (सतत निवास करील.)।।११।।

टीका. (१) ज्ञान विमल जलिं स्नान- विमल ज्ञान हेच विमल निर्मल जल हे रोगमुक्तीनंतरचे स्नान नसून रोगमुक्त होऊन अशक्तपणा जाऊन पूर्वीप्रमाणे सशक्त झाल्यानंतरचे स्नान आहे, असे मागील दोन चौपायांवरुन ठरते. 'दुर्बलता गता' असे झाल्यानंतरचे स्नान आहे. रोग बरा झाल्यनंतर जे पहिले स्नान घालतात ते हे नव्हे. कारण ते विमल जलाने न घालतां ज्यांत निर्गुड वगैरे काही वनस्पति, औषधे, उकळलेली असतात अशा ऊष्णोदकाने ते रोगमुक्तीनंतरचे स्नान घालतात. पुढे नुसत्या गरम पाण्याने काही दिवसा आड घालतात, नंतर काही दिवस रोज गरम पाण्याने घालतात. तितक्या अवधीत तो मनुष्य अगदीं पूर्वीसारखा धट्टाकट्टा होतो, तेव्हा मग तो आजारी पडण्यापूर्वी सारखे नदीच्या स्वच्छ पाण्यात बुड्या मारुन स्नान करु लागतो. त्याप्रमाणेच संशय विपर्ययरहित अपरोक्ष साक्षात्कार दृढ होणे हेच विमल ज्ञान जलांत स्नान करणे आहे. हे विमल ज्ञान जल सद्‌गुरुंच्या हृदयांत निवास करीत असते त्यामुळे हे सद्‌गुरु कृपेने प्राप्त होते. 'गुरुविण नोहे ज्ञान ज्ञान किं होइ विराग विण' (७।८९रा.) असे भुशुंडीच म्हणाला आहे. येथे आधी अपर वैराग्य प्राप्ति झाल्याचे दाखवूनच आता विमल ज्ञान प्राप्त झाल्याचा उल्लेख केला. शिष्याचे वैराग्य व रामकथाप्रीति पाहून सद्‌गुरु प्रसन्न होतात व त्यांच्या कृपेने विमल ज्ञान प्राप्त होते. ज्या ज्ञानात संशय विपर्यय इत्यादि अविद्या जनित मल नाही, वासनेचा गंध सुद्धा नाही व स्वतोत्थान किंवा परतोत्थान होत नाही ते विमल ज्ञान. 'ज्ञान, जिथे मानादिक नाहीं। ब्रह्म समान सकल जगिं पाही.' (३।१५।७) (क) पाण्यांत बुडी मारल्यावर डोळे उघडून पाहिले तर जसे दशदिशांस जलाशिवाय दुसरे काही दिसत नाही त्याप्रमाणे आत्मानुभूति सर्वत्र येऊ लागली सर्वत्र रामच अनुभवास येऊ लागले की विमलज्ञान जलांत स्नान झाले.

(२) रामभक्ति उरी करी स्थान तैं- तैं = सद्‌गुरुकृपेने विमल ज्ञान प्राप्त झाल्यावर म्हणजे जीवन्मुक्त झाल्यावर काही काळ सद्‌गुरुमुखाने

रामकथाश्रवण केल्यावर. 'मुक्त विरक्त नि विषयी ऐकति। भक्ति सुगति नव वैभव पावति' (७।१५।५) जीवन्मुक्तानी रामकथा श्रवण केली की त्यांना भक्ति मिळते. हा रामकथाश्रवणाचा महिमा भुशुंडीने गरुडासच सांगितला आहे व तोच येथे वक्ता आहे. (क) रामभक्ति उरिं करी स्थान- कृपासाध्य असलेली प्रेमभक्ति सद्‌गुरुच्या कृपेने हृदयांत निरंतर निवास करते. अशा अनपायिनी प्रेमभक्तीने हृदयांत निवास केला म्हणजे माया व मायेचा परिवास तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहू शकत नाहीत. 'सकल फलहि हरि भक्ति सुशोभन। संतकृपेविण कुणाहि लाभ न' (१२०।१८) हे रामकथाश्रवणाने कोणत्या क्रमाने घडते हे येथे ६-११ या सहा चौपायांत दाखविले. भुशुंडीला स्वतः मात्र विप्रजन्मातच रामप्रेमाची प्राप्ति झाली होती व भक्तिमार्गातील विमलज्ञान म्हणजे 'निज प्रभुमय जग पाहति करिति कुणाशि विरोध' (११२) ही स्थिती प्राप्त झाली होती, पण तो अपवाद आहे. शूद्र जन्मांत शंकरांचा जो आशीर्वाद मिळाला होता त्याचा परिणाम आहे. तथापि त्यालाही काक देहाने रामचरितमानस कथा दीर्घकाळ श्रवण केल्यानंतर सद्‌गुरु लोमशांच्या आशीर्वादानेच अनपायिनी भक्ति व ज्ञान यांची प्राप्ति झाली. (ख) जोपर्यंत जीवात्मा व परमात्मा ब्रह्म यांच्या ऐक्याचा पूर्ण दृढ अनुभव येणार नाही तोपर्यंत परमात्म्यावर परम प्रेम करताच येणार नाही, व पूर्ण निर्भयता प्राप्त होणार नाही. कारण 'प्रेष्ठतमः आत्मा' 'सबसे जीव प्यारा' जीव स्वतःवर जेवढे प्रेम करतो तेवढे द्वैतभावना शिल्लक असेपर्यंत इतर कोणावरही करता येणार नाही. द्वैतनाश झाल्यावरच स्वतःच्या इतके प्रेम भगवंतावर करतां येईल. सद्‌गुरुसेवा व सद्‌गुरुमुखाने रामकथाश्रवण याने हे सर्व सहज साधते. विनय पत्रिका पद १३६।११-१२ चा अनुवाद पुढे या काण्डाच्या परिशिष्टात दिलेला पहावा. आता शंकरादिकांचे मत काय आहे ते सांगतात.

हिं. ।सिव अज सुक सनकादिक नारद।जे मुनि ब्रह्म बिचार बिसारद।।१२।।
।सब कर मत खग नायक एहा।करिअ राम पद पंकज नेहा।।१३।।

म. ।शिव अज शुक सनकादिक नारद।मुनि जे ब्रह्म विचार विशारद।।१२।।
।सर्वांचे मत खगपति हे हो!।करा रामपद कंजी स्नेहो।।१३।।

अर्थ- शिव, ब्रह्मदेव, शुकाचार्य, सनाकादि मुनि, नारदमुनि, आणि जे मुनि

ब्रह्मविचार करण्यात परम प्रवीण आहेत.।।१२।। त्या सर्वांचे अहो खगनायक! हेच मत आहे की श्रीरामचरणकमलीं स्नेह करा, करावा.।।१३।।

टीका. चौ.१२-१३ (१) शिव = कल्याणस्वरूप, मोक्षस्वरुप असणारे शंकर, अज- ज्यांना जन्म नाही व जे सृष्टीची उत्पत्ती करतात व ज्यांचे गुरु साक्षात शेषशायी नारायण ते ब्रह्मदेव. शुक = शुकाचार्य या पृथ्वीतलावरील प्रसिद्ध विरागी व ज्ञानी. सनकादि मुनि ब्रह्मदेवाचे मानस पुत्र ब्रह्मलोक निवासी, पण वाटेल त्या लोकांत गमन करणारे दिगंबर, नारद देवर्षि ब्रह्मलोक निवासी. आणि 'मुनि जे ब्रह्मविचार विशारद'- ब्रह्मज्ञान विशारद, ब्रह्माचा वि्चार करण्यात परम प्रविण असे इतर मुनि, या सर्वांचे हेच मत आहे की रामचरण कमलीं प्रेम करावे कारण की हेच सुलभ, सुखद, अमोघ व सर्वश्रेयस्कर असे भवरोगांतून मुक्त होऊन सदा दुःखरहित, पूर्णनिर्भय व परमसुखी राहण्याचे साधन आहे व ते पूर्वी सांगितल्याप्रमाणे सद्‌गुरु मुखाने रामकथा श्रवण केल्याने सिद्ध होते, म्हणूनच 'जिवन्मुक्तही ब्रह्मपर श्रवती त्यजुनी ध्यान।। जे न धरिति हरिकथारति ते हृदयें पाषाण' (७।४२). (क) पदकंज शब्दाने सगुण साकार राम श्रीरघुपति हा अर्थ सुचविला. आता सर्वांची मते पहा-

(२) (क) शिवमत- 'सत् हरिभजन जगत् स्वप्नासम' (३।३९।५) 'भवसिंधु अगाध हि ते पडती। पदपंकजिं प्रेम न जे करती' (७।१४।५) आणखी पुष्कळ आहेत. (ख) अज = ब्रह्मदेवमत- 'धिग् जीवन देव शरीर हरे। तव भक्ति विना भवभूलिं खरे' (६।१११।९) यांचीही आणखी पुष्कळ वचने मानसांत आहेत. (ग) शुकमत = शुकाचार्यांचेमत मानसांत नाही. त्यांचे मत म्हणजे श्रीमद्‌भागवताचे मत. त्यानीच परीक्षितीला श्रीमत् भागवत सांगितले. 'श्रेयसुतिं भक्तिमुदस्य ते विभो क्लिशन्ति ये केवलबोधलब्धये। तेषामसौ क्लेशल एव शिष्यते नान्यद्यथा स्थूलतुषावघातिनाम्' (भा.१०।१४।४) (घ) सनकादिमत- 'प्रेमभक्ति अनपायिनी द्या आम्हा श्रीराम.' 'द्यावि भक्ति रघुपति अति पावनि। त्रिविध ताप भव दर्प विनाशनि' (७।३४, ३५।१). (ङ) नारदमत- 'मामवलोकय पंकज लोचन। कृपाविलोकनिं शोचविमोचन' (७।५१।१) 'राका रजनी भक्ति

तव रामनाम तो सोम। अपरनाम उडुगण विमल वसो भक्तहृद् व्योम' (३।४२रा.।। असा वर नारदांनी श्रीरघुवीराजवळ मागितला. 'रामस्तवराज' पहा त्यात नारद वचनेच आहेत.

(३) भरद्वाज, वाल्मिकी, अत्रि, शरभंग, सुतीक्ष्ण, अगस्ति, वसिष्ठ, विदेही-जनक या सर्वांची मते मानसांत अगदी स्पष्ट आहेत. त्यातील भरद्वाज आणि वसिष्ठ यांची मते पुढे दिली आहेत. (क) भरद्वाजमत- 'त्यजुनि छल तनुमन वचने जोवरिं तुझा न दास। स्वप्निंहि तोवरि सुख नसे कोटि साधने भास' (२।१०७) (ख) वसिष्ठ मत- 'तवपदपद्मी प्रीति निरंतर। सकल साधनां हे फल सुंदर' (७।४९।१-८) पहा.

ल.ठे.- शंकर, ब्रह्मदेव, सनकादिकमुनि, विदेहीजनक, इंद्र इत्यादि सर्वांनी श्रीरघुपतिजवळ प्रेमभक्तीच मागितली आहे. हनुमान, बिभीषण, मारीच, मंदोदरी, कुंभकर्ण, शुक हेर, पार्वती याज्ञवल्क्य इत्यादींचे हेच मत मानसांत दिसते. तसेच श्रीज्ञानेश्वरांपासून आज पर्यंत झालेल्या महाराष्ट्रातील सर्व प्रसिद्ध संतांचे हेच मत आहे की हरिभक्तिवाचून तरणोपाय नाही. (क) याप्रमाणे रघुपतिभक्ति हेच दुःखरहित शाश्वतसुख प्राप्तीचे सुलभ व अलौकिक साधन आहे हे अन्वयमुखाने सांगितले आता तेच व्यतिरेकाने सांगतात.

हिं. *।श्रुति पुरान सदग्रंथ कहाहीं।रघुपति भगति बिना सुख नाहीं।।१४।।*
।कमठ पीठ जामहिं बरु बारा।बंध्या सुत बरु काहुहि मारा।।१५।।

म. *।श्रुति पुराण सद्ग्रंथ वदति ही।रघुपति भक्ति विना सुख नाहीं।।१४।।*
।कमठ-पृष्ठिं जरि वाढति बाल।वंध्या-सुत जरि कोणि वधाल।।१५।।

अर्थ- वेद पुराण आणि सद्ग्रंथ सुद्धा सांगतात की श्री रघुपतीच्या भक्ती वाचून सुख (मिळणे शक्य) नाही.।।१४।। कासवाच्या पाठीवर जरि केस (बाल) वाढले आमि वांझेच्या पोराचा जरि कोणी वध केला (तरि हरिविमुख जीवाला सुख मिळणार नाही).।।१५।।

टीका. चौ.१४ (१) पूर्वी सांगितले की जिथे रघुपति भक्ती नाही तिथे सुख नाही, कारण की तिथे अनंत दुःखदायक असाध्य असे अनेक मानस रोग सतत

निवास करतात.

सूचना- प्रचलित पाठ 'सबग्रंथ' असा आहे. तो पाठ घेतल्यास अतिव्याप्ति दोष होतो. पूर्व मीमांसा, सांख्य, न्याय इत्यादि शास्त्रे सुद्धा वरील मत मान्य करीत नाहीत. आणि सद्ग्रंथ हा उल्लेख पूर्वी चार वेळा येऊन गेलेला आहे. पाखंड्यांचे ग्रंथ, नास्तिकांचे ग्रंथ सद्ग्रंथ नाहीत. 'नाना पुराण निगमागम संमत' असेल तोच सद्ग्रंथ. सब ग्रंथ असा पाठ घेऊन सद्ग्रंथ असाच अर्थ टीकाकार करतात, मग 'सद्ग्रंथ' असा पूर्वापार संदर्भास सुसंगत, स्पष्टार्थवाचक, निर्दोष पाठ घेणेच काय वाईट? म्हणून येथे हिंदीतही 'सद्ग्रंथ' असा पाठ घेतला आहे.

(२) या व पुढील चौपायांत मिळून सुख नसल्याचा उल्लेख चार वेळा केला आहे व पाचव्या वेळी 'न भवतरण' असे म्हटले आहे. भवतरण म्हणजे सुख प्राप्तीच. १)सुख नाही. २)जीवा सुख न, ३)न जीव सुख पावे, ४)सुख पावे ना कुणि ५)न भवतरण. (क) काही वेदान्तग्रंथात तीन आनंदाचा व काहींत पाच आनंदाचा उल्लेख आहे. येथे पाच आनंद मान्य करुन त्यांचा पूर्ण अभाव सुचविला आहे. १)योगानंद- यालाच मानसांत परमानंद म्हटले आहे व परमानंद ब्रह्मानंदापेक्षा श्रेष्ठ मानला आहे. २)आत्मानंद = ब्रह्मानंद, मानसांत ब्रह्मानंदच म्हटले आहे. ३)अद्वैतानंद, ४)विद्यानंद व ५)विषयानंद. जेथे तीन मानले आहेत तेथे ब्रह्मानंद, विद्यानंद व विषयानंद असा उल्लेख आहे. वरील पाच प्रकारच्या आनंदापैकी कोणताही रघुपतिभक्तिवाचून मिळणार नाही हे येथील व पुढील चार उल्लेखावरुन सुचविले आहे. (ख) सुख = आनंद मिळणे किती अशक्य आहे हे नऊ (९) दृष्टान्तांनी सांगतात. नऊ (९) हा अंक गोस्वामीस फार प्रिय असल्याचे प्रस्तावनेत साधार दाखविले आहे. (ग) रघुपतिभक्तिविना सुख नाही असा सिद्धान्त जरि असला तरि रघुपतिभक्तिविहीन लोक आपापल्या परीने सुखासाठी प्रयत्न करीत असतातच. त्यांच्या प्रयत्नांचे विवेचन शास्त्रीयदृष्ट्या दृष्टान्त देऊन सुचविले आहे.

चौ.१५ (१) कमठपृष्ठि जरि वाढति बाल- बाल = केश, 'चिकुरः कुन्तलो बालः कचः केशः शिरोरुहः' (अमरे २।६।९५). येथील दोन दृष्टान्तानी दोन प्रकारचे प्रयत्न सुचविले आहेत (क) कमठपृष्ठि बाल- कासवाच्या पाठीवर

केश. कासव आणि त्याची पाठ एक नव्हत. त्यात अंगागी (अंग +अंगी) संबंध आहे, म्हणजे स्वगतभेद आहे, पण तो चटकन स्पष्ट दिसत नाही. पाठ हा मिथ्यात्मा आहे. तसाच आत्मा आणि देह यात फार भेद आहे,तथापि आत्मस्वरूप असलेला जीव अनात्मरुप मिथ्या असलेल्या देहादि जड क्षणभंगूर विषयापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न करतातच. यात स्वगत भेद, मिथ्यात्मा. (ख) जरि वाढती बाल- कासवाच्या पाठीवर कधी बाल = केश वाढत नाहीत, उत्पन्न होत नाहीत. त्यामुळे ते उत्पन्न करण्याचा प्रयत्न जसा निष्फळ, कारण ते उत्पन्न होणे निसर्गतःच अशक्य आहे. तसेच अनात्म जड वस्तूपासून सुख मिळणे अशक्य असल्याने ते मिळविण्याचा प्रयत्न म्हणजे मूर्खपणा होय. मिथ्यात्मारूपी विषयांत सुख नाही म्हणून त्यापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न करणे हा मूर्खपणा ठरतो.

(२) वंध्यासुत जरि कोणि वधाल- सुत = पुत्र, अर्थात पुत्र, कन्या, नातू पणतू, पत्नि, माता, पिता इ. गौणात्मा आहेत. ते जरि भिन्न असले तरि त्यात ममत्वादि गुण साम्य आहे. भेद असून गुणसाम्य आहे म्हणून गौणात्मा आहेत. (क) वंध्या आणि तिचा पुत्र यांचे साहचर्य असूच शकत नाही. पुत्र झाला असेल तर तिला वंध्या म्हणताच येणार नाही, व वंध्या असेतोपर्यंत तिला पुत्र नाही. जो झालेलाच नाही त्याला मारणे अशक्य आहे. तसेच पुत्र स्त्री इत्यादि गौणात्म्यापासून सुख मिळणे अत्यंत अशक्य आहे. वंध्यापुत्राला कोणी मारला असे घटकाभर मानले तरीसुद्धा गौणात्मा पासून सुख मिळणे अशक्य! या पुत्रैषणेने मति मलिन होते, झालेली असते, 'तनय लोक धन तीन एषणा। करिति मलीन न मतीस कवणा' (७।७१।६) एषणा हा तर एक ज्वर आहे. 'त्रिविध एषणा तरुण तिजारी' (१२१।३६). मलिन मतीला व तृतीयक ज्वर येणाऱ्याला सुख मिळणे अशक्यच आहे. येथे सजातीय भेद व गौणात्मा यांचे विवेचन आहे. (क) याप्रमाणे मिथ्यात्मा व गौणात्मा यापासून सुख मिळणे अशक्य आहे हे दाखवून आता एका दृष्टान्ताने दाखवितात की रामभक्ति विहीनानां मुख्यात्म्यापासूनही सुख मिळणे अशक्य आहे.

हिं. ।फूलहिं नभ बरु बहुबिध फूला।जीव न लह सुख हरि प्रतिकूला।।१६।।

म. ।फुलली नभिं जरि बहुविध फूलहि।जीवा सुख न हरीप्रतिकूल हि।।१६।।

अर्थ- आकाशात जरि नाना प्रकारची फुले फुलली तरि हरि प्रतिकूल जीवाला सुख होणार नाही.।।१६।।

टीका. (१) फुलली नभिं...फूल- येथे नभाचा आकाशाचा दृष्टान्त देऊन मुख्यात्म्याचा निर्देश केला. मुख्यात्मा व आकाश व्यापक आहेत, निर्लेपता हा धर्म दोघांत साधारण आहे. सर्व विश्व जसे मुख्यात्म्यांत असून मुख्यात्मा सर्वात आहे त्याप्रमाणेच सर्व विश्व आकाशात असून आकाश सर्वात आहे, म्हणूनच 'खं ब्रह्म' अशी श्रुति आहे. मिथ्यात्मा द्वेष्य अथवा प्रिय असू शकतो. गौणात्मा अधिक प्रिय (प्रियतर) किंवा अधिक द्वेष्य (द्वेषतर) असू शकतो. पण मुख्यात्मा नेहमी प्रियतम असतो. 'प्रेष्ठतमः आत्मा' तो साक्षी असतो तोच निर्विकार निर्लेप केवल स्वरुप आहे. 'आत्मनः तु कामाय सर्वं प्रियं भवति' (बृ.श्रु.) त्याला अनुकूल असतील तो पर्यंतच जडविषय (मिथ्यात्मा) आणि पुत्रभार्यादि (गौणात्मा) प्रिय वाटतात. (क) आकाशात फुले फुलणे अशक्य आहे. जो मुख्यात्मा तोच हरि आहे. 'जीवो ब्रह्मैव' पण जीव जर हरिप्रतिकूल असेल तर त्याला स्वात्मसुख सुद्धा मिळणे शक्य नाही. हरिच प्रपंचाचे अधिष्ठान आहे व याचाच अंश जीव आहे. 'यापरिं जग हरि आश्रित असते' 'रामाख्यमीशं हरिम्' जे जीव सर्वाधिष्ठानभूत हरीला म्हणजेच रघुपतीला प्रतिकूल राहून आत्मसुखाचा शोध करतात ते खरोखर स्वतः स्वतःशीच प्रतिकूल बनतात. त्यांना आकाशात फुलणाऱ्या फुलांसारखेच सुख मिळेल म्हणजे स्वप्नातसुद्धा मिळणार नाही. आकाशात फुले फुलणे अगदी अशक्य आहे, पण ते एकवेळ शक्य मानले तरि हरि प्रतिकूल रघुपति प्रतिकूल होणाऱ्या, असणाऱ्या जीवांना सुख मिळणे शक्य नाही. रघुपतीविमुख जीवानां विषयानंद किंवा आत्मानंद मिळणे अशक्य आहे. मुख्यात्म्यापासून सुख नाही कारण ते जीव त्यालाच प्रतिकूल असतात. (ख) ल.ठे. कासवाच्या पाठीवर केस, वंध्यापुत्र आणि आकाशपुष्प या तिन्ही गोष्टी कधी त्रिकाळीही अस्तित्वात नसतात म्हणून हे तिन्ही दृष्टान्त अजातवादाचे आहे. 'अगा जें जाहलेंचि नाही' (दा.बो.) जग उत्पन्न झालेच नाही हा अजात वाद आहे. आता उपपत्ति सांगतील.

हिं. ।तृषा जाइ बरु मृगजल पाना।बरु जामहिं सस सीस बिषाना।।१७।।
।अंधकारु बरु रबिहि नसावै।राम बिमुख न जीव सुख पावै।।१८।।

म. */तृषा शान्ति जरि मृगजल-पाने /फुटलीं जरि शश शिरीं विषाणें / /१७ / /*
/अंधारे जरि रविस गिळावे /राम विमुख न जीव सुख पावे / /१८ / /

अर्थ- मृगजल पिऊन जरि तहान भागली किंवा सशाच्या शिरावर जरि शिंगे फुटली.।।१७।। अंधाराने जरि सूर्याला गिळला. नष्ट केला तरि रामविमुख जीवाला सुख मिळणे शक्य नाही.।।१८।।

टीका. चौ.१७ (१) मृगजल या दृष्टान्ताने जगाची प्रातिभासिक सत्ता दाखविली. मृगजळ जेव्हा जेथे ज्याला दिसते तेव्हा तेथे जल नसते, जलाचा नुसता भास होतो. जे जग खरोखर अस्तित्वांत नसून मृगजळासारखे असल्यासारखे भासते त्या जगापासून विषयापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न कितीही केला तरि मृगजळा मागे धावणाऱ्या हरिणाप्रमाणे दुःखाशिवाय दुसरे काहीच मिळणे शक्य नाही. ज्याच्या आश्रयावर जगरूपी मृगजळ भासते त्या भानुकुल भानु श्रीरघुनाथाला न जाणल्यानेच मिथ्या असणारे जग सत्यासारखे भासते. 'यत्सत्यत्वे जड जी माया। गमे सत्यशी मोह सहायां।।८।। रजत शुक्तिमधिं भासते यथा भानुकरिं वारि।। मृषा त्रिकाळीहिं तरि कुणि शक्त न जो भ्रम वारि' (१।११७) भानुकर वारि = मृगजळ. 'ज्यांची कृपा असा भ्रम हरते। गिरीजे! कृपालु रघुनायकते' (१।११८।-) ज्यांच्याकृपेशिवाय या भ्रमाचा नाश होत नाही त्या श्रीरघुनायकालाच विन्मुख राहून सुख मिळणे शक्य नाही. हा दृष्टान्त विवर्त वादाचा व प्रतिभासिक सत्तेचा आहे. (क) मृगजळ ही सत्य किंवा व्यवहार्य वस्तूच नाही त्यामुळे त्यातील पाणी पिणे अत्यंत अशक्य तसेच प्रातिभासिक विषयांत सुख नसल्याने ते कधीही मिळणे शक्य नाही, त्यातही जे रामविमुख असतील त्यांना तर अत्यंत अशक्य. सर्व विषयांत राम दिसू लागल्याशिवाय सुख आनंद मिळणे शक्य नाही आणि हे घडणे रामकृपेशिवाय शक्य नाही म्हणून रामविमुखांना कालत्रयीं सुख होणे मिळणे शक्य नाही. कदाचित मृगजळ पिऊन तहान भागली कोणाची, तरीसुद्धा रामविमुख जीवाला सुख मिळणे अशक्य.

(२) 'यदि जग मृषा तरी तापत्रय अनुभव येती कैसे। मृगजळ सत्य नसुनी मृग मरती भ्रमे दुःख जगिं तैसे।।२।। तुलसिदास हा प्रपंच जग सब मृषा वेद जरि गाती। रघुपतिभक्ति संत संगति विण कोणि न हरि भवभिती'।।५।।

(वि.प.पद १२१ अनुवाद) 'श्रुति गुरुसाधू स्मृति संमत कीं दृश्य असत् दुखकारी। ते त्यजुनि रघुपति भजल्याविण कोण विपत्ति निवारी।।' (वि.प.पद १२०।४ अनुवाद) तुलसीदास अद्वैती होते की नाही हे यावरून ठरवावे.

(३) फुटलीं जरि शश शिरीं विषाणे- शश = ससा, सशाला कालत्रयी, शिंगे फुटणे अशक्य आहे, तथापि कदाचित त्याला शिंगे फुटली तरि हरिविमुख जीवाला रघुपतिभक्तिविहीनाला सुख मिळणे शक्य नाही. सशाला जर शिंगे फुटली तर त्याला कोणी ससा म्हणणार नाही. सशाच्या शिंगाना पारमार्थिक, प्रतिभासिक किंवा व्यावहारिक आस्तित्व सुद्धा नाही. तसेच ब्रह्मलीन विज्ञानीला तिन्ही काळी व सर्व अवस्थेत हे जग असत् आहे. श्रीमत् टेंब्येस्वामी विरचित मनन या छोट्याशा ग्रंथात शशशृंगाची तुच्छ सत्ता मानली आहे. जगाची व्यावहारिक सत्ता मानली तरी सुद्धा ते सुखद नाही हे आता दृष्टान्ताने सांगतात.

चौ.१८ (१) अंधारे जरि रविस गिळावे- तत्वतः पाहतां अंधार ही काही वस्तु पदार्थ नाही. प्रकाशाचा अभाव म्हणजेच अंधार. ज्ञानाचा अभाव म्हणजेच अज्ञान. तथापि नैय्यायिक अभावाला स्वतंत्र पदार्थ मानतात. काहीहीं मानले तरि अंधार ही व्यवहार्थ वस्तु आहेच, त्याला व्यावहारिक सत्ता आहे. व प्रकाशाने त्याचा नाश होतो हे तितकेच खरे आहे. सूर्याशिवाय इतर कोणताही प्रकाशमान पदार्थ अंधाराचा पूर्ण नाश करु शकत नाही. सूर्यच रात्रीचा विनाश करु शकतो. 'उगवति सोळा पूर्ण शशि, तारागण समुदाय।। सकल गिरिंस दव लाविला रविविण रात्र न जाय' (७।७८म) हरिभजनाविण तसा खगेशा। नाश नव्हे जीवांचे क्लेशा (७।७९।१) 'जेव्हा राम प्रताप दिनपति। प्रबल परम उदया ये खगपति' (७।३१।१) पासून 'हा प्रताप रवि ज्याचे उरिं जैं करी प्रकाश।। मागिल वाढति कथित जे प्रथम पावती नाश' (७।३१) पर्यंत पाहणे. 'भ्रम तम महा प्रताप दिवाकर' (६।११५।३) असे श्रीरघुनाथ आहेत. 'मोहनिशें सर्वहि निजणारे' म्हणून राम रवीच्या प्रतापाचा लाभ झाल्याशिवाय मोहरात्रीचा, मानसरोगांच्या मूळाचा विनाश होणे शक्य नाही. अंधाराने सूर्याला गिळून टाकला कदाचित तरिसुद्धा रामविमुख जीवाला व्यवहारात सुद्धा सुख मिळणे अशक्य.

(२) सूर्य अंधाराचा नाश करतो व अंधार सूर्याचा नाश करु शकणार नाही हे जगप्रसिद्ध आहे. तथापि सूर्य हा सृष्टीत उत्पन्न झालेला पदार्थ असल्याने त्याचा केव्हातरि विनाश होणार हे ठरलेलेच आहे. महाकल्पान्ताच्या वेळी सूर्याचा नाश होतोच व त्यावेळी 'तमः आसीत् तमसा गूह्यमग्रे' (ऋ.ना.सू.) सर्वत्र अंधारच अंधार असतो. महा कल्पान्तापर्यंत अनेक जन्म घेतले तरि जीवाला सुख होत नाही हे ठरलेलेच आहे पण त्या कल्पान्तानंतरच्या तमोमय काळातसुद्धा पूर्वी हरिविमुख राहिलेल्या जीवाला सुख मिळणे शक्य नाही. कारण की त्या काळात जड देह नसतो शास्त्र नसते व काही साधन करता येण्यासारखे नसते सर्व जीव मायेंत लीन झालेले असतात. 'तनुविण भजन वेद ना वर्णी' (७।९६।५)

ल.ठे.- 'रामविमुख न जीव सुख पावे' हा चरण वाचतांना थोडे अडखळावे लागते. कारण की यतिभंग झालेला आहे. 'रामविमुख जीव न सुख पावे' असे श्रीतुलसीदासांस सहज लिहिता आले असते व यतिभंग दोष टळला असता तरीसुद्धा यतिभंग कायम ठेवला आहे, त्यात दोन हेतु आहेत १)रामविमुख जीवाला नेहमी धक्के, हिसके खावे लागतात हे दाखविणे आणि २)रामविमुख जीव न सुख पावे असे लिहिले असते तर 'जीव न' याचा उच्चार जीवन असा सहज होतो व अगदी विरुद्ध अर्थ श्रोत्यांच्या कानांत घुसतो. 'रामविमुख जीवन असणारा सुख पावे किंवा रामविमुख असणारा जीवनसुख पावे' असा अर्थ स्वाभाविकरीत्या ग्रहण केला जातो. या अनर्थाला व महाभ्रमाला थारा मिळू नये म्हणून यतिभंगाचा दोष पत्करुन सुद्धा सिद्धान्त अबाधित ठेवला. (क) माया व ब्रह्म अगदीं विरुद्ध स्वभावी असल्याने मायेच्या कोणत्याही रूपाचा आश्रय केला जात आहे तोपर्यंत सुख नाही हे आता सांगतील.

हिं. ।हिम ते अनल प्रगट बरु होई।बिमुख राम सुख पाव न कोई।।१९।।

म. ।अनल जरी प्रगटला हिमांतुनि।विमुख राम सुख पावे ना कुणि।।१९।।

अर्थ- बर्फातून जरि अग्नि प्रगट झाला तरि रामविमुख असणाऱ्या कोणालाही सुख मिळणार नाही.।।१९।।

टीका. (१) अनल जरी प्रगटला हिमांतुनि- हिम = बर्फ. बर्फ अग्नीच्या

जवळ जाताच त्याचा बर्फपणा नष्ट होऊन त्याचे पाणी होते. बर्फ अगदी थंड गार अग्नि अगदी ऊष्ण. 'अग्नेः आपः' अग्नीपासून जलाची उत्पत्ती झालेली आहे. घनरूप झालेले घट्ट पाषाणासारखे स्थावर झालेले जल म्हणजेच बर्फ. अग्नि हे कारण व बर्फ हे कार्य आहे, कार्यातून कारणाची उत्पत्ती होणे निसर्गविरुद्ध असल्याने बर्फातून अग्नि प्रगट होणे शक्य नाही. ही त्रिकाळी असंभाव्य असलेली गोष्ट कदाचित घडेल असे मानले तरि सुद्धा रामविमुख जीवाला सुख मिळणे मात्र अगदीच अशक्य आहे. 'तात! सहज अनलिं हा स्वभावो। हिम न शके कधिं समीप जावो' (१।९०।७) (क) हिम आणि अग्नि यांचा जसा अगदी विरुद्ध स्वभाव आहे तसाच माया आणि ब्रह्म (= राम) यांचा आहे. 'ब्रह्म राम चिन्मय अविनाशी' 'ब्रह्म सच्चिदानंदमय-कंद भानुकुलकेतु' ब्रह्म सच्चिदानंद आहे. माया बर्फासारखी जड आहे म्हणून माया ब्रह्माला स्पर्श करु शकत नाही. आणि ब्रह्म म्हणजेच रामभानुकुलकेतु, रघुपति. म्हणून जीव जसजसा रघुपतीरूपी अनलाच्या जवळ जवळ जाईल. ('दनुज गहन घन दहन कृशानुसि' भजा (७।३०।७) 'संशय विपिन अनल' (६।११५।४) असे शंकरांनी श्रीरघुनाथास म्हटले आहे.) तसतसे मायामोहभ्रमरूपी बर्फ वितळत जाईल व तो श्रीरघुपती समीप आला किंवा रघुपति त्याच्या हृदयांत राहिले म्हणजे मायेचा पूर्ण विनाश होईल. परंतु जीव स्वतःच जर रामविमुख होऊन, रघुपतीकडे पाठ फिरवून दूर दूर जात राहिला तर मायारूपी हिम आधिकाधिक वाढत जाईल व दुःख अधिकाधिक सोसावे लागेल यात काहीच नवल नाही. 'जो आनंदसिंधु सुखराशी। त्रिजगी पावे लवें सुखासी।। तो सुखधाम राम...' (१।१९७।५-६) आनंद सागराकडे सुखधामाकडे पाठ फिरवून जो दूर दूर जाईल त्याला सुख-आनंद मिळणे कालत्रयी अशक्य! (ख) आता आणखी दोन दृष्टान्त देऊन सिद्धान्त सांगून या वर्णनाचा उपसंहार करतील.

हिं.दो. ।बारि मथें घृत होइ बरु सिकता ते बरुतेल।।
।।बिनु हरिभजन न भव तरिअ यह सिद्धान्त अपेल।।१२२रा.।।

म.दो. ।वारि मथुनि घृत होइ जरि सिकते पासुनि तेल।।
।।विण हरिभजन न भवतरण सिद्धान्त चि न टळेल।।१२२रा.।।

अर्थ- पाण्याचे मंथन करुन जरि तूप झाले किंवा वाळूपासून जरि तेल निघाले

तरिसुद्धा हरिभजनावाचून भवसागर तरता येत नाही हा सिद्धान्त आहे व हा कधी टळणार नाही.।।दो.१२२रा.।।

टीका. सूचना- यापूर्वी १)कासवाच्या पाठीवर केस येणे, २)वंध्यापुत्राचा वध करणे, ३)आकाशाला फुले येणे, ४)मृगजळ पिऊन तृषा शमविणे, ५)सशाला शिंगे फुटणे, ६)अंधाराने सूर्याचा नाश होणे व ७)बर्फातून अग्नि प्रगट होणे हे सात दृष्टान्त देऊन मायेचे व दृश्य जगाचे स्वरुप जड, दुःखमय, मिथ्या, असत्य व व्यावहारिक सत्य असल्याचे दाखवून हे ही दाखविले की रघुपति विमुखांना या जगापासून कोणताच आनंद सुख मिळणे मुळीच शक्य नाही. या दोह्यांत हे दाखवितात की हरिभजनाचा त्याग करून इतर साधनांनी सुख मिळविण्याचे केलेले प्रयत्न सुख देऊ शकत नाहीतच पण निरर्थक दुःख, कष्ट, श्रमच पदरांत पडतात.

(१) वारि मथुनि घृत होइ- दुधाचे किंवा दह्याचे मंथन केले तरि दूध किंवा दही तूप होऊ शकत नाही, मंथनाने फक्त लोणीच निघू शकते व त्याचे तूप करावे लागते, दुधांत अदृश्यरूपाने लोणी असते म्हणून मंथनाने निघू शकते. पाण्यात दृश्य किंवा अदृश्यरूपाने लोण्याचा किंवा तूपाचा लवलेश नसतां त्याचे मंथन कल्पान्तापर्यंत केले तरि त्यातून लोण्याचा कण किंवा तुपाची एक कणी सुद्धा निघणार नाही, आणि त्याचे तूपही होणार नाही, मात्र मंथनाचे कष्ट तेवढे पदरांत पडतील. पाण्याचे मंथन करुन त्याचे तूप करण्याचा प्रयत्न क्लेश श्रमरुपी फळाशिवाय आणि क्रोधसंतापादिवृद्धि शिवाय दुसरे काही देऊ शकत नाही, त्याचप्रमाणे हरिभजनाचा आधार न घेतां भवसिंधुपार जाऊन परमानंदसंदोह परमसुखी होण्याचा केलेला कोणताही प्रयत्न दुःखदायकच ठरणार. तुपासाठी जसे दुधाचे किंवा दह्याचेच मंथन केले पाहिजे तसेच हरिभजन रुपी दुधाशिवाय सुखरूपी घृताची प्राप्ती होणे शक्य नाही. क्वचित कोणी सिद्धींच्या सामर्थ्याने पाण्याचे तूप करू शकला तरिसुद्धा हरिभजनावाचून त्यालाही भवसागर तरुन जाऊन परमसुखी होता येणार नाही. (१९३३च्या मे महिन्यात एका योग्याने समुद्राच्या पाण्याचे शुद्ध दूध केले होते!) 'मळे धुउनि कधिं मळ किं नाशतो। वारि मथुनि कुणि घृत किं पावतो।। प्रेमभक्ति जलविण रघुवर तो। अभ्यंतर-मळ कधी न जातो' (७।४९।५-६) असे

वसिष्ठांनी श्रीरघुपतीची स्तुती करताना म्हटले आहे. अधिक विस्तार त्या चौपायांच्या टीकेत पहावा. हा दृष्टान्त केवळ ज्ञानाने भवमुक्त होण्याचे कष्ट करणारांविषयी आहे.

(२) सिकते पासुनि तेल- सिकता = वाळू, रेती. रेती हा रसहीन, अति शुष्क, कठिण, अति जड स्थावर पदार्थ आहे. आणि तेल हा रसाळ, स्निग्ध, द्रव, मृदु प्रवाही पदार्थ आहे. या दृष्टान्ताने केवळ शारीरीक कष्ट, ढोर मेहनत व निरर्थक परिश्रम व ते निष्फळ झाल्याने मनःक्षोभ निराशा व महामूर्खपणा पदरांत घेणे या गोष्टी सुचविल्या आहेत. घाण्यांत रेती घालून तेल काढण्याचा प्रयत्न करणारास लहान थोर सुद्धा वेडा, माथेफिरु म्हणतील. त्याप्रमाणे हरिभजनहीन तपश्चर्या, तीर्थाटण, इत्यादि साधनांनी सुखरूपी तेलाचा एक तुषार सुद्धा मिळणार नाही.

(३) विण हरिभजन न भवतरण- हरिभजनावाचून सुख नाही असे आता पर्यंत चार वेळा सांगितले पण येथे 'सुखप्राप्ती' च्या ऐवजी 'भवतरण' शब्द वापरला व सुचविले की सुखी होणे म्हणजेच भवसागरांतून तरून जाणे, आणि भवसागर तरणे म्हणजेच सुखी होणे. 'सेवक सेव्य भावविण भवतरण न उरगारि।। भजा राम पद पंकजां या सिद्धान्त विचारि' (७।११९रा) टीका पहावी. (क) भवतरण शब्दाने पूर्वीच्या 'सुख' शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट केला आहे. आत्यन्तिक दुःख निवृत्तिपूर्वक आत्यन्तिक सुख प्राप्ति म्हणजेच भव तरणे. ज्या सुखांत दुःखाचे मिश्रण असेल व ज्याच्या पूर्वी व नंतर दुःख असेल त्या सुखाला सुख असे म्हणताच येत नाही. असे दुःखरहित अखंड एकरस शाश्वत सुख कोणत्याहि विषयाच्या सेवनाने कधि तरि मिळणे शक्य आहे काय? याचा विचार करावा. विषय सेवनाने जे क्षणभंगूर सुख मिळाल्यासारखे वाटते ते विषय सेवनांत एक क्षणभर एकाग्र झालेल्या चित्तवृत्तीमुळे वाटते, जसे हाड चघळताना आपल्याच दातांतून निघणाऱ्या रक्ताच्या चवीने कुत्र्याला वाटते तसेच ते घडते.

(४) सिद्धान्त, चि न टळेल- हरिभजनाने हरिभक्ति, रघुपतिप्रेमभक्ति प्राप्त झाल्याशिवाय भवसागर तरून परम सुखी होणे शक्य नाही हा सिद्धान्त आहे. हा कधीच टळणार नाही. या सिद्धान्ताला अपवाद उत्पन्न होणे शक्य नाही.

म्हणूनच पूर्वी म्हटले आहे की 'रामचंद्रभजनाविण वांछिति पद निर्वाण। ज्ञानवंत अपि ते नर पशु विण पुच्छविषाण' (७।७८रा.) असा हा सिद्धान्त असल्याने सुख मिळविण्यात प्रवीण कोण ते आता सांगतात.

हिं.दो. ।मसकहि करइ बिरंचि प्रभु अजहि मसक ते हीन।।
।।अस बिचारि तजि संसय रामहि भजहिं प्रबीन।।१२२म.।।

म.दो. ।प्रभु विरंचि मशका करिती मशकाहूनि अज हीन।।
।।हें जाणुनि संशय तजुनि रामहि भजे प्रवीण।।१२२म.।।

अर्थ- प्रभु (रघुनाथ) मशकाला विरंचि करतात आणि विरंचीला = ब्रह्मदेवाला (अज) मशकाहून हीन करतात, हे जाणून सर्व संशय सोडून जो रामाला भजतो तोच प्रवीण तोच खरा शाहणा.।।१२२म.।।

टीका. (१) प्रभु = कर्तु अकर्तु अन्यथाकर्तु समर्थ असे श्रीराम रघुनाथ आहेत. (क) मशका विरंचि करिति- मशक ड़ासापेक्षांही अगदी लहान असतात, त्यांना चिलटे, केमरे म्हणतात. ब्रह्मदेव = विरंचि रचित सृष्टींत हा सर्वांत लहान, अतिक्षुद्र प्राणी समजला जातो. उंबराच्या फळांत जे जंतू असतात त्यांना सुद्धा मशक म्हणतात. सृष्टीरचना करणारा जो विरंचि = ब्रह्मदेव तो सर्व जीवांत श्रेष्ठ आहे. प्रभु रघुनाथ मशकासारख्या अति क्षुद्र जंतूला सुद्धा विश्वरचना करणारा ब्रह्मदेव बनविण्यास पूर्ण समर्थ आहेत. (ख) मशकाहुनि अज हीन- मशकापेक्षा लहान, क्षुद्र जीव सृष्टीत पुष्कळ आहेत, पण ते मनुष्यांना सहज दिसण्यासारखे किंवा ओळखता येण्यासारखे नाहीत. अज = ज्याला जन्म नाही, जो साक्षात श्रीनारायणाच्या नाभिकमळातून उत्पन्न झाला असा जो ब्रह्मदेव, विरंचि त्याला प्रभु मशकापेक्षांही क्षुद्र, हीन बनवू शकतात. 'भक्तिहीन जरि विरिंचि असला। तो प्रिय सब जीवांसम मजला।।' असे प्रभुच म्हणाले आहेत. सब जीवांसम म्हणजे कृमिकीटपतंगमशकांइतकाच प्रिय असतो व 'जीव भक्तिमान् नीच जरि महा। प्राणप्रिय मज बाणा मम हा' (७।८६।९-१०)

(२) हे जाणुनि- 'ईश्वर अंश जीव' 'चेतन अमल सहज सुखराशी

अविनाशी' असून 'फिरे सदा मायेने प्रेरित' आणि अनंत काळ दुःख भोगीत भ्रमण करीत असतां ईश्वराने करुणा करून सुरदुर्लभ मनुष्य देह दिला आहे, व रघुनायकासारखा परम कृपाळु दीन दयाळु परम समर्थ कोणी नाही हे जाणून (क) संशय तजुनि- संशयाचा त्याग करुन, संशय ही त्यागण्याची वस्तु आहे हे खरे असले तरि सत्संगात दीर्घकाळ हरिकथा श्रवण केल्याशिवाय मोठमोठ्यांचे सुद्धा संशय जात नाहीत. 'असे संशयी अमित भरे मन। तिळहि संचरे हृदिं प्रबोध न' (१।५१।४) सतीने आपल्या मनाची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला तरि संशय गेले नाहीत. फार काय सांगावे शंकरांनी पुष्कळ समजूत घातली तरी गेले नाहीत. 'संशय हटति न मी वदतां ही' (१।५२।६) असे महेशांनी म्हटले आहे. गरुडाचे सुद्धा तसेच झाले. 'जैं बहुकाळ करिति सत्संग। तदा सकल संदेहां भंग' (७।६१।४) 'जाति मिळत सद्‌गुरु जसे भ्रम संशय समुदाय' (४।१७) यावरुन ठरले की संशय त्यजुनि सद्‌गुरु संगतीत राहून सद्‌गुरु मुखाने बहुकाळ हरिकथा श्रवण करून सद्‌गुरु कृपेने संशय भ्रम मोह निवृत्त होऊन.

(३) राम हि भजे प्रवीण- प्रवीण = अभिज्ञ, विज्ञ = शाहणा, कृती. येथे प्रवीण शब्दाची व्याख्याच दिली आहे. वर सांगितल्याप्रमाणे संशयरहित होऊन जे रामभजन करतात तेच (हि) प्रवीण = शाहणे. अर्थापत्तीने हे ठरले की रामभजन न करतां इतर नाना शास्त्रे, कला, विद्या, सिद्धि इत्यादि अनेक गोष्टींत प्रवीण झाले तरि शाहणे नव्हत. 'ज्ञानवंत अपि ते नर पशु विण पुच्छ विषाण' (७।७८म.) हरिभजनाशिवाय तरणोपाय नाही असे निषेध मुखाने उपसंहारात येथे सांगितले. आता अन्वयमुखाने हाच सिद्धान्त सांगून या प्रकरणाची समाप्ति होईल. पुढील श्लोक प्रमाणिका छंदात आहे.

श्लोक- ।विनिश्चितं वदामि ते न अन्यथा वचांसि मे।।
।।हरिं नरा भजंति येऽति-दुस्तरं तरंति ते।।१२२चं.।।

अर्थ- विशेष निश्चित केलेला सिद्धान्त मी तुला सांगतो, माझे म्हणणे खोटे नाही. जे मनुष्य श्रीहरीला भजतात ते अति दुस्तर (अशी हरिमाया म्हणजेच संसारसागर) तरून जातात.।।१२२चं.।। (या श्लोकाचा अनुवाद केला नाही.)

टीका. (१) ते विनिश्चितं वदामि- ते = तुला, विनिश्चितं = विविध प्रकारे विशेष निश्चित केलेले, वदामि = सांगतो. (क) दांभिक, कपटी, पाखंडी, स्वार्थी, प्रतिष्ठाप्रिय वगैरे नसलेला कोणीही वक्ता विशेष निश्चयाने तेव्हाच बोलतो कीं जेव्हा शास्त्र प्रतीति, गुरुप्रतीति आणि आत्मप्रतीति या त्रिविध प्रतीति त्याला लाभलेल्या असतात. शास्त्राने जो सिद्धान्त सांगितला असेल तोच सद्गुरुमुखाने सत्य सिद्धान्त म्हणून श्रवण केला असेल व त्याचा अनुभव स्वतः घेतला असेल त्याविषयींच तो विनिश्चित विधान करतो. भक्तिपूर्वकालीन साधनकाळांतील स्थिती व भक्तियुक्त साधनाने प्राप्त झालेली स्थिती यांचा पडताळा पाहून शास्त्र गुरु वचनाशीं सुसंगत असा जो स्वानुभव तोच कोणी एखाद्या अत्यंत विश्वासांतील सद्भक्तास सांगतो. तसेच मी सांगत आहे हा भुशुंडीच्या म्हणण्याचा भाव आहे. त्रिविध प्रतीतीने अन्वय व्यतिरेकाने जे निश्चित झाले असेल तोच आपला निश्चय म्हणून सांगावा, माझे मत असे सांगण्याचा फारसा उपयोग होत नाही.

(२) मे वचांसि अन्यथा न (सन्ति) मे = माझा, माझी, माझे, वचांसि = शब्द वचन म्हणणे. अन्यथा = असत्य, खोटे. माझे म्हणणे कधीं असत्य होत नाही. मी जे आतापर्यंत सविस्तर वर्णन केले त्याचे सार म्हणून जो सिद्धान्त सांगणार आहे तो कधीं कालत्रयीं खोटा ठरणार नाही. शूद्रजन्मांतील सद्गुरु, शंकरांचे आशीर्वाद, लोमशमुनींचे आशीर्वाद व श्रीरामचंद्रांनी दिलेले वर यांच्या सामर्थ्याने व अनेक जन्मांचा अनुभव व आतांचा अनुभव यावरुन जे निश्चित झाले तेच मी सांगत असल्याने ते कधी खोटे ठरणार नाही. 'स्वामि! कर्म सब करुनि पाहिले। सुख न अतां सम कधीं जाहले' असे भुशुंडीने पूर्वीच सांगितले आहे.

(३) ये नराः हरिं भजंति- ये = जे, नरा = नराः = धर्मशील मनुष्य, हरीला भजतात. 'नर तनु भववारिधीत तारुं' पण सगळींच नरतनु रूपी तारवें भवसागराच्या पार नेऊ शकत नाहीत. जी धर्मशील विश्वास श्रद्धासंपन्न असतील तीच तरून नेण्यास योग्य असतात, पण रामकृपारूपी अनुकूल वारा पाहिजे. 'सम्मुख मरुत कृपा मम चारु' तथापि कर्णधार नसेल तर उपयोग होत नाही. 'सद्गुरु कर्णधार दृढ नावे' (७।४४।७-८) इतके मिळून जे राम

भजतील ते तरतील. (क) ते अति दुस्तरं तरंति ते = विषयाशा सोडून वर सांगितल्याप्रमाणे रामभजन करणारे. अति दुस्तर 'भव वारिधि मंदर परमं दर। वारय तारय संसृति दुस्तर' (६।११५।६) असे शंकर म्हणाले आहेत. 'जीव पुन्हां तैं विविध विध भोगि संसृती क्लेश।। हरिमाया अति दुस्तर तरवे ना विहगेश' (७।११८रा.) असे ज्ञानदीपाच्या उपसंहारात भुशुंडीनेच म्हटले आहे. भवतरण = संसृतीसागरतरणे फार कठिण आहे कारण हरिमाया अति दुस्तर आहे. म्हणून अति दुस्तरं तरन्ति = अति दुस्तर अशी जी हरिमाया अविद्या तिच्यातून सुखाने तरून जातात. भवसागर तरणे म्हणजेच मायामुक्त होणे, अविद्या मायेच्या बंधनातून सुटणे. 'दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरंति ते' (भ.गी.)

मानसरोगप्रकरण समाप्त

सप्तप्रश्नगीता समाप्ता.

श्रीमानस गूढार्थचंद्रिका उत्तरकाण्ड अध्याय १५वा समाप्त.

■

अध्याय १६ वा.

उपसंहार प्रकरण (१२३ /१ - १३०)

आता चारी वक्ते क्रमाने आपापल्या कथेचा उपसंहार करतील. (क) बालकाण्डात प्रथम श्रीतुलसीदासानी कथेचा उपक्रम केला, पण ती कथा याज्ञवल्क्य भरद्वाज संवादावर अवलंबून, याज्ञवल्वक्यांनी सांगितलेली कथा उमामहेश संवादावर अवलंबून, व महेशांनी सांगितलेली कथा काकभुशुंडीगरूडसंवादावर अवलंबून असल्यामुळे, म्हणजे तो संवाद सर्वात प्रथम असल्यामुळे आता प्रथम भुशुंडी-गरुड संवादाचा उपसंहार दो. १२३ ।१-दो.१२५ पर्यंत आहे. नंतर उमा महेशसंवादाचा उपसंहार दो. १२६ ।१-१२९ दो. पर्यंत आहे. पुढे याज्ञवल्क्य भरद्वाज संवादाचा उपसंहार दो. १३० ।१-४ पर्यंत आहे. आणि शेवटी श्रीगोस्वामीकथित रामकथेचा उपसंहार दो. १३० ।५ दो.१३० पर्यंत आहे. व शेवटी दोन संस्कृत श्लोकांत ग्रंथाचा उपसंहार आहे आणि त्यानंतर अनुवादककृत उपसंहार आहे. असे असल्यामुळे या प्रकरणास उपसंहार प्रकरण हे नाव देणे योग्य वाटले.

हिं. ।कहेउँ नाथ हरिचरित अनूपा ।ब्यास समास स्वमति अनुरूपा ।।१ ।।

म. ।कथित नाथ हरिचरित्र अनुपम ।व्यास समासे यथा बुद्धि मम ।।१ ।।

अर्थ- (भुशुंडी गरुडास म्हणाला) हे नाथ! मी आपल्या बुद्धीप्रमाणे (यथामति) (काही) विस्ताराने व (काही) संक्षेपाने अनुपम हरिचरित्र सांगितले.

टीका. (१) नाथ! हरिचरित्र कथित- हा उपसंहार खरोखर सप्तप्रश्नांचे विवरण व त्या पूर्वीचा ज्ञानभक्तिविषयी गरुडाचा प्रश्न आणि भुशुंडीच्या चरित्राविषयींचे गरुडाचे प्रश्न यांच्या विवेचनाचा आहे. असे असून त्या सर्व कथेला हरिचरित्र असे म्हटले, आणि सुचविले की ज्या कथांमध्ये श्रीहरीचा संबंध येतो ते सर्व हरिचरित्रच समजणे योग्य आहे. भक्तांचा संबंध बाजूला काढला तर भगवंताचे चरित्र असे शिल्लकच राहणार नाही, व भगवंताचा संबंध बाजूस ठेवला तर संतांचे भक्तांचे चरित्रच राहणार नाही, त्यांना भक्त म्हणताच येणार नाही. सार हे की भक्तांचे व भगवंताचे चरित्र एकत्र केलेल्या

दूधसाखरेसारखे असते. भगवंताचा संबंध सोडून संतांचे चरित्र राहिले शिल्लक तरि त्याचा इतर जीवांना मायामुक्त होण्याच्या दृष्टीने काही उपयोग होणार नाही, भगवंताच्या चरित्राचे ही तसेच आहे. (क) व्यास = विस्तार, समास = संक्षेप. काही विषयांचे कथांचे विवेचन विस्ताराने केले आहे व काहीचे संक्षेपाने, अति संक्षेपाने केले आहे. याविषयी पूर्वी टीकेत ठिकठिकाणी स्पष्टीकरण केले आहे. (ख) यथा बुद्धी मम = माझ्या बुद्धीच्या शक्तीप्रमाणे म्हणजेच यथामति. शंकरानी सुद्धा असेच म्हटले आहे. तेथे टीकेत कारणे देऊन स्पष्टीकरण केले आहे. (७।५२।१ टी.प.)

हिं. ।श्रुति सिद्धान्त इहइ उरगारी।राम भजिअ सब काज बिसारी।।२।।
।प्रभु रघुपति तजि सेइअ काही।मोहि से सठ पर ममता जाही।।३।।

म. ।उरगारी! हा श्रुति सिद्धान्त हि।राम भजा भुलुनी सब काज हि।।२।।
।भज्य कोण तजुनी प्रभु रघुपति।ज्यांची ममता शठिं मजशा अति।।३।।

अर्थ- हे उरगारी, (सर्पशत्रु, गरुडा) हा श्रुतींचाच सिद्धान्त आहे की सर्व कार्ये (कामकाज) भुलून जाऊन विसरुन राम भजावा.।।२।। माझ्यासारख्या अति शठावर ज्यांची ममता आहे त्या प्रभु रघुपतीला सोडून कोणाला भजावे? (कोण आहे भजण्यास योग्य?).।।३।।

टीका. चौ.२ (१) हा श्रुति सिद्धान्त हि- भाव हा की मी तुम्हाला जो सिद्धान्त सांगितला की 'हरिं नरा भजन्ति ये ऽ ति दुस्तरं तरंति ते' आणि 'विण हरिभजन न भवतरण सिद्धान्त, चि न टळेल.' तो सिद्धान्त मी आपल्या पदरचा सांगितला नसून जो श्रुतींचा सिद्धान्त आहे तोच मी सविस्तर सांगितला. श्रुति हाच सिद्धान्त सांगतात की 'राम भजा भुलुनी सब काजहि.' वेदांनी सांगितलेल्या सर्व धर्म कर्म उपासना ज्ञानादिकानी अंति प्राप्तव्य प्रेमभक्ति अनपायिनी हेच आहे. वेदांनी एकमुखाने हेच मागणे मागितले श्रीरघुनाथाजवळ की 'करुणानिधे प्रभु सद्गुणाकर देव हा वर मागतो। मन वचन कर्म विकार सोडुनि तवपदीं अनुराग तो' (७।१३।६). 'तव जपुनि नामा श्रम विना भव तरति त्या स्मरतो हरे! (७।१३।३) वेद सुद्धा राम प्रेम भक्तिसाठी हरिनामस्मरणरूपी भजन करीत असतात. (क) पूर्वी जो ज्ञानसिद्धान्त

सांगितला तो श्रुतींचाच असला तरि तो सर्वसारभूत मुख्य सिद्धान्त नव्हे.

(२) भुलुनी सब काज हि- सर्व कामें, सर्व कार्ये भुलून, विसरून रामभजन केले पाहिजे. भजन करताना चित्तमन बुद्धि इतकी रंगली पाहिजे की बाकीच्या सर्व कार्याचा, तहानभूक इत्यादींचा सुद्धा सहज विसर पडला पाहिजे. हा मुख्य अर्थ आहे पण हे एकदम साधणार नाही. म्हणून भजन करताना इतर कार्याचे, इतर गोष्टींचे विचार मनात आले तर ते काढून टाकले पाहिजेत हा दुसरा अर्थ गौण आहे. भजन म्हणजे मानसपूजा, ध्यान, जप, बाह्यपूजा, नामस्मरण, नामसंकीर्तन, रामचरित्र श्रवण, कथन, रामगुणचिंतन, प्रार्थना इत्यादि. सर्व कार्याचा सहज विसर पडल्याची उदाहरणे बालकाण्डांत व अयोध्याकांडात बरीच आहेत. प्रस्तावनाखंडात 'काम त्याग व कार्य विसर' हे प्रकरण (पृ.४८९) पहावे. (क) भजनांत इतर सर्व गोष्टींचा विसर पडणे फार प्रेम रामावर असल्याशिवाय घडणार नाही. ज्या गोष्टीवर प्रेम असते तिच्या चिंतनात मन तेव्हाच तदाकार होते. ज्या गोष्टींची मनाला चटक लागलेली नसते ती करताना निद्रा, तंद्रा, आळस, जांभया इत्यादि लयरूपी विघ्ने येतात किंवा मन इतर गोष्टींचे स्मरण, चिंतन, विचार करू लागते हे विक्षेपरूपी विघ्न आहे. लय विक्षेपरहित भजन घडले पाहिजे.

चौ.३ (१) ज्यांची ममता शठिं मजशा अति- शठ सेवक त्याच्या स्वामीला शूळासारखा पीडादायक, दुःखदायक असतो, वाटतो, म्हणून शठसेवकावर स्वामी कधीं ममता प्रेम करीत नाहीत ही जागतिक वस्तुस्थिती आहे. 'सेवक शठ नृप कृपण कुनारी। कपटी मित्र शूलसम चारी' (४।७।९). पण रघुपति असे स्वामी आहेत की सेवक शठ असला तरिसुद्धा त्याच्यावर ममता करतात. 'प्रभु तरुतळिं विटपीं कपी केले त्यां स्वसमान। तुलसी कुठे न रामसे स्वामी शील निधान' (१।२९रा.) ज्याला एकदां आपला सेवक म्हणून मानला त्याच्या दुर्गुणांकडे, चुकांकडे लक्ष न देता त्याच्यावर ममता करणारा स्वामी रघुपती सारखा दुसरा नाही. अशाप्रकारे आपले स्वानुभूत मत मानसांत अनेकांनी सांगितले आहे. 'स्वामी रघुपती समान नाहीं' (पृ.५३८) आणि 'मानसांत श्रीरामस्वभाव' (पृ.५४०) ही प्रकरणे प्रस्तावनेत पाहावीत.

(२) मजशा अति शठिं- माझ्यासारख्या अति शठावर. माझ्यासारखा शठ

जगांत दुसरा नाही हा भावार्थ आहे. हा भुशुंडीचा कार्पण्य भाव आहे हे परमलीनतेचे लक्षण आहे. अशांना आपला स्वतःचा राई एवढा दोष पर्वतासारखा वाटतो, पण दुसऱ्यांचा हिमालयासारखा दोष दिसत नाही. हे 'बालक सुत सम दास अमानी' परम दीनता संपन्न भक्तांचे लक्षण आहे. असले दैन्य ईश्वराला प्रिय असते. 'ईश्वरास्यापि अभिमानद्वेषित्वात् दैन्यप्रियत्वाच्च' (ना.भ.२७) (क) भज्य कोण तजुनि प्रभु रघुपति! रघुपतीसारखा परम दयाळू कृपासिंधु सेवकांच्या दोषांकडे, चुकांकडे, शठतेकडे न बघता त्यांच्यावर ममता करणारा व सेवकांचे परमहित करणारा स्वामी जगांत दुसरा नाही, मग त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ, चांगला कसा आढळणार? कोणी रघुपतीपेक्षा श्रेष्ठ किंवा निदान त्यांच्यासारखा असता तर रघुपतीचा त्याग करून त्याचा आश्रय करणे कदाचित क्षम्य ठरले असते. पण त्यांच्यासारखा सुद्धा दुसरा कोणी नाही. मग त्यांच्य वाचून कोणाचे भजन करावे? शठ सेवकावर ममता करून त्याचे परमहित कसे करतात हे आता गरुडाच्या निमित्ताने सांगतात.

हिं. *।तुम्ह बिग्यनरूप नहिं मोहा।नाथ कीन्हि मोपर अति छोहा।।४।।*
।पूँछिहु राम कथा अति पावनि।सुक सनकादि संभु मन भावनि।।५।।

म. *।तुम्हिं विज्ञानरूप नहि मोहो।नाथ! कृपा कृत मजवर अति हो!।।४।।*
।पुसिली रामकथा अति पावनि।शुक सनकादि शंभु मनभावनि।।५।।

अर्थ- तुम्हीं विज्ञानरूप आहांत, तुमच्या ठिकाणी मोह नव्हताच, परंतु अहो नाथ! तुम्ही माझ्यावर अति कृपा केलात.।।४।। शुक सनकादि व शंभू यांच्या मनाला आवडणारी अति पावन रामकथा तुम्हीं विचारलीत.।।५।।

टीका.चौ.४ (१) विज्ञानरूप = ब्रह्मरूप, 'विज्ञानं आनंदं ब्रह्म' असे ऋग्वेदाचे एक महावाक्य आहे. ब्रह्माच्या ठिकाणी मोह नसतो, म्हणून तुमच्याठिकाणी पूर्वी सुद्धा मोह नव्हताच. भाव हा की तुम्हाला मोह झालेला नसता तुम्ही माझ्याकडे आलात ही माझ्यावर अति कृपा केलीत. गरुडाला रामचरितमानसकथा सांगितल्यावर भुशुंडी प्रेमाने असेच म्हणाला की 'तुम्हां न संशय माया मोह न। दया मजवरी केली आपण' (७।७०।३) टी.प. तेच भाव येथे आहेत. 'गरुडमहाज्ञानी' होताच व त्याला अविद्याजनित मोह झालेला

नव्हताच. भरद्वाज व सती यांनासुद्धा अविद्याजनित मोह नव्हता. प्रभूंनी आपल्या विद्यामायेने त्यांना मोहित केले होते. तसाच गरुडाला ही विद्या मायेने मुद्दाम मोहित केला होता.

चौ.५ (१) पुसिली रामकथा अति पावनि- तुम्हाला मोह नसतां तुम्ही माझ्या कडे येऊन रामकथा सांगण्याविषयी विनंती केलीत हा माझ्यावर थोर उपकार केलात. 'आता रामकथा अति पावन। सदा सुखद दुःखाद्रि विनाशन।। तात! ऐकवा सादर मजला। पुनःपुन्हा प्रभु विनती तुजला' (७।६४।३-४) असे जे गरुडाने प्रथम विनविले त्या विषयीं हा उल्लेख केला आहे. (क) शुक सनकादि....भावनि- शुकानीं कृष्णचरित्रप्रधान श्रीमद्भगवतांत अत्यंत प्रेमाने रामचंद्रांस वंदन केले आहे व 'महापुरुष' हे विशेषण भागवतांत इतर कोणास न वापरता फक्त रामचंद्रांस दोनदा वापरले आहे. 'ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहंतीर्थास्पदं शिवविरंचिनुतं शरण्यम्। भृत्यार्तिहं प्रणतपाल भवाब्धिपोतं वन्दे महापुरुष ते चरणारविंदम्।। त्यक्त्वा सुदुस्त्यज-सुरेप्सित-राज्यलक्ष्मीं धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम्।। मायामृगं दयितयेप्सितमन्व धावद्वंदे महापुरुष ते चरणारविन्दम्।। (११।५।३३-३४)' १)सनकादिकांना प्रिय- 'दिशा वसन, हे व्यसन तयांप्रति। रघुपतिचरित कथिति तिथं ऐकति' (७।३२।६) (७।२५।१-२पाहा). ब्रह्मलोकांतून या मृत्युलोकांत रघुपतीकथा श्रवण करण्यासाठी येतात. २)शंभुमन भावनि- रामकथा श्रवणासाठी हंस बनले व कावळ्याच्या मुखाने श्रवण केली. आणि कैलासाहून मुद्दाम अगस्त्याश्रमांत येउन श्रवण केली. (१।४८।१-३पहा). अशी शुकसनकादि शंकरांना सुद्धा फार प्रिय असलेली कथा तुम्ही विचारलीत, म्हणून मला सत्संगाचा लाभ झाला. तुमच्या सारखा श्रोता मिळणे फार दुर्लभ आहे. परमभाग्य व भगवत्कृपा असल्याशिवाय हे घडत नाही, कारण सांगतात.

हिं. ।सतसंगति दुर्लभ संसारा।निमिष दंड भरि एकउ बारा।।६।।
।देखु गरुड निज हृदयँ बिचारी।मैं रघुबीर भजन अधिकारी।।७।।
।सकुनाधम सभ भाँति अपावन।प्रभु मोहि कीन्ह बिदित जग पावन।।८।।

म. ।सत्संगति दुर्लभ संसारा।निमिष घडीभर एकहि वारां।।६।।
।बघा गरुड! निज हृदिं सुविचारी।मी रघुवीर भजन अधिकारी।।७।।

।शकुनाधम सब रीतिं अपावन।प्रभु मज करिति विदित जग पावन।।८।।

अर्थ- या संसारात एक घटकाभर, क्षणभर, एकवेळ ही संतसंगति दुर्लभ आहे.।।६।। अहो गरुड! आपण आपल्या हृदयांत सुविचाराने जरा पहा की मी रघुवीर भजनाचा अधिकारी आहे का?।।७।। मी सर्व पक्ष्यांत अधम, सर्व प्रकारे अधम आणि सर्व प्रकारे अपवित्र असून प्रभूंनी मला पावन करून जगांत प्रसिद्ध बनविला.।।८।।

टीका. चौ.६ (१) सत्संगति दुर्लभ संसारा- संसारात = जन्ममरणाच्या फेऱ्यांत भ्रमण करीत असणाऱ्या जीवाला संतांची संगति केवळ नरदेहांतच लाभू शकते व नरदेहांत सुद्धा ती दुर्लभ आहे. 'संत भेटी सम जगांत सुख ना' (१२१।१३) पण 'विण हरिकृपे भेट नहिं संतां' (५।७।४) म्हणून संतसंगति मनुष्यांना सुद्धा दुर्लभ आहे. सत्संगाचा महिमा यापूर्वी जागोजागी वर्णिला आहे. (क) निमिष घडीभर एकहि वारां- संतसंग एकदा, एक घटकाभर, एक क्षणभर मिळणे सुद्धा दुर्लभ आहे. 'महत्संगो दुर्लभोऽगम्योऽमोघश्च' (ना.भ.३९). पण भगवंताच्या कृपेने एकदा, एक घटकाभर, फार कशाला एक क्षणभर जरि लाभला तरि त्याचा प्रभाव अमोघ असतो. 'स्वर्ग-मोक्ष-सुख घालितां एका तुलांगि तात!।। सकल मिळुनि ना तोलवे सुख लव सत्संगात.' (५।४) असे असून मला कावळ्याला सत्संगाचा लाभ झाला आणि तो सुद्धा इतका दीर्घकाळ!

चौ.७ (१) बघा गरुड....सुविचारी- भाव हा कीं आपल्यासारखे प्रत्यक्ष श्रीहरीची सेवा करणारे पक्षिराज संत कोठे व मी एक कावळा कोठे? पण मला आपल्यासारख्या संतांच्या संगतीचा लाभ प्रदीर्घ काळ झाला हे कशामुळे घडले याचा आपण आपल्या मनात जरा विचार करून पहा. (क) मी रघुवीर भजन अधिकारी- हा आश्चर्यदर्शक प्रश्न आहे. मी चांडाळपक्षी कावळा, आणि रामभक्ति यांचा संबंध स्वप्नांत तरि येणे शक्य आहे काय? याचाही विचार करा. जी भक्ति ब्रह्मलीन विज्ञानी महामुनींना सुद्धा मिळणे फार दुर्लभ आहे ती एका कावळ्याला मिळणे शक्य आहे काय? व कावळ्याला भक्ति भजन करता येईल काय याचाही विचार करा. कावळा हरिभक्त झाला असे कोणाला तुम्ही सांगितले तर कोणी ते खरे मानील का? कोणी सुद्धा खरे मानणार नाही.

म्हणूनच पार्वतीला अति आश्चर्य वाटले व तिने प्रश्न विचारले शंकरांनीच तसे सांगितले म्हणून खरे वाटले. दुसऱ्या कोणी सांगितले असते तर खरे वाटणे शक्यच नव्हते. (ख) रघुबीर शब्दाने मुख्यतः कृपावीरता सुचविली आहे. रघुवीरांनी कृपा केली तर मशकाला ते ब्रह्मदेव बनवू शकतात, मग कावळा भक्त बनेल यात काय नवल? रघुवीर कृपेने पाषाण सुद्धा तरले व त्यांनी दुसऱ्यांस तारले!

(२) भजन अधिकारी- प्रेमभक्तीचा अधिकारी कोण होऊ शकतो याचाहि विचार करा म्हणजे खात्री होईल की कावळा भक्तीचा अधिकारी होणे अगदी अगदी अशक्य! कारण की 'सा न कामयमाना निरोधरूपत्वात्' (ना.भ.७) प्रेमभक्ति कामनायुक्त (मोक्षकामनायुक्त सुद्धा) असू शकत नाही, कारण ती निरोघरूप आहे. 'निरोघस्तु लोकवेदव्यापारन्यासः' (ना.भ.८) लौकिक आणि वैदिक कर्मांचा न्यास म्हणजे निरोध. आणि 'तस्मिन् अनन्यता तद्विरोधिषु उदासीनता' (ना.भ.९) त्या परमात्म्याच्या ठिकाणी अनन्यता व भक्तिविरोधी विषयांत उदासीनता म्हणजे निरोध. 'अन्याश्रयाणां त्यागः अनन्यता' (ना.भ.१०) अन्य आश्रयांचा त्याग म्हणजे अनन्यता. या सर्व गोष्टी मोठमोठ्या महामुनींना सुद्धा परम दुर्लभ आहेत. असे असता कावळा भक्तीचा अधिकारी कसा असू शकेल? भाव हा की रघुवीराने कृपा केली तर अनाधिकारी असलेल्या कोणाही प्राण्याला ते आपल्या प्रभावाने उत्तम अधिकारी बनवू शकतात. अपात्राला परम सुपात्र बनवितात. 'सर्व सुधारिति ते मम दोषू। करत कृपा तत्कृपे न तोषू' (१।२८।३)

चौ.७ (१) शकुनाधम- शकुन = पक्षी, आणि शकुन = शुभाशुभनिमित्त. मी सर्व पक्ष्यांत अधम पक्षी असून इतका अधम की त्याची कावकाव अधम शकुन = अपशकुन समजला जातो. त्याचा स्पर्श झाला तर स्नान करावे लागते असा पक्ष्यांत चांडाल. (क) सबरीतिं अपावन- जात, भक्ष्य, स्वभाव, वर्ण, बुद्धि कृति गति इत्यादि सर्वच अपावन अपवित्र असते. प्रस्तावनेत 'काकस्वभावादि' हे प्रकरण (पृ.६३५) पाहावे. तेथे मानसांतील अवतरणे दिलेली आहेत. (ख) प्रभु मज करिति विदित जग पावन. भाव हा आहे की जो सर्व भावाने कपट सोडून श्रीरघुपतीचा अनन्यगतिक दीन सेवक होऊन राहील तो कितीही अपावन

कितीही मूर्ख असला तरि त्याला आपला म्हटल्यावर भगवान रघुवीर त्याला पावन करतातच, पण तो जगाला पावन करणारा होईल असे करतात. या काकाला तर आता जगाला पावन करणारांत प्रसिद्ध केला. प्रभूंनी कृपा करून मला उभयमायामुक्त केला व परम दुर्लभ भक्ति दिली इतकेच नव्हे तर माझी जगांत प्रसिद्धि करण्यासाठी मोहाचे निमित्त करुन तुम्हाला येथे पाठविले आणि शिवाय संत समागमाचा लाभ पुष्कळ काळ दिला. म्हणून तो आता म्हणतो

हिं.दो. ।आजु धन्य मैं धन्य अति जद्यपि सब बिधि हीन।।
।।निज जन जानि राम मोहि संत-समागम दीन्ह।।१२३रा.।।

म.दो. ।आज धन्य मी धन्य अति सर्वपरीं जरि हीन।।
।।संत समागम राम दे जाणुनि निज जन दीन।।१२३रा.।।

अर्थ- जरि मी सर्व प्रकारे हीन असलो तरि आज मी धन्य झालो, अति धन्य झालो (आजचा दिवस धन्य व मी अति धन्य) कारण की श्रीरामचंद्रांनी दीन निज दास जाणून संतसमागम दिला.।।दो.१२३रा.।।

टीका. (१) आज- काकभुशुंडी 'कथारंभ करुं पाहे जेव्हा। गेला खगपति तेथे तेव्हा' (७।६३।५) गरुड भुशुंडीकडे गेला तेव्हा तो कथारंभ करण्याच्या बेतात होता. त्याने स्वागत करताना गरुडाला विचारले की 'का येणे प्रभु आज' (७।६३रा.) नंतर गरुडाने रामकथा सांगण्याविषयी प्रार्थना केली व लगेच काकाने कथा सांगण्यास प्रारंभ केला, व आता सर्व रामकथा सांगून झाल्यावर म्हटले की 'आज धन्य मी धन्य अति' यावरुन ठरले की बालकांडापासून मागील दो.१२२ पर्यंतची सर्व रामकथा एकाच दिवशी सांगून झाली. पण तो सर्व दिवसभर रामकथा सांगत नसे. (क) त्याचा नित्यक्रम असा होता- 'पिप्पलतलिं तो ध्याना बसतो। जपयज्ञा पिंपरितलिं करतो।। करि रसालतलिं मानसपूजा। भजनविना व्यवसाय न दूजा।। वटतळिं करि हरिकथा मनोरम। श्रवणा जमति अनेक विहंगम.' (७।५७।५-७) याने ठरते की तो एका दिवसांत ध्यान, जपयज्ञ, मानसपूजा व रामकथा सांगणे या चार गोष्टी क्रमाने रोज करीत असे. (ख) एका दिवसाचे चार प्रहर होतात. पहिल्या प्रहरांत ध्यान, दुसऱ्या प्रहरात जपयज्ञ, तिसऱ्या प्रहरांत मानसपूजा व चौथ्या प्रहरांत रामकथा

सांगत असे. म्हणून ठरले की तिसरा प्रहर संपून भुशुंडी रामकथेला प्रारंभ करणार तोच गरुड तेथे गेला व त्याला काकाने विचारले की 'का येणे प्रभु आज' आणि सर्व राम कथा सांगून झाल्यावर म्हटले की 'आज धन्य मी धन्य अति' म्हणजे बालकाण्डापासून उत्तरकांड दो.१२२ पर्यंतची सर्व कथा सांगण्यास पुरता एक प्रहर सुद्धा लागला नाही. परंतु आमच्या दिनमानाप्रमाणे एका प्रहरांत ही कथा सांगणे अगदीं अशक्य आहे, म्हणून काकाच्या 'आज' शब्दांत गूढार्थ असला पाहिजे हे ठरले.

(२) एका प्रहरांत जर ही कथा सांगता आली असती तर गरुड शंकराकडे गेला तेव्हा त्यांनी त्याला काकाकडे पाठविताना जे सांगितले ते न सांगता मार्गांत बसूनही कथा सांगता आली असती, पण शंकर म्हणाले की 'गरुडा मार्गी भेटसि मजला। अता कसे समजाऊ तुजला। तदा सकल संदेहां भंग। जैं बहु काळ करिति सत्संग।। नित्य हरिकथा होते जेथे। करा श्रवण जा धाउं तेथे.' (७।६१।३-७पहा) यावरुन ठरले काक नित्य नियमाने हरिकथा सांगतो आणि हिमालयापलीकडील कैलासपर्वतावर राहणाऱ्या शंकराच्या दिनमान गणनेप्रमाणे पुष्कळ काळ रामकथा श्रवण करण्यास लागतो. एक प्रहर म्हणजे पुष्कळ काळ असे म्हणतां येत नाही. पण भुशुंडीच्या एका प्रहरापेक्षा कमी काळांत रामकथा सांगितली गेली आहे म्हणजे या पृथ्वीतलावरील पुष्कळ काळ = भुशुंडीचा प्रहरापेक्षा कमी काळ आता हे समीकरण सोडविले पाहिजे.

(३) ब्रह्मदेवाने गोकुळातील वासरे व बालगोपाळ यांना पळवून नेऊन लपवून ठेवली व टिचकी वाजविण्यास जेवढा काळ लागतो तेवढ्यात पुन्हा परत येऊन पाहतात तो गोकुळांतले एक वर्ष संपण्यास अगदी थोडे दिवसच राहिले होते. (क) रैवत राजाने आपल्या रेवती मुलीसाठी काही वरांची निवड मनाशी केली व त्यातील कोणत्या वराला रेवती द्यावी हे निश्चित करण्यासाठी रेवतीला घेऊन ब्रह्मलोकांत गेले. तेथे चाललेले गायन ऐकण्यासाठी क्षणभर थांबले व परत आले तो इकडे पृथ्वीवर दुसरे युग सुरु झाले होते व पूर्वी मनात योजलेले सर्व वर व त्यांचे वंश नष्ट झाले होते . हा जसा ब्रह्मलोकांतला एक क्षण आणि पृत्वीवरील युग यांचा संबंध आहे तसाच संबंध भुशुंडीचा प्रहरापेक्षा कमी काळ व पृथ्वीवरील पुष्कळ काळ यांचा असला पाहिजे.

(४) (क) 'कृतयुगिं सब योगी विज्ञानी। ध्यात हरिस भव तरती प्राणी' तसा हा काक त्याच्या पहिल्याप्रहरांत हरीचे ध्यान करतो. 'पिप्पल तलिं तो ध्याना वसतो' (ख) त्रेतीं यज्ञ विविध नर करती। प्रभुस कर्म अर्पुनि भव तरती हा दुसऱ्या प्रहरांत 'जपयज्ञा पाकरिं तलिं करतो' कावळा असल्याने इतर यज्ञ करण्याचा त्यास अधिकार नाही व 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' (भ.गी.) (ग) तिसऱ्या युगांत 'द्वापरिं करुनि रघुपति पूजा। नर भव तरति उपाय न दूजा' हा तिसऱ्या प्रहरांत 'करि रसाल तलिं मानस पूजा' (घ) चौथ्या युगांत 'कलियुगिं केवल हरिगुण गाथा (= कथा)। भवठावा नर पावति गातां' हा चौथ्या प्रहरांत 'वट तळिं करि हरिकथा मनोरम' (ङ) यावरून ठरले की भुशुंडीच्या दिवसाचा पहिला भाग = कृतयुग, दुसरा भाग = त्रेतायुग, तिसरा भाग = द्वापर युग, आणि चौथा भाग = कलियुग. याप्रमाणे त्याच्या दिवसांतील कलियुग सुरु होण्याच्या वेळी गरुड त्याच्याकडे गेला व ते कलियुग संपण्यापूर्वी रामकथा श्रवण करुन आता वैकुंठास जाईल.

(५) यावरुन ठरले की त्रेतायुगांत रामावतारात गरुडास मोह झाला. त्या मोह ग्रस्त झालेल्या स्थितीत पुष्कळ काल विचार केला, पण त्रस्त होऊन तो नारद ब्रह्मदेव व शंकर यांच्याकडे गेला तो द्वापर युग संपलेच. ब्रह्मलोकांतील एक क्षण म्हणजे या पृथ्वीवर एक युग हे आधीच दाखविले आहे. कलियुगारंभी तो भुशुंडीकडे गेला. तेथे नक्की किती वर्षे (मानवांची) राहिला हे ठरविणे कठीण आहे, तथापि श्रीगोस्वामींच्या कालगणनेच्या गुप्त संकेतावरून असे ठरते की मानवांची ९० वर्षे तेथे राहून त्याने श्रीरामचरित मानस श्रवण केले व नंतर भुशुंडीविषयी चार प्रश्न विचारले नंतर ज्ञानभक्ति यात अंतर किती हा प्रश्न विचारला व सप्त प्रश्न विचारले. त्यांचे सर्वांचे विवेचन ऐकण्यात काही वर्षे गेली. बा.कां.दो.४३रा च्या टीकेनंतर याविषयी स्पष्टीकरण केले आहे ते पहावे.

(६) आज धन्य = आजचा दिवस धन्य झाला. 'जैं सत्संगति काळ धन्य तो' (१२७।८) (क) 'मी अति धन्य' श्री रघुपतींस सनकादि संतांचे दर्शन झाले तेव्हा त्यास म्हणाले की 'आज धन्य मी पहा मुनीश्वर। तुमचे दर्शन अघराशीहर।। बहुभाग्यें सत्संग लाभतो। विना श्रमहि भव भंग पावतो.'

संतांच्या नुसत्या दर्शनाने रघुपतीस धन्यता प्राप्त झाली. मग हरिवाहन गरुडाचा समागम दीर्घकाळ एका कावळ्याला मिळाला तर त्याला अति धन्यता वाटणारच. दर्शनाने धन्य झाला व समागमाने अति धन्य झाला म्हणून म्हणाला की धन्य मी, धन्य अति. 'विण हरि कृपें भेट नहिं संतां' (५।७।४) (ख) सर्वपरीं जरि हीन- 'शकुनाधम सबरीतिं आपावन' टीका पहा. (ग) संत समागम राम दे- 'मोहमिषे प्रभु तुम्हां धाडति। रघुपति देती मजला महती' (७।७१।४) यातील भावच येथे आहे. हरिकृपेशिवाय संतांची भेट होत नाही. श्रीरामचंद्रांनीच तुम्हाला माझ्याकडे पाठविले व अशारीतीने मला संतसमागमाचा परम दुर्लभ लाभ झाला. 'गिरिजे! संत समागम सम न लाभ जगिं आन'

हिं.दो. ।नाथ जथामति भाषेउँ राखेउँ नहिं कछु गोइ।।
।।चरितसिंधु रघुनायक थाह कि पावइ कोइ।।१२३म.।।

म.दो. ।नाथ! यथामति कथित मी काहींहि न गोपोनि।।
।।चरितसिंधु रघुनायक ठाव किं पावे कोणि।।१२३म.।।

अर्थ- हे नाथ! मी यथामति सर्व सांगितले, काहीं सुद्धा गुप्त ठेवले (गोपोनि) नाहीं. रघुनायकाचे चरित्र हा एक सागर आहे. त्याचा ठाव कोणी पावू शकेल का? (ठाव लागणे शक्य नाही.)।।१२३म.।।

टीका. (१) यथामति कथित- रघुनायकाचे संपूर्ण चरित्र कोणीही सांगू शकणार नाही. माझ्या बुद्धिशक्तीप्रमाणे मी सांगितले. मात्र सर्व काही सांगितले. (क) काहींहि न गोपोनि- गोपणे = गुप्त ठेवणे, लपवून ठेवणे. काही गोष्टी अशा असतात की त्या श्रोत्यांना सांगणे इष्ट नसते, पण मी तसे काहीही लपवून ठेवले नाही. माझे स्वतःचे अनुभव सुद्धा सांगितले. 'रामकृपाभाजन तुम्हिं ताता!। प्रीति हरिगुणी मज सुख दाता।। म्हणुनि तुम्हासिं न काहीं लपवतो। परम रहस्य मनोहर वदतो।।' (७।७४।३-४) असा जो उपक्रम केला होता त्याचा येथे उपसंहार केला आणि सुचविले की आणखी काही रहस्य सांगावयाचे राहिले नाही. मला जितके माहीत होते तितके सर्व तुम्हाला सांगितले. (ख) 'चरितसिंधु रघुनायक ठाव किं पावे कोणि' जसा कोणि

रघुनायकाचा ठाव पावू शकत नाही तसाच रघुनायकचरित्राचा ठाव कोणासही लागणे शक्य नाही. 'हरी अनंत हरिकथा अनंत.... सुंदर रामचंद्र चरितांना। कल्पकोटि पुरति न गाताना' (१।१४२।५-६) असे जे शंकर म्हणाले तेच येथे थोडक्यात सांगितले आहे.

हिं. *।सुमिरि राम के गुन गन नाना।पुनि पुनि हरष भुसुंडि सुजाना।।१।।*
।महिमा निगम नेति करि गाई।अतुलित बल प्रताप प्रभुताई।।२।।

म. *।स्मरुनि राम-गुणगणांस नाना।घडि घडि हर्ष भुशुंडि सुजाणा।।१।।*
।नेति नेति महिमा श्रुति वर्णित।प्रभुता प्रताप बलही अतुलित।।२।।

अर्थ- श्रीरामचंद्रांच्या अनेक गुणसमूहांचे स्मरण होऊन सुजाण भुशुंडीला वारंवार हर्ष झाला.।।१।। नेति नेति म्हणून वेद महिमा वर्णन करीत असतात आणि प्रभुता, प्रताप आणि बल (इ. सर्वच) अतुलनीय आहेत.।।२।।

टीका. चौ.१ (१) रामगुण गणास नाना- 'राम अनंत अनंत गुण...' 'महिमा नाम रूप गुण गाथा। सकल अनंत अमित रघुनाथा' अशा अनंत गुणांपैकी काही गुणांचे स्मरण रामसेवकांस प्रसंगानुसार सहज होते. कृपालुता, उदारता, भक्तवत्सलता, क्षमाशीलता इ.इ. भगवद्गुण साधकांच्या, भक्तांच्या स्मरणांत अनेक वेळा प्रसंगानुसार सहज येतात, कारण की त्या गुणांचा त्यांना अनेक वेळा अनुभव आलेला असतो असे स्मरण झाले म्हणजे 'पुलकित तनु लोचन सजल' अशी स्थिती आपोआप होते. तसेच येथे भुशुंडीच्या बाबतीत घडले. अनावर हर्ष हृदयांत झाला की तो अनुभावरुपाने बाहेर प्रगट होतो. गरुडाचे असेच झाले आहे. 'गरुडे हर्षे पंख फुलविले।। नयनिं नीर मन अती प्रहर्षित। हृदिं रघुपतीचा प्रताप आणित' (७।९३।२) 'हर्ष हृदयिं अति विशेष पावति। ....पुनःपुन्हां करुणाब्धि पुलकती' (१।५०।१-४) असे शंकरांचे झाले आहे. सार हे की जसजसे रामगुणांचे स्मरण होऊ लागले तसतसे भुशुंडीच्या अंगावर वारंवार रोमांच उठू लागले म्हणजेच त्याचे पंख फुलू लागले. हेच प्रेमभक्तीचे लक्षण आहे.

(२) सुजाण = शाहणा. 'श्रुणु वायस तूं सहज शहाणा। मागसि का न अशा वर दाना।। याचित भक्ति सकल सुखदानी। महाभाग तुज सम नहि कोणी' (७।८५।१-२) शाहणा, सुजाण, कोण याचे हे रहस्य प्रभूंनी सांगितले आहे. अष्टसिद्धि, ऋद्धिमोक्ष सकल सुखखाण व 'ज्ञान विवेक विरति विज्ञान' माग असे साक्षात प्रभूंनी सांगितल्यावर सुद्धा यातील काही न मागता अनपायिनी प्रेमभक्ति मागतो तोच शाहणा आणि असा शाहणा बाकी सर्व बाबतीत वेडा असला तरि प्रभूला प्राणप्रिय होतो.

चौ.२ (१) नेति नेति महिमा श्रुति वर्णित- रामचंद्रांच्या निर्गुण स्वरूपाचा महिमा कसा आहे हे वेदाना सुद्धा विधिमुखाने सांगता येत नाही, असा नाही, असा नाही अशा निषेधमुखानेच वर्णन करतात. आणि ज्याला इति = सीमा, अंत मर्यादा नाही असा श्रीरघुपतीचा महिमा = प्रभाव आहे असे वेद वर्णन करतात. 'नेति म्हणुनि महिमा श्रुति सांगत। जे त्रय काळिं एकरस राहत' (१।३४१।८) 'रघुपति महिमा अगुण अबाधित। अगाधता ती सुजला वानित' (१।३७।२) 'रघुपतीच्या अगुण स्वरूपाचा अबाधित महिमा' असा बालकांडात उल्लेख आहेच. हा चरण याप्रमाणे निर्गुणपर व सगुणपर लागतो. या चरणाने श्रीरघुपतीच्या प्रभावाला अंत, सीमा नाही असे सांगितले आणि पुढील चरणांत अनुपमता सुचविली आहे, म्हणून महिमा = प्रभुता असा अर्थ असला तरि द्विरुक्ति दोष नाही.

(२) प्रभुता प्रताप बल ही अतुलित. (क) प्रभुता ७।७४।१ पासून ७।९१।६ पर्यंत दाखविली आहे. (ख) प्रताप- 'ज्यांच्या यशा प्रतापा पुढती। शशि मलीन रवि शीतल गमती' (१।२९।२) 'रविशत कोटि प्रकाश' (७।९१रा.) (ग) बल अतुलित- 'अतुलबली नर केसरि उभयहि' (३।३७।१) उभय = रामलक्ष्मण. 'बधुनि अमित बल वाढे प्रीती' (४।७।१३) याचे सोदाहरण स्पष्टीकरण ५।२०।४ पासून ५।२१ पर्यंत पहावे.

हिं. ।सिव अज पूज्य चरन रघुराई।मो पर कृपा परम मृदुलाई।।३।।
।अस सुभाउ कहुँ सुनउँ न देखउँ।केहि खगेस रघुपति सम लेखउँ।।४।।

म. ।शिव अज पूज्यचरण जे रघुवर।कृपा परम मृदुलता किं मजवर।।३।।

।कुठें स्वभाव न हा श्रुत देखुं।कुणा खगेश रामसम लेखूं।।४।।

अर्थ- ज्या रघुनायकाचे चरण शिव आणि ब्रह्मदेव यांच्याकडून पूजिले जातात, त्यांची माझ्यावर परम कृपा झाली ही त्यांची परम कोमलता होय।।३।। अहो खगराज! असा स्वभाव कुठे कोणाचाही ऐकला नाही व दिसत नाही, मग मी कोणाला रघुपतिसमान लेखू (गणू, समजू)?।।४।।

टीका. चौ.३ (१) जे रघुवर चरण- चरण शब्दाने भ्रमण करणे पायी पर्यटन करणे सुचविले आहे. 'चरणोऽस्त्री....पदेऽपिच। भक्षणे भ्रमणे चापि नपुंसक उदाहृतः' (मेदिनी) ज्यांच्या शिवअजपूज्य कमल मृदुल पायानी भक्तांच्या हितासाठी वनावनांतून हिंडून थंडी, ऊन, वारा, कुश, कंटक इत्यादींचे दुःख सोसले. वेदानी स्तुतीत असेच म्हटले आहे. 'जे चरण शिव अज पूज्य, रज शुभ लागतां मुनिवधु तरे।.....ध्वज कुलिश अंकुश कंज युत वनिं फिरत कंटककिण वरी। पदकंज युगल मुकुंद राम रमेश भजतो अंतरी.' (७।१३।४) टी.पहावी. भक्तांच्या हितासाठी श्रीरघुनायक अपार दुःख कष्ट सोसतात हे सुचविले. कंटककिण = काटे लागून झालेल्या भोवऱ्या.

(२) शिव अज पूज्य- कोणी टीकाकार अर्थ करतात की एक चरण शंकर पूजतात आणि एक ब्रह्मदेव पूजतात. हा अर्थ इतका हास्यास्पद व पोरकटपणाचा आहे की त्याचे खंडण करण्याची आवश्यकता नाही हे पुढील मानस वचनांनी सहज कळेल. 'ब्रह्माशंभुफणींद्रसेव्यमनिशं' 'कोसलेन्द्र पदकंजमंजुलौ- कोमलावजमहेश वंदितौ। जानकी कर सरोज लालितौ.' या कांडाच्या मंगलाचरणातच म्हटले. 'पदपंकज सेवित संभु उमा' (हिंदी ६।१११।११) असे ब्रह्मदेवाने म्हटले आहे. जनक, अत्रि, शबरी, भरद्वाज, अगस्ति इ. सर्वांनी दोन्ही पायांचे प्रक्षालन केले. (क) भाव हा की शंकर, ब्रह्मदेव इत्यादि ज्यांच्या पायांची सेवा पूजा करतात ते पाय कोमल हृदयाचे असून मुनिजनांना सुख देण्यासाठी अनवाणी वनात हिंडले हे जरि आश्चर्य असले तरि (ख) मजवर कृपा परम- हे मात्र परम आश्चर्य आहे. मी 'शकुनाधम सबरीतिं अपावन' एक कावळा, अति हीन दीन असून माझ्यावर सुद्धा कृपा केली आणि थोडी थोडकी नाही केली, परम कृपा केली. हे परम मृदुल = कोमल हृदयांचे द्योतक आहे. त्यांच्यासारखे कोमल हृदयाचे तेच.

माझ्यावर जेवढी कृपा केली तेवढी कोणावरही कोणी केलेली नाही कारण की 'ज्ञानी भक्त शिरोमणी त्रिभुवनपतिचे यान' अशा आपल्या अति निकट निवासी नित्य सेवकाला, पक्षिराजा असून एका चांडाल पक्ष्याकडे पाठविला! आणि मला संत समागमाचा परम दुर्लभ लाभ दिला.

चौ.४ (१) असा स्वभाव- यापूर्वी वर्णन केला त्या प्रकारचा. दासांचे दोष, चुका शठता इत्यादींकडे न बघता आपल्या ब्रीदाकडे पाहून दासांवर कृपा करुन त्यास परम सुखी करुन, त्यांना मोठेपणा देऊन त्यांची कीर्ति वाढविणे, सेवकरुचि राखणे, सेवकास संकोच वाटणार नाही अशा गुप्त रितीने त्यांच्यावर कृपा करणे हा रघुपतीचा स्वभाव आहे. 'मानसांत श्रीराम स्वभाव' हे प्रकरण प्रस्तावनेत (पृ.५४०) पाहावे. असा स्वभाव इतर कोणाचा असल्याचे ऐकले नाही, असा कोणी माझ्या अनेक जन्मांत मला दिसला नाही व आजही दिसत नाही, म्हणून 'निरुपम न उपमा आन, राम चि राम सम वदति श्रुती' (७।९२छं) असे भुशुंडी म्हणाला. श्रीतुलसीदास उपसंहारात म्हणतात- 'सुंदर सुजाण कृपानिधान अनाथिं करतो प्रीति जो। तो एक राम अकामहित निर्वाणदायक नान्य तो।। ज्याच्या कृपालेशामुळे मतिमंद तुलसीदासही। पावे परम विश्राम तो प्रभु राम, सम कोठे नहीं' (७।१३०छं.३)

हिं. *।साधक सिद्ध बिमुक्त उदासी।कबि कोबिद कृतग्य संन्यासी।।५।।*
।जोगी सूर सुतापस ग्यानी।धर्मनिरत पंडित बिग्यानी।।६।।
।तरहिं न बिनु सेएँ मम स्वामी।राम नमामि नमामि नमामि।।७।।
।सरन गएँ मोसे अघरासी।होहिं सुद्ध नमामि अबिनासी।।८।।

म. *।साधक सिद्ध विमुक्त उदासी।कवि कोविद कृतज्ञ संन्यासी।।५।।*
।शूर सुतापस योगी ज्ञानी।धर्मरत पंडित विज्ञानी।।६।।
।तरति न सेवेविण मत्स्वामी।राम नमामि नमामि नमामि।।७।।
।शरण जात मजसे अघराशी।होती शुद्ध नमामि अविनाशी।।८।।

अर्थ- साधक, सिद्ध (सिद्धी प्राप्त झालेले) विमुक्त (जीवन्मुक्त) विरागी (उदासी),कवि, कोविद कृतज्ञ संन्यासी, शूर, उत्तमतपस्वी, योगी, ज्ञानी, धर्मशील, पंडित आणि विज्ञानी (इत्यादि कोणीही असोत)।।५-६। ते

माझ्या स्वामीची सेवा = भक्ति भजन न करतां तरणे शक्य नाही. हे राम मी तुला पुनःपुन्हा नमस्कार करतो. वारंवार नमन करतो.।।७।। ज्यांस शरण जातांच माझ्यासारख्रे पापांचे पर्वत पापांचे सागर शुद्ध होतात त्या अविनाशी रामचंद्रांस मी नमन करतो.

टीका. चौ.५-६ (१) साधक = सिद्धि मिळविण्याचा प्रयत्न, साधन, करणारे साधक, कारण पुढेच सिद्धांचा उल्लेख आहे. सिद्ध = योगाभ्यासाने किंवा इतर साधनांनी ज्यांना सिद्धि प्राप्त झालेल्या आहेत असे. जन्म, मणि, मंत्र, तप व समाधि यानी सिद्धि मिळू शकतात. (यो.सू.) सिद्धि ज्ञानमार्गातील मोठी विघ्ने आहेत हे ज्ञानदीपांत दाखविले आहे. साधक व हे सिद्ध विषयासक्तच असतात. (क) विमुक्त = येथे विमुक्त, ज्ञानी आणि विज्ञानी असा उल्लेख केला आहे. पार्वतीने ज्ञानी, जीवन्मुक्त व विज्ञानी असा तिघांचा उल्लेख (७।५४।३-५ टी.प.) केला आहे. म्हणून येथे विमुक्त = जीवन्मुक्त, ज्ञानी = सम्पक् ज्ञान प्राप्त झालेला, व विज्ञानी = ब्रह्मलीन दुर्लभ विज्ञानी असा अर्थ घेणे जरुर आहे. केवळ ज्ञानाने भवसागर तरुन जाणे अशक्य आहे हे पूर्वी भुशुंडीनेच दाखविले आहे. (ख) उदासी = 'विषयविमुख कुणि विरागीं रत तो' (५४।२) येथे गणलेल्या पंध्रा प्रकारांत विरक्तांचा स्पष्ट उल्लेख नाही. विषय त्याग करणारांचा उल्लेख 'संन्यासी' शब्दाने केला आहे, म्हणून येथे उदासी = अंतवैराग्य संपन्न विरागी अर्थ घेणे जरुर आहे.

(२) कवि कोविद- पुढे 'पंडित' शब्द आहे. कवि, कोविद, पंडित विद्वान हे शब्द कोषांत समानार्थक दिले आहेत तथापि त्यातील सूक्ष्म भेद येथे ग्रहण करणे जरुर आहे. कवि = काव्यकर्ता, भक्तीरसात्मक काव्य जरि लिहिले तरि तेवढ्याने तरतां येणार नाही. कोविद = व्यवहारदक्ष वा भाष्य टीका, व्याख्या, निबंध इत्यादि लेखनांत कुशल. पंडित = विविध शास्त्रांचे शब्दज्ञानसंपन्न. (क) कृतज्ञ = कृत = विहित असा दुसरा अर्थ येथे घेण्यासारखा आहे. कृतं जानाति = कृतज्ञ = विहितज्ञ. 'कृतं युगेऽलमर्थे स्यात् विहिते हिंसिते त्रिषु' (इति मेदिनी) कर्तव्य, कार्य जाणणारा. संन्यासी = सर्व कर्मांचा संन्यास करुन चतुर्थाश्रमाचा स्वीकार केलेला.

(३) शूर = युद्धांत शत्रूंशी लढणारा. सुतापस = चांगला तपस्वी. तपश्चर्या हे मुख्यतः वानप्रस्थाश्रमाचे मुख्य कर्तव्य आहे म्हणून येथे वानप्रस्थ समजणे योग्य आहे. 'वानप्रस्थाहि शोकाजोगा। त्यजुनि तपा ज्या आवड भोगां' (२।१७३।१) असा तपाच्या आश्यकतेचा संबंध वानप्रस्थाशीच दाखविला आहे. योगी = ज्ञानासाठी योगाचा अभ्यास करणारा, कारण 'योग दे ज्ञाना' (३।१६।१) (क) धर्मनिरत = धर्मशील. (७।५४।२ टी.पहा.) ज्ञानी सम्यकज्ञान संपन्न (७।५४।३ टी.प.) विज्ञानी ब्रह्मलीन.

चौ.७ (१) तरति न सेवेविण मत्स्वामी- साधकापासून विज्ञानी पर्यंत वर सांगितलेल्या पंध्रा प्रकारच्या लोकांनी किंवा इतर कोणी आपापले साध्य जरि उत्तम साधले तरी त्यांनी जर मत्स्वामी = माझे स्वामी जे रघुपति, त्यांची सेवा म्हणजे भक्ति प्राप्त केली नाही तर त्यांस भवसागरांतून तरुन जाता येणार नाही, कारण 'हरिमाया अति दुस्तर तरवे ना विहगेश' (७।११८) इतर कोणत्याही साधनांनी जे साध्य होत नाही ते रामभक्तीने सहज साध्य होते, पण ती हरिभक्ति, रघुपतिभक्ति मिळणे फार दुर्लभ आहे असे असून भुशुंडी कावळा असून त्याला ती मिळाली याचे कारण केवळ रामकृपा, म्हणून भुशुंडी (क) राम नमामि नमामि नमामि म्हणून पुनःपुन्हा श्रीरामाला, रघुपतीला नमन करु लागला. रामकृपेने आनंदसिंधुत नित्य निवास करण्यास सापडत आहे. प्रभूच्या निर्हेतुक कृपा ऋणांतून मुक्त होणे शक्य नसल्याने, प्रभुचे स्मरण करुन वारंवार नमन करणे एवढेच सेवकाच्या हाती आहे.

चौ.८ (१) शरण जात मजसे अघराशी होति शुद्ध- भाव हा आहे की माझ्या सारखे महापापी सुद्धा ज्या प्रभूला नुसते शरण गेले की शुद्ध होतात, पापमुक्त होऊन हृदय निर्मल होते त्या प्रभूला साधकसिद्धादि विविध पुण्यवान मनुष्य जर शरण जातील तर त्यांच्या श्रमांचे व नरदेहाचे सार्थक सहज होईल, त्यांना रघुपती प्रेम मिळण्यास वेळ लागणार नाही. भ.गीतेत भगवान हेच सांगतात. 'मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपिः स्युः पापयोनयः। स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपियान्ति परांगतिं।।३२।। किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा। अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्।।३३।। (भ.गी.९)' (क) नमामि अविनाशी- राम रघुपति अविनाशी आहेत. अविनाशी भक्ति ते देऊ शकतात.

'नामसंकीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनं। प्रणामो दुःखशमनः तं नमामि हरिं परम्' (भाग.) भगवंताला केलेला प्रणाम दुःखाचे शमन करणारा असतो. 'पतितः स्खलितश्चार्तः क्षुत्वा वा विवशो ब्रुवन्। हरये नम इत्युच्चैर्मुच्यते सर्वपातकात्'(भाग.)

हिं.दो. ।जासु नाम भव भेषज हरन घोर त्रय सूल।।
।।सो कृपाल मोहि तो पर सदा रहहु अनुकूल।।१२४रा.।।

म.दो. ।यस्यनाम भवभेषज घोर हरी त्रय शूल।।
।।तो कृपाल मज तुजवरी असो सदा अनुकूल।।१२४रा.।।

अर्थ- ज्याचे नाम (च) भवरोगाचे औषध आहे व जे महा घोर तिन्हीशूलांचा नाश करते तो कृपालु (प्रभु) सदा माझ्यावर व तुझ्यावर प्रसन्न असो.।।

टीका. (१) यस्य नाम भवभेषज- यस्य = ज्याचे, भेषज = औषध, 'संसारामय भेषजं सुखकरं श्रीरामनामामृतम्' (कि.मं.श्लो.२) 'नाम घेत सुकती भवसागर' (१।२५।४). रामकथारूपी संजीवनी मुळी सेवन करणाराला पथ्य व अनुपाम लागते पण रामनाम अमृत असल्यामुळे त्याला पथ्य व अनुपान यांची आवश्यकता नाही हे सुचविले. (क) घोर हरी त्रय शूल- आधिभौतिक, आध्यात्मिक व आधिदैविक ताप हे तीन शूल आहेत. पण काम, क्रोध आणि लोभ हे महा घोर तीन शूल आहेत व हे तीन म्हणजे नरकाचे द्वार आहेत. त्रिताप व कामक्रोधलोभरुपी तीन घोर शूल इत्यादींचा नाश श्रीरामनामरूपी औषध करते. असा ज्यांच्या नामाचा प्रभाव आहे (ख) तो कृपालु- ते कृपासिंधु रघुनायक माझ्यावर व तुझ्यावर सदा प्रसन्न (अनुकूल) असोत. गरुडाला फार मोठा आशीर्वाद मिळाला. भाव हा की तुमच्या हृदयांत मोह उत्पन्न करण्याची प्रेरणा राम आपल्या विद्या मायेला पुन्हा न देवोत, आणि मला मोठेपणा व कीर्ति मिळाली याचा अभिमान माझ्या हृदयांत उत्पन्न होणार नाही अशी कृपा माझ्यावर करोत.

येथे श्रीरामचरित मानसांतील् भुशुंडीचे शेवटचे भाषण समाप्त झाले. आता गरुड आपल्या सद्गुरुंची स्तुती करुन कृतार्थता व कृतज्ञता प्रगट करुन

परत जाईल.

हिं.दो. ।सुनि भुसुंडि के बचन सुभ देखि राम पद नेह।।
।।बोलेउ प्रेम सहित गिरा गरुड बिगत संदेह।।१२४म.।।

म.दो. ।श्रवुनि भुशुंडी वचन शुभ प्रभुपदिं बघुनि स्नेह।।
।।प्रेमसहित वदला गिरा गरुड विगत संदेह।।१२४म.।।

अर्थ- भुशुंडीचे शुभ वचन ऐकून व श्रीरामप्रभूच्याचरणीं त्याचा स्नेह पाहून, अगदीं संदेहमुक्त झालेला गरुड प्रेमाने भाषण करु लागला.।।दो.१२४म.।।

टीका. (१) श्रवुनि भुशुंडीवचन- 'तात! ऐक सादर सप्रीती' (१२१।८) पासून 'तुजवरी असो सदा अनुकूल' (१२४रा.) पर्यंतचे सर्व भाषण ऐकून. (क) शुभकल्याणं मंगलं शुभम् (अमरे) त्या भाषणाने गरुडाचे कल्याण झाले त्याचे सर्व संदेह नष्ट झाले त्याला दृढ रामभक्ति मिळाली, आणि शेवटी शुभ आशीर्वाद मिळाला म्हणून वचन शुभ. (ख) प्रभुपदिं बघुनि स्नेह- 'घडि घडि हर्ष भुशुंडी सुजाणा' (१२४।१ टी.प.) आपली स्वतःची हीनता, भगवंताची परम कृपालुता व कोमलता, प्रभाव इत्यादींचे जे वर्णन केले त्यात कायिक वाचिक मानसिक स्नेह पूर्णपणे भरलेला गरुडाला दिसला कळला. (ग) विगत संदेह- संदेह = संशय. 'प्रभो! प्रसादे तव हृदयीं मम। संशय शोक न मोह नसे भ्रम' (११५।६) असे भुशुंडीविषयीं विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर ऐकल्यावर गरुड म्हणाला, पण 'ज्ञानभक्ति यामधिं किती अंतर' असे विचारण्या इतका संशय मनांत आला होता तो, व ज्या संशयामुळे सप्त प्रश्न विचारण्याची इच्छा झाली ते सर्व संशय सुद्धा आता राहिले नाहीत. आता पूर्ण संशयरहित झाला. आणि भुशुंडीच्या कृपेचे, प्रभावाचे, त्याच्या अलौकिक लीनतेचे वगैरे स्मरण होताच प्रेमाने बोलण्यास प्रारंभ केला.

हिं. ।मैं कृतकृत्य भयउँ तव बानी।सुनि रघुबीर भगति रस सानी।।१।।
।राम चरन नूतन रति भई।माया जनित बिपति सब गई।।२।।

म. ।मज कृतकृत्य करी तव भाषण।जें रघुवीर भक्ति रस मिश्रण।।१।।

।रामचरणिं नव रति उपजली।माया जनित विपद नासली।।२।।

अर्थ- श्रीरघुवीराच्या भक्तिरुपी रसाचे मिश्रण असे जे तुमचे भाषण त्याने मला कृतकृत्य केला. (मी कृतकृत्य झालो).।।१।। श्रीरामचरणी नवीन दृढप्रीति (= रति) उद्भवली व मायेपासून उत्पन्न झालेली विपत्ति नष्ट झाली.।।२।।

टीका. चौ.१ (१) रघुवीर भक्तिरस मिश्रण- भुशुंडीच्या भाषणांत भक्तिरस सर्वत्र थबथबत आहे हे कोणीही सहृदय वाचक जाणू शकेल. उदा. मानसरोगांच्या वर्णनात दहा चौपाया व दोन दोहे खर्ची पडले व त्यात भक्तीचा संबंध कुठे आणता आला नाही म्हणून मानस रोग बरे कसे होतील हे सांगताना १४ चौपाया दोन दोहे व एक श्लोक यात भक्तीचेच वर्णन केले असेच प्रत्येक प्रकरणांत झाले आहे. मानसरोग वर्णनात जो भक्तीचा जोराचा प्रवाह सुरु झाला तो पुढेही चालूच राहिला. (क) भक्तिरस- भक्ति हा अनिर्वचनीय अनुपम असा दहावा रस आहे. 'शम दम नियमचि फुले ज्ञान फल। हरिपद रति रस वेद वदे कल' (१।३७।१४ टी.पहा.) (ख) कृतकृत्य करी- देह धारण करुन जे मुख्य कर्तव्य करावयाचे ते केले गेले. कृतकृत्य झाला म्हणजे काय झाले हे पुढल्या चौपाईत सांगतात. (ग) रघुवीर शब्दाने मुख्यतः कृपावीरता सुचविली आहे. 'अतां गमे तो भ्रम मज हितकर। करिती अनुग्रहास कृपाकर' (६९।२) आणि 'रामकृपें तव दर्शन घडले। अनुग्रहे तव संशय उडले' (६९।८) असे जे पूर्वी म्हणाला तेच येथे रघुवीर शब्दाने सुचविले. रामभक्ति मिळाल्याशिवाय कोणी कृतकृत्य होत नाही म्हणून सांगतो.

चौ.२ (१) रामचरणिं नव रति उपजली- सगळे रामचरितमानस श्रवण केल्यावर पूर्वी गरुड म्हणाला की 'गेला मम संदेह श्रुत सगळें रघुपतिचरित रामपदाब्जीं स्नेह तवचि कृपें वायस तिलक' (७।६८रा.) त्या वेळीच रामचरणीं स्नेह उत्पन्न झाला होता व तो भुशुंडीच्या कृपेनेच झाला होता. पण तो दृढ नव्हता, म्हणून येथे म्हटले की 'नव रति उपजली' रति = दृढ, अनुराग, दृढप्रिती, प्रेम = दृढ प्रेमभक्ती. नव = सदा सर्वदा नवी नवीच राहणारी, कधी कमी न होणारी पूर्वी जरि स्नेह उपजला होता तरि ज्ञानाचे महत्त्व भक्तीपेक्षा अधिक वाटत होते, म्हणून पुढे ज्ञानभक्ती यामधि किती अंतर असे विचारले.

भुशुंडी मोहकथाश्रवण केल्याने रामप्रभावाचे व रामस्वभावाचे विशेष ज्ञान झाले व मर्म समजले. पुढील रामरहस्य प्रकरण, ज्ञानदीप व भक्तिचिंतामणि प्रकरणे श्रवण केल्यावर खात्री झाली की ज्ञानापेक्षा भक्ती श्रेष्ठ आहे आणि 'तो कृपाल तुजवरी सदा असो अनुकूल' असा रामप्राणप्रिय संताचा आशीर्वाद मिळतांच संतकृपासाध्य अविरल अनपायिनी प्रेमभक्ति मिळाली. 'भक्ति तात! अनुपम सुखमूल हि। मिळते संत यदा अनुकूल हि' (३।१६।४) आणि 'भक्ति स्वतंत्र सब सुखदानी। विण सत्संग न पावे प्राणी' (७।४५।५) या श्रीरामवचनांची प्रतीती गरुडाला आली. आणि संतसंग भगवंताच्या कृपेनेच मिळतो हे जाणून रघुवीराच्या सारखा कोणी कृपालु नाही याविषयी खात्री झाली. आणि गरुडाचे हृदय भरुन आले. त्याची वाणी सद्‌गदित झाली. हे या चौपाईतील प्रत्येक चरणांत १।१ मात्रा कमी ठेऊन त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या गतिभंगाने सुचविले आहे.

(२) माया जनित बिपद नासली- 'जी ज्ञानी चित्ता अपहरते। बलात्कारिं मनिं विमोह करते।।' अशी जी प्रबल रामाची माया. 'जी नाचवि बहु वेळा मजला व्यापी तीच विहगपति तुजला' (७।५९।४-६) असे नारद गरुडास म्हणाले. म्हणून ही माया = हरिप्रेरित विद्यामाया होय. 'व्यापि न हरिसेवका अविद्या। व्यापी प्रभूंनी प्रेरित विद्या' (७।७९।२) (क) मायाजनित विपत्ति- 'उपजे हृदीं प्रचंड विषाद।। विविध विधा समजावि मनासी। ज्ञान नव्हे भ्रम हृदया ग्रासी।। खेद खिन्न मनिं तर्क वाढवी। जाई व्याकुळ सुरर्षिपासी' (७।५८।५ - ७।५९।३ पहा) 'संशय सर्प तात! मज डसला। दुःखद लहरि कुतर्क वाढला' (७।९३।६) हे जे प्रदीर्घकाळ घडले त्याच मायाजनित सर्व विपत्ति. 'गरुड महाज्ञानी गुणराशी। हरिसेवक अति निकट निवासी' वैकुंठात राहणारा असून हरिमायेने मोहित केल्यामुळे त्याच्या मनाची शांती, आनंद, प्रसन्नता नष्ट होऊन निरंतर संशयजनित कुतर्कांनी त्याला अगदीं व्याकुळ केला होता, आणि ही दुर्दशा एक संपूर्ण युग जाईपर्यंत राहिली. नाइलाज झाला तेव्हा हरिप्रेरणेनेच तो नारदाकडे गेला, ब्रह्मदेवाकडे गेला वगैरे सुरु झाले. ते दुःख आता पार लयाला गेले. (ख) भुशुंडीच्या कृपेने आणखी काय झाले ते गद्‌गदवाणीनेच आता सांगतो.

हिं. ।मोह जलधि बोहित तुम्ह भए।मो कहँ नाथ विविध सुख दए।।३।।

।मो पहिं होइ न प्रति उपकारा ।बैदउँ तव पद बारहिं बारा।।४।।

म. *।मोहजलधिं जहाज जाहलां ।दिधलें नाथ! विविध सुख मला।।३।।*
।मज करवे ना प्रत्युपकारां ।पाया पडतो वारंवारां।।४।।

अर्थ- अहो नाथ! मला मोहसागरांतून तारुन नेण्यास तुम्हीं जहाज झालात आणि मला विविध प्रकारचे सुख दिलेत.।।३।। मला तुमच्या उपकारांची फेड करतां येणे शक्य नाही. मी वारंवार तुमच्या पाया पडतो.।।४।।

टीका. 'मोह जलधिं जहाज जाहलां' 'नर तनु भववारिधींत तारुं। सद्गुरु कर्णधार दृढ नावे' (७।४४।७-८) मनुष्य देह- साधकाचा देह हे जहाज व सद्गुरु कर्णधार असा बहुधा संबंध असतो म्हणजे त्या साधक जहाजालाच भवसागरांतून लाटांचे धक्के खावे, लागतात. सागरांतील नक्रादि जलचरांची भीति त्यालाच असते, सद्गुरु फक्त 'सम्मुख मरुत कृपा मम चारु' राम कृपा रूपी वारा कसा वहात आहे हे पाहून विशिष्ट दिशेने व विशिष्ट मार्गाने त्या साधक जहाजाला वळवितात. सार हे की साधनांचे कष्ट शिष्यालाच करावे लागतात, सद्गुरु फक्त साधनाची दिशा व मार्ग दाखवितात आणि म्हणूनच वेदान्त ग्रंथात सद्गुरुला देशिक म्हणतात. येथे मात्र तसे झाले नाही. भुशुंडीच जहाज बनला व भुशुंडीच कर्णधार बनला. भाव हा की श्रवण करण्यापलिकडे गरुडाला कोणतेच साधन करावे लागले नाही, काहीसुद्धा श्रम करावे लागले नाहीत, सागराच्या जलाचा स्पर्श सुद्धा झाला नाही. आणि प्रेमभक्ति अनपायिनी प्राप्त झाली. अधिकारी रामप्रेमी सद्गुरुच्या संगतीत राहून दीर्घकाळ श्रीरामचरितमानस श्रवण केल्याचे फळ कसे सहज मिळते हे दाखविले. म्हणूनच पुढे महेश सांगतात की 'मुनि दुर्लभ हरि भक्ति नर पावति विना प्रयास।। जे ही कथा निरंतर ऐकति युत विश्वास' (७।१२६)

(२) दिधले नाथ विविध सुख मला- योग ज्ञान विज्ञान वगैरे सुखाची साधने आहेत परंतु ते सुख त्यातून मिळवावे लागते कारण, 'मोक्ष सकल सुखखाण' (७।८३) आहे आणि शिवाय ते सुख केव्हा नष्ट होईल याचाही नेम नाही. (७।११९।६) 'ती ममभक्ति भक्त सुखदाई' (३।१६।२) आहे ती ज्याने दिली त्यानेच सकल सुखे दिली असे ओघानेच ठरले. ब्रह्मसुखापेक्षा भक्तिसुख

श्रेष्ठ आहे हे पूर्वी अनेक वेळा दाखविले आहे. (७।४२ दो.पहा). ब्रह्मानंदापेक्षा भक्तीने मिळणारा परमानंद अधिक श्रेष्ठ आहे. ब्रह्मानंदात ब्रह्मसुखांत जसे इतर सर्व सुख अंतर्भूत होते त्याप्रमाणे प्रेमभक्तिसुखांत ब्रह्मसुखासहित सर्व सुखांचा समावेश होतो. भक्तिसुख मिळाल्यावर इतर कोणतेहि सुख मिळावयाचे किंवा मिळवावयाचे रहात नाही, तसेच गरुडास विविध प्रकारचे सर्व सुख मिळाले.

चौ.४ (१) मज करवेना प्रत्युपकारा- 'दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः' (शतश्लोकी) असे श्रीमदाचार्य म्हणतात. ज्ञान देणाऱ्या सद्गुरु सारखा कोणी दाता जगांत नाही. प्रति उपकार करणे म्हणजे कोणी केलेल्या उपकारांची सव्याजपरत फेड करणे, उपकारकर्त्यास त्याने केलेल्या उपकाराच्या तोडीचे किंवा अधिक किंमतीचे काहीतरि देणे. प्रत्युपकार करणे हा सज्जनांचा धर्म आहे. तसे न करणे हा कृतघ्नपणा ठरतो. परंतु ज्ञानदात्या सद्गुरुंनी केलेल्या उपकारांची फेड करण्यासाठी देण्यासारखे जगात काही सुद्धा नाही. मग ज्ञानदात्यांपेक्षा प्रेमभक्ति देणाराचे उपकार अनंतपटींनी मोठे असले तरि त्याची फेड कोणी कशानेच करू शकणार नाही. मी पक्षिराज, हरियान असलो तरि तुमच्या उपकारांची फेड करण्यास असमर्थ आहे. भाव हा की मी सदैव आपला ऋणीच राहणार! माझ्या हाती एकच गोष्ट करण्यासारखी आहे. (क) पाया पडतो वारंवारा. पुनःपुन्हा आपल्या पायांवर डोके ठेऊन नमन करतो व क्षमा मागून विनंती करतो तेवढी ऐकावी. (ख) अशीच भावना मनात धरून वारंवार वंदन केल्याची अनेक उदाहरणे मानसांत यापूर्वी टीकेत स्पष्ट दाखविली आहेत. उदा. १।११९, ३।१०, ३।३६।१३पहा. आतां भुशुंडीची थोडी स्तुती करुन गरुड एक विनंती करील.

हिं. ।पूरन काम राम अनुरागी।तुम्ह सम तात न कोउ बडभागी।।५।।
।संत बिटप सरिता गिरि धरनी।पर हित हेतु सबन्ह कैं करनी।।६।।

म. ।पूरित काम राम अनुरागी।कुणि न तुम्हासम तात सुभागी।।५।
।संत विटप सरिता गिरि धरणी।सर्वांची परहितार्थ करणी।।६।।

अर्थ- हे तात! तुम्हीं पूर्णकाम (= पूरितकाम) असून तुमच्या सारखा रामावर प्रेम

करणारा कोणी नाही आणि तुमच्यासारखा महा भाग्यवान कोणी नाही.।।५।। संत विटप (वृक्ष) सरिता, पर्वत आणि धरणी या सर्वांची करणी (कृति, कर्म) दुसऱ्यांच्या हितासाठीच असते.।।६।।

टीका. चौ.५ (१) पूरितकाम = पूर्णकाम. पूर्ण झालेले आहेत काम = कामना, इच्छा ज्याच्या तो पूर्ण काम = पूरित काम. ज्याला मोक्षाची किंवा कशाचीही कामना राहिलेली नाही तो. जटायु सुद्धा पूर्णकाम व रामानुरागी होता. मायानिर्मित पदार्थ अनंत आहेत म्हणून विषयकामना कोणाच्याही परिपूर्ण होणे शक्य नाही. म्हणून पूर्ण इच्छा रहित होणे म्हणजेच पूर्ण काम होणे. 'रमाविलास राम अनुरागी त्यजिति वमन सम जन बहुभागी' (२।३२४।८) (क) पूरितकाम राम अनुरागी- = राम अनुरागी. जे पूरितकाम असतील तेच रामप्रेमी होऊ शकतील. ज्यांचे विषयांवर थोडेही प्रेम असेल किंवा ज्यांना काही कामना असेल ते रामप्रेमी होणेच शक्य नाही. मोक्षाची कामना असणारा सुद्धा खरा रामप्रेमी नव्हे.

(२) कुणि न तुम्हासम तात सुभागी- सुभागी = महाभाग्यवान. खरोखरच भुशुंडी सारखा भाग्यवान प्राणी दुसरा नाहीच. कावळा असून काळाची सत्ता त्याच्यावर चालत नाही. प्रत्येक कल्पांत रामावताराचे वेळी अयोध्येत बाललीला पाहणारा दुसरा कोणी जीव नाहीच. मठ, आश्रम, वस्त्र, पात्र इ. कशाचीच आवश्यकता नाही. ज्याच्याकडे गरुडाने श्रवणास जाऊन कृतार्थ व्हावे असा कोण आहे?

चौ.६ (१) संत विटप..... करणी- वृक्षादि स्थावर जडांच्या पंक्तींत संतांना का बसविले असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. याने हे सुचविले आहे की धरणी गिरि सरिता आणि वृक्ष या सर्वांचे ठिकाणी जे जे सद्गुण आहेत ते सर्व संतांच्या ठिकाणी आहेत त्या चौघांत असलेले दोष मात्र संतांच्या ठिकाणी नाहीत आणि वृक्षादि चौघांच्या ठिकाणी नसलेले लोककल्याणकारी अनेक गुण संतांत असतात. (क) या पाचांपैकी प्रत्येकाचे अस्तित्व परहितासाठीच आहे हे साम्य आहे, परंतु प्रत्येकांत काही वैशिष्ट्य आहे. धरणी सर्वास धारण करणारी क्षमेची प्रत्यक्षमूर्तीच आहे पण गिरीच्या ठिकाणी असणारे गांभीर्य मनोहरता

इत्यादि अनेक गुण धरणींत नाहींत. सरितांचे उगमस्थान गिरि आहेत पण सरितांच्या ठिकाणी असणारी तृषाहरणशक्ती पर्वतांत नाही. मलहरण करण्याची शक्ति वृक्ष गिरि व धरणी यांच्यात नाही. विटपांच्या ठिकाणी असणारी क्षुधाशमन, आतपदुःख निवारण करणारी शक्ति सरितादि तिघांच्या ठिकाणी नाही. संत जंगम असल्यामुळे भिन्न भिन्न स्थानांतील अनेक जीवांवर ते उपकार करु शकतात. तसे बाकीच्या चौघांचे नाही. भवरोगहारक संजीवनी मूळी संतांच्याजवळ असते, भवदुःख निवारण करणारी शक्ति बाकीच्या चौघांत नाही. विटप सरिता गिरि धरणी पुष्कळ वेळा प्राण्यांचा विनाशही करतात, पण संतांकडून तसे कधी घडत नाही. (ख) हा एका मोठ्या लेखाचा विषय आहे म्हणून येथे नुसते दिग्दर्शन केले आहे. या काण्डाच्या टीकेनंतर परिशिष्टात स्वतंत्र लेख दिला आहे. मानसमणि मे १९५५ च्या अंकात हिंदीत प्रकाशित झाला आहे. (ग) सर्वांची परहितार्थ करणी = या सर्वांची निर्मितीच परहितासाठी केली गेली आहे. यांची सर्व संपत्ती, सर्व सद्‌गुण परहित साधनाचेच कार्य करीत असतात, व त्यांना स्वतःचा कोणताच स्वार्थ नसतो. आता संतांच्या कोमल हृदयाचे वर्णन करतात.

हिं. *।संत हृदय नवनीत समाना।कहा कबिन्ह परि कहै न जाना।।७।।*
।निज परिताप द्रवइ नवनीता।पर दुख द्रवहिं संत सुपुनीता।।८।।

म. *।संत हृदय लोण्यासम वदले।जे कवि त्यांना मर्म न कळले।।७।।*
।निज परितापें द्रव नवनीता।द्रव परदुःखिं सुपावन संतां।।८।।

अर्थ- संतांचे हृदय लोण्यासारखे असते असे जे कवि म्हणाले त्यांना मर्म कळलेच नाही.।।७।। लोणी स्वतःच्याच परितापाने (ऊष्णता, ताप लागल्याने) द्रवते, (विरघळते, वितळते) पण अति पवित्र संत दुसऱ्यांच्या दुःखाने द्रवतात.।।८।।

टीका. चौ.७ (१) संत हृदय- भाव हा की विटप सरिता गिरि धरणी जड हृदय शून्य आहेत. स्वतःच्या किंवा दुसऱ्यांच्या दुःखाचे ज्ञान त्यांना होत असले तरि ते अगदीच कमी. एखाद्या उंच फांदीला सुंदर मधुर पिकलेली फळे लागलेली असली व लहान मुलगा तेथे आला व भूक लागून रडू लागला तर तो

वृक्ष आपली फांदी त्या मुलाच्यासाठी खाली त्याच्या हाताजवळ आणणार नाही. संत आपल्या पुढे वाढून घेतलेले ताट उचलून त्याच्यापुढे ठेवतील, त्याला भरवतीलसुद्धा. विटपादि जे परोपकार परहित करतात ते हृदयाच्या कोमलतेमुळे करीत नाहीत. पण संत जे परहित करतात ते त्यांच्या दयार्द्र हृदयामुळे करतात. (क) लोण्यासम- लोण्यासारखे मऊ, मृदु, कोमल. मृदुता हा धर्म संत आणि लोणी यांच्यात आहे किती प्रमाणात आणि कशा प्रकारचा हा विचार निराळा. 'श्रुणु मुनि साधुंचे (संतांचे) गुण जितके। वदुं न शकति वाणी श्रुति तितके' (३।४६।८) असे भगवान म्हणाले असतां एका उपमेने संतांच्या हृदयाचे वर्णन कसे करता येणार? जो एक गुण लोण्याच्या उपमेने कवींनी वर्णन केला आहे तो सुद्धा यथार्थरीत्या वर्णिला नाही, कारण की दोघांच्या कोमलतेतील भेदाचे मर्मच त्यांना कळले नाही.

चौ.८ (१) निज परितापे द्रव नवनीता- लोण्याला (= नवनीताला) स्वतःस ताप, ऊष्णता लागेल तेव्हाच ते द्रवते वितळते. पापडाला भाजला, लोण्याच्या देखत आणि त्याच्य अंगाला मोठमोठे फोड आलेले जवळ असलेल्या लोण्याने पाहिले तरि त्याला लेशमात्र द्रव फुटणार नाही, असे का आहे संतांचे हृदय? लोणी फक्त स्वतःच्या दुःखानेच दुःखी होते. अशा हृदयाचे सर्वच लोक असतात. स्वतःच्या दुःखाने मुळीच दुःखी न होणारा जीव जगांत फारच विरळा. संतच फक्त असे असतात. मग लोण्याची उपमा ज्यांनी संतांच्या हृदयांला दिली त्यांनी विचारच केला नाही. असे नाही का ठरत? संत लोण्यासारखे स्वार्थी का असतात? (क) द्रव परदुःखिं संतां- दुसऱ्यांचे दुःख पाहून ऐकून संत दुःखी होतात. 'मऊ लोण्याहूनि आम्हीं विष्णुदास। कठिण वज्रास भेदू शको' हे म्हणणे यथार्थ आहे. म्हणून संतांच्या हृदयाला लोण्यासारखे म्हणणे म्हणजे संतानां सर्व साधारण स्वार्थी, विषयी लोकांच्य सारखे ठरविणे आहे. स्वार्थी कोमल हृदय व केवल परोपकारी, परहितकारी कोमल हृदय यांची बरोबरी करणे, दाखविणे हा अविवेक आहे. (ख) सुपावन- लोणी शुभ्र, स्वच्छ, निर्मल दिसले तरि त्यात पुष्कळ मळ असतोच. जुने झाले म्हणजे घाण येते नासते. पण संतांच्या हृदयांत मळ जरासुद्धा नसतो. त्यातील ममतारूपी मळ व इतर सर्व मळ जळून गेलेले असतात. 'ममता मलहि जळून' भाव हा की इतर कोणी उपकार केले तरि ते ममतेला बळी पडून करतात, पण

संत निर्मल असून परोपकार परहित करतात. संत दुसऱ्यांच्या हृदयांनाही पावन करतात म्हणून ते सुपावन = अति पावित्र. 'संत हृदयसम निर्मल वारी' पंपासरोवराचे होते. वारि = मल, तृषा इ. हरण करणारे पाणी (अ.व्या.सु) लोण्यातच मल असल्याने ते इतरांना कसे पावन करील? सार हे की संतांच्या हृदयाची कोमलता निरुपम आहे. गरुडाचे दुःख पाहून भुशुंडीला दुःख झाले त्याला दया आली. 'येइ दया कोमल मन संतां' म्हणून त्याने कृपा करुन गरुडाला सर्व सुखदायिनी भक्ति दिली, म्हणून गरुडाने असे वर्णन केले.

हिं. *।जीवन जन्म सुफल मम भयऊ।तव प्रसाद संसय सब गयऊ।।९।।*
।जानेहु सदा मोहि निज किंकर।पुनि पुनि उमा कहइ बिहंगबर।।१०।।

म. *।माझे जीवन जन्म हि सुफलित।तव प्रसादे संशय सब गत।।९।।*
।समजा सदा मजसि निज किंकर।घडि घडि उमे वदे विहंगवर।।१०।।

अर्थ- तुमच्या कृपा प्रसादाने माझे सर्व संशय नष्ट झाले आणि माझा जन्म, व माझे जीवन सफल झाले.।।९।। आता मला आपण आपला नित्य किंकर (दास गुलाम) समजा (एवढीच विनंति आहे). उमे! खगश्रेष्ठ गरुड असे पुनःपुन्हां म्हणाला.।।१०।।

टीका. चौ.९ (१) जीवन जन्महि सुफलित- जीवन = जन्मास आल्यानंतर जगणे. जन्म = जन्मणे. 'पुत्रवती युवती जगिं तीच किं। रघुपति भक्त जिचा सुत होत किं।। न तरि वांझ बरि विते वृथा ते। रामविमुख सुत मानि हितातें।।२।७५।१-२).' 'साधु समाजिं न ज्याची गणना। स्थान रामभक्तांस ज्यास ना। वृथा जगे जगिं तो भूभारु। जननी यौवन-विटप कुठारु' (२।१९०।७-८) 'हृदयिं हरिभक्ति न आणिति जीत शवासम गणा प्राणिते'।। (१।११३।५) सार हे कीं जो हरिभक्त होत नाहीं त्याने जन्मास येणें म्हणजे जननीच्या तारुण्यावर घाला घालण्यासारखे आहे. भक्तिहीन मानवाने जिवंत राहणें म्हणजे मढे शिल्लक राहण्यासारखे आहे. 'भक्तिहीन पशु कशासि जन्मला । सटवीनें नेला कैसा नाहीं ।।' (एकनाथ) ७/७८२।, ५/५०/१ पहा. कवितावली उत्तरकांड पद ४०व ४१ मुद्दाम पहावे.ज्याने रामभक्ति संपादन केली त्याचे ज़न्मास येणें व जीवित सुफल होत. गरूड म्हणतो कीं तुम्हीं कृपा केलीत म्हणून

माझा जन्म आणि जीवित सुफल झाली. नाही तर मी हरिवाहन, हरिनिकटनिवासी, वैकुंठ-निवासी असून जन्मास येणें व जगणें व्यर्थ ठरले असते. (क) संशय सब गत-'गरूड विगत संदेह'(१२४ म) ही पाहावी. आपल्या या उपकारांच्या ऋणातून सुटणें शक्य नाही. पण एवढीच विनंति आहे की मला पक्षिराज, हरिवाहन इत्यादि माननीय न समजता एवढेच करावे की-

चौ.१० (१) समजा सदा मजासि निज किंकर- निज=नित्य 'स्वके नित्ये निजं त्रिषु'(अमरे). आपला एक प्रिय नित्य दास जाणावा. आपला एक नित्य गुलाम या दृष्टिनेच माझ्याकडे पाहावे व या नात्यानेंच माझ्यावर कृपादृष्टि ठेवावी. 'नाथ मला निज सेवक जाणुनि' (७।१२१।२). असे नित्य सेवकत्व स्वीकारले होते; पण उपकारांची फेड करता येत नसल्याने निरंतरचे दास्य स्वीकारले. सेवक व दास यांतील फरक पूर्वी टीकेत दाखविला आहे. दास=गुलाम. ल.ठे. येथें दाखविले की- सद्‌गुरूच्या ऋणांतून मुक्त होणें अशक्य असल्याने व्यवहारांत - जगांत शिष्य कितीही मोठा असला तरी त्याने सद्‌गुरूशी निरंतर दास्य भावानेच वागले पाहिजे. शिष्याने स्वतःस गुरूदासच मानणें जरूर आहे, अन्यथा त्याच्यासारखा कृतघ्न जगात नाही.

हिं. दो. ।तासु चरन सिरु नाइ करि प्रेम सहित मतिधीर ।।
।। गयउ गरूड बैकुंठ तब हृदयें राखि रघुबीर ।।१२५ रा ।।
। गिरिजा संत समागम सम न लाभ कछु आन ।।
।। बिनु हरि कृपा न होइ सो गावहि बेद पुरान ।।१२५ म।।

म.दो. ।त्याचे पदि शिर नमवुनी प्रेमाने मतिधीर ।।
।।वैकुंठा गेला गरूड हृदयि धरूनि रघुवीर।।१२५ रा।।
।गिरिजे ! संत समागम सम न लाभ जगिं आन।।
।तो न मिळे हरिकृपे बिण गाती वेद पुराण ।।१२५ म।।

अर्थ- त्याच्या (काकाच्या) चरणांवर प्रेमाने मस्तक नमवून धीरमति गरूड - रघुवीरास हृदयात धारण करून वैकुंठास गेला. ।। दो.१२५ रा ।। (शंकर सांगतात) गिरिजे या जगात संतसमागमा सारखा दुसरा लाभ नाही; पण तो हरिकृपेवाचून मिळत नाही, असे वेदपुराणे वर्णन करतात. ।।१२५ म ।।

टीका. दो. रा. (१) त्याचे पदि शिर नमवुनी- भुशुंडीच्या पायावर विनयाने डोके ठेवून गरूडाने प्रेमाने वंदन केले. प्रेमाने= भाव हा कीं नमन करताना अंगावर रोमांच उठले व डोळ्यात पाणी आले. मति धरि = धीरमति -त्याचे हृदय सद्‌गुरूप्रेम व गुरूविरहव्यथा यांनी इतके भरून आले होते की, त्याचा पाय तेथून निघत नव्हता; पण कसें तरी धैर्य धरून निघाला. (क) हृदयिं धरूनि रघुवीर= रघुवीराचे हृदयात ध्यान करीत निघाला. आला तेव्हा रघुवीराविषयींच्या संशयांनी व कुतर्कांनी त्याचे हृदय व्यापले होते; पण आता परत जाताना हृदयात प्रेमाने रघुवीराचे ध्यान करीत निघाला! हा संतसमागमाचा महिमा आहे. (ख) रघुवीर शब्द युध्दवीरता व कृपावीरता येथे सुचवितो. ज्या रघुवीराचे रणचरित्र पाहून त्यांच्या ठिकाणीं युध्दवीरता न दिसल्याने गरूडास संशयाने ग्रासले व रघुवीर परमात्मा नाहीत असा मोह झाला, त्यांच्याच कृपावीरतेने त्याला भुशुंडीकडे आणून अतिदुर्लभ असा संतसमागमाचा लाभ दिला. या सर्व गोष्टींचे चिंतन करीत व रघुवीराचे ध्यान करीत गरूड वैकुंठास गेला.

येथे भुशुंडी-गरूड संवादाची समाप्ती झाली. हा सर्वात पहिला व इतरांना आधारभूत असलेला संवाद होय. आता महेश वरील कथेतील सार उमेला सांगून आपल्या कथेच्या उपसंहाराकडे वळतील.

दो.म.(१) गिरिजे! -'गिरिजड सहज' असल्यामुळे त्याच्या मुलीच्या ठिकाणी सुद्धा जडता असावयाचीच. 'श्रुणु गिरिजे हरिचरित मनोरम' (१।१२१।१) असे म्हणून रामचरित्र सांगण्याचा उपक्रम महेशानीं केला. आता त्या कथेसहित नंतरच्या सर्व कथेचा उपसंहार करताना तेच संबोधन वापरले व सुचविले कीं- तुमच्या ठिकाणी जी थोडी मोहजडता होती ती आता बहुधा गेली असेलच, कारण की गरूडाच्या सारखा मोह तुमच्या हृदयात नव्हता थोडी छाया होती. या गिरिजा शब्दातील खोच पार्वतीच्या लक्षात आली आहे; पती महेशांच्या अपेक्षेनुसार योग्य ते उत्तर देणार आहे; व तेथे कवीनी गिरिजा शब्दच वापरला आहे. (१२९/७-८ व दो.पहा).

(२) संतसमागम-सम लाभ जगिं आन न- इष्टलाभ झाल्याने जीवास सुख होते. ज्या लाभाने सर्वात मोठे सुख मिळेल तो लाभ सर्वात मोठा. 'संतभेटिसम जगांत सुख ना' म्हणून संतसमागमासारखा दुसरा लाभ जगात नाही

असे सज्जनांस वाटते व श्रुति पुराणादि सद्ग्रंथ हेच सांगतात, असे मत ज्यांचे बनले असेल त्यांच्यावर ईश्वरकृपा झाली असे समजावे; कारण की बहुजन समाजास हा लाभ सर्वात मोठा वाटत नाही. सत्संग महिमा आतापर्यंत जागोजागी असाच वर्णिला गेला आहे. (क) तो न मिळे हरिकृपेविण- 'बिन सत्संग विवेक न होतो। रामकृपेविण सुलभ न हो! तो' (११३/७) असे ग्रंथाचा उपक्रमात म्हटले तेच येथे उपसंहारात सांगितले. याविषयी ही भरपूर चर्चा मागील प्रकरणांत केली गेली आहे, म्हणून येथे अधिक अवतरणें नकोत. ७/५५/ ८ मध्ये ज्याचा उपक्रम केला त्या सर्व इतिहासाचा उपसंहार आता आधी सुरु करतील.

हिं. ।कहेउँ परम पुनीत इतिहासा।सुनत श्रवत छुटहिं भवपासा।।१।।
।प्रनत कल्पतरू करूना पुंजा।उपजइ प्रीति राम पद कंजा।।२।।
।मन क्रम बचन जनित अघ जाई।सुनहिं जे कथा श्रवन मन लाई।।३।।

म. ।कथित परम पुनीत इतिहास।श्रवत कार्नि सुटती भवपाश।।१।।
।प्रणतकल्पतरू करूणापुंजी।उपजे प्रीति राम-पद-कंजी।।२।।
।मनकृतिवचनजनित-अघ भंजन।श्रवति कथा लाउति जे श्रुति मन।।३।।

अर्थ-मी (हा) परमपुनीत इतिहास सांगितला तो कानांनी श्रवण केल्याने भवपाश सुटतात.।।१।। शरणागतांचा कल्पतरू आणि करूणेचा सागर जे श्रीराम त्यांच्या पदकमली प्रीती उत्पन्न होते.।।२।। (कारण) जे ही कथा कान (श्रुति) व मन लावून श्रवण करतात त्यांचे कायिक वाचिक मानसिक पाप नष्ट होते.।।३।।

टीका.चौ.१.(१) परम पुनीत इतिहास -'ऐक परम पुनीत इतिहास। श्रवुनि-सकल लोक भ्रम नाश' (७/५५/८)असा जो इतिहास सांगण्या विषयी उपक्रम केला त्याचा उपसंहार येथे करून त्याच्या श्रवणाची फलश्रुती सांगत आहेत. हा इतिहास म्हणजे उत्तरकाण्डांत पार्वतीने विचारलेल्या सहा प्रश्नांचे व गरूडाच्या सर्व प्रश्नांचे केलेले विवेचन. परम पुनीत शब्दातील भाव ७/५५/८-च्या टीकेत पाहावे. (क) सुटती भवपाश= भवपाश= भवबंधन. सुटती (छूटहिं) हे अनेक वचन आहे, म्हणून अनेक भवपाश= 'दारूण अविद्या पंच जनित विकार' (१३० छं) अविद्यादि पंचक्लेश व त्यांच्यापासून उत्पन होणारे कामक्रोधादि समस्त

विकाररूपी बंधने- सुटतात;आपोआप गळून पडतात, ती सोडण्यासाठी किंवा तोडण्यासाठी काही श्रम करावे लागत नाहीत. फक्त या इतिहासाचे सद्‌गुरूमुखाने श्रवण केले म्हणजे जीव मायेच्या बंधनातून सुटतो. म्हणजे जीव ज्ञानविज्ञान संपन्न जीवनमुक्त होतो. ज्यांना मोक्ष नको असेल त्यांनी आणखी श्रवण केले म्हणजे त्यांना काय प्राप्त होते हे पुढील चौपाईत सांगतील. येथे 'ज्ञान विमल जलिं करी स्नान जै' हे घडल्याचे सांगितले. 'रामभक्ति उरिं करी स्थान तै' (१२२/११) हे आता सांगतात.

चौ.२ (१) प्रणत कल्पतरु = शरणागतांच्या इच्छा पुरविणारा कल्पतरु. जीवनमुक्त होऊन सुद्धा ज्याला मोक्षाची इच्छा नसते पण भक्तीची इच्छा असते त्याची ती इच्छा रामचंद्र पुरवितात; कारण ते शरणागतांचे 'करूणापुंज'= करूणासागर आहेत. ते त्या श्रोत्यावर करुणा दया करतात व त्याला जे पाहिजे देतात तेव्हा (क) उपजे प्रीति रामपदकंजी= रामचंद्रांच्या पदकमली प्रीति उत्पन्न होते. प्रेमभक्ति दास्यभावाने मिळ्ते. रामराज्याभिषेक-कथा श्रवणाची फलश्रुति भुशुंडीने (म्हणजे शंकरांनीं) अशीच सांगितली आहे. 'मुक्त विरक्त नि विषयी ऐकति । भक्ति सुगति नव वैभव पावति' (७/१७/५). परंतु वैराग्याशिवाय ज्ञान होत नाही म्हणून पुढील चौपाईत ते सुचवितात व श्रवण कसे केले पाहिजे हे सांगतात.

चौ. ३-(१) या इतिहासाच्या श्रवणाने मनकृतिवचन जनित अघ-भंजन होते. मनाने, कृतीने व वाणीने घडलेल्या सर्व पापांचा नाश होतो. पापांचा नाश पुण्यकर्माने होतो; आणि हा इतिहास तर परमपुनीत आहे; त्याचे यथविधिश्रवण हे परम पुण्यकर्म आहे. पापांचा नाश झाला तरच खरे वैराग्य प्राप्त होऊन मोहनाश होतो व नंतर दृढभक्तिमिळ्ते असे भगवान गीतेतही म्हणाले आहेत. 'येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणां । ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रता:'(भ.गी.७/२८) ज्या पुण्यकर्म करणारांच्या पापाचा अंत होतो ते द्वंद्वांपासून व मोहापासून मुक्त होऊन दृढ व्रत म्हणून माझे भजन करतात, मला भजतात. द्वंद्वांपासून सुटणे म्हणजेच वैराग्य. सुखदु:ख, लाभहानी, जन्ममृत्यु इ. द्वंद्वे समान वाटणे हेच वैराग्य . वैराग्याशिवाय हे साधणारच नाही. पण अशा प्रकारे श्रवणाचे फळ मिळण्यास श्रवण विशिष्ट प्रकारानेंच केले पाहिजे. (क) श्रवति कथा लाउनि

जे श्रुति मन' जे श्रुति= कान, कर्णेद्रिय आणि मन लावून श्रवण करतील त्यांनाच वर सांगितलेले फळ मिळेल. कर्णेद्रिय व मन एकग्र करून म्हणजेच इंद्रिये व मन एकाग्र करून या इतिहासाचे श्रवण केले पाहिजे. 'ऐका मति मन चित्ता लाउनि'(३/१५/१) टी.पहावी. (ख) ल.ठे. येथे अति जिज्ञासु अर्थार्थी यांना काय मिळेल हे सांगितले नसले तरी 'मुक्त विरक्त नि विषयी ऐकति। भक्ति सुगति (=मोक्ष) नव वैभव पावति' (७/१५/५) यात सांगितलेले फळ गृहीत धरणे जरूर आहे; कारण बाकीची फलश्रुति येथे अगदी तीच सांगितली आहे. आता महेश सांगतील भवानीला की सर्व साधनांचे फल हरिभक्ती आहे

हिं. */तीर्थाटन साधन समुदाई/जोग-बिराग ग्यान निपुनाई//४// /*
/नाना कर्म धर्म व्रत दाना/संजम दम जप तप मख नाना//५//
/भूतदया द्विज गुर सेवकाई/विद्या बिनय बिबेक बडाई//६//
/जहँ लगि साधन बेद बखानी/सब कर फल हरिभगति भवानी//७//

म. */तीर्थाटन नाना साधनगण/योग-विरक्ति ज्ञान-निपुणपण//४//*
/कर्म धर्म नाना व्रत दानें/शम दम जप तप यज्ञ साधनें//५//
/व्दिज-गुरूसेवा भूत-सदयता/विद्या विनय विवेक महत्ता//६//
/साधन जितके श्रुति वाखाणी/सर्वां फल हरिभक्ति भवानी//७//

अर्थ- तीर्थाटन आणि विविध साधनांचे समुदाय (उदाहरणार्थ) योग, वैराग्य आणि ज्ञान यात निपुणता ।।४।। अनेक कर्म धर्म, अनेक व्रते, अनेक दाने, शम(मनोनिग्रह) दम(इंद्रियनिग्रह) जप, तप व विविध यज्ञयागादि साधने ।।५।। विप्रसेवा, गुरूसेवा, भूतांवर दया करणें, विद्या विनय आणि विवेक यांची महती ।।६।। इत्यादि जितकी साधने वेदांनी वार्णिली आहेत त्या सर्वांचे (अंतिम) फळ हे भवानी! हरिभक्तीच आहे. ।। ७।।

टीका. चौ.४-(१) तीर्थाटन= तीर्थक्षेत्रात पायी अनवाणी चालत जाणे व त्या त्या तीर्थात तीर्थविधि व स्नानादि करणें, (क) आता पुढे नाना साधन गण = साधनांचे समुदाय सांगितले आहेत; त्यांत १.ज्ञान साधन गण, २. कर्म साधन गण व ३. भक्ति साधन गण असे मुख्य तीन प्रकार आहेत. योग-विरक्ती-ज्ञान यात निपुणता हा ज्ञानमार्गातील मुख्य साधन समुदाय आहे. वैराग्य निपुणतेने योग

निपुणता व त्याने ज्ञान निपुणता येते.

चौ.५.(१) वैराग्याची प्राप्ती धर्माचरणाने होते. या चौपाईत कर्ममार्गाने धर्माचरणाच्या साधनांचा उल्लेख आहे. कर्म,धर्म, व्रते, दाने, शम, दम, यम, जप, तप, व यज्ञयागदि साधने धर्माच्या अंगभूत आहेत. 'विरतिस धर्म योग दे ज्ञाना'- शमदम शब्दाने शमादि षट्काचे ग्रहण करणे योग्य. दान, जप, तप, यांचा अंतर्भाव नियमात होतो म्हणून दान जप तप यांनी नियमांचे ग्रहण करणें योग्य आहे. यम आणि नियम यांचे पालन सर्वच मार्गाने आवश्यक आहे. यज्ञयागांचा केवळ कर्ममार्गात अंतर्भाव होतो.

चौ.६.(१) द्विजगुरुसेवा भूतसदयता- ही मुख्यत: भक्तिमार्गाची पूर्वसाधने आहेत रामकृपा संपादन करण्याचा सोपा उपाय आहे. 'द्विजसेवा हे व्रत हरितोषण' भूतदया असल्याशिवाय यमांतील मुख्य जी अहिंसा(परमधर्ममय पय) ती साधणारच नाही. तिन्ही मार्गात भूतदयेची आवश्यकता असतेच पण भक्तिमार्गात विशेष इतकेच. (क) विद्या-विनय-विवेक-महत्ता - विद्यामहत्ता, विनयमहत्ता व विवेकमहत्ता तिन्ही मार्गात कमी अधिक प्रमाणात पाहिजेच पण विद्या व विवेक यांचे महत्त्व ज्ञानमार्गात आहे. भक्तिमार्गात विद्या पाहिजेच असे नाही. विनय=नम्रता भक्तिमार्गात विशेष पाहिजे. सूचना= या तीन चौपायांतील विविध शब्दांवर टीका,व्याख्या, इ. विस्तार अरण्यकांडांतील रामगीतेपासून उ.कां.दो.१२५ पर्यंत ठिकठिकाणीं अनेक वेळा केलेला आहे.

चौ.७.(१) सर्वा फल हरि भक्ति - वेद पुराणांनी सांगितलेल्या या व इतर सर्व साधनांनी मिळवावयाचे शेवटचे फल म्हणजे 'प्रेमभक्ति अनपाविनी' हेच आहे. येथे शंकरांनीं जो सिद्धान्त सांगितला तोच भुशुंडीने १२४/५-७ यात जरा निराळ्या प्रकाराने सांगितला आहे; व ९५/५-६ मध्ये येथल्या सारखाच सांगितला आहे. वसिष्ठांनीं ७/४८ पासून ४९ पर्यंत हाच सिद्धान्त अधिक विस्ताराने सांगितला आहे. (क) मंगलाचरणांत 'यत्पादप्लव एक एव हि भवाम्भोधेस्तितीर्षावताम्' यांतही हाच सिद्धान्त ध्वनित केलेला आहे व त्याचे कारण ही 'यन्मायावशयर्तिविश्वमखिलभ्' या चरणानें सांगितले आहे आणि उपक्रमांत मानसरूपकांत 'शम यम नियम चि फुले ज्ञान फल । हरिपद-रति रस वेद वदे कल' (१/३७/१४) यांत सांगितला आहे. या प्रमाणे मंगलाचरणापासून हा सिद्धान्त

वारंवार सांगून येथे उपसंहार केला.

हिं. । सो रघुनाथ भगति श्रुति गाई । राम कृपाँ काहूँ एक पाई ।।८।।
दो. । मुनि दुर्लभ हरिभगति नर पावहिं बिनहिं प्रयास ।।
।। जे यह कथा निरंतर सुनहि मानि बिस्वास ।।१२६।।

म. । श्रुतिगीता रघुनाथ भक्ति ते । रामकृपे कुणि एका मिळते ।।८।।
दो. । मुनि दुर्लभ हरिभक्ति नर पावति बिना प्रयास ।।
।।जे ही कथा निरंतर ऐकति युत विश्वास ।।१२६।।

अर्थ - वेदांनी वर्णिलेली ती श्री रघुनाथाची भक्ती रामकृपेने कोणी एखाद्यास मिळते ।।८।। (परंतु) जे नर विश्वासयुक्त होऊन ही कथा निरंतर श्रवण करतात त्यांना मुनिदुर्लभ असलेली ती रघुनाथभक्ती प्रयासांवाचून मिळते ।।दो.१२६।।

चौ.८.(१) रघुनाथ भक्ति ते- ते=ती, सर्व साधनांचे फल म्हणून जिचे वर्णन केले ती फलस्वरूप असलेली प्रेमभक्ती. रघुनाथ शब्दाने सगुण-साकार दशरथनन्दन रामचंद्रांची भक्ती सुचविली. (क) 'रामकृपे कुणि एका मिळते' भाव हा की ती रामकृपेशिवाय मिळत नाही आणि रामकृपेने ज्याला ती मिळते तो क्वचित कोणी एखादाच असतो. भाव हा की ती सर्व साधनांचे फल म्हणून मिळणारी भक्ती फार दुर्लभ आहे.'वृष्टि शारदी तुरळक थोडी । तशि मम भक्ति एक कुणि जोडी' (४/१६/१०) असे रघुनाथच म्हणतात पण ते असे ही म्हणतात की 'मिळते संत यदा अनुकूल हि'(३/१६/४) संतांच्या कृपेने मिळते असे रघुनाथ म्हणतात. शंकर म्हणतात रामकृपेने मिळते. या दोन मतांचा समन्वय असा की. 'भेटति संत विशुध्द तयाला राम कृपे अवलोकिति ज्याला' (७/६९/७) रामकृपेने संत सद्गुरू भेट होते व संतांच्या कृपेने ती भक्ती मिळते. अशी क्वचित कोणास मिळणारी फार दुर्लभ असणारी भक्ती सहज सुलभ व पुष्कळांस कशाने मिळते हे दोह्यात सांगतात.

दो.(१) श्रद्धा, धर्माचरण, वैराग्य, नवविधा साधनभक्ती, ज्ञानप्राप्ती आणि संत किंवा भगवंत यांची कृपा या क्रमाने प्रेमभक्ती मिळणे फार दुर्लभ व फार प्रयासांचे आहे, परंतु तीच (क) मुनिदुर्लभ हरिभक्ति - ज्ञानी विरागी मुनींना सुद्धा

दुर्लभ असणारी रघुनाथभक्ती प्रयासांवाचून मिळण्याचा एकच सोपा मार्ग आहे, तो म्हणजे (ख) या कथेचे निरंतर (सद्‌गुरूमुखाने) श्रवण केल्याने वाटेल त्यांना मिळू शकेल- (ग) निरंतर युत विश्वास ऐकति -(१) युत विश्वास - या कथेच्या श्रवणाने मुनिदुर्लभ भक्ती सहज मिळेल असा विश्वास आणि 'सद्‌गुरूवैद्यवचनि विश्वास हिं' (१२२/६) पाहिजे. अशा 'विश्वासा विण भक्ति ना, द्रवति न तीविण राम' 'स्वप्निहि रामकृपेविण जीवा नहिं विश्राम' (७/९०), ७/१०३/४; ७/१०३रा.पहा. (२) निरंतर श्रवण केले पाहिजे.- 'श्रवण जयांचे समान अर्णव । नाना सरिता सुभग कथा तव।। भरति निरंतर पूर्ण न होती। त्यांचे हृदय तुम्हां शुभ वसती। (२/१२८/४-५) टीका पाहावी. निरंतर श्रवण म्हणजे खंड न पडता सतत श्रवण करणे. जशा महानद्या सागरात (अर्णव) पडतात तशी ही रामचरितमानस कथा अखंड कानात पडत राहिली पाहिजे; व पुरे झाले श्रवण असे वाटता नये. असे श्रवण सद्‌गुरूमुखाने झाले (१२२/६. पहा) की सद्‌गुरूकृपेने रघुनाथभक्ती हृदयात निवास करते व प्रेमभक्तीला वश झालेले राम, जानकी व लक्ष्मण यांच्यासह हृदयात विश्राम करतात.(३) श्रवण कसे करावे याविषयी शंकरांनी जे सांगितले त्याप्रमाणे म्हणजे मन व इंद्रिये एकाग्र करून श्रवण केले पाहिजे. आता अशा भक्ताची प्रशंसा करतात.

हिं. *। सोइ सर्बग्य गुनी सोइ ग्याता। सोइ महि मंडित पंडित दाता ।।१।।*
। धर्म परायन सोइ कुल त्राता। राम चरन जा कर मन राता ।।२।।

म *। तो सर्वज्ञ गुणी तो ज्ञाता। तो महि मंडित पंडित दाता ।।१।।*
।धर्म परायण कुलपाता तो। रामचरणिं मन ज्याचे रत तो । ।२।।

अर्थ- ज्याचे मन श्रीरामचरणी रत झाले तोच (खरा) सर्वज्ञ, तोच गुणी, तोच ज्ञानी, तोच पृथ्वीला सुशोभित करणारा, तोच पंडित, तोच दाता, तोच धर्मपरायण आणि कुलाचा रक्षक ही (खरा) तोच.।।१-२।।

टीका. सूचना- येथून चार चौपायात भगवान शंकर रामप्रेमी भक्ताची प्रशंसा करतात, व सुचवितात की रामभक्ताने सर्व काही संपादन केले. मिळवण्यासारखे किंवा करण्यासारखे सर्व त्याने मिळविले व केले; काही मिळवावयाचे वा करावयाचे राहिले नाही.

चौ.१.(१) सर्वज्ञ = सर्व जाणणारा, तोच, भक्तिहीन सर्वज्ञ असतील त्यांची सर्वज्ञता व्यर्थ होय. सर्वज्ञतादि गुणानी मिळवावयाचे असते सुख, पण ते शाश्वत नसते. रामभक्ति सुख अपार, अनंत, अवीट असल्याने, रामभक्ताच्या सुखात सर्व सुखांचा शतेपंचाशत् न्यायाने अंतर्भाव होतोच; म्हणून तोच खरा सर्वज्ञ, तोच खरा गुणी इत्यादि सर्व खरा तोच. (क) महि- मंडित, मंडित=भूषित; तोच खरा या पृथ्वीचे भूषण बनतो, त्याच्यामुळे 'सनाथा चेयं भूर्भवति'(ना.भ.७१) (ख) पंडित = सर्व शास्त्रांचे शब्दज्ञान संपादन केलेला, विद्वान. भक्तिहीन पांडित्याने जन्ममरणाचे दु:ख तर नाहीच चुकविता येत, पण जिवंतपणी सुद्धा दु:खहीन सुख मिळत नाही. भक्त 'सच्छास्त्रीकुर्वन्ति शास्त्राणि' (ना.भ.६९) (ग) दाता- दानाने पापनाश व पुण्यप्राप्ती होते; पुण्याचे फल सुख मिळते, पण ते अल्प व दु:खमिश्रितच असते. दानाने अविद्यामुक्त, निर्भय होता येत नाही; भक्ताने सर्व सुखांचे निधान आपल्या हृदयात साठविलेले असते. शिवाय भक्ताने आपले सर्वस्व व मन रामचंद्रांस दिलेले असते. भक्तिहीन दाता कदाचित सर्व देईल पण मन देऊ शकत नाही. ज्याने आपले मन भगवंतास दान दिले त्याच्या सारखा दाता तोच.

चौ.२.(१) धर्मपरायण - मनुष्य जन्मास येऊन मुख्य कोणता धर्म संपादन करावयाच्या असेल तर भागवत धर्म. जो भागवत धर्मपरायण असेल तोच खरा धर्मपरायण. म्हणूनच वसिष्ठांनी 'धंदा पौरोहित्य मंद अति' असून त्याचा स्वीकार केला. 'योग मख व्रत दान। ज्यास्तव करणे तो मिळे धर्म न या सम आन' (७/४८) असे वसिष्ठांनी म्हटले आहे. (क) तो कुलपाता- पाता=दाता, रक्षक, उद्धार करणारा.'पावयन्ति कुलानि' (ना.भ. ६८) भक्ताला पाहून त्याचे 'मोदन्ते पितर:' (ना.भ.सू. ७१) पूर्वज आनंदित होतात. भक्त आपल्या पितृकुलांतील सात पिढ्यांचा व मातृकुलांतील सात पिढ्यांचा-पूर्वजांचा उद्धार करतो. भक्तिहीन कुलपालक कुळाचा उद्धार करू शकत नाही; त्याच्यामुळे कुल धन्य होत नाही. भक्तामुळे कुल धन्य होते हे पुढे सांगतील.

हिं. ।नीति निपुन सोइ परम सयाना।श्रुति सिद्धान्त नीक तेहिं जाना ।।३।।
।सोइ कबि कोबिंद सोइ रनधीरा। जो छल छाडि भजइ रघुबीरा।।४।।

म. ।नीति निपुण तो परम शहाणा।श्रुति सिद्धान्त सुज्ञ तो जाणा ।।३।।

।तो कवि कोविंद तो रणधीर।भजे त्यजुनि छल जो रघुवीर।।४।।

अर्थ- जो छलाचा त्याग करून रघुवीरास भजतो तोच (खरा) नीतिनिपुण, तोच परम शाहाणा व त्यानेच श्रुतींचा सिद्धान्त चांगला जाणला हे लक्षात ठेवा. तोच कवी, तोच खरा कोविंद, आणि तोच खरा रणधीर होय. ।।३-४।।

टीका.-चौ.३ <u>(१)</u> <u>नीति निपुण</u>- सर्वात दुर्लभ शरीर कोणते; सर्वात मोठे सुख कोणते व मोठे दु:ख कोणते; वेदोक्त परम धर्म कोणता व सर्वात अति कराल पाप कोणते; संत व दुर्जन यांचा सहज स्वभाव कसा असतो; आणि- मानसरोग कोणते; या सात गोष्टींचे उत्तम ज्ञान त्याला आहे; व यातील जे उत्तम तेच रामभक्त आचरतो; आणि जे वाईट ते टाकतो, करीत नाही. संतांची संगती करतो, असंतांची चुकून सुद्धा करीत नाही; अहिंसारूपी परम धर्माचे पालन करतो, परनिंदारूपी अतिकराल पाप चुकून सुद्धा करीत नाही; अज्ञान-मोह-दारिद्र्य त्याच्या जवळ येऊ शकत नाही; आणि तो (रामभक्त, रघुवीरभक्त)मानसरोगांतून मुक्त झालेला असतो. हाच खरा नीतिनिपुण. 'तात! ऐक सादर सुप्रीती। सांगू संक्षेपें ही नीती'(१२१/८) असे म्हणूनच भुशुंडीने वरील सात प्रश्नांचे विवेचन केले आहे. या नीतीच्या पालनात जो तरबेज असतो तोच नीतिनिपुण. <u>(क)</u> धर्मनीती हेच सांगते की पुण्य करावे; पाप करू नये, दुसऱ्यांस दुःख देऊ नये; सज्जनांची संगती करावी, दुर्जनांची संगती करू नये; निरोगी रहावे, रोगांच्या तडाक्यात सापडणार नाही असे वागावे; मनुष्याने पशू बनू नये. छलहीन रामभक्त पूर्ण नीतिनिपुण असतो, तो अनीतीने कधीच वागत नाही. केवल ज्ञानी सुद्धा भक्ताच्या इतका नीतिनिपुण नसतो. <u>(ख)</u> असा नीतिनिपुण नसून जो नीतिनिपुण गणला जात असेल किंवा स्वत:स समजत असेल तो नीतिनिपुण नव्हेच. दु:खाचा पूर्ण नाश करून सदा सुखी कसे राहता येईल; व आपल्या वागण्याने इतरांच्या सुखाचा विनाश होणार नाही व इतरांना आपल्यामुळे दु:ख होणार नाही असे वागण्याचे जे नियम ती नीति. परंतु छलहीन रघुवीरभक्तांखेरीज कोणीच नीतीचे परमोच्च शिखर गाठू शकत नाही.

<u>(२)</u> <u>तो परम शहाणा</u>- आपले हिताहित, कर्तव्याकर्तव्य जाणून हिताचे व स्वकर्तव्य करून जो सुखी होतो त्याला शाहणा, चतुर म्हणतात 'सांडूनि सर्वहि आस भजति राम ते चतुर नर' (३/६म) 'चतुर शिरोमणि तेच किं जगतीं। (भक्ति)

मण्यालागि या सुयत्न करती' (७/१२०/१०) 'श्रुणु वायस तूं सहज शहाणा। मागसि कां न अशा वरदाना।। याचित भक्ति सकल सुखदानी। महाभाग तुजसम नहिं कोणी,(७/८५/२-३) ऋध्दि सिध्दि, मोक्ष सकल सुखखाण, भगवान देत असता सुद्धा जो मागत नाही आणि भक्ती मागतो तो सहज शाहणा असे प्रभु श्री रघुवीरच म्हणाले; मग ज्याने भक्ती प्राप्त करून घेतली तो परम शाहणा हे ठरलेच.

<u>(३)</u> श्रुतिसिद्धान्त सुज्ञ तो(च) 'उरगारी! हा श्रुति सिद्धान्त हि! राम भजा भुलुनी सब काज हि'.(१२३/२) हाच श्रुतीचा सर्वसिद्धान्त-सारभूत सिद्धान्त आहे. हा ज्याने उत्तम प्रकारे जाणला, जो या सिद्धान्तानुसार सर्व कार्य विसरून रामभजन करू लागला तो खरा श्रुतिसिद्धान्त उत्तम प्रकारे जाणणारा हे ठरलेच. हा सिद्धान्त जाणून त्याचे पालन पूर्णपणे न करता जो इतर अनेक श्रुतिसिद्धान्त जाणत असेल तो पढतमूर्खच. तो श्रुतिरूपी तलावात राहणाऱ्या जळ्वांसारखाच व या सारभूत सिद्धान्ताचे पूर्ण पालन करणारा पंकजा सारखा. 'त्रैगुण्य विषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन' (भ.गी.)

चौ.४.<u>(१)</u> <u>तो कवी कोविद</u>- तोच खरा कवी कारण तो आपल्या, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या तिन्ही वाणींचा उपयोग भगवंताचे गुणानुवाद गाण्यात करतो. <u>(क)</u> तोच कोविद= भाष्यकर्ता, शास्त्रग्रंथांचे व्याख्यानादि करणारा, त्या सर्वांचा मतितार्थ समन्वयपूर्वक जाणणारा. म्हणूनच तुकोबा म्हणतात- 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा। इतरी वाहावा भार माथा' <u>अर्थ</u> = मतितार्थ, सार. <u>(ख)</u> तो रणधीर= जो शत्रूंबरोबर युध्द करण्यास भीत नाही व सर्व शत्रूंचा संहार करतो तोच शत्रूंवर विजय मिळविणारा रणधीर वीर- 'महा अजय संसार रिपु जिंकुं शके तो वीर' (६/८० रा) असे श्री रघुवीरानेच बिभिषणाला सांगितले आहे. 'ढाल विरति, असि बोध, रिपु मद मोहादि वधून । जय देते हरिभक्ति ती बघ खगेश चिंतून'(७/१२० म) जोपर्यंत हृदयातील मोह महीपाल व त्याचे कामक्रोधलोभादि सेनापति आणि दंभकपटादि इतर सर्व सैन्य यांचा पराभव केला जात नाही तोपर्यंत बाह्यशत्रूंचा पराभव करणारी शूरता, वीरता व रणधीरता दुःखनाश करून शाश्वत सुख देऊ शकत नाहीत. या सर्व हृदयस्थ रिपूंचा वध करून जय देणारी आणि महा अजय संसार रिपूला जिंकणारी हरिभक्ती ज्याच्या हृदयात असते तो खरा शूरवीर रणधीर.

(२) त्यजुनि छल- 'अर्थ न धर्म न कामरूचि नको गतिहि निर्वाण।। जन्मजन्म रति रामपदि- '(२/२०४) अशी ज्याची निष्ठा असते व जो अनन्यगतिक असतो, अन्यांचा भरवसा किंवा साधनांचा भरवसा जो धरित नाही तोच छलहीन. (क) अशा प्रकारे केवळ सद्‌गुरूमुखाने श्री रामचरित्र कथा श्रवण केल्याने भक्ती मिळून जीव कृतकृत्य होतो हे खरे असले तरी निरंतर कथा सांगणारे सद्‌गुरू भेटणे, राम, गुरू व कथा यांवर पूर्ण विश्वास, इंद्रिये व मन एकाग्र करणे व निरंतर कथा श्रवण करणे या गोष्टी सर्वांनाच शक्य नाहीत. एका जन्मात हे सर्वांना साधणे शक्य नाही; म्हणून या सर्व गोष्टी साधण्याची पात्रता येण्यास स्त्रिया व चार वर्णाचे लोक यांनी प्रथम कोणता पाया भरभक्कम भरला पाहिजे हे आता सांगतील.

हिं. *। धन्य देस सो जहँ सुरसरी। धन्य नारि पतिब्रत अनुसरी ।।५।।*
।धन्य सो भूपु नीति जो करई। धन्य सो व्दिज निज धर्म न टरई ।।६।।

म *। धन्य देश जेथें सुरसरी । ती स्त्री धन्य पतिव्रत करी ।।५।।*
।धन्य भूप जो नीति पाळी । धन्य विप्र निज धर्म न टाळी ।।६।।

अर्थ- सुरनदी गंगा ज्या देशात वाहते तो देश धन्य होय. जी स्त्री पतिव्रताचे पालन करते ती स्त्री धन्य होय।।५।। जो नीतीचे पालन करतो तो राजा धन्य होय. जो स्वधर्म टाळीत नाही (स्वधर्मनिरत राहतो) तो ब्राह्मण धन्य होय.

टीका.चौ.५.(१) धन्य देश जेथे सुरसरी- 'ज्यापदिं सुरसरिता परम पुनीता प्रगट होइ शिव शिरी धरी'(१।२११छं.४) जिला शंकर सुद्धा मस्तकावर धारण करतात अशी परम पावन करणारी गंगा आहे. तिचे नित्य स्नानपान विश्वास श्रद्धायुक्त हृदयाने करून पापांचे क्षालन सहज होते. म्हणून ज्या देशांतून गंगा वाहते तो देश धन्य; म्हणजे त्या देशातील लोकही धन्यच. कारण की त्यांच्या भाग्याने पापविनाशिनी गंगा त्यांना उपलब्ध झालेली आहे. पापविनाश झाल्याशिवाय रामभक्ती मिळत नाही. स्त्रीशूद्रादि कोणीही मनुष्य तिचा लाभ घेऊन निष्पाप होऊ शकतात. हे साधन त्या त्या देशातील लोकांस सर्वसामान्य

असल्याने प्रथम उल्लेख केला.

(२) गंगेच्या तीरावर राहणारात वृध्द झालेले पापी असतातच: नित्य नियमाने गंगास्नान करणारे सुद्धा पापमुक्त होऊन भगवद्भक्त झालेले दिसत नाहीत. नित्य गंगास्नान व गंगाजलपान करीत अगदी वृध्द झालेले सगळेच हरिभक्त व्हावयास पाहिजेत. पण त्या देशातही छलहीन भक्तिसंपन्नांचे दुर्भिक्षच आहे. म्हणून सुरसरि शब्दाचा वाच्यार्थ घेणेच पुरेसे नाही. शिवाय जे इतर ठिकाणी राहतात त्यांना पापक्षालनाचे विप्रसेवेपेक्षाही सुलभ साधन सांगितले जात नाही; म्हणून सुरसरी= नवविधा साधन भक्ति. 'रामभक्ति जिथ धार भागिरथि' (१।२।८) रामभक्ति= सुरसरिता, गंगा हे ठरले. पण त्यातल्यात्यात सर्वांस सुलभ रघुपतिकथा गंगा आहे. 'पुसले रघुपति कथा प्रसंगा। सकल लोक जग पावनि गंगा'(१।११२।७) रघुपति कथा ही सकल लोकांना पावन करणारी गंगा आहे. नवविधासाधन भक्तीत हरिकथा श्रवण ही पहिलीच भक्ती आहे. रामकथारूपी सुरसरिता ज्या स्थानात व ज्या कर्णरूपी देशात वाहात असेल ते स्थान व ते कर्ण धन्य होत. हे साधन सर्व वर्णांस व स्त्रियांस सुलभ असे आद्य साधन आहे. (क) 'संजिवनि मुळि भवरोगा ती । रामकथा' (१२६।२). पण मुळी, औषध घ्यावयाचे म्हणजे पथ्य, अनुपान आणि वैद्य पाहिजेच. गंगा-स्नान करण्यात सुद्धा काही विधीनिषेधांचे पालन करावेच लागते. व ते स्त्रियांसाठी व पुरूषांसाठी निरनिराळे असतात. पुरूषांनाही वर्णानुसार विधीनिषेध निराळे असतात. विधि म्हणजेच अनुपान आणि निषेध म्हणजेच कुपथ्य त्याग. म्हणून आता अनुपान, पथ्य व सद्वैद्याची संगती सांगतात.

(३) देश धन्य कोणता हे सांगितले. आता ब्राह्मणादि चार वर्णांचा उल्लेख न करता प्रथम स्त्रियांचाच उल्लेख कां? ज्या देशात गंगा वाहते त्या देशातील लोकांना पापक्षालनाचे साधन सुलभ हे खरे असले तरी 'स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकर:। संकरो नरकायैव' (भ.गी). स्त्रिया बिघडल्या की वर्णसंकर होतो व वर्णधर्मांचे पालन करणें अशक्य होते. ब्राह्मणादि चार वर्णांचे पावित्र्य राखण्यास प्रथम स्त्रिया पवित्र शुध्द राहिल्या पाहिजेत; म्हणून प्रथम स्त्रियांचा

उल्लेख केला. (क) जी स्त्री हरिकथा श्रवण करून पतिव्रत धारण करील तिला पूर्वी वर्णिलेली हरिभक्ती सहज प्राप्त होईल. मुनिदुर्लभ श्रीरघुपतिभक्ती त्यांना सहज, विनाप्रयास प्राप्त होईल. रामकथारूपी गंगेचे एकाग्र चित्ताने स्नानपान करणें हे औषध, व स्त्रियांनी पतिव्रत्याचे पूर्ण पालन करणे हे पथ्य व अनुपान होय. असे झाले म्हणजे त्यांना प्रेमभक्ती अनपायिनी प्राप्त होऊन त्या धन्य होतील. अशा स्त्रिया ज्या ज्या वर्णात होतील त्या त्या वर्णात रामभक्तीचा प्रसार सहज होईल. (ख) लौकिकदृष्ट्या पातिव्रत्यधर्माचे पालन करणारी स्त्री धन्यच पण तेवढयाने भवविनाश होणार नाही. (ग) 'श्रवणी कथनि हर्षती पुलकती । ते सुकृती मन मुदित मज्जती' (१/४१/६) 'करता सादर मज्जन पाना । पाप, हृदयि परिताप उरत ना'(१/४३/६)श्रवण करताना प्रेमाश्रु येऊ लागणे हे रामकथा पान केल्याचे लक्षण आहे. (१/३७ पहा.)

चौ.६.(१) धन्य भूप जो नीती पाळी- भूप = राजा, क्षत्रिय, धर्मनीती व राजनीती यांचे पालन करील तो क्षत्रिय, तो राजा धन्य. धर्मनीती पालनात स्ववर्णाचे कर्तव्य करणें व प्रजेकडून वर्णाश्रमधर्माचे पालन करविणें याचा समावेश होतो. हे करण्यासाठी व प्रजेचे पालनपोषण करण्यासाठी राजनीतीचे पालन करणें आवश्यक असते.प्रस्तावनेत 'भूपधर्म' हे प्रकरण (पृ.४६४) पहावे. हा वाच्यार्थ झाला. पण एवढ्याने खरी धन्यता= कृतकृत्यता येणार नाही; जन्ममरण चुकणार नाही. (क) सादर, विश्वासाने, नित्य रामकथा श्रवण करून वर सांगितल्या प्रमाणें नीतीचे पालन करील तो राजा, तो क्षत्रिय रामभक्तिलाभ करून घेऊन खरा धन्य होईल, भवभयातून मुक्त होईल. धर्मकर्मादिकांना हरिभक्ती हे फळ जर लाभले नाही तर सर्व व्यर्थ असे नुकतेच सांगितलेआहे. हे विसरून भागणार नाही. क्षत्रियांनी रामभक्ती प्राप्त करण्यात रघुनाथकथा श्रवण हे औषध, स्वधर्मानुष्ठान हे पथ्य व पुण्यरत राहणे हे अनुपान सर्वांसाठीच (पुढे सांगितले)आहे. आणि संतसंगरूपी सद्वैद्य (सर्ववर्णांसाठीच) पुढे सांगतील. असे हे चतुष्ट्य जमविले पाहिजे; म्हणजे भूप, क्षत्रिय, खरे धन्य होतील.

(२) धन्य विप्र निज धर्म न टाळी- जो ब्राह्मण ब्राह्मणधर्माचे पालन उत्तम

प्रकारे करतो तो विप्र धन्य; हा वाच्यार्थ आहे. एवढयाने त्या पुरूषाची चित्तशुद्धी होईल; पण भवरोग नष्ट होणार नाही. (क) रामकथा भागीरथीचे स्नानपान हे औषध, ब्राह्मण धर्माचे उत्तम पालन हे पथ्य, सदा पुण्यरत राहणे हे अनुपान आणि संतसंग हा वैद्य एवढे ब्राह्मणाने केले म्हणजे रघुनाथभक्ती प्राप्त होऊन ब्राह्मण खरा धन्य होईल. (ख) शंका- विप्राच्या वर्णनाच्या आधी भूपाचे वर्णन का? शोचनीय कोण यांच्या वर्णनात व कलिप्रभाव वर्णनात आधी ब्राह्मणांचा व मग भूपाचा उल्लेख आहे. समाधान - धर्मशील नीतिमान राजा असेल तरच प्रजेतील चारी वर्णाच्या लोकांना आपापल्या वर्णाश्रम धर्माचे पालन करता येईल नाही तर ते घडणे शक्य नसते. 'यथा राजा तथा प्रजा' 'राजा कालस्य कारणम' परधर्मी व निधर्मी राजसत्तेमुळे वर्णाश्रम धर्माचा विनाश कसा होतो याचा अनुभव मुसलमानी राजसत्ता सुरू झाल्यापासून आजपर्यंत हिंदूना येतच आहे. ज्या हिंदुस्थानात घरांना दरवाजांची आवश्यकता नव्हती व चंद्रसूर्याच्या साक्षी कागदपत्रांवर पुरेशा होत असत तेथे गुन्ह्यांची संख्या किती वाढली आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. (ग) स्त्रियांच्या उल्लेखा नंतर भूपांचा उल्लेख करण्यात हा हेतु आहे की राजा व क्षत्रिय-प्रजा स्वधर्मनीतिचे व राजनीतिचे पालन करणारे असतील तरच प्रजेतील स्त्रियांच्या शीलाचे व पातिव्रत्याचे संरक्षण होऊ शकेल. क्रमभंग करून केवढाले महत्वाचे सिद्धान्त ध्वनित केले हे पाहण्या सारखे आहे! शेष दोन वर्णांना धन्यता कशी येईल व अनुपान आणि वैद्य याविषयी आता दोन चौपायांत सांगतील; म्हणजे आठ प्रकारचे धन्य होतील.

हिं. । सो धन धन्य प्रथम गति जाकी । धन्य पुन्य रत मति सोइ पाकी ।।७।।
।धन्य घरी सोइ जब सतसंगा । धन्य जन्म व्दिज भगति अभंगा ।।८।।

म. । ते धन धन्यचि जया प्रथम गति । धन्य पुण्यरत पावन ती मति । ।७।।
।जै सतसंगति काळ धन्य तो । व्दिजभक्ति दृढ धन्य जन्म तो ।।८।।

अर्थ- ज्याधनाला(दान करणें, दान देणें, ही मुख्य गति मिळते ते धन धन्य होय (तो वैश्य धन्य होय). जी मती (बुद्धी) सदा पुण्यरत व पावन असते ती मती धन्य होय.।।७।। जितका वेळ (काळ) संतसमागम होईल तो तितका काळ धन्य

होय. आणि ज्या (शूद्र)-जन्मात =दृढ द्विजभक्ती घडेल तो (शूद्र) जन्म धन्य होय.।।८।।

टीका-चौ.७.(१) ते धन.....प्रथम गति= 'दानं भोगो नाश स्तिस्त्रो गतयो भवन्ति वित्तानाम्। यो न ददाति न भुंक्ते तस्य तृतीया गतिर्भवति' (सुभा.)दान, भोग आणि नाश या वित्ताच्या(धनाच्या) तीन गती आहेत. होतात. जो देत नाही, दान करत नाही किंवा वित्ताचा उपभोग घेत नाही, त्याच्या वित्ताची तिसरी गती होते. नाश होतो. ज्या धनाचा, वित्ताचा देण्यात दानधर्म करण्यात व्यय होतो ते धन धन्य होय. धन म्हणजे केवळ पैसा नव्हे, हे गोधन, तपोधन, यशोधन इत्यादि शब्दांनी ठरते. अन्नदान, विद्यादान इत्यादि शब्द तेच सांगतात. ज्याला काही किंमत, मूल्य, महत्व आहे असे काहीही धनच होय. हा बाह्यार्थ झाला. (क) भूपधर्मात 'दानमीश्वरभावश्च'असा दानाचा समावेश होत असल्याने व भूपधर्माचा स्वतंत्र उल्लेख आधीच केला असल्याने याचा संबंध क्षत्रियांकडे घेता येत नाही. क्षत्रिय व ब्राह्मण यांचे वर्णन पूर्वी केले. शेष दोन वर्णात धनाचा संग्रह करण्याचा मुख्य अधिकार वैश्यांचा आहे. हा वर्गच केव्हाही कोणत्याही देशात इतर सर्व वर्गापेक्षा अधिक धनसंग्रही, श्रीमंत असतो. वैश्यांनी विपुल धन संपादन करून त्याचा उपयोग बाकीच्या तीन वर्णांच्या सेवेत खर्च करण्यासाठी करावा हा त्याचा धर्म आहे. म्हणूनच म्हटले आहे की 'वैश्य कृपण धनवान शोच्य तो'(२/१७२/५) जो वैश्य आपल्या धनाचा व्यय इतर तीन वर्णांना देण्यात व दान धर्मात, कृपणपणा न करता, करतो तो धन्य होय. आज हिंदुस्थानांत सुद्धा मुख्य धनिकवर्ग व्यापारी वर्ग (वैश्य)च आहे. दरिद्री सरकारला कोट्यावधी रूपये कर्ज व लाखो रूपयांनी कर देण्यात हाच वर्ग मुख्य आहे. हजारो लाखों रूपयांनी दान धर्म करणाऱ्यांत, सार्वजनिक संस्थाना मदत करणाऱ्यांत हाच वर्ग प्रामुख्याने दिसतो. वैश्य असा धन्य झाला तरी जन्ममरण चक्रातून व दु:खानुभवातून सुटणार नाही. (ख) त्यानेही दानधर्म करण्यात आपल्या संपत्तीचा व्यय मुक्तहस्ताने करणें हे पथ्य पाळून हरिकथा सुरनदीत स्नानपान व त्या औषधाचे अनुपान व संतसंग या गोष्टी केल्या तर भक्ती प्राप्त होऊन तो खरा धन्य होईल.

(२) धन्य पुण्यरत.....मति- जी बुद्धी पुण्यकर्म करण्यात तत्पर असते व पावन असते ती बुद्धी धन्य होय. 'कर्म न करता हरिस समर्पण। श्रम फल.......करूनि'(३।२१।८-९) जे कर्म (पुण्यकर्म असले तरी) हरिला समर्पण केले जात नाही, त्याचे फल केवळ श्रमच, म्हणजेच ते कर्म बंधाला कारण होत असल्याने ते कर्म अपवित्रच ठरते. पुण्यकर्म निष्काम बुद्धीने करून ईश्वरार्पण करते ती बुद्धी धन्य होय. हे अनुपान चारी वर्णातील पुरूषांनी भवरोगातून मुक्त होण्यासाठी घेतले पाहिजे. 'स्वस्वकर्म निरती श्रुति रीती'(३/१६/६) ही भक्तिमार्गातली दुसरी पायरी आहे. स्व. स्व. कर्म= वर्ण जाति इत्यादिकांचे आवश्यक धर्मकर्म. (क) 'पाकी' हा हिन्दीतील शब्द 'मति'चे विशेषण आहे. ते पाक=(पवित्र) या शब्दाचे स्त्रीलिंग रूप आहे.

चौ.८.(१) जै सत्संगति काळ धन्य तो- संत समागमात जेवढा काळ जाईल तेवढाच आयुष्यातील काळ धन्य होय. संत समागमासारखे दुसरे मोठे सुख जगात नाही, म्हणून तो काळ मोठ्यात मोठे सुख देणारा ठरतो, म्हणून तो काळ धन्य. 'सद्गुरू वैद्य-वचनिं विश्वास हि' (१२१/६) संतचरण पंकजिं सुप्रेमा' (३/१६/९) ही भक्तिप्राप्तीतील फार महत्वाची पायरी आहे. 'विण सत्संग विवेक न होतो' (१/३/७) विवेक प्रत्येक कर्मात, प्रत्येक कार्यात आवश्यक असतोच. येथे संतसमागमरूपी वैद्याचा उपदेश सुचविला. दोन्ही दृष्टीनी हे साधनसुद्धा चारी वर्णांच्या व्यक्तींस आवश्यक आहे.

(२) द्विज भक्ती दृढ धन्य जन्म तो- 'प्रथम विप्रपदिं परमा प्रीती' (३/१६/६) ही भक्तिमार्गातील पहिली पायरी आहे. 'द्विज सेवा हे व्रत हरितोषण' (क) द्विज=ब्राह्मण क्षत्रिय वैश्य हा एक अर्थ आणि द्विज=ब्राह्मण हा दुसरा अर्थ आहे. त्रैवर्णिकांची सेवा करणें हा शूद्राचा स्वधर्म आहे. त्या स्वधर्माचे पालन जो दृढ प्रेमाने करील तो शूद्र धन्य होय. पण एवढयाने भवभंग होणार नाही. म्हणून हरिकथा श्रवण हे औषध, तीन वर्णांची दृढभक्तीने सेवा हे पथ्य, किंवा ब्राह्माणाची दृढभक्तिने सेवा हे पथ्य; व ते निष्काम ईश्वरार्पण बुद्धीने करणें हे अनुपान आणि संत समागमारूपी वैद्याचा उपदेश याचा योग्य उपयोग शूद्र

करील तर प्रेमभक्ती मिळून तोही खरा धन्य होईल व भवरोगमुक्त होईल.

सूचना- याप्रमाणें या चार चौपायात वाच्यार्थाने देश, स्त्री, भूप(क्षत्रीय), ब्राह्मण, धन(वैश्य), बुद्धी, काळ आणि जन्म (शूद्रजन्म)हे आठ प्रकारचे धन्य सांगितले. पण एवढाच अर्थ घेतल्यास मागील विषयाशी आणि पुढील दोह्याशी विषयसंगती जुळत नाही. कारण मागील (१-४)चार चौपायात रामभक्ताची प्रशंसा केली-आहे व पुढील दोह्यात रामभक्ताचा महिमा सांगून दुसऱ्या चौपाईतील 'कुलत्राता' याचा अर्थ स्पष्ट केला आहे. शिवाय रामभक्तिहीन सर्वसाधने दु:खदायक आहेत या पूर्वीच्या सिद्धान्तानुसार केवळ दु:खदायक आचरणास गोष्टीना धन्य म्हणता येणार नाही. (क) म्हणून प्रवृत्तीचा त्याग न करू शकणाऱ्या व्यक्तीसाठी रामभक्ति प्राप्तीचा सोपा मार्ग मोठ्या खुबीने येथ` सांगितला आहे. (ख) वाच्यार्थाचे: बाह्यार्थाचेच ग्रहण केल्यास असा अर्थ निष्पन्न होतो की स्त्रिया शूद्र वैश्य क्षत्रिय व ब्राह्मण आपापल्या वर्णानुसार या जगात धन्यता संपादन करतील तर त्यांना पुढील जन्मात अधिक श्रेष्ठ वर्णाचा देह प्राप्त होईल, ब्राह्मण प्रवृत्तिपर असतील ते निवृत्तिपर होतील व स्त्रियाही श्रेष्ठ श्रेष्ठ वर्णात देह धारण करून क्रमाने हरिभक्ती प्राप्त करून भवबंधनांतून सुटतील. पण हे उधारीचे काम! किती जन्म घ्यावे लागतील याचा नेम नाही, पण एवढे निश्चित की असे धन्य पुरूष व स्त्रिया सुद्धा अधोगतीला न जाता उत्तरोत्तर पारमार्थिक मार्गात प्रगतीच करतील व केव्हातरी भक्ती मिळून कृतार्थ होतील. (ग) रामभक्तिसंपन्न स्त्रिया किंवा पुरूष ज्या कुळात जन्मतील त्याची महती म्हणजेच रामभक्ताची महती सांगून या विषयाचा उपसंहार करतील.

हिं.दो । सो कुल धन्य उमा सुनु जगत पूज्य सुपुनीत ।।
।। श्री रघुबीर परायन जेहिं नर उपज बिनीत ।।१२७।।

म.दो. । ऐक उमे कुळ धन्य ते जगत्पूज्य सुपुनीत ।।
।। श्री रघुबीर परायण जिथ नर होइ बिनीत ।।१२७।।

अर्थ- हे उमे ऐक ! ज्या कुळात श्रीरघुवीर परायण विनम्र मनुष्य उत्पन्न होईल ते कुळ

धन्य, ते सर्व जगात पूज्य आणि अतिपवित्र होय ।।दो.१२७।।

टीका-(१) कुळ धन्य ते- ब्राह्मणादि चार वर्णातील, कोण्त्याही उत्तम, मध्यम नीच जातीतील कुळ असो ज्या कुळात अनन्य रामभक्त निपजतो ते कुळ धन्य. ते कुळ पूर्वी हीन, अपवित्र असले तरी त्यात रामभक्त उपजल्याने इतके पवित्र होते की, ते सर्व जगाने मान देण्यास योग्य होते. म्हणूनच अशा प्रसिध्द संताचे पुत्रपौत्रादि वंशज संत नसले तरी संतांच्या वंशांतले म्हणून त्यांना मानसन्मान मिळत असलेला आजही दिसतोच. (क) श्रीरघुबीर परायण- 'आश्रये तत्पराऽभीष्टे परायण पदं विदु:' (इति शाश्वत:) आश्रय, तत्पर, आणि अभीष्ट असे परायण शब्दाचे तिन्ही अर्थ येथे लागू पडतात. श्री रघुवीरच ज्याचा आश्रय आहे, जो श्रीरघुवीरभक्तीत, भजनात, तत्पर असतो व श्रीरघुवीरच ज्याच` अभीष्ट असते, इतर काहीही ज्याला नको असते तो श्रीरघुवीर परायण.(ख) विनीत= अतिनम्र, अत्यंत लीन, पूर्ण निरभिमानी सर्वांबरोबर नम्रतेने, लीनतेने, वागणारा. 'नम्र झाला भूतां तेणें कोंडिलें अनंता' आता पुढील चौपायात श्री रामचरितमानस कथेचे अनधिकारी व अधिकारी कोण हे सांगतील.

हिं । मति अनुरूप कथा मैं भाषी । जद्यपि प्रथम गुप्त करि राखी ।।१।।
।तव मन प्रीति देखि अधिकाई । तब मैं रघुपति कथा सुनाई ।।२।।

म । कथा यथामति मी सांगितली । प्रथम जरी ती गुप्त राखिली ।।१।।
।प्रीती अधिक तव मनीं पाहिली । रघुपति कथा तदा मी कथिली ।।२।।

अर्थ- मी ही कथा (इतिहासरूपी कथा) माझ्या बुद्धीप्रमाणें सांगितली. प्रथम जरी मी ही कथा गुप्त ठेवली होती तरी तुझ्या मनांतील विशेष प्रीती पाहिली तेव्हा ही रघुपतिकथा तुला सांगितली ।।१-२।।

टीका-(१) कथा यथामति मी सांगितली- येथे श्री रामचरितमानस कथेचा उपसंहार करीत नसून 'कथित परम पुनीत इतिहास' (१२६।१) असे म्हणून जो उपसंहार केला त्याची समाप्ती येथे करीत आहेत. रामचरित मानसाचा उपसंहार अधिकारी कोण हे सांगून झाल्यावर पुढे 'गिरिजे! रामकथा कृत

वर्णन' (१२७।१) या चौपाईपासून सुरू होत आहे. येथील 'कथा' शब्दाने टीकाकारास भ्रमात पाडले आहेत ! परम पुनीत इतिहास सांगितला असे म्हटले तेथे 'यथामति सांगितला' हे सांगावयाचे राहिले होते ते न्यून येथे पूर्ण केले. <u>(क)</u> 'प्रथम जरी ती गुप्त राखिली' प्रथम= रामचरितमानस सांगण्यास प्रारंभ करताना. ती कथा= 'तो संवाद उदार घडे कसा सांगेन मग'(१/१२०च) असा हवाला देऊन काक व गरूड संवाद का घडला, कसा घडला, तोच शंकरास कसा ऐकण्यास सापडला वगैरे सर्व कथा गुप्त ठेवली होती. 'श्रुणु शुभ कथा भवानि रामचरित मानस विमल। जी भुशुंडि वाखाणि ऐके खगनायक गरुड' (१/१२०) असा उपक्रम केल्यावर खरे पाहता गरूड काकाकडे का गेला वगैरे कथा सांगणें जरूर होते पण ती कथा मग सांगेन असा हवाला देऊन गुप्त ठेवली होती. तसा हवाला देऊन गुप्त का ठेवली होती याचे कारण पुढील चरणात सुचविले आहे. -

<u>(२)</u> <u>प्रीति अधिक तव मनीं पाहिली</u>- सुचविले की राम व रामकथश्रवण याविषयी तुझ्या मनात प्रीती आहे की नाही हे पाहण्यासाठी अत्यंत महत्वाची कथा गुप्त ठेवली होती; पण माझ्या अपेक्षेपेक्षा अधिकच प्रीती दिसली तेव्हा ती सांगितली. अधिक प्रीती केव्हा दिसली? व कशामुळे दिसली? <u>(क)</u> रामचरितमानस कथा सांगून झाल्यावर 'उमे कथा सब रूचिर वर्णिली। भुशुंडिने जी गरूडा कथिली।। 'कथित रामगुण वर्णुनि काही' असा त्या कथेचा उपसंहार केल्यावर पार्वतीच्या प्रीतीची परीक्षा पाहण्यासाठी मुद्दाम विचारले की 'सांगू काय भवानि अता ही' भुशुंडी गरूड संवाद कथा सांगून झाली, आता भवानी! आणखी काय सांगू?' पूर्वीच्या हवाला प्रमाणें 'काक गरूड संवाद कसा झाला ते मला कृपा करून सांगा' असे म्हणाली असती तरी शंकरांच्या अपेक्षेप्रमाणें प्रीती दिसली असती. पण भवानी प्रथम सांगते की तुमच्या मुखचंद्रातून स्रवणाऱ्या रामकथासुधेचे कर्णपुटांनी पान करून माझ्या मनाची तृप्ती होत नाही. नंतर चांगली सुंदर प्रस्तावना करून तिने सांगितले की.'धर्मशील सुविरागी ज्ञानी। जीवन्मुक्त ब्रह्मपर प्राणी' या सर्वांपेक्षा अतिदुर्लभ 'रामभक्तिरत गतमदमाया' (७/ ५२ रा.पासून ५५/५ पर्यंत पहा) म्हणजे रामभक्तिरत विनम्र प्राणी, ब्रह्मलीन विज्ञ

ानीपेक्षा श्रेष्ठ असतो हे तिने मान्य केले व विचारले की अशी ब्रह्मलीन विज्ञानीना सुद्धा दुर्लभ असलेली भक्ती कावळ्याला मिळाली कशी? आणि 'रामपरायण बोधरत गुणागार मतिधीर' (दो.५४) असून काक शरीर का मिळाले? हे दोन व आणखी दुसरे चार मिळून सहा प्रश्न लागोपाठ मोठ्या प्रेमाने विचारले. ते ऐकून शंकर म्हणाले.'धन्य सती पावन तूझी मति । थोडि न रघुपति पदी प्रीति अति।' 'ऐक परम पुनीत इतिहास' (५५/७-८) रघुपति कथा सुधापान करण्याची तृषा पाहिली (दो.५२रा) आणि रघुपतिपदी थोडीथोडकी नव्हे अति प्रीती पाहिली तेव्हा म्हणाले 'ऐक परम पुनीत इतिहास.' वाचक हो आता विचार करा की हा उपसंहार ५६/१पासून दो १२५ पर्यंतच्या कथेचा आहे की जी कथा बालकाण्डात सांगण्यास प्रारंभ केला तिचा आहे? रामकथा श्रवणाचा उत्तम अधिकारी कोण हे येथे सुचविले आहे. आता श्री रामचरितमानस व नंतरची सर्व पुरवणी कथा, अशी समग्र कथा श्रवणांचा अनधिकारी कोण हे प्रथम सांगतात.

अनधिकारी कोण? (१२८/३-५)

हिं. ।यह न कहिअ सठही हठसीलहि।जो मन लाइ न सुन हरि लीलहि ।।३।।
।कहिअ न लोभिहि क्रोधिहि कामिहि।जो न भजइ सचराचर स्वामिहि ।।४।।
।द्विज द्रोहिहि न सुनाइअ कबहूँ।सुरपति सरिस होइ नृप जबहूँ ।।५।।

म. ।ही न वदावि शठां हठशीला।श्रवति न लाउनि मन हरिलीला ।।३।।
।न वदा लोभी, क्रोधि, कामिला।जे न भजति अगजगत्स्वामिला ।।४।।
।द्विजा द्रोहि त्या कधि न वदाही।सुरपति सम जरि नृप असला ही ।।५।।

अर्थ- ही कथा शठांना, हट्टी स्वभावाचे असतील त्यांना आणि जे हरिलीला मन लावून ऐकत नाहीत त्यांना सांगू नये.।।३।। जे लोभी, अथवा क्रोधी अथवा कामी असतील आणि जे स्थावर जंगमात्मक जगाच्या स्वामीला(रघुपतीला) भजत नाहीत (त्यांना ही कथा सांगू नये) ।।४।। आणि ब्राह्मणांचा द्रोह करणारा जरी इंद्रासारखा राजा असला तरी सुद्धा त्याला कधीही ही कथा सांगू नये.।।५।। (अनधिकारी आठ)

टीका.चौ.३.(१) शठ- कपटी, धूर्त, लबाड. जे वरवर शिष्टाचाराची भाषा बोलतात, वेष शिष्टांचा करतात पण ज्यांचा ह्दयात कपट असते असे. दांभिक यातच येतात. जे बगळ्यासारखे दांभिक, मोरासारखे कपटी व कावळ्यासारखे धूर्त असतील त्यांना ही कथा सांगू नये. 'बगळे काक बिषायि अति खल ते । जाति अभागि न सरा जवळ ते' (१/३८/३) असे धूर्त, दंभी कपटी फार करून मानसाच्या जवळ जात नाहीत, व कधी आले तरी ते वक्ता, श्रोते व कथा यांतील दोषनिरीक्षणासाठीच येतात व पाठीमागे या त्रिवर्गाची निंदा करतात. (१/३९/१-४ पहा). (क) हठशील= हट्टी स्वभावाचे; आपले म्हणणे, आपला पक्ष न सोडणारे, पक्षाभिमानी, वादविवाद प्रिय असलेले. (ख) श्रवति न मन लाउनि हरिलीला- लक्ष्मण हट्टी किंवा शठ नाहीत, तरी प्रभूंनी त्यांस म्हटले की, 'ऐका मति मन चित्ता लाउनि' (३/१५/१) म्हणून हा स्वतंत्र वर्ग घेणें भाग आहे. शंकरांनीच 'श्रवति कथा लाउनि जे श्रुति मन' (१२६/३) हे स्वतंत्र आवश्यक लक्षण सांगितले आहे. हे ज्याच्या ठिकाणी नसेल तो श्रोता इतर दृष्टीने अधिकारी असला तरी तो अनधिकारी समजावा.

चौ.४.(१) लोभी, क्रोधी किंवा कामी रामकथा श्रवणाचे अधिकारी नाहीत. लोभी मनुष्याला धनाचा लोभ असतो, त्याचे भगवंतावर, कथेवर, किंवा कोणावरही प्रेम उत्पन्न होणें शक्य नसते. क्रोधी असेल तो तिथे श्रवण करताना सुद्धा निष्कारण काही तरी निमित्त काढून कोणाशी भांडू लागेल याचा नेम नसतो, त्यामुळे तो एकच असला तरी सुद्धा सर्वांचा विरस करील.कामी मनुष्य श्रवणास जमलेल्या स्त्रियांकडे पाहू लागेल, कारण 'कामातुराणां न भयं न लज्जा' त्यामुळे तोही व्यग्रता उत्पन्न करील. 'क्रोध्या शम काम्या हरिकथा' सांगणें म्हणजे खडक नांगरून बी पेरण्या सारखेच निष्फळ श्रम. हे तिघेही त्यांचा आवडीचा विषय कथेत न मिळाल्याने नंतर कथेचीच निंदा करू लागतात. (क) जे न भजति अगजगत्स्वामिला- चराचर जगाचा स्वामी जो परमात्मा परमेश्वर, त्याचे जे लोक भजन पूजनादि करीत नाहीत- त्यांना ही कथा सांगू नये. परमेश्वराचे भजन न करता इंद्रादि देव, भूत प्रेतादि-वगैरेंचे भजन करणारे असतील त्यांच्या ठिकाणी मन लावून श्रवण करणे. द्विजसेवेची आवड इत्यादि अनुकुल लक्षणें असली तरी

त्यांना ही कथा सांगू नये, किंवा जे श्रीरघुनाथाला मनुष्य मानीत असतील त्यांना सांगू नये कारण त्यांचा या कथेवर विश्वास बसणार नाही व ते रघुनाथाची, कथा सांगणाराची व कथा ज्यांनी प्रचारित केली त्या कवीची निंदा करू लागतील. त्यामुळे भाविक अर्धवट विश्वासी लोकांचा बुध्दिभेद होईल निंदा करणारांच्या पदरात पापनाश हे फळ न पडता ते नर्काचे अधिकारी होतील. सार हे की या सात प्रकारच्या लोकांना ही कथा सांगणे त्यांच्या हिताचे न ठरता, त्या श्रवणाने ते आपले अधिक अकल्याण करून घेतात; म्हणून त्यांना न सांगणे म्हणजे त्यांच्यावर उपकार करण्यासारखे आहे.

चौ.५.<u>(१)</u> <u>द्विजां द्रोहि त्या कधिं न वदा ही</u>- 'प्रथम विप्रपदिं परमा प्रीती ' ही हरिभक्तिप्राप्तीची पहिली पायरी आहे. 'द्विज सेवा हे व्रत हरितोषण' द्विज सेवा हे हरिकृपा संपादन करण्याचे साधन आहे. त्यामुळे द्विजांचा द्रोह करण्याऱ्यांवर भगवंताची कृपा कधीही होणे शक्य नाही. ब्राह्मणद्रोह करण्याऱ्यांनी एकाग्र चित्ताने श्रवण केले तरी त्यांना काही लाभ होणार नाही. उलट या कथेत जागोजागी विप्रसेवेचे महत्व नाना पुराण निगमागमसंमत वर्णन केलेले असल्याने ते कथेची व कवीची व संताची निंदा करू लागतील. <u>(क)</u> 'सुरपतिसम जरि नृप असला ही' देवराज इंद्रासारखा समर्थ सत्ताधीश परम ऐश्वर्यसंपन्न महाराजाधिराज जर द्विजद्रोही असला तर त्याला सुद्धा ही श्रीरामचरितमानस कथा सांगू नये, मग इतरांची कथा ती काय? हा एक दोष असला तर श्रोत्याची इतर लक्षणें असली तरी ब्राह्मण विरोध -द्वेष-वैर करणारास कधीही सांगू नये. <u>(ख)</u> ही लक्षणें आधी सांगण्यात हेतु इतकाच आहे की या सर्व लक्षणांचा अभाव असून पुढे सांगितलेले आवश्यक लक्षण ज्यांचा ठिकाणी असेल अशा श्रोत्यानांच ही कथा सांगावी.

अधिकारी कोण? (१२८ /६-८)

हिं. । राम कथा के तेइ अधिकारी। जिन्ह के सतसंगति अति प्यारी ।।६।।
। गुरू पद प्रीती नीति रत जेई । व्दिज सेवक अधिकारी तेई ।।७।।
। ता कहँ यह बिसेष सुखदाई । जाहि प्रानप्रिय श्रीरघुराई ।।८।।

म. *। रामकथेचे ते अधिकारी । सत्संगति ज्यांना प्रिय भारि ।।६।।*
। प्रीति गुरूपदी नीति निरत जे । अधिकारी व्दिज-सेवारत ते ।।७।।
। ही तयास विशेष सुखदायक । प्राणप्रिय ज्या श्रीरघुनायक ।।८।।

अर्थ- ज्यांना संतसंगती अत्यंत प्रिय असते तेच या रामकथेचे अधिकारी होत ।।६।। ज्यांचे गुरूपदी प्रेम असेल, जे नीतिपरायण असतील, किंवा जे विप्रसेवा तत्पर असतील ते सुद्धा या रामकथेचे अधिकारी होत.।।७।। ज्याला श्रीरघुनायक प्राणप्रिय असतील त्याला ही कथा विशेष सुखदायक आहे.।।८।।

टीका.चौ.६.<u>(१)</u> <u>सत्संगति ज्यांना प्रिय भारी</u>- इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा ज्यांना सत्संगति भारी प्रिय, अति प्रिय वाटते ते अधिकारी होत. बहुवचनानें सुचविले की असे बहुत असू शकतील. 'प्रथम भक्ति संताची संगति'(३।३५।८) ही ज्यांना अति प्रिय वाटते त्यांना संत संगतीच्या प्रभावाने दुसरी भक्ती 'कथा श्रवणि मग रति होते' सहज प्राप्त होते. संत-सद्‌गुरूमुखाने हरिकथा श्रवण केल्यानेच संत कृपेने प्रेमभक्ती मिळते हे पूर्वी अनेक वेळा दाखविले आहे. १/३८ व ७/६/१ व ७/१२०/१९ पहा.

चौ.७ <u>(१)</u> <u>प्रीति गुरूपदी</u>- गुरूविण नोहे ज्ञान' म्हणून सद्‌गुरूची आवश्यकता आहे; गुरूवर प्रेम असल्याशिवाय गुरूकृपा होणार नाही; म्हणून गुरूपदी प्रीती पाहिजे. पद शब्दाने दास्यभाव व गुरूसेवा सुचविली आहे. सेवेनेच प्रीति प्रगट दिसते. गुरू संत असलेच पाहिजेत. संतसंगतीत काही काळ राहिल्यावर, हरिकथा श्रवणाने गुरूची आवश्यकता पटते; व त्याच किंवा कोणत्या तरि संतानां शरण जाऊन शिष्य बनतो सेवा करतो व हरिकथाश्रवण त्यांचा मुखानेच करतो व त्यांच्या कृपेने पुढील सर्व प्राप्त होते. 'वन्दे बोधमयं नित्यं गुरूं शंकर रूपिणम्) यमाश्रित्य हि वक्रोऽपि चंद्रः सर्वत्र पूज्यते' (१मं.श्लो.३) गुरू साक्षात् शंकर (शंकर) आहेत या भावनेने जे गुरूचरणीं प्रेम करतात ते अधिकारी होत. असे सुद्धा बहुत असू शकतात.

(२) नीतिनिरत जे- जे धर्म नीतिपरायण व धर्मनीति निपुण असतील ते भगवंतास व संतांस ही आवडतात, अनीतिमान आवड नाहीत 'नीतिनिपुण आदर्श जगाला। तन्मन शुभ निज सदन तुम्हाला' (२।१३१।२) असे वाल्मीकीनीं भगवंतास एक स्थान सांगितले आहे. 'नीतिनिपुण' १२७।३ टीकेत विस्तार पहावा. विभीषण नीति निरत व विप्रासाठी संकट सोसणारा होता म्हणून भगवंतास प्रिय झाला. २।१३१।१-२ टी. पहा- व ५।४८ पहा.'जे या बहुवचनाने सुचविले की असे अधिकारी श्रोते बहुत असूं शकतात. (क) व्दिजसेवारत. फार प्रेमाने ब्राह्मणांची सेवा करण्यास तत्पर असतील ते सुद्धा अधिकारी होत. 'प्रभु ब्रह्मण्यदेव' असल्याने विप्रसेवातत्परावर ते फार कृपा करतात. 'त्यजुनि कपट तन मन वचनि जो भूसुर सेवील। मी विधि शिवसुर सर्वही त्याला वश होतील'(३।३३) साक्षात प्रभूला वश करण्याचे हे फार सोपे साधन आहे. याच्या उलट 'श्रुणु गंधर्वा तुला सांगतो। ब्रह्मकुल द्रोहि न मज रुचतो' (३।३४।१) असे प्रभूच म्हणाले आहेत. म्हणून ब्राह्मण द्रोह करणारास अत्यंत अनधिकारी ठरविला आहे. 'ते' शब्दाने सुचविले की असे अधिकारी श्रोते बहुत असूं शकतील.

चौ.८.(१) ही तयास..........श्री रघुनायक- तयास' व 'ज्या' या एकवचनाने सुचविले की असा श्रोता भुशुंडी विप्रजन्मांत होता. (क) विशेष सुखदायक- सुचविले की बाकीच्या चौघांना ही रामकथा सुखदायक होईल. (ख) प्राणप्रिय= प्राणांसारखे प्रिय किंवा प्रांणाहून प्रिय- भाव हा की श्री रघुनायक दर्शनासाठी 'ज्यांचे प्राण व्याकुळ होतात असे. भुशुंडी विप्रजन्मांत असाच होता- 'मनी वासना एक न जागे। केवळ रामचरणिं लय लागे।। रामचरण वारिज जैं देखूं तै निज जन्म-सुफलता लेखूं'(७।११०।६,१४) एवढयासाठीच तो रामकथा श्रवण करून भटकत होता, इतर कशावरही त्याचे प्रेम नव्हते. इतर काही उद्योग तो करीत नव्हता(११०।३-११० रा.पर्यंत पहा). असा असेल त्यालाच ही रामकथा श्रवण केल्यानें विशेष सुख मिळू शकेल. सूचना- मन लाऊन एकाग्रतेने तेच श्रवण करू शकतील की श्रवणाने ज्यास सुख मिळू शकते. असे चार अधिकारी दाखविले व एक विशेष अधिकारी सांगितला. या श्रोत्यानी काय करावे हे आता शेवटी सांगतील-

हिं.दो. । राम चरन रति जो चह अथवा पद निर्बान ।।
।। भाव सहित सो यह कथा करउ श्रवन पुट पान ।।१२८।।

म.दो । रामचरणिं रति वांछि जो अथवा पद निर्वाण ।।
।। भाव सहित तो ही कथा करो श्रवणपुटिं पान ।।१२८।।

अर्थ- ज्याला रामचंद्रांच्या चरणीं दृढ प्रेमभक्ति हवी असेल किंवा ज्याला निर्वाणपद (कैवल्य मोक्ष) पाहिजे असेल त्याने प्रेमाने (भाव सहित) या कथेचे कर्णपुटानीं पान करावे।।दो.१२८।।

टीका- सूचना-१ रामचरितमानस कथा हा विषय आहे. याच्या श्रवणाचे अधिकारी कोण हे मागिल सहा चौपायांत सांगितले. आता या दोह्यांत प्रयोजन व संबंध सांगत आहेत.

(२) रामचरणरति किंवा कैवल्य मोक्ष हे प्रयोजन सांगितले. हेच बा.मंगलाचरणांत 'सिद्धा=पश्यन्ति स्वान्त:स्थमीवरम्' यात ध्वनित केले आहे. या प्रयोजनाचे फळ 'स्वान्त:सुख' मागल्या चौपाईत 'विशेष सुखदायक' या शब्दानी येथे उपसंहारांत दाखविले व ग्रंथाच्या उपक्रमांत 'स्वान्त:सुखाय तुलसी........! (बा.मं.श्ल.७)यात-सांगितले आहे.(क) भावसहित= भक्तिभावयुक्त होऊन=प्रेमाने. (ख) श्रवणपुटिं पान करो- कर्ण, कानरूपी पर्णपुटाने- पात्रांच्या द्रोणाने रामकथा रूपी अमृत प्यावे. कानरूपी पात्राने पीत पीत, मनाने त्याचा स्वाद चाखवित, हृदयात संतोष पावत जावे. 'ती वसुधातलि सुधातरंगिणि'(१।३१।८)ती= रामचरितमानस कथा या पृथ्वी वरील अमृताची नदी आहे. अमृताने स्वाद व तोष मिळतो. 'स्वाद तोष सम सुगति सुधेचे'(१।२०।७) सार हे की या रामकथामृताचे मनन युक्त श्रवण सद्‌गुरूमुखाने प्रेमाने करीत जावे. 'श्रवण' शब्दाने श्रोता वक्ता संबंध किंवा आश्रयाश्रित संबंध सुचविला आहे. बा.कां. मंगलाचरणांत 'यमाश्रित्य हि वक्रोऽपि चंद्र:सर्वत्र वंद्यते (मं.श्ल.३) यातील आश्रित्य शब्दाने आश्रय सद्‌गुरु व आश्रित शिष्य हा आश्रयाश्रित संबंधच सुचविला आहे. या काण्डांत सुद्धा रामकथेला सुधा म्हटले

आहेच 'स्रवत नाथ आनन शशी कथा सुधा रघुवीर। श्रवण पुटी पिउनिया मन तृप्त नव्हे मतिधीर '(५२म). 'काढिति मधुनि कथा सुधा भक्ति माधुरीमंत (१२० रा). भक्तिप्रेम हीच या सुधेची मधुरता आहे.

सूचना २- अधिकारी, विषय, संबंध व प्रयोजन या अनुवंध चतुष्टयाचा उल्लेख श्री तुलसीदासानीं जसा ग्रंथारंभी केला तसाच येथे उपसंहारात शंकरानी केला; व प्रयोजनाचे फल स्वान्त:सुखही दोन्ही ठिकाणीं दाखविले आहे.

सूचना ३-'उमे कथा सब रूचिर वर्णिली: भुशुंडिने जी गरूडा कथिली'(५२।६) याने मुख्य रामकथेचा उपसंहार केला. नंतर पार्वतीच्या प्रश्नामुळे,'ऐक परम पुनीत इतिहास'असे म्हणून पूर्वी' गुप्त ठेवलेल्या रामकथेचा उपक्रम केला. त्या गुप्त रामकथेच्या उपसंहाराचा प्रारंभ 'कथित परम पुनीत इतिहास' (१२६।१)असे म्हणून केला; व कथा यथा मति मी सांगितली' (१२८।५) असे म्हणून त्या उपसंहाराची समाप्ति केली. नंतर दोन्ही कथा मिळून झालेल्या कथेचे अधिकारी वगैरे कोण हे या दोह्या पर्यंत सांगितले. अशी सुंदर संगति या उपसंहारांची लागते. भुशुंडीने मुख्य कथा व पुरवणी कथा अशा संपूर्ण कथेचाच उपसंहार केला.(१२३।१)व आता त्या संपूर्ण कथेचा उपसंहार म्हणजे उमाशंभु संवादाचा उपसंहार शंभु करीत आहेत.(दो.१२९) नंतर याज्ञवल्क्य व तुलसीदास आपल्या कथांचा उपसंहार करतील.

हिं. *।राम कथा गिरिजा मैं बरनी।कलिमल समनि मनोमल हरनी ।।१।।*
।संसृति रोग सजीवन मूरी।राम कथा गावहिं श्रुति सूरी ।।२।।
।एहि महँ रूचिर सप्त सोपना।रघुपति भगति केर पंथाना ।।३।।

म. *।गिरिजे रामकथा कृत वर्णन।कलिमल शमन मनोमल नाशन ।।१।।*
।संजीचनि मुळि भगरोगा ती।रामकथा, श्रुति सूरी गाती।।२।।
।रूचिर हिच्यांत सप्त सोपान।रघुपति-भक्तिचे पंथान।।३।।

अर्थ- गिरिजे! कलिमलांचे शमन करणारी व मनोमलांचा नाश करणारी जी रामकथा तिचे मी वर्णन केले।।१।। भवरोगाला नष्ट करणारी जी संजीवन

मुळी तीच रामकथा असे वेद व विव्दान लोक वर्णन करतात।।२।। हिच्यात सात सुंदर सोपान (जिने) आहेत; ते श्री रघुनाथ भक्तिचे मार्ग आहेत।।३।।

टीका.चौ.१ (१) गिरिजे! या शब्दातील भाव दो.१२६ च्या टीकेत पहावे. (क) कलिमल शमन- कलिमल=कलियुगातील पापे. 'कलि केवल मलमूल मलीनहि। पाप पयोनिधि जन मन मीनहि'(१।२७।४) 'रामकथा कलिबिटप कुठारी। सादर ऐक गिरीश कुमारी'(१।११४।२ शिववचन). 'रामकथा कलि कलुष बिभंजनि' (१।३२।५). (ख) मनोमल= मोह व मोहापासून उत्पन्न होणारे काम क्रोध लोभादि सगळे मनोविकार, मानसरोग, 'भ्रम संदेह मोह निज हरणी'(१।३१।४).'महामोह महिषेश बिशाल हि। रामकथा कालिका कराल हि'(१।४७।६)मोहच सर्व मनोमलांचे मूळ आहे.

चौ.२ (१) संजीवानिमुळि भगरोगा- भवरोगाचा विनाश करणारी संजीवनी मूळी ही रामकथा आहे. मानस रोगांत भुशुंडीने हेच औषध पथ्य व अनुपाना सह सांगितले आहे. (१२२।११-१२ टी.पहा)'रामकथा- 'भवसरिता तरणी' 'मुळी सुजन संजीवनि सुंदर' (१।३१।४,७) असे उपक्रमांत म्हटले आहे. (क) सूरी=विव्दान, पंडित, ज्ञानी, व वेद सुद्धा असेच म्हणतात व रामकथा गातात. वंदे चारीवेद....ज्या स्वप्निहि ना खेद वर्णित रघुवर विशद यश'(१।१४ य) टीका पाहावी.

चौ.३ (१) रूचिर हिच्यात सप्त सोपान....पंथान- रामचरित मानसात सात कांडे रूपी सात सोपान आहेत. त्यांपैकी प्रत्येक जिन्याने (सोपानाने) श्री रघुपतिभक्ति पर्यंत जाता येते. पंथान= मार्ग, रस्ते. दिल्ली शहरात निरनिराळ्या दिशां कडून अनेक लोह मार्ग (सात रेल्वे) आहेत. कोणी कोणत्याही मार्गाने गेला तरि दिल्लीत पोचतां येते. त्याप्रमाणें प्रत्येक सोपान रामभक्ति देण्यास समर्थ आहे. 'सप्त प्रबंध सुभग सोपान हि' (१।३७।१ टी.प.) असे ग्रंथाच्या उपक्रमांत म्हटले आहे. सात काण्डे स्वयंपूर्ण कशी आहेत हे प्रस्तावनेत विशेषत: महाकाव्य लक्षणांत दाखविले आहे.

सूचना- रघुपति भक्तिच्या या सुंदर मार्गाने कोण जातात व त्यांना काय मिळते हे- पुढील तीन चौपायात सांगतात-त्यां पुढील दोन चौपायात व दोह्यात गिरिजा स्वानुभव सांगते व उमाशंभु संवादाचि समाप्ति होते.

हिं. *।अति हरि कृपा जाहि पर होई।पाउँ देइ एहि मारग सोई।।४।।*
।मन कामना सिध्दि नर पावा।जो यह कथा कपट तजि गावा।।५।।
।कहहिं सुनहिं अनुमोदन करहीं।ते गोपद इव भवनिधि तरहीं।।६।।

म *।होते अति हरि कृपा जयावर।पाय देइ तो या मार्गावर ।।४।।*
।पावति मन कामना सिध्दि ते।त्यजुनि कपट ही कथा गाति ते।।५।।
।श्रवण कथन अनुमोदन करती।ते भवनिधि गोपद इव तरती ।।६।।

अर्थ- ज्याच्यावर अत्यंत हरिकृपा होते तोच या मार्गावर पाऊल टाकतो।।४।। जे ही कथा कपट टाकून गातात, त्यांच्या मनातील सर्व कामना सिध्दीस जातात।।५।। जे ही कथा ऐकतात, सांगतात व हिची प्रशंसा करतात ते भवसागर गोपदा सारखा तरतात।।६।।

टीका.चौ.४ (१) सात सोपान हे रघुपतिभक्तिचे सुंदर मार्ग असले तरी या मार्गानी जाणारे फार थोडे कां? याचे उत्तर या चौपाईत आहे. (क) होते अति हरिकृपा जयावर सात्विक श्रद्धारूपी प्रवासाची सामुग्री मिळणे हरिकृपेवर अवलंबून असते. संतांची साथ रूपी मार्गदर्शकाची सोबत. हरि कृपे शिवाय मिळत नाही; मार्गांत विघ्ने न येणें हरिकृपेवरच अवलंबून असते; आणि या मार्गाने चालत जाण्याची ताकद येणे हरिकृपेवरच अवलंबून असते. या मार्गाने जाण्याची आवड हरिकृपेशिवाय उत्पन्न होत नाही. म्हणून म्हटले कीं अत्यंत हरिकृपा ज्याच्यावर होते तोच एखादा भाग्यवान या मार्गावर पाऊल टाकतो. 'श्रद्धा पथधन ना जया नहि संतांची साथ। त्यांना मानस अगम अति ज्या प्रिय ना रघुनाथ' (१।३८। टी.प.) ही कथा श्रवण करणें निराळे व कथेत सांगितल्या प्रमाणें त्या मार्गाने चालणें' आचरण करणें यात महदंतर आहे. 'सरि या येता बहुत कठिणता' (१।३८।६) पासून 'मोह मान मद सुघोर कानन। सरिता नाना कुतर्क भीषण'(१।३८।९) पर्यंत

सटीक पहा. त्यात विविध विघ्नांचे वर्णन केले आहे. नंतर म्हणतात की 'त्या न सकल हीं विध्ने बाधिति। सुकृपे राम जयास विलोकिति' (१।३९।९)सुकृपे अति कृपेने. असे उपक्रमांत सांगितले तेच येथे उपसंहारात सांगितले. ल.ठे. 'जयावर' आणि तो'या एकवचनाने सुचविले की कोणी एखादा विरळाच या मार्गाने जातो. उपक्रमांत सुद्धा 'त्या'व 'ज्यास ' असे एकवचनच वापरले आहे.

चौ.५ <u>(१)</u> मनकामना= मनांतील कामना, इच्छा. येथे 'जे ते' असे बहुवचन वांपरून सुचविले कीं मनकामना सिध्दी साठी या कथेचा उपयोग करणारे पुष्कळ असतात. आर्त जिज्ञासु व अर्थार्थी (१।२२।१-५ टी.पहा) याच्या ज्या कामना असतील त्या जशा रामनामाने सिध्दीस जातात तशाचा या रामकथेच्या श्रवणाने गानाने सिध्दीस जातील, पण एका कुपथ्याचा त्याग केला पाहिजे. <u>(क)</u> <u>त्यजुनि कपट</u>- श्री रघुनाथा शिवाय व रामकथे शिवाय इतर कोणाची आशा, इतर कोणाचा व इतर साधनांचा भरवसा सोडला पाहिजे. म्हणजेच पूर्ण अनन्य गतिक झाले पाहिजे.

चौ.६ <u>(१)</u> श्रवण कथन अनुमोदन करती...तरती. श्रवण करतात, नंतर ही कथा दुसऱ्यांस सांगतात व या कथेची इतरां जवळ प्रशंसा करतात, त्याना महा दुस्तर भवसागर गाईच्या खुराने' (पादाने) पडलेल्या खाडयांतील जला सारखा तरून जाण्यास अगदी सुलभ होतो. रामनामा बदल असेच म्हटले आहे.१।११२।३ पहा. 'कलियुग' केवळ हरिगुणगाया। भवठावा नर पावति गाता'(७।११३।४)गोपद कसे तरून जावे असा विचार मुंगिला सुद्धा करावा लागत नाही. मग मनुष्यास असा विचार पडणेंच शक्य नाही. आता गिरिजा आपला अनुभव सांगते.

हिं. *।सुनि सब कथा हृदय अति भाई।गिरिजा बोली गिरा सुहाई।।७।।*
।नाथ कृपाँ मम गत संदेहा।राम चरन उपजेउ नव नेहा।।८।।

म. *।श्रवुनि कथा सब हृदि अति भरली।रूचिर गिरा गिरिजा उद्गिरली।।७।।*
।नाथ कृपे मम गत संदेहो।रामचरणिं नव उपजे स्नेहो।।८।।

अर्थ- श्रृणु- सर्व कथा श्रवण करून ती पार्वतीला फार आवडली; तेव्हा गिरिजा सुंदर वचन बोलली (उद्गारली)।।७।। हे नाथ! आपल्या कृपेने माझे सर्व संदेह गेले आणि श्री राम चरणी नवीन स्नेह उत्पन्न झाला।।८।।

टीका.चौ.७ (१) श्रवुति कथा सब- बालकाण्डा पासून मागल्या चौपाई पर्यंत जी कथा शंकरानी सांगितली व जी संपूर्ण कथा ऐकली ती पार्वतीला फार आवडली. (क) गिरिजा उद्गिरली= गिरिजा उद्गारली, म्हणाली, सहजोद्गार काढले. ती म्हणाली की मी प्रथम प्रश्न विचारले तेव्हा माझ्या हृदयांत गिरि सारखी संदेह रूपी जडता होती. त्यामुळे श्री रघुनाथचरित्रांतील गूढ रहस्याचे आकलन मला करता न आल्याने श्री रघुनाथ चरणीं प्रीति नव्हती व त्यामुळे मला भक्ति आवडत नव्हती; व ज्ञानाकडेच जास्त ओढा होता; पण आपल्या कृपेने ती जडता आता राहिली नाही. (ख) रूचिर गिरा- रामभक्तिने मी कृतार्थ हे सत्य तिने आपल्या वाणीने सांगितले म्हणून गिरा रूचिर.

चौ.८.(१) नाथ कृपे. नाथ! आपल्या कृपेने, असा अर्थ आहे. भाव हा की तुम्ही प्रेमाने व आदराने कथा सांगितलीत आणि कृपा केलीत म्हणून माझे संदेह नष्ट झाले.'प्रभो! प्रसादे तव, हृदयीं मम। संशय शोक न मोह नसे भ्रम।। पावन रामगुण ग्रामां श्रुत। चित्त तव कृपे विश्रामे युत।(१५।६-७) असे गरूड भुशुंडीला म्हणाला, तोच भाव येथे आहे. ल. ठे. ज्याच्या बद्दल संदेह = संशय असतो त्याबद्दल प्रीति नसते. असलेली प्रीति सुद्धा संशय येताच नष्ट होते, किंवा कमी होते. 'संशयात्मा विनश्यति' (भ.गी) संदेह गेल्या शिवाय ज्ञान होत नाही; प्रभाव जाणल्या शिवाय प्रतिति=विश्वास उत्पन्न होत नाही. प्रतीतीवाचून प्रीती नाही. आणि प्रीती वाचून भक्ति दृढ होत नाही. (८९।७-८ टी.पहा.) (क) गत संदेहो पार्वतीला कोणते संदेह होते ते पहा- 'राम अयोध्या नृप सुत तो ही।कुणि कि अगुण अज अलक्षगति ही।।८।।ब्रह्म कसा जर भूपसुत स्त्रीविरहे धी भ्रांत। बघुनि चरित महिमा श्रवुनि मम मतिला भ्रम नांत।।१०८।। व्यापक अनीह विभु जर कोणी। नाथ वदा मज समजावोनी'(१।१०८।१)

(२) 'राम चरणिं नव उपजे स्नेहो' -'रामचरणिं नव रति उपजली।

'मायाजनित विपद नासली। मोह जलधिं जहाज जाहला। दिधले नाथ विविध सुख मला' (१२५।२-३) असे गरूड म्हणाला. तेच सर्व भाव येथे आहेत नव स्नेहो= नव स्नेह =नव रति: त्या दोन चौपायाची टीका पाहावी. नव=नवा, सदा नवा राहणारा, स्नेह=प्रेम, म्हणजेच अनपायिनी प्रेमभक्ति. पूर्वी भक्ति उपजली होती, पण ती दृढ नव्हती; ती आतां दृढ झाली, गरूडाचे असेच झालेले तेथे (७।१२५।२)टीकेत दाखविले आहे. <u>(क)</u> पार्वतीच्या (१।१०८।१-३ मधील) शंकेचे समाधान केल्यावर कविनी म्हटले आहे की. 'श्रुत्वा भ्रमभंजक शिववचना। सकल विलयि गत कुतर्क रचना।। रघुपति पदि ये प्रतिती प्रीती।। दारूण असंभावना गत ती (१।११९।७-८)।। गिरिजा म्हणाली- 'परिसुनि तुमचे वच सम शशिकर। फिटे मोह शरदातप अतितर।। तुम्हि कृपालु सब संशय हरले। रामस्वरूप मज आकळले (१।१२०।१-२) या प्रमाणे प्रतीति येऊन प्रीति उत्पन्न झाली, व मोह संशय शंकर कृपेने नष्ट झाल्याचे गिरिजेने कबूल केले. परंतु ही कबुली महेशांच्या भयाने दिली गेली होती. पार्वतीने आपला संशय व सर्व प्रश्न विचारल्यावर शंकरानी किंचित आवेशाने ध्वनितार्थाने जो ताशेरा झाडला (१।११३।२-७ टी.पहा)व तिच्या शंकेचे उत्तर देण्यास प्रारंभ करण्यापूर्वी उघड उघड म्हणाले की. 'श्रवति वदति असं अधम ज्या लागे मोह पिशांच।। पाखंडी हरिपद बिमुख जाणति मृषा न साच.(१।११४) आणि शंकेचे समाधान करीत असता बराच वेळ पार्वती काहीच बोलली नाही तेव्हा शेवटी म्हणाले की. 'तो परमात्मा राम भवानी!। भ्रम तिथ अति अविहित तव वाणी।। हृदयि आणता संशय असले। ज्ञान विरति गुण पळती असले=असलेले)' (१।११९।५-६) या वचनांनीं घाबरून जाऊन पार्वतीने कबूली दिली, पण संशय संदेह गेले नव्हते; हे तिच्या येथील वचनाने स्पष्ट होते. ही वस्तुस्थिति शंकरानी जाणली, कारण, मोह संशय गेले असे म्हटल्यावर तिने धन्य झाल्याचे, कृतकृत्य झाल्याचे उद्‌गार काढले नाहीत, म्हणूनच पुढे शंकर म्हणाले की, मोहभ्रमाची छाया अजून आहेच.

<u>(२)</u> 'बघुति भवानी यच्चरिताला। सती शरीरी भ्रमिष्ट झाला।।ती छाया तव अजुनि न गता। भ्रमरूजहारी श्रुणु तच्चरिता (१।१४१।४-५) 'रामस्वरूप मज आकळले' असे पार्वती तेव्हा म्हणाली, पण ते कसे आहे हे तिने सांगितले नाही.

पण पुढे सर्वमुख्य रामकथा श्रवण केल्यावर तिचा मोह जेव्हा खरोखर गेला तेव्हाचे तिचे उद्‌गार ऐका- 'धन्य धन्य मी धन्य पुरारी। रामगुणां श्रुत भवभयहारी।। तुमच्या कृपे कृपायतन अतां कृतार्थ, न मोह।। विदित राम महिमा, प्रभु चिदानंद संदोह.'(७।५२ रा.) त्यावेळी (१।१२०।१-४) जर मोह नष्ट झाला होता तर आता जो मोह गेला तो कुठला? पण या मोहाचे व त्याच्या पासून उत्पन्न होणाऱ्या अभिमानाचे असेच आहे; गेल्यासारखे वाटतात त्या ज्ञानी व्यक्तिला पण हृदयाच्या एका कोपऱ्यात लपलेले असतात. मोह खरोखर गेल्या बरोबर येथे धन्य झाल्याचे उद्‌गार सहज बाहेर पडले. पूर्वी मोह गेल्याचे म्हणाली तेव्हा हर्ष झाला नव्हता, तो या दुसऱ्या वेळी झाला आहे. 'श्रुवुनि कथा शुभ उमा हर्षली' (७।७३।१) हा रसविशेष= प्रीतिरस, भक्तिरस, परंतु तिची ती दशा पाहून व तिने नंतर विचारलेले प्रश्न ऐकून शंकर म्हणाले की. 'धन्य सती पावन तूझी मति। थोडि न, रघुपति पदी प्रीति अति' (७।५५।७) ही प्रीति मुख्य रामकथा ऐकल्यावर प्राप्त झालेली आहे. ती अति आहे. पण दृढ, अनपायिनी नाही. ही जुनी प्रीति आहे. त्यानंतर पुढील सर्व कथा श्रवण केल्यानंतर या अति प्रीतिचे दृढ प्रीतितं. अनपयिनी प्रेमभक्तितं रूपांतर झाले त्याला 'नव स्नेह' असे म्हटले. स्नेह-प्रीति, प्रेम, अनुराग व भक्ति हे शब्द समानार्थक वापरलेले आहेत; परंतु 'प्रीति विना नहि भक्ति सुदृढता'(७।८५।८) या वचनामुळे प्रीतिची परिपक्वदशा म्हणजे भक्ति=प्रेमभक्ति असे म्हणणे भाग आहे. पुढे गिरिजा सांगतेच कीं दृढ रामभक्ति उपजली.

हिं.दो. । मैं कृतकृत्य भयउँ अब तव प्रसाद बिश्वेस ।
।उपजी राम भगति दृढ बीते सकल कलेस ।।१२९।।

म.दो. । मी कृतार्थ झाले अतां कृपे तव हि विश्वेश ।।
।। रामभक्ति दृढ उपजली गेले सगळे क्लेश ।।१२९।।

अर्थ- अहो विश्वेश्वर! मी तुमच्याच कृपेनें आता कृतार्थ (कृतकृत्य) झाले; (माझ्या हृदयात) दृढ रामभक्ति उपजली आणि (मोहसंशयजनित) सगळे क्लेश गेले।।१२९।।

टीका-(१) विश्वेश= विश्वाचेईश=विश्वेश्वर. बालकांडांत प्रथम विनंती करताना 'विश्वनाथ मम नाथ पुरारी! त्रिभुवन जाणे महिमा भारी'(१।१०७।७)यात विश्वनाथ=विश्वेशच म्हटले आहे. शेवटी कृतार्थता व कृतज्ञता प्रगट करतात तोच शब्द वापरला. भाव हा की विश्वातील जीवाचे अज्ञान, मोह हरण करून त्यांना कृतार्थ करणारा प्रभाव जेवढा आपला आहे, तेवढा कोणाचा नाही. असे मी पूर्वी म्हटलेले माझ्या चांगले प्रतीतीस आले. 'त्रिभुवन-गुरु तुम्हि वेद बानती।।क्षुद्रजीव किति आन जाणती' (१।१११।५) असे पार्वतीने त्यावेळी म्हटले आहे. 'ज्ञानं महेश्वरादिच्छेद' (क) 'कृपे तव हि' आपण कृपा केलीत म्हणूनच श्री रघुनाथा विषयी माझ्या मनांत उत्पन्न झालेले मोह भ्रम संशय नष्ट झाले. इतर कोणी हे करू शकला नसता. (ख) मी कृतार्थ झाले अता- आता मला काही करावयाचे राहिले नाही. मिळण्याचे वा मिळविण्याचे काही उरले नाही. भाव हा की' माझे जीवन जन्महि सुफलित'(१२५।९) (ग) रामभक्ति दृढ उपजली- हे कृतार्थ होण्यास कारण झाले. नव स्नेह=दृढ रामभक्ति हे येथे स्पष्ट केले. (घ) गेले सगळे क्लेश- श्री रघुनाथाच्या चरित्रामुळे श्री रघुनाथाच्या स्वरूपा विषयी मोह व संशय उत्पन्न होऊन त्यामुळे जे क्लेश होत होते ते गेले. हा मोह भगवंताच्या विद्या मायेने उत्पन्न केलेला होता. तिला आत्मस्वरूपा विषयी अज्ञान (मोह) भ्रम संशय नव्हते; म्हणून येथे अविद्यादि पंच क्लेशाचे ग्रहण करणें चुकीचे ठरेल. 'मायाजनित विपद नासली' (१२५।२) असे गरूड म्हणाला. तेथे टीकेत केलेला विस्तार पाहावा. गरूडाला सुद्धा विद्यामायेनेच विपत्ति भोगाव्या लागल्या. ल.ठे. येथे हे दाखविले की, विद्यामाया (हरिमाया) जनित क्लेश असोत की. अविद्यामाया जनित क्लेश असोत; सगळे क्लेश सद्‌गुरूकृपेने, रामकथा श्रवणाने, दृढ रामभक्ति प्राप्त झाल्याने नष्ट होतात.

येथे पार्वतीचे भाषण समाप्त झाले व उमा शंभु संवाद उपसंहार याज्ञवल्क्यानी केला. पुढील चार चौपायांत याज्ञवल्क्य आपल्या कथेचा उपसंहार करतात. भरव्दाज कथा श्रवणांत इतके तल्लीन झालेले आहेत की ते बोलू शकत नाहीत; म्हणून उपसंहारात त्यांचे भाषण नाही.

हिं. ।यह सुभ संभु उमा संबादा।सुख संपादन समन बिषादा।।१।।

।भव भंजन गंजन संदेहा।जन रंजन सज्जन प्रिय एहा।।२।।

म. ।हा शुभ शंभु उमा संवाद।सुख संपादन शमन विषाद।।१।।
।संदेहा गंजन भवभंजन।हाचि सज्जनां प्रिय जन रंजन।।२।।

अर्थ- हा कल्याणकारक (शुभ) शंभुउमा संवाद विवादांचा नाश करून सुख प्राप्त करून देणारा आहे।।१।। हा संदेहांचा नाश करून भवाचा बिनाश करणारा आहे. (म्हणून)संताना हाच (एहा) प्रिय वाटतो व हा सर्व लोकांचे मनोरंजन करणारा आहे.।।२।।

टीका.चौ.१-२ <u>(१)</u> <u>हा शंभु उमा संवाद</u>- याज्ञवल्क्य उमाशंभु संवादाचीच महती उपसंहारात सांगत आहेत; कारण त्यानीं उपक्रमांतच म्हटले आहे की. 'अता यथा मति सांगु तो उमा शंभु संवाद।।...श्रुणु मुनि मिटे विषाद'(१।४७) <u>(क)</u> उपक्रमात 'उमाशंभु'असे म्हटले कारण त्यात प्रथम बोलण्यास प्रारंभ उमेने केला.येथे उपसंहारात शंभुउमा संवाद म्हटले; कारण शंभूचे भाषण आधी समाप्त झाले आणि शेवटी उमा बोलली. म्हणजेच संवादाचा उपक्रम जसा उमेने केला तसा उपसंहारही तिच्याच भाषणाने पूर्ण झाला. <u>(ख)</u> सुखसंपादन शमन बिषाद- बिषादाचा नाश झाल्या शिवाय सुख होत नाही. पण विषादाच्या कारणांचा नाश झाल्या शिवाय विषादाचा नाश होत नाही. विषादाचा नाश झाल्याने सुख मिळतेच असे नाही. दुःखाचा अभाव म्हणजे सुख नव्हे म्हणून सुखप्राप्तीचा ही उल्लेख केला. भरव्दाजांच्या विषादाचे कारण रघुनाथाच्या चरित्रा विषयीचे संशय हे होते. आणि इतरानाही संशयानी विषाद होतोच. <u>(ग)</u> <u>संदेहा गंजन</u>- संदेह=संशय, संशय भ्रम मोहानेच विषाद=दुःख, प्राप्ति होते. हा संवाद सर्व प्रकारच्या संशय मोहादिकांचा विनाश करणारा आहे. मोहाचा विनाश झाला की भवाचा विनाश होतो म्हणून 'भवभंजन' करणारा आहे असे म्हटले. 'भ्रमसंदेह-मोह निज हरणी। करीं कथा भवसरिता तरणी'(१।३१।४) 'बुध विश्राम सकल जन रंजनि'(१।३१।५)असे ग्रंथाच्या उपक्रमात म्हटले तेच येथे उपसंहारात सांगितले की 'हाच सज्जनां प्रिय जन रंजन' (१।३१।४-५) टीका पहावी. तसेच 'सज्जन कुमुद चकोर मन हितकर अति लाभास' (१।३२ म) टीका पहावी. सज्जन=संत,

बुध आणि जन= इतर लोक. 'विषयि जनांसहि हरिगुण-आगर) श्रवण सुखद, हृदया प्रसन्न कर' (७।५३।४) हाच अर्थ येथे 'जन रंजन'चा आहे.

हिं. *।राम उपासक जे जग माहीं।एहि सम प्रिय तिन्ह कें कछु नाहीं।।३।।*
।रघुपति कृपाँ जथामति गावा।मैं यह पावन चरित सुहावा।।४।।

म. *।राम उपासक जगामधे जे।प्रिय यासम काही ना त्याते।।३।।*
।रघुपति कृपे यथामति गीत।मी हे सुंदर चरित पुनीत।।४।।

अर्थ- जगामधे जे रामभक्त असतील त्याना या रामचरितमानसा सारखे दुसरे काहीं प्रिय नाहीं।।३।। हे सुंदर पुनीत रामचरित्र श्री रघुपतीच्या कृपेने यथामति विस्तारपूर्वक सांगितले।।४।।

टीका.१ चौ.३.(१) रामभक्ताना हे रामचरितमानस इतर कोणत्याही हरि कथेपेक्षां अत्यंत प्रिय वाटते. रामभक्त नसलेल्या संताना सुद्धा प्रिय वाटते हे आधी सांगितले आहे. पण रामभक्तानां हे प्रियतम आहे. ही अगदी सत्य वस्तुस्थिति आज ही प्रत्यक्षात येत आहे. रामभक्त नसून रामभक्तिमार्गाचे थोडेसे साधन करणारांना सुद्धा फार प्रिय वाटते. 'ही तयास विशेष सुखदायक। प्राणप्रिय ज्या श्री रघुनायक' (१२८।८) असे शंकर म्हणाले.

चौ.४. (१) हे सुंदर चरित पुनीत- सांगू रामकथा अतिसुंदर' (१।४७।५) असे उपक्रमांत म्हटले. (क) रघुपतिकृपे- 'कृपा करा प्रणमुनि रघुनाथा। बिशद वर्णीतो तद्गुण गाथा।। ज्या जन जाणुनि कृपाऽऽधार दे। नाचवि कवि उर अजिरि शारदे' या प्रमाणें रघुनाथाला वंदन करून त्यांच्या कृपेच्या आधारावर (कृपा+आधार) याज्ञवल्क्यानीं कथा सांगण्यास आरंभ केला होता. (१।१०५।६,६) तेच येथे सांगितले. 'कलिमल शमन मनोमल नाशन' असे शंभु म्हणाले; त्याचे सार येथे 'पुनित' शब्दाने सांगितले. (ख) कृपा वदा विस्तारी' (१।४७।१) अशी विनंति भरव्दाजानीं केली होती. येथे म्हटले यथामति गीत= कथा विस्ताराने सांगितली. असे उपक्रम व उपसंहार यात पूर्ण साम्य आहे. याज्ञवल्क्य-भरव्दाज संवादाची समाप्ति येथे झाली आता श्रीगोस्वामी कथेचा

उपसंहार करतील.

हिं. ।एहिं कलिकाल न साधन दूजा।जोग जग्य जप तप ब्रत पूजा।।५।।
।रामहि सुमिरिअ गाइअ रामहि।संतत सुनिअ राम गुन ग्रामहि।।६।।

म. ।या कलिकालीं दुजें न साधन।योग,यज्ञ,जप,व्रत,तप पूजन।।५।।
।रामचि गाणें स्मरणें रामहि।श्रवणें संतत रामगुण वृंदहि।।६।।

अर्थ- या कलिकालांत योग, यज्ञ, जप, तप,व्रत, पूजन इत्यादि दुसरे साधन (मुख्य) नाही.।।५।। रामगुणांचेच गान करणें, रामनामाचेच स्मरण करावे आणि सतत श्री रामचंद्रांच्या गुणसमूहाचे (चरित्राचे) श्रवण करावे.।।६।।

टीका.चौ.५ (१) कलिकालीं- 'तो कलिकाल कठिन उरगारी। पाप परायण सब नर नारी।।८।। ग्रस्त कलिमले धर्म सब लुप्त सकल सद्ग्रंथ' (दो.९७ रा.म.पहा) बाल काण्डांत म्हटले की. 'कलियुगीं कर्म न भक्ति विवेकू। रामनाम अवलंबन एकू' (१।२७।७) भुशुंडीने कलिप्रभाव वर्णनांत सांगितले कीं 'योग यज्ञ कलियुगिं ना ज्ञानहि । एक अधार रामगुण गान हि'।। 'कलियुगि केवळ हरिगुण गाथा' 'सत्यी त्रेती व्दापरीं पूजा मख नी योग।। देती गति ती कलि हरि नामे पावति लोक.'(७।१०२ म-१०३।५) यांवरील टीका पाहावी. योगाने कृतयुगांत, यज्ञानीं त्रेतायुगात, यज्ञांत जप करावा लागतोच तप हे पहिल्या दोन युगांतले सामान्य साधन होते. व्रत व पूजनाने व्दापर युगात मनुष्याला भवमुक्त होता येत असे, पण ही साधने करण्यास लागणारे आयुष्य,तितिक्षा, सात्विक बुध्दि; यज्ञ यागादिकात धन, शुध्द सात्विक पूजा द्रव्यें, हवनाची द्रव्यें इत्यादि सर्व साधनें कलियुगात यथाविधि घडणें जवळजवळ अशक्य म्हणून पहिल्या तीन युगांची साधने कलियुगात मुख्य नाहीत; म्हणून सांगतात-

चौ.६ (१) भुशुंडीने कलियुगात मुख्य तीन साधने सांगितली. हरिनाम,(७।१०२ म) हरिगुणगान(१०३।५) आणि हरिगुणगाथा = हरिकथा, रामचरित्र श्रवण.तीच येथे या चौपाईत सांगितली आहेत, म्हणून रामचि गाणें = रामगुणगान,=नाम गुण संकीर्तन. स्मरणें रामहि = रामनाम स्मरण, म्हणजे

मुखाने रामनामोच्चार='नाम जपुनि जागति' (१।६।३।टी.पहा) आणि 'श्रवणें सतत रामगुण वृंदहि= सतत रामकथा,रामचरित्र, श्रवण करणें. या तीन साधनांतील कोणते तरि एक मुख्य करून बाकीची तदंगभूत मानून सर्वकाल या तीन साधनांतच घालविला पाहिजे हे सतत(संतत) शब्दाने सुचविले आहे. सतत रामकथा श्रवण किंवा सतत रामगुणगान सगळ्यानांच साधेल असे नाही.कारण श्रवण करण्यास कथा सांगणारा भेटला पाहिजे. रामगुणगान=रामकथा सांगणें असाहि अर्थ होतो. शक्य असेल तेव्हा तेंही करावे किंवा रामगुण-नाम संकीर्तन वैखरीने करावे; पण हे ही सर्व दिवस करता येणे शक्य नाही; म्हणून निष्कर्ष हा निघतो कीं रामनाम हे मुख्य साधन करून बाकीची दोन अनुकूलते प्रमाणें करावी. हे तुलसीदास आपल्या मनास सांगत असले तरि कलियुगातील सर्व मानवां साठीच हे सांगितले आहे.

हिं. *।जासु पतित पावन बड़ बाना।गावहिं कवि श्रुति संत पुराना।।७।।*
।ताहि भजहि मन तजि कुटिलाई।राम भजे गति केहिं न पाई।।८।।

म. *।यस्थ पतित पावन बाणा अति।श्रुति पुराण कवि साधू वानति।।७।।*
।त्यजुनि कुटिलता तया भज मना।राम भजुनि गति लब्ध न कवणा।।८।।

अर्थ- ज्याचा पतित पावन हा मोठा बाणा (ब्रीद) आहे असे वेद, पुराण, संत व कवि वर्णन करतात.।।७।। त्याला हे मना! कुटिलता सोडून भज. (शरण जाऊन भजन कर) रामास भजल्यानें गति कोणाला नाहीं मिळाली?।।८।।

टीका.चौ.८.(१) यस्य = ज्याचा, पतितपावन = पतिताला पावन करणारा. बाणा=ब्रीद, पण, प्रतिज्ञा, प्रस्तावनेंत पृष्ट ५४३(२९-३७) पहा. तेथे प्रभूचे नऊ पण दिले आहेत. (क) पतितपावन बाण्याचा व कलियुगाचा फार निकट संबंध आहे; कलियुग पापपयोनिधि आहे; आणि त्यांत 'जन-मन मीन' झालेले असतात. अति पापी, स्वधर्मभ्रष्ट, यानां पतित म्हणतात; तीन दिवस संध्या न करणारा किंवा सात दिवस प्रात: स्नान सूर्योदयाच्या पूर्वी स्नान न करणारा ब्राह्मण पतित होतो. अशी आणखी पुस्कळ कारणें आहेत कीं ज्यातून सुटलेला कलियुगात विरळाच.

पतिताना पावन करून घेणारे 'गतप्रदायक दीनदयाल हि' (१।१३।७) भगवान श्री रघुपति आहेत. (ख) श्री तुलसीदास कलियुगात अवतरले; म्हणून त्यानी कलियुगातील साधनांचा मुद्दाम स्वतंत्र उल्लेख ठिकठिकाणीं केला आहे. (ग) कुटिलता= इतरांची आशा, भरवसा, यांचा त्याग सर्वत्र अत्यंत आवश्यक म्हणून सांगितला आहे. भज=शरण जा व भजन कर. रामभजनानीं गति मिळाली नाही असा पतित कोणी नाही. आता काहीं पतितांची उदाहरणें देतात:-

हिं. छं. *। पाई न केहिं गति पतित पावन राम भजि सुनु सठ मना।*
।।गनिका अजामिल ब्याध गीध गजादि खल तारे घना।।
।आभीर जमन किरात खस स्वपचादि अति अघरूप जे।
।।कहि नाम बारक तेपि पावन होहिं राम नमामि ते।।१।।

म. छं. *। गति कुणा प्राप्त न पतित पावन राम भजुनी शठ मना!*
।। गंणिका अजामिल मृगयु गृध्र गजादि तारित खलगणां।।
। आभीर यवन किरात खस चाण्डाल अति अघरूप जे।
।। ते नाम सकृदपि वदत पावन होति राम नमामि ते।।१।।

अर्थ- अरे! मूर्ख मना! पतित पावन श्री रामचंद्रांस भजून गति कोणाला नाही मिळाली? गणिका, अजामिळ, व्याध, गिधाड आणि गज इत्यादि दुष्टांच्या समूहानां (प्रभूनी) तारलेच. आभीर, यवन, किरात, खस,चांडाल इत्यादि जे अति पापरूप असलेले ते सुद्धा एकदांच (राम)नाम उच्चारल्याने पावन होतात. हे राम! मी तुला नमस्कार करतो।।छ१।।

टीका.-(१) पतित पावन राम- कोणी कितीही महापापी, पतित असो, तो अनन्य भावाने श्री रघुनाथास शरण गेला कीं ते त्याला पूर्ण पावन करतात. 'शरण जात' मजसे अघराशी' होति शुध्द..' (७।१२४।८) असे भुशुंडी म्हणाला. 'चराचरां द्रोहि नर असुनी । येति सभय मज शरण लक्षुनी। त्यजुनि मोह मद छलादि नाना! सद्य साधुसम करतो त्यानां (५।४८।२-३) 'कोटि विप्रवध पाप जयाही। येतां शरण न तजूं तयाही।। सम्मुख होइ जीव मम जेव्हा। जन्म कोटि अघ नासे तेव्हां'

(५।४४।१-२) परंतु 'सहज शील कीं हे पाप्यांचे।सदा वावडे मम भजनाचें'(५।४४।३) असे श्री रघुनाथच म्हणाले आहेत. येथे भजणें = शरण जाऊन भजन करणें. (क) गति कुणा प्राप्त न- गति=सुगति, मोक्ष, मुक्ति इ. वाटेल तितकीं घोर पातके करणारांना सुद्धा सुगति प्राप्त झालेली आहे. आता पांच उदाहरणें देतात.

(२) गणिका, अजमिळ, मृगयु = व्याध, गृध्र, गज. 'गज गणिका अति पतित अजामिळ। मुक्त होति हरिनाम बलें किल'(१।१२६।७) या चौपाईच्या टीकेत गज, गणिका व अजामिळ यांची अल्पचरित्रे दिली आहेत. 'गति मिळते' याचा अर्थ वरील चौपाईतील 'मुक्त होति' शब्दानीं स्पष्ट केला आहे. (क) मृगयु=व्याध. प्राचीन काळी रत्नाकर नांवाचा एक व्याध (शिकार करणारा)होता. तो ब्राह्मण असून व्याधाचा धंदा करीत असे, शिवाय वनांतून जाणाऱ्यानां ठार मारून सर्व लुटीत असे. एक दिवस देवर्षी नारद त्या वनांतून जात असतां त्याने त्यांस अडविले. हाच रत्नाकर व्याध पुढे वाल्मीकी ऋषि झाला.(१।३।३।पहा) (ख) गृध्र- जटायु, संपाति, यांच्या कथा मानसात आहेतच. गज = गजेंद्र मोक्षात प्रसिध्द असलेला.

(३) गणिका अजामिळ व्याध, गृध्र व गज या पांचाचाच उल्लेख करण्यात हेतु.- (क) गणिक-वेश्या. 'क्षणिक सुखा जन्मांतरि कोटी। दु:ख न समजे ती अति खोटी'(३।६।६) 'नारि बिष्णुमाया प्रगट' वेश्या अज्ञानी जड मूढ असते. अविद्येची मूर्तीच (अविद्या माया) (ख) अजामिळ- द्रव्यमदाने व यौवनमदाने अंध होऊन अगणित घोर पातके केली. लाज लज्जा सोडली; असा अहंकार प्रधान होता (अस्मिता) (ग) व्याध- कुटुंबापोषणासाठी ब्राह्मण असून सुद्धा पशुपक्षी मनुष्यादि सर्वांशीं वैर केले; इतका कुटुंबावर आसक्त होता. हा रागप्रधान होता; (राग) (घ) गृध्र अधम खग आमिष भोगि' अति तमो गुणि; संपाति रामदूतानां जिवंत खाण्याचा विचार करीत होता. (व्देष) (ड) गज = गजेन्द्र मरण भयानेच भगवंतास शरण गेला, मरणभय प्रधान. (अभिनिवेष)-या प्रमाणें अविद्या, अस्मिता, राग, व्देष व अभिनिवेष या पंचक्लेशांची च उदाहरणें दिली; कारण की पुढील छंदात

यांचा उल्लेख करणें आहे.

<u>चरण ३ रा-</u> 'आभीर यवन...अघरूप जे' ज्यांचे जीवनच पापमय असते अशा या जाती आहेत लंकेतील सर्व निशाचरानां अघरूप म्हटले आहे.'विप्रशापवश जाहले ते सगळे अघरूप (१।१७६) या आभीरादिकांचे आचरण राक्षसां सारखेच असते. 'किरात स्वभावादि' हे प्रकरण प्रस्तावनेत पाहावे. (पृ.६३८) श्रीमत्भागवतांत या सर्वांचा पाप:!= पापमय असाच उल्लेख येथील अर्थानेच केला आहे. 'किरात हूणांन्ध्रपुलिन्द पुल्कसा आभीरकंकायवना: खसादय: । येऽन्ये च पापा यदुपाश्रयाश्रया: शुध्यन्ति तस्मै प्रभविष्णवे नम:' (भाग.२।४।१८) ज्याचा किंवा ज्याच्या भक्ताचा आश्रय केल्यानें आभीरादि हे सर्व पापमय जीव शुध्द होतात त्या भगवंताला मी नमस्कार करतो असे श्री शुकाचार्य म्हणाले हेच येथे सांगून कविनी शरणागति सूचक असाच नमस्कार केला आहे.

<u>चरण ४था</u>- ते नाम सकृदपि वदत पावन होति:- रामनामाचा प्रभाव या प्रमाणें येथे उपसंहारात सांगितला. 'यन्नामा नर विवशहि वदती। बहुजन्मार्जित अघगिरि दहती'(१।११९।३). <u>(क) सूचना</u>- या छंदात भगवत् शरणागति व राम नाम यांचे महत्व सांगितले. पुढील छंदात-रामकथा व रामरूप यांचा महिमा सांगून त्यांच्या योगाने मुक्त होता येते हे सांगतील.

हिं.छं. *। रघुबंसभूषन चरित यह नर कहहिं सुनहिं जे गावहीं।*
।। कलिमल मनोमल धोइ बिनु श्रम राम धाम सिधावहीं।।
। सत पंच चौपाईं मनोहर जानि जो नर उर धरै।
।। दारून अबिद्या पंच जनित बिकार श्रीरघुबर हरै ।।२।।

म.छं. *। रघुवंशभूषण चरित हे नर कथिति परिसति गाति जे।*
।। कलिमल मनोमल घुउनि अश्रम रामधामीं जाति ते।।
। पांच् सात चौपाया मनोहर जाणुनी नर उरिं धरी।
।। दारुण अविद्या पंचजनित विकार श्रीरघुबर हरी।।२।।

अर्थ- रघुवंशभूषण श्री रामचंद्रांचे हे चरित्र जे कोणी कथन करतील, श्रवण करतील आणि गातील(गातात) ते कलियुगातील पापरुपीमल व मनोविकाररुपी

मल धुऊन टाकून रामचंद्रांच्या धामांत जातील. (इतके कशाला) यांतील बारा (पाच+सात) मनोहर चौपाया जाणून त्यांचे हृदयांत ध्यान करतील तर घोर अविद्यापंचक आणि त्यापासून उत्पन्न होणारे विकार श्री रघुवर हरण करतील.

टीका.चरण १-२ (१) रघुवंशभूषण- 'परमात्मा ब्रह्मचि नर रूप। होतील रघुकुल भूषण भूप'(७।४८।८) असे जे रघुकुलभूषण झाले त्यांचे चरित्र (क) कथिति परिसति गाति जे- जे स्नेहे ही कथा सांगतील। सावधान, समजुनी ऐकतिल।।होतील रामचरण अनुरागी। कलिमल रहित सुमंगल भागी'(१।१५।१०-११ टी.पहावी) उपक्रमांतील या दोन चौपाया येथील दोन चरणांचा अर्थ अधिक स्पष्ट करतात. सावधानपणें सांगणें आणि अर्थ, भाव वगैरे समजून ऐकणें हे पथ्य पालन केले पाहिजे. 'जे श्रवत गातहि वदत समजत परमपद नर लभतमे.'(४।३.छं) असे किष्किंधा कांडाच्या उपसंहारांत म्हटले आहे. टीका पाहावी. कथन करणारे, श्रवण करणारे आणि गान करणारे असे भिन्न समजणें योग्य नाही हे किष्किंधा कांडाच्या टीकेत सादर दाखविले आहे. श्री तुलसीदासानीं आधीं गुरूमुखाने अनेक वेळा श्रवण केले मग संतमुखाने रामकथेचे पुष्कळ श्रवण केले, नंतर पुष्कळ कथन केले; तेव्हाच पुढे गान केले. (ख) कलिमल मनोमल धुउनि = 'कलिमलशमन मनोमलनाशन'(१२९।१) टी.पहा. अश्रम रामधामीं जाति ते' ४।३ छंदांत परम पद म्हटले, परमपद=कैवल्य मोक्ष आणि रामधाम=नित्यवैकुंठ. हे दोन्ही अर्थ येथे घेणें जरूर आहे. 'रामचरणरति वांछिजो अथवा पद निर्वाण ।। भाव सहित तो ही कथा करो श्रवण पुटीं पान' (७।१२८) असे महेशानीं म्हटले आहे. ज्याला मोक्ष हवा असेल त्याला तो श्रमां वाचून मिळेल व ज्याला मोक्ष नको असून दृढ भक्ति मिळते तो नित्य वैकुंठ रूपी रामधामास जातो. जटायु, शरभंग वगैरे अनेक रामधामीं गेले आहेत. शबरी मुक्त झाली आहे.

पांच, सात चौपाया मनोहर!

चरण ३ रा- पांच सात (सतपंच) चौपाया मनोहर जाणुनी नर उरि धरी. हिन्दीत 'सत पंच' शब्द आहेत. सत=सप्त, सात; शंभर व सत्य आणि संत असे अनेक अर्थ असल्यामुळे येथे किती चौपाया सांगितल्या आहेत या विषयी किततरी

मतभेद आहेत. पण चौपाई, मनोहर, जाणुनी, उरि धरणें या चार गोष्टी आणि रघुवराने अविद्या पंचजनित विकार हरणें अशा पांच-गोष्टींचा मेळ मानसाधारे बसविला कीं एकच निश्चित अर्थ सिध्द होतो; व तोच वर दिला आहे.

<u>१.चौपाई-</u> गोरखपूरच्या गीताप्रेसच्या गुटक्यांत व मोठया पुस्तकांत चौपायांना जसे क्रमांक दिलेले नाहीत त्याप्रमाणेंच जुन्या पोथ्यांत चौपायांना क्रमांक दिलेले नाहीत. त्यामुळे चार चरणांची ती चौपाई या सामान्य अर्था प्रमाणें कोणी गणना करतात, व काही लोक या टीकेत दिलेल्या क्रमांका प्रमाणें दोन चरणांना मिळूनच चौपाई म्हणतात. परंतु श्री तुलसीदासानीं 'वन्दे गुरूपद पद्म परागा। सुरूचि सुवास सरस अनुरागा'।।१।। अशा १६।१६ मात्रांच्या दोन चरणांनाच चौपाई मानली आहे हे प्रस्तावनेत (पृ.७१-७२) सात मुद्दे देऊन सिध्द केले आहे. ही प्रथा मानल्यासच सतपंच चौपाई आणि मानसात फक्त एकाच ठिकाणी आहेत; व त्या बारा ओळीनां मनोहर आदि सर्व लक्षणें लागू पडतात. त्या बारा ओळी म्हणजे बा.कां.१९९च्या अंगभूत असलेल्या बारा चौपायात होत.

<u>२. मनोहर</u>- त्या बारा चौपायांत बालरूप रामाचें ध्यान वर्णीले आहे; व ते इतके मनोहर आंहे की उपडे वळण्यापासून रांगण्यापर्यंतच्या एक वर्षाच्या आंतील बाल रूपाचे व त्या काळातील विविध अवस्थांतील रूपांचे त्यांत वर्णन आहे. या रूपावर कौसल्या; काकभुशुंडी व शिव जितके आसक्त दिसतात तितके इतर रूपांवर दिसत नाहित. पशुपक्ष्यांची बालके सुद्धा त्या त्या मोठया प्राण्यापेक्षां मोहक व आकर्षक दिसतात. मग बाल रामचंद्रांचे रूप किति मनोहर असेल!- पुढे दाखविलेल्या सतपंचच्या अनेक अर्थाना 'मनोहर' म्हणतां येते का याचा विचार पुढे केला आहे.

<u>३. जाणुनी</u>- या बारा चौपाया जितक्या सोप्या वाटतात तितक्याच त्या गूढ आहेत. तेथे स्पष्ट केलेले गूढार्थ पाहिले म्हणजे 'जाणुनी' पदाची सार्थकता याच बारा ओळीत आहे अशी खात्री होईल. टीकाकार म्हणतात की जाणून=अर्थ जाणून, पण या बारा ओळींचा सरळ ब्राह्मार्थ जाणून भावना सहज जागृत होणार नाहीत, गूढार्थ जाणणें भाग आहे. सतपंच चौपाया कोणत्या ते जाणून असा अर्थ

करणें ही जरूर आहे. ज्या बालरूप ध्यानासाठी त्या ब्राह्मणानें शाप पत्करला; व जे त्याला लोमशां कडून मिळाले, त्याच ध्यानांचे ते वर्णन आहे. रूपाचे ध्यान, मानसपूजा, मंत्रजप व कथा सांगणें किंवा ऐकणें म्हणजेच भजन करणें होय. ज्या रूपाचे ध्यान करावयाचे त्याचीच मानसपूजा करावयाची असते. म्हणून येथे तीन गोष्टींचाच उल्लेख केला आहे. प्रथम नामाचें महत्व सांगितले; नंतर कथेचे सांगितले; आणि या दोन चरणांत रूपाचे महत्व सांगितले जात आहे.

४. उरि धरी- उरिं (हृदिं, हृदयिं) धरणें हे शब्द ध्यान या अर्थानेच मानसांत वापरले आहेत. पण उरिं धरीच्या या अर्था कडे सर्वच टीकाकारांनी काना डोळा केला आहे, व सत=शंभर हा अर्थ दाखविण्यासाठी मानसांतील अवतरणांची भिंडोळी पुढे केली आहेत. कोणी सत=सत्य हा अर्थ सिध्द करण्यासाठीं अनेक खटपटी केल्या आहेत. उरि धरणें=ध्यान करणें याला मानसांतले आधार-१.'हृदिं शशिमौलि धरूनि बृषाकेतू' (१।६४।४); २.'धरि उरिं उमा प्राणपति चरणां (१।७४।१), ३.'पडे धरूनि उरिं पदजलजांला'१ (१।२२६।८). ४.'जे पद जनकसुता हृदिं धरते' (७।४२।७). ५.'रामचरणपंकज हृदिं धरणें' (६।१।८). ६.धरूनि शोभासिंधु हृदिं गेले विधि धामास(७।५१). 'प्रभुता हृदिं धरणें' 'प्रताप हृदिं धरणें, अशी काहीं उदा, आहेत. वर जी ६ उदाहरणें दिली तशीच आणखी बरीच आहेत. 'हृदिं धरणें; उरिं धरणें', याचा संबंध रूपाशीच येतो; व वर निर्दिष्ट केलेल्या बारा चौपायात, (मधे दोहा न येता) रामरूपाचे ध्यान मानसांत इतर ठिकाणी कुठेच नाही.

५. दारुण अविद्या पंच = दारुण अविद्यादि पंच क्लेश. अविद्या, अस्मिता, रागव्देष आणि अभिनिवेष म्हणजेच पंच क्लेश. आणि 'जनिंत विकार' म्हणजे सगळे मानसरोग,मोह कामक्रोध लोभ मद मत्सरादि सर्व मनोविकार; यांचा नाश श्री रघुवर करतात. तो कसा करतात हे आता पाहिले पाहिजे. (क) बालरूपाचे ध्यान करण्यात ते रूप निदान ध्यानाच्या काळांत तरि 'हृदिं धारण' करावे लागतेच. आणि रघुनाथ हृदयांत वास करूं लागले कीं मोहादिक कोणी तेथे राहूं शकत नाहीत. 'हृदयिं बसति खल नाना तोंवर लोभ मोह मद मान नि मत्सर।। जों

हृदयिं न बसती रघुनायक'(५।४७।२-३) बाल रूपावर सहज प्रेम बसते; व रामकृपेने भक्ति मिळते. भुशुंडीला भक्ति वगैरे जे वर भगवंतानी दिले ते रांगणाऱ्या बालरामचंद्रानीच दिले. तत्पूर्वी कावळा बनल्यावर तो 'कामकोटिछवि शाम शरीर। नील कंज वारिद गंभीर'(१।१८८।१)पासून, 'छवि न वर्णवे श्रुति शेषांही। तो जाणे स्वप्निंहि जो पाहि।(१।१८८।१२) पर्यंत वर्णीलेल्या बालरूपाचेच ध्यान तो करीत असे. हे ध्यान काकभुशुंडी-गरूड संवादांतलेच शंकरानी उमेला सांगितले आहे. (ख) ध्यानाने अनात्मगुणांचा नाश होतो. सर्वांग सुंदर सगुण बालरूप, मनाचे तेव्हाच हरण करते; मुनिमन हरणाचा उल्लेख त्या रूपवर्णनात आहेच. उपडया वळणाऱ्या किंवा रांगणाऱ्या बालरामाच्या तळपायावरील ध्वजरेखांकुश वज्र चिन्हासहित तळपायाचे ध्यान सोपे कीं सिंहासनासिन रामचंद्राच्या तळपायाचे ध्यान सोपे आणि अधिक मनोहर याचा विचार करावा. सत=सप्त त्यात हा अर्थ छोट्याशा हिन्दी मराठी कोषांत सुद्धा दिलेला आहे. 'सतसई'=सप्तशति हे श्री तुलसीदासांच्या ग्रंथाचे नांव आहे. यावरून ठरले की. त्यानीं सत=(सात) शब्द इतरत्रही वापरला आहे. (ग) कोणी वाचक कदाचित म्हणतील की बारा चौपायात वर्णिलेले ध्यान करणें फार कठीण जाईल. पण त्यात एकच ध्यान 'नसून २।२, ३।३ ओळींची अशी अनेक ध्याने आहेत. उदा. दात न आलेला जागच्या जागी उपडा उताणा वळणारा, आपल्याच हृदयावरील विप्रचरण चिन्हाकडे कुतूहलानें बघत बसलेला दोन दोन दात आलेल्या मुखाचे; रांगणाऱ्या रामाचे अशी अनेक ध्याने त्यात आहेत. (घ) याप्रमाणें या अल्प बुध्दीला साधक बाधक प्रमाणानीं जे अर्थ खाली दिले जात आहेत व ते अयोग्य का हे थोडक्यात दाखविले जात आहे. शत पंच= १०५,५००,५१०० इत्यादि अनेक अर्थ केले आहेत. हे लोक चौपाई म्हणजे चार अर्धे म्हणजे वर दाखविल्या तशा दोन चौपाया असा अर्थ घेतात, म्हणजे२१० ओळी, १००० ओळी व १०२०० ओळी असा अर्थ होतो पण एवढ्या चौपायांच्या ओळी मध्ये दोहा, सोरठा छंद न येता कुठेच नाहीत. चौपाई= कमळाची वेल, कमललता व दोहे सोरठे छंद म्हणजे बहुरंगी कमळे आहेत. असे ग्रंथाच्या उपक्रमांतच म्हटले आहे. वरील तीन अर्थ किंवा ७५=३५ हा अर्थ घेतल्यास, ३५ चौपायांच्या ओळीच एकत्र कुठेच नाहीत. ७।१२१ मध्ये ३७ ओळी आहेत.

३५२=७० ओळी मानल्या तर त्या चारी प्रकारात छंद, सोरठे दोहे यांची गणना चौपायांत करावी लागते, व तशी ते ते टीकाकार करतात. म्हणजे शार्दूलविक्रीडित, वसंततिलका स्त्रग्धरा इत्यादि वृत्तांना कोणी आर्या किंवा अभंग म्हणावे, मानवे,तसेच करतात असे करणें किती संयुक्तिक आहे याचा विचार वाचकानीं करावा. असे करणें मानसवचन विरोधी आहे असे या अल्प मतीस वाटते.

(२) वरील गणना योग्य आहे असे मानल्यास ३५ किंवा २१० इत्यादि ओळीत रूपाचे एकत्र वर्णन कोठेच नाही. त्यामुळे उरिं धरणें म्हणजे हृदयांत धारण करणें इतकाच अर्थ सांगून टीकाकार मोकळे होतात. मानसांत 'उरि धरणें'ची उदाहरणें दहा पेक्षा जास्त असून तिकडे टीकाकार जाणून बुजून काना डोळा करतात. बरे २१०, १०००, १०२००, ओळींचे चिंतन, मनन, एकाच वेळी करता येणें शक्य आहे काय? आणि या सगळ्याच ओळी मनोहर आहेत काय? उदा १. 'जाणुनि अशी भक्ति परिहरती'(७।११५।१)पासून ७।१३०।८ पर्यंतच्या २१० ओळींनां 'सतपंच चौपाई मनोहर' मानतात. यात २४ दोहे २ सोरठे व १ प्रमाणिका वृत्ताचा श्लोक आहे. त्या श्लोकाला सुद्धा चौपाई म्हणावयाचे काय? या सर्व २१० ओळी मनोहर आहेत काय? 'बंध्या सुत जरि कोणि वधाल' 'कमठ पृष्टिं जरि वाढति बाल' 'फूटती जरि शश शिरीं बिषाणें''वारिमथुनि जरि होई घृत' सिकते पासुनि तेल' इ.इ. अनेक चरणांत व ओळीत काय मनोहरता आहे? याचे चिंतन ध्यान करून पंचक्लेशादि कसे नष्ट होणार! जी गोष्ट २१० ओळींची तीच १०००, १०२०० ओळींची.

<u>(३)</u> उरिं धरणें म्हणजे मुखोद्गत करणें असा अर्थ घेतल्यास इतक्या ओळी तोंडपाठ करण्यानेच किंबहुत संपूर्ण रामचरितमानस तोंडपाठ केल्यानें पंचक्लेशादिकांचा नाश होणें शक्य आहे काय? ज्यांचे समग्र रामायण तोंडपाठ आहे असे पुष्कळ लोक, तरुण सुद्धा आहेत, पण त्या कोणाचे ही अविद्यादि पंच क्लेश व जनित विकार नष्ट झालेले दिसले नाहीत,दिसत नाहीत.

<u>(४)</u> सतपंच= सत्य पंच(पांचा मुखी परमेश्वर)=सत्य बोलणाऱ्या पंचा

सारख्या चौपाया असा अर्थ काही लेखक करतात; व संख्ये विषयि मौन धरतात. (मानसमणि या हिन्दी मासिकाच्या अनुक्रमणिका नसलेल्या काही वर्षा पूर्वीच्या अंकांत वेळोवेळी प्रसिध्द झालेले 'सतपंच चौपाई) या विषयावर वरचे लेख आहेत! शेवटी संपादकानीं तो विषय बंद केला. लेख पाठवू नयेत असे जाहिर केले!) या शिवाय आणखी पुष्कळ मते आहेत. काही लोक विषम संख्या असलेल्या ठिकाणी टिपणिला चौपाई मानतात व सम संख्या असलेल्या ठिकाणी चार चरणांना चौपाई मानतात! म्हणजे काही दोष टाळण्या साठी एकाच ग्रंथात दोन गणना पध्दतीचा स्वीकार करतात. अशी अनेक मते आणखी पुष्कळ आहेत.

सूचना- अशी अनेक मते उत्पन्न होण्याचे मूळ कारण म्हणजे चौपाईची व्याख्याच श्री तुलसीदासानीं स्वीकारलेली स्वीकारली गेली नाही. त्यामुळे १२२=२४ ओळीत रामरूपाचे वर्णन सापडले नाही; कारण की तसे वर्णन मानसांत नाहीच; त्यामुळे सतपंच(=१२) चौपाया लक्षात येणेंच अशक्य झाले त्यावर असे अविद्येचे आवरण पडल्यामुळे व 'सतपंच' चा अर्थ सांगणें तर भागच पडल्यामुळे या शब्दांतून संस्कृत व हिन्दी या दोन भाषांच्या साह्याने जेवढे अर्थ निघणें शक्य होते तितके तरि निघालेच! शिवाय मध्यमपदलोपी समास मानून जेवढे काढता येणें शक्य होते तितके हि काढले गेले आहेत!

उपसंहार- मागल्या व या छंदांत कलियुगातील मुख्य तीन चार साधनांचा उल्लेख करून त्यांचा प्रभाव सांगितला. चौ.८ मधील 'राम भजुनि गति लब्ध न कवणा' याचाच अर्थ या दोन छंदांत स्पष्ट केला गेला. भजुनि= शरण जाऊन, भजन कसे करावे हे सांगितले. प्रथम श्री रघुनाथास अनन्य भावाने शरण जाणें ही गोष्ट केली कीं मग भजन करणें म्हणजे=रामनाम रामकथामृतपान व रामरूपाचे ध्यान या तीन गोष्टी करण्यातच बुध्दि,मन,इंद्रिये, व शरीर यांची सर्व शक्ति सतत खर्च करणें. मानसपूजेत रूपाचे ध्यान असतेच. म्हणून नामजपादि, हरि कथाश्रवण कथन,गान, मानसपूजा व ध्यान या चार गोष्टी करणें म्हणजे भजन करणें. काकभुशुंडी सुद्धा या चार गोष्टीनींच भजन करीत असतो. (७ ।५७ ।५-७) पहा. याच तीन चार गोष्टी करून श्री रघुनाथ कृपेने श्री तुलसीदासानीं या

कलियुगातच काय मिळविले ते आता सांगतात.

हिं.छं. */ सुंदर सुजान कृपानिधान अनाथ पर कर प्रीति जो /*
//सो एक राम अकाम हित निर्बानप्रद सम आन को //
/ जाकी कृपा लवलेस ते मतिमंद तुलसीदास हूँ /
//पायो परम बिश्रामु राम समान प्रभु नाहीं कहूँ //३ //

म.छं. */ सुंदर सुजाण कृपानिधान अनाथिं करतो प्रीति जो /*
//तो एक राम अकामहित निर्वाणदायक नान्य तों //
/ ज्याच्या कृपालेशामुळे मतिमंद तुलसीदास ही /
// पावे परम विश्राम तो प्रभु राम, सम कोठे नही //३ //

अर्थ- सुंदर, सुजाण (सर्वज्ञ, सर्वदर्शी) कृपासागर असून जो अनाथावर प्रीति करतो असा प्रभु फक्त एक रामचंद्रच होय. ते निर्हेतुक हितकर्ते व निष्कामांचे मित्र आहेत; आणि त्यांच्या सारखा मोक्ष देणारा तर दुसरा नाहीच. ज्याच्या कृपेच्या लेशामुळे मंदबुध्दि- तुलसीदास सुद्धा परम विश्राम पावला तो प्रभु राम च; त्यांच्या सारखा प्रभु कोठे ही नाही।।३।।

टीका. (१) सुंदर- मागल्या छंदात शेवटी बालरूपाच्या ध्यानाचा प्रभाव सांगितला. येथे सुंदर शब्दाने रूपाचा उल्लेख प्रथम केला. सुंदर=चित्ताला पाझर फोडणारे. याने रामरूपाच्या ठिकाणी असलेला प्रेम उत्पादन करणारा प्रभाव सुचविला. (क) अनाथि करतो प्रीति जो- राम बाल असोत की धनुर्धारी असोत ते सुजाण=सर्वज्ञ सर्वदर्शी असल्याने अनाथ कोण आहे हे ते जाणतात. आणि सुंदर रामरूपाचे ध्यानादि भजन करणारा अनाथ आहे असे ठरताच त्याच्यावर प्रीति करतात. भजन करणाराने अनाथ बनून ध्यानादि चार प्रकारचे भजन केले पाहिजे. (ख) अनाथ- जगांत माझा कोणी नाथ=स्वामी, हितकर्ता नाही; मी निराश्रित अनाथ आहे, प्रभु रामचंद्रा शिवाय कोणी आश्रय, आधार नाही अशी ज्याची दृढ मान्यता असते व स्वत:च्या साधनाचा सुद्धा भरवसा न धरता प्रभु राम कृपालु आहेत; ते कृपा करतील तरच माझा उद्धार होईल असे ज्यास वाटते तो अनाथ. अशा अनाथांवर प्रीति करणारा प्रभु फक्त एक रामच. (ग) अकामहित=

अकाम=निष्काम, निर्हेतुक, निःस्वार्थ, हित=मित्र, सुहृद, हितकर्ता. 'हेतुरहित जगि जुग उपकारि। तुम्हि तुमचे सेवक असुरारी'।। ७।४७।५) निःस्वार्थ हितकर्ता हा एक अर्थ आहे. दुसरा अर्थ 'निष्कामांचे सुहृद' हा आहे. 'नित नौमि राम अकामप्रिय'(३।३२ छं २) यात 'अकामप्रिय' शब्दाने जे सांगितले तेच येथें 'अकामहित' या शबदाने सांगितले. 'अकामिनां स्वधामदं' (३।४।१) अकाम= पूर्णनिष्काम असतील त्या अनाथावर कृपा करून त्याना आपले धाम देऊन त्यांचे हित करतात. किंवा (घ) निर्वाणदायक- मोक्ष देतात. रामधाम देतात हे मागल्या छंदांतच सांगितले आहे. ज्याला मोक्ष हवा असेल त्याला मोक्ष देतात. असा, मोक्ष देणारा प्रभु दुसरा कोणी नाही. 'ज्ञानं महेश्वरादिच्छेत् मोक्षमिच्छेत् जनार्दनात्' अतिदुर्लभ कैवल्य पद' सुद्धा देतात.

(२) श्री तुलसीदास आता स्वतःचा अनुभव सांगतात. (क) कृपालेशामुळे= अल्पशा कृपेने; मतिमंद= मंद बुध्दि असून सुद्धा, परम विश्राम मिळाला. जो पर्यंत मानसरोगांचा नाश झालेला नसतो तो पर्यंत विश्राम सुद्धा मिळत नाही. रामभक्ति प्राप्त झाल्या शिवाय मानसरोग जात नाहीत. 'विश्वासाविण भक्ति ना द्रवति न ती विण राम।। स्वप्निहि रामकृपेविण जीवा नहि विश्राम'(७।९रा) भक्तिवाचून विश्राम मिळत नाही. तुलसी दासाना तर परम विश्राम मिळाला म्हणजेच परम भक्ति=सर्वात श्रेष्ठ भक्ति = अनपायिनी प्रेमभक्ति प्राप्त झाली. (ख) रामकथा श्रवण, कथन व गान तुलसीदासानीं दीर्घ काळ केले हे. त्यांच्या मानसोपलब्ध चरित्रात प्रस्तावनेत दाखविले आहे. (ग) तुलसीदास सुचवितात की माझ्या सारख्या मतिमंदाला सुद्धा परम विश्राम मिळाला, मग जे बुध्दिमंत असतील त्यानां प्रभु परमविश्राम देतील यात नवल काय?

ल.ठे. श्री गोस्वामी स्वतःचा उल्लेख, अशा ठिकाणी प्रथम पुरुषाने न करता 'मला परम विश्राम मिळाला' असे न म्हणतां 'तुलसीदासाला मिळाला' असा तृतीय पुरूषाने करतात. 'दास तुलसी गातसे' 'तुलसी भाषानिबन्ध मतिमंजुल मात- नोति'(बा.मं.७) मंगलाचरणापासून उपसंहारा पर्यंत हीच पध्दति आहे. 'मी' ही 'अस्मिता' अशा वावतींत कधीं धारण केली नाही. 'मी' आणि 'तुलसीदास' ज्याला

म्हणतात तो एक नव्हे हे. ठायीं ठायीं दाखविले आहे. प्रभूला प्रार्थना करतानां मात्र ही भावना नाही हे आता दिसेलच. आता श्री रघुवीराला थोडी प्रार्थना करून श्री तुलसीदास रूपप्रेमाची व नामप्रेमाची भिक्षा प्रभूजवळ मागतील.

हिं. दो । मो सम दीन न दीन हित तुम्ह समान रघुबीर ।।
।। अस बिचारी रघुबंसमनि हरहु बिषम भव भीर ।।१३० रा. ।।

म. दो । मज सम दीन न, दीन-हित सम रघुवीर तुम्हा हि ।।
।। हे जाणुनि रघुवंशमणि भवभय बिषम हरा हि ।।१३० रा ।।

अर्थ - हे रघुवीरा! माझ्या सारखा कोणी दीन नाही; आणि तुमच्या सारखा दीनांचे हित करणारा कोणी नाही; हे जाणून,हे रघुवंशाशिरोमणि! माझे विषम भवभय हरण करा।।दो.१३० रा।।

टीका.-(१) मज सम दीन न- माझ्या सारखा दीन तुम्हाला पुन्हा मिळणार नाही. दीनहितकर्ता हे आपले ब्रीद सत्य करून दाखविण्यास ही संधि उत्तम आहे; म्हणून तुम्हीं आपल्या ब्रीदा कडे पाहून व मी अत्यंत दीन आहे एवढेच पाहूनमाझे हित करा. हित कसे करावयाचे हे पण सांगितले. (क) बिषम= कठोर; दु:खदायक,भवभय हरण करा, म्हणजे माझे हित होईल. हिन्दी भीर हा शब्द संस्कृत 'भी'=भीति याचे प्राकृत रूप आहे. (ख) शंका-परम विश्राम=दृढ रामभक्ति मिळाल्यानंतर भवभय कसे राहिले? याचे उत्तर या पूर्वी तीन ठिकाणीं तरि दिलेले आहे. रामभक्ति प्राप्त झाली किंवा जीवन्मुक्त, विज्ञानी झाला तरि 'काम कोप हे रिपु उभयानां' (३।४३।९) असतातच. त्यांच्या पासून माझे नित्य रक्षण करा हे येथे सुचविले आहे. 'नान्या स्पृहा रघुपते' (कि.कां.मं.श्लोक २) या श्लोकांत 'कामादि दोषरहितं कुरू मानसंच' असे. 'भक्तिं प्रयच्छ रघुपुंगव निर्भरां मे'म्हटल्या नंतर ज्या हेतूने म्हटले तोच हेतु येथे आहे. तसेच'अकामिनां स्वधामदं' म्हटल्या नंतर 'मदादिदोषमोचनं' कां म्हटलें हे (अरण्य कांड ४।२) टीकेत पाहावे. भाव हा की लक्ष्मण व सीता यांच्या सह माझ्या हृदयात निरंतर निवास करा. 'अनुज जानकी सहित निरंतर। वसा राम नृप मम उर अंतर' (६।११५।८) असे

शंकरानीं-'मां अभिरक्षय रघुकुलनायक' (६।११५।१)असे आधीं म्हटल्यानंतर, मागणें मागून सुचविले आहे की त्याशिवाय भवभय नष्ट होणार नाही. भवभय उत्पन्न होऊ न देण्यास भगवंताचे नाम व रूप ही दोन मुख्य साधने आहेत. म्हणून शेवटी रूपासक्ति व नामासक्ति मागतात.

हिं. दो. । कामिहि नारि पिआरि जिमि लोभिहि प्रिय जिमि दाम।।
।। तिमि रघुनाथ निरंतर प्रिय लागहु मोहि राम।।१३० म.।।

म.दो. । कामि नरा प्रिय नारि जशि लोभि नरा प्रिय दाम।।
।। मज रघुनाथ! निरंतर व्हा प्रिय तसेच राम।।१३०म.।।

अर्थ- कामी पुरूषाला जशि नारी प्रिय असते (तिचे रूप) व लोभी मनुष्याला जसा पैसा (त्याची संख्या) प्रिय असतो; तसे हे रघुनाथ! हे राम! तुम्हा मला प्रिय व्हा।।१३० म।।

टीका. <u>(१)</u> कामी पुरूषाला नारी प्रिय वाटते याचे कारण तो तिच्या रूपावर आसक्त असतो. तिच्या रूपाचे, गुणांचे, तिच्या पासून मिळणाऱ्या सुखाचे च तो चिंतन करीत असतो; तसे तुमचे जे रघुनाथ रूप आहे ते मला प्रिय वाटो. <u>(क)</u> लोभी मनुष्याला दाम=पैसे, रूपये प्रिय असतात. आज इतके मिळविले, उद्यां इतके मिळवीन असे त्याचें चिंतन चाललेले असते. कालच्यापेक्षा आज रूपयांची संख्या किती वाढली हे तो सतत बघत असतो, त्यातले खर्च करीत नाही. तसेच 'राम' हे नाम मला प्रिय वाटो. <u>(ख)</u> राम आणि रघुनाथ एकच असले तरि रघुनाथाचे नांव 'राम' आहे, म्हणून राम शब्दाने नाम सुचविले. राम=निर्गुण ब्रह्म, असा ही अर्थ होऊ शकेल, म्हणून रघुनाथ शब्दाने सगुणसाकार रूप सुचविले. भाव हा आहे की मनाने रघुनाथ रूपाचे ध्यान व वाणीनें रामनामाचा उच्चार या दोन्ही गोष्टी एकाच वेळी अत्यंत प्रेमानें सतत घडाव्या. 'पुलकित, हृदिं सीता रघुवीर। जीभ नाम जपि, लोचनि नीर'(२।३२६।१) अशी दशा सदा असावी. हे भरताच्या दशेचे वर्णन आहे. भरतचरित्राचा पगडा तुलसीदासांच्या मनावर फारच पडला हे त्यानींच (२।३२६छं) सांगितले आहे. <u>(ग)</u> बाल काण्डारंभी आधीं संस्कृत

श्लोकांत मंगलाचरण करून नंतर प्राकृतांत मंगलाचरण केले; त्याच्या उलट क्रमानें येथे आधीं हिंदीत उपसंहार केला व आता दोन संस्कृत श्लोकांत उपसंहार करतात.

शा. वि ।यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्री शम्भुना दुर्गमं।
।। श्रीमद्राम-पदाब्ज-भक्तिमनिशं प्राप्त्यै तु रामायणम् ।।
। मत्वा तद्रघुनाथ-नाम-निरतं स्वान्त स्तमः शान्तये।।
।। भाषाबध्दमिदं चकार तुलसीदास स्तथा मानसम् ।।१।।

अर्थ- श्री रामचंद्राच्या चरण कमलांची भक्ति नित्य निरंतर प्राप्त व्हावी म्हणून प्रभु व उत्कृष्ट कवि शम्भु यानीं जे रामायण पूर्वी, रचले होते, ते दुर्गम पण श्री रघुनाथनाम निरत आहे असे जाणून तुलसीदासानें आपल्या अंतरांतील तमाच्या शान्ती साठी ते जसेच्या तसेच रामचरितमानस रूपाने स्वभाषेत रचले।।१।।

टीका.(१)- यत्पूर्व प्रभुणा शम्भुना सुकविना कृतं- यत् =जे, पूर्व= फार पुरातन काळी, २७ कल्पांच्या पूर्वी केव्हा तरि. प्रभुणा=कर्तुमकर्तु अन्यथा कर्तु समर्थ अशा सर्वज्ञ, सर्व शक्तिमान् महादेवानी जे रचले होते, त्याच रामायणाच्या आधारे व तथा=तसेच तुलसीदासाने हे स्वभाषेत रचले. भाव हा की हे स्वकपोल कल्पित लिहिलेले नाही. आणि म्हणूनच हे परम अलौकिक व परम दिव्य असल्याची प्रतीति येते. (क) सुकविना- रामचरितकर्ते वाल्मीकींच्या सारखे कितीही मोठे सुकवि झाले, तरि साक्षात शंकरां सारखे सुकवि ते होणें शक्य नाही. रामचंद्राचें चरित्र आणि त्याची काव्यमय रचना करणारे शंकर! असा अद्भुत योग! शंकरानीं कां रचले?

(२) श्रीमत्- राम पदाब्ज भक्तिं अनिशं प्राप्त्यै- अनिशं=संतत, नित्य निरंतर, प्राप्त्यै =प्राप्तिसाठीः त्या रामायणाचे प्रयोजन येथे सांगितले. शंकरासारखा रामचंद्रांस प्रिय भक्त दुसराकोणी नाही. 'प्रिय शिवसम मजला नहिं कोणी' (१।१३८।६)असे भगवानच म्हणाले आहेत. असे परमोत्कृष्ट रामभक्त स्वतः प्रभु, महेश्वर असून त्यानीं स्वतःस भक्ति प्राप्त व्हावी म्हणून ज्याची रचना

केली (लिहिले नाही हो!) त्याची भक्ति प्रदान शक्ति किती असेल याचा विचार करावा! 'शंभु चरित हे सुंदर रचिती'

(३) तु= परंतु, ततृ=ते, रामायण दुर्गम मत्वा=ते रामायण समजण्यास फार कठिण आहे, असे जाणून (मत्वा). तुलसीदासानी उपक्रमांतच सांगितले आहे की' रामकथा अति गूढ । ।कशि समजे मी जीव जड कलिमल ग्रसित विमूढ'(१३० म) 'दुर्गम'चा अर्थच त्या दोह्यांत स्पष्ट केला आहे. दुर्गम=अत्यंत गूढ, रहस्यमय, 'वारंवार परी गुरु सांगति। कांहि समजली मला यथामति।ती करीन मी भाषाबध्दहि'(१ ।३१ ।१-२) स्वभाषेत कां लिहिले याचा एक हेतु सांगितला; पण हा मुख्य हेतु नाही.

(४) तत् रघुनाथनिरतं मत्वा नामनिरत = नामपरायण. रघुनाथनाम='राम'नाम. ते शंभुविरचित रामायण अत्यंत नाम परायण आहे असे जाणून. ते भक्तिप्रद आहे हे खरे; पण त्याची भक्तिप्रदता रामनाम परायणतेमुळे आहे असे जाणले म्हणून स्वभाषेत लिहिण्याची इच्छा झाली. येथे हे दाखविले कीं रामभक्ति लाभ श्री रामनामपरायण रामचरित्राने च सुलभ होतो. स्वभाषेत का लिहिले याची दोन कारणें सांगितली. पण लिहिले कशासाठी? (क) स्वान्तस्तम: शान्तये- स्व+अन्त=तम: शान्ति= स्वत:च्या अन्त:करणातील तमाची. अंधाराची शान्ति, व्हावी म्हणून रचना केली. मंगलाचरणांत (श्लो.७) 'स्वान्त: सुखाय तुलसी रघुनाथगाथा-भाषानिबन्ध-मतिमंजुल मातनोति' स्वत:च्या अन्त:करणास सुख व्हावे एवढयासाठी. श्री रघुनाथ कथा भाषानिबन्ध करतो असे म्हणून उपक्रम केला. उपक्रम व उपसंहार यांच्या समन्वयानें दाखविले कीं जो पर्यंत हृदयात तम आहे तो पर्यंत सुख मिळणें शक्य नाही. 'रामभक्ति चिंतामणि सुंदर। वसे गरूड ज्याचे हृदयांतर।। प्रबल अविद्या तिमिर नासतो'(७ ।१२० ।२,५) 'हरिभजनाबिण तसा खगेशा। नाश नव्हे जीवाचे क्लेशा'(७ ।७८ ।१)अविद्या हाच मुख्य क्लेश आहे. 'दारूण अविद्या पंचजनित बिकार श्री रघुवर हरि' (ख) सार हे की शंभुविरचित रामायण 'राम'नाम निरत असल्याने त्यातील नामाच्या प्रभावाने अविद्यादि पंचक्लेश रूपी तमाचा विनाश्रम नाश होईल, विमलज्ञानाची प्राप्ति होईल व

'रामभक्ति बिना सुख नाही. (७।१२२।१४). स्वान्त:सुख लाभ कसा होतो याचा क्रम दाखविला. या क्रमाने स्वान्त स्तमाचा नाश होऊन भक्ति प्राप्त होईल व स्वान्त:सुख मिळेल या हेतुने रचना केली. (ग) शंकरांच्या हृदयांत तम नव्हता; कारण त्यांच्या हृदयांत भक्ति होतीच तरी पण ती दृढ व्हावी व हरिमायेने आक्रमण करू नये म्हणून त्यांनी भक्ति प्राप्तिसाठीं रचना केली. शिवाय भक्ति प्राप्ति व्हावी म्हणून रचना केली असे तुलसीदास म्हणाले असते तर दोघांची बरोबरी ठरली असती. आणि तमनाश पासून सुखप्राप्ति पर्यंतचा क्रम उपसंहारांत सुचविला जावा म्हणून 'स्वान्त:सुखाय' असे उपसंहारांत म्हटले नाही.

(५) भाषाबध्दमिदं चकार तुलसीदास- भाषाबध्दम् इदं चकार; इदं=हे रामचरितमानस. भाषानिबन्धं तुलसी आतनोति'(श्लोक.७) असे म्हणून ग्रंथाच्या मंगलाचरणांत प्रतिज्ञा केली होती; ती शेवटास गेली; ग्रंथ समाप्त झाला हे दाखविले. उपक्रमांत तृतीय पुरूषाचा उपयोग 'आतनोति' म्हणून केला, तसाच उपसंहारांत 'तुलसीदास: चकार'असे म्हणून तृतीय पुरुषाचा उल्लेख केला. कर्तृत्वाहंकार नष्ट झाल्याचे हे लक्षण आहे. (क) चकार हा परोक्ष भूत काळ आहे, अपरोक्षभूत पाहिजे होता, असे ज्या पंडितांस वाटेल त्यानीं विजयानंदजी त्रिपाठि कृत 'मानसव्याकरण'(पृ.८४-८८) पाहावे. या अल्पमतीस असे ही वाटते कीं भविष्य काळातील लोक जेव्हा हा श्लोक वाचतील तेव्हा त्यानी परोक्षभूत वापरणेंच व्याकरण शुध्द ठरते, त्या दृष्टीनेच परोक्षभूत वापरला आहे. (ख) तथा मानसं- यथा शंभुना मानसरूपेण विरचितच यथा विरचित तथा. शंभूनी जशी मानस रूपानें रचना केली तशीच ही रचना मानस सरोवरा सारखीच केली; आणि शंभुविरचित रामायणांत जे जसे सिद्धान्त होते ते तसेच यांत आहेत; आणि ते जसे रामनाम निरत आहे तसेच हे ही मानस रामायण रामनामनिरत आहे. उपक्रमांत म्हटले आहे की 'मम रचना सब गुणरहित! आहे; पण तिच्यात' विश्व विदित गुण एक' आहे (१।९)तो म्हणजे 'यामधि रघुपति नाम उदार: श्रुतिपुराण अति पावन सार।। मंगलभवन अमंगल हारि। उमे सहित जे जपति पुरारी'(१।१०।१-२) (ग) श्री रामचरितमानस मानस सरोवरा सारखे कसे आहे हे मानसरूपकांत उपक्रमांत सविस्तर दाखविले आहे व टीकेच्या शेवटी

कोष्टकरूपाने तुलना केली आहे. आता श्री तुलसी विरचीत रामचरितमानसाची फल श्रुति सांगून मानस समाप्ति होईल.

शा.वि. । पुण्यं पापहरं सदा शिवकरं विज्ञानभक्तिप्रदं ।
।। मायामोहमलापहं सुविमलं प्रेमाम्बुपूरं शुभम् ।।
। श्रीमद्रामचरित्र मानसमिदं भक्त्याऽवगाहन्ति ये ।
।। ते संसारपतंग घोरकिरणैर्दह्यान्ति नो मानवा: ।।२।।

अर्थ- हे (इदं) श्री रामचरितमानस पुण्यरूप आहे, पापांचा विनाश करणारें आहे, सदा कल्याण करणारे आहे, (सदाशिवाचा वरद हस्त (कर)च आहे) विज्ञान (विमल ज्ञान) देणारे व भक्ति देणारे आहे. माया व मोहादि मल यांचा नाश करणारे आहे. अति निर्मल आहे; प्रेमरूपी अंबूने (=जलाने) परिपूर्ण आहे; आणि मंगलरूप आहे. जे मनुष्य भक्तिने यात बुडया मारतात (मारतील) ते संसाररूपी सूर्याच्या(पतंगाच्या) अति घोर किरणानीं जळत नाहीत (जळणार नाहीत, जाळले जाणार नाहीत.) ।।श्लोक.२।।

टीका. -<u>(१)</u>- <u>पुण्यं पापहरं</u>- हे स्वत:च पुण्यरूप आहे, त्यामुळे सहजच समस्त पापसंचयाचा संहार करते. पापविनाश झाला की व्दंव्दांच्या पाशांतून सुटका होते. म्हणूनच म्हटले कीं सदा शिवकरं-सदा कल्याण करणारे आहे. कल्याण=मोक्ष किंवा 'जीवनजन्म सफलता'. 'श्वश्रेयसं शिवं भद्रं कल्याणं मंगलं शुभम्'(अमरे) 'नि:श्रेयसं तु कल्याण मोक्षयो: शंकरे पुमान्' (अ.व्या.सु) कल्याण कशाने होते? <u>(क)</u> <u>विज्ञानभक्ति प्रदं</u>- विज्ञान = विमल ज्ञान आणि ज्ञानोत्तर प्रेमभक्ति, हे देते; म्हणून कल्याण होते. 'येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणां। ते व्दन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता:' (भ.गी.७।२८) 'तदेव सत्यं तदु हैव मंगलं तदेव पुण्यं भगवद्गुणोदयम्। तदेव, रम्यं रूचिरं नवं नवं तदेव शश्वन्मनसो महोत्सवम्।। तदेव शोकार्णव तारणं नृणां यदुत्तमश्लोक यशोऽनुगीयते।। (भाग.१२।१२।४८-४९) उत्तमश्लोक जो परमात्मा त्याचे यशोगान(करणें)च सत्य, मंगल, पुण्य आहे. कारण ते भगवंताच्या गुणांचा उदय करणारे आहे. तेच रम्य, तेच रुचिकर, तेच नित्य तेच नवे; तोच सतत मनाचा महोत्सव आणि तेच

मानवानां शोक सागरांतून तारून नेणारे आहे. श्री रामचरितमानसांत उत्तमश्लोक यशोगानच आहे; व याला मूळ, आधार सदाशिव-विरचित मानस आहे. ब्रह्मदेवाने पृथ्वीतलावर निर्माण केलेले. मानस पुण्यसरोवर असले व त्यानें पापक्षालन होत असले तरी ते अंशत: व उधारीचे आहे. सर्व पापाचा नाश होत असलेला प्रतीतीस येत नाही व त्यांत स्नान केल्यानें विज्ञान व भक्ति मिळत नाहीत; पण या मानसाने सर्व पाप प्रणाश होतो असे हे पुण्यरूप व मंगलरूप आहे. पुण्यरूप,मंगलरूप, परम कल्याणस्वरूप जो परमात्मा त्याचेंच हे चरित्र असल्याने व हे राम+अयन=(रामायण) रामचंद्राचे निवास स्थान असल्याने रामरूपच आहे हा भाव सुचविला आहे. नाम आणि नामी यात जसा अभेद आहे, तसाच नामी आणि त्याचे अशा प्रकारचे चरित्र यात अभेद आहे हे येथे या विशेष्यानीं सुचविले आहे. याने विमलज्ञान व प्रेमभक्ति यांची प्राप्ति कशी होते ते आता दाखवितात.

(२) माया- मोह-मलापहं- मल+अपह: मलांचा अपहार करणारे. माया = अविद्या, तिच्यापासून उत्पन्न झालेला,सकल मानस रोगांचे मूळ असलेला मोह, आणि मोहापासून उत्पन्न झालेले मनोमल= कामक्रोध लोभादि सर्व मनोविकार, या सर्वांचा संहार करणारे हे मानस आहे. जल निर्मल असल्याशिवाय वस्त्रादिकांचा मल जात नाही; म्हणून म्हटले कीं हे मानस सुविमल आहे. कोणत्याही प्रकारचा मल नाही; कारण हे. (क) प्रेमाम्बुपूरं आहे. भगवत्प्रेम हेच अंबु(जल) पूरो जल प्रवाहे रूपात् (मंदिनी). पूर=पाण्याचा पूर, भगवत्प्रेम रूपी अंबूचा ज्याला पूर आलेला आहे असे. असल्या प्रवाहाचा आवाज येत असतो म्हणून येथे अंबू शब्द वापरला आहे. अम्बते, शब्दं करोति इति, अंबू, अबि शब्दे (अ.व्या.सु) मधुर, प्रेमळ, रसाळ, शब्द सतत कानांवर येत असतात. प्राकृत मानस सरोवराचे जळ शब्दसुख देणारे, कर्णमधुर नसते; हे कर्णमधुर आहे हे प्रेमांबु शब्दाने सुचविले आहे. ल.ठे. 'कर्णमधुर संगीत लहरी' हा श्री नरसोपंत केळकरांचा रामचरित मानसा विषयी अभिप्राय आहेच. कल्याण मासिकाच्या मानसांकांत आहे. (ख) शुभं- हे प्रेमांबु प्राकृत नाही; विषय प्रेम नाही. 'प्रेमभक्ति जलविण रघुवर तों । अभ्यंतर मल कधी न जातो' (७।४९।६)पण या मानसांत

राम प्रेमभक्तिरूपी जल आहे त्यामुळे अभ्यंतरमल= मायामोहमल जातात विज्ञान व प्रेमभक्ति मिळतात.

(३) भक्त्यावगाहन्ति ये- जे भक्तींनी वारंवार बुड्या मारतात. आनंदित - अन्त:करणांने उत्साहाने; अत्यंत आवडीने एखाद्या पाणबुड्या प्रमाणें या मानसात, म्हणजे मानसांतील प्रेमाम्बुपूरांत वारंवार वुडया मारून स्नान केले पाहिजे. हे कसे करावयाचे हे आता ठरविणें भाग आहे. या जलांत बुडी मारल्यावर जशी स्थिति होते तशी संत-सद्‌गुरूमुखाने मानसकथा श्रवण करीत असता झाली पाहिजे. याचे सविस्तर वर्णन 'परिसुनि समजुनि, मुदित मन मज्जति अति अनुरागि.' (बा.कां.दो.२) च्या टीकेत पाहावे. थोडक्यांत सार हे की. 'श्रवणिं कथनि; हर्षती पुलकती। ते सुकृती मन मुदित मज्जती' (१।४१।६ टी.प.) तसेच ऐका मतिमन चित्ता लाऊनि' (३।१५।१) या वरील टीका पहावी. श्रवण किंवा कथन, गान करतानां रोमांच, अश्रुपात, स्तंभ इत्यादि सात्विक भाव भक्तिरसवर्णनांत प्रगट होऊ लागले कीं अवगाहन सुरू झाले; असे समजावे. मात्र विरह शोकरसाचे वर्णन ऐकतानां सात्विक भाव प्रगट झाले तर ते मज्जन नव्हे. 'पुलक वाटिका बाग वन' (१।३७।टी.प.)

(४) 'ते संसार... दह्यन्ति नो मानवा:' ते मानवा: संसार पतंग (सूर्य)घोर किरणै, नो (न) दह्यन्ति. संसार, संसृति मन= जन्म मरण परंपरा. पतंग=सूर्य, घोर=भयंकर, अति तापदायक. ते मनुष्य संसाररूपी सूर्यच्या अति तापदायक किरणानीं जळत नाहीत. मानस सरोवरांतील खोल पाण्यांत बुडया मारीत असलेल्या माणसानां ग्रीष्म ऋतूतील सूर्याच्या प्रचंड किरणांचा जसा ताप होत नाही. तसाच या मानसांत यथाविधि बुडया मारणारानां जन्ममरण परंपरेत होणारे त्रिविध ताप, नाना यातना होत नाहीत; ते भवभयातून मुक्त होऊन परानंद संदोह होतात. 'सुकृपे राम जयास विलोकति।। तो सादर सरिं मज्जन करतो। घोर महा त्रय तापि न जळतो।।(१।३८।५-६) 'मन करि बिषय वनानलि जळता। होइ सुखी या सरांत पडतां' (१।३५।८) (क) शंका- घोर किरणै; मानवा: न (नो) दह्यन्ति' हे कर्मणि प्रयोगाचे वाक्य आहे. खरे पाहता दह्यन्ते असे रूप पाहिजे होते; व 'दह्यन्ते

न भवार्क ' घोर किरणै स्ते सज्जना मानवा;' असे सहज लिहितां आले असतें; असे असून दह्यन्ति रूप घालण्यांत गूढ भाव आहे तो असा - संसार=संसृति मिथ्या आहे. त्या मिथ्या संसृतीतील सर्वोत्कृष्ट अशा नरजन्मास येऊन सुद्धा, नरजीव वेदपुराणसंत यानीं सांगितलेले न ऐकता जगाला व जगांतील विषयांना सत्य मानतो; मृगजळाच्या मागे धाऊन हरणें मरतात, यांत दोष कोणाचा? मृगजळाचा दोष नाही; मृगजळ हरणांना मारीत नाही. ती स्वतःच आपल्या मूर्खपणामुळे मरतात. त्या प्रमाणेंच संसारसूर्याचे किरण मानवाना जाळीत नाहीत. मानव स्वतःच त्या हरणांच्या सारखे विषयरूपी वणव्या जवळ प्रेमाने धावत जातात व जळतात; म्हणूनच जळतात असा अर्थ वर केला आहे. दह हा धातु चतुर्थगणाच्या परस्मै पदासारखा वापरला आहे. श्री रामचरितमानसा सारखे सर्व ताप शमन करणारे जंगम मानस सरोवर कोणाही नर जीवास सहज मिळण्या सारखे असता अभागि मानव ह्याच्या जवळा सुद्धा जात नाहीत; म्हणून हा दोष संसार पतंगाच्या माथीं मारण्याचें कारण नाही. <u>(ख)</u> उपक्रमांत मानसरूपकांत काय म्हटले आहे पहाः- 'अद्‌भुत सलिल श्रवणि गुणकारि। आशा तृषा मनोमल हारि।। पोषि राम सुप्रेमा पाणी। हरि सकल कलि कलुषें ग्लानी।। शोषि भवश्रम तोषक तोषा । शमन दुरित दुख दरिद्र दोषां ।। कामकोप मद मोह बिनाशक । विमल विवेक विराग विवर्धक ।। करतां सादर मज्जन पाना । पाप हृदयिं परिताप उरत नां।। जिहिं या जलि मानस ना क्षालित । ते कातर कलिकाले वंचित ।। तृषित,बघुनि रविकरभव वारी ।- फिरतिल जिव मृग दुःखी भारी' (१।४३।२-८) टीका. पहा.) हे कीर्ति शरयूंच्या जलाविषयी म्हटले असले तरि शरयूचे जल मानसांतलेच. <u>(ग)</u> संसारताप संतप्त असून लोक या मानसा कडे कां जात नाहीत याचे वर्णन १।३८।३ पासून १।३८ पर्यंत पहावे. तसेच विषयी काक बलाक गेले चुकून तर काय होते याचे वर्णन १।३९।१-४ मध्यें टीकेत पाहावे.

<u>ल. ठे.</u> ग्रंथाचा उपक्रम वर्णानां, यातील 'व' या अमृतबीजाने केला. व उपसंहारात 'मानवाः' यातील 'व' अक्षारानेच उपसंहार केला. म्हणजेच समग्र ग्रंथ 'व' या अमृत बीजाने संपुटित केला आहे.

अनुवादक कृत- उपसंहार-

आर्या- । श्री रामा तव नामीं सुखदामीं नित्य चित्त रंगावे ।
।। कोमल पदकमली तव मनमधुपें नित्यची तरंगावे ।।१।।
। गावा गुणगण गरिमा गगनाहुनि गहन गोड गंभीर ।
।। तारी त्रिताप तरणी तापार्णव दावि चरण तव तीर ।।२।।
। देवा! प्रज्ञानाला द्यावे जों कायसंघ निश्वासे।
।। सेवा विश्वाची या तवरूपाची घडो सुविश्वासें ।।३।।

शब्दार्थ- नामीं=नामांत; सुखदाम=सुखांची माळ, सुखांचा हार, तरंगावे= तरंगत राहावे, गरिमा=मोठेपणा, महत्व, गहन= विशाल, गंभीर= अगाध, त्रितापतरणी= त्रिविध तापरूपी सूर्य, तापार्णव= तापाचासागर. त्रिविधतापरूपी सूर्याचा तापसागर; दावी= दाखवितो(दावी) या क्रियेचा कर्ता आहे. कायसंघ =देह-इंद्रियें इत्यादिंचा समूह. निश्वासे= श्वास टाकीत आहे, जिवंत आहे. सूचना- यापेक्षां या प्रार्थनेवर आणखी विस्तार नको. गूढार्थ नाही.

श्री मानस गूढार्थ चंद्रिका उत्तर काण्ड अध्याय १६ वा समाप्त.
इति श्रीमद्रामचरित मानसे सकल कलि कलुष विध्वंसने
समाप्तः सप्तम सोपानः ।
उत्तर काण्ड समाप्त.
श्री रामचरितमानस-गूढार्थ चंद्रिका टीका समाप्त.
श्री राम-सद्‌गुरु -चरणारविन्देषु समर्पिताऽस्तु.

अनुवादकाची सज्जनांस विनंति

(पृथ्वी)

नसे कुशल हा कवि कुशल ना जनां शीकवी।
परेश रघुनाथ जो करि सनाथ या, तो कवी।।
स्वयेची करवी तरी मिखुं कां वृथा योरवी।
जसा रविमणी द्रवे उगवता नभी तो रवि।।१।।
न शब्द पटुता अथवा सुखदकाव्य कौशल्यता।
परी तुलसिदास सत्कवि तरुवरी ही लता।।
गुरू-पदरज क्षमा जल कृपा वरी घालता।
विदेहतनयापती, फळलि बोलतां चालतां।।२।।
तृणासि करि वज्र जो तृणलघू पवीते करी।
मुखीं वदवि वेद जो जड अशा पशूच्या हरि।।
अशक्य किमपी नसे रघुवरा करा ना स्मय।
सरोज पद वंदुनी जयति बोलतो जय जय।।३।।
अजाण मदिमंद मी, परि धरून हाती मला।
चरित्र-अनुवाद हा करविला हरीनें भला।।
असे बघुनि जाति जे शरण राघवा मानव।
तपांस सुखलाभ तो; प्रतिदिनीं मिळे मा नव।।४।।
सुसंगति घरून जे पठति या चरित्रा नव।
स्वधर्म अवलंबुनी भजति राम भक्तिस्तव।।
विवेक-विरती सवे जपति नाम जे राघव।
जिवंत असता तनू सहज लंघिती ते भव।।५।।
बसून तरणीमधें उतरती जलाब्धी जसे।
तसाच अनुवाद हा मम कृती जराही नसे।।
वसे हृदयिं राम जो सकल तोच हे बोलतो।
शुका शिकविती जसे नर वदे तसे बोल तो।।६।।

श्रीतुलसीदास विरचित श्री रामायणजीची आरती

आरति श्री रामायनजी की। कीरति कलित ललित सिय पी की।।
गावत ब्रह्मादिक मुनिनारद। बालमीक बिग्यान बिसारद।।
सुक सनकादि सेष अरु सारद। बरनि पवनसुत कीरति नीकी।।१।।
गावत बेद पुरान अष्टदस। छओ सास्त्र सब ग्रंथन को रस।
मुनिजन धन संतन को सरबस। सार अंस संमत सबही की।।२।।
गावत संतत संभु भवानी। अरु घटसंभव मुनि बिग्यानी।
ब्यास आदि कबि बर्ज बखानी। कागभुशुंडी गरुड के ही की।।३।।
कलिमल हरनि बिषय रस फीकी। सुभग सिंगार मुक्ति जुवती की।
दलन रोग भव मूरि अमी की। तात मात सब बिधि तुलसी की।।४।।

आरती श्री रामचरित्राची (मराठी)

जय जय जय जय आरति सुखकर रामचरित्रातें। सुखकर... ।।
श्रवणें मननें पठणें गानें दे हरि-मित्रातें ।।धृ।।
शंकर-मानसि रचिलें पावे हिमगिरिकन्या तें। पावे... ।।
काकभुशुंडी याज्ञवल्क्यमुनि लोमश घटजातें।।१।।
नरहरि तुलसीदासापासुनिं गंगादासातें। पासुनि।।
तेणें होऊनि कृपाल दिधलें मजला दिनातें।।२।।
भवभयहरणा शांतिवितरणा रघुवर चरणांतें। वितरणा।
प्रेमळ पापविनाशन पावन पाववुनि मातें।।३।।
माते सम मम अहित निवारुनि निजपद दात्याते।
सच्चित्सुखकर राम कृपाकर-भक्तिरसा दातें।।४।।
जनहितकारक षड्रिपुमारक भवतारक पातें।
नाहीं साधन नीति-सुशिक्षण तुजसम जगतातें।।५।।
म्हणुनी रामे आज्ञापुनि मज या अनुवादातें।
करवुनि केले तीर्ण काहिंसे तव उपकारातें।।६।।
परधर्मी हि निधर्मी वानिति बहु महिमा; त्यांते।
वेद शास्त्रवर मंथन उद्धृत या नवनीतातें।।७।।

नवनींतांचा स्वाद घेऊनी नवनीत चि व्हावे।
रामचरित वर तुलसी-वंदन प्रज्ञा करि भावें ।।८।।

आरती श्री बाबा गंगादासाची

प्रेमे आरति ओवाळूं जय गंगादासातें ।
प्रेमाचा पुतळा च भासला जो जगती मातें ।।धृ ।।
भक्तिरसाची खाण असुनि नहि वैराग्या वाण ।
मान मोह मद मार नसोनी पूर्ण असे ज्ञान ।।१।।
देहिं सर्वदा उदास राही कर्दळि-कौपीन ।
रसनेचा जय पूर्ण असोनी नाहीं तनु पीन ।।२।।
रामरसाचा पाझर झरतो नयनीं नहि भान ।
सर्वभूतहित-निरत, सतत रत रामचरित-गान ।।३।।
भक्तिरसाचा स्वाद चाखिला ज्यांच्या संगतिने ।
किति उपकारा वानूं त्यांच्या अतर्क्य मन-मतिनें ।।४।।
केवळ आशीर्वादें ज्यानीं रहस्य हे दिघलें ।
प्रभुपदिं निष्ठा अचळ समर्पुनि चित्तमळां धुतले ।।५।।
हा अनुवाद तयासी अर्पू पुष्पांजलि हातें ।
प्रेम जयाचे अखंड निर्मळ प्राणांहुनि माते ।।६।।
करूं दंडवत अखंड नमुनी त्यांच्या चरणांते ।
उपकारा उत्तीर्ण व्हावया शक्ति न प्रज्ञातें ।।७।।

आरत्या समाप्त.

सूचना - आतां पुढे परिशिष्ट प्रकरण आहे. त्यांत एकंदर पंधरा परिशिष्टें आहेत.

जय जय सर्वसुखाकर राम । शिव-अजपूजित पदरज राम ।।

■

परिशिष्ट १

सीता परित्यागाचे मूळ कारण 'रजक पूर्वजन्म कथा'

(पद्म. पु. पा. खं. ५७)

श्रीजनकनंदिनी सीता जेव्हा कुमारिका होती तेव्हा (बालपणी) एक दिवस सख्यांसह बागेत खेळत होती. तेव्हा तेथे एका वृक्षावर अत्यंत सुन्दर शुक-शुकीची एक जोडी होती. ते दोघेही भावी रामचरित्र श्लोकांमधून गात होते. त्यामध्ये सीता, जानकी, राम ही नावे वारंवार ऐकून सीतेला जिज्ञासा उत्पन झाली की हे दोघे कोणत्या जानकी-सीतेसंबधी बोलत आहेत? आणि ज्या रामांविषयी बोलत आहेत, ते राम कोण, कुठले? सीतेला वाटले की ते कोणी देव-देवी असावेत.

सीतेने आपल्या सख्यांकरवी त्या दोघांना पकडले आणि मोठ्या विनयाने ही जानकी-सीता कोण असे विचारले. राम कोण, कोठले आणि त्यांचा संबंध पुढे कसा येणार आहे इत्यादी सर्व वृत्तांत सविस्तर ऐकविण्याची विनंती केली. जानकी सीता म्हणजे तूच असे सांगून ते शुक-शुकी पुढे म्हणाले- 'आम्ही पक्षीच आहोत. वाल्मीकी आश्रमाजवळून उडत असता तेथे दररोज (प्रदीर्घ काळपर्यंत) हे राम-चरित्र ऐकल्याने ते आता आम्हाला पाठ झाले आहे. जानकी सीता तूच आहेस, आणि राम विश्वामित्र मुनींबरोबर येऊन तुझ्याशी विवाह करतील', असा सर्व वृत्तान्त अत्यंत विनयपूर्वक सांगितला व म्हणाले, 'आता आम्हाला सोडा'. तेव्हा सीतेने पोपटाला फक्त सोडले आणि म्हणाली 'ह्या शुकीने जसे सांगितले तसे झाल्यावर माझ्या विवाहानंतरच मी हिला सोडेन. तोपर्यंत हिच्या मुखाने मी दररोज रामकथा ऐकत राहीन; हा रामकथा-श्रवणाचा लाभ मी गमवायला तयार नाही.'

त्यावर शुकाने प्रार्थना केली की, 'ही गर्भवती आहे, म्हणून तिलाही सोड. ती प्रसूत झाल्यानंतर, पिले स्वतंत्र होताच, आम्ही दोघेही पुन्हा तुझ्याजवळच येऊन राहू, तेव्हा आत्ता तिला सोडून दे'. शुकीनेही सीतेची तशीच आर्जवाने प्रार्थना केली की 'मला (या काळात) तर पतिविरह अत्यंत असह्य होईल, तेव्हा मलाही सोड.' पण सीतेने ऐकले नाही. तेव्हा रागावून

शुकीने सीतेस शाप दिला की- 'जसा तू माझा वियोग (ताटातूट) माझ्या पतीपासून करीत आहेस, तसाच तुलाही गर्भवती असताना रामांचा वियोग होईल. अशा शाप देऊन पतिविरहाच्या असह्य दुःखाने त्या शुकीने 'राम-राम' म्हणत प्राण सोडला. त्या शुकीसाठी एक सुंदर विमान आले आणि ती त्यात बसून स्वर्गास गेली.

आपल्या पत्नीच्या विरह दुःखाने तो शुकही अत्यंत व्याकुळ झाला आणि रागारागाने गंगेत जाऊन पडला. अन् मरता मरता म्हणाला-'मी रामांच्या नगरीत जाऊन अशा प्रकारे जन्म घेईन की जेणें करून माझ्या पत्नीचा शाप सत्य होईल.' तोच शुक अयोध्येत रजक किंवा धोबी बनला, आणि त्याने केलेली सीतेची निन्दा श्रीरघुनाथांच्या गुप्तहेरांनी जशी ऐकली तशी त्यांना ऐकवली, आणि त्यामुळे गर्भवती अवस्थेत श्रीरामांनी सीतेचा परित्याग केला.

ऐतिहासिक विशिष्ट घटनांचा यथायोग्य निर्णय करण्यासाठी पुराणांचे परिशीलन किती आवश्यक आहे, हे या प्रसंगावरून ध्यानात येईल. म्हणून यावरूनच पद्मपुराणातही 'शिव-राघव संवादा'त म्हटले आहे की- 'अन्तर्गतोऽपि वेदानां सर्व शास्त्रार्थवेद्यपि । पुमान श्रुत पौराणः न सम्यग् गतिर्मान्पुयात्।। वेदार्थादधिकं मन्ये पुराणार्थं च भामिनि !' (शिव पार्वतीस म्हणतात-) 'पुराणमन्यथा कृत्वा तिर्यग्योनिमवान्पुयात्।।' ही कथा आनंदाश्रम मुद्रणालय (पुणे)च्या पद्मपुराण पाताल खंडात ५७व्या अध्यायात आहे.

*-कुपिता दुःखिता भार्या शशाप जनकात्मजाम् ।।५७।। यथा त्वं पतीना सार्धं वियोजयासि मामितः।। तथा त्वमपि रामेण वियुक्ता भव गर्भिणी।।५८।।

- पहिले परिशिष्ट समाप्त-

परिशिष्ट २

ज्ञानदीपाहून भक्तिचिंतामणीची श्रेष्ठता

ज्ञानदीप	क्रम	भक्तिचिंतामणी
असा पेटवा दीप तेजराशि विज्ञानमय	१	रामभक्ति चिंतामणी सुंदर
दिवसा प्रकाश देत नाही	२	परम प्रकाशरूप दिनराती
केवल तेजराशी	३	परम प्रकाशरूप
दिवा, घृत, वाती इत्यादी पाहिजे	४	काहीच नको दिवा, घृत, वाती
माया 'विझवी दीपा अंचल वातें'	५	त्याला विझवी लोभ वात ना
कळ बळ छळ करि समीप जाते	६	निकट मोह दारिद्र्य येत ना
ज्ञानदीप सुंदर नाही	७	रामभक्ती चिंतामणी सुंदर
विघ्न अनेक करी तैं माया	८	प्रबल अविद्या तिमिर नासतो
जैं उरगृहिं तो घुसे प्रभंजन	९	खल कामदि निकट ना वळती
होइ विकल मति विषय वादळें	१०	सकल शलभ समुदाय हारतो
जीव पुन्हा तैं विविध विध भोगि संसृती क्लेश	११	दुःखलेश त्यां स्वप्निंहि नाही
करणसुरांना ज्ञान नावडे	१२	ब्रह्मादि सर्व देवांनी भक्ती मागितली
ज्ञानाचा पथ कृपाणधार हि	१३	बंधू! सुलभ सुखद हा मार्ग हि ७/४५/२
पडत खगेश! न लगे वार हि	१४	त्यास सदा मी रक्षीं ताता। ३/४३/५
भक्तिहीन तो प्रिय नहि मजला ७/४५/४	१५	जीव भक्तिमान् नीच जरि महा। प्राणप्रिय मज बाणा मम हा।। ७/८६/१०

(ज्ञान) मोक्ष सकल सुखखाणी	१६	ती मम भक्ति भक्त सुखदाई ३/१६/२
ज्ञान अधीन तिच्या विज्ञानहि ३/१६/३	१७	ती स्वतंत्र अवलंब आन नहि ३/१६/३
साधत कठिण ७/४५/३	१८	वदा भक्तिपथिं कुठे प्रयासहि ७/४६/१
भगवान ज्ञान्यांसाठी अवतार घेत नाहीत.	१९	संत समान तुम्हां प्रिय मातें। प्रार्थुनि इतरि न धरूं देहाते ५/४८/८
• केवळ ज्ञानी प्रभुंना आवडत नाहीत.	२०	महती दासां सदा देतसां ३/१३/१४
भक्तिहीन् जरि विरिंचि असला तो प्रिय सब जींवा सम मजला ७/८६/९	२१	रामदास रामाहुनि मोठे ७/१२०/१६
प्रौढ तनय सम मजला ज्ञानी ३/४३/८	२२	बालक सुत सम दास अमानी ३/४३/८

अशा प्रकारे केवळ ज्ञानमार्ग आणि ज्ञानी, व भक्तिमार्ग आणि भक्त यातील अंतर मानसानुसार यथामती वरीलप्रमाणे दाखवून दिले आहे. मुख्य आधार ज्ञानदीप आणि भक्तिचिंतामणी या प्रकरणांचाच आहे. इतर काण्डातील उदाहरणे ते ते क्रमांक घालून दाखविली आहेत. 'ज्ञानदीप' आणि 'भक्ति चिंतामणी' हे शब्दच जणू स्वयंप्रकाशी -अर्थान्वयी आहेत, त्यावरूनच यामध्ये श्रेष्ठ कोण व का हे सामान्य मनुष्य ही सहज सांगू शकेल. 'ज्ञानदीपेन भास्वता' (भ.गीता) 'नामचिंतामणी' (पद्मपुराण)- याद्वारे हे शब्द तुलसीदास निर्मित नाहीत हे स्पष्ट होते.

- दुसरे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट ३

महादेवकृत रामस्तुती

प.पु. उत्तरखंड अध्याय २७० मधील (आनंदाश्रम-प्रकाशन)

श्रीरामराज्याभिषेक समयी दरबारात प्रगटरुपाने येऊन स्तुती केली आहे.

दृष्ट्वा तुष्टाव हृष्टात्मा शंकरो द्रष्टुमागतः
कृताञ्जालिपुटो भूत्वा सानन्दो गद्गदाकुलः ।
हर्षयन् सकलान् देवान् मुनीनपि च वानरान् ॥२३॥
महादेव उवाच- नमो मूलप्रकृतये नित्याय परमात्मने ।
सच्चिदानंदरूपाय विश्वरूपाय वेधसे ॥२४॥
नमो निरन्तरानन्दकन्दमूलाय विष्णवे ।
जगत्त्रयकृतानन्तमूर्तये दिव्यमूर्तये ॥२५॥
नमो ब्रह्मेन्द्रपूज्याय शंकराय हराय च ।
नमो विष्णुस्वरूपाय सर्वरूप नमो नमः ॥२६॥
उत्पत्तिस्थितिसंहारकारिणे त्रिगुणात्मने
नमोऽस्तु निर्गतोपाधिस्वरूपाय महात्मने ॥२७॥
(अनया विद्यया देव्या सीतयोपाधिकारिणे ।
नमः पुंप्र (स्प्र) कृतिभ्यां च युवाभ्यां जगतां कृते) ॥२८॥
जगन्माता पितृभ्यां च जनन्यै राघवाय च ।
नमः प्रपञ्चरूपिण्यै निष्प्रपञ्चस्वरूपिणे ॥२९॥
नमो ध्यानस्वरूपिण्यै योगिध्येयात्ममूर्तये ।
परिणामापरीणामनित्याभ्यां च नमो नमः ॥३०॥
कूटस्थ बीजरूपिण्यै सीतायै राघवाय च ।
सीता लक्ष्मीर्भवान् विष्णुः सीता गौरी भवाञ्छिवः ॥३१॥

सीता स्वयं हि सावित्री भवान् ब्रह्मा चतुर्मुखः ।
सीता शची भवाञ्शक्रः सीता स्वाहाऽनलो भवान् ।।३२।।
सीता संहारिणी देवी यमरूपधरो भवान् ।
(सीताहि सर्वसम्पत्तिः कुबेरस्त्वं रघूत्तम) ।।३३।।
सीता देवी च रुद्राणी भवान् रुद्रो महाबलः ।
सीता तु रोहिणी देवी चन्द्रस्त्वं लोकसौख्यदः ।।३४।।
सीता संज्ञा भवान् सूर्यः सीता रात्रिर्भवान् दिवा ।
सीता देवी महाकाली महान् कालो भवान् सदा ।।३५।।
स्त्रीलिङ्गं तु त्रिलोकेषु यत्तत्सर्वं हि जानकी ।
पुन्नामलाञ्छितं यत्तु तत्सर्वं हि भवान् प्रभो ।।३६।।
सर्वत्र सर्वदेवेश सीता सर्वत्र धारिणी ।
तदा त्वमपि च त्रातुं तच्छक्तिविश्वधारिणी ।।३७।।
तस्मात्कोटिगुणं पुण्यं युवाभ्यां परिचिह्नितम् ।
चिन्हितं शिवशक्तिभ्यां चरितं शान्तिदं प्रभो ।।३८।।
आवां राम जगत्पूज्यौ मम पूज्यौ सदा युवाम् ।
त्वन्नामजापिनी गौरी त्वन्मन्त्रजपवानहम् ।।३९।।
मुमूर्षोर्मणिकर्ण्यां तु अर्धोदक निवासिनः ।
अहं दिशामि ते मन्त्रं तारकं ब्रह्मदायकम् ।।४०।।
अतस्त्वं जानकीनाथ परंब्रह्मासि निश्चितम् ।
त्वन्माया मोहिताः सर्वे न त्वां जानन्ति तत्त्वतः ।।४१।।
ईश्वर उवाच- इत्युक्तः शम्भुना रामः प्रसादप्रणतोऽभवत् ।
दिव्यरूपधरः श्रीमान् अद्भुताद्भुतदर्शनः ।।४२।।

तं तथारूपमालोक्य नरवानरदेवताः ।
न द्रष्टुमपि शक्तास्तु भेषजं महदद्भुतम् ।।४३।।
भयाद्वै त्रिदशश्रेष्ठाः प्रणेमुश्चातिभक्तितः ।
संविज्ञाय च रामोऽपि नरवानरदेवताः ।।४४।।
मायामानुषतां प्राप्तः सर्वदेवान् ब्रवीद्वचः ।
श्रीराम उवाच- श्रुणुध्वं देवता यो मां प्रत्यहं संस्तरिष्यति ।
स्तवेन शम्भुनोक्तेन देवतुल्यो भवेन्नरः ।।४५।।
विमुक्तः सर्वपापेभ्यो मत्स्वरूपं समश्नुते ।
रणे जयमवाप्नोति न क्वचित् प्रतिहन्यते ।।४६।।
भूतवेतालकृत्याभिर्ग्रहैश्चापि न बाध्यते ।
अपुत्रो लभते पुत्रं पतिं विन्दति कन्यका ।।४७।।
दरिद्रः श्रियमाप्नोति सत्ववाच्छीलवान् भवेत् ।
आत्मतुल्यसुतः श्रीमान् जायते नात्र संशयः ।।४८।।
निर्विघ्नं सर्वकार्येषु सर्वारम्भेषु वै नृणाम् ।
यं यं कामयते मर्त्यस्तल्लभेत मनोरथम् ।।४९।।
षण्मासान्मुक्तिमाप्नोति स्तवस्यास्य प्रसादतः ।
यत्पुण्यं सर्वतीर्थेषु सर्वयज्ञेषु यत्फलम ।
तत्फलं कोटिगुणितं स्तवेनानेन लभ्यते ।।५०।।

इति श्रीमहादेवकृत रामस्तवः समाप्तः ।

- तिसरे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट ४

कुदान घेणें

(या विषयी उत्तरकाण्ड ९९/२ चा टीकेत पूर्वी थोडासा खुलासा केला आहे)

कुदान घेणे = निषिद्ध प्रतिग्रह, या कुदानांचे मुख्य चार प्रकार आहेत. १.दातृदोष २. कालदोष ३. देशदोष ४. प्रतिग्रह दोष.

१) दातृदोष - उत्श्रृंखल वृत्तीचा राजा किंवा शास्त्राविरुद्ध वागणारा राजा, पतित, चाण्डाळ आणि ग्रामचाण्डाळ यांचे कडून दान घेऊ नये. २) कालदोष - सूर्य-चंद्रग्रहण, अर्धोदय, गजच्छाय, कपिलाषष्ठी इत्यादी महापर्वांच्या पर्वकाळात कोणतेही दान घेणे हे कुदान होय. ३) देशदोष - कुरूक्षेत्र, गया, प्रयाग, पुष्कर आदी महाक्षेत्रांत किंवा कोणत्याही तीर्थाचे ठिकाणी दान स्वीकारणे हे कुदान होय. 'तीर्थे न प्रतिगृह्णीयात् प्राणैः कण्ठगतैरपि।' ४) प्रतिग्रहदोष- अग्राह्य वस्तुदोषः 'तिलधेनुर्गवो वाजी महिष्यजिनमूर्तयः। सुरभिः सूयमाना च घोराः सप्त प्रतिग्रहाः।' 'महिष्यजिनमूर्तया' चे जागी 'प्रेतान्नमजिनं मणिम्' असा पाठभेद आहे. तीळ, धेनू (गाय), बैल, घोडा, रेडा, मृगादिंचे चर्म किंवा कातडे, शालिग्रामादि मूर्ती, आणि अन्य मूर्ती, प्रसूत होणारी गाय, मृताच्या एकोव्दिष्ट श्राद्धाचे भोजन वगैरे आणि मणी. (मणि= शाळिग्राम, इति हेमाद्रिः) 'अरुणस्मृति' मध्ये रथ आणि हत्ती यांची आणखी भर आहे. सोळा महादाने आणि तुलादानाचा अंश हे ही अग्राह्य आहेत. १) हे सर्व दुष्ट प्रतिग्रह होत. आणि 'दुष्टप्रतिग्रहरतो विप्रो भवति पातकी। नाभिभाषेत् ततो दत्वा तन्मुखं नावलोकयेत्' (भविष्योत्तरे). दुष्ट प्रतिग्रह म्हणजे वरील चार पैकी कोणत्याही एका प्रकाराचे दान घेणारा विप्र पातकी (पापी) होतो. असे दान ज्याने घेतले असेल त्यास दान देणाऱ्यानेही पुन्हा कधी त्याचेशी भाषण करू नये, इतकेच नव्हे तर पुन्हा त्याचे तोंडही पाहू नये. या सर्वास आधार -'दानचंद्रिका' ग्रंथ आहे. जे कुदानात गणले गेले नाही असेही काही दान घेणे हा ही दोषच आहे, कारण दान घेण्याने ब्राम्हणाचे ब्राह्म-तेज नष्ट होते. - (अरुणस्मृति). म्हणून परिग्रह दान घेतल्यानंतरही प्रायश्चित घेणे आवश्यक आहे.

अपवाद - (१) मधुपर्के च या धेनुर्या धेनुः कार्य सिद्धये। एतत्प्रतिग्रहे विप्र प्रायश्चित न विद्यते। तसेच दक्षिणारहित भूमिदान सदोष नाही. (२) न मागता, संकल्प व दक्षिणारहित आणून दिलेले दुष्टाकडूनही घेण्यात दोष नाही. यापेक्षा अधिक माहिती भविष्योत्तर पुराण, अरुणस्मृति, दानचंद्रिका इत्यादी ग्रंथात पहावी.

- चौथे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट ५

श्रीरामचरितमानसोपलब्ध राम-सपादसहस्रनाम (१२५१) स्तोत्र

लेखकाचे निवेदन

श्रीरामचरितमानसामध्ये श्रीरामसहस्रनाम मिळेल अशी वृती 'मानस-गूढार्थ-चंद्रिका' त्याची मुद्रण प्रत (press-copy) लिहिताना वारंवार उठत असे, आणि या विषयाचा (ओझरता) उल्लेखही गूढार्थचंद्रिका-प्रस्तावना खंड (मराठी) यात आलेला होता. वेळेचा अभाव आणि संस्कृत श्लोकांचे लेखन करणे हे काम या अल्पज्ञ, मंदमती लेखकाच्या शक्तीच्या बाहेरचे असल्यामुळे अशा मानसांतर्गत श्रीरामनामांचे संशोधन किंवा संकलन करून श्लोकबद्ध रचना करण्याची कधी इच्छाच झाली नाही की वृत्तीही उठली नाही. तथापि इ.स.१९५५ मध्ये श्री धनसिंह भदौरिया यांनी विनयपूर्वक विनंतीनुसार मानसोपलब्ध रामनामांचे संकलन करण्याचे प्रयत्न सुरूही केले पण अचानक त्यांचे देहावसान झाले अन् ते कार्य तेथेच थांबले.

प्रस्तावना-खंडाच्या मराठी लेखांचा हिंदी अनुवाद, मानसमणी मासिकासाठी करताना श्रीरामसहस्रनाम विषयक उल्लेखांकडे लक्ष गेले, तरी त्यावेळी ते कार्य सुरू करण्याची इच्छा झाली नाही. अचानक डिसेंबर १९५९ मध्ये स्फूर्ती झाली आणि श्रीरामचरितमानसाचे अवलोकन करून नाम-संकलनाचे कार्य केवळ ७/८ दिवसांत पूर्ण झाले. चांगली १३०० नामे मिळाली. त्यावेळी 'श्रीमानस-शब्द-सागर' इथे उपलब्ध नव्हते, नाहीतर हेच कार्य अधिक शीघ्र आणि पूर्णरूपाने सिद्ध-झाले असते.

१३०० नामांचा संग्रह होऊनही श्लोकबद्ध रचनेस प्रारंभ झाला नाही. कारण संकलनकाळी अशी स्फूर्ती होत होती की, श्रीशिवशतनाम, श्रीभवानीशतनाम, श्रीलक्ष्मणशतनाम, श्रीहनुमानशतनाम आणि श्रीसीताशतनाम स्तोत्रे या मानसातील नामांनुसारच लिहिली जावीत. तेव्हा

हा प्रयत्न सुरू झाला आणि शिवनाम स्तोत्रादी लिहिली गेली. त्यानंतर श्री गुरु-कृपेने श्रीरामनामस्तोत्र लेखन सुरू झाले. प्रथम १००८, नंतर १२१२ असे करत करत शेवटी १२५१ नामांचे हे श्रीरामनामस्तोत्र संस्कृत श्लोकबद्ध झाले. १२५१=१+२+५+१=९ हा सर्वात मोठा, अविकारी आणि श्रीमानसकवी तुलसी-परमप्रिय असा अंक सहज सिद्ध झाला.

हा लेखक कवी, शास्त्री, पंडित, विद्वान, चतुर इ.इ. काहीही नाही. संस्कृत व्याकरणादि शास्त्रांचे अध्ययन तर जवळ जवळ नाही पैकी! विष्णुसहस्रनाम, रामसहस्रनाम इ. ग्रंथही जवळ नाहीत तसेच संस्कृत शब्दकोष, अमरकोष, इ. संदर्भग्रंथ मिळणेही कठीण! तसेच गेली तीस वर्षे संस्कृत-भाषा-व्यासंगाशी जवळ जवळ नाते नसलेले, दुरावलेले, अशा अनेक कारणांस्तव या संस्कृत श्लोक रचनेत नक्कीच कांही व्याकरण-दोष असणार असे वाटले.म्हणून मुंबईत राहणारे एक सत्त्वशील, भक्तिमार्गी, सदाचारी, सनातनी वृत्तीचे व्याकरणाचार्य -वेदान्ताचार्य इत्यादी अनेक पदवीविभूषित पंडितांकडे हे श्लोक अवलोकनार्थ पाठवले. त्यांनी मनःपूर्वक सूक्ष्म अभ्यासू वृत्तीने अवलोकन करून आवश्यक त्या सूचनांसह योग्य वेळेत सर्व श्लोक परत पाठवले.

श्रीतुलसीदासांच्या मानसांतर्गत शब्दकलावैशिष्ट्याची हानी न होईल, क्लिष्टता न वाटेल या दृष्टिने पंडितजींच्या सूचनांचा उपयोग करून आवश्यक तेथे सुधारणा केल्या. तरीही मानसाची काव्यकला, शब्दकला इत्यादींचे यथार्थ मर्म न जाणणाऱ्या लोकांना-पाठकांनाही पुढील श्लोकांत काही ना काही दोष आढळतील. उदाहरणार्थ -

१) 'जननी पितृसौख्यदः' यामध्ये अल्पाक्षरी शब्द प्रथम किंवा प्रारंभी पाहिजे या मतानुसार 'मातृपितृसौख्यदः' पाहिजे असे कोणी म्हणेल. परंतु 'जननी' आणि 'माता' या शब्दांच्या अर्थात वेगळ्या छटा आहेत. आणि अधिक क्लिष्टताही नको म्हणून तसेच 'जननी' ही पित्यापेक्षा जनकापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे म्हणून जननी शब्द प्रथम ठेवणे भाग पडले. अन्यथा

'मातापितरौ, पितरौ, मातर पितरौ, प्रसूजनपितरौ' या समानार्थी शब्दापैकी 'प्रसू' शब्दाने 'जननी' हा अर्थ मिळाला असता, परंतु क्लिष्टता वाढली असती. शिवाय मानसामध्ये गोस्वामींनी 'प्रसू' शब्दाचा वापरच केलेला नाही. श्रीमानसामध्ये शब्दांचे वापर गोस्वामींनी बहुतेक, त्यांच्या व्युत्पत्तीनुसारच केलेले आहेत, हे मर्म अजूनही अ-प्रकाशित आहे, वाचकांच्या फारसे ध्यानीं आलेले नाही.

२) 'रामचन्द' या शब्दामध्ये 'चन्द' शब्दात पंडिताना अप्रयुक्त शब्ददोष दिसेल, काही काही जण तर चन्द शब्द हिन्दी आहे असेही म्हणतील. पण 'चन्द' शब्द संस्कृत भाषेतच आहे. चन्द आणि चन्द्र मध्ये एका रकाराचा भेद आहे. रकारामध्ये दाहक अग्निबीज आहे. श्री राम वचन पहा- 'विषसंयुत कर-निकर पसरतो। विरहवंत नर नारि जाळतो॥' दाहकत्वरहित चन्द्राच्या अन्य सद्‌गुणाचे अस्तित्व जेथे दाखवून द्यायचे आहे तेथे 'चन्द' शब्द मानसात वापरलेला दिसतो. मानसाचे हे गूढार्थ वैशिष्ट्य सांगण्यासाठीच 'रामचन्द' असे लिहावे लागले. तेव्हा चन्द शब्दाचा उपयोग जाणून बुजून, हेतुपूर्वक समंजसपणे केला आहे.

३) काही जण म्हणतील 'अनन्यगतिक' आणि 'अनन्यगति' या शब्दांत पुनरुक्तिदोष आहे, पण दोन्ही शब्दांत एक फरक आहे. जो एकाच देवाचा दास- सेवक बनतो, अन्य कोणावरही भरोसा ठेवत नाही, तो 'अनन्यगतिक' होय आणि 'अनन्यगति' याची व्याख्या किष्किंधाकाण्ड दोहा ३ मध्ये श्रीरघुवीरमुखानेच केलेली सूज्ञ वाचक जाणतातच.

४) 'अगुण' आणि 'निर्गुण' यामध्ये जसा अर्थभेद आहे तसाच 'अनीह' आणि 'निरीह' शब्दात आहे.

५) ज्याने (भक्तीच्या) हट्टाने श्रीरामांचे-भगवंतांचे पदकमल धुतले आणि तिघांनाही गंगापार नेले तो केवट आणि निषादराज गुह हे दोघे एकच असे बरेच मानस टीकाकार मानतात. पण निषादराज गुह आणि केवट या दोन भिन्न व्यक्ती आहेत असे मानसामध्ये अतिशय स्पष्टपणे नमूद केले आहे. निषादराज

गुह रामसखा आहेत तर केवट हा केवळ केवट (एक सामान्य भक्त) आहे. (नाविक आहे)

६) संस्कृत व्याकरणशास्त्राचे अर्धवट ज्ञान असणारे पाठक काही सामासिक शब्दांत दोष पाहतील परंतु व्याकरणाचार्यांच्या दृष्टिने ते दोष असणार नाहीत. 'युधिष्टिर' सारखाच पथिगत शब्दाचा मानसातला वापर किंवा प्रयोग जसा आहे तसेच आणखीही काही शब्द या स्तोत्रात पुढे सापडतील.

७)'कपटछल छिद्राऽ प्रिय' 'ज्ञान्यभक्ताप्रिय' इत्यादी शब्दांतून प्रभू रघुनाथांचे स्वभाव वैशिष्ट्य दाखविण्याचा प्रयत्न आहे. 'मला कपट छल छिद्र न भावे' 'भक्तिहीन तो प्रिय नहि मजला'अशी प्रत्यक्ष श्रीराम-वचनेच आहेत. अप्रिय=द्वेष असा अर्थ करण्याची आवश्यकता नाही. अप्रिय=जो प्रिय नाही असा. प्रेम किं वा प्रीतीचा अभाव असणे म्हणजे वैर किंवा द्वेष म्हणणे हे योग्य नव्हे.

८) कोदण्डशरधर, चापपाणि, शार्ङ्गपाणि अशा शब्दांमध्येही पुनरुक्तिवदाभास आहे, पुनरुक्ती नाही, कारण प्रत्येक शब्दाच्या अर्थ-छटा भिन्न आहेत.

९) विधि, विधान, अयन, आयतन, भवन, धाम, सदन इत्यादी समानार्थी समजल्या जाणाऱ्या शब्दांमध्येही व्युत्पत्यानुसार सूक्ष्म अर्थभेद आहेत. हे 'अमरव्याख्या सुधा' (अमरकोष टीका) पाहून अधिक स्पष्ट होईल.

१०) 'अनुष्टुप्' छन्दाच्या चरणामध्ये सहावे अक्षर दीर्घ किंवा गुरु पाहिजे या सामान्य नियमाचा भंग पुराणांप्रमाणे जागोजागी दिसेल, तसा या स्तोत्रात क्वचित्च कुठे कुठे आढळेल.

११) अखिल विश्वच 'जडचेतनगुणदोषमय' असे असल्यामुळे या स्तोत्रात - श्लोकांमध्ये कोणताही दोष नाही हे म्हणणे मूर्खपणा नव्हे तर महामूर्खपणा ठरेल. कारण केवळ श्रीरघुनाथच निर्दोष आहेत, 'निर्दोषं हि समं ब्रह्म ।' (भ.गीता). म्हणून 'संत हंस गुण घेति पय त्यजुनि जला दोषास'

१२) प्रभु, राम, हरि, अज, अव्यय असे शब्द अनेकवेळा वापरले असले तरी त्यांची गणना करता ती एक/एक वेळा अशीच असेल.

१३) जरी 'च,वै, तु, हि' असे पादपूरणार्थक शब्द वापरलेले असले, तरी काही काही ठिकाणी 'तु, हि' या शब्दांचा सार्थ उपयोग ही केलेला आहे.

१४) नामस्तोत्रामध्ये वर्ण क्रमानुसार शक्यतो शब्दांचे वापर केलेले आहेत, तथापि काही काही ठिकाणी वृत्ताच्या सुकरतेसाठी इतर शब्दही वापरले आहेत.(क) ख,छ, ङ, क्ष, ज्ञ, ह या अक्षरांनी प्रारंभ होणारे शब्द फारच थोडे असल्याने त्यांची रचना जवळ जवळच्या ओळींमध्ये केली आहे. (ख) या नामस्तोत्रात 'रामचरितमानसात' प्रत्यक्ष वापरलेले शब्द किंवा तो अर्थ सूचित करणारे शब्दच प्रयोगात (वापरात) आणले आहेत. काही नामे राहूनही गेली असतील (ग) वर्णक्रमानुसार शब्दरचनेत त्या वर्णांमध्येही श्रीरामचरित्रक्रम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. क्वचित जेथे चरित्रक्रमभंग असेल तो केवळ वृत्तरचनेसाठीच झाला आहे.

१५)'रकारादि रामसहस्रनाम' 'मकारदि रामसहस्रनाम' अशी रामसहस्रनामस्तोत्रे संस्कृतमध्ये पूर्वीपासूनच आहेत, मग या स्तोत्राच्या रचनेचे व पठनाचे असे काय विशेष प्रयोजन आहे बरे? - असे एखादा बहुश्रुत संस्कृत पंडित म्हणेल - त्यास उत्तर हेच की, महाकविकुलाचे मूर्धन्य मुकुटमणि जे श्री तुलसीदास त्यांच्या शब्दनिर्मितीकलेचे अल्पदर्शन या स्तोत्राद्वारे सहजी घडावे. तसेच या मानसनाट्य महाकाव्याचे मुख्य नायक करुणानिधान, रघुनंदन, श्री रामचन्द्रांचे - चरित्र, गुण, स्वभाव इत्यादींचे चिंतन अल्पकाळात सहजी घडावे हा हेतू. तसेच यामुळे श्रीरामचरितमानसाचे सिंहावलोकन करणे या मंदमतीस सहज सुलभ होईल. आणि त्याद्वारे स्वान्तस्तमःशान्ती व स्वान्तःसुख यांची वृद्धी होईल असा स्वानुभवपूर्वक निश्चय वाटतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'प्रेरक हृदिं रघुवंश विभूषण' यांच्या अहैतुकी कृपेनेच केवळ ही रचना करण्याची अंतःस्फूर्ती झाली - हे मूळ कारण.

१६) गेली २०/२५ वर्षे काव्यादि जे जे लेखन हातून लिहिले गेले ती या लेखकाची इच्छा नसून त्या सच्चिदानंदघन रघुनाथाच्या प्रेरणेनेच हे सारे लिहिले गेले. लिहिताना पुस्तकरूपाने हे सर्व प्रकाशित होईल अशी लवमात्रही कल्पना नव्हती, आणि तशी शक्यताही वाटत नव्हती. तथापि ईशप्रेरणेने हे सारे ग्रंथ प्रकाशित केले गेले(त्यांची प्रत्येकी एक एक प्रत श्री तुलसी-संग्रहालय, रामवन, सतना येथे आहे.) काही ग्रंथ तर द्वितीय आवृत्तीच्या प्रकाशन मार्गावर ही आहेत. - ही केवळ रघुनाथाची प्रेरणा ! जणू या स्तोत्ररचनेपूर्वीच या सर्वांचेच प्रकाशन होईल अशी श्रीरघुवंशविभूषणाची व्यवस्था असावी ! म्हणूनच मानस संघ, रामवनाचे प्रमुख महोदय श्री शारदा प्रसाद यांनी जेव्हा हे स्तोत्र-लेखन पूर्ण झाल्याचे ऐकले तेव्हा त्वरित स्वयंस्फूर्तीने ही सर्व नामस्तोत्रे पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली. तरीही इ.स. १९६४ पर्यंत त्यांचेकडून हे कार्य झाले नाही.

या 'रामनामस्तोत्रां'चा प्रारंभ रामनामापासूनच होतो. पहिल्या ओळीतले रघुवर, ब्रह्म, नारायण, विष्णु, हरि हे शब्द गूढार्थपूर्ण आहेत. मानसातील महत्त्वाचा सिद्धांत या शब्दांनी सूचित केला गेला आहे की, रघुवंशात जे रामावतार होतात ते कधी ब्रह्माचे, कधी नारायण भगवंताचे तर कधी वैकुंठाधिपती भगवान विष्णुचे असतात. आणि राम, विष्णु, नारायण किंवा ब्रह्म या चारी शब्दांचा बोध एका 'हरि' या शब्दाने होतो. तत्त्वतः हे चारही एकरूपच आहेत. मानसाच्या मंगलाचरणात देखील 'अशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम्' ह्या शब्दांतूनही हीच एकवाक्यता जाणवते.

'ब्रह्माविष्णुशिवपूजित,' 'विधिहरिहर वन्दित' असे शब्द रघुपती रामाचे श्रेष्ठत्व ब्रह्मा-विष्णु-महेश या त्रिदेवांपेक्षाही आहे हे जाणवून देण्यासाठी आहेत; तसेच रामावतार परमात्मा परब्रह्माचा किंवा क्षीरसागरनिवासी नारायण भगवानाचा आहे हे सांगण्यासाठी आहे. 'ब्रह्माशम्भुफणीन्द्र सेव्य' अशा शब्दाने ब्रह्मदेव व शिव यांहीपेक्षा रघुनाथाची श्रेष्ठता सूचित होते, तसेच तो अवतार

भगवान नारायण किंवा वैकुंठाधिपती विष्णुंचा आहे हेही कळते. तर मधुसूदन, कैटभारि, हिरण्याक्षहन्ता हे शब्द केवळ वैकुंठाधिपती भगवान विष्णुचा रामावतार सूचित करतात. मानसात असे हे अवतारभेद का आणि ते तसे कोणत्या प्रकाराने सांगितले आहेत याचे साधार सविस्तर विवेचन आपणास 'मानसगूढार्थ चंद्रिका आणि प्रस्तावना खंड' यातून समजेल.

श्रीविष्णुसहस्रनामाचे केवळ १०७ श्लोकच आहेत. परंतु त्यातील शब्द मुख्यत्वाने तात्त्विक अर्थाचे प्रतिपादन करून 'सर्व खलु इदं ब्रह्म =विष्णु' असे सांगतात. सगुणसाकार भगवंताचे अवतारचरित्र, लीला, रूप, गुण इत्यादिंचे प्रतिपादन करणारी फारच थोडी नावे त्यात आहेत. शिवपुराणात जे विष्णुप्रोक्त शिवसहस्रनाम आहे, त्याची रचना विष्णुसहस्रनामासारखीच आहे. अन् श्लोक संख्या केवळ १३२ .

या रामनामस्तोत्रात १२५१ नामांचा समावेश असून २३६ श्लोकात याची रचना झाली आहे. सगुण अवतारचरित्रदर्शक शब्द यात जास्त प्रमाणात आहेत. तर काही काही सामासिक शब्द १६/१६ अक्षरांचे आहेत. कठिण सामासिक शब्दांचे अर्थ तेथेच खाली तळटीप (foot notes) मध्ये दिले आहेत.

प्रारंभीच्या ध्यान-श्लोकांपैकी पहिला श्लोक-श्री मानसपरंपरेनुसार तर दुसरा श्लोक 'मराठी श्री रामचरितमानस' मधील मंगलाचरणातील आहे.

या स्तोत्रातील सर्व शब्दांचे किंवा त्यांच्या अर्थाचे उल्लेख श्री तुलसीदासांच्या श्री रामचरितमानसातीलच असल्याने या नामस्तोत्राचे ऋषी श्री तुलसीदासच आहेत.

त्यानंतरचे न्यास हे स्वयंस्फूर्त असून, न्यासाची आवश्यकता पाठ करणाऱ्यांच्या श्रद्धा व भावनांवर अवलंबून आहे. श्री रामनामस्तोत्राचा पाठ

करण्यापूर्वी प्रत्येक वेळी शिवनामस्तोत्र किंवा हनुमानस्तोत्र किंवा लक्ष्मणनामस्तोत्र यांचा पाठ केला तर अधिक फलदायी ठरेल.

या स्तोत्रातील जे जे कौतुकास्पद, प्रशंसनीय असे आहे ते सारे श्रीसद्गुरु-राम-कृपा याचे फळ समजावे आणि जे सदोष, हास्यास्पद वाटेल ते ते सर्व या जड, मंद, दीनबुद्धी लेखकाचे समजावे.

'गुण तुमचे समजे निज दोषां ज्यां तुमचा सर्वस्विं भरोसा।' 'संत -हंस गुण घेति पय त्यजुनि जला दोषास'

जय जय रघुवीर समर्थ।

श्रीराम- सपादसहस्रनाम-स्तोत्रम्

अस्य श्रीरामसपादसहस्रनाम (१२५१) स्तोत्रस्य गोस्वामी श्रीतुलसीदासर्षिः। अनुष्टप्छन्दः । श्रीरामो देवता । 'राम' नाम बीजम् श्रीसीताशक्तिः। श्री हनुमान् कीलकम्। अशेष पापक्षयद्वारा श्रीसीतारामकृपया श्रीरामभक्तिप्राप्त्यर्थे (अथवा इष्टार्थे) विनियोगः ।।

न्यास :

रामाय नमः ब्रह्मरन्ध्रे न्यसामि। हरये नमः, भ्रूमध्ये न्यसामि। सीतापतये नमः, हृदये न्यसामि ।श्री रघुवीराय नमः, नाभौ न्यसामि। रघुनाथाय नमः, वामोरौ न्यसामि । रघुपतये नमः, दक्षिणोरौ न्यसामि । रामचन्द्राय नमः, वामपादे न्यसामि। रामभद्राय नमः, दक्षिणपादे न्यसामि।

ध्यानम्

रक्ताऽम्भोजदलाऽभिरामनयनं पीताम्बरालङ्कृतं
श्यामाङ्गं द्विभुजं प्रसन्नवदनं श्रीसीतया शोभितम् ।
कारुण्यामृतसागरं प्रियगणैर्भ्रात्रादिभिर्भावितं
वन्दे विष्णुशिवादिसेव्यमनिशं भक्तेष्टसिद्धिप्रदम् ।।१।।
शरदम्बराभनीलं शरत्सरोरुहसुरम्यमुखकञ्जम् ।
रामं विधिशिववन्द्यं तुलसीवाल्मीकिवर्णितं वन्दे ।।

-*-

रामो रघुवरो ब्रह्म विष्णुर्नारायणो हरिः ।
अशेषकारणपरोऽरूपोऽनादिरनामयः ।।१।।
अगुणः सगुणोऽनन्तोऽगाधोऽनन्तगुणोऽकलः।
ईशोऽमितप्रभावोऽजश्चाऽनीहश्चाऽद्वितीयकः ।।२।।
अविनाशी ह्यनुपमोऽनिर्वाच्यस्त्वतिसुन्दरः ।
असुरारिरुदासीनस्त्वगाधचरितः प्रभुः ।।३।।

अपारचरितोऽनन्तचरित्रश्चार्तिनाशनः ।
आनन्दराशिरव्यक्तोऽखण्डोऽलक्ष्यगतिर्हरिः ॥४॥
अप्रमेयप्रभावश्चाऽतिविचित्रचरित्रकृत् ।
अभेदोऽनन्तकीर्तिश्चाऽनाथनाथोऽतिकोमलः ॥५॥
अन्तर्यामी त्वर्थसङ्घकर्ताऽयोध्यापतिर्विभुः ।
अशङ्कश्चिन्मयो रामो ह्यनाथहितकारकः ॥६॥
मनोमतिवचनोऽतर्क्योऽखिलविश्वैककारणम् ।
उमापतीष्टदेवश्च विविधानन्तजन्मधृक् ॥७॥
अनामाऽनन्तनामा चाऽतीवाऽयोध्यापुरी प्रियः ।
अकर्माऽनन्तकर्मा च विविधाद्भुतकर्मकृत् ॥८॥
मृषाजगदधिष्ठानस्त्वनिर्वाच्यस्वरूपकः ।
अनिर्वाच्यगुणोऽयोध्यानरनारीसुखप्रदः॥९॥
परमोदारनामाऽविज्ञेयमर्मा ह्यघान्तकः ।
आनन्दाऽऽनन्ददोऽनन्तशरद्राकाशशिप्रभः ॥१०॥
रामोऽनुभवगम्यश्चाद्भुतरूपोऽभिरामदृक् ।
अत्यल्पस्नेहसन्तुष्टोऽमानोऽनुपमबालकः ॥११॥
आनन्दकन्दोऽतुलितबलः शीतलभाषणः ।
सुगूढवचनोऽत्यन्तविनीतवचनोऽव्ययः ॥१२॥
अतिमानुषकर्मा तु ह्यपारचरिताम्बुधिः ।
अतिसाधुचरित्रश्च सर्वाऽवगुणनाशनः ॥१३॥
अनिर्वाच्यप्रेमरसः सदाऽनुल्लङ्घ्यशासनः ।
अत्यप्रमेयविभवश्चाकामिनिजधामदः ॥१४॥

समोऽसमस्वभावश्च सुगम्योऽगम्य ईश्वरः ।
जननीसदृशानन्यगतिसेवकरक्षकः ॥१५॥
अनवद्यो ह्यतुलितबलवन्नरकेसरी ।
अविद्याक्लेशहर्ता च ह्यनन्यगतिकप्रियः ॥१६॥
उदारापारमाहात्म्य ईड्योऽकामजनप्रियः ।
अतुल्यबलधामाऽतिविचित्रगतिरव्ययः ॥१७॥
स्वापराधिजनाऽक्रोधोऽजिनधारीन्दिरापतिः ।
अत्युदारावतारश्चाऽमरदुःखविनाशनः ॥१८॥
इन्दिरारमणोऽदभ्रोऽखिलश्चोर्व्यात्मजापतिः ।
अप्रमेयबलोऽजय्य उदरोऽमितपौरुषः ॥१९॥
अतुल्यबलसीमा चाऽलेपो रामोऽतिनागरः ।
अजपूजितपादाब्ज ऊर्वीशोऽवनिजापतिः ॥२०॥
सर्वात्मसमदर्शी च योगिदुर्लभदर्शनः ।
मृदुमूर्तिर्बोधमयो ह्यभीष्टप्रदनामकः॥२१॥
विकाररहितोऽखण्डरूपोऽपारगुणस्तथा ।
अबाधितातिमहिमश्चाज्ञताभञ्जनः प्रभुः ॥२२॥
कोट्यश्वमेधकर्ता च नवेन्दीवरसुन्दरः ।
अनन्तभुवनेशोऽनुपमकीर्तिरगोचरः ॥२३॥
सनकादिस्तुतो रामोऽद्वैतश्चाऽज्ञेय एव च ।
अद्वितीयप्रभुश्चार्तबन्धुरङ्गदसंस्तुतः ॥२४॥
एकोऽनेकोऽभिरामश्च नित्यभक्तिप्रदायकः ।
अमोघशक्तिरखिलान्तरात्माऽमोघदर्शनः ॥२५॥

अत्र्याश्रमपदप्राप्तो ज्ञानी भक्तप्रियः प्रभुः ।
सशक्तिसानुजश्चात्रिपूजितश्चात्रिसंस्तुतः ॥२६॥
अगस्त्याश्रमसम्प्राप्तः सदाऽकामहितो हरिः ।
सम्मानितोऽर्चितो भक्तिप्रार्थिनश्च प्रशंसितः ॥२७॥
अमोघेषुरनिर्वाच्यविश्रामदगुणाकरः ।
अयोध्येशो ह्यतिमृदुशीलोऽनन्यजनप्रियः ॥२८॥
अमोघवचनोऽव्यक्तमूलसंसृतिपादपः ।
बहुदेहधरोऽयोध्यानारीनरविशोककृत् ॥२९॥
सीताशोभितवामाङ्गेऽयोध्यासिंहासनस्थितः ।
उमापतिस्तुतो बन्दिवेषिवेदगणस्तुतः ॥३०॥
अतिप्रभुत्वः करुणानिधानः करुणाकरः ।
कपिभाल्लूकसचिवः कल्याणनिधिनामकः ॥३१॥
कालरूपः कृपावारिधरः कोशलमण्डनः ।
कृपावरूथः करुणासिन्धुः क्षत्रवपुर्धरः ॥३२॥
खरारिः कोशलावासिप्राणप्रेष्ठः कृपाकरः ।
खलघ्नः कालसदृशबालकः करुणामयः ॥३३॥
प्रभुः काननसंचारी यः कल्पतरुनामकः ।
कृपापुञ्जः कृपागेहः कृपायतन एव च ॥३४॥
कृपासिन्धुः कलिमलदहनः करुणानिधिः ।
कृपानिधिः कलिमलहरकीर्तिश्च कौतुकी ॥३५॥
कृपालुः कौतुकनिधिः कृतज्ञः कोशलाधिपः ।
क्रोधहा कमलाकान्तः कलिकल्मषहृद्यशाः ॥३६॥

हिरण्यकशिपुध्वंसी काञ्चनाक्ष विनाशकः ।
प्रतिकल्पावतर्ता च कोशलेशः खरान्तकः ॥३७॥
कोदण्डशरधारी च कर्मबन्धातिगस्तथा ।
कम्बुकण्ठः करिकरभुजदण्डो गिरापतिः ॥३८॥
कृपानिधानः करुणायतनश्च गतप्रदः ।
कौसल्याहितकारी च कौसल्याङ्कविहारकृत् ॥३९॥
कौसल्यामोददाता च कलिकल्मषहृत्कथः ।
कोशलावासीसुखदः काकपक्षधरो हरिः ॥४०॥
किशोररूपः करुणासागरो गुणसागरः ।
कोशलेशकिशोरस्तु करुणाभवनः प्रभुः ॥४१॥
केसरीशगतिश्चापपाणिश्च गुणमन्दिरः ।
केकिकण्ठाभनीलाङ्गो जगदीशो कृपायनः ॥४२॥
केवलः कालकोदण्डः कामाकेखलभञ्जनः ।
कोट्यब्धिशोषकश्चैव कामिदैन्यप्रदर्शकः ॥४३॥
कन्दावदातः करुणासीमा कारुणिकोत्तमाः ।
कालकालश्च कपटछलछिद्राऽप्रियो हरिः ॥४४॥
कर्ता धर्ता च संहर्ता कालकर्मप्रवर्तकः ।
कालमत्तेभसिंहस्तु कपिकीर्तिप्रवर्धकः ॥४५॥
कबन्धवधकर्ता च कबन्धसुगतिप्रदः ।
कोमलाङ्गः कटिलसत्तूणीरः कामलोभहा ॥४६॥
कुम्भकर्णान्तकः कुम्भकर्णमोक्षप्रदायकः ।
क्वचित्सुयोगिगम्यो हि कुयोगिनरदुर्लभः ॥४७॥

गंभिरनाभिर्गोऽतीतो गुरुसेवापरायणः ।
गुर्वाज्ञापालनरतः शिष्यधर्मानुवर्तनः ॥४८॥
गुणातीतः कोटिकामकमनीयो जगत्पिता ।
गुणराशिर्गुरुपदसेवामग्नो जगत्पतिः ॥४९॥
तडिद्विनिन्दकपटो विवाहवरवेषधृक् ।
विवाहभूषणधरो हरिः कारणमानवः ॥५०॥
सदाशिवशिरोवर्तिपूतपादाम्बुजद्रवः ।
विदेहक्षालितपदो मधुपर्कसमार्चितः ॥५१॥
महेशहृत्सरःकञ्जचरणाब्जो जगद्धितः ।
सीतापाणिग्रहीता च छविसिन्धुर्जगन्मयः ॥५२॥
खलकञ्जतुषारः सत्सुखदश्चारुचन्द्रमाः ।
छन्दःकर्ता जगत्स्वामी प्रीतिज्ञो जानकीपतिः ॥५३॥
गोस्वामी गुहमित्रश्च गङ्गामाहात्म्यशंसकः ।
गृध्रराजानुरागी च गोदातीरनिवासकृत् ॥५४॥
गृध्रसंसेवितो रामो गृध्रवैकुण्ठधामदः ।
ग्रामीणानुष्ठितातिथ्यो गोब्राह्मणगणप्रिय : ॥५५॥
गोपरश्छविधामश्च[१] खलनाशरतस्तथा ।
चराचरेशो जटिलो गुणागारः सुलोचनः ॥५६॥
सुगूढचरितो ज्ञानायतनश्छविसागरः ।
रामश्चराचरस्वामी जानकीनाथ एव हि ॥५७॥
चेतनाऽचेतनयस्त्रितापहरनामकः ।
जटायुहृदयाब्जालिर्वै जटायुक्रियाकरः ॥५८॥

गोविन्दश्च गुणग्रामप्रेरको भक्तिगोचरः ।

गणिकाऽजामिलव्याधगजादिखलतारकः ॥५९॥

जानकीवल्लभश्चारुचिन्तामणिचरित्रकृत् ।

चिदानन्दश्चिदानन्दसन्दोहो जनसौख्यदः ॥६०॥

जनपीडापरिज्ञाता जनपीडा निवारकः ।

जानकीशो निजजनसर्वस्वो जगदाश्रयः ॥६१॥

जगन्माता जगद्द्रष्टा जगत्पावन ईश्वरः ।

जगन्निवासः स्वजनगुणग्राही खलान्तकः ॥६२॥

ताटिकावधकर्ता च त्रिवलीललितोदरः ।

ताटिकाकुल विध्वंसी ताटिकागतिदायकः ॥६३॥

तरुणारुणपाथोजनयनश्च त्रिविक्रमः ।

मारीचासुर विध्वंसी सुबाहुप्राणनाशनः ॥६४॥

विप्रनिर्भयकारी च मुनिदेवगणस्तुतः ।

घोरपावकरोषश्च दिनेशान्वयमण्डनः॥६५॥

त्रिसत्यवचनस्तामरसदामतनुः प्रभुः।

तमालनील स्तरुणस्तज्ज्ञश्च नयनागरः ॥६६॥

धर्मसेतुर्धर्मनिधि-र्दयालुर्दूषणापहः ।

दीनानुरागी निर्वाणप्रदकोधः सुखाकरः ॥६७॥

नरावतारधारी च जगन्मङ्गलहेतुकः ।

दिनेशवंशतिलको विरागायतनस्तथा ॥६८॥

अतिपूतपदस्पर्श स्तपस्विदारतारकः ।

अतिपूतपदाम्भोजरजा ज्ञानिजन[१] प्रियः ॥६९॥

त्रितापहृच्छशिमुख-स्तर्कातीतश्च नागरः ।
जगन्मङ्गलकृज्जन्मा जननीपितृसौख्यदः ॥७०॥
जानकीजीवनश्चित्रकूटवासी जगद्गुरुः ।
जटामुकुटधारी च जानकीकरलालितः ॥७१॥
जगदात्मा जगत्येकसुवीरो[२] जगदीश्वरः ।
चक्षुष्मज्जन्मसाफल्यकृत्स्वरूपधरो हरिः ॥७२॥
तथा च जडमोक्षाधिकारिकृत्पादपांसुकः ।
विकारहीनकायो हि सच्चिदानन्दविग्रहः ॥७३॥
चिन्तानाट्याप्रवीणस्तु चतुराननसंस्तुतः ।
रामोऽचिच्चेतनीकर्ता चिज्जडीकारकस्तथा ॥७४॥
रामो वज्रतृणीकर्ता तृणवज्रीकरस्तथा ।
तीर्थराजगतो राम स्त्रिवेणी तोयमज्जकः ॥७५॥
तीर्थदेवार्चकश्चैव तीर्थराजप्रशंसकः ।
तारामायाहरस्ताराज्ञानभक्ति प्रदायकः ॥७६॥
त्रितापहरनामा च त्रिलोकीशोकहारकः ।
त्रेतायुगकृतीकर्ता तुरीयस्त्रासखण्डनः ॥७७॥
त्रितापहीनराज्यश्च त्रिलोकैक विभूषणः ।
त्रैलोक्यव्यापिसुयशास्त्रिकालैकरसस्तथा ॥७८॥
तेजोनिधिस्त्रिलोकेशो धर्मसेतुसुरक्षकः ।
धीरो धर्मरतो धर्मधुरीणो धरणीधरः ॥७९॥
धर्मसंस्थापको धन्विवरोऽधर्मविनाशनः ।
धर्मव्रतधरो धेनुहितस्तरणतारणः ॥८०॥

दयालु र्दोषदलनो दीननाथो दयानिधिः ।
तपस्वि हितकृद्दीनदयालुर्दनुजान्तकः ॥८१॥
दीनप्रियो दशरथनन्दनो दीनवत्सलः ।
दिव्यसौन्दर्यसिन्धुश्च प्राणधिकपितृप्रियः ॥८२॥
दण्डकारण्यसंचारी दण्डकारण्यपावनः ।
दुष्टमोहकलीलश्च दोषदूषणवर्जितः ॥८३॥
दृढ़व्रतो व्दन्व्दहरो रामो दासमहत्त्वदः ।
दुःसहारण्यवातोष्णसहो दीनदयाकरः ॥८४॥
दानिचूड़ामणिर्दीनबन्धुर्दीनार्तिनाशनः ।
दिनेशवंशतिलको दण्डाकारण्यशापहा ॥८५॥
देवो धर्मगतिज्ञस्तु देवद्रुमस्वभाववान् ।
ज्ञानप्रदकृपादृष्टि दैन्यदुर्गतिनाशनः ॥८६॥
निरुपाधि र्निजानन्दो निजतन्त्रो निरञ्जनः ।
नानातनुधरो नामरूपोपाधिश्च निर्गुणः ॥८७॥
नरभूपो नृपसुतो दिव्यनीलमणिप्रभः ।
नीलनीरधरश्यामो नित्यो नारदमोहकः ॥८८॥
निरकारश्च निगमागमगीतगुणोऽगुणः ।
नारदाहंकृतिहर स्तथा नारदशापितः ॥८९॥
प्रमाणीकृतशापस्तु नानानिशिचरान्तकः ।
नेत्रसाफल्यदाता च नित्यकर्मपरायणः ॥९०॥
निर्हेतुकोपकर्ता च निर्हेतुकदयाकरः ।
मुकुन्दो नवराजीवविनिन्दक विलोचनः ॥९१॥

नृदेहधारिमोक्ष श्च नखचूडान्तसुन्दरः ।
निजायुधधरो नीतिपालको नरभूषणः ॥९२॥
नेतीतिश्रुतिसंगीतो नृपलीलारतोह्यजः ।
नाविकप्रेमविवशः प्रक्षालितपदाम्बुजः ॥९३॥
स निषाददयाशील स्तथा नाविकभक्तिदः ।
नर्मप्रदगुणग्रामो नारदर्षिवरप्रदः ॥९४॥
निर्वाणशान्तिदाता च नयनानन्ददायकः ।
नामरूपविहीनोऽसौ नरलीलारतः प्रभु ॥९५॥
परंब्रह्म परंधाम प्रसिद्धः प्रणतार्तिहा ।
प्रकाशनिधिरानन्दसिन्धुः प्रणतपालकः ॥९६॥
सदा प्रसन्नवदनो नित्यनीतिनिधिस्तथ ।
पीताम्बरः पितृहितस्तथा पावननामकः ॥९७॥
प्रभुः प्रणतसुस्नेही मानदो मुनिचीरधृक् ।
पूजनीयाश्रयः प्रेमजितश्च मुनिपालकः ॥९८॥
अमानी परमस्नेही यः प्रतापदिवाकरः ।
राजा परमधीरश्च परविश्रामदायकः ॥९९॥
सदाप्रणतविश्रामप्रदो बोधघनस्तथा ।
परावरेशोऽनिर्वाच्यप्रतापः पुरुषः परः ॥१००॥
परमात्मा च परमविवेकी पुरुषोत्तमः ।
परेशः परमानन्दः प्रभुः परमसुन्दरः ॥१०१॥
अचक्षुर्दर्शनोऽकर्णश्रवणोऽनङ्घ्रियानवान्[१] ।
अवक्त्रभोज्यवाग्वक्ता[२] तथैवाऽनासजिघ्रकः ॥१०२॥

अहस्तकार्यकारी च त्वतनुस्पर्शशक्तिमान् ।
पुनीतशिशुलीलश्च परमाऽकिञ्चनप्रियः ॥१०३॥
पुनीतचरितो बालरूपः प्राणिगणप्रियः ।
बलधामा च परममनोहारिचरित्रकृत् ॥१०४॥
पूर्णकामश्च पुरुषसिंहो भयभयावहः ।
पूतप्रेमानुगामी च मातापितृवचोरतः ॥१०५॥
परमार्थस्वरूपश्च परमार्थविदुत्तमः ।
पितृवैकल्यदुःखी च पितृवाक्यप्रमाणकृत् ॥१०६॥
पावनारण्यचारित्र्यः परपीडाशुपीडितः ।
प्रजादुःखति दुःखी च प्रीतिविज्ञशिरोमणिः ॥१०७॥
निःस्वार्थश्च प्रपन्नार्तिहृत्पणः परमेश्वरः ।
प्रेमाधीरः प्रजादुःखहरः पतितपावनः ॥१०८॥
प्रणतामरधेनुश्च प्रणतामरभूरुहः ।
ब्रह्मादिशेषसेव्यश्च योगीन्द्रो बलिबन्धकः ॥१०९॥
ब्रह्मण्यदेवो ब्रह्मादिजनको ब्राह्मणप्रियः ।
बालक्रीडारसरतो बाहुवीर्यपयोनिधिः ॥११०॥
ब्रह्मावृन्दैकदेवश्च रामो बन्धुसुखप्रदः ।
बिभीषणपरित्राता बिभीषणसुसेवितः ॥१११॥
प्रभु बिंभीषणाकल्पलङ्काराज्यसमर्पकः ।
पुष्पकागतसाकेतो बिभीषणसखस्तथा ॥११२॥
ब्रह्मानन्दसुराशिर्हि यथावेषकृतिश्च सः ।
सर्वमङ्गलकृन्नामा भवभेषजजन्मक : ॥११३॥

प्रभुर्भुशुंडिवरदो भावज्ञो भाववल्लभः ।
भक्ताऽदेयविहीनश्च भूमिपालशिरोमणिः ॥११४॥
भक्तप्रेमात्तदेहश्च भगवान् भरतप्रियः ।
भक्ताभिमानहर्ता च भवरोगमहाऽगदः ॥११५॥
भुशुंडिमोहको भेदातीतो भक्तभयापहः ।
भुशुंडिहृत्सरोहंसो भवभेषजनामकः ॥११६॥
भरतप्रेम विवशो स भानुकुलभास्करः ।
भवखेदच्छेददक्षो स भानुकुलनायकः ॥११७॥
भवसागरसेतुश्च सर्वमङ्गलकृत्कथः ।
मृदुस्वभावो भरतमहिमज्ञो महाबली ॥११८॥
सदासद्धर्मवर्मा च स भानुकुलकेतनः ।
भवाम्भोधिप्लवपदो भूमिभारविभञ्जनः ॥११९॥
भक्तापभ्दञ्जको भक्तहितकर्ता भ्रमापहः ।
भ्रमहारिचरित्रश्च भयहा भक्तवत्सलः ॥१२०॥
मृदुभाषी भक्तहितनरविग्रहधारकः ।
गुरुकौशिकसंगीतो भवभीतिविभञ्जनः ॥१२१॥
भक्तिप्रभावदर्शी च भववारिधिमन्दरः ।
भयहारिचरित्रश्च भवकोदण्डभञ्जनः ॥१२२॥
रामो भावप्रियो भक्तसुखदायिचरित्रकृत् ।
भावानुकूलवर्ती च भावगम्यो भवापहः ॥१२३॥
मुनिमानसंहसो हि सर्वमङ्गलकारकः ।
मङ्गलायतनं चैव सर्वाऽमङ्गलहारकः ॥१२४॥

मायानाथश्च मायेशो मायाप्रेरक ईश्वरः ।
मायाधीशः सर्वपरो मायाऽकर्षक एव च ॥१२५॥
भक्तप्रेमवशो मायापरो मायापतिस्तथा ।
महामायापति र्मोहापहो भक्तसुखप्रदः ॥१२६॥
रामो मङ्गलमूर्तिश्च भुवनेशो मदापहः ।
मनोजमदहद्रूपो मत्तमातङ्गराङ्गति ॥१२७॥
मायानटीनर्तयिता मनोवागाद्यगोचरः ।
भूपाजिरविहारी च मातापितृसुखप्रदः ॥१२८॥
मोहातीतो मुनिधनो मुनीशमखरक्षकः ।
मृदुगात्रोऽतिसरलबाललीला विशारदः ॥१२९॥
हरिन्मणिनिभो मारमनोहरिविलोकनः ।
मुनिहृत्पद्मभृङ्गोपि ताताम्बाज्ञानुपालकः ॥१३०॥
महेशहृत्सरोहंसश्चतिदुर्लभदर्शन ः ।
विश्वसाक्षी महेशाजविष्णुनर्तयिता[४] तथा ॥१३१॥
मखशालाप्रविष्टस्तु यथाभावविलोकितः ।
श्रृङ्गारमूर्तिर्मधुरमूर्तिः स हि भयानकः ॥१३२॥
कालमूर्ति शान्तमूर्तिः साक्षाव्दीररसस्तथा।
विरागमूर्तिः सहस्राक्षोऽनन्तपाणिः सहस्रपात् ॥१३३॥
सहस्रशीर्ष आत्मीयो भानुवंशविभूषणः ।
हरिभक्तेष्टदेवश्च परतत्त्वमयः शिशुः ॥१३४॥
महेशकीर्तितगुणो भार्गवक्रोधभाजनः ।
भार्गवाऽनाद्रितो रामो भार्गवक्रोधशामकः ॥१३५॥

भृग्वीशबलदर्पघ्नो भृगुनाथक्षमापितः ।
भृगुनाथप्रार्थितश्च संस्तुतश्च सुधीरधीः ॥१३६॥
मिथिलालोकनयनफलदाता मनोहरः ।
मोदमङ्गलमूलश्च मुनिवेषाशनव्रती ॥१३७॥
महीशायी कन्दमूलफलाशी भूमिमण्डनः ।
मायामानुषरूपश्च ग्रामवासविवर्जितः ॥१३८॥
तरुमूलनिवासी च पदत्राणादिवर्जितः ।
मेघपूगकृतच्छायो मनोजरिपुवन्दितः ॥१३९॥
मायामृगानुसारी च महीपालो जटाधरः ।
मारीचारिश्च मानारिर्मधुकैटभसूदनः ॥१४०॥
प्रभुः पञ्जवटीवासी तथा मातलिसारथिः ।
मायातीतो मनोतीतो मुनिमानसरञ्जनः ॥१४१॥
मारीचप्रेमविच्चैव मुनीप्सितगतिप्रदः ।
मुनिचित्ताब्जमधुपो मङ्गलाकरसद्यशा ॥१४२॥
मुदमङ्गल निधि र्भानुकुलकैरवचन्द्रमाः ।
रामो मायामनुष्यश्च मङ्गलायन सद्यशा ॥१४३॥
रामचन्द्रो रघुकुलतिलको रघुनायकः ।
राजीवलोचनो रामभद्रश्च रघुनंदनः ॥१४४॥
रमानिकेतश्च रमानिवासो हि रमापतिः ।
रघुवंशाम्बुजवनभानू रघुपतिर्हरिः ॥१४५॥
रघुवीरोऽनघो भानुकुलनाथश्च राघवः ।
रघुवंशावरीर्णस्तु रमारमण एव हि ॥१४६॥

रघुनाथो रसस्त्रष्टा रघुवंशविभूषण ।
राकेशकरचारित्र्यो रघुवंशशिरोमणिः ॥१४७॥
रघुराजो रघुकुलदीपो रूपनिधिर्हरिः ।
गुप्तरूपावतीर्णश्च लब्धवैष्णवकार्मुकः ॥१४८॥
लक्ष्मीपती रघुकुलमणिर्वै रूपसागरः ।
रघुसिंहो रघुकुलकेतू राजकुमारकः ॥१४९॥
रविवंशरवि र्लक्ष्मीनिवासो लक्ष्मणाग्रजः ।
लोकमानसचोरश्च लोकलोचनसौख्यदः ॥१५०॥
नरनाथो रूपधामा रघुवंशाब्जचन्द्रमाः ।
कृपाम्बुधिश्च ललितनरलीलापरायणः ॥१५१॥
शार्ङ्गपाणिश्च परमस्वतन्त्रः शोकमोचनः ।
नेत्रलाभावधिश्चैव साधुलक्षणशंसकः ॥१५२॥
रामो नेत्रभिरामश्च रघुव्दहप्रदीपकः ।
विनीतो वल्कलधरो हरिर्विनयसागरः ॥१५३॥
राज्यलोभविहीनो हि राजनीतिसुरक्षकः ।
रघुनन्दो रघुकुलचन्दो राक्षसमर्दनः ॥१५४॥
राजचिन्हाङ्कितनू रागरोषविवर्जितः ।
रणधीरो रघुकुलनाथो हि रघुपुङ्गव : ॥१५५॥
लङ्केशशशिराहुश्च राजधर्मोपदेशकः ।
बाणजालाऽस्पृष्टतनू रिपुमायाविनाशकः ॥१५६॥
रामेश्वरप्रतिष्ठाता श्रीरामेश्वरपूजकः ।
रम्यः क्षमामन्दिरश्च रिपुचार प्रशंसितः ॥१५७॥

रावणप्राणहर्ताच दशग्रीवगतिप्रदः ।
रिपुभार्यास्तुतगुणो दशाननकुलान्तकः ॥१५८॥
विधाता विश्वसुखदो विश्वकर्ता विनायकः ।
विधिगीतगुणो व्याप्यो व्यापको विरजो विभुः ॥१५९॥
विश्ववासो हि विशदयशा विविधदेहधृक् ।
मत्स्यः कूर्मो वराहश्च नरसिंहश्च वामनः ॥१६०॥
विधिवाक्यचिकीर्षुर्वै वासुदेवः स भार्गवः ।
वेदाज्ञेयो विश्वनाथो विधिविष्णवीशवन्दितः ॥१६१॥
विशालतेजा वैकुण्ठनाथः श्रीवत्सलाञ्छनः ।
हरिर्वृन्दाशापितो हि वृन्दाव्रतविभञ्जनः ॥१६२॥
रामो वारिदगम्भीरो यो विज्ञान विशारदः ।
विश्वामित्रार्पितो वीरो विश्वामित्रानुगः प्रभुः ॥१६३॥
विद्यावीरो दयावीरो धर्मवीरो वीचक्षणः ।
युद्धवीरो दानवीरो विप्रपादाब्जलाञ्छनः ॥१६४॥
वनमाली पञ्चवीरः कर्णान्तायतलोचनः ।
वृषस्कन्धो विशालाक्षो राजीवदललोचनः ॥१६५॥
विशालवक्षा विरतो रामो विनयवारिधिः ।
वेदतत्त्वो हि विगतविनोदो विश्वभूषणः ॥१६६॥
विश्वलोचनचोरश्च विधिविष्णवीशपूजितः ।
विद्यासिन्धुर्विप्रदासो विप्रपादाभिवादकः ॥१६७॥
विद्यानिधिश्च जननीविश्वरूपदर्शकः ।
वशीकृतमहामायो विश्वामित्रमहानिधिः ॥१६८॥

विश्वरूपो हि पातालपादोऽजाऽगारशीर्षकः[१] ।
कालभ्रूर्भानुनेत्रश्च दिक्कर्णो मेघकुन्तलः ॥१६९॥
नासत्यनासिकश्चैव[२] विश्वाधारोऽनलाऽऽननः ।
दिनरात्रिनिमेषो दिक्पालबाहुः परात्परः ॥१७०॥
सृष्टिस्थितिलयेहश्च करालयमदंष्ट्रकः ।
सरित्नडीसमूहश्च शैलास्थिः सागरोदरः ॥१७१॥
तरूगुल्मलतारोमराजि र्वारीशजिव्हकः ।
चन्द्रस्वान्तो विधिप्रज्ञः शिवाहंकारकस्तया ॥१७२॥
दुर्गाकोटीवशत्रुघ्नः कोटिकन्दर्पसुन्दरः ।
शक्रकोटिविलासश्च नमः कोट्यावकाशवान् ॥१७३॥
कालकोटिसुदुर्गश्च कालकोट्यातिदुस्तरः ।
कालकोटिदुरन्तश्च तीर्थकोटीव पावनः ॥१७४॥
यमकोटिकरालश्च हिमवत्कोटिनिश्चलः ।
केतु[१]कोटिदुराघर्षो विधिकोटीव विश्वसृक् ॥१७५॥
कोटीसागरगम्भीरो विष्णुकोटीवपालकः ।
रुद्रकोटीवसंहर्ता शेषकोटीवभारधृक् ॥१७६॥
पातालकोट्यागाधश्च शशिकोटिसुशीतलः ।
मरुत्कोटिबलाढ्यश्च भानुकोटिप्रकाशवान् ॥१७७॥
शारदाकोटिचतुरः कोटिवित्तपवित्तवान् ।
मायाकोटिप्रपञ्चाम्बुनिधिर्निरूपमोऽमलः ॥१७८॥
वनवासप्रयाता च वनवाससुखी हरिः ।
वियोगयोगहीनस्तु विरहीवविषादकृत् ॥१७९॥

वेदान्तवेद्यो वागीशः सुरेशो वैरिसंस्तुतः।
विज्ञानधामा[२] विज्ञानघनो वाल्मीकिसत्कृतः ॥१८०॥
वज्रध्वजाङ्कुशाऽम्भोजरेखाङ्कितपदाम्बुजः ।
अतिदुस्तरमायश्च रामो वाल्मीकिसंस्तुतः ॥१८१॥
ऋक्षवानरसैन्यश्च भल्लवानरसेवितः ।
वसिष्ठपूजको रामो वसिष्ठप्रार्थितः स्तुतः ॥१८२॥
शिवस्वामी शिवसखः शेषशायी सनातनः ।
शिवगीतचरित्रश्च श्रीपतिः शिवसेवकः ॥१८३॥
शीलब्धिश्च शिवध्येयः श्रुतिसेतुसुरक्षकः ।
शैशवस्वोदराऽनन्तब्रह्माण्डगणदर्शकः ॥१८४॥
शब्दवर्णादिकर्ता च शिवप्रियतमः प्रभुः ।
शतकोटिचरित्रः श्रीनिवासः सुरनायकः ॥१८५॥
श्रुतिगीतः शिवप्राणः श्यामलः शीलसागरः ।
शान्तः शीलनिधानश्च शोभाधामः समस्तथा ॥१८६॥
शोभासिन्धुर्वेदसारनामा शरणसौख्यदः ।
शोभाकरः श्रुतिपथपालः सर्वश्रमापहः ॥१८७॥
शिशुरूपधरः शोभावधिः शिशुविनोदकृत् ।
श्रीकान्तः शम्भुहृव्दासी शशिमालिन्यकृद्यशाः ॥१८८॥
श्रीरङ्गः सुखसन्दोहः शिवपार्थिवपूजकः ।
श्रृंगवेराऽऽगतो देवसरिद्दर्शनहर्षितः ॥१८९॥
शीलस्नेहसुनिर्वाही तथा श्रीरमणो हरिः ।
शीलसंकोचपाथोधिः शास्त्रनिर्बन्ध पालकः ॥१९०॥

सदाशान्तस्वभावश्च शरणागतवत्सलः ।
शरणागतपालश्च शुभाऽशुभफलप्रदः ॥१९१॥
शरणागतसंत्राणप्रतिज्ञः शाश्वतो विभुः ।
विरिञ्चिशम्भुभज्यश्च श्रव्दाविश्वासदायकः ॥१९२॥
शोकान्धातिमिरार्कश्च शचीनाथप्रियानुजः ।
शरभङ्गाश्रमप्राप्तः शरभङ्गपरिष्टुतः ॥१९३॥
वैकुण्ठधामदः प्रेमविवशो निजभक्तिदः ।
शबर्याश्रमसम्प्राप्तः शिवादिध्यानदुर्लभः ॥१९४॥
शबर्यालिङ्गित पदः प्रक्षालित पदाम्बुजः ।
शबरीदत्तकन्दादिफलसप्रीतिभक्षकः ॥१९५॥
सत्सङ्गमुख्यनवधास्वभक्ति प्रतिपादकः ।
शबरीसात्म्यदाता च शरणागतसौख्यदः ॥१९६॥
सर्वज्ञः सच्चिदानन्दघनश्च सुरपालकः ।
सत्सङ्गदायकः सीतावल्लभः सुखदायकः ॥१९७॥
सर्वसद्गुणराशिश्च सर्वदुष्टविनाशनः ।
सेवकामरधेनुश्च सेवकामरपादपः ॥१९८॥
सुरसंस्थापकः साधुपरित्राणपरायणः ।
सुरासुरर्षिमनुजगीतकीर्तिः सुखालयः ॥१९९॥
सिव्द्धयोगिमुनिध्येयो नरनागर्षिसेवितः ।
सुरस्वामि च सुग्रीवसखः सस्मितभाषणः ॥२००॥
सर्वदर्शी च सर्वान्तर्यामी हि सुखसागरः ।
सेवातिसुलभः सर्वसुखदः शम्भुसेवितः ॥२०१॥

सुस्वामी सुरनाथश्च सचराचरनायकः ।
सुशीलः सेवकवशः सुरदानवसेवितः ॥२०२॥
सरलः सर्वरहितः सदोत्साही च सर्वगः ।
स्वयंप्रकाशरूपश्च स्वेच्छामयवपुर्धरः ॥२०३॥
ऋजुस्वभावः सहजशुचि सहजपावनः ।
सुशीलस्नेहवेत्ता च सुज्ञः सहज सुन्दरः ॥२०४॥
सत्यप्रतिज्ञः सुषमाकन्दः सर्वगुणाकरः ।
सुरभूपश्च सुषमासदनश्छलवर्जितः ॥२०५॥
धरणीसुर-पालश्च सुरवृन्द हितंकरः ।
श्रुतिशेषाद्यविज्ञेयः सन्ध्यावन्दनतत्परः ॥२०६॥
सर्वः सुखनिधानश्च सुखपुञ्जः सतांगतिः ।
अजसेवितपादाब्जः स्वर्णदीजन्मभूपदः ॥२०७॥
श्रीसीतामहिमज्ञश्च सीतास्नेह प्रशंसकः ।
सीतामुखशरच्चन्द्रचकोरो विषमः समः ॥२०८॥
सुखमूलः प्रभुः सीताजयमालाविभूषितः ।
सुखसारो रावणारि. सर्वाङ्गसुभगस्तथा ॥२०९॥
सर्वाऽमङ्गलहृत्रामा सर्वदेवशिरोमणिः ।
संकोचशीलः सहजमनोहरमुखाम्बुजः ॥२१०॥
सौमित्रीसेवितो रामः कृतसप्तपदीविधिः ।
सीतामस्तकसिन्दूरपूरकश्छविसागरः ॥२११॥
सदाशिवहृदम्भोजसुगोपितपदाम्बुजः ।
सौन्दर्यनिधिवक्त्रश्च चेतोहारिसुमुद्रिकः ॥२१२॥

ह्रीशीलस्नेहवचनः सुरूपनिधिरेन च।
सीताम्बाप्रार्थितः सीताजननीसंस्तुतो हरिः ॥२१३॥
जानक्याम्बाधृतपदः श्वश्रूसम्मानदः प्रभुः ।
समस्तसुखमूलस्तु श्वश्रूपादाभिवादकः ॥२१४॥
सर्वजीवगतिज्ञश्च विदेहनृपसंस्तुतः ।
स्वदासहृच्चन्दनश्च सस्नेहगुरुपूजकः ॥२१५॥
सीताप्राणपतिः सीतानाथश्च सुखमन्दिरः ।
सदासरलभाषी च सर्वमातृसमस्तथा ॥२१६॥
सुरधेनुपयः फेनमृदुशय्यासुखोचितः ।
सत्यसन्धश्च सौमित्रिनाथः सन्देहनाशनः ॥२१७॥
स्वार्थहीनः सर्वसुहृत् सीतासौम्मित्रिसंयुतः ।
सुरकार्यरतो मोहपरः परमकारणम् ॥२१८॥
दाससेवकसंतुष्टः[१] सेवकारिरिपुर्हरि ः ।
इषीकसायकधनुरिषीकास्त्रविमोचकः ॥२१९॥
परमानन्दसन्दोहो जयन्तप्राणरक्षकः ।
सान्द्रानन्दपयोदश्च सुसेव्यः समतावधिः ॥२२०॥
प्राणप्राणो जीवजीवो राम सुखसुखप्रदः ।
सुखमूलयशाः साधुसरोजवनभास्करः ॥२२१॥
समस्तसंशयध्वंसी सर्वेषांऽऽशानिवारकः ।
सुगम्यागम्यवरदः सिन्धुनिग्रहकारकः ॥२२२॥
सेतुबन्धनकर्ता च सिन्धुपीडानिवारकः ।
सर्वलोकपतिस्वामी सेतुमाहात्मयशंसकः ॥२२३॥

दुस्तर्कशमनोऽघारि र्विषादघ्नो जितेन्द्रियः ।
सहस्रबाहुहन्ता च सुरवृन्दाभयप्रदः ॥२२४॥
सर्वामरगुरु : सत्यसंकल्पः शक्रसंस्तुतः ।
साधुसम्मानदः सर्वहितः शक्रतिमानदः ॥२२५॥
सीताजीवननाथश्च सीतासौमित्रिसौख्यदः ।
रामः सीताप्राणनाथः स्वदासरुचिरक्षकः ॥२२६॥
सीतापतिः सरलतासागरः स्नेहसागरः ।
संसारसिन्धुसेतुश्च सबलः सत्यसागरः ॥२२७॥
स सीतारमणः स्नेहनिधानः सुकृतावधिः ।
सहजस्नेहविवशः स सर्वज्ञशिरोमणिः ॥२२८॥
सुखस्वरूपः सकलपुरुषार्थदनामकः ।
सज्जनार्तिहरः स्नेहसदनः सुरसत्तमः ॥२२९॥
स्नेहधामः सर्वगुणागारः सर्वगुणायनः ।
स्नेहावधिश्च सहजशुद्धः सुज्ञशिरोमणिः ॥२३०॥
सुरेन्द्रस्यन्दनारूढः सुरेन्द्रमुनिसौख्यदः ।
सुखराशिः स्वयंसिद्धकार्यः संसृतिशामकः ॥२३१॥
सदासेवकसुत्राता रामः सुग्रीवराज्यदः ।
सर्वरूपः सुरत्राता त्रिशिरोरिः सुरारिहा ॥२३२॥
समदर्शी दूषणारिः सुखकन्दः सुरोत्तमः ।
सर्वलोकैकविश्रामोऽजितो भक्तिवशः प्रभुः ॥२३३॥
क्षीराब्धिवासी तुलसीदासेशो दासवत्सलः ।
हृत्तापहरिहासश्च हंसवंशावतंसकः ॥२३४॥

हृत्प्रेरको हि हनुमत्संवितो हनुमद्‌ऋणी ।
ज्ञानदो ज्ञानगम्यश्च सर्वज्ञानिशिरोमणिः ॥२३५॥
ज्ञानातीतो हि विज्ञानातीतः सर्वामरप्रभुः ।
ज्ञानधामा हर्षखेदातीतः सौन्दर्यमन्दिरः ॥२३६॥
रमन्ते योगिनो यस्मिन्नित्यानन्दे चिदात्मनि ।
तस्मै रामाय देवाय दीनाऽनाथहिताय च ॥२३७॥
परिपूर्णावताराय स्वजनानन्ददायिने ।
प्रज्ञानानन्दनाथाय जानकीजानये नमः ॥२३८॥
सपादोत्तरसहस्रनामस्तोत्रमघापहम् ।
सारं श्रीरामचरितमानसस्य रसात्मकम् ॥२३९॥
मोदमङ्गलदं रामचरित्रसारकं शुभम् ।
प्रेम्णा पठन्ति ये केऽपि तेषां कल्याणकृद्भवेत् ॥२४०॥
प्रज्ञानानन्दनामाऽयं न कविर्न च पण्डितः ।
चतुरो न च शास्त्रज्ञो लेखकस्तु यथामति ॥२४१॥
तेनेदं लिखितं स्तोत्रं श्रीमानसविहारिणा ।
मनोमतिप्रेरकस्तु रघुनाथो दयानिधिः ॥२४२॥
हंसास्तु सज्जना दोषजलं त्यक्त्वा पयो गुणान् ।
गृह्णन्तीति परिज्ञाय धाष्टर्यमेतत्कृतं महत् ॥२४३॥
गुणाः श्रीरामचन्द्रस्य दोषा मन्दमतेस्तथा ।
गुणदोषमयं विश्वं निर्दोषो राम एव हि ॥२४४॥
अलङ्कारै भूषयित्वा स्वबालं जननी यथा ।
दृष्ट्वा तं हर्षिता प्रेम्णा प्रसन्ना भवति स्वयम् ॥२४५॥

बालस्तु पश्यति मुहुर्भूषणानि सकौतुकम् ।
बालोयं रघुनाथस्य तया स्तोत्रं पठिष्यति ॥२४६॥
रघुनाथ दयासिन्धो दीनबन्धो दयानिधे ।
प्रसन्नो भव पादाब्जभक्तिं देह्यनपायिनीम् ॥२४७॥
सिद्धिप्रतिष्ठाऽऽकांक्षा नो मोक्षाकांक्षा नचास्ति मे ।
चिरजीवनवाञ्छा नो, देहि भक्तिं दृढां प्रभो ॥२४८॥
त्वत्समो दीनबन्धु र्नो हीनदीनो न मत्समः ।
त्वदन्या मे गतिर्नास्ति प्रसीद करुणानिधे ॥२४९॥
त्वत्कथानामनिरतिं देहि सत्सङ्गतिं प्रभो ।
कामक्रोधादिरहितं मनः कुरु नमामि ते ॥२५०॥
इति प्रज्ञानानन्दस्वामि विरचितं श्रीराम-सपादसहस्रनामस्तोत्रं सम्पूर्णम्।

श्रीरघुनाथायार्पितमस्तु।

- पाचवे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट ६

श्री रामचरितमानसोपलब्ध श्री शिवनामस्तोत्रम्

लेखकाचे निवेदन

निम्नलिखित श्री शिवनामस्तोत्रात श्री रामचरितमानसातील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उपलब्ध २२५ नामे एकत्र केली आहेत. पहिल्या लेखनात २१६ नामे होती, पण त्यातील दोष निरसन करून त्याचे पुनर्लेखन केल्यानंतर ती २२५ नामे झाली. पुनश्च श्री तुलसीदासांचा प्रिय अंक नऊ (२+२+५+=९) पुन्हा सिद्ध झाला.- हा सुरेख योगायोग!

प्रथम (केवळ) श्री रामसहस्रनामच लिहिण्याचा विचार होता. परंतु मानसातील श्री राम वचन 'अन्य गुप्त मत एकतें कथितो जोडुनि हात । शंकर भजन विना नर भक्ति न मम लभतात ।।' याच्या प्रभावाने अंकित होऊन जणू यांच्याच प्रेरणेने ह्या शिवनामस्तोत्राची रचना सर्वप्रथम झाली.

न्यास-मंत्रांमध्ये एकाक्षर किंवा षडाक्षर मंत्र नाहीत, त्यामुळे ब्राह्मण, ब्राह्मणेतर, स्त्री-पुरुष - कोणीही याचा प्रयोग करू शकेल. ध्यानाचे दोन्हीही श्लोक श्रीमानसातीलच आहेत.

शिवनामस्तोत्रातील बरीचशी नामे श्रीरामनामस्तोत्रातही आहेत, यावरून तत्त्वतः श्रीराम व श्रीशिव हे एकच आहेत हे कळते. जिज्ञासूंनी तुलना करून पहावी. विश्वकार्यासाठी बाह्यतः भेद दिसतो.

श्रीराम, श्रीशिव, श्रीविष्णु, श्रीदेवी इत्यादि देवांमध्ये तात्त्विक भेद मानणे हा नामापराध आहे (पद्म पुराण). कोणत्याही देवाचा द्वेष करणे म्हणजे नरकात पडण्याचे सुलभ साधन होय. 'अद्वेष्टा सर्वभूतांना' हे तर भक्ती आणि ज्ञानाचे मुख्य लक्षण आहे. श्रुती, पुराणें यामध्ये जो राम-विष्णु-शिव अभेद आहे तोच श्री तुलसीदासांनी मानसात प्रतिपादन केला आहे.

पुढे ऋषी, छन्द, न्यास इ. दिलेले पहावेत.

श्रीशिवनामस्तोत्रम्

अस्य श्रीशिवनामस्तोत्रस्य गोस्वामी श्रीतुलसीदासर्षिः । अनुष्टुप्छन्दः। श्री शिवो देवता। 'शिव' नाम बीजम्। शिवा शक्तिः। श्रीगजाननः कीलकम्। श्रीशिवभवानीकृपा प्राप्तये पाठे (जपे) विनियोगः। न्यासः - शिवाय नमः, ब्रह्मरन्ध्रे न्यसामि। त्रिलोचनाय नमः, भ्रूमध्ये न्यसामि। श्रीशङ्कराय नमः, हृदये न्यसामि। भवाय नमः, नाभौ न्यसामि। महेश्वराय नमः, वामोरौ न्यसामि। महादेवाय नमः, दक्षिणोरौ न्यसामि। हराय नमः, वामपादे न्यसामि। शर्वाय नमः, दक्षिणपादे न्यसामि।

ध्यानम् - यस्याङ्के च विभाति भूधरसुता देवापगा मस्तके

भाले बालविधुर्गले च गरलं यस्योरसि व्यालराट्।

सोऽयं भूतिविभूषणः सुरवरः सर्वाधिपः सर्वदा।

शर्वः सर्वगतः शिवः शशिनिभः श्रीशङ्करः पातु माम् ॥१॥

कुन्द-इन्दु-दर-गौरसुन्दरं अम्बिकापतिमभीष्टसिद्धिदम्।

कारुणीककलकञ्जलोचनं नौमि शङ्करमनङ्गमोचनम् ॥२॥

इति ध्यानम् ॥

शिवः शम्भुः शूलपाणिः शङ्करः शशिभूषणः।

शङ्खेव्दाभः शशिनिभः शापानुग्रहकारकः ॥१।

शरण्यः शान्तमूर्तिश्च शार्दूलाजिनधारकः।

शर्वः श्रीराघवप्रेष्ठः श्रुतिनीतिसुरक्षकः ॥२॥

अजोऽखण्डोऽमोघशापो ह्यनवद्योऽम्बिकापतिः।

ओंकारमूलईशान उमेशोऽशिववेषकृत् ॥३॥

आकाशवासाश्चाङ्गमोचनोऽभीष्टसिद्धिदः ।
ईशोऽखण्डसमाधिस्थ ईश्वरश्चातिसुन्दरः ॥४॥
उदासीनोऽगुणोऽकामोऽनङ्गरातिरूमापतिः ।
आनन्ददोऽकलोऽगेह उमामोहतमोहरः ॥५॥
अविनाशी ह्यमितदः कृपाब्धिरकलङ्कितः ।
अन्तर्याम्याशुतोषश्च करुणायतनस्तथा ॥६॥
उमानाथो ह्यघघनध्वान्तहा धीरधीरपि ।
कृपालुश्च करालश्च कामारिः कल्मषान्तकः ॥७॥
कैवल्यदः कलातीतो विषकण्ठः कृपानिधिः ।
कारूणीकश्च कल्पान्तकारी लावण्यसागरः ॥८॥
कैलासवासी काशीशः कपाली च कलङ्कहृत् ।
कुन्देन्दुदरगौरश्च कालव्यालविभूषणः ॥९॥
गुणागारो गिरीशश्च गम्भीरो गिरिजापतिः ।
गङ्गाधरो गुणनिधिर्गिरिजारमणोऽपि च ॥१०॥
गङ्गाप्रियो गिराज्ञान्गोऽतीतः खलदण्डकृत् ।
चन्द्रमौलिश्चिदानन्दसन्दोहो डमरूकरः ॥११॥
चन्द्रावतंसो जटिलो जगदात्मा जगत्पिता ।
चिदाकाशो जगव्दन्द्यो जगदीशश्च तापहा ॥१२॥
जटामुकुटधारी च चरित्रब्धिश्च दुर्गमः ।
लोकत्रयगुरुस्त्यागी त्रयः शूलविनाशकः ॥१३॥
तरुणारुणराजीवचरणश्च त्रिलोचनः ।
तुरीयस्त्रिपुरारिश्च दीनदुःखार्तिनाशनः ॥१४॥

दीनस्नेही च तुलसीपिता योगी हिमाद्रिमः ।
दक्षापमानितो दीनदयालुश्च दिगम्बरः ॥१५॥
दीनबन्धुर्दुराराध्यो दशाननवरप्रदः ।
दिनदानी दुराधर्षो हरः सत्सङ्गमप्रियः ॥१६॥
नग्नो निर्वाणरूपश्च निर्गुणो नलिनाम्बकः ।
निरीहो नीलकण्ठश्च त्वनन्तमदनप्रभः ॥१७॥
निर्विकल्पो निराकारो नरमुण्डधरो ह्यजः ।
ज्ञानसिन्धुश्च संसारपारः पद्मासनस्थितः ॥१८॥
प्रभुः प्रलम्बबाहुश्च प्रणतार्तिविभञ्जनः ।
परेशः परमोऽगाधः पुरारिर्बुद्धिदायकः ॥१९॥
प्रचण्डश्च प्रगल्भश्च प्रणतोऽमरपादपः ।
नित्यो विभुः प्रकृष्टश्च पिशाचपतिरेव हि ॥२०॥
ब्रह्म बोधमयो भावगम्यो भूतपतिर्भवः ।
भुजङ्गकण्ठो भगवान् भानुकोटिसमप्रभः ॥२१॥
महादेवो जनस्वान्ततमोहरनखद्युतिः ।
महेश्वरश्च मदनमर्दनो मुनिर्चीरधृक् ॥२२॥
मोहापहो महाकालकालो देवो वरप्रदः ।
व्यापको वृषकेतुश्च विश्वेशो वृषवाहनः ॥२३॥
विवेकोदधिपूर्णेन्दुवैराग्याम्बुजभास्करः ।
वेदस्वरूपो विषमविषपानकरस्तथा ॥२४॥
विश्वनाथो विशालाक्षो रुद्रो रामप्रपूजितः ।
रामेश्वरो रामचन्द्रवन्दितो रामभक्तिदः ॥२५॥

रामप्रियतमो रामप्रार्थितो व्यालकुण्डलः ।
रघुनाथव्रती रामरणलीला निरिक्षकः ॥२६॥
रामनामप्रभावज्ञो राममन्त्रप्रजापकः ।
रामसेवारतो रामचरित्रसुकविस्तथा ॥२७॥
रामभक्ताग्रगण्यश्च सुखकन्दो विभूतिदः ।
सुज्ञः समर्थः सर्वज्ञः सुखधामा सदाशिवः ॥२८॥
सीतापतिसखः सीतापतिस्वामी च सत्यवाक् ।
रघुनाथकथाप्रेमी रघुनाथसुसेवकः ॥२९॥
स्मशानभूतिलिप्ताङ्गे भालचन्द्रो भगापहः ।
सज्जनानन्ददाता च सर्वभूतनिवासकृत् ॥३०॥
सर्वनाथः सुरवरः क्षमाशीलव्दिजप्रियः ।
सत्यधामरतः सर्वहितकर्ता च सर्वगः ॥३१॥
सुखशीलो मृगाधीशचर्मवासाः सुखप्रदः ।
सुरेन्द्रमुनिवन्द्यश्च ब्रह्मविष्णवादिसंस्तुतः ॥३२॥
सुरनाथः सौख्यराशिः सर्वसद्गुणसागरः ।
सर्वहृत्प्रेरकः काश्यमुक्तिदः पार्वतीप्रियः ॥३३॥
भवानीपतिरेकाकी दयालुः कञ्जलोचनः ।
रामलीलारहस्यज्ञो रामनामप्रियप्रियः ॥३४॥
रघुनाथकथावक्ता श्रीरामस्तुतिकारकः ।
सप्रेमरामपादाब्जयुगलध्यानतत्परः ॥३५॥
रामचन्द्रः शिवः साक्षाद्यः शिवो राम एव सः ।
यदैकः कारणब्रह्म कार्यब्रह्म तदाऽपरः ॥३६॥

उभयोरन्तरं नैव द्रष्टव्यं हितकाङ्क्षिभिः ।
शिवोमाराममन्त्रोऽपि विद्यते श्रुतिसंग्रहे ॥३७॥
लब्धं श्रीरामचरितमानसे ग्रथितं त्विदम् ।
रामभक्तिप्राप्तये हि शङ्करस्य प्रसादतः ॥३८॥
प्रज्ञानानन्दयतिना नामस्तोत्रमुमापतेः ।
श्रीशङ्कर नमस्तुभ्यं भक्तिं देहि च शं कुरु ॥३९॥
इति प्रज्ञानानन्दस्वामिविरचितं श्री शिवनामस्तोत्रम् सम्पूर्णम् ।
जय जय शंकर । निज जन शंकर । वंदित विधिसुर । दयानिधे ॥
श्रीरामचन्द्रचरणसरोजार्पितमस्तुः । पार्वतीपते हर हर महादेव ।

- सहावे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट ७

अथ श्रीभवानीशतनामस्तोत्रम् -

लेखकाचे निवेदन

श्री शिवनामस्तोत्र लिहिले गेले आणि 'शिवः शक्त्या युक्तो यदि भवति शक्त प्रभावितुं । न चेदेवं देवो न खलु भवतिस्पन्दितुमपि' या श्रीमद् शंकराचार्यकृत आनंदलहरीच्या स्मृतिपथातील वचनानुसार (शिव शक्तियुक्त असतील तरच त्यांचा प्रभाव पडतो अन्यथा (शक्तिविना) ते किंचितसे स्पंदनही करू शकत नाहीत') म्हणजेच शक्तिविहीन शिव हे जणूं शवासमान असतात. हे ध्यानी घेऊन शिवनामस्तोत्रानंतर श्रीभवानीनामस्तोत्र लिहिणे हे अनिवार्य झाले. मानसानुसारी भवानीची नामे ७०/७१ यामध्ये आहेत, आणि मानसोक्त भवानी चरित्रानुसार आणखी काही नामे अंतर्दृष्टित तरळली अशी एकूण १०१ भवानी नामे यात समाविष्ट झाली.

खालील स्तोत्रातील नामांचा क्रम मुख्यत्वें भवानी चरित्रानुसारच आहे. तसेच या स्तोत्राची श्रीसीतानामस्तोत्राशी तुलना करता श्रीसीता व श्रीभवानी यांची तत्त्वतः एकरूपता ध्यानी येते. जसे परमात्मा परमेश्वर एकच आहे, तशी त्याची शक्ती, जिला मूळमाया, माया, आदिशक्ती, प्रकृती, महामाया इत्यादि म्हणतात ती ही एकच आहे. म्हणून श्रीसीता व श्रीभवानी यामध्ये तात्त्विक भेद मानणे आत्महित-विनाशक ठरेल. नाना पुराण निगमागम सम्मत असे सिद्धान्तच मानसामध्ये गोस्वामींनी ग्रथित केलेले आहेत. सर्व देव-देवता ह्या अनादि आहेत. विश्वोत्पत्तीकर्ता शिवांना भव म्हणतात तर, त्यांच्या शक्तीस भवानी म्हणतात. उमा= उ= महेशांची. मा=लक्ष्मी, शक्ती= उमा (एकाक्षर कोष व अमरव्याख्या सुधा पहा) रुद्राची शक्ती ती रुद्राणि, मृडाची शक्ती ती मृडानी, अन् शर्वांची शक्ती ती शर्वाणी. पण रुद्राणी, शर्वाणी, मृडानी, चण्डिका ही नामे मानसात नाहीत म्हणून ती या १०१ नामांत दिसणार नाहीत.

न्यासमंत्रामध्ये एकाक्षर वा षडाक्षर मंत्र नसल्याने याचा कोणीही प्रयोग करू शकतो, त्यास शास्त्रविरोध नाही. शरीरावर मंत्राक्षरांची स्थापना करणे म्हणजे न्यास होय. न्यास करण्यामुळे शरीर मंत्रमय बनते, म्हणून न्यासपूर्वक

जप, पारायण इत्यादि करणे हे अधिक श्रेयस्कर होय.

मानसामध्ये खास श्रीभवानीच्या ध्यानाचा श्लोक नाही, आणि पूर्वी या लेखकाने लिहिलेला श्लोक उपलब्ध नाही, तरीही श्रीहरि-कृपेने हा नवीन श्लोक निर्माण झाला. यातील भवानीची विशेषणे श्रीगोस्वामींच्या अन्य ग्रंथांत आढळतील.

प्रारंभी न्यास केले की ते समाप्तीचे वेळी पुन्हा केले पाहिजेत. खालील श्लोकांमध्ये व्याकरणादि दोष नाहीत असे म्हणणे हे दुःसाहसच ठरेल. तथापि 'अपि मासं मषं कुर्यात्, छन्दो भङ्ग न कारयेत्' या वचनाप्रमाणे पाठक या दोषांकडे पाहणार नाहीत.

॥ श्री भवानीशतनामस्तोत्रम् ॥

अस्य श्रीभवानीशतनामस्तोत्रस्य गोस्वामी श्रीतुलसीदासर्षिः । अनुष्टुप्छन्दः । श्री भवानी देवता । शिवा बीजम् । उमा शक्तिः । श्रीगजाननः कीलकम् । श्रीभवानीशङ्करकृपा प्राप्तये (अथवा इष्टार्थे) (जपे) पाठे विनियोगः । न्यासः- भवान्यै नमः, ब्रह्मरन्ध्रे न्यसामि । जगदम्बायै नमः, भ्रूमध्ये न्यसामि । पार्वत्यै नमः, हृदये न्यसामि । शिवायै नमः, नाभौ न्यसामि । उमायै नमः, वामोरौ न्यसामि । गौर्यै नमः, दक्षिणोरौ न्यसामि । श्रीगिरिजायै नमः, वामपादे न्यसामि । श्रीशैलजायै नमः, दक्षिणपादे न्यसामि

अथ ध्यानम् - विद्युत्पुञ्जनिभां सुरक्तवसनां श्रीमूलमायां शिवां ।

शूलं खड्गवराभयं च दधतीं हस्तैर्जगन्मातरम् ॥

कामक्रोधमदादिदैत्यदलनीं दीनार्तिदुःखापहां ।

वन्दे केसरिवाहिनीं सकरुणां देवीं भवानीमुमाम् ॥१॥

-*-

भवानी गिरिजा गौरी शैलजा हिमशैलजा ।

अम्बिका भूधरसुता पार्वती मेनकात्मजा ॥१॥

मातृप्राणप्रियतरा राजैश्वर्यविवर्धिता ।
उमा तपस्याऽनर्हाऽतिकोमलाङ्गी तु बालिका ॥२॥
देवर्षिवाक्यमर्मज्ञा सुतपःकृतनिश्चया ।
समूद्भूताशिवस्नेहा महेशपतिभाविनी ॥३॥
गुरुनारदवाक्पूर्णदृढविश्वासवत्यपि ।
स्वप्नविप्राज्ञापिता च तपोहेतु विनिर्गता ॥४॥
मातापित्रभ्यनुज्ञाता त्यक्तभोगसुखा तथा ।
एकाकिनी शिवाम्भोजपदध्यान परायणा ॥५॥
कन्दमूलफलाहारा जलाहारा ततःपरम् ।
एकबिल्वदलाहारा त्यक्तपर्णाशना ततः ॥६॥
ततस्तु पवनहारा त्यक्तवाय्वाशना तथा ।
तपःप्रक्षीणदेहाऽपि ह्यचला दृढनिश्चया ॥७॥
सुधीरज्ञानिमुन्यादिसुदुश्चर-तपोरता ।
साक्षात्तपस्यामूर्तिश्च तथाऽपूर्वतपस्विनी ॥८॥
आश्वासिता च गगनब्रह्मवाणीप्रशंसिता ।
शिवाऽनन्या ह्यकामा तु सप्तर्षिसुपरीक्षिता ॥९॥
सप्तर्षिसंस्तुता चापि शङ्करोव्दाहिता ततः ।
सशङ्करवृषारूढा कैलासभवनागता ॥१०॥
ततः सहमहादेवचिरकालविहारिणी ।
षण्मुखाम्बा गणेशाम्बा पूर्वजन्मस्मरा शिवा ॥११॥

पतिव्रताग्रगण्या च कैलासाद्रिनिवासिनी ।

सर्वलक्षणसम्पन्ना शक्तिः सर्वगुणाकरी ॥१२॥

जगदम्बा जगत्पूज्या जगन्माता जगन्मयी ।

वेदाऽज्ञेया तु सर्वज्ञा सौदामनीद्युतिर्ह्रीजा ॥१३॥

गिरिराजकुमारी च माया विश्वविमोहिनी ।

आदिमध्यान्तहीना च सृष्टि स्थित्यन्तकारिणी ॥१४॥

तथाऽमितप्रभावा च त्रिपुरारिप्रिया सदा ।

अपर्णाऽचलसौभाग्या चानादिरविनाशिनी ॥१५॥

स्वेच्छामयवपुर्धत्री शिवार्धाङ्गनिवासिनी ।

वरदात्री तथा दासपुरुषार्थप्रदायिनी ॥१६॥

सुज्ञा सौन्दर्यसीमा च सुशीला हि शिवप्रिया ।

सुरमोहकरूपा च सर्वहृत्पुरवासिनी ॥१७॥

सुमुखी विश्वजननी रामनामजपप्रिया ।

रघुनाथकथाप्रश्नकर्त्री लोकोपकारका ॥१८॥

शिवाऽऽननशरच्चन्द्रचकोरी शिवसौख्यदा ।

रघुवीरप्रभावज्ञा रघुनाथकथाप्रिया ॥१९॥

प्राप्तशम्भुप्रसादा च कृतार्था जानकीस्तुता ।

स्ववशा सेवकवशा रामभक्तिमती शिवा ॥२०॥

उमानामगुणान्वक्तुं शक्तः शेषो न शारदा ।

यथामति तथापीदं ग्रथितं कल्मषापहम् ॥२१॥

श्रीरामचरिते प्रोक्तादुमायाश्चरिताच्छुभात् ।

प्रज्ञानानन्दयतिना नाम्नामेकोत्तरंशतम् ।।२२।।

रघुनाथपदाम्भोजभक्तिं देह्यनपायिनीम् ।

दुर्गे देवि दयाशीले भवान्यै ते नमो नमः ।।२३।।

इति प्रज्ञानानन्दस्वामिविरचितं श्री भवानीशतनामस्तोत्रं सम्पूर्णम् ।
श्रीरामचन्द्रार्पितमस्तु ।

भवभवविभवपराभवकारिणि ।

जयति भवानी संसृतितारिणि ।

- सातवे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट ८

श्री लक्ष्मणाष्टोत्तरशतनामस्तोत्रम्

लेखकाचे निवेदन

शिवनामस्तोत्र आणि भवानीनामस्तोत्र लिहिल्यानंतर श्रीलक्ष्मणनामस्तोत्र लिहिणे हे क्रमप्राप्तच झाले. आनंद रामायणामध्ये जेथे राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता आणि हनुमान यांची कवचे लिहिली आहेत तेथे असे स्पष्ट म्हटले आहे की लक्ष्मण, हनुमान व सीताकवच यांपैकी कोणत्याही एका कवचाचा पाठ केल्याशिवाय श्रीरामकवचाचा पाठ करू नये. तर श्री रामार्चनचन्द्रिका ग्रंथात लिहिले आहे की समान उपचारांनी लक्ष्मणाचे पूजन केल्याशिवाय रामपूजन निष्फळ होते. अशा या उल्लेखांमुळेच मानसात श्रीगोस्वामींनी परम प्रभावी भाषेत सांगितले आहे की, 'रघुपति कीर्ति-पताके विमले । ज्यांचे यश दंडासम बनले ।।'

आपण ध्वजाचे पूजन करतांना प्रथम ध्वज-दंडाचे पूजन करतो, त्यानंतरच ध्वजास वंदन करतो. पुढील नामांमध्ये 'नारायणावतार' हे एक नाम आहे, हे वाचून पंडितांच्या मनात शंकासूर निर्माण होईल. पण या नामाचा आधार लक्ष्मणवंदनेत आहे. लक्ष्मण हे शेषावतार आहेत हे सर्व जाणतात. शेष भगवान जगाचे आधार आहेत, परंतु खऱ्या अर्थाने 'जगकारण' नाहीत. मानसात स्पष्ट लिहिले आहे. 'शेष सहस्रशीर्ष जग-कारण'असे लक्ष्मण आहेत.'जगकारण' केवळ शेषशायी भगवान किंवा परमात्मा परमेश्वरच असू शकतात. मानसातील अन्य वचनांनीही 'जगकारण' याचा अर्थ 'श्रीशेषशायी भगवान नारायण' असाच सिद्ध होतो.

लक्ष्मणनामस्तोत्र आणि श्रीरामनामस्तोत्र यांची तुलना करताही रामलक्ष्मणांची तत्त्वतः अभिन्नताच दिसते वा सिद्ध होते. या नामस्तोत्राच्या आधारे श्रीमानसातील श्रीलक्ष्मणांचे चरित्र-चिंतन करणे सहज सोपे होईल.

'भक्तिदाता', 'कृपासिंधु' ही विशेषणे मानसात फक्त श्रीराम, शिव, परमार्थगुरु किंवा सद्‌गुरु आणि लक्ष्मण या चौघांनाच लावलेली दिसतात. १०८=१+०+८=९ हा श्री तुलसीदासांचा आवडता अंक म्हणून या स्तोत्रात

१०८ नामेच आहेत. त्यामुळे कांही नामे राहिली असण्याची शक्यता आहे.

श्री शिव, लक्ष्मण, हनुमान किंवा सीता नामस्तोत्रानंतरच श्रीरामस्तोत्र पाठ करणे श्रेयस्कर आहे हे ध्यानात ठेवावे. यानंतर ऋषी, छंद, न्यास, ध्यान, यानंतर नामस्तोत्र लिहिले आहे.

अस्य श्रीलक्ष्मणाष्टोत्तरशतनामस्तोत्रस्य गोस्वामी श्रीतुलसीदासर्षिः ।अनुष्टुप छन्दः । श्रीरामसेवामूर्ति लक्ष्मणो देवता । अनन्तः बीजम् । श्रीरामसेवा शक्तिः । श्रीमद्धनुमान् कीलकम् । लक्ष्मणानुग्रहप्राप्तिद्वारा श्रीरामभक्तिप्राप्तये (अथवा इष्टार्थे) विनियोगः ।

न्यास-श्रीलक्ष्मणाय नमः, ब्रह्मरन्ध्रे न्यसामि । रामसेवामूर्तये नमः, भ्रूमध्ये न्यसामि । श्रीरामानुजाय नमः, हृदये न्यसामि । अं अनन्ताय नमः, नाभौ न्यसामि। श्रीसौमित्रये नमः, वामोरौ न्यसामि । श्री अहीशाय नमः, दक्षिणोरौ न्यसामि। जगदाधाराय नमः वामपादे न्यसामि । श्रीरामसेवकाय नमः दक्षिणपादे न्यसामि ।।

अथ ध्यानम् - स्वर्णाम्भोजनिभं महाबलनिधिं रामानुगं धन्विनं ।
विश्वाधारमहीशलक्षणनिधिं रामप्रियं कोमलम् ।।
मायामानुषरूपिणं श्रुतिनुतं नीलाम्बरं सुन्दरं ।
वन्देऽहं करुणाकरं रघुवरं भक्तिप्रदं लक्ष्मणम् ।।१।।

अथ श्रीलक्ष्मणनामस्तोत्रम्

लक्ष्मणः शीतलो भक्तसुखदाता गुणाकरः ।
शेषः सहस्रशीर्षश्च सुभगो विश्वकारणम् ।।१।।
कृपासिन्धुः किशोरश्च कुन्दगौरोऽतिसुन्दरः ।
रामकीर्तिध्वजस्तम्भसमानसुयशा स्तथा ।।२।।
विज्ञानधामः शोभाढ्योऽतिबलः श्रुतिसन्नुतः ।
वरधन्वी रघुवरो मायामानुषरूपधृक् ।।३।।
हितः सव्द्धर्मवर्मा च सीतान्वेषणतत्परः ।

भक्तिप्रदः पथिगतो विप्रधेनुगणप्रियः ॥४॥
रामानुजो दयाशीलः कुमारः कोमलान्तरः ।
रामप्रियः सर्वलोकख्यातधन्वी च धीरधीः ॥५॥
निमेषे विश्वरजनीचरनाशक्षमो मृदुः ।
उदारः सर्वजगदाधारो बाणधनुर्धरः ॥६॥
नारायणावतारश्च रूपधामा दृढव्रतः ।
शीलधामः सत्यसन्धो नागरो नरकेसरी ॥७॥
'अ' कारक्षरसम्भूतः सौमित्रि र्विश्वभावनः ।
रघुवंशमणिर्धीरो बलधामो महीधरः ॥८॥
सुखधामो जगच्चेतोहरोऽमलविधुस्तथा ।
आबाल्यरघुनाथङ्घ्रिनिरतश्चातिकोमलः ॥९॥
सर्वलक्षणसम्पन्ना विद्याविनयवारिधिः ।
सर्वाङ्गसुन्दरोऽनन्तो मुनीशमखरक्षकः ॥१०॥
वृषस्कन्धो विशालाक्षो दीर्घबाहुश्च निर्भयः ।
रघुसिंहः शरच्चन्द्रविनिन्दकमुखाम्बुजः ॥११॥
रामाऽपमानाऽसहनः कोटिकन्दर्पमोहकः ।
तेजोनिधिः कन्दुकेवब्रह्माण्डोत्थापनक्षमः ॥१२॥
भृगुसिंहापमानी[१] च लोकत्रयविभासकः ।
वीरो भृग्वीशदर्पघ्नःक्षमामन्दिर एव च ॥१३॥
रूपसिन्धु-रुमानाथहृद्वासी चोर्मिलापतिः ।
रामैश्वर्यप्रभावज्ञो रामसेवापरायणः ॥१४॥
रामाऽनन्यः प्रभुस्नेहपालितो बालकश्च सः ।
रामानुगो वने-रामसीतारक्षणतत्परः ॥१५॥
गुहोपदेशकश्चिरजटाधारी निषङ्गधृक् ।

रामचित्तविषादज्ञो रामदुःखाऽसहस्तथा ॥१६॥
समयेनीतिवक्ता च रामसेवैकवासनः ।
महाशूरः शूर्पणखाकर्णनासानिकृन्तनः ॥१७॥
विपिनेद्वादश-शरन्निद्राऽऽहारविर्जितः ।
हनुमत्क्षालिताङ्घ्रिश्च दैववादविरोधकः ॥१८॥
सुरनिस्तारको मेघनादहन्ता च निर्ममः ।
रामदुःखातिदुःखी तु रामद्रोहीकृतान्तकः ॥१९॥
रणेश्रीरामदोर्भूतः सर्वाऽमरगणस्तुतः ।
रामस्नेहमयो रामसेवामूर्तिर्हि लक्ष्मणः ॥२०॥
शक्तः स्तोतुमनन्तं को ह्यनन्तगुणसागरम् ।
लक्ष्मणं लक्ष्मणसमं रामदक्षिणपूजितम् ॥२१॥
तथापि रामचरितमानसे कथितानि वा ।
सूचितानि च नामानि ग्रथितानि यथामति ॥२२॥
प्रज्ञानानन्दयतिना श्रीमानसविहारिणा ।
प्रसन्नो लक्ष्मणाऽनेन भव मे रामभक्तिदः ॥२३॥
इति विज्ञाप्यते नत्वा पादब्जयुगुलेऽसकृत् ।
न मोक्षस्यास्ति चाकाङ्क्षा विभूतिर्न च याच्यते ॥२४॥
इति प्रज्ञानानन्दस्वामि विरचितं श्रीलक्ष्मणाष्टोत्तरशतनामस्तोत्रं सम्पूर्णम्।

श्रीरघुनाथचरणारविन्दार्पितमस्तु

जय जय लक्ष्मण । युत शुभ लक्षण ।

– आठवे परिशिष्ट समाप्त –

परिशिष्ट १

श्री हनुमत्सार्धशतनामस्तोत्रम्

लेखकाचे निवेदन

'तूं प्रिय मजला लक्ष्मण दूणें' असे श्रीराम स्वमुखाने हनुमानास म्हणाले आहेत. तसेच 'श्रुणु सुत ! अनृण तुझा मी नाही' असेही म्हणाले आहेत. म्हणून हनुमन्नामस्तोत्र लिहिणे हे तर आद्य कर्तव्यच ठरते. या स्तोत्रातही मुख्यत्वे चरित्रक्रम राखला आहे.

श्री रामचरितमानस कथित हनुमच्चरित्रच या स्तोत्राचा आधार असल्याने अंजनीनंदन, केसरीसुत अशी नामे यात नाहीत. अगदी स्पष्ट नसले तरी अस्पष्टपणे मानसात हनुमान हे शिवावतारच आहेत हे दिसते. हनुमानांच्या चिरंजीव होण्याचाही स्पष्ट वा अस्पष्ट उल्लेख मानसात आढळत नाही. परंतु श्री रघुनाथांचे हनुमान हे सदैव ऋणी असल्याने हनुमंतांची कृपा झाली तरच भगवान श्रीरामांची कृपा सहजपणे लाभेल. श्री रामसेवकांचे संरक्षक, सुहृद श्रीमहावीर हनुमान आहेत, तसेच ते रामकथाप्रियही आहेत. म्हणून श्रीलक्ष्मण, सीता आणि राम यांच्या स्तोत्रपठनाचे वेळी या महावीर हनुमानांना आवाहन करून, आसन दिलेच पाहिजे. कारण श्रीशिवांप्रमाणेच हनुमानही आशुतोष आहेत आणि ते श्रीरामांच्या सेवेने प्रसन्न होतात.

ध्यानाच्या श्लोकात 'रघुपति प्रियभक्तं' या शब्दात कदाचित पाठकांना दोष दिसेल, परंतु संस्कृत व्याकरणानुसार 'प्र्न्हेवा' या सूत्रानुसार 'प्र'च्या आधीचे लघु किंवा ऱ्हस्व अक्षर गुरु किंवा दीर्घ मानण्याचाही एक विकल्प आहे, म्हणजेच ते अक्षर गुरु असेल तरी ठीक, वा नसले तरी ठीक.

अस्य श्री हनुमत्सार्धशतनामस्तोत्रस्य गोस्वामी श्रीतुलसीदासर्षिः । अनुष्टुप् छन्दः। महावीरो हनुमान् देवता। हं बीजम्। 'राम' नाम शक्तिः । श्रीरघुनाथसेवा कीलकम्। श्रीहनुमत्प्रसादप्राप्त्यर्थे (इष्टार्थे) पाठे विनियोगः।

न्यासः- शिवावताराय नमः, ब्रह्मरन्ध्रे न्यसामि । महारुद्राय नमः, भ्रूमध्ये न्यसामि । हं हनुमते नमः, हृदये न्यसामि । लङ्काभयंकराय नमः, नाभौ न्यसामि

। कपीशाय नमः, वामोरौ न्यसामि । वानराधीशाय नमः, दक्षिणोरौ न्यसामि । अक्षकुमारहन्त्रेनमः, वामपादे न्यसामि । कालनेमिघ्नाय नमः, दक्षिणपादे न्यसामि।

अथ ध्यानम्- अतुलितबलधामं स्वर्णशैलाभदेहं
दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम् ।
सकलगुणनिधानं वानराणामधीशं
रघुपतिप्रियभक्तं वातजातं नमामि ॥१॥
श्रीरामभक्तवन्द्यं रघुवरभक्तार्तिनाशनं धीरम् ।
रघुवीरनुतं वन्दे दासानां रक्षकं महावीरम् ॥२॥

अथ नामस्तोत्रम्

सीतारामगुणग्रामपुण्यारण्यविहारकः ।
साधुर्विशुद्धविज्ञानी हनुमांश्च कपीश्वरः ॥१॥
कुवेषकृत्तु सन्मान्यः शीतलो वानरः कपिः ।
शिवावतारः श्रीरामकार्यकर्ता तु मर्कटः ॥२॥
वातजातश्च पवनकुमारः सुमतिस्तथा ।
सुग्रीवसचिवो ज्ञानघनो विज्ञानसागरः ॥३॥
समर्थो बलधामश्च खलकाननपावकः ।
रामनामस्मृतिरतो ह्यनन्यगतिकास्तथा ॥४॥
रामप्रियतमो रामभक्तो रामवशंकरः ।
विप्ररूपधरो रामस्तुतिकर्ता च धीरधीः ॥५॥
श्रीरामनेत्रपद्माम्बुसिक्तो मानविवर्जितः ।
सदाजितषडूर्मिश्च रामलक्ष्मणवाहकः ॥६॥
सुभटो रामसुग्रीवसख्यकर्ता सदाऽभयः ।
सुग्रीवबोधको ज्ञाननिधिर्लक्ष्मणशामकः ॥७॥

रामपाणिस्पृष्टमौलिर्लब्ध श्रीराममुद्रिकः ।
रामसन्देशहारी च सीतान्वेषणतत्परः ॥८॥
रामदूतो रामदूतवानरप्राणरक्षकः ।
जाम्बवत्स्मारितबलो महावीरो महाबली ॥९॥
स्वर्णशैलाकृतितनुस्तप्तकाञ्चनसन्निभः ।
महोत्साही बुद्धिधामा सिंहगम्भीरगर्जकः ॥१०॥
सर्वज्ञान्यग्रण्यश्चाऽतुलनीयबलायनः
क्षाराब्धिलङ्घनोद्युक्तो ह्यतिहर्षयुतः कपिः ॥११॥
रघुवीरस्मरो रामोऽमोघबाणगतिस्तथा ।
मैनाकसत्कृतश्चापि करस्पर्शसुमानदः ॥१२॥
अणिमामतिमैश्वर्यसंयुतः सुरसाजयी ।
सिंहिकाकपटज्ञश्च सिंहिकाप्राणघातकः ॥१३॥
सिन्धुपारगतस्तीरस्थितो दृश्यनिरीक्षकः ।
सुवेलाद्रिसमारूढो लङ्कादुर्गनिरीक्षकः ॥१४॥
दुर्गप्रवेष्टुकामस्तु धृतस्वल्पकलेवरः ।
तथापि लङ्किनीरूद्धश्चाऽपशब्दावमानितः ॥१५॥
वाममुष्टिप्रहर्ता च लब्ध्वाशीर्विजयी ततः ।
लङ्काप्रवेशकर्ता च प्रतिरक्षोगृहेगतः ॥१६॥
वैदेहीमार्गमाणस्तु स विभीषणसङ्गतः ।
अशोकवनिकाविष्टो विभीषणाप्तयुक्तिकः ॥१७॥
तरुपल्लवलीनस्तु शून्यसन्धिप्रतीक्षकः ।
रामनामकथागानकर्ता प्रक्षिप्तमुद्रिकः ॥१८॥
सीतासमीपगन्ता च सीतासन्देहनाशनः ।
स्वर्णाद्रिसदृशाकारो रणभीषणरूपधृक् ॥१९॥

सीताश्वासनकर्ता श्रीरामसन्देशशंसकः ।
अशोकवाटिकाऽऽविष्टो वनरक्षकमर्दनः ॥२०॥
अशोकवाटिकाध्वंसी ह्यक्षादिखलभञ्जनः ।
ब्रह्मास्त्रमानदो धीरो नागपाशवशंगतः ॥२१॥
दशाननसमानीतः सुरारिहितबोधकः ।
प्रज्वालितमहापुच्छो नागपाशविनिर्गतः ॥२२॥
कनकाट्टालिकारूढो लघिमादिसुसिद्धिमान् ।
लब्धाखिलमरुत्साह्योऽखिललङ्काविदाहकः ॥२३॥
पुच्छनिर्वापकः सिन्धुस्नातश्च विगतश्रमः ।
सीतानुज्ञागृहीता च लब्धचूडामणिः कपिः ॥२४॥
लङ्केशमानमथनोऽतिमहाघोरगर्जकः ।
पुनःसिन्धुर्लङ्घिता च भल्लवानरपूजितः ॥२५॥
अंगदादिसमेतस्तु कृतकार्यः समागतः ।
अतिप्रसन्नवदनो रामपादाब्जवन्दकः ॥२६॥
रघुनाथालिङ्गितश्च रामकार्यप्रसाधकः ।
सीतासन्देशवक्ता च चूडामणिसमर्पकः ॥२७॥
रामसम्मानितः पुण्यपुञ्जो रामप्रशंसितः ।
सरलो वानराधीशो ऋणीकृत रघूत्तमः ॥२८॥
प्रेमभक्तिवरप्रार्थी शुद्धभक्तिमयः कपिः ।
महातिबलशीलश्च प्रभञ्जनसुतस्तथा ॥२९॥
कालनेमिप्राणहर्ता द्रोणाद्युत्पाटकोऽपि सः ।
भरतातिप्रभावज्ञः समीरणसुतः कपिः ॥३०॥
औषध्यद्रिसमाहर्ता लक्ष्मणप्राणरक्षकः ।
रावणप्रस्तुतबलो मेघनादभयावहः ॥३१॥
अजरश्चामरो रामदास्यभक्तिपरायणः ।

भरतालिङ्गितश्चैव भरताश्वासकस्तथा ॥३२॥

मारुतिर्मारुतसुतः सदाश्रीरामकिंकरः ।

कः समर्थो हनूमन्तं गुणागारं प्रभुष्टुतम् ॥३३॥

रामदासाग्रगण्यं हि प्रस्तोतुं चिरजीविनम् ।

वाणीं पवित्रीकर्तुं तु गुणनामादिकीर्तनम् ॥३४॥

यथामति कृतं किञ्चिच्छ्रीरामचरितोध्द्धृतम् ।

हनूमतः सार्धशतनामस्तोत्रमिदं शुभम् ॥३५॥

प्राप्तुं श्रीरामभक्तिं हि ग्रथितं पापनाशनम् ।

प्रज्ञानानन्दयतिना प्रभुणा प्रेरितं यथा ॥३६॥

स्वान्तःसुखप्रदं भूयान्मरुत्सुतकृपाप्रदम् ।

सखे श्रीरामदासानां तुभ्यं हनुमते नमः ॥३७॥

इति प्रज्ञानानन्दस्वामिविरचितं श्रीहनुमत्सार्धशतनामस्तोत्रं सम्पूर्णम्।

॥ श्रीरघुनाथचरणसरोजार्पितमस्तु ॥

॥ महावीर श्रीहनुमानकी जय॥

- नववे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट १०

श्री सीताष्टोत्तरशतनामस्तोत्रम्

लेखकाचे निवेदन

श्री हनुमन्नामस्तोत्र लिहिले गेले तेव्हा अविद्याक्लेशहारिणी, आदिशक्ति श्रीराममाया, सीतानामस्तोत्र लिहिणे हे क्रमप्राप्तच झाले, कारण सीतारूपी विद्यामायेच्या मदतीशिवाय ब्रह्मरूप राम परमात्मा कांहीही करू शकत नाहीत. ही माया 'गरुड महाज्ञानी गुणराशी । हरिसेवक अति निकट निवासि ।' किंवा देवर्षी नारदांसारख्या परम ज्ञान्यालाही मोहित करू शकते. तसेच सीता ही रामवल्लभा आणि सर्वश्रेयस्करी आहे.

मानसामध्ये ज्याप्रकारे राम-शिव अभेद स्पष्ट सांगितला आहे, त्याप्रमाणे उमा, भवानी आणि सीता यामध्येही तत्त्वतः अभिन्नता आहे. हा नाना पुराणनिगमागम सम्मत सिद्धांतच मानसामध्ये विशद केलेला आहे. हे भवानीनामस्तोत्र आणि सीतानामस्तोत्र यांच्या तुलनेने सिद्ध होईल.

ध्यानाचा पहिला श्लोक मानसातील, तर दुसरा उपनिषदादि ग्रंथांवर आधारित आहे. सीतेचे अंश म्हणजे उमा, रमा, ब्रह्माणी आहेत असे मानसावरून स्पष्ट कळते. त्याचप्रमाणे सीता भवानीचे पूजन करून स्तुती, प्रार्थनादि करून आपल्या मनोरथासाठी याचना करते असे ही मानसातच दाखविले आहे. 'सोंगा योग्य किं नटें नाचणें' हे जसे रामचरित्रात दाखविले आहे, तसेच सीताचरित्रातही दाखविले आहे. मनुष्य शरीर धारण केल्यावर मनुष्यांसारखे वागायलाच हवे.

अथ ऋषिच्छन्दादिकम्

अस्य श्रीसीताष्टोत्तरशतनामस्तोत्रस्य गोस्वामी श्रीतुलसीदासर्षिः । अनुष्टुपछन्दः । श्रीसीता देवता । महामाया शक्तिः । श्रीमद्हनुमान् कीलकम् । श्रीसीताकृपा प्राप्त्यर्थे (इष्टार्थे) पाठे विनियोगः ।

न्यासः- आदिशक्तये नमः, ब्रह्मरन्ध्रे न्यसामि। महामायायै नमः, भ्रूमध्ये न्यसामि । सीतायै नमः, हृदये न्यसामि । क्लेशहारिण्यै[१] नमः, नाभौ न्यसामि।

जानक्यै नमः, वामोरौ न्यसामि । जनकतनयायै नमः, दक्षिणोरौ न्यसामि । अवनिजायै नमः, वामपादे न्यसामि । धरणीसुतायै नमः, दक्षिणपादे न्यसामि ।

अथ ध्यानम्- उद्भवस्थितिसंहारकारिणीं क्लेशहारिणीम् ।
सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम् ॥१॥
स्वर्णाभाम्बुजकरां रामालोकनतत्पराम् ।
द्विभुजां जानकीं वन्दे रामवामाङ्गसंस्थिताम् ॥२॥

अथ नामस्तोत्रम् ।

श्रीः सीता चादिशक्तिश्च विश्वोद्भवकरी तथा ।
विश्वपालनकर्त्री च विश्वसंहारकारिणीं ॥१॥
सर्वश्रेयस्करी क्लेशहारिणी रामवल्लभा ।
जानकी विश्वजननी रमा जनककन्यका ॥२॥
अतिखिन्नप्रिया रामभिन्नाऽभिन्ना मनो-हरा ।
जगन्मूला छविनिधिः सुनिर्मलमतिप्रदा ॥३॥
सतीशिरोमणी रामवामभागविराजिनी ।
भ्रूविलासजगर्कत्रीं वाग्रमोमाऽभिवन्दिता ॥४॥
सर्वमङ्गलकर्त्री तु गौरीपूजनतत्परा ।
सीताऽप्रतिमरूपाऽतिरघुनाथप्रिया तथा ॥५॥
रघुवीराक्षियुगलचकोरसुखदाऽमला ।
शरत्पूर्णेन्दुवदना सुज्ञा शोभावधिर्मता ॥६॥
रामाननशरच्चन्द्रचकोरी धरणीसुता ।
भवानीस्तुतिकर्त्रीं च वैदेही जगदम्बिका ॥७॥
माया शोभाखनिः स्नेहरवनिर्गुणरवनिस्तथा ।
रूपराशिः सुरवरवनिर्मृगशावकलोचना ॥८॥
वामा राजकुमारी च श्यामा परमसुन्दरी ।

छविगेहेज्ज्वलद्दीपशिखा परिजनप्रिया ॥९॥
रामपादाम्बुजस्पर्शभीरू हंसगतिस्तथा ।
इन्दिराऽवनिजा लक्ष्मीः सर्वभूषणभूषिता ॥१०॥
सुधोपमसुकीर्तिश्च सर्वसिद्धिसुसेविता ।
रामानुकूला जनकतनया चातिकोमला ॥११॥
सौन्दर्यसुन्दरकरी रतिमानमदापहा ।
श्वश्रूप्राणप्रिया बालमरालगतिरेव च ॥१२॥
कौसल्याकल्पवाल्लीवलालिता स्नेहसिञ्चिता ।
प्राणालम्बनभूताऽपि श्वशुरातिप्रिया तथा ॥१३॥
रामाऽनन्या वनानर्हा रामानुगमनोत्सुका ।
पतिप्रेमपुनीता हि वियोगभयविह्वला ॥१४॥
स्वभावभीरूः सुमुखी मृदुमञ्जुपदाम्बुजा ।
पतिव्रतोत्तमाश्रेष्ठा वनेपत्यनुगामिनी ॥१५॥
प्रतिश्वश्रूतनुधरा श्वश्रूसेवारता वने ।
मुनिचीरधराऽन्तब्रह्माण्डव्यापिकीर्तिका ॥१६॥
मायासीतोत्पादिका च सुशीला रुचिरव्रता ।
विनीता वन्हिसंल्लीना चानसूयाप्रपूजिता ॥१७॥
रावणाऽपहृताऽशोकतरुमूलनिवासिनी ।
कालरात्रीवलङ्केशकुलसंहारकारिणी ॥१८॥
शीतरात्रीवरजनीचराब्जवननाशिनी ।
अग्निप्रत्यर्पिता सीता कृत दिव्यात्वनिन्दिता ॥१९॥
पुष्पकाख्यविमानस्था रामवामाङ्क शोभिता ।
दिव्यसिंहासनारूढा रामप्राणप्रिया ह्यजा ॥२०॥
मदमानविहीना श्रीरामसेवापरायणा ।
श्वश्रूसेवातत्परा श्रीः पतिचित्तानुवर्तिनी ॥२१॥

गृहकार्यरता सेवाविधिज्ञा जनकात्मजा ।
सीतानामगुणान् वक्तुं शक्तः शेषो न शारदा ॥२२॥
यथा रामस्तथा सीताऽनन्ताऽनन्तगुणालया ।
यथामति तथापीदं नाम्नामष्टोत्तरं शतम् ॥२३॥
लब्धं श्रीरामचरितमानसे भक्तिदायके ।
प्रज्ञानानन्दयतिना ग्रथितं पापनाशनम् ॥२४॥
श्रीरामवल्लभे तुभ्यं नमः सीते सुरार्चिते ।
आदिशक्त्यै महादेव्यै जानक्यै ते नमो नमः ॥२५॥
न मोक्षो नाष्टसिध्यादि वैभवं याच्यते मया ।
तथा कुरुष्व देवेशि यथा रामकृपा भवेत् ॥२६॥
या सीता सा भवान्येव या शिवा सैव जानकी ।
तत्त्वतस्तु न भेदोस्ति भेदःकार्यानुसारतः ॥२७॥

इति प्रज्ञानानन्दस्वामिविरचितं श्रीसीताष्टोत्तरशतनामस्तोत्रं सम्पूर्णम् ॥

॥श्रीरघुवीरचरणपद्मार्पितमस्तु ॥

जय जय जानकि जनकनन्दिनी ।
जय जय सीते क्लेशनिकन्दिनि ॥

- दहावे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट ११

सन्त विटप सरिता गिरी धरणी

संत विटप सरिता गिरी धरणी । सर्वांची परहितार्थ करणी ।।
(उत्तरकाण्ड १२५/६)

काव्यमणिं कांचनमेकसूत्रे, गूढा निबध्नन्ति किमत चित्रम्। विचारवान पणिनिरेक सूत्रे, श्वानं युवानं मघवानमाह ।। या सूत्रानुसार सन्ताना वृक्ष, नदी, पर्वत व पृथ्वी यांच्या ओळीत कसे बसवले? महाकवींनी असे का केले, अशी शंका येते. याचे समाधान असे आहे-संतांना वृक्षादिंच्या एका ओळीत बसवून ग्रंथकार हे दाखवू इच्छितात की या चारांची निर्मिती परहितासाठीच आहे, तरीही या सर्वांचे म्हणजे चारांचेही गुण एका संतामध्ये आहेत. वृक्ष इत्यादित परहिताचे कोणते गुण आहेत अन् संतांनी ते सर्वगुण अंगीकारून परहित कसे केले आहे ते आता आपण सविस्तर पाहू-

१) विटप- याचा मूळ अर्थ शाखा किंवा फांदी असा आहे, परंतु इथे 'वृक्ष' हा अर्थ अभिप्रेत आहे. भल्या मोठया डेरेदार वृक्षाच्या सावलीत बसताच अंगाची लाही लाही करणाऱ्या, भाजून काढणाऱ्या उन्हाच्या त्रासातून सुटका होते, तसेच संतांच्या सन्निध्यात मनाचे सर्व त्रास नष्ट होऊन समाधान, शांती लाभते. वृक्षाचा प्रत्येक भाग जसा दुसऱ्याच्या उपयोगी पडतो, तसे संत आपला देह परोपकारासाठीच झिजवितात. 'परोपकाराय सत्तां विभूतयः।।' तुलसीदास आपल्या दुसऱ्या एका दोह्यात सांगतात की, 'तुलसी संत सुअम्ब तरु , फूलि फलहि परहेत । इतते ये पाहन हनत उतते ये फल देत ।' 'भूर्जतरु सम कृपालु संत हि । परहितिं सहति विपद अति सततहि ।' फळांनी लगडलेला वृक्ष जसा खाली झुकतो, तसे हे संत सद्‌गुण ऐश्वर्य, किंवा संपत्तीच्या भाराने झुकतात. 'पर उपकारी जसे नर विभवलाभीं नमतात।' वृक्ष फुले, फळे, छाया देतात; पण असेही काही वृक्ष आहेत की ज्यांना ना फुले, ना फळे, ना छाया. तर काही कांटेरी वृक्ष अन्य वृक्षांच्या रक्षणासाठीच केवळ असतात. संत असेच असतात, ते कोणतेही कार्य करताना दिसत नाहीत, पण एकांतात बसून ध्यानादि तपश्चर्येद्वारे समाजाचे कल्याण करण्यात सदैव मग्न असतात. वृक्षाचा उपयोग

तो तोडल्यानंतर ही अनेक प्रकारे (इंधन, इमारती लाकूड इ.साठी) होतो. तसे संत आपल्या मृत्युनंतरही ग्रंथ, साहित्य, उपदेश, आचरण इत्यादिद्वारे समाजाची सेवा व मार्गदर्शन करीत राहतात. वृक्षाची सुमधुर फळे जसे खाणाऱ्यास तृप्ती, शांती व समाधान देतात तसे संत रूचिवैचित्र्यानुसार अनेकांना अनेक प्रकारची फळे देतात- कोणाला भक्ती, कर्म, उपासना, ज्ञान-त्यानुसार मिळणारी आत्मशांती इ. देतात. वृक्ष जाळल्यानंतर त्याची राख जशी खत म्हणून उपयोगी पडते तसे संत आपल्या देहपतनानंतरही आपल्या समाधीद्वारे सर्व सामान्यांचे समाजाचे हितच सदैव करीत राहतात.

२) सरिता - धरणी आणि पर्वत यांचा प्राण्यांना उपयोग होतो, पण तरीही नदीचे गुण त्यांचेमध्ये नाहीत. नदीच्या पाण्याने मानव प्राणी आपले शरीर, कपडे इ. धुऊन स्वच्छ करतो. तर संतांच्या सानिध्याने मुमुक्षु साधक आपले कलिमल धुवून आपले अंतःकरणरूपी वस्त्र (पट) स्वच्छ करतो. धान्यापेक्षाही आपल्याला पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. असे जीवन (=पाणी) देणारी ही सरिता वा नदी आहे. तर संत आपणास धर्म-नीती रूपी जीवन देतात. नदीच्या सहाय्याने जसे सागरात प्रवेश करणे सोपे आहे तसे संताच्या सहाय्याने व कृपेने परमात्मरूपी सागरात आपण सहजी प्रवेश करू शकतो. 'सरिता जल जलनिधि मधिं जावुनि । होइ अचल जिव इव हरि पावुनि ।।' वर्षा ऋतू वगळता अन्य ऋतूंमध्ये नदीचे पाणी सदैव स्वच्छ असते. तसे संत-हृदयात नित्य वसणारे (वाहणारे) धर्म नीती रूपी (जल)जीवन सर्वही ऋतूत स्वच्छ, निर्मळच असते. 'संत हृदयसम निर्मल वारी ।' रणरणत्या उन्हामुळे किंवा आग लागण्यामुळे जी शरीराची जळजळ होते ती या नदीत डुंबल्याने तत्काळ शांत होते. तसे संत-सान्निध्यात राहिल्याने, रामकथादि श्रवणामुळे भव-दावाग्नि किंवा त्रिताप सहजी दूर होतात किंवा हे ताप जवळपासही फिरकायला घाबरतात. नदीच्या स्वच्छ पाण्यात जसे आपण आपले प्रतिबिंब पाहू शकतो, तसे सत्संगामुळे-संतांच्या संगतीमुळे आपण परमात्म-दर्शनही करू शकतो. किंवा संत हे आत्मदर्शन आपल्याला करवितात. कसे ते पहा- 'हरि से जनि तू हेत कर, कर हरिजनसे हेत । माल मुलुक हरि देत है, हरिजन हरिही देत ।'-(कबीर) म्हणून संत मोठे! 'गुरु गोविंद दाऊं खडे काके लागों

पाय । बलिहरि गुरु आपने गोविंद दियो बताय ।-(कबीर) इथे हरिजन किंवा गुरु म्हणजेच संत हा अर्थ अभिप्रेत आहे. संतहृदय हे पाण्याप्रमाणे मृदु असते. नदीसारखेच सन्त दयार्द्र असतात. नदी जसे सर्वांना सम-भावाने पाणी देते मग तो वाघ असो की शेळी, तसे संताचे ठिकाणीही सम-भावच सदैव असतो. शिष्ट, दुष्ट असा भेदभाव न करता सर्वांना ते समानच उपदेश-मार्गदर्शन इ.देतात. जसे नदीच्या पाण्याने तहान भागते, तसे संतांना शरण गेले की आपली विषय-तृष्णा शमते. संतांचे बोल हे नदीच्या पाण्याप्रमाणे सर्वांना समान असे शीतल व दाहकता विझविणारे असतात. नदीचे पाणी जसे मधुर तसे संताचे बोलणे आणि हृदय दोन्हीही माधुर्यपूर्ण असते. ही भक्तीची माधुरी संतांकडे भरपूर असते. नदीचे पाणी जसे पचायला हलके, तसे संतहृदय हे नेहमी विनम्र, विनीत असेच असते. नदीचे पाणी पर्वताप्रमाणे जड किंवा एका जागी अडलेले असे नसते, तेथे पाणी सदैव वाहते, असून सर्वांना जीवन देत राहते. तसे संत हे जड नसून चैतन्याने व ज्ञानाने भरलेले असे असून आपले ज्ञान सदैव सर्वांना देतच राहतात. असे असूनही त्यांचे जवळ मान, गर्व, ताठा, मद कधीही नसतो. अन् अज्ञान तर त्यांचा आसपासही फिरकत नाही. 'सम शीतल, ना त्यागिति नीती ।'

नदीच्या पाण्याने जशी शेते पिकतात, जमीन सुपीक होते तसे संतांच्या उपदेशाने मानव ऐहिक व पारमार्थिक लाभ करून घेऊ शकतो. त्यामुळे तर खऱ्या अर्थाने जीवन सार्थक होते. नदीमध्ये सुसरी-मगरीं सारखे भयंकर जलचर प्राणी असतात. तसे संतांजवळ चुकूनही कसलीही भयानकता सापडणे अशक्य ! नदी निसर्गतः ज्या प्रदेशातून वाहते तेथील जमीन जास्त सुपीक, आणि पिके इत्यादिंनी तो प्रदेश 'सुजलाम् सुफलाम्' बनतो. तर नशिबाने व प्रयत्नपूर्वक साधनेची उंच झेप घेईल त्यावर हे संत भक्ती, ज्ञान, वैराग्य इत्यादिंची बरसात करून त्या साधकाचे जीवन आपल्या जीवनाप्रमाणे किंबहुना जास्तच सुगंधी करतात, अन् तेही कोणतेही मोल न घेता.(रामकृष्ण परमहंसांनी जसे विवेकानंदांचे जीवन सुगंधी व धन्य केले तसे) नदीचे पाणी जिकडे जाईल तिकडे सर्वांचे जीवन परिपूर्ण होईल - अशा पाण्याचे उदाहरण संतांचे बाबतीत देणे ही धृष्टता न ठरो ! 'विधिवश सुजन कुसंगीं पडती । निजगुण फणिमणि सम

अनुसरती।' 'जे रहीम उत्तम प्रकृति का करि सकत कुसंग। चंदन विष व्यापत नहीं लिपटे रहत भुजंग' (बिभीषणांनी जसे आपले संतगुण रावणवेष्टित लंकेतही सुरक्षित ठेवले) परंतु वृक्षाचे गुण-छाया-फळे-फुले-देणे, अग्नि सिद्धी करणे हे गुण नदीमध्ये नाहीत.

३) गिरी- म्हणजे पर्वत, डोंगर वा पहाड. गिरी हा पृथ्वीचाच एक भाग असूनही, त्याचेपासून वेगळा गणला जातो तो त्याच्या उच्चतेमुळे व दुर्गमतेमुळे वा गांभीर्यामुळे. या पर्वतीय प्रदेशावर अनेक पशु-पक्ष्यांचे निवासस्थान असते. तसे संत पशु, पश्मते, बध्यते, इति पशुः-पशुपति= ईश्वर हे विहंगम मार्गाने परमार्थ प्राप्ती करणाऱ्या साधकांना व सर्वही पशु-पक्ष्यांना जवळ करतात, आश्रय देतात. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचर। पक्षीही सुस्वरें आळविती-' संत तुकाराम. पर्वतावर शिष्ट, दुष्ट सर्व प्रकारची जनावरे असतात. तसे संतांचा दरबार सज्जन, दुर्जनांसाठी सदैव खुला असतो. पहाडावर एकांत असतो तसे हे संतही एकांतप्रिय असून सर्वांसाठी त्यांचे जवळ ऐक्यभाव असतो. 'दास डोंगरी राहतो' - समर्थ रामदास स्वामी. पर्वत फालतू वस्तू बाहेर खुल्यावर ठेवतात तर मूल्यवान वस्तू आपल्या खाणींमध्ये लपवून ठेवतात. तसे संत आपली सत्कृत्ये, सद्गुण, ज्ञान, वैराग्य यासारख्या अमूल्य गोष्टी स्वतःजवळ गुप्त राखून इतर सामन्यांप्रमाणे बाह्यजीवन जगतात. 'वेष असावा बावळा परि अंतरी नाना कळा।' जसे पर्वतातून नद्यांचे उगम होतात, वा त्या खळाळत वहात असतात. तसे कर्म-ज्ञान-भक्ती-उपासनारूपी नद्या या संतांपासूनच निघतात; तेथूनच त्यांचा प्रार्दुभाव होतो. पर्वतांप्रमाणे संत हे भव्य अशी धीर-गंभीरता धारण करणारे असतात. पर्वत जसे निसर्गसौंदर्याने नटले-बहरलेले असतात, तसे संतांच्या हृदयात धर्म-नीती-भक्ती-उपासना-कर्म-ज्ञान अशा प्रकारचे दिव्य सौंदर्य सतत बहरलेले असते. पर्वतावर जशी शुद्ध (प्रदूषणमुक्त) हवा असते, तसे संत-मन नेहमी शुद्ध सात्त्विक विचारांनी भरलेले असते. पर्वत जसे पावसाचा किंवा गारांचा मारा सहन करून शांत असतात तसे संत निंदा, छळ इत्यादि सोसून शुद्ध व शांतच असतात. 'बिंदुघात गिरी सोसति तैसे। संत सहति खल वचनें जैसे।' पर्वत - व त्यातील जंगले यांची खोली गाठणे म्हणजे सुईच्या नेढ्यातून ऊंट आरपार करणे होय. श्रद्धा व विश्वास नसणाऱ्यांना

या अशा संत-हृदयाच्या खोलीचा थांगपत्ता लागणे अती दुष्कर ! पर्वत आणि त्याची शिखरे ही जशी नेहमी मेघाच्छादित असतात तसे संत या कृपामेघांनी सदैव भरलेले असतात. पर्वत जसे हिरव्या वनश्रीने आणि खडे, पाषण, काटे-कुटे यांनी भरलेले असतात तसे संताचे मनात मृदु मुलायम हिरवळ तर सदैव असतेच असते. तसे न्याय-नीती वा धर्म पालनाचे बाबतीत, वज्राहूनही कठोरता असते. 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णूदास। कठीण वज्रासी भेदूं ऐसे।' सिंह, वाघ, लांडगे, हत्ती अशा प्राण्यांच्या शिकारी या पर्वत वा अरण्यात जसे शूर लोक करू शकतात; तसे या संत-संगतीत राहणारे साधक आपल्या काम-क्रोधादि विकारांची सहजी शिकार करून त्यांचे सावज बनवतात. पर्वतात जशा रत्नांच्या खाणी असतात, तशा या संताच्या हृदयात रामकथारूपी रत्नांची लयलूट असते. लोकवस्तीपासून दूर स्वच्छ हवेमुळे जसे या पर्वतावरील वृक्ष निसर्गाच्या मदतीने फळाफुलांनी डंवरतात तसे या संतांच्या संगतीत राहून मुमुक्षु, साधक वगैरेंच्या अनेक प्रकारच्या वृक्षावर अनेक प्रकारची ज्ञान-भक्तीची फळे, फुले डंवरतात. पर्वत जसा अचल, स्थिर तसे संत आपल्या धर्म-ज्ञान-भक्तीच्या ध्येयावर अटल, निश्चल असे स्थिरावलेले असतात. पर्वत वरील अनेक गुणांनी संपन्न असले तरी ते मलिन, स्थावर, जड व भयानक असतात. या उलट संत या सर्व गुणांनी संपन्न असून नेहमी अंतर्बाहय शुद्ध-निर्मल, स्थितप्रज्ञ, सत्-चित्-आनंदाने भरलेले अन् याच ज्ञान-भक्तीच्या सुंदरतेने नटलेले असे असतात.

धरणी- पृथ्वी, मही, भूमी, अवनी. धरणी म्हणजे धारणा शक्ती, आश्रय, आधार. 'जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा' असे महाराष्ट्रीय संत तुकोबाराय यांचे म्हणणे आहे. धरणी-पृथ्वी जशी अतिविशाल आहे तसे संत हृदयही महान विशाल असते. एवढेच नव्हे तर त्यांच्यापाशी जो जो आपले दु:ख घेऊन येईल, तो तो संत-सान्निध्यात सुखी होतो. धरणीजवळ जशी अनेक प्रकारची 'मह' म्हणजे ऐश्वर्ये आहेत तशी ज्ञान, भक्ती, वैराग्य, योग, धर्म, शास्त्र इत्यादि ऐश्वर्यांने संत श्रीमंत असतात. त्यांच्याकडे ह्या साऱ्या सात्त्विक संपत्तीचे कधीही न संपणारे भांडार आहे. क्षमा हा पृथ्वीचा गुण जणू तिने संतांकडूनच घेतला असावा. कारण या पृथ्वीवर

खणणे, नांगरणे, जाळणे, घाण टाकणे अशा अनेक प्रकारांनी तिला त्रास दिला तरी बिचारी ती सर्वकाही शांतपणे सहन करते- विनातक्रार. उलट मानव-पशु इत्यादिंना आश्रय देऊन त्यांचे ती कल्याणच करते. सर्व जीवांना लागणारे अन्नही ही पृथ्वीच देते, तसे संत बुभुक्षितास अन्न तर देतातच त्याहीपेक्षा सदुपदेश आणि हरिकथा यांचा सुंदर आहार वा अन्न देऊन त्यांची मानसिक-अध्यात्मिक भूकही भागवितात. या पृथ्वीवर आपण घरे, महाल, प्रासाद, इ.बांधून त्यात जसे सुरक्षित राहतो तसे संत देहबुद्धीचा नाश करून आत्मबुद्धी प्रवण करून साधकास खऱ्या अर्थाने संरक्षित करतात. तर अगदी प्राथमिक पातळीवर दुर्वर्तन-व्यसन इत्यादिंपासून सुरक्षित ठेवतात. 'सुधारती शठ सुसंग पावुनि।' 'काल कर्म नी स्वभाव दडपणिं । भले प्रकृतिवश चुकति भलेपणिं । ती घे हरिजन - चूक सुधारूनि। देइ सुयश दुखदोष निवारूनि (बा.कां. ७) 'सादर सेवत शमवी क्लेशां।' 'दुःख सहुनि पराच्छिदां झांकति।' (बा.कां. २)'विण सत्संग विवेक न होतो।' (बा.कां. ७) नदी आणि जल यांचा आधार धरणीच आहे.' स्थलविण जल कधिं राहुं न शकते ।' तसेच या पृथ्वीपासूनच अग्नी प्रज्वलित करण्याची साधने निर्माण होतात - तसे संत हे विवेकाग्नीचे निर्माते आहेत. संतच योगाग्नी प्रकट करून तो प्रज्वलित करतात. तसेच संत अकामता रूपी अग्नी (अनल)निर्माण करून तो वाढवून पोसत राहतात. अशा प्रकारे धरणीचे सर्व गुण संतांमध्ये स्थित आहेत.

सूचना- पृथ्वीवाचक १८ शब्दांचे अर्थानुसार सद्गुण, पर्वताचे अकरा सद्गुण आणि सरितेचे ११ सद्गुण असे १८+११+११=४० सद्गुण संतामध्ये आढळतात. ते टीकेत दाखविले गेले आहेत. शारदा, श्रुति, शेष हे देखिल संतांच्या सद्गुणांचे पूर्णपणाने वर्णन करू शकत नाहीत असे प्रभु रामचंद्रांनी नारदांना सांगितले आहे. जसा आकाशाचा थांग आजपर्यंत एकाही पक्षाला गवसला नाही तरीही काही काही पक्षी असा वेध घेऊ पाहतात, तसे सन्त-वर्णन करण्यास एक उपमा अपुरी वाटल्याने गोस्वामीनी अनेक (चार-चार) उपमा एकत्र घेऊनही हे संत-वर्णन पूर्ण होत नाही हे जणू कबूल केले आहे. तरीही हे लक्षात घेणे जरूरीचे आहे की धरणी, पर्वत, सरिता व वृक्ष या चारांमध्ये काही दुर्गुण किंवा क्वचित प्रसंगी जीवांचे अहित करण्याची शक्यता असते

परंतु हा धोका संतांचे बाबतीत स्वप्नातही संभवत नाही.

सन्त	१. विटप गुण
१. कृपाछत्र- त्रिताप नाश, विकार मुक्ती	छाया
२. सत्संगाची माधुरी सुवास	फुले
३. भक्ती-कर्म-उपासना,ज्ञान, वैराग्य,योग इ	फळे
४. लौकिक व पारमार्थिक फल देणें	पाने-आयुर्वेदिक उपचारादि
५. देह कष्टविति उपकारें	लाकूड
६. समाधीरूपाने शक्ती देणें, ग्रंथ उपदेश	राख
७. परनिंदा सोसणे, छळ, मार, त्रासहि.	साल
८. नम्र	झुकणें
९. एकांतप्रिय-एकांत साधनेने समाजहित	एकटाच उभा असतो
	दोष -
	वाऱ्यावादळाने पडून त्याचे खाली जीव मरतात, किडणे, सडणे,वाळवी लागणे

सन्त	२. सरिता गुण
१. सर्वांचा मनोमल धुणे	देह, कपडे यांची स्वच्छता
२. खऱ्या अर्थाने जीवन कृतार्थ धर्मनीती, अध्यात्म	'जीवन'दायी पोषण करतात- प्रेम,
३. परमात्म- हरिप्राप्ती- सुलभ	सागरप्रवेश सुलभ
४. सर्व प्रकारे निववतात	तलखी शांतविणे

५. परमात्म- दर्शन घडवितात	प्रतिबिंब
६. मृदु, दयार्द्र	ओलसरपणा
७. सुष्ट, दुष्ट सर्वांना समान उपदेश	समभावाने पाणी देणे
८. विषम तृष्णा शमते.	तहान भागते
९. हृदयाची व बोलातील माधुर्याने शीतलता	शीतल
१०. भक्तीचा सोपा सुलभ पचनीय मार्ग दाखवतात	पाणी पचायला हलके
११. संत- प्रति परमेश्वर- सत् चित् आनंदघन	जड
१२. मानद सर्वा स्वयें अमानी	पूर आल्यावर मदाने सीमोल्लंघन
१३. उलट जीवांचा उद्धार करतात.	
१४. ऐहिक व पारमार्थिक लाभ	शेते, पिके, जमिनी सुपीक
१५. सदैव वंदनीय	तीर्थ म्हणून वंदनीय
१६. सदैव पापक्षालन- समाधीनंतरही	पापक्षालन (शरयू, गंगा इ.)
	दोष-
	१. जीवीत वित्तहानी
	पात्र बदलते
	नदीत भयानक जलचर प्राणी
	कारखान्यांच्यामुळे पाणी दूषित बनणे- अपाय

संत **३. गिरी/पर्वत/डोंगर/पहाड**

गुण

१. उच्च ध्येये, दुष्टांना-दुर्गम, सदैव धीर-गंभीर	उंच, दुर्गम, गंभीर
२. विहंगम मार्गियांना निवारा पशु-पक्षी प्रिय	पशुपक्ष्यांचे निवासस्थान
३. सुष्ट, दुष्ट सारे या	सर्व प्रकारची जनावरे
४. एकांत प्रिय- साधना	दूर एकटाच उभा
५. सद्गुण साधना-रत्ने दडलेली सामान्य जीवनाचे प्रदर्शन	रत्नखाणी दडलेल्या, फालतूंचे प्रदर्शन
६. सद्गुण साधना-संपन्नता	निसर्गसौंदर्य संपन्न
७. सात्त्विक विचार	शुद्ध, मोकळी हवा
८. निंदा, छळ आनंदाने सोसतात	पाउस, उन, वारा, गारा सोसतात
९. संतहृदयाची खोली कोण गाठू शकेल?	आतील जंगलांचा थांग लागणे अतिशय अवघड
१०. मुळचे मृदु मुलायम पण बाबतीत -मृदुनि कुसुमादपि, वज्रादपि कठोराणि।	पाषाण, काटे-कुटे, खडे नीतीधर्माचे
११. कामक्रोधादिंची शिकार	प्राण्यांची शिकार करणे सोपे सुलभ
१२. रामकथारूपी रत्नखाणी-अनमोल	यातील रत्नांचे मोल होते.
१३. आपल्या ज्ञान,भक्ती,कर्म, योग मार्गावर अचल	एका जागी अचल, स्थिर
१४. सर्वांना अध्यात्म संपत्ती अमाप लुटत रहातात.	यावर वृक्ष, लता, वेली

	दोष-
१. पतनास वावच नाही, उलट आधार	यावरून पतन, अपघात, जीवघात शक्य
२. कोणताही धोका नाही, उलट आधार	ज्वालामुखी, खचणे,
३.कोणताही धोका नाही, उलट आधार	वाट चुकून तहान-भूकेने त्रस्त जीव हानीही
४. दुरून, जवळून सदैवच साजरे	दुरून डोंगर साजरे

संत	**धरणी गुण**
१. सर्वांचाच आधार- विशेषतः दीनांचा	सर्वांचा आश्रय, आधार
२. विशाल	विशाल
३. सुख देणे	सुखी करणे
४. मोक्षाश्रिया अलंकृत। ऐसे संत श्रीमंत।	महा-ऐश्वर्य संपन्न
५. क्षमा + दया + करुणा	क्षमा
६. सर्वांचा छळही सहन करतात.	सर्वांचा त्रास सहन करणे.
७. अन्न + प्रेम + सदुपदेश + भक्ती + ज्ञान	अन्न देते.
८. देहबुद्धीतून आत्मबुद्धी ते निर्भय करतात.	सुरक्षित
९. किंवा अगदी प्राथमिक अवस्थेत सुधारतात - दुर्वतन-व्यसनांपासून 'मानव' बनवतात.	

श्री रामचंद्रार्पितमस्तु।

संतप्रिय श्री रघुपतींचा जयजयकार असो। रामप्रिय संतांचा जय असो।

- अकरावे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट १२

श्री मानसात हरियान

श्री तुलसी काव्यकलेचा एक अतुलसा अतिरमणीय परम अद्भुत नमुना-

'राम अनंत अनंत गुण अमित कथा विस्तार' तसेच ' मानस अंत न ठाव ना अमित भाव विस्तार।।' (प्रज्ञा). मानसांत अरण्यकाण्डापासून ग्रंथसमाप्तीपर्यंत 'हरियान' ('हरियाना' सुद्धा) शब्द नऊ वेळा वापरलेला आहे. हरियान हे पक्षिराज गरुडाच्या अनेक नावांपैकी एक आहे.

मानसात व्यक्तींच्या नावांचा उपयोग काही तरी गूढ भावार्थ प्रगट करण्यासाठी केलेला आहे; ही गोष्ट गूढार्थ चंद्रिकेत निःसंशय निरपवाद सिद्ध करून दाखवलेली आहे. हरियान शब्द या सिद्धांताला अपवाद नाही. हा शब्द क्लिष्ट आहे; संदर्भानुसार अनेक अर्थ आहेत. १. हरियान = हरिमार्ग, हरि+यान = पंथ, मार्ग, गमन, गति. हरिप्राप्तीचा मार्ग, हरिकडे जाणे, हरीचे गमन असे अनेक अर्थ झाले.२. हरियान = हरीचे वाहन. ३. हरीची शत्रूवर स्वारी; स्वारी करण्याकरता प्रयाण. 'संधि र्ना विग्रहो यानं आसनं द्वैधमाश्रयः'उपदेश हे राजाचे युद्धनीतीतील सहा गुण आहेत. ४. हरियानचा पदच्छेद हरि या न असा केला म्हणजे (या=जाणे) हरिकडे न जाणे, हरिविमुख असणे, हा अर्थ सिद्ध होतो. मानसात हे सर्व अर्थ वापरले आहेत.

हरियान = श्रीहरीकडे जाणे, श्रीहरीला अनन्यभावाने शरण जाणे, हाच हरिप्राप्तीचा सर्वात सोपा, अति प्रभावी असा मुख्य मार्ग आहे. प्रथम अनन्य गतिक होऊन हरीला शरण गेले पाहिजे. नंतर 'श्रुतिसंमत हरिभक्तिपथ संयुत विरति विवेक' (७/१००) या मार्गाने जात राहिले पाहिजे, तरच श्रीहरि रघुनाथ त्या जीवाच्या हृदयात जाऊन राहतील (हरि-यान = हरिचे गमन = गति) व त्या जीवाच्या मोह कामक्रोधलोभादि शत्रूंवर ते स्वारी करतील; व तो जीव सदासर्वकाळ 'सुखसंदोह मोहपर' परम निर्भय होईल.

हरियान शब्दाचा भिन्न भिन्न ठिकाणी मिळून नऊ वेळा उपयोग करून अन्वयव्यतिरेकानी वरील श्रीमानसातील श्रुतिसिद्धान्तच ग्रथित केला आहे, हे वाचून वाचक आश्चर्य चकित होतीलच होतील; पण मानस अशा परमरमणीय भावरत्नांचा मोठा खजिना आहे.

पुढे संकलित केलेली वचने मानसात भिन्न भिन्न स्थळी ज्या क्रमाने आली आहेत, त्याच क्रमाने ती घेतली आहेत. त्या नऊ वचनांचा परस्पर संबंध अगदी सुसंगत व न्यायघटित असून, उपक्रमोपसंहार, दृष्टान्त, हेतु इत्यादिंचा सुंदर उपयोग क्रमशः केलेला आहे.

नऊ (९) हा अंक सर्व अंकात मोठा व श्रेष्ठ आहे. तो स्वतः निर्विकार असून इतरांतही तो विकार उत्पन्न करीत नाही, हे गू.चं. जागोजागी दाखविले आहे. हरियान = हरिभक्तिपथ ९ या अंकासारखाच सर्वसुखसाधनात मोठा, सर्वश्रेष्ठ व निर्विकार आहे हे ध्वनित करण्यासाठीच हरियान शब्द नऊ वेळा वापरला आहे. 'तव पदपद्मी प्रीति निरंतर। सकल साधनां हें फल सुंदर' (७/४१/४) 'जीव भक्तिमान् नीच जरि महा। प्राणप्रिय मज बाणा मम हा।। भक्तिहीन जरि विरिंचि असला। तो प्रिय सब जीवांसम मजला' इत्यादि वचने हेच सांगतात. हरियानचे पूर्वी दिलेले अर्थ ध्यानी घेऊन त्या नऊ वचनांचा आता विचार करूया.

नऊ वेळा हरियान

१. पितृ यम, माता मृत्यु समाना। सुधा विष बने श्रृणु हरियाना।। ३/२/६।।

२. ती माया न दुखद मज काहीं। आन जीव इव संसृति नाही।।२।।

नाथ! निराळें येथें कारण। ऐका सावधान हरियान।। ७/७८/३।।

३. दो.-भिन्न भिन्न सब पाहिले अति विचित्र हरियान।।

अमित भुवनिं फिरलो, प्रभु राम न दिसले आन।। ।।७/८१रा ।।

४. दो.-होति लोक सब मोहवश ग्रसी लोभ शुभ कर्म।।

श्रुणु हरियाना ज्ञाननिधि सांगुं काहिं कलि धर्म।। ।।७/९७ म।।

५. दो.-जी जी तनु धृत ती त्यजिलि अनायास हरियान।।

पट नूतन नेसूनि जसें नर परिहरिति पुराण।। ।।७/१०९ चं।।

६. पाप पिशुनते सम कीं आन। धर्म किं दयासदृश हरियान ।। ७/११२/१० ।।

७. बोध विराग नि योग विबोध हि। श्रृणु हरियान पुरुष हे सर्व हि ।। ७/११५/१५ ।।

८. दो.-मुनि ते ज्ञाननिधान मृगनयनी विधुमुख बघुनि ।।

विवश होति हरियान नारि विष्णुमाया प्रगट ।। ७/११५ म ।।

९. दो.-नेम धर्म आचार तप ज्ञान यज्ञ जप दान ।।

भेषज कोटि करून नहि जाति रोग हरियान ।। ७/१२१ म ।।

वरील स्थलनिर्देशावरून खात्री होईल की ही नऊ वचने एका प्रकरणातील सुद्धा नाहीत; भिन्न भिन्न प्रकरणातील आहेत; व इकडे तिकडे विखुरलेली आहेत; तथापि यांचा परस्परसंबंध इतका घनिष्ट आहे की जणू नऊ वचनांचे पंधरा ओळींचे हे स्वतंत्र काव्यच हेतुपूर्वक लिहिलेले आहे. आता या वचनात अर्थ व परस्पर सुसंगति यथामति विशद केली जात आहे.

१ [३/२/६]

पितृ यम, माता मृत्यु समाना। सुधा विष बने श्रुणु हरियाना ।।

पिता यमासारखा, माता मृत्युसारखी आणि अमृत विष बनते. केव्हा? जेव्हा 'हरि या न', जीव जेव्हा श्रीहरिकडे गमन करीत नाही, भगवंताला शरण जात नाही, तेव्हा - अगदी असे विपरीत सुद्धा घडते. पण तोच जीव जेव्हा हरियान करतो; भगवंताला शरण जातो तेव्हा सुरपति सुत जयंताप्रमाणे सर्व गोष्टी अनुकूल घडतात. बने विष सुधा, मृत्यु मातेसमान व यम पित्यासारखा होतो.

'हरियान'चे हे पहिले उदाहरण आहे. बहुसंख्य मानव जीव हरिविमुखच असतात, म्हणून प्रथम हरिविमुख, विषयरत, कामी, अभिमानी सुरपतिसुताचे उदाहरण दिले आहे. हे वचन जयन्त कथेतले आहे. 'श्रुतिसंमत हरिभक्तिपथ संयुत विरति विवेक (=ज्ञान) ।। तो न धरिति नर मोहवश, कल्पिति पंथ अनेक' (७/१००म) जे लोक अविद्यामायामोहाला वश होऊन हरिभक्ति (पथाने)

मार्गाने जात नाहीत - व सुखासाठी विविध कल्पित मार्गांनी जातात; अशांची दशा येथे जयन्ताच्या उदाहरणाने उपक्रमात दाखविली; व हरियानाचा आश्रय करणारांची गति सुचवून ठेवली. जे हरियान करतात - भगवंताला शरण जातात व हरियानाने (भक्तिमार्गाने) चालतात त्यांच्या विषयी आता दुसऱ्या वचनात सांगतात.

२ [७/७८/२-३]

ती माया न दुखद मज काहीं। आन जीव इव संसृति नाहीं॥२॥ ती माया म्हणजे - 'जी माया नाचवि जगताला। जिचे चरित्र न कळे कुणाला' (७/७२/१) 'शिव चतुरानन डरती जीतें' (७/७१/८) 'हरिमाया अति दुस्तर तरवे ना विहगेश'(७/११८रा) 'देवा प्रबला अति तव माया' (४/२१/२) अशी प्रबल, दुस्तर, भयदायक, अज्ञेय माया जी 'शिव विरंचिनां मोह्ते', ती माया सुद्धा 'काही दुखद - दुखद नाही' जरासुद्धा दुःखदायक नाही, म्हणजे इतर जीवांसारखे संसृतीचे दुःख नाही. कोणाला व का नाही?

'नाथ निराळें येथे कारण। ऐका, सावधान हरियान॥३॥' कारण इतकेच की जीव सावधान राहून हरियान करतो. श्रीहरीला अनन्य भावाने शरण जातो व सावधान राहून हरियानाने - भक्तिमार्गाने चालतो. (व) याचा अर्थ असा नव्हे की हरियानाने - भक्तिमार्गाने सावधान रीत्या चालणारास हरिमाया = विद्यामाया मोहित करीत नाही. 'शिवविरंचिनां मोहते कोण बापुडे आन?' याना सुद्धा मोहित करते, नाचवते हरिमाया; पण त्याना संसृति दुःखात पाडीत नाही. सावधानपणे हरियानाने चालणाऱ्या जीवाला हरिमायेने जरि नाचविला, तरि तो संसृति दुःखमुक्तच राहतो. मात्र त्याने अतिविचित्र हरिचरित्र 'ऐका सावधान' - सावधानपणे श्रवण केले पाहिजे. दृष्टान्त तिसऱ्या वचनाने देतात.

३[८१रा]

दो.। भिन्न भिन्न सब पाहिलें अति विचित्र हरियान।

अमित भुवनिं फिरलो प्रभु राम न दिसले आन॥

हरिभक्तिरूपी हरियानाने जाणारा जीव सुद्धा हरिमायामोहित होऊन

अगणित ब्रह्मांडभुवनात भ्रमिष्टासारखा भ्रमण करणार नाही असे नाही. तो सर्व गोष्टी भिन्न पाहीलही; तथापि त्या सर्वांमधे एकम् एव अद्वितीयम् राम, तो अभिन्नपणे पाहील. 'स्वर्ग नर्क अपवर्ग समान हि। बघे सर्व थळिं धृतधनुबाणहि॥२/१३१/७॥ 'निज प्रभुमय जग पाहति करिति कुणाशि विरोध' (७/११२). भुशुंडी सावधानपणे हरियानाने जाणारा होता; त्यामुळे त्याला विचित्र अनुभव आला की ती माया न दुखद मज काही.' जरि तिने त्याला अनंत ब्रह्मांडात फिरविला तरि ती त्याला काहीच दुःख देऊ शकली नाही; म्हणून म्हटले की 'विचित्र हरियान' आणि 'राम न दिसले आन' असाही विचित्र अनुभव आला; म्हणून म्हटले की 'अति विचित्र हरियान'.

'अति विचित्र रघुपति चरित्र' (१/४९) असे पूर्वी म्हटले आहे. आणि 'अतिविचित्र हरियान' असे येथे म्हटले; याने सुचविले की रघुपति चरित्र आणि हरिभक्तिपथ एकरूपच आहेत. 'संजीवनि मुळि भवरोगा, ती। रामकथा' (७/१२९/२) 'रामचरित चिंतामणि चारू' (१/३२/१) आणि 'रामभक्ति चिंतामणि सुंदर' (७/१२०/२) चारु = सुंदर. ज्ञानप्राप्तिनंतर हरियानाची जरूर काय? असे वाटेल म्हणून सांगतात -

४[७/९७ म]

होति लोक सब मोहवश ग्रसी लोभ शुभ कर्म।

श्रुणु हरियाना ज्ञाननिधि सांगु काहिं कलिधर्म॥

कोणी कितीही मोठा ज्ञानी, अगदी ज्ञाननिधि झाला आणि जर 'हरि या ना' हरिकडे जाणार नाही, हरियान रहित राहील तर तो ज्ञाननिधि सुद्धा अविद्यामोहवश होईल. अशांनी जरी शुभ कर्मे केली तरी ती लोभग्रस्त असणार; आणि निक्षून सांगतो की त्यांच्या ठिकाणी काही कलिधर्म असणारच. 'रामचंद्र भजनाविण इच्छी पद निर्वाण॥ ज्ञानवंत अपि तो नर पशु विण पुच्छ विषाण' (७/७८) याचे कारण प्रभुनारदसंवादात प्रभूंनीच सांगितले आहे की 'मम बल भक्तां स्वबल तयाना। काम कोप हे रिपु उभयानां॥ हें जाणुनि पंडित मज भजती। ज्ञान लाभिंहि न भक्ती त्यजती॥'(३/४३/९-१०).

यावर कोणी शंका घेईल की सावधानपणे हरियानाने चालणारास विद्यामायेने मोहित केल्यास ती त्याला संसृति दुःख देणार नाही. हे मान्य पण अविद्येने मोहित केला तर ती माया त्याला दुःखद होणारच. याचे निरसन पाचव्या वचनाने करतात.

५[७/१०९चं]

जी जी तनु धृत ती त्यजिली अनायास हरियान॥

'दुःसह दुःख जन्मतां मरतां' हेच मुख्य भवदुःख. 'कृपा पुरारि न करिति जयासी। भक्तिलाभ मम मुनि! न तयासी' (१/१३८/७) 'शंकर भजन बिना नर भक्ति न मम लभतात' (७/४५). शंकरांची कृपा ज्याच्यावर होते तोच सावधपणे हरियानाने - भक्तिमार्गाने जाऊ शकतो. काही असाधारण कारणानी तो जरि जन्ममरण प्रवाहात वाहत राहिला तरी 'जी जी तनु धृत ती त्यजिलि अनायास,' देहधारणा व देहत्याग करण्यात त्यास आयास = कष्ट मुळीच होत नाहीत; असा 'अनायास हरियान' आहे; म्हणून तर ''तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावें आम्हांसी'' म्हणूनच 'प्रतिजन्मीं प्रभुपदकमल - स्नेह न घटो कदाहि' असे मागणे वसिष्ठांनी मागितले.

त्या शूद्राला शंकरानी शापानंतर आशीर्वाद दिला होता की 'अनुग्रहें मम पुरी प्रभावें। रामभक्ति तव हृदयिं उद्भवे' (७/१०८/१०) या हरिभक्तिच्या प्रभावानेच देहधारण व देहत्याग करताना त्याला कष्ट झाले नाहीत. तो अविद्या मोहित होता आणि अनेक योनींत जन्मला व मेला, पण हरियान-हरिभक्तिपथ अनायास असल्याने 'पट नूतन नेसुनि जसे नर परिहरिति पुराण.' त्यात दुःख कष्ट काहीच होत नाहीत, उलट काहींना आनंद वाटतो व शोभा तर वाढतेच.

हरिमार्गाने सावधानपणे जाणारास 'दुःसह दुःख जन्मतां मरतां' मुळीच होत नाही - हे ठरले. सावधानता कोणती व कसे चालले पाहिजे हे साहव्या वचनाने सांगतात.

६[७/११२/१०]

'पाप पिशुनते सम कीं आन। धर्म किं दया सदृश हरियान॥

परनिंदा, परदोषदर्शन, परदोषचर्चा, परद्रोह, म्हणजेच पिशुनता 'पिशुना दुर्जनः खलः' (अमरे). सर्व पापांत हे फार मोठे पाप आहे. 'परनिंदा अघ अधिक गिरीशा' (७/१२१/२२ टी.प.) हरियानानें=भक्तिमार्गानें जाणाऱ्यानें हे घोर पाप रूपी-कुपथ्य टाळलेंच पाहिजे. आता अनुपान सांगतात.

'धर्म किं दया सदृश हरियान' - भूतमात्रावर दया करीतच हरियानानें गेले पाहिजे. भूतदया हा सर्वात श्रेष्ठ धर्म आहे. 'दया धरम का मूल है' (तुलसी)- ''भूतांची दया हे भांडवल संतां'' 'परमधर्म वेदोक्त अहिंसा' असे मानसवचन असलें तरि दया असल्याशिवाय अहिंसेचे पालन करताच येणार नाही. दया हे अहिंसा परमधर्माचें मूळ आहे. तिचा अंतर्भाव अहिंसेत होतोच. कार्याला कारण व्यापून असतेंच. निर्दय मनुष्या कडून अहिंसाव्रत पाळलें जाणें अशक्य आहे. 'दया सदृश हरियान' दयारूपी धर्म हरिभक्तिमार्गा सारखा, त्याच्या बरोबरीचा आहे. पिशुनतेचा त्याग व दयेचे आचरण, दया करणें, या दोन्ही गोष्टी उत्तम प्रकारें साधणें म्हणजेच सावधान राहणें. पिशुनता त्याग व दयेचें पालन केल्यानें होणारा लाभ आतां दाखवितात.

७[७/११५/१५]

'बोध विराग नि योग विबोधहि । श्रुणु हरियान पुरुष हे सर्वहि ।।

बोध=ज्ञान, विबोध=विज्ञान, वैराग्य, योग ज्ञान व विज्ञान या पुरुषांची प्राप्ति हरियान विरहित केवळ ज्ञान मार्गानें किती कठीण आहे; आणि अपार कष्ट करून सुद्धां विज्ञानदीप विषय झंझावातानें कसा विझतो याचे वर्णन ७/११५/१३ पासून ७/११८/ पर्यंत टीकेत पहावे. हरियान अनायास असल्यानें अहिंसारूपी परमधर्माचे मूळ जी दया ती असली व पिशुनतेचा अभाव असला तर हरियानानें जाणाऱ्यांस वैराग्य योग, ज्ञान व विज्ञान यांची प्राप्ति सहज होते; म्हणजेच यांच्या साह्यानें मिळवावयाची कैवल्य मुक्ति अनायासे मिळते. 'वद भक्तिपथिं कुठे प्रयासहि । योग न जप तप मख उपवास हि' (७/४६/१) असे प्रभु म्हणाले आहेत. 'स्वामी! राम भजत मुक्ती ते । न इच्छितां जबरीनें येते' (७/११९/४) 'भक्ति करत यत्नां विण कष्टां । संसृतिमूळ अविद्या नष्टा' (७/११९/८). अति दुर्लभ असणारी कैवल्यमुक्ति कुपथ्य टाकून व अनुपान राखून

हरिमार्गानें, जाणारांच्या पायाशीं लोटांगण घालीत येते. विराग योगादि चारी पुरुषांचें पौरुष भक्तिमार्गानें जाणारांसच तारक ठरते अन्यथा 'ज्ञानाचा पथ कृपाण-धारहि। पडत खगेश! न लागे वारहि' (७/११९/९ टी.प.) म्हणून आठव्या वचनांत सांगतात की-

८[११५म]

सो. मुनि ते ज्ञाननिधान मृगनयनी विधुमुख बघुनि।

विवश होति हरियान नारि विष्णुमाया प्रगट ।।

जे हरिकडे जात नाहींत 'हरि या न'; ते मुनि जरि ज्ञाननिधान असले-तरि अविद्यामाया-मोहित होऊन कामादिकांचे गुलाम बनतात; मग साधारण ज्ञानी मनुष्यांची कथा ती काय? याचें कारण 'स्थळाविण जळ कधि राहुं न शकते। यत्न कोटिही करून विविध ते।। तसें मोक्ष सुख बघ खगराया। टिकुं न शके हरिभक्ति बिना या' (७/११९/५-६) कोटि यत्न कोणते ते आता नवव्या वचनांत सांगून या नऊ वचनांच्या प्रकरणाचा उपसंहार करतील.

९[७/१२१ म]

दो.- नेम धर्म आचार तप ज्ञान यज्ञ जप दान।

भेषज कोटिं करून नहिं जाति रोग हरियान ।।

ज्ञान विज्ञानादिकांपासून मिळणाऱ्या मोक्षसुखाच्या संरक्षणासाठीं; किंवा ते मिळविण्यासाठीं नेम, धर्म आचार तपादि अनंत उपाय केले. साधने केलीं तरि 'हरि या न' अशा हरिविमुखांचे मोह कामक्रोध लोभादि रोग जात नाहीत, नष्ट होत नाहीत. या साधनांचा विस्तृत उल्लेख ७/४९/१-८ मध्यें वसिष्ठानीं; ७/१२६/४-७ मध्ये शंभूनीं केलेला आहे तो पहावा. जिथे हरियान (हरिशरणागति व हरिभक्तिपंथ)नाहीं - तेथून काम क्रोधादि रोग जात नाहींत. आणि जेथें हरियान आहे तेथें हे रोग जात नाहींत व हरियान आहे तेथून ते जातात.' 'जेथे हरियान तेथून रोग जाति व न हि हरियान तेथून रोग नहिं जाति' 'खल कामादि निकट ना वळती। ज्याचे हृदयिं भक्ति करि वसती।। निकट मोहदारिद्र्य येत ना' (७/१२०/६,४)

उपक्रमामध्यें= पहिल्या वचनात हरियानच्या अभावाचा परिणाम दाखविला व हरियानच्या अस्तित्वाचा प्रभाव सुचविला. येथे उपसंहारांत स्पष्टच सांगितले की हरिभक्ति पंथाशिवाय मानसरोग=मोहकामक्रोध लोभादि खल जात नाहींत व सुचविलें कीं हरियान असेल तेथें ते रोग फिरकत सुद्धां नाहींत. अशी उपक्रम व उपसंहार यांची पूर्ण एकरूपता दाखविली. मध्यें अभ्यास, अपूर्वता, व फल यांचे निदर्शन केले आहे.

सूचना- मूळात जेथें हीं वचनें आहेत तेथें 'हरियान, हरियाना' हीं गरुडाला उद्देशून संबोधनें आहेत व संदर्भानुसार अर्थ निराळा आहेच; पण तो वाच्यार्थ आहे.

या अद्भुत काव्यकलानिर्देशक प्रकरणाचें सार, श्रीगोस्वामींच्याच वचनात फक्त एका शब्दाचा बदल करून असें आहे.

दो. भक्ति राम की अंक है सब साधन है सून।

अंक गएँ कछु हाथ नहिं अंक रहे दसगून ॥ (दोहा.१०)

'रामभक्ति पूर्णांक हा सर्व साधनें शून्य। अंक जात, करिं काहि ना, अंकासह दशगूण' ॥१०॥

सूचना-'नाम' च्या जागीं भक्ति शब्द घातला म्हणून 'को'च्या जागीं की आली. नाम हा भक्तिमार्गाचा पाया व शिखरही आहे.

गू.चं. लिहितानाच 'हरियान' शब्दांतील गूढभाव 'प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण'च्या कृपेने जागोजागी प्रगट होत गेले. त्या वेळींच 'मानसांत हरियान' हा लेख लिहिण्याची- आवश्यकता वाटू लागली. सर्व टीकालेखन समाप्तीनंतर हिंदींत लेख लिहिण्याच्या दृष्टीनें सर्व वचनें एकत्र केली गेली. आणि विचाररूपी मंथन सुरू झाले त्या मंथनाने जे परम-आल्हाद दायक, अमोल व निगूढ भावामृत निघाले तें प्रथम मानसहंस (मासिक हिंदीं) हाथरस उत्तरप्रदेश, साठीं हिंदींत कागदावर वाढलें गेले; तथापि चार महिने झाले तरि पाठविण्यास वेळच मिळाला नाहीं. २२/११/५५/ रोजी मानसमणि मासिकासाठीं त्या लेखाची प्रत करताना थोडा विस्तार झाला व त्यास

मराठींत आणताना (२४/११/५५) थोडा विस्तार झाला. श्री तुलसीमानस-सिद्धान्त मुकुटमणि 'रामभक्ति चिंतामणि सुंदर' चेच प्रतिपादन या नऊ वचनांत नव पद्धतीनें सुचारुरूपात केलेले आहे.

'रामचंद्र' 'श्रुतिसिद्धान्त' 'विश्राम' 'क्लेश' 'रघुराया'या शब्दांच्या वचनानीं सुद्धा हा भक्तिसिद्धान्तच प्रतिपादन केलेला आढळला; व त्या शब्दांचे लेख प्रस्तावना खंडात प्रविष्ट झाले आहेत. प्रस्तावनेचा विस्तार फार होऊ लागल्यामुळे मागील परिशिष्ट, हा लेख व पुढला लेख यांना प्रस्तावनेत बसविता आले नाहीत, म्हणून परिशिष्टात दाखल करणें क्रमप्राप्त झाले.

अशी अतिमानुष, अति अनुपम, परम अद्भुत काव्यकला व काव्य प्रतिभा-विश्वसाहित्यात श्रीरामचरित मानसाशिवाय अन्यत्र मिळणें अगदीं अशक्य आहे. निःपक्षपाती, विचारवंत, काव्यरसिक हा व असले प्रस्तावनेंतील इतर लेख वाचल्यावर वरील म्हणणें मान्य केल्याशिवाय राहणार नाहीत, अशी या अल्पमतीस पूर्ण खात्री वाटते.

श्रीमानसांत अशा भावरत्नांचा अपार खजिना आहे. अशी भावरत्ने वारंवार हाती लागत आहेत हा केवळ अहैतुकी कृपाकर, श्री तुलसीमंजरी विभूषक, श्रीरामभ्रमराच्या कृपामय मृदु मधुर गुंजारवाचाच प्रताप आहे. या मंद मतीला व मलिन शठ मनाला मानसाच्या अगाध तळाशीं नकळत नेऊन श्रीरघुनाथकृपा जणू काय बलात्कारानें या मंद बुद्धीच्या मलिन पदरात अशी भावरत्ने सुंदर रीतीनें घट्ट बांधून देते.

।।संत हंस गुण घेति पय टाकुनि वारि विकार ।।

दो। रघुनाथाचे सकल गुण, दोष मतीचे मंद ।।

मानसांत आनंद अति दायक रघुकुलचंद ।।

हेतुरहित उपकारीश्रीरघुनाथ व त्यांचे अनन्य भक्त
यांचा जयजयकार करून हे परिशिष्ट समाप्त.

***

परिशिष्ट १३

मानसांत छंदांचा उपयोग सहेतुक व सापेक्ष

श्रीमानस गूढार्थ चंद्रिका लिहिताना पुष्कळ ठिकाणी असे आढळून आले आहे की मानसांत संस्कृतातील छंदांचा = वृत्तांचा उपयोग सहेतुक व सापेक्ष केलेला आहे. या नियमास अपवाद सापडतील असे प्रथम लेख लिहिताना वाटत होते; परंतु एकही अपवाद नाही हे सर्व वृत्तांच्या विषयी संशोधन व लेखन केल्यावर सिद्ध झाले आहे. प्रसिद्ध मराठी व संस्कृत साहित्यिकांस विचारता समजले की काही ग्रंथकारांनी काही प्रसिद्ध वृत्तांचा उपयोग अंशतः असा केलेला आढळतो, पण ग्रंथात वापरलेल्या सर्व संस्कृत वृत्तांचा उपयोग वृत्तांच्या नामार्थानुसार केल्याचे एकही उदाहरण नाही.

मानसांत काण्डाच्या मंगलचरणात अनुष्टुभ, शार्दूलविक्रीडित, वसंततिलका, वंशस्थ, इंद्रवज्रा, मालिनी, स्रग्धरा व रथोद्धता, या आठ वृत्तांचा उपयोग केलेला असून कथाभागांत नगस्वरूपिणी (प्रमाणिका) तोमर; तोटक व भुजंगप्रयात या चार वृत्तांचा उपयोग केलेला आहे.

मंगलाचरणांत काण्डक्रमाने ७, ३, २, २, ३, ३, ३ व मानसोपसंहारांत २ = २५ श्लोक आहेत. त्यांत अनुष्टुभ ६; शा.वि. १०; वसंत ति. २; वंशस्थ १; इंद्रवज्रा १;स्रग्धरा २;मालिनी १ व रथोद्धता २ = २५ आहेत.

कथाभागात नगस्वरूपिणी अरण्य दो.४; तोमर-अरण्य दो. २०; लंका. दो. १०१ व ११३ मधे; तोटक-लंका. १११; उत्तर १४, १०१ व १०२ मधे आहे, आणि भुजंगप्रयात उत्तर १०८ मधे रुद्राष्टकात आहे; त्यातच शेवटी एक अनुष्टुभ श्लोक व उत्तर १२२ मधे १ प्रमाणिका श्लोक आहे.

या सर्व ठिकाणी त्या त्या वृत्ताचा उपयोग हेतुपुरःसर, वृत्ताच्या नावाच्या अर्थानुसार त्याची सार्थकता करण्यासाठीच केला आहे, हे निःसंदेहपणे, सप्रमाण, निरपवाद सिद्ध झाले आहे. पूर्वील अनेक शोधां प्रमाणेच हा शोधही श्रीरामचरित मानसाच्या आयुष्यात महाराष्ट्रात, महाराष्ट्रीयालाच प्रथम लागला! हे ही ईश्वरकरणीची अद्भुतताच दाखविते.

हे रहस्य लंकाकाण्ड टीका लेखनात प्रथम दृग्गोचर झाले ते असे - अयोध्या, अरण्य, किष्किंधा व सुंदर या चार काण्डांच्या मंगलाचरणाचा प्रारंभ शार्दूलविक्रीडित या ओजस्वी वृत्ताने केला आहे. (क) लंका मंगलाचरण - श्लोकातच 'कालमत्तेभसिंहं' = काळरूपी मत्तहत्तीचा विनाश करणारा सिंह, असे श्रीरघुवीरासच म्हटले आहे. असे असून शा. विक्रीडित हे अति ओजस्वी वृत्त न वापरता स्रग्धरा हे कोमल वृत्त का वापरले? रावणकुंभकर्णादि महा उन्मत्त झालेल्या महागजराजांचा संहार केला ही करणी सिंहाच्या क्रीडेसारखी, शार्दूलाच्या विक्रीडिता सारखी नाही काय? ती करणी स्रग्धरा = माला, हार, धारण करणारी कशी? अशी शंका २५ वर्षात या मनात कधी डोकावली नसता व ३८४ वर्षांत उत्तर हिंदुस्थानातील मानसव्यास, रामायणी, मानसराजहंस, मानसहंस, इत्यादि प्रगाढ मानसाभ्यासी टीकाकार, संस्कृत पंडित इत्यादि कोणीही प्रदर्शित न केलेली अशी मोठी शंका उद्भवली व स्वस्थ बसू देईना; पण अलिकडील काही वर्षांच्या अनुभवाप्रमाणे ही शंका आपल्या समाधानास पाठीवर घेऊनच पुढे आली.

या अद्भुत व अपूर्व शोधाचे जन्मस्थान लंकाकाण्डच झाल्याने, या विषयाचे प्रतिपादन लंकाकाण्डापासूनच सुरू करणे योग्य ठरेल. संस्कृतात वृत्तांना छंद म्हणतात; व त्या शास्त्राला छन्दशास्त्र म्हणतात. वेदांच्या सहा उपांगांपैकी छंदःशास्त्र एक उपांग आहे. मराठीत साधारणपणे वृत्त म्हणतात; तथापि 'अनुष्टुभ् छंद तो ज्याला एकनेम नसे गणीं' असे परशुराम तात्या गोडबोले यांनी वृत्तदर्पणात म्हटले आहे.

लंकाकाण्ड

'रामं कामारिसेव्यं' हा मंगलाचरणाचा पहिला श्लोक स्रग्धरा छंद का?

रावणाच्या अत्याचारांनी व दुराचाराने त्रस्त झालेली लंका नगरीची देवता लंकिनी, लंका अरण्यकाण्डापासून रघुवीराने दाखविलेले शार्दूल विक्रीडित ऐकून व पाहून आणि रामदूत कपिकेसरिचे शार्दूल विक्रीडित स्वतः अनुभवून अयोध्यापती रघुनाथाच्या गळ्यात विजयमाला घालण्यासाठी स्रग्धरा (माला - हार = स्रक् घेतलेली - हातात धरलेली) झाली आहे. लंका व रावणविजयश्री - स्रक् तिने आपल्या हातात धरलेली आहे. रघुवीर राम लंकेजवळ जाताच

लंका त्यांना विजयस्रक् = विजयमाला घालणार हे स्रग्धरा छंदाने सुचविले आहे.

१. शतयोजन रुंद सागरावर सेतू बांधणे म्हणजे लंकाविजयश्री स्रक्-हार - रामचंद्रांच्या गळ्यात पडणे नाही असे कोण म्हणेल ?

२. कपि व मनुष्य राक्षसांचा स्वाभाविक आहार असून व जेथे प्रत्यक्ष काळ पहाऱ्यावर ठेवलेला होता तेथे अगणित कपिसेनेसह एक नर राजपुत्र तळ देतो; हे लंका विजयमाला रघुवीरांच्या गळ्यात पडल्याचेच चिन्ह नव्हे काय?

३. रघुवीरांच्या एका अदृश्य बाणाने भर सभेत येऊन रावणाचे छत्र व मुकुट आणि त्याच्या जवळ बसलेल्या त्याच्या पट्टराणीचे ताटंक (कर्णफुले) तोडून सर्वांच्या देखत धुळीत पाडणे म्हणजे रावणविजयमाला गळ्यात पडणे नव्हे काय ?

४. एका रामदूत वानराने - अंगदाने प्रतिज्ञा करून भर दरबारात आपला पाय रोवला असता इंद्रजितादि कोणाहि राक्षस महावीराला तो पाय गहूभर सुद्धा हालविता न येणे व अशा रीतीने सर्वांचा पराजय होणे आणि रावणासारख्या विश्वविजयी व राक्षसराजाच्या डोक्यांवरील चार मुकुट त्या माकडाच्या सहज हाती येऊन त्याने रावणाच्या डोळ्यांदेखत भर दरबारातून ते झुगारून देणे हे रघुवीराच्या गळ्यात विजयमाला पडणे नाही असे कोण म्हणेल ?

५. जिने रामनाममहामाला (स्रक्) अहर्निश आपल्या कंठात धारण केली आहे अशी सीता अशोक वाटिकेत रात्रंदिवस श्रीराम नामाची महामणिमाला आपल्या कंठात धारण करून ती जणू स्रग्धरा बनूनच तेथे बसलेली आहे. जणू तिच्या योगे (तिचे ज्या क्षणापासून लंकेत पदार्पण झाले, त्या क्षणापासून) 'श्री रघुवीरांचा विजय असो' अशा अक्षरांनी बनलेली ती महामणिमालेचीच बनलेली विजयमाला रघुनाथांची वाट पहात आहे. – ही भविष्यकालीन स्रग्धरा!

६. रघुवीर कालरूपी मदोन्मत्त हत्तीस सिंहाप्रमाणे सहज लीलया संपविणारे महाकाल आहेत. तेव्हा रावणासारख्या चिलटाला मारण्यास रघुनाथांना शार्दूलाचे विक्रीडित करण्याची गरजच काय? उलट गळ्यात

सुमनमाळ घालावी तितक्या सहजतेने विना-सायास श्रीरघुनाथ रावणाच्या संहाराची लीलाच करतील - हा सुरेख भाव. आणि प्रत्यक्षात झालेही तसेच - ज्या ज्या वेळी रघुनाथांनी रावण-कुंभकर्णादिंच्या मायावी युद्धास वा हल्ल्यास चोख प्रत्युत्तर देऊन त्यांना हतबल करून त्यांचा पूर्ण विनाश केला त्या प्रत्येक वेळी हसत हसत धनुष्यावर बाण चढवले आहेत. जणू लंकेच्या समरभूमीवर श्री रघुनाथांना काही करावेच लागले नाही, केवळ त्यांच्या हास्यानेच रावणादिंचा संहार झाला - ही पहा त्याची उदाहरणे -

श्री) हसुनि कृपानिधि चाप जोडिती। पावक सायक सपदिं सोडती। ६/४७/३

रा) प्रभु सस्मित जाणुनि अभिमान हि। सहज चाप कृत शरसंधान हि॥ ६/१३/७

म) प्रभु हसुनी म्हणती किं भिऊ नका। ६/३२/९

वि) प्रभु सस्मित जैं सुर-वच कानां। मग रघुवीर निरीक्षिति बाणां॥६/८६/७

ज) चमु चकित बघुनी हसुनि लाविति चापिं शर कोसलधनी।
माया हरी हरि निमिषिं, हर्षे सकल मर्कट-वाहिनी॥८९ छंद

य) राम पाहुनि कौतुक हसले॥६/५२/६

या प्रकारे ८०/९,९३ छंद, ९६ इ. अनेक प्रसंगांत श्री रघुवीर रणांगणांवर हसताना दिसतात. ज्या अगणित रावणांना पाहून लक्ष्मण, हनुमान, अंगद यांच्यासारखे महावीराग्रणी सुद्धा भयचकित व किंकर्तव्यमूढ झाले, तेव्हा त्याच रावणांना पाहून श्री रघुवीर हसले आहेत.कारण रावणाचा विनाश करणे हे कृत्य श्री रामांच्या दृष्टीने गळ्यात माळ घालण्याइतके हलके फुलके होते. केवळ श्री रामांचे हास्यच ही कृती करण्यास समर्थ होते. 'माया हास्य बाहु दिक्पाल' श्री राममायेपुढे राक्षसांच्या मायेचा काय पाड लागणार? श्री राममाये पुढे या राक्षसी मायेस पळताना भुई थोडी होते - असे अगणित भावदर्शन घडविण्यासाठी शार्दूल विक्रिडित न वापरता स्रग्धरा-छंद वापरला. लंकाकाण्डात प्रारंभी स्रग्धरा-छंद का वापरला, याचे पुरेपूर समाधान झाले की नाही?

अरण्यकाण्डात खर-दूषणादि-वध, किष्किंधाकाण्डात वाली-वध ही कृत्ये तर रावण-वधापेक्षाही हलकीफुलकी किंबहुना फुसकी होती मग तेथे स्रग्धरा न वापरता शार्दूल विक्रिडित का वापरला बरे?

इथे या शंकेचे संक्षेपात निरसन केले जाईल, अरण्य-काण्ड-छंदविवरणात याचा सविस्तर निरास करण्यास गोस्वामी समर्थ आहेत.

१. अरण्यकाण्डात खरदूषणांना पाहण्यापूर्वी 'धूलिपूर्ण नभमंडल बने' अन् पाहिल्यावर 'राम बघुनि रिपुदल ये चालुनि।चढवि कठिण कोदंडा विहसुनी।।' इथे फक्त एकदाच श्रीरघुवीर हसले आहेत. हे हास्य केवळ मायेला प्रेरणा देण्यासाठी होते, राक्षसांना मारण्यासाठी किंवा त्यांच्या मायावी-युद्धनीतीस प्रत्युत्तर नव्हते तर खरदूषणांनी संधी किंवा तह करून युद्ध न करता परत जाऊ नये ही प्रेरणा देण्यासाठी ते रघुनाथांचे हास्य होते. अरण्यकाण्डात यानंतर एकही वेळा प्रभुंचे हास्य, विहास्य, स्मित, काहीही नाही. याचाच अर्थ असा की प्रभुंनी आपल्या मायेचा उपयोग युद्धात आणि राक्षस-विनाशासाठी कधीही केला नाही. शेवटी संमोहनास्त्राच्या प्रयोगाच्या वेळीही प्रभूंचे हास्य नाही, हे ध्यानी घ्यावे. खरादि राक्षसांच्या मायेच्या विनाशासाठी प्रभुंनी आपली विश्वमोहिनी माया मुळीच वापरली नाही. राक्षसी माया म्हणजे कपटाचा व राक्षसांचा संहार रघुवीरांनी केला तो आपल्या युद्धकौशल्याने, शौर्याने, वीर्याने ! रावणाचा वध करणे म्हणजे आपल्याच पापकर्माने मेलेल्यास मारण्यासारखे होते. 'मृता मारणें नहि पुरुषत्वहि'- असा अंगदाने अगदी सुस्पष्ट उल्लेख केला आहे. अनरण्य राजा, वेदवती इ.च्या शापाने रावण शापदग्ध झालेलाच होता. त्यात भर पडली सीता-हरणाच्या महापापाची अन् त्यावरही कळस म्हणजे महाभागवत बिभीषणाचा अपमान व त्याला लत्ता-प्रहार करणे - त्याचवेळी खऱ्या अर्थाने रावण आणि त्याची सर्व सभा कालवश झालेलीच होती. 'राम सत्यसंकल्प प्रभु सभा तुझी वश काल। गत हे वदुनि बिभीषण जेंव्हा। आयुहीन सब झालें तेंव्हा।' असे शिवजी भवानीस म्हणाले आहेत. तर सर्व देव व सिद्ध म्हणतात 'जगद् द्रोहरत हा खल कामी। नष्ट अर्घे निज कुमार्गगामी।'

'कौल कामवश कृपण विमूढहि । अति दरिद्र अयशी अति वृद्धहि।। रोगी सदा सतत जो क्रोधी। विष्णु-विमुख श्रुति-संत-विरोधी।। तनु पोषक

निंदक अघ खाणी। जिवंत शवसम चौदाप्राणी॥'- असा रावण 'जिवंत शवसम' होता. यातील एकाही कारणाने 'जिवंत शव' बनते, रावणामध्ये तर या १४ पैकी ६-७ कारणे होती- मग त्याचेबद्दल काय बोलावे?

अशी अवस्था खर-दूषण, वाली यांची नव्हती. ते शापदग्ध नव्हते.अन् स्वतःच्या पापांनी शवसम बनलेलेही नव्हते. रावण तर 'ठेवि वालि कक्षांत' (वालीने रावणाचे खेळणे केलेले जणूं!) तेंव्हा या सर्वांवरून वालिवध आणि खर-दूषणादि वधासाठी शार्दूल विक्रिडिताची म्हणजे सिंहाप्रमाणे पराक्रम करण्याची आवश्यकता नव्हती, असे कोणी म्हणेल कां? अशा प्रकारे अरण्य व किष्किंधा काण्डाआरंभीच्या शार्दूल विक्रिडिताची सार्थकता सिद्ध झाली.

सुंदरकाण्डाचे आरंभी ही कपि केसरी हनुमानाच्या सिंहासारख्या प्रताप-लीला सूचित करण्यासाठी शार्दूल विक्रिडितच हवे, नाही कां?

अयोध्याकाण्डाचे आरंभीही शार्दूल विक्रिडित आहे कारण दशरथांसारख्या धर्म-न्याय-नीतीने राज्य करणाऱ्या सम्राटाने वारसाहक्काने देऊ केलेले राज्य, पित्याच्या वचनपूर्तीसाठी तृणसमान एका क्षणात त्यागून वनात जाणे ही सिंहासारखी प्रतापी, महापराक्रमी करणीच आहे. सिंह अन्य पशूंनी मारलेला प्राणी खात नाही. त्यावेळी श्रीदशरथनंदन रघुपती केवळ १८ वर्षांचे होते, नुकतेच १८व्या वर्षात पदार्पण केले होते. हे वाल्मीकी रामायणावरून सिद्ध होते. 'दशसप्त च वर्षाणि तव जातस्य राघव। आसितानि प्रकांक्षन्त्या मयादुःख परिक्षयम्' असे कौसल्येचे वचन आहे. (वा.रा.)

शार्दूलचा सामान्य अर्थ वाघ असा आहे, परंतु सिंह या अर्थीही तो वापरला जातो, जसे- नरशार्दूल, नर-सिंह.

छंदांची सहेतुक योजना आणि सापेक्षत्व सिद्ध करण्याचा प्रारंभ स्वभावतः जेथून झाला तेथूनच ह्या लेखापासून आरंभ केल्याचे या लेखाच्या प्रारंभीच म्हटले आहे. आता दुसऱ्या लेखात अयोध्याकाण्डातील छंदांचा विचार केला जाईल. सर्वप्रथम मंगलाचरणांच्या छंदांचा विचार मांडला जाईल.

गोस्वामींची श्रीमानसकाव्यकला किती गूढ अन् आश्चर्यचकित करणारी आहे हे पहातच रहावेसे वाटते. अर्थात या कलेची यथार्थ प्रशंसा करणेची

ताकद या मंदमती लेखकाची नाही, हे खरेच! तथापि श्रीरघुनाथांच्या कृपा-वर्षावामुळे यातून जो परमानंद मिळतो, त्यातला कांहीसा अंश मानसप्रेमी सज्जनांना समर्पित करण्याचा यथाशक्ती अल्पसा प्रयत्न येथे केला आहे!

श्री रघुवीर रामचंद्रांचा विजय असो!

अयोध्याकाण्ड मंगलाचरणातील छंद

पहिल्या लेखात लंकाकाण्ड मंगलाचरण प्रथम छंद -'स्रग्धरा'-याची सार्थकता आणि अयोध्याकाण्ड- प्रथम छंद 'शार्दूल विक्रिडित' यांची सार्थकता सांगितली. आता या लेखात अयोध्याकाण्ड मंगलाचरणातील राहिलेल्या छंदांची सार्थकता विशद करून, बालकाण्ड- मंगलाचरणातील छंदांची सार्थकता क्रमशः सांगितली जाईल.

अयोध्याकाण्ड- या काण्डात मंगलाचरणाचे तीन श्लोक आहेत. शार्दूल विक्रिडित, दुसरा वंशस्थ व तिसरा इंद्रवज्रा- अशा छंदात हे तीन श्लोक आहेत. पैकी दुसऱ्या छंदाचा विचार करू-

या श्लोकाचा छंद वंशस्थ, वंशस्थविल किंवा वंशस्तनित- अशा तीनही नावानी ओळखला जातो. तिन्हींच्या अर्थानुसारी अशी या छंदाची इथे रचना केलेली आहे.

१) वंशस्थ= वंश+स्थ. वंश= कुल आणि वेणू किंवा कळक किंवा बांबू. वंशस्थ म्हणजे त्या वंशातील- कुलातील, किंवा वंशाची स्थिती ज्याचेवर अवलंबून असते असा. जसा गृहस्थ शब्द बनला आहे तसाच वंशस्थ शब्द! राम, दशरथ, कैकयी, भरत, कौसल्या हे सारे वंशस्थच आहेत. वंश= वेणू. श्रीरघुनाथ, श्रीदशरथ आदि सर्वच १,१ वंश आहेत, सर्वांचे मिळून जणू हे वेणूवन बनले आहे. यामध्ये अग्नी असतो म्हणून वंशस्थचा आणखी एक अर्थ 'वेणूवनातील आग' असा झाला. आता पहा- वंशामध्ये स्थित-वंशस्थ, रघुवंशस्थ कैकेयी ही वंशस्थ= वेणुवन अग्नि=वेणूवनातील आग बनली आहे. 'कुटिल कठोर कुबुद्धि अभागिनि। होइ आग रघुवंश-वेणू-वनिं॥' असे घडलेही. 'सहूं न शकति रघुवर-विरहानळ। लोक सकल पळुं लागति विव्हळ॥'

ही या काण्डातील घटना आहे. हे कशा प्रकाराने घडले याचे स्पष्टीकरण 'वंशस्थविल' या शब्दाने होते.

२) वंशस्थविल-वंशस्थाः विल्यन्ते-भिद्यते अनेन, इति वंशस्थविल, विल भेदने- वंशस्थांमध्ये भेद करणारा असा वंशस्थविल शब्दाचा अर्थ झाला. रघुवंशांतील व्यक्तीमध्ये भेद निर्माण करून कैकेयी जी दशरथ - वेणुवन आग बनली- त्याचेच हे सूचन होय. कैकेयी स्वतःच म्हणते-

'प्रिय वच, परी मलिन मन जाणत। गप्प रहा, राणी दरडावत॥

घरफोडे! कधिं असे वदसि जर। जीभ काढविन तव ओढुनि बरं॥ २/१४/७,८

१४व्या दोह्यातही 'कुबडी' 'दासी'. प्रथम वंशस्थविल बनविली गेली ज्यामुळे रघुवंशात भेदाचे बीज पेरले गेले, व त्याचा परिणाम म्हणून कैकयी वंशस्थ = वेणूवन आग बनली. आता याचा परिणाम 'वंशस्तनित'ने सुचविला आहे.

३. वंशस्तनित- वंश+स्तनित, स्तनित म्हणजे गर्जना, कोलाहल, आक्रोश. रघुवर विरहानलामुळे संतप्त लोकांचा शोक इत्यादिमुळे जो कोलाहल माजला, तो हा वंशस्तनित होय.

'वृत्त तीक्ष्ण अति नगरिं पसरले। इंगळी-विष जणुं देहीं चढले॥
परिसुनि विकल सकल नर नारी। वेलि विटप दव बघुनि किं भारी॥'
२/४६/६,७

वेणुवनात जेव्हा आग लागते, ती आग वेणू (बांबू) एकमेकांवर घासल्यामुळेच लागते. अगदी तसेच कैकयीच्या हृदयात ही आग कुबडीने रामराज्य व भरतराज्य या भेदानेच निर्माण केली. या मुळे जे मानसिक संघर्षण सुरू झाले त्यातून कैकेयीच्या मूळच्या भोळ्या स्वभावाचे परिवर्तन सवती-मत्सर, दाह, द्वेषरूपी आगीत झाले. आगीचे बीज जरी बारीक ठिणगीत (कुबडीने पेटवून दिलेल्या) असले तरी ती पाहता पाहता भीषण भयंकर आगीचे रूप धारण करते. त्या भयंकर रूपामुळे सर्व व्याकूळ झाले, ओरडू लागले,

कैकयीस शिव्या देऊ लागले, डोकी बडवून घेऊ लागले - इ. हे सर्व वंशस्तनित आहे. अशा प्रकारे या वंशस्तनिताचे अनेक दाखले या अयोध्याकाण्डात पहायला मिळतील. 'गत रघुनाथ ओरडा झाला' 'नगरिं करुण-रस-कटक करि चाल पिटुन डंक्यास॥' २/४६ यातून जो ध्वनि निघाला तोच वंशस्तनित आहे.

या दुसऱ्या श्लोकात 'तथा न मम्ले वनवास दुःखतः' केवळ रघुनंदनांची मुखांबुजश्री आपल्या वनवास-दुःखाने म्लान झाली नाही. परंतु मंथरा-कैकेयी वगळता' अयोध्येतील समस्त जीवांची दशा पुढील चौपायीवरून स्पष्ट कळते -

बागांमधिं तरू वेलि कोमजति। नदी तलाव न मुळीं पाहवति॥ २/८३/८

इत्यादि वर्णने पाहा. या तीनही शब्दार्थांचे पोषक भरपूर आधार मानसात भरलेले आहेत. हे केवळ योगायोगानेच घडले. काकतालीय न्यायाने म्हणजे कावळा बसायला अन् फांदी मोडायला गांठ पडली - असे कोणता विचारशील, काव्यरसिक भावुक वाचक म्हणण्याचे धाडस करेल? अशा या विलक्षण अद्भुत रचना हेतुपूर्वकच केलेल्या आहेत, हे आता पुढील तिसऱ्या श्लोकाच्या इंद्रवज्रा छंदाद्वारे अधिक स्पष्ट होईल. श्री अयोध्या प्रथम वंशस्थनित (वंशस्थांमधील भेद), नंतर वंशस्थ (वेणूवन आग) अन् शेवटी वंशस्तनित (आक्रोश, कोलाहल) - विरह विलापाने भरून जाईल. १४ वर्षे हे करुण रसाचे सैन्य या अयोध्येत असेच डंके पिटत राहणार असे सर्व सार या तीन नावाच्या छंदांतून क्रमाक्रमाने सूचित केले आहे.

तिसरा श्लोक इंद्रवज्रा छंदाचा आहे. 'नीलाम्बुज श्यामल कोमलांगं...' रामविरहरूपी इंद्राचे वज्र ज्या अयोध्यापुरीवर पडले, ती इंद्रवज्राच होणार ना? 'रामं रघुवंशनाथम्' असे छंदाच्या अंती शब्द आहेत. रघुवंशाचे नाथ – राम वनवासी झाल्यावर रघुवंशासह सारी अयोध्या अनाथ बनणार हेच जणू यातून सूचित केले आहे. आणि ज्या अयोध्यापुरीचा परित्याग रघुवंशनाथांनी केला ती नगरी 'इंद्रवज्राच' बनणार हे अगदी सुस्पष्टपणे दाखवले आहे. एरव्ही इंद्राच्या अमरावतीस लाजविणारी ही अयोध्या, इंद्राचे वज्र पडल्याने विरही दुःखी अवस्थेतील दशरथपुरी-अयोध्या बनणार हे ही ध्वनित केले आहे. पुढे तर स्पष्टच म्हटले आहे – 'कौसल्या करि काय बिघाडा। ज्यास्तव वज्र तुम्हीं पुरिं

पाडा।।'४९/८ कुबडी वंशस्थविल-घरफोडी बनल्यामुळे, कैकयीने रघुनंदनास वनात पाठवून जणुं दशरथपुरीवर इंद्राच्या व्रजाचा आघात केला – म्हणून अयोध्या इंद्रवज्रा बनली. तथापि एकदा अयोध्येवर वज्राघात करून भागले नाही तर दुसऱ्यांदा झालेला हा वज्राघात (कुलिशपात) पाहा –

'श्रवुनि विलाप दुःख दुःखाला धैर्याचाहि धीर पळाला।
राऊळिं आक्रोशा श्रवुनि पुरिं कोलाहल घोर।
विपुल विहगवनिं पतित जणुं रात्रीं कुलिश कठोर।।' दो. १५३

आता कोणीही सांगावे की हा इंद्रवज्राचा प्रयोग जाणून बुजून केला आहे, की आपला घडून आलेला योगायोग, असा आहे?

खरोखर गोस्वामींच्या काव्यकलेस विश्वात तुलनीय असे एकही काव्य-नाट्य वा साहित्य सापडणार नाही. असे कोणीही बहुश्रुत, बहुभाषाभिज्ञ काव्यरसिक म्हणेलच म्हणेल!

सूचना- लेखाचा आरंभ प्रत्येक काण्डातील मंगलाचरणातील छंदांची सहेतुकता व सार्थकता सिद्ध करून दाखवण्यासाठी झाली. जिथे अशा अतिगूढ अद्भुत रहस्याचे उद्घाटन झाले, त्या लंकाकाण्डापासून प्रारंभ केला अन् त्या संबंधी अयोध्या, मंगलाचरण प्रथम छंद याची सार्थकता सांगितल्यानंतर सुंदरकाण्डाकडे वळण्याचा विचार होता; पण 'प्रेरक हृदिं रघुवंश विभूषण त्यांनी हे मन अयोध्या मंगलाचरण श्लोक २ व ३ कडे खेचले. जेव्हा अशी रघुनाथांची अद्भुतता प्रतीतीस आली, तेव्हा मग पहिल्या श्लोकाचाही तेथे समावेश करणे उचित वाटले म्हणून तिन्ही श्लोकांविषयी लिहिले गेले. अशा प्रकारे या लेखनास अनिच्छेने ही दिशा दिली गेली. आता बालकाण्डाच्या मंगलाचरणांतील सात श्लोकांची सार्थकता याच प्रकाराने दाखवणे हे क्रमप्राप्तच आहे. परंतु या श्लोकांच्या छंदांविषयी लिहिणे दुसऱ्या लेखातच योग्य आहे. म्हणून इथे मानसमणि वाचकांच्या सेवेत हा लेख समर्पित करून विश्राम घेतला जाईल.

अहैतुकी कृपाकर दीन बंधु रघुनाथांचा विजय असो.

श्रीगोस्वामी तुलसीदासांचा आणि त्यांच्या मानस काव्य कलेचा विजय असो.

बालकाण्ड मंगलाचरण अनुष्टुभ

मागील दोन लेखांत लंकाकाण्ड मंगलाचरण प्रथम श्लोक, आणि अयोध्याकाण्ड मंगलाचरणाचे तीन श्लोक यांच्या छंदांची महत्त्वता व सार्थकता साधार दाखवली गेली. आता बालकाण्ड मंगलाचरणाच्या सातही श्लोकांत तोच छंदांच्या सार्थकतेचा विचार केला जाईल. बालकाण्ड मंगलाचरण छंद – या काण्डात सात संस्कृत श्लोक आहेत. त्या पैकी पहिले पाच अनुष्टुभ, सहावा शार्दूलविक्रीडित अन् सातवा वसंततिलका या छंदांत आहेत. या लेखात पहिल्या पाच श्लोकांची अनुष्टुभ छंद सार्थकता दाखविली जाईल.

अनुष्टुभ हे एक छंदाचे नाव आहे. तसेच याचे आणखीही अर्थ संस्कृत भाषेत आहेत, ते असे – अनुष्टुभ=वाणी, भाषा, सरस्वती.

प्रथम श्लोकात वाच्यार्थाने 'वन्दे वाणीविनायकौ' हा मुख्य हेतु आहे. सरस्वती देवीला नमन करण्यामध्ये, ज्याचा अर्थ 'सरस्वती' आहे अशा अनुष्टुभ छंदाचा वापर करण्यात कवीच्या काव्यकला प्रतिभा, त्यांचे शब्दज्ञान, संस्कृत भाषा व व्युत्पत्तिज्ञान निदर्शक नाही असे म्हणण्याचे दुःसाहस कोणता सुज्ञ वाचक करेल? पहिल्या श्लोकाच्या वाच्यार्थाविषयीचा हा विचार झाला. परंतु वाच्यार्थापेक्षा लक्ष्यार्थ श्रेष्ठ असतो.

बालकाण्डाच्या सातही श्लोकांमध्ये तत्त्वनिर्णायक उपक्रमोपसंहारादि सहा लक्षणांचा उपयोग, अनुबंध चतुष्टय आणि प्रयोजनाचे फळ अशा सर्वांचा यात समावेश आहे. हे भाव मानस-पीयूष या टीकेत नाहीत. कदाचित या लेखकाचे हे भाव प्रकाशित केले जातील. मानस-गूढार्थ-चन्द्रिका टीकेमध्ये मराठीत ते लिहिले गेले आहेत. ते मानसमणि वाचकांच्या सेवेत यथावकाश समर्पित केले जातील. आता मा.गू.चं. - हिंदी/मराठी प्रथम खंडात पाहा.

प्रथम श्लोक - 'वर्णानामर्थसंघानां...' या मध्ये वाणी=सीता, आणि विनायक=श्रीराम यांची वंदना केली आहे. बालकाण्डाच्या विषयाचा वस्तूनिर्देशही यात आहेच. या प्रकारे उरलेले सहा श्लोक क्रमशः प्रत्येक काण्डाचे प्रतिनिधी आहेत. हे सर्व विवेचन सविस्तर साधार असे मा.गू.चं. मध्ये मानस वचनांनीच सिद्ध करून दाखविले आहे.

बालकाण्डात प्रामुख्याने श्रीराम-सीता विवाहापर्यंतचे चरित्र-वर्णन आहे. या संपूर्ण चरित्राचे रहस्य 'अनुष्टुभ' या शब्दाने ध्वनित केले आहे. अनुष्टुभ=अनु+ष्टुभ, ष्टुभ स्तुम्नानि=व्याप्नोति, व्यापणे या अर्थाचा हा धातू आहे. आणि ष्टुभ=स्तम्भे-स्तोभते, स्तंभित करणे, वश करणे, निरोध करणे. अशा दोन धातुंचा हा अनुष्टुभ शब्द बनला आहे. अनुष्टुभ श्रीराम हे बालकाण्डाचे श्रीराम आहेत.

अनु स्तोभते इति अनुष्टुभः, रामः, आणि अनु स्तुभ्नाति इति अनुष्टुभ, रामः. (स्तुभ चा अर्थ 'कस्तुभ' आणि 'कौस्तुभ' या शब्दांच्या टीकेत अ.व्या.सु.ग्रंथात सापडला.) कोणाचे तरी अनुगमन करून स्तंभित, वश, करणारा तो अनुष्टुभ आणि कोणाचे तरी अनुगमन करून व्यापणारा तो अनुष्टुभ हे दोन्ही अर्थ बालकाण्डातील रामचरित्राचे पूर्ण निदर्शक आहेत.

१. विश्वामित्राबरोबर जाईपर्यंत - 'आज्ञा घेति करिति पुरकाजा। बघुनि चरित हर्षित मनि राजा।।८।। व्यापक अकल अनीह अज निर्गुण नाम न रूप।। भक्तांसव विविधा चरित अनुपम करत अनूप। (१/२०९) अशा आपल्या ऐश्वर्याच्या प्रभावाने प्रभु अयोध्यावासी लोकांना सर्व प्रकारे सुखी करत होते. पण प्रत्येक कामापूर्वी किंवा घरातून बाहेर पडताना राजाची, पित्याची किंवा मातेची आज्ञा घेतल्याशिवाय कार्य करत नसत. कोणाचे तरि अनुगमन, अनुसरण करूनच सर्व काही करीत असत. स्वतंत्रपणे कोणतेही काम करीत नव्हते. (क) चापबाण करतलिं अति शोभति। देसत रूपचराचर मोहति।। ज्या पथिं बिहरति भाऊ चवघे। थक्क होति नारी नर अवघे। (१/२०४/७०८) या प्रमाणे सर्व लोकांना स्तंभित करीत असत. (स्तोभते; पण बाहेर जाताना आज्ञा घेतल्याशिवाय जात नसत, म्हणूनच हे अनुष्टुभाचे अनुष्टुभ (अनु स्तोभते, ष्टुभ स्तंभे) चरित्र आहे, हे सिद्ध झाले. (ख) रामलक्ष्मणाना दशरथांनी विश्वामित्रांस दिले आणि 'तुम्हि मुनि पिता आन नहि कोणी' (१/२०८/१०) असे दशरथ म्हणाले म्हणून पितृत्व विश्वामित्राकडे गेल्याने प्रभु विश्वामित्रानुगामी झाले व त्यांच्या आज्ञेनेच प्रत्येक कार्य केले आहे.

२. विश्वामित्रांबरोबर गेल्यापासून - (क) 'पथिं जातां ताडके दावि मुनि।' तेव्हा 'एकचि बाणें प्राण हरण करि' (१/२०९/५-६). ताटकावध

विश्वामित्राज्ञानेच केला. (ख) दशरथानी मुनिमखरक्षण करण्यासाठीच पाठवले होते; म्हणून राक्षसांचा विनाश करून रक्षण केले. (ग) जनकपुरीला गेले विश्वामित्राज्ञेनेच - 'वदति आदरें मुनि समजाउनि। चरित एक बघणें प्रभु जाउनि। कळत धनुर्मख रघुकुल नाथा। निघति हर्षित मुनिवर साथां' (१/२१०/९-१०) (घ) अहल्योद्धार विश्वामित्राज्ञानेच केला. 'चरणकमलरज वांछिते कृपा करा रघुवीर' (१/२१०) (ङ) आमराईत उतरले मुनींच्या आज्ञेनेच. (१/२१४/६-७) (च) भोजन सुद्धा ऋषींच्या बरोबर रामाचे; रघुनाथाबरोबर ऋषीचे नव्हे. (१/२१७) (छ) लक्ष्मणाला नगर दाखविण्यास गेले व लोकलोचन सुफल केले विश्वामित्राज्ञेनेच. 'सुखनिधान युग बंधुनो या नगरी पाहून।। करा सुफल जन नेत्र तव सुंदर मुख दावून' ९१/२१८) जाताना आबालवृद्ध नरनारींना स्तंभित केल्याचे वर्णन २१८ नंतर आहे. (ज) स्नानास, संध्येला वगैरे सुद्धा मुनि आज्ञा घेऊन जात असत. (झ) झोपले मुनि आज्ञेने (ञ) फुले आणण्यास गेले आज्ञा घेऊन. (ट) धनुर्मख मंडपात गेले मुनींच्या आज्ञेने, मुनींच्या बरोबर. (ठ) 'उठा राम भंगा भवचापा' अशी आज्ञा ऐकल्यावरच धनुर्भंग करण्यासाठी उठले व केला. (ड) दशरथ आल्यावर त्यांस भेटण्यास जाण्याची इच्छा असून परवानगी मागण्यास धीर झाला नाही. मुनि स्वतः बरोबर घेऊन गेले दोघांना. (ढ) विश्वामित्रांनी दशरथांच्या स्वाधीन केल्यावर पूर्ववत दशरथाज्ञेने वागले आहेत.

बालकाण्डात, विश्वाला आश्चर्याने स्तंभित करणाऱ्या अनेक लीला केल्या पण त्या सर्व पित्याची किंवा गुरुची आज्ञापालन करण्याच्या निमित्याने केल्या. कोणालाही 'तथास्तु' म्हणून वर दिला नाही. स्वतंत्रपणे काही केले नाही. बालकाण्डाचा पहिला श्लोक अनुष्टुभ छंदाचा का हे आता सूर्यप्रकाशवत स्पष्ट झाले.

श्लोक २ रा अनुष्टुभच आहे.

या श्लोकात अधिकारी व प्रयोजन यांचा निर्देश केलेला आहे. जो श्रद्धाविश्वासांचा अनुगामी होईल तोच स्वान्तस्थ ईश्वराला जाणू शकेल. वृत्तिव्याप्ति त्यालाच साधेल - इतरांस साधणार नाही. अनु स्तुभ्नाति - व्याप्नोति, अनुगामी बनून व्यापतो तो अनुष्टुभ.

श्लोक ३ रा अनुष्टुभच आहे.

'वंदे बोधमयं नित्यं' या श्लोकात आश्रित शब्दाने आश्रयाश्रित संबंध दाखविला आहे. सद्‌गुरुचा आश्रित, सेवक, अनुगामी बनल्याशिवाय श्रद्धाविश्वासवान सुद्धा स्वान्तःस्थ ईश्वराचा साक्षात्कार करू शकणार नाही. गुरु -आश्रित, गुरु -आज्ञापालन करणारा असेल त्यालाच भवचापभंग करता येईल. (भव = संसृति हेच धनुष्य; आणि भव = शिव) हे श्री रघुवीराच्या उदाहरणाने बा.कां. आधीच दाखवून ठेवले आहे.

श्लोक ४ था अनुष्टुभच आहे.

विश्वासश्रद्धाअनुगामी, गुरु -अनुगामी बनला; तरी सीताराम गुणग्राम पुण्यारण्यात, सद्‌गुरुच्या आज्ञेप्रमाणे; त्यांच्या साह्याने विहार केल्याशिवाय दुसऱ्या श्लोकात सांगितलेले प्रयोजन सिद्ध होणार नाही. सीताराम गुणग्रामपुण्यारण्यात मुख्यतः 'राम' नाम आणि चरित्र यांचा अंतर्भाव होतो. म्हणजेच गुरुमुखाने रामनाम व रामचरितमानस यांचा अनुयायी बनल्याशिवाय स्वान्तःस्थ ईश्वराचा साक्षात्कार होणार नाही. (७/६९ पहा) गुरुपदेशाने प्राप्त झालेला रामनाममंत्र आणि गुरुमुखाने, गुरुसेवक, आश्रित बनून रामचरितमानसाचे श्रवण सतत करील त्यालाच प्रयोजन सिद्ध होईल परंतु अविद्यादि - मोहादिक्लेशांचा नाश विद्याच करते म्हणून आणखी एक अनुगामीत्व हवे.

श्लोक ५ वा अनुष्टुभच आहे.

(१) अज्ञाननाश, ज्ञानाचा उद्भव व ज्ञानाची स्थिती सिद्ध करून देणारी क्लेशहारिणी व सर्वश्रेयस्करी सीता रामवल्लभा आहे. ब्रह्मविद्या सीता आहे. तिने अज्ञान-विनाश व ज्ञानाचा उद्भव होतो पण गुरुकृपेने; परंतु ज्ञानाची स्थिती नुसत्या ब्रह्मविद्येने होत नाही हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. भक्तिरूपी रामवल्लभा पाहिजेच (७/११६/४; ७/११९/४-६; ७/४५/३-४ पहा) म्हणून रामवल्लभारूपी भक्तीचा अनुयायी बनला तरच स्वान्तःस्थ ईश्वराचा साक्षात्कार पूर्वी वर्णिलेल्या तीन प्रकारच्या अनुष्टुभ साधकास होईल. (क) सीता =

विद्यामाया आपले कार्य करण्यास स्वतंत्र नाही. ती रामानुगामिनी होऊनच शिवविरंचिना मोहते व विश्वाचे उत्पत्तिस्थितिलय करते. (३/१५/६) म्हणून सीतेच्या नमनाचा श्लोक अनुष्टुभ वृत्ताचाच असणे योग्य ठरते.

श्लोक ६ वा शार्दुलविक्रीडित आहे

रामचंद्रांच्या सिंहासारख्या विशेष क्रीडीताने (क्रिडेने) ब्रह्मादिदेवांसुद्धा अखिल विश्वाला वश करणाऱ्या मायेचा सहज अंत होतो. हे 'यत्पादप्लव एक एव हि भवाम्भोधेःतितीर्षावताम्' या वचनाने स्पष्टच सांगितले आहे. (क) रामकृपा झाली तरच श्रद्धाविश्वास यांची प्राप्ती होते. 'श्रद्धा सात्विक धेनु शोभना। करि हरिकृपें हृदयिं जर सदना' (७/११७/९). (ख) रामकृपा झाली तरच विशुद्ध संत सद्गुरु म्हणून भेटतात -'भेटति संत विशुद्ध तयाला। रामकृपें अवलोकिति ज्याला'(७/६९/७) मग त्या (संतांच्या) सद्गुरुच्या कृपेने किंवा रामकृपेने भक्ति मिळते. पण संतकृपेने भक्ति मिळालेल्या जीवाला हरिमाया मोहित करू शकते आणि रामकृपेने ज्याला भक्ति मिळाली त्याला हरिमाया सुद्धा त्रास देऊ शकत नाही. (ग) 'श्रुति गीता रघुनाथ भक्ति ते। रामकृपे कुणि एका मिळते '(७/१२६/८) सिंह आपल्या नुस्त्या गर्जनेने मोठमोठ्या मत्त हत्तींच्या कळपांना दशदिशांस पळवून लावतो; तसे राम आपल्या विशेष कृपेने भक्तांच्या भववारणाचे विदारण करतात. 'भववारणदारणसिंह प्रभो' (६/१११/१). 'कामकोपमदगजः पंचानन। वसां निरंतर जनमन कानन' (६/१११/१). अशा अद्भुत रामप्रतापाचे दिग्ददर्शन करण्यासाठी शार्दूलविक्रीडित वृत्त वापरले आहे.

सातवा श्लोक वसंततिलका आहे.

पहिल्या श्लोकात वर्णिलेले श्रीरामसीतास्वरूप समजून त्याच्या प्राप्तीसाठी विश्वासाश्रित सात्त्विक श्रद्धा हरिशरणागतीने यथोक्त मार्गाने संपादन करून, जो योग्य सद्गुरुचा आश्रित बनेल व सेवक होईल; गुरुमुखाने रामनाममंत्र मिळवून त्यात रमेल व सद्गुरुमुखाने व संतमुखाने हरिकथा श्रवण करिल व सीतारामचरणांची नवविधा साधन भक्ति करून श्रीगुरुकृपेने व श्रीहरिकृपेने निर्मोह होऊन ज्यास रामप्रेमभक्ति मिळते त्यालाच स्वान्तःसुख मिळते, तोच

परमविश्राम पावतो. असा होऊन जो 'नानापुराण-निगमागमसंमत रघुनाथकथा करतो ती इतरांस वसंततिलक होऊ शकते.

वसंतऋतूत वसंत पूजा करतात. तेव्हा कर्पूर कंकोळादिमिश्रित चंदन अंगाला लावतात व कपाळावर त्या चंदनाचा तिलक लावतात. त्या मुळे शीतलता उत्पन्न होऊन ताप, उन्हाळ्याचा त्रास नाहीसा होतो व अंतरांत सुख होते. तशीच अशा रामभक्ताने निगमागमसंतसंमत केलेली रामकथा वसंत तिलकाप्रमाणे मस्तकावर धारण करण्यास योग्य, वसंततिलकासारखी तापनिवारक व विशेषतः स्वान्तसुखदायक होते.

श्रीगोस्वामी प्रथम या सर्व पायऱ्या आक्रमित गेले व परमविश्राम पावले आणि नंतरच त्यांनी नानापुराणानिगमागमसंमत व मुख्यतः शिवरामायणानुसारी अशी स्वान्तःसुखद श्रीरघुनाथकथा लिहिली हे मानसांतील वचनांनीच सिद्ध झालेले आहे. मानसोपलब्ध श्रीतुलसीदास चरित्र हे प्रकरण प्रस्तावनेत पाहावे. या प्रमाणे येथे वसंततिलका हे श्रीरघुनाथकथेचे विशेषण आहे. वसंतपूजेत आरंभी चंदनाचा तिलक लावतात, काही तरी शीतल पेय देतात व पुष्पहार (पुष्पसह) त्या ब्राह्मणांच्या गळ्यात घालून शेवटी दक्षणा देतात. त्याप्रमाणेच आरंभी ही कथा वसंततिलका आहे, लंकाकाण्डारंभी व उत्तरकाण्डारंभी स्रग्धरा झाली आहे. मध्ये किष्किंधाकाण्डारंभी मंगलाचरणातच 'श्रीरामनामामृतं' तिला पिण्यास दिले आहे; तेव्हा शेवटी ब्राह्मण जसा आशीर्वाद देतात त्याप्रमाणे आशीर्वाद संस्कृतातच दिला आहे की 'श्रीरामचरित्रमानसामिदं भक्त्यावगाहन्ति ये। ते संसार पतंग घोर किरणैर्दहान्ति नो मानवाः' कशी मजा आहे!

येणे प्रमाणे बालकाण्डारंभीच्या सात श्लोकांची सहेतुक सापेक्षता मानसाधारेच स्पष्ट झाली.

अरण्यकाण्ड -मंगलाचरणांतील छंद.

दोन श्लोक असून दोन्ही शार्दूलविक्रीडित छंदाचे आहेत.

अरण्यकाण्डातील सर्व लीला दण्डकारण्यासारख्या महाघोर अरण्यातच झाली आहे. तेथे जर शार्दूलविक्रीडित नसेल तर पुरुषांना सुद्धा तेथे जगणेही शक्य नव्हते. त्या अरण्याची थोडीशी कल्पना २/६२/४० पासून २/६३/३

पर्यंतच्या वर्णनात दिली आहे. 'डरति धीर गहना स्मरतां मनि'। (२/६३/४) धैर्यवान पुरुषांना सुद्धा त्या अरण्याच्या नुसत्या आठवणीने भीति वाटत असे. 'निशिचर करि वरूथ मृगराज.'। (३/११/६) असे रामचंद्रास म्हटले आहे. 'मृगराज की प्रभु निरखति गजराज यूथां पाहुनी' (१८ छंद) 'अतुलबलि नरकेसरि उभयहि' (३७/१) रामलक्ष्मण हे दोघे अतुलबली नरसिंह दंडकारण्यात निर्भयपणे संचार करीत होते. 'क्षत्रिय अम्हिं मृगया वनिं करतो। तुमच्या सम खलमृगां धुंडतो। (३/१९/९) असा निरोप खरदूषणांच्या सचिवांबरोबर त्यांना पाठविला आहे. हंसी, चंपकमाला, मालिनी, स्रग्धरा, वसंततिलका, मंदाक्रांता या सगळ्या कोमल सौम्य स्त्रियांचा दंडकारण्यात निभाव कसा लागणार? नको नको म्हणत असता एक हंसी गेली दंडकारण्यात तर तिला रावणाने कपटाने चोरून नेली ! जिथे गजवाजी प्रवेश होणे सुद्धा फार कठीण तेथे रथ तरी कसा जाणार व मग रथोद्धता (रथ-उद्हता)कुठली असणार? रामराज्यातील अयोध्येतच रथोद्धता योग्य !

सूचना - अरण्य व किष्किंधा काण्डात शार्दूलविक्रीडित का याचे विशेष कारण लंकाकाण्ड श्लोक वर्णनात पूर्वीच दिले आहे.

किष्किंधाकाण्ड मंगलाचरणांत २ शार्दूलविक्रीडितच.

किष्किंधाकाण्ड स्वतंत्र असले तरी तो देश दण्डकारण्याचाच एक भाग होता. पर्वताकार वानरांची-माकडांची तेथे वस्ती होती; त्यामुळे परिस्थिती अरण्यकाण्डासाराखीच होती. रावणाला खाकेत ठेवून चतु:समुद्रांची प्रदक्षिणा रोज करणारा वाली तेथे राजा होता; व तो रावणाचा मित्र होता. पण रावणासारखा शापदग्ध, पापहत, व जिवंत शवासमान नव्हता. विश्वात अपराजित होता. यामुळे लक्ष्मण व राम यांना तेथे शार्दूलविक्रीडित करावेच लागले; म्हणून दोन्ही श्लोक शार्दूलविक्रीडित छंदाचे असणे योग्य ठरते.

हे दोन श्लोक उलट्या व सुलट्या (मरा, राम) रामनामाचा प्रभाव वर्णन करणारे आहेत. 'रामनाम नरकेसरी कनकशिपु कलिकाळ। जापक ते प्रल्हादसे, सुररिपु वधि जनपाल।' (१/२७/०१) रामनाम भगवान नारसिंहासारखे असल्याने त्याचा प्रताप वर्णन करण्यास शार्दूलविक्रीडिता शिवाय दुसरे अधिक ओजस्वी वृत्त प्रचारात नाही. 'पापिहि ज्यांच्या नामा

स्मरती। अति अपार भवसागर तरती' (२९/३) इत्यादी अनेक प्रकारे आरंभापासून उपसंहारापर्यंत रामनाम महिमा या काण्डात वारंवार वर्णिला आहे. हे काण्डच रामनामपर कसे आहे हे त्या काण्डाच्या उपक्रमाच्या टीकेत, वैशिष्ट्यात, उपसंहारात व तेथील परिशिष्टात दाखविले आहे.

सुंदरकाण्ड-मंगलाचरण श्लोक १ला शार्दूलविक्रीडित आहे.

'शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं' या पहिल्या श्लोकात रघुवरास वंदन केले असले तरी या काण्डाच्या आरंभापासून पूर्वार्धापर्यंत हनुमंताचे चरित्र आहे. ते सर्व सिंहाच्या विशेष क्रीडेसारखे नाही, असे कोणीच म्हणणार नाही.

सुरसाविजय, सागरलंघन, सिंहिकावध, त्रिकूटावर निर्भयपणे प्रवेश, लंकादेवीविजय, लंकाप्रवेश, रावणाच्या वाड्यात प्रवेश, बिभीषणभेट, अशोकवन प्रवेश, सीताभेट, अशोकवन-विध्वंस, अक्षकुमारादि लक्षावधि राक्षसांचा वध, निःशंकपणे रावणाच्या दरबारात प्रवेश, रावणाला उपदेश, लंकादहन व पुन्हा सागरलंघन ही सर्व कार्ये हनुमंताने इतकी सहज लीलेने, फक्त पाचच दिवसात (मार्गशीर्ष शुद्ध एकादशीपासून पौर्णिमा) केली की हनुमानाचा बलवीर्य पराक्रम सिंहाच्या सहजलीलेसारखाच ठरतो. त्याच्यावर ब्रह्मास्त्र व नागपाश यांचा सुद्धा काही परिणाम झाला नाही. या पराक्रमाचे यथार्थ निदर्शन करणारे सार्थ नाव असणारे दुसरे वृत्त संस्कृत भाषेत आहे पण ते संस्कृत वाङ्मयात सुद्धा प्रचलित नाही. त्याचे नाव सिंहविक्रान्त आहे. त्याच्या प्रत्येक चरणात २७ पेक्षा जास्त अक्षरे असतात. ते वापरले असते तर 'अपरिचित वृत्त' दोष पंडितांनी माथी मारला असता व तो श्लोक पुष्कळास वाचता सुद्धा आला नसता.

दुसरा श्लोक वसंततिलका छंदाचा आहे.

'नान्यास्पृहारघुपते' या श्लोकात भक्तीची याचना केली आहे. मोक्षाची सुद्धा इच्छा नसलेल्या कामादिदोषरहित हृदयात निवास करणारी भक्ती मागितली आहे. स्वान्तःसुख देणाऱ्या रघुनाथकथेला वसंततिलका म्हटले. (बा.कां. ७) 'हरिभक्ति सुगम सुखदाती' (७/११९/१०) 'भक्ती स्वतंत्रसुखदानी' आहेच म्हणून अशा भक्तीला व भक्तीच्या याचनेला

वसंततिलका हे विशेषण योग्यच आहे. 'वसंततिलका'चा अर्थ बा.कां. श्लोक ७ च्या वर्णनात स्पष्ट केला आहे.

हा दुसरा श्लोक सुंदरकाण्डातील बिभीषणचरित्र निदर्शक आहे; हे तेथे टीकेत दाखविले आहे. बिभीषणाने अशी भक्तीच मागितली आहे. हनुमन्ताने सुद्धा अशा भक्तीचीच याचना याच काळात केली आहे. 'अतां स्वभक्ति कृपालु पावनी। द्यावि सदा शिव मनभावनी' (४९/७) अशी याचना बिभीषणाने केली आहे; व प्रभुनी 'तथास्तु' म्हणून ती त्याला दिली आहे, व लगेच सागरजलाने श्रीरघुवीराने त्यास लंकाराज्यतिलक (अभिषेक) केला आहे. 'तया राम नृपतिलका करती। अमित सुमन नभिं देव वर्षती' (४९/१०) भक्तिरूपी वसंततिलका हाच चंदनाचा टिळक लावून लंकाराज्यरूपी दक्षिणा दिली आहे. प्रथम बिभीषणाचा दाह नष्ट करून त्याला शीतलता व स्वान्तःसुखशान्ती दिली. 'रावणकोपकृशानु, निजश्वास समीर प्रचंड।। जळत बिभीषण राखिला' आणि मग 'दिधले राज्य अखंड।।४९।। जी संपत् शिव रावणा देति देत दश माथ।। बिभीषणा ती भूति दे, संकोचे रघुनाथ' (४९अ). बिभीषण ब्राह्मणच होता. पुलस्ति मुनींचा नातू. याप्रमाणे वसंततिलका नावाची सहेतुक सापेक्षता सिद्ध झाली.

तिसरा श्लोक मालिनी छंदाचा आहे.

माला जिच्या जवळ आहे ती मालिनी. शिवाय माला हे एक लतेचे नाव आहे व तिची लागवड लंकेत केली जाते म्हणून तिला लंकोपिका हे नावही आहे. 'लंकायाम् उप्यते' - लागवड केली जाते. (अ.व्या. सु.) म्हणून लंका मालिनी आहे. 'मरुत् माला...लंकोपिका इत्यादी' (अमरे २/४/१३३ पहा).

'अतुलित बलधामं' या तिसऱ्या श्लोकात वर्णिलेल्या हनुमंताच्या गुणांची प्रतीती लंकेतच आलेली आहे. लंका = मालिनी. रामदूत कपीच्या गळ्यात घालण्यासाठी लंकादेवी जयमाला हातात घेऊन पुष्कळ दीर्घ काळ त्याची रात्रंदिवस वाट पाहात होती. विरंचिने सांगितलेली खूण पटताच लंकाविजयाची माला तिने त्याला अर्पण केली. 'गत विरंचि मज वदुनि लक्षणा।।६।। विकल होसि तूं कपिच्या मारें। तदा समज हत निशिचर सारे।। -

शिरूनि नगरिं करिजे सब काजा' (५/१) ही आशीर्वादोक्तिरूपी लंकाविजयमालाच तिने हनुमानाला घातली. या लंकादेवीला हनुमन्ताने डाव्या हाताच्या एका ठोशाने जमिनीवर लोळवली व तिने हा आशीर्वाद दिला. मालिनी नाव व त्याचा लंकेशी विशेष संबंध, मालिनी = लंका. तिच्यातच हुमन्ताच्या सात अलौकिक गुणांची माला प्रगट झाली. या श्लोकात अतुलित बलधामं वगैरे सात हनुमंताची विशेषणे आहेत.

लंकाकाण्ड -मंगलाचरण श्लोक, तीन आहेत.

पहिला श्लोक स्रग्धरा वृत्ताचा आहे व त्याविषयी लेखारंभीच लिहिले आहे.

दुसरा श्लोक शार्दूलविक्रीडित आहे.

'शंखेंद्वाभमतीव सुंदरतनुं' हा श्लोक शार्दूलविक्रीडित छंदाचा आहे. यात 'कंदर्पहं शंकरं' वगैरे वर्णन करून शंकरांना वंदन केले आहे. कं=कुत्सित दर्प गर्व हरण करणारे = कंदर्पह, हे शंकरांचे कार्य शिवावतार हनुमान, अंगद, जरठ जांबवान, सुग्रीव, नल नील इत्यादी वानरवीरांनी केले आहे. रावणाचा, इंद्रजिताचा, कुंभकर्णाचा आणि इतर दुष्ट राक्षसांचा दुष्टदर्प हरण केला आहे, व ती त्यांची करणी शार्दूलविक्रीडितासारखी आहे. 'तुमचे बळें रिपु मारले। पावे बिभीषण राज्य, जगतीं सुयश तुमचें पसरलें' (६/१०६ छं.) असे श्रीरघुवीरच म्हणाले आहेत. 'तुमच्या बळें मारिला रावण। राज्यीं स्थापित सखा बिभीषण' (६/११८/४) असे प्रभूंनी पुन्हा म्हटले.

तिसरा श्लोक अनुष्टुभ छंदाचा आहे.

'यो ददाति सतां शम्भुः' या श्लोकात शंकरास 'खलानां दण्डकृत' म्हटले आहे. लंकाकाण्ड सप्तमोक्षपुरींपैकी साहवी अवन्तिका (उज्जयिनी)पुरी आहे. अवन्तीपुरीची देवता महाकाल शिव आहे. महाकाल खलांना दण्ड करण्यासाठीच अवन्तीत प्रगट झाले व लिंगरूपाने राहिले वगैरे कथा रामेश्वरस्थापना टीकेत दिली आहे. अवन्तीश शंकर खलांना दण्ड करणारे असल्यामुळेच रघुवीराने लंकाकाण्डारंभीच रामेश्वर नावाने शंकरांची स्थापना

व पूजा केली; आणि नंतर = अनु, त्यांनी लंकापुरी व्यापली आहे. (अनु स्तुभ्नाति, ष्टुभ - व्यापणे) सेतुबंधन पूर्ण करून सर्व सैन्यासह सुवेल शैल ताब्यात घेऊन तेथे तळ दिला व लंकेला वेढा दिला आहे. म्हणून येथे रघुवीर अनुष्टभ झाले आहेत. लंकेतील मुख्य देवता शिवच आहे.

उत्तरकाण्ड- मंगलाचरण श्लोक, तीन आहेत.

पहिला स्रग्धरा छंद आहे.

जी अयोध्या रामवियोगाने इंद्रवज्रा झाली होती, तीच अयोध्यानाथ श्रीराम सीता व लक्ष्मण यांच्यासह कुशल परत येत आहेत असे ऐकताच स्रग्धरा बनली यात आश्चर्य काय?

श्रीरघुनाथ वनात जाण्यासाठी अयोध्येतून बाहेर गेल्यावर 'दिसे अयोध्या भीषण भारी। काळरात्र की जणुं अंधारी' (२/८३/५ - ८४/४ पहा) 'रामदर्शना सर्व जन करिति नेम उपवास।। त्यागिति भूषण भोगसुख जगवी अवधी आस' (२/३२२) स्रक् चंदन वनितादि भोगांचा लोकांनी म्हणजे अयोध्येने त्याग केला होता, व जी इंद्रवज्राहत झाली होती तीच 'प्रभु येती हे जाणुनि नगरी। होइ सकल सौंदर्य-आगरी' (७/३/९). 'नगर रम्य चौफेर जणुं सुचवी प्रभु येतात.' नंतर ध्वजपताका तोरणे, पुष्पहार, गजमुक्तांच्या रांगोळ्या इत्यादि प्रकारे सर्व अयोध्या सौंदर्याची खाण झाली आहे; लोकानी ही सुंदर वस्त्रेभूषणे, पुष्पहार इत्यादि घातले आहेत. अशी अयोध्या स्रग्धरा झाली; हे स्रग्धरा वृत्ताने सुचवले आहे.

पुढील दोन श्लोक रथोद्धता वृत्ताचे आहेत.

ज्या नगरीच्या रस्त्यात घोडे, रथ, हत्ती इत्यादींचे १४ वर्षे दर्शन होत नव्हते ती नगरी रथांनी उद्धत (उद्+हत) होऊ लागली. रथ हत्ती घोडे यांनी तिचे रस्ते सारखे तुडविले जाऊ लागले. रथांचा खडखडाट, डंक्याचा व इतर वाद्यांचा कडकडाट, हत्तींच्या गर्जना व त्यांच्या घंटांचा घणघणाट, घोड्यांचे खिंकाळणे इत्यादींचा कोलाहल सुरू झाला. सर्व नगरलोक रथादिवाहनांतून नंदिग्रामाकडे त्वरेने, धावपळ करीत श्रीरामदर्शनासाठी चालले आहेत. श्रीरघुनाथाच्या आगमनाच्या दिवशी अयोध्या जी रथोद्धता बनली तशीच

वैशाख वद्य सप्तमीला, दुसऱ्या दिवशी, श्रीरघुनाथाचा नगरप्रवेश व राज्याभिषेक या निमित्ताने रथोद्धता बनली.

या वृत्ताची द्विरुक्ती करून सुचविले आहे की अशीच स्थिती रामराज्यांत पुनःपुन्हा दिसत होती. 'पुरी अयोध्यावासिजन सुख संपदा समाज ।। शेष सहस्र न वदुं शकति जिथे राम नृपराज' (२६).

रामराज्यात सर्व जगातच कोणत्याही प्रकारचे दुःख कोणासही केव्हाही होत नव्हते व सर्व सुख मिळत होते. अशा साम्राज्याची राजधानी रामपुरी अयोध्या सर्वदा रथोद्धता = रथादि वाहनांनी गजबजलेली असेल यांत नवल काय?

याप्रमाणे प्रत्येक काण्डाच्या मंगलाचरणांतील वृत्तें सहेतुक (हेतुपूर्वक) वापरली असून त्यांचा उपयोग त्यांच्या नावांच्या अर्थानुसार अगदी योग्य संदर्भाने कथा प्रसंगानुरूपच केला आहे; व तो किती उद्बोधक आहे हे या विस्तृत लेखात दिसले असेलच. हा असा उपयोग सगळ्या ग्रंथात इतक्या कुशलतेने केलेला पाहून - जाणून मति गुंगच होते.

उपसंहार - श्लोक वृत्ते शार्दुल विक्रिडित आहेत.

प्रत्येक काण्डाच्या मंगलाचरणात संस्कृत श्लोक आहेत; पण काण्डांचा उपसंहार संस्कृत श्लोकांनी केलेला नाही. ग्रंथाचा उपसंहार उत्तरकाण्डाच्या शेवटच्या दोह्यानंतर दोन संस्कृत श्लोकांनी केलेला आहे. ते दोन्ही श्लोक शार्दुल विक्रिडित छंदाचे आहेत.

पहिल्या श्लोकात शंभुविरचित रामचरित मानसाचा प्रभाव वर्णिला आहे. दुर्गम पण रामनामनिरत हे त्याचे वैशिष्ट्य आहे. रामनामाचा प्रभाव नरकेसरी - भगवान नृसिंहासारखा आहे हे किष्किंधाकाण्ड मंगलाचरण श्लोकात दाखविले आहे. रामनाम प्रभावामुळे त्या शंभुकृत रामायणाचा प्रभावही शार्दुलविक्रिडिता सारखाच आहे; पण ते दुर्गम असल्यामुळे व लिखित नसल्यामुळे त्याचा प्रभाव सर्वांच्या उपयोगी पडण्यासारखा नाही; पण त्याच्याच आधारावर त्याच्याच सारखे श्रीरामचरितमानस तुलसीदासांनी केले; त्याचा प्रभाव दुसऱ्या श्लोकात वर्णिला आहे. भवदुःखदाहशमन सहज लीलेने

करून जीवाला कृतकृत्य करणारे ते रामचरित्र आहे. म्हणजेच त्याचा प्रभाव शार्दुलविक्रिडितासारखा आहे. म्हणून हे दोन्ही श्लोक शार्दुलविक्रिडित छंदाचे आहेत. 'दिने दिने यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः' ही व्याख्या श्री रामचरित मानसाविषयी अक्षरशः खरी असल्याचा अनुभव गेली २७-२८ वर्षे सतत येत आहे. जो जो याचे परिशीलन केले जाईल तो तो अनेक जन्मात सुद्धा श्री सद्गुरु -रघुपति-संतकृपेने असेच अनुभव येत राहतील अशी आता अगदी पक्की खात्री वाटत आहे.

लेखारंभी दाखविलेल्या १२ वृत्तांपैकी आठ वृत्तांची सहेतुक सापेक्षता २५ श्लोकांच्या विवरणात येथपर्यंत दाखविली गेली.

आता कथाभागातील चार वृत्तांचा त्या दृष्टीने विचार करावयाचा राहिला.

उपक्रमोपसंहारातील वृत्तांचे विवेचन येथे समाप्त झाले.

कथाभागातील वृत्तांची सहेतुक सापेक्षता.

नगस्वरूपिणी (प्रमाणिका)

हे वृत्त मुख्यतः अरण्यकाण्डात अत्रिकृत स्तुतीचे आहे. यालाच प्रमाणिका हे दुसरे नाव आहे. प्रथम नगस्वरूपिणी या नावाचा विचार करू.

नग - 'नगो महीरुहे शैले भास्करे, पवनाशने' (अमरे.) वृक्ष, पर्वत, सूर्य व सर्प हे नग शब्दाचे चार अर्थ आहेत.

१. तरुपर्वतमय अरण्यातच, अरण्यकाण्डारंभी ही स्तुती आहे; ही एकच गोष्ट नगस्वरूपिणीची सापेक्षता सिद्ध करण्यास पुरेशी आहे. (हिंदी टीकाकारांनी इतकेच महत्त्व दाखविले आहे.) (क) तरु = तरन्ति अनेन, ज्याने तरून जाता येते तो तरु. 'पतंति नो भवार्णवे' 'ते पदं व्रजान्ति' अशी या स्तुतीच्या पठनाची फलश्रुति आहेच. (ख) वृक्ष जसे ऊर्ध्वगामी असतात तशी ती रामपददायिनी आहे. (ग) वृक्ष - वृक्षति - वरतो; किंवा छेदन केला जातो तो वृक्ष. संसृति वृक्षाचे छेदन करणारी ही स्तुति आहे. 'प्रयान्ति ते गति स्वकाम्' हे स्तुतीत सांगितले आहेच. (घ) महीरुहाला शाखी असेही म्हणतात. 'शाखी स्यात् पादपे वेदे' ही स्तुती वेदस्वरूपिणी आहे असे तिच्या अर्थाकडे पाहिल्यावर

कोण म्हणणार नाही? वेद जसे प्रमाणभूत आहेत तशी ती प्रमाणिका आहे. विशुद्धबोधविग्रह = विशुद्ध ज्ञानस्वरुपिणी आहेच. याप्रमाणे महीरुह शब्दाच्या इतर पर्यायांची सार्थकता पण सिद्ध करता येईल; तथापि 'थोडक्यात उमजे सुज्ञानां' म्हणून विस्तार नको. या स्तुतीत 'पादप' = वृक्ष आहेच. 'स्वभक्त कल्पपादपं'

२. नग = शैल, पर्वत; स्तुतीत मंदर पर्वत आहेच. 'भवाम्बुनाथ-मंदरं' पर्वत जसे विशाल, गंभीर व अनेक रत्ने गुप्तपणे धारण करणारे असतात तशी ही स्तुती अत्यंत गंभीर अर्थानी भरलेली, अनेक विशाल अर्थ असलेली व अनेक भावरत्ने गुप्त असलेली आहे हे या स्तुतीच्या गूढार्थ चंद्रिकेत अवलोकन केल्याने सहज कळेल.

३. नग = भास्कर, आदित्य. हे बारा आहेत; तसे या स्तुतीत बारा श्लोक आहेत. बारा श्लोकांनी युक्त असणारी अशी फक्त हीच स्तुती मानसात आहे. ब्रह्मदेवकृत स्तुतीत लंका काण्डात ११च श्लोक, इंद्रकृत स्तुतीत आठच व शिवकृत स्तुतीत १०+१=११च आहेत. (क) भास्कर = सूर्य = दिनेश, 'दिनेश-वंश-मंडनं' असा उल्लेख स्तुतीत आहेच. ही भानुकुलभानुची - भास्करवंशभूषणाची (मंडनाची) स्तुति भास्करस्वरुपिणी आहे. 'विशुद्धबोधविग्रहं' असे प्रभूचे स्वरूप हिच्यात सांगितले आहे. विशुद्ध बोध भास्कर असून अज्ञानतिमिराचा नाश करतो. 'यत्ज्ञानार्के भवनिशि नासत'- ज्ञानाला सूर्य म्हटले आहेच.

४. नगः पवनाशन - सर्प. ही स्तुति आश्लेषा नक्षत्र आहे. आश्लेषा नक्षत्र सर्पदेवात्मक असल्यामुळेच त्यास सार्प असे नाव आहे. हिच्यात भवसागरमंथनाचा उल्लेख असल्याने वासुकी सर्प गृहीत धरावा लागतोच.

दुसरे नाव प्रमाणिका आहे.

'प्रमाणिका तिला म्हणा। जरालगा असे गणा। पदांत आठ अक्षरें। वदाल सत्य तें खरें' (वृत्तदर्पण) वदाल सत्य तें खरे करणारी ती प्रमाणिका. या स्तुतीत वर्णिलेली प्रत्येक गोष्ट प्रमाणिका आहे; किंवा रघुनाथानें सत्य करून दाखवली आहे.

१. 'नमामि भक्तवत्सलं। कृपालुशील कोमलं' अत्रि ऋषींनी न बोलावता त्यांच्या आश्रमात जाऊन त्यास नमन करून हे वचन प्रमाण केले आहे. २. 'अकामिनां स्वधामदं' या नंतरच शरभंग, विराध, कबंध, जटायु इत्यादींना रामधाम दिले आहे. ३. 'निकाम शामसुंदरं, प्रफुल्ल कंजलोचनं प्रलंबबाहू' यांच्या अलौकिक सौंदर्याचा विक्रम - प्रभाव असा आहे की शरभंग आणि अगस्त्याश्रमातील मुनि राममुखचंद्राकडे चकोरांप्रमाणे बघतच राहिले आहेत; शूर्पणखा नरभक्षक भयानक राक्षसी यांच्या रूपावर काममोहित झाली आहे; आणि खरदूषणांसारखे वज्रहृदयी राक्षस निकाम शामसुंदरास पाहताच वैर विसरून, युद्धाची इच्छा नाहिशी होऊन 'अनुपम पुरुष वधा लायक नही' असे म्हणाले आहेत. ४. मदादि दोषमोचनं - परशुरामाचे मदादि सर्वदोष पूर्वीच नष्ट केले आहेत. शूर्पणखेचा रूपमद व काममद; खरदूषणांचा वीर्यशौर्यधैर्यादीचा मद याच काण्डात आणि रावणाचा सत्तामद, ऐश्वर्यमद, इत्यादी सर्व मदांचा विनाश केला आहे. ५. 'प्रभोऽप्रमेय वैभवं' जनकराजांच्या धनुर्याग मंडपात जगातील सर्व मानवदेवदानवादि वीर-महावीरांच्या देखत सर्वांच्या पेक्षा श्रेष्ठ प्रभुत्व व प्रतापवैभव प्रमाणित झाले आहे. ६. 'निषंगचापसायकं धरं त्रिलोकनायकं' भव धनुष्य भंगले. 'विश्वविजययश जानकी' मिळवून प्रमाणित केले आहे. तसेच पुढे खरदूषणमारीच रावणकुंभकर्णादि त्रैलोक्य विजयी राक्षसांच्या वधाने प्रमाणभूत ठरले आहे. ७. 'दिनेशवंशमंडनं,महेशचापखंडनं' हे जनकसभेत पूर्वीच सिद्ध झाले आहे. ८. 'मुनींद्रसंतरंजनं-सुरारिवृंदभंजनं' हे याच काण्डात 'सकल मुनींना सुख दिलें तदाश्रमी जाऊन' (दो. ९)'तिथें राम जैं निवास करती। सुखी होति मुनि भया विसरती' (३/१४/१) खरदूषणादिकांच्या वधाने 'सुरारिवृंदभंजनं' याच कांडात खरे झाले आहे. पूर्वी ताटका सुबाहू वगैरेंच्या वधाने सत्य ठरले होतेच. ९. 'मनोजवैरिवंदितं अजादिदेव सेवितं' हे सतीला दाखविलेल्या विश्वरूपात पूर्वीच खरे करून दाखविले आहे. १०. विशुद्ध बोध विग्रहं. 'चिदानंदमय अपली काया' असे वाल्मीकींनी यापूर्वीच म्हटले आहे. ११. समस्तदूषणावहं - खरदूषण मारीचादिकांचे सर्व दोष नष्ट करून त्यांस मुक्ति दिली आहे, याच काण्डांत. निषादराज, तेथील तो नावाडी, शबरी भिल्लीण, इत्यादि अस्पृश्यांचे सर्व दोष दूर केले आहेत. १२. नमामि इंदिरापतिं - अत्रि ऋषि स्वतः वंदन

करीत आहेतच. परशुरामासारख्या क्षत्रिय कुलद्रोही विप्रोत्तमानेही नमन केले आहे. १३. सुखाकरं = सुखाची खाण. ज्याना युद्धात ठार मारले अशा घोर महापापी विप्रद्रोही हजारो, लाखो राक्षसांना 'मोक्षसकलसुखखाण' ज्यानी दिला ते स्वतः सुखखाण आहेत यात नवल काय? या प्रमाणे ही तेरा वचने क्रमाने घेऊन सिद्ध झाले की ही सर्व सत्य ठरली आहेत. याच पद्धतीने शेषवचनांची सत्यता वाचक सिद्ध करू शकतील. विस्तारभयास्तव येथे इतकीच पुरेत.

उत्तरकाण्ड दो. १२२ मधे १ श्लोक प्रमाणिका वृत्ताचा आहे.

'विनिश्चितं वदामि ते। न अन्यथा वचांसि मे॥ हरिं नरा भजन्ति येऽति दुस्तरं तरंति ते।' यात 'न अन्यथा वचांसि मे' - माझे म्हणणे असत्य नाही - प्रमाणभूत आहे, असे आधी स्पष्टच सांगितले आहे. हरिभजनाने भवसागर तरून गेल्याची अनेक उदाहरणें मानसात आहेत. प्रमाणभूत सिद्धान्त सांगण्यास शेवटी प्रमाणिका वृत्त वापरले. यांत नग शब्दाचे चारी अर्थ अध्याहृत आहेत. वृक्ष ऊर्ध्वगति सूचक आहे. हरिभजनाने उच्च गति मिळतेच. शैल = पर्वत; हा सिद्धान्त पर्वतासारखा अढळ आहे. हरिभक्ति ज्ञानभास्कराने अज्ञानतिमिराचा नाश करते; पवनाशन - पवन+अशन = याने योग सुचविला जातो. हरिभक्तिने देव व भक्त यांचा योग होतोच.

तोमरवृत्त - सार्थकता

हे वृत्त अरण्य दो. २०; लंका. दो. १०९ व ११३ यांमधे वापरले आहे.

तोमर हे एक आयुध आहे. युद्धात त्याचा उपयोग शत्रूवर फेकून प्रहार करण्यात होतो. अरण्य दो. २० व लंका दो. १०९ मधे घनघोर युद्धाच्या वर्णनात हे वापरले आहे.

१. अरण्यकाण्डातील तोमर छंदाच्या १३ ओळीत राम आणि खरसैन्‍ यांनी एकमेकांवर अस्त्रांचा वर्षाव केला आहे; त्यात स्वसंरक्षणासाठी शस्त्रास्त्रांचा उपयोग केल्याचे वर्णन नाही; कारण की तोमर हे संरक्षक आयुध नसून प्रहारकच आहे. म्हणून तोमर छंदाचा केलेला उपयोग त्या नावाची सार्थकता करणाराच आहे.

२. लंका. १०१ मधे १६ ओळी तोमरवृत्ताच्या आहेत; त्यांत रावणाने नानाविध भूत-पिशाचादि तोमरच जणू वानर सैन्यात फेकले आहेत व त्याचा परिणाम वानरसेनेवर काय झाला हेच त्या तोमर छंदात प्रथम दाखविले आहे. नंतर वाळूचा वगैरे वर्षाव आणि हजारो हनुमान प्रगट होऊन त्यांनी श्रीरघुवीरास घेरणे वगैरे वर्णन आहे; पण त्यांत वानर सैनिक किंवा राम यांनी स्वसंरक्षक आयुधांचा उपयोग केल्याचे वर्णन नाही.

संरक्षक युद्धाचे वर्णन करण्याची वेळ येताच दोन्ही ठिकाणी (अरण्य २० व लंका १०११) छंद बदलला आहे. तोमर संरक्षक नाही म्हणून संरक्षक युद्धवर्णनात तोमर छंद नाही. याप्रमाणे अन्वयव्यतिरेकाने तोमर वृत्ताच्या नावाची सार्थकता सिद्ध झाली.

३. तिसरे स्थान लंका १२३ मधे इंद्रकृत स्तुतीत आहे. पहिल्या सोळा ओळी तोमराच्या आहेत. रघुवीराने युद्धात केलेल्या राक्षस संहाराचे प्रथम वर्णन आहे; नंतर इंद्राच्या अतिअभिमानाचा संहार झाल्याचे (रघुवीराने केल्याचे) वर्णन आहे. आणि शेवटी, सर्व दोषांवर व भवदुःखांवर संहारक प्रहार भक्तिरूपी तोमराने करण्याविषयी म्हणजे त्यांचा सहार करणारी भक्ती देण्याविषयी प्रार्थना केली आहे. पण रामचंद्रास नमन करण्याच्या वर्णनाची वेळ येताच छंद बदलला आहे, तोमर नाही. केवळ प्रहारक आयुधाचे कार्य दाखवले आहे म्हणून तोमर नावाची सार्थकता करून दाखवली आहे, हे सिद्ध झाले.

तोटक छंदाची सार्थकता

याचा उपयोग एकंदर चार ठिकाणी केला आहे. दोन ठिकाणी रामस्तुतीत व दोन ठिकाणी कलिप्रभाव वर्णनात हा छंद वापरला आहे.

१. लंका. दो. १११ मध्ये ब्रह्मदेवकृत स्तुतीत याचे ११ श्लोक आहेत व उत्तरकांड दो. १४ मध्ये शिवकृत स्तुतीत याचे १० श्लोक आहेत. मात्र संस्कृतात नसून स्वभाषेत आहेत. २. उत्तरकाण्ड दो. १०९ मध्ये पाच व दो. १०९ मध्ये ५ श्लोक कलिवर्णनात आहेत. हे दोन प्रकार तोटक शब्दाच्या दोन भिन्न अर्थानुसार आहेत.

तोटक = तोडणारा, छेदणारा, कापणारा. तुट = तोडणे, कापणे; आणि कलह, तंटा, विरोध करणे; असे दोन अर्थ आहेत. तुट हा साहव्या गणाचा

परस्मैपदी धातू आहे. तुष, पुष, मुच यांपासून जसे तोषक, पोषक, मोचक हे शब्द झाले तसाच तुट पासून तोटक शब्द झाला. तोडणारा, कापणारा, छेदणारा हा एक अर्थ आणि कलह करणारा/री - हा दुसरा अर्थ आहे. हे दोन अर्थ क्रमश: वरील दोन प्रकारात वापरले आहेत.

ब्रह्मस्तुतीत व शिवस्तुतीत तोटक छंदांत रामचंद्रास काय म्हटले आहे पहा -

१. भववारणदारणसिंहप्रभो! (१) 'भवतारण कारणकार्यपरं' (६) 'मति माझि विभेदकरी हरणें' (१०) भवरूपी हत्तीला तोडणारा, कापणारा, छेदणारा. भवसागरातून तारणारा म्हणजेच भवछेदन करणारा. जीव आणि ब्रह्म (राम) यांची ताटातूट, वियोग करणारी जी भेदबुद्धि (विभेद करी मति) तिचा नाश करणारे. भवरूपी हत्ती जीव आणि ब्रह्मराम यांच्या मधे येऊन त्यांची ताडातोड केली गेली आहे. भवरूपीसागर जीव आणि ब्रह्म यांच्या मधे येऊन त्यांना विभक्त केले आहे. भेद उत्पन्न करणारी, जीवाला ब्रह्मापासून विभक्त करणारी हत्तीणच जणू भेदबुद्धि आहे. भवहत्तीला, भवसागराला, व भेदबुद्धि हत्तिणीला तोडून, छेदून नष्ट करून टाकणारा सिंह श्रीरघुनाथ आहेत. या प्रमाणे प्रभु रघुवीर भवतोटक आहेत. 'भववारणदारणसिंह' याने हेच सांगितले. शेवटी मागणे मागितले कीं 'दे वरदानमिदं चरणांबुज प्रेमसदा शुभदं' चरणांबुज प्रेम = दास्यभावाने प्रेमभक्ती मागितली, कारण की तीच भववारणदारण करणारी आहे. म्हणजे रामभक्ती भवतोटक आहे, ती देणारे रघुपती भवतोटक आहेत.

या प्रमाणे ब्रह्मदेवकृत स्तुतीत तोटक छंदाच्या नावाची पूर्ण सार्थकता झाली आहे.

२. शिवस्तुतीत - (क) 'जय राम रमारमणं शमनं। भवताप भयाकुल पाहि जनं।।' प्रथम 'भवतापशमनं' म्हटले. (ख) 'मदमोहमहा ममता रजनी।तमपुंज दिवाकर' भवतापाचे छेदन करणारे, मदमोहमहा ममता रजनीचा संहार करणारे आहेत, त्या रात्रीतील तमाचे छेदन करणारे दिवाकर राम आहेत. म्हणजेच राम भवतापतोटक आहेत. (ग) 'भवसिंधुं अगाधहि ते पडती। पदपंकजि प्रेम न जे करती' प्रभुपदपंकज प्रेम भवसिंधुतोटक आहे. (घ) 'तव नाम जपादि नमामि हरि। भवरोग महामद मान अरि' भवरोगाचा विनाश

करणारे महाअगद (औषध) रामनाम आहे. म्हणजेच रामनाम भवरोगतोटक आहे. नमनभक्ति भवरोगतोटक आहे. (ङ) 'अवलंब कथा तुमच्याहि जयां। प्रिय सन्त अनंत सदैव तयां' संतमुखाने रामकथाश्रवण भवतोटक आहे. (च) 'रघुनंद निकंदय द्वंद्वघनं' हा उपसंहार आहे. येथेही द्वंद्वघन = भव, निकंदन करणारे रघुनंदनच आहेत, म्हणूनही भवतोटक आहेत. याप्रमाणे तोटक वृत्ताच्या नावाची सार्थकता या स्तुतीतही अगदी स्पष्ट दिसते.

३. उत्तरकाण्ड दो. १०१ व १०२ यांत तोटक छंदच आहे. तेथे तोटक म्हणजे कलह करणारा हा मुख्य अर्थ आहे. या दहा छंदात कलिस्वभाव-प्रभाव वर्णन आहे. कलि, कलह, युद्ध, इत्यादि. 'युद्धंआयोधनं ... समरानीक रणाः = कलह-विग्रहौ ॥ कलिसंस्फौटसंयुगाः' (अमरे) युद्ध, आयोधन, समर, अनीक, रण, कलह, विग्रह, कलि, संस्फोट, संयुग, इत्यादि २१ शब्द समानार्थक आहेत.तोटक = कलह करणारा - हा छंद आहे; आणि युद्धरूप जो कलि, कलह त्याच्या वर्णनात तोटक वापरला. यापेक्षा तोटक नावाची सार्थकता ती कोणती? 'अभिमान विरोध अकारणही' 'श्वशुरालय गोड गमे हि यदा। रिपुरूप कुटुंब ठरेहि तदा' कलि = मारामारी, भांडण, तंटा, विरोध, वैर, शत्रुत्व इत्यादि अर्थ आहेतच. कलियुगात यांचेच प्राधान्य आहे. म्हणून कलि हा तोटक कलह करणारा आहे; हे थोडक्यात पण स्पष्टपणे या छंदाने सुचविले आहे.

अवशिष्ट वृत्त भुजंगप्रयात आहे.

उत्तरकाण्ड दो. १०८ मधे विप्राने केलेल्या शिवस्तुतीचे वृत्त भुजंगप्रयात आहे. त्या विप्राच्या अभिमानी, दांभिक, गुरुद्रोही, विप्रद्रोही, विष्णुद्रोही शूद्र शिष्याला- महाकाल महेशानी शाप दिला की 'अजगर इव पापी बसलासी। खल! अधमयमति भुजंग होसी ॥ (हिंदीत 'सर्प' आहे) महा बिटप कोटरांत जाउनि। वस अधमाधम अघगति पाउनि' (७।१०७।७०८) खला! तू भुजंग (सर्प) हो. आणि महावृक्षाच्या ढोलीत जा, (भुजंग प्रयात) = भुजंग होऊन जा, असा शाप दिला. त्या शापतापातून शिष्यास मुक्त करण्याच्या हेतूने, त्याच्या भुजंगपणास दूर जाण्यास लावण्याच्या हेतूने, शंकरास प्रसन्न करण्यासाठी विप्राने जी स्तुती केली ती भुजंगप्रयात छंदात केली. भुजंग-

प्रयात, अशा अर्थाचा शाप दिला गेला म्हणून भुजंगप्रयात वृत्त वापरून त्याला शापदु:खापासून सोडविण्याच्या हेतूने स्तुती केली. भुजंग होऊन, जाऊन राहण्याचा संबंध जिथे आला तेथे हंस, विद्युन्माला, चंपकमाला, मालिनी, स्रग्धरा, वसंततिलका इत्यादि दुसऱ्या कोणत्याही वृत्तापेक्षा भुजंगप्रयात वृत्त वापरणेच अत्यंत समयोचित आहे. या स्तुतीनें त्या शूद्राचे भुजंगत्व असून नसल्यासारखेच करून ठेवले, हे पुढे स्पष्ट झाले आहे. 'नमामीशमीशान निर्वाणरूपं' या रुद्राष्टकानें महाकालमहेश प्रसन्न झाले; व 'वर माग' असे त्या विप्राला सांगितले. विप्राने शिवभक्ति मागून आणखी एक वर मागितला आणि शूद्रावर शापानुग्रह व्हावा अशी प्रार्थना केली. तेव्हा त्या भुजंगप्रयात स्तुतीने प्रसन्न झालेल्या शंकरांनी त्या शूद्रावर अपार कृपावृष्टि केली. त्यामुळे त्याला भुजंग होण्याचे व जन्ममरणाचे दु:ख भुजंग होऊन सुद्धा झाले नाही. अशा प्रकारे भुजंगप्रयात वृत्ताच्या नामाची पूर्ण सार्थकता झाली.

१ अनुष्टुभ श्लोक दो. ११८ मधे आहे.

या रुद्राष्टकाची फलश्रुति अनुष्टुभ छंदाने सांगितली आहे. 'रुद्राष्टकमिदं प्रोक्तं विप्रेण हरतोषये। ये पठन्ति नरा भक्त्या तेषां शम्भु: प्रसीदति', यात हेच सांगितले आहे की जो कोणी प्रेमाने या स्तुतीचा अनुगामी, सेवक, बनेल तो शंकरास वश करील. (अनु. स्तोभते). म्हणजेच अनुष्टुभ नावाची सार्थकता सिद्ध झाली.

येणे प्रमाणे श्रीरामचरितमानसात वापरलेल्या संस्कृत भाषेतील बारा प्रकारच्या छंदांची सहेतुक सापेक्षता यथामती सिद्ध केली गेली.

मुख्य काव्य चौपाई, दोहा, सोरठा, व छंद या हिंदी वृत्तात आहे.

बुद्धिप्रेरक रघुकुलमणिजय। तुलसी कविकुलचूडामणिजय।।
परमकृपाकर सद्गुरुवरजय। गंगादास कृपाकर जयजय।।

- तेरावे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट १४

राम लक्ष्मण, भरत शत्रुघ्न

जानेवारी १९५५च्या मानसमणिच्या अंकात हे प्रसिद्ध झाले होते की, राम आदि बन्धु चतुष्टयांच्या नांवाच्या वर्णाक्षरांवरून त्यांचे स्वभाव व चरित्र कसे प्रगट होतो ते मानस-प्रेमीनीं लिहून पाठवावे. मराठी वर्तमान पत्रांतूनही असे जाहीर प्रगटन आले होते. दिलेल्या वेळेच्या अवधित केवळ एक हिंदी व एक मराठी लेख आणि त्यानंतरही तसेच १ मराठी व १ हिंदी लेख आला होता, परंतु वर्णाक्षरांनुसार विचार कशातच नव्हते. रामायणातीलच इकड-तिकडच्या गोष्टी त्यात होत्या, त्या सर्वजण जाणतातच.

या दीनदासाने मा.गू.चं.मध्ये नोव्हेंबर १९५४ मध्ये या विषयावर संक्षिप्त लेखन केले होते. तेव्हापासून आज अखेर या विषयावर विशेष संशोधन करण्यास वेळच मिळाला नाही. आता मा.गू. चं आणि भूमिका (मराठी प्रस्तावना) लेखन समाप्तीनंतर इ.स. १९५७ मध्ये या विषयावर लिहिणे, सविस्तर लिहिणे क्रमप्राप्त कर्तव्य समजून खालीलप्रमाणे रहस्ये प्रगट करीत आहे.

१. राम

'राम' याचा विशेष अर्थ नामवंदनेत मानसात आहेच, हे सर्व मानसाभ्यासी जाणतात. 'वन्दे नाम राम रघुवरचे' हेतु कृशानु भानु हिमकरचे' र+अ+म=कृशानु+भानु+हिमकर=राम. 'र' अग्नि बीज आहे, जे 'तापवि अनल अकाम बनवुनी' यामध्ये निष्काम धर्माचरण=परम धर्मचरणासच अनल=अग्नि म्हटले आहे. वैराग्य देखील अग्नीच आहे. तसेच अ=भानु=प्रकाशमान सूर्य, ज्ञान आहे. 'यज्ज्ञानार्के भवानिशि नासत' आणि 'रामस्नेह सुधाकर सार', सुधाकर सार=अमृत=रामभक्तीत आहे. अशा प्रकारे 'राम' नामाने धर्म, वैराग्य, ज्ञान, आणि भक्ती यांची प्राप्ती होते. जे नाम करते, तेच नामीही करतो 'नाम चिन्तामणिः कृष्णः चैतन्यरस-विग्रहः नित्यः शुद्धो बुद्धमुक्तोऽ भिन्नत्वान्नाम नामिनो ।।' (वि.पु.)

भगवंताचे नाम आणि भगवान (नामी) यात अभेद आहे. मानसात

रघुपतींनी वैराग्य, ज्ञान, भक्ती इ. सर्व काही दिलेले आहे. 'अविरल भक्ति विरति विज्ञान। होशि सकल-गुण-बोध निधान' ३/११/२९ आणखीही पुष्कळ उदाहरणे आहेत. अगस्ती, भुशुंडी इत्यादिंना सर्व काही दिले आणि म्हटले 'जना अदेय नसे मम काही'

'राम' यामध्ये जशी दोन अक्षरे आहेत, तसे रामांचे चरित्र ही दोन प्रकारचे आहे. 'प्रगट जिधुनि रघुपति शशि चारू। विश्वसुखद खलकमलतुषारू।' (१/१६/५) एक विश्व सुखद चरित्र आणि दुसरे खल-संहारक चरित्र आहे. रा=र+अ, अग्निदाहक आणि सूर्य=आ, खलांना अतिशय तापदायक आहेत. पण भक्तांचे मात्र पाप-ताप-दैन्य, दोष, दुःख, दुराशा इ.चे दाहक आहेत. 'निशिचर निकर पतंग सम रघुवर बाण कृशानु। जननी हृदयी धीर धर दग्ध निशाचर जाण। जय रघुवंश वनज वन भानू। गहन दनुज कुल दहन कृशानु।' दोनच प्रकार आहेत.

'म्लान कुमुदं, अरूणोदयीं उडुगण तेजें क्षीण' १/२३८ 'तव आगमना ऐकुनी जसे नृपती बलहीना ॥' (१/२३७ छं)
रघुराया ! निज-उदय मिषें रवि। प्रभू-प्रताप नृपांनां दाखवि॥ १/२३९/५
भवत्सुतां पुसणे किं अवश्यक। पुरुषसिंह ते जगत्प्रकाशक॥१/२९२/१
ज्यांच्या यशा प्रतापा पुढतीं। शशी मलीन रवि शीतल गमती ॥१/२९२/२

आणि उत्तर ३१/१ ते दो.३३ पहा. जेव्हा रामप्रताप दिनपति .... जे प्रथम पावती नाश ॥ तेथेही रामप्रताप दिनेश (भानु) याचाच प्रभाव दाखवला आहे. 'राम' मध्ये अग्नि, भानु आणि चंद्रमा यांचा जो स्वभाव व चरित्र आहे तस्सेच राम-चरित्र व राम-स्वभावही आहे. सूर्याचे १२ गुण, चंद्राचे १६ गुण, अग्निचे गुण रामात आहेत तसे नामातही -(मा.गू.चंआणि प्रस्तावना पहा) आता अवतार रहस्य ही पहा- राम=र+अ+आ+म्+अ. अ=विष्णू आणि अकारो वासुदेवो स्यात्! वासुदेव=हरि=परमात्मा. ज्यांच्या अंशांपासून ब्रह्मा, विष्णू, महेश होतात. विष्णू किंवा वासुदेव=परमात्मा ब्रह्मच रामावतार घेतात हे सिद्ध झालेले आहे.

हेतु पहा- १) आ= पितामह -वाक्य. जा= ब्रह्माजी आणि त्यांचे वाक्य. = विधि वचन. 'प्रभु करुं इच्छिति विधिवाक्साची' १/४९/१/ ब्रह्मदेवाचे वचन सत्य करण्यासाठी अवतार घेतात. २) 'आ' सीमायां अव्ययं च, म्हणून राम अव्यय, अविनाशी आहेत आणि सर्व गुण, प्रताप, ऐश्वर्य, लावण्य, सत्ता, व्यापकता इत्यादिंची सीमा आहेत. 'शोभा-शीव सुभग युग वीर' १/२३३/१ 'जय जय सुरनायक' 'महा स्वतंत्र न कोणि शिरावरि' १/१३७/१/ 'कोण तयाची सीमा भक्षक । ज्यासि रमापति महा सुरक्षक ।'

इत्यादि मानसांत खूप वचनें आहेत. (सूचना-वरील अर्थ एकाक्षर कोष, आणि एकाक्षराभिधानम् (अग्निपुराण) यानुसार आहेत.)

अक्षमाला उपनिषदांत 'अ' पासून 'क्ष' पर्यंतच्या ५० वर्णांच्या न्यास मालेचे मण्यांवर क्रमशः असे म्हटले आहे की, 'अ' पासून 'क्ष' पर्यंतच्या वर्णाचे अर्थ त्या मंत्रांमध्ये आहेत. त्यानुसार पहा- १) अ=मृत्युंजय सर्वव्यापक. श्रीराम काळास जिंकणारे आणि सर्वव्यापकही आहेत. -'राम ब्रह्म व्यापक अविनाशी', 'काल यस्य कोदंड' जो काळ चराचर जीवांचा भक्षक आहे. 'काळ सदा तव भीत भया तो' 'काळरुप मी त्यांना भ्राता' आणि राम आपल्या भक्तांच्या मृत्युलाही जिंकतात. २) रकार दाहकर आहे. हे प्रथम र=अग्नि असे अर्थात स्पष्ट केले आहे. (ग) आकार आकर्षणात्मक, सर्वगत 'सर्व सर्वगत सर्व उरालय' वससि' दो.१६ पहा. सर्व चराचर जगतात मी अंतर्यामी रूपाने प्रविष्ट होऊन राहतो. राम आपल्या विश्वमोहिनी मायेसही आकर्षित करतात. तर सर्व भक्तांना आपल्याकडे आकर्षित करून घेतात, यात आश्चर्य तें काय? भक्तांवर कृपा करून आपले रूपामृत, सद्गुण-सिंधु इत्यादिंनी मोहित करून आपल्याकडे आकर्षित करतात.'निज माया प्रबलतें घें कृपाब्धि आकर्षुन' (घ) म=विद्वेषी, मोहकर. विप्रदोही, मुनिद्रोही, विश्वद्रोही खलांना आपल्या-चरित्राने, लीलेने मोहित करतात. जसे 'श्रुणु खगेश रघुपतिची लीला। सुरहित दनुज विमोहन शीला ।' 'उमा रामगुण गूढ पंडित मुनि पावती विरति। पावति मोह विमूढ जे हरि विमुख न धर्म रति । (ङ) आ=पूजाया मणि मांगल्ये (एकाक्षर कोष) १)राम परमपूज्य आहेत.'ब्रह्मा शम्भु फणींद्र सेव्यम्', 'पूजिति प्रभुसि

देव बहु वेषां' 'सेविति सिद्ध मुनीश प्रवीणा' इत्यादि. १/५५ पर्यंत पहा. २) मांगल्ये-'मंगलभवन अमंगलहारी। द्रवउं तो दशरथ अजिर-विहारी।' 'मंगलभवन अमंगलहारी । उमा सहित जे जपती पुरारी।' राम नाम मंगलमय आहे. 'जगमंगल गुण-गण रामाचे' इत्यादि अनेक आहेत. रामांशी संबंधी जे जे तें सारे मंगलमयच आहे.

५) र=अनिल, भूमि आणि मन. अनिल = वायु =प्राण. 'मुनिधन जनसर्वस्व शिवप्राणा' राम शिवजींचे प्राण, मुनींचे धन, आणि भक्तांची भूमी इत्यादि सर्वस्वच आहे. अशा प्रकारे 'राम' शब्दाचे वर्णाक्षरांनुसार, अक्षमालोपनिषद्, एकाक्षराभिधानम् (अग्नि पु.) आणि एकाक्षर कोष अनुसार जे जे अर्थ प्रगट झाले त्यानुसार श्रीराम स्वभाव व चरित्र आहे हे मानस वचनांवरून सिद्ध होते. अन्य रामायणांतून अशी आधारभूत वचने मिळत नाहीत.

आता रामपूर्वतापिनी उपनिषदामध्ये 'राम'चा अर्थ दिला आहे तो पाहू- 'चिन्मयेऽस्मिन महाविष्णौ (वासुदेव) जाते दशरथे हरौ। रघोः कुलेऽखिलं राति (ददाति) राजते यो महीस्थितः ॥ -स राम इति लोकेषु विव्दभ्दिः प्रकृतिकृतः। राक्षसा येन मरणं यान्ति स्वोद्रेकतोऽथवा ॥ राम नाम भुविख्यातमभिरामेण वा पुनः । राक्षसान् मर्त्यरूपेण राहुर्मनसिजं यथा॥' (मनसिज= चंद्र)(रावणशशि राहू-मानसात म्हटले आहे)'प्रभाहीनां-स्तथाकृत्वा राज्यार्हाणांमहीभृतां । धर्म-मार्ग चरित्रेण, ज्ञान-मार्ग च नामतः॥ तथा ध्यानेन वैराग्यं ऐश्वर्य स्वस्य पूजनात्॥ तथा रात्यस्य (राति=ददाति + अस्य) रामाख्या भुविस्याद- यतत्वतः । रमन्ते योगिनोऽनन्ते नित्यानन्दे चिदात्मनि इति राम पदेनासौ परंब्रह्माऽ भिधीयते॥' यात पूर्वीचेच सारे सारभूत आहे. इथे विशेष असे सांगितले आहे की, कोणत्या साधनाने काय लाभ होतो.

२. लक्ष्मण

'राम' मधला म ही लक्ष्मणात आहेच. म=हिमकर=चंद्र, शीतल, ताप निवारक, प्रसन्नता, आल्हाददायक, कोमल आहे. 'भरत-शत्रुघ्न' यात 'म' नाही. दोघांमध्ये म=चंद्रमा=अमृत=रामभक्ती दातृत्व आहे, म्हणून तर

राम लक्ष्मण सदैव (साथ) बरोबर राहीले. म्हणून दोघांनाही विनयाने समान विशेषणे लावली आहेत. 'कुन्देदिवर सुन्दरौ, भक्तिप्रदौ, तौहिनः' दोघेही रामभक्ती देणारे आहेत असे म्हटले आहे. भरत शत्रुघ्न यांना कुठल्याही ठिकाणी मानसामध्ये रामभक्तिप्रद म्हटले नाही. भेद इतकाच आहे की, रामाचे कोमल इ. गुण प्रगट आहेत; कारण 'म' प्रगट आहे, तेच 'म' हा लक्ष्मणांच्या जणू ह्रदयात गुप्त वसत असल्याने तो तितका प्रगट दिसत नाही. म्हणून वर वर पाहता लक्ष्मण कोमल नाहीत असे वाटते, क्वचित, रागीटही वाटतात पण श्रीरामच म्हणतात 'बंधू सदा तव स्वभाव कोमल', आणि या कोमल स्वभावाचा अनुभव-रावणाच्या-शत्रुदूतांवरही लक्ष्मणांनी दया केली आहे- 'श्रवुनि निकट त्यां लक्ष्मण अणविति, शीघ्र दया ये, हसुनि सोडविति।' 'कृपासिंधु सौमित्रि गुणाकर'. कृपासिंधु कधी कठोर होऊ शकतो कां? मानसात-कृपासिंधु' शब्द केवळ श्रीराम, शिव, सद्‌गुरु आणि लक्ष्मण यांचेसाठीच वापरला आहे. अन्य कोणालाही 'कृपासिंधु' गोस्वामी म्हणत नाहीत. हे ध्यानीं घेऊन लक्ष्मण-चरित्र मानसातले अभ्यासावे, पहावे. लक्ष्मण-वंदनेत 'लक्ष्मण पदजलजाता; असे कमलासमान ते कोमल, प्रसन्न आहेत. भरत व शत्रुघ्नवंदनेत किंवा अन्यत्र भरत-पद- कमल असे शब्द नाहीत. 'शीतल सुभग भक्त सुखदाता' शीतल व सुखदाता (म=चंद्रमाच आहे) भरतांना शीतल म्हटले नाही. 'राम' एकीकडे क्रोधानल आहेत, तर एका तऱ्हेने शीतल चंद्र आहेत. हे केवळ मानस प्रमाणांनीच सिद्ध होते-झाले आहे.

आता अक्षमालोपनिषदानुसार-'ल' कार विश्वंभर, भासुर (=तेजोराशी), भू=धारण करणे, आश्रय घेणे (गीर्वाणलघुकोष) विश्वाचा जगताचा आधार-आश्रय=जगदाधार='लक्ष्मण-धाम राम प्रिय सकल जगा आधार' विश्व=विष्णु. विश्वं विष्णु (विष्णु सहस्रनाम) 'रघुपति कीर्ती पताके विमले। ज्यांचे यश दंडासम बनले।' रघुपती= विष्णू. विष्णूची कीर्तीरूपी पताका लक्ष्मण यशरूपी दंडाने धारण केली जाते. अशा प्रकारे विश्वंभर-लक्ष्मण आहेत. 'ब्रह्मांड भवन निवास ज्याचे एक शिरिं सम रजकणी' (६/८३/छंद) ब्रह्मांडास सहज लीलेने धारण करणारे लक्ष्मण आहेत. जो सहस्त्र शीर्ष अहीश महिधर' दंड आणि पताका जशा नेहमी बरोबरच राहतात, तसे लक्ष्मण

आजन्म रामानुगामी आहेत; तसे भरत-शत्रुघ्न नाहीत. भासुर=अत्यंत तेजस्वी 'तेजनिधान लक्ष्मणहि तैसे'. क्षकार--परात्परत्व ज्ञापक, परंज्योतिरूप 'विज्ञान-धामौ उभौ' परतत्व आणि अपरतत्वाचे ज्ञान लक्ष्मणांच्या कृपेने होते, पूर्ण परतत्वज्ञान 'मोक्ष सकल सुखखाणी' मिळते. म्हणून वंदनेत म्हटले आहे-भक्तसुखदाता, भक्तिप्रदही आहेत. 'भक्तिप्रदौ तौ हि नः' 'भक्ति-विना सुख नाही' ज्ञान आणि भक्ती प्रदान करून सुखदाता होतात आणि कृपासिंधुही आहेत. 'कृपासिंधु सौमित्रि गुणाकर' परंज्योतिरूप=भगवान, ईश्वर आहेत, म्हणून तर 'कुन्देदीवर सुन्दरावति बलौ, श्रुतिनुतौ, गोविप्रवृन्दप्रियौ' इत्यादि विशेषणे लक्ष्मण व राम दोघांनाही समानच लावून वर्णन केले आहे. णकार-सर्व सिद्धप्रद, मोहकर-असे लक्ष्मण चरित्र आहे, म्हणून त्यांना पाहून व ऐकून लोकांना ते तामसी-क्रोधी असल्याचा मोह होतो, अन् त्यांच्या रूपावरही सारे मोहित होतात. परशुरामही त्यांच्या चरित्राने असेच मोहित झालेले होते म्हणून शेवटी त्यांनी 'क्षमा क्षमा मंदिर दो भ्राते' अशी आळवणी केली. श्रीराम तर सर्व सिद्धीप्रद व मोहकर आहेतच.

आता एकाक्षर कोषानुसार - 'ल दीप्तौ भये चाल्हादनेऽपिच' दिप्ती=तेज, हे मागे भासुर शब्दाने सांगीतले आहेच. भये-'जग भयमग्न, होइ नभवाणी' लक्ष्मणांची प्रतिज्ञा इ. ऐकून सर्व जग भयमग्न झाले होते. 'जैं लक्ष्मण वच सकोप वदले । कंपित मही दिक्करी डोलले ।' रघुकुलातही सर्वजण लक्ष्मणांना घाबरत असत. 'गमें लक्ष्मणें शिक्षा दिधली' असे कैकयी म्हणाली आहे. आल्हादने-लक्ष्मण आल्हाददायक आहेत. 'आनंदा आनंद हि दाते' ही विदेह वचने राम-लक्ष्मणांसाठी आहेत. इंद्रजिताचा वध करून सुरगंधर्वादिंना सर्वांना आल्हाद-आनंद दिला आहे. 'जय अनंत जय जगदाधारा । प्रभु! तुम्ही सर्व सुरां उद्धारां ।' ६/७७/४. ल-प्रलय-'पहा भानुकुल-पंकज-भानू! वदें स्वभाव न लव अभिमानू। जर आज्ञा आपली पावतो! कंदुकसे ब्रह्मांड उठवतो। कच्चा घटसे टाकीन फोडून ।....' यावरून सिद्ध होते की ब्रह्मांडाचा प्रलय करण्यास लक्ष्मण समर्थ आहेत. 'श्रुणु गिरिजे क्रोधानल ज्याचा । करी दाह चौदा भुवनांचा। सेविति सुरनर अग जग ज्याला ।।' (६/५५/१-२) ल-सान्त्वनेऽपिच-लक्ष्मण रघुवीरांचे वारंवार सांत्वन करतात. 'लक्ष्मण नानापरिं समजावित । लता-

तरूना जाति विचारित ॥' वा.रा. मध्ये तर अनेक प्रकारांनी त्यांनी रामांचे सांत्वन केले आहे. क्ष=वक्षसि, शब्द शासने क्ष=मधे, ह्रदयात आहे आणि (म्हणून) त्यांनी जनकराज व परशुराम या दोघांनाही शब्दाने शासन केले. (शाब्दिक दंडण) अशा प्रकारे लक्ष्मण शब्दाचे वर्णाक्षरांनुसार अर्थानुसार त्यांचा स्वभाव आणि चरित्र - मानस वचनांनी सिद्ध झाले.

३. भरत

मानसानुसार 'जो विश्वभरण पोषणकरि। नाम तयाचें भरत जाण तरि। जो विश्वाचे भरण-पोषण करतो त्याचे नांव भरत आहे. भृ=भरणे, पोषणे' भरति इति भरता' राम म्हणतात' सहज सत्य वदुं साक्षी शंकर भरत राहि महि तुम्हिं राखां तर' जो भरत विश्वाचो भरण-पोषण कर्ता आहे, त्याने जर भरण पोषण केले नाही तर भूमी किंवा जग कसे राहील (जगेल)? म्हणून पुन्हा म्हटले आहे. 'मही प्रजा नगरी सांभाळा।' (२/३१५/८) 'मुख्य मुखासम पाहिजे खाण्यापिण्यास एक। पाळि पोषी अंगां सकल तुलसी सहित विवेक ॥ २/३१५/ आणि भरतजीनीं अयोध्येस परत जाऊन हेच केले.

(पालन-पोषण भरण खरे होते ते प्रेमाने म्हणून मानस म्हणते- 'रामस्नेहचि जणूं देहधर' म्हणून 'जग जपि राम, राम जपि ज्यांहि' अशी रामदशा आहे. 'रामा निशिदिन बंधु-सुचिंता-जशि अंडांची कासवि-चित्ता')

भं नक्षत्रे गभस्तौ, भ=गभस्ति=सूर्य=हंस='भरत हंस रविवंश तडागां।' परमात्मा. भे रत, भ-रत=भगवान परमात्म्यात जो रत राहीला तो भरत, भरत रामस्नेहरत, रामनिरत असे आहेत. अयोध्याकाण्डात भरतविषयक वचनांचा सडा पडलेला आहे, प्राजक्ताच्या फुलांप्रमाणे. त्यातील सु-मनें अलगद वेचून घ्यावीत, अन् ती रामचरणींच अर्पावीत. राम मध्ये अ=गभस्ती, सूर्य, भानू आहेच, यांतही जो सदा रत तो भरत. भ=नक्षत्र, ज्ञानी. 'शम दम संयम नियम उपासहिं। भगण, भरत ह्रद् विमलाकाशहिं। ध्रुव विश्वास अवधि राकासी, स्वामी स्मृति सुरवीथि विकासी' २/३२५/४-५. सुरवीथि=आकाशगंगा, अगणित तारा-समूह आहे, तेच रामांचे अगाणित गुण होत-ज्यामध्ये सदैव भरत रत असतात. अशाप्रकारे भे रतः= भरतः हे ही सिद्ध झाले. 'अपर नाम

उडुगण विमल' उडुगण=नक्षत्र. रामांची जी सर्व अन्य गुणग्रामदर्शक नामे आहेत, तीच नक्षत्रे होत, अन त्याच्याच मनन-चिंतन-निदिध्यासात भरत सदा-सर्वदा रत असतात.

अक्षरमालोपनिषदानुसार- भ=भूत प्रशांतिकर. भरतांनी भूतमात्रानां अतिशय शांत केले होते-

भरत सुसेवक सचिवां बोधिति। आज्ञें निज निज कार्यी लागति ॥[१]
बोलावुनि लघु बंधु शिकविती । सकल मातृसेवा सोपविती ॥[२]
भूसुर अणवुनि भरत जुळुनि कर । नमुनि प्रार्थिति विनयाने वर ॥[३]
प्रजा नि पुरजन परिजन आणविति । समाधानयुत सुखांत वसविती ॥[५]

२/३२३/१,२,३,५,. या वरून सिद्ध होते की भरतांनी अयोध्या आणि प्रजा यांचे समाधान केले होते. म्हणून 'भूत प्रशांत्तिकर' अर्थ सिद्ध झाला. भ=भयानक. इतके भयानक बनले की फलविण शर मारला तो पर्वतासह हनुमान मूर्च्छित होऊन भूमीवर पडले. आणि कैकेयीसाठीही प्रथम अतिभयानक बनले होते. रकार-दाहक आहे. 'भरत' मध्ये 'र' मध्ये आहे त्यामुळे रामवियोगात त्यांचा हृदय-दाह होत होता. 'दुःख दाह हा जाळि उर सदा। भूक न दिनि , निशिं निद्रा न कदा।' २/३१२/१.'धिग् मजला वेणू-वन-दहना' दोष-दुःख अति दाह भाजना' २/१६४/७. अशा प्रकारे आत्मग्लानीमुळे भरतांच्या छातीत दाह होत होता. उत्तरकाण्डातही पहा-'कपटी कुटील हि मी प्रभु जाणित । म्हणून नाथ मज सवें न राखति' कृतीकडे प्रभु बघतील मम जर । कल्पकोटी शत सुटका नच तर ।' (७/१/४-५) त=धनधान्यादि संपत्प्रद. विश्वाचे भरणपोषण करणारा धनधान्य संपत्तीने संपन्न असेल यात नवल तें काय? कारण त्याशिवाय विश्व-पोषण व्हावे कसे? अशा प्रकारे 'भरत' शब्दाचेही अर्थानुसार स्वभाव व चरित्र सिद्ध झाले.

४. शत्रुघ्न

'शत्रुघ्न' शब्दात भरत मधले र आणि त आहेत, पण ते स्वररहित झाल्याने 'श' आणि घ्न च्या मध्ये बसले आहेत. स्वररहित केवळ वर्णानीं बोलता येत

नाही, म्हणून 'उ'बरोबर घेऊन बसले आहेत. मानसात कुबडी प्रसंगातही शत्रुघ्न आपल्या मुखाने एकही शब्द बोललेले नाहीत. दंड किंवा शिक्षा केली आहे, पण बोलणे नाही. याचाच अर्थ असा की ते कृतीतूनच बोलतात, शब्द वाया घालवत नाहीत. 'र' जसा मध्ये आहे, तसा क्रोधाग्नीही त्यांच्या हृदयात गुप्त आहे. परंतु तो क्रोध 'परूष वचन बल' अशा कठोर शब्दांनी व्यक्त किंवा प्रगट होत नाही. जे कृती करतात ते ही 'उ'=महेशांसमान संहारकारक कृतीतूनच सांगतात. 'शूर समरिं करणी करती, स्वयें न कधी वदताति' - हे तर संहारकर्त्याचे-शत्रुघ्नाचे खरे भूषण आहे. शत्रुघ्न=शत्रुहन्ता.ज्याच्या हृदयात क्रोध नाही तो शत्रुचा संहार कसा करणार? तो नुसतेच वाचा-युद्ध करू लागला तर शत्रुघ्न नाम व्यर्थ ठरेल! वा.रा.- मध्ये कुबडी-प्रसंगात शत्रुघ्न बोलले आहेत पण अतिशय क्रोधपूर्ण बोलले आहेत. रोषोक्तो उ -(अमरे)' रूषा कोपेन उक्तौ वचने '(अव्या.सु) म्हणून वा.रा. मध्येही शत्रुघ्न नाम चरितार्थ ठरले. उ=क्रोधवचन.

भरतानुगामी बनले कारण र् त् वर्णाचीं समानता. आणखी परा-भ भरत बीज आहे (रामरहस्योपनिषद) भवने च तथा भः स्यात् भ्रमरो भः प्रकीर्तितः (एकाक्षर कोष) भ्रमराप्रमाणे पण स्वररहित (र् त्) (भ) भरतांमध्ये ते भ्रमरासमान स्वररहित रत रहात होते. शत्रुघ्न स्वर रहित भ्रमर मधुप आहेत. मधुपाप्रमाणे शत्रुघ्न भरतात रत राहतात. अक्ष मालोपनिषदानुसार-श=सर्वफलप्रद, पवित्र उ=सर्वबलप्रद सारभूत. घ=सौभाग्य प्रद. न=भुक्तिमुक्तिप्रद, शांत. शत्रुघ्नजी भरतजींच्या सेवेत सर्वफल, पवित्रता, सर्व साधनाचे सार, सकल सौभाग्याची प्राप्ती आणी भुक्तीमुक्ती सर्वकाही समजतात अन् अतिशय शांतही आहेत. जणूं शत्रुघ्नांचे स्वतंत्र चरित्रच नाही. भरत-सेवा करीत सावलीप्रमाणे त्यांचे अनुगमन करणे हेच शत्रुघ्न-चरित्र होय. 'यत्स्मरणें रिपु नाश पावतो'-'नाम शत्रुघ्न वेद प्रकाशा' संसार=संसृती हा सर्वात मोठा प्रबल शत्रु होय, त्याचा नाश केवळ शत्रुघ्नाच्या स्मरणाने होतो. 'महा अजय संसार रिपु जिंकु शके तो वीर' ६/८ संसृती-विनाश हेच सर्व साधनांचे फळ आहे. मानव जन्माचे हेच सार आहे, हे सिद्ध करणे हेच सौभाग्य होय. याचेच नाव मुक्ति! म्हणून शत्रुघ्न स्मरणाने हे सर्व प्राप्त होते, सिद्ध होते. हरिदास (रामभक्ता) च्या दासाची भक्ती

सर्व कांही देणार व अन् बरोबर शांतीही देणार! शं=सुखं, शंकर=शश्च, श=शंकर शिवजी यावरून असे सिद्ध होते की कधीकधी शिवावतारी असे शत्रुघ्न असतात.

'यस्मरणें रिपु नाश पावतो'=भगवंताचे चक्र, सुदर्शन चक्र-असाही कधी कधी यांचा अवतार असतो. पद्म पुराणानुसार शत्रुघ्न हे सुदर्शन चक्रावतारीच आहेत. विश्वभरण-पोषण करणारे =विश्वभरण पोषण=विष्णु. त्यांच्या हातात जो राहतो,=शंख, शंखावतार भरतजी आहेत. असे स्कंद व पद्मपुराणात म्हटले आहे. -भरतामध्ये अ आहे, अ=विष्णू. कधी कधी विष्णू अवतार घेऊन भरत येतात. लक्ष्मणांना शेषावतार म्हंटले आहे. ल=विश्वंभर=महाविष्णू = जो क्ष=परज्योतिरूप आहे त्याचाही कधी कधी अवतार असतात. (सूचना१ - मा.गू.चं.त सांगितले आहे जेव्हा ब्रह्माचा अवतार राम होतो, तेव्हा महाविष्णू=नारायण=शेषशायी अवतार लक्ष्मण, शिवावतार शत्रुघ्न आणि विष्णू अवतार भरत असतात. सूचना२-आणि जेव्हा विष्णू किंवा नारायणावतार राम असतात तेव्हा शेषावतार लक्ष्मण, शंखावतार-भरत आणि सुदर्शनावतार शत्रुघ्न असतात.

अशा प्रकारे राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांची नामे वर्णाक्षरांनी सिद्ध झाली. संस्कृत भाषेचा महिमा पहा, कसा आहे तो, हे सारे पाहून सामान्य मनुष्य आश्चर्यचकित होतो खरोखर संस्कृतसारखी दुसरी भाषा विश्वात नाही, आणि असे संस्कृतकोष, पुराणे, उपनिषदे इत्यादि ग्रंथही नाहीत. आपल्या पूर्वजांनी यासाठी किती कष्ट घेतले असतील, याची केवळ कल्पनाच करावी! परंतु आज मात्र चित्र फार दयनीय दुःखद दिसते आहे, कारण दिवसेंदिवस संस्कृत भाषेचा प्रचार कमी करणे यातच सरकार आणि बहुजन समाज आपली धन्यता मानीत आहेत. याला म्हणायचे कलिचा प्रभाव....! दोष कोणास द्यायचा?

- चौदावे परिशिष्ट समाप्त -

परिशिष्ट १५

बालरामरूपाचे वर्णन

बालकाण्ड व उत्तरकाण्ड तुलनात्मक कोष्टक

बालकाण्ड

(१/१९९-१ते१२)

१) काम कोटि छवि शाम शरीर।नीलकंज वारिद गंभीर १/१९२/१ यात नीलकमल व नीलमेघाची उपमा दिली आहे.

२)अरूण चरण पंकज नख ज्योती। कमलदलीं बसली जणुं मोती। १/१९९/२. दोन्हीकडेही चरणांपासूनच वर्णन आहे.

तर येथे कमळाच्या पाकळ्यांवर ठेवलेल्या मोत्यांची उत्प्रेक्षा केली आहे. चंद्रकांतांत नसलेले काठिण्य व तांबूसपणा मोत्यांच्या उपमानाने सुचविला आहे. कमलदलाने पदज म्हणजे पायांचे तळवे, बोटे व नखे यांचाच उल्लेख समजावा.

३) ध्वज रेखांकुश कुलिश तळपती। मुनि मन नूपुर नादिं मोहती। १/१९९/३.

ध्वज, उर्ध्वरेषा, अंकुश व वज्र यांचा येथे स्पष्ट उल्लेख आहे.

४) कटीं किंकिणी उदरीं त्रिवली। नाभि गभिर कळे ज्यां दिसली। १/१९९/४.

उत्तरकाण्ड

(७/७५/५ ते ७७/१०)

१) मृदुल कलेवर मरकत शाम-येथे मरकत म्हणजे पाचूच्या रत्नाची उपमा दिली आहे. कारण गडद हिरवा रंग दुरून नीलवर्णासारखाच दिसतो.

२) नवराजीव अरुण मृदु चरणहि। पदज रूचिर नख शशिभा हरणहि। तेथे नखांची कांती चंद्राच्या कान्तीस लाजविणारी आहे. तर येथे चंद्रकांतीच्या उपमानाने तेज, शीतलता व प्रसन्नता हे गुण सुचविले आहेत.

३) ललित अंक कुलिशादिक चारी। नूपुर चारु मधुर रवकारि। तर येथे अंक म्हणजे चिन्ह या शब्दाने तोच भाव ध्वनित केला आहे.

४) चारु कनक-मणि विरचित सुंदर। कटिं किंकिणी कल मुखर मनोहर। कटिसूत्र-करगोट्याचे वर्णन

५) भुज विशाल बहुभुषणयुत वर । हृदिं हरिनखशोभा अति सुंदर ।। १/१९९/५.

इथे नाभिवर्णनानंतर लगेचच विशाल छातीचा उल्लेख आहे. पण तो बाहूंच्या व हृदयाच्या वर्णनानंतर आहे.

६) उरिं मणिहार पदक अति शोभे। विप्रचरण देखत मन लोभे।। १/१९९/६.

इथे पायापासून विशाल छातीपर्यंतचे वर्णन आहे.

७) कंबु कंठ अति चिबुकहि सुंदर । अमित मदन छवि वसे मुखावर ।। १/१९९/७

इथे अगणित मदनांच्या छविचा उल्लेख सरस आहे.

८) दो दो दशन नि अधर अरूण वर। वर्णिल नासा तिलक कोण बरं ।। १/१९९/८

दशन म्हणजे चावणारे दात हा उल्लेख दोन्हीत आहे पण सौख्यद

(बालकाण्डातील) येथे भरीस घ्यायला हवे. दोन्हीकडे ही तळपायावरील चिन्हे, नूपुरनाद,किंकिणी, उदररेखा व नाभि यांचे एकाच क्रमाने वर्णन आहे.

५)रेखामय सुंदर उदरिं नाभि रूचिर गंभिर । आयत उर राजति विविध बाल विभूषण चीर ।। दो.७६. येथे 'राजति विविध बालविभूषण' मध्ये वाघनख, मणिहार व पदक, विप्रचरण हे बालकाण्ड वर्णनातले गृहीत धरणें आवश्यक आहे.

६ व ७) अरुण, पाणि, नख, करज, मनोहर। बाहु विशाल विभूषण सुंदर।। स्कंध बालहरि कम्बूग्रीवा। चारू चिवुक आनन छविशीवा।।

तर इथे थोडा क्रम बदल करून तळहाताकडे दृष्टी केल्याने त्याचे वर्णन केले आहे. बालकाण्डात तळहात, हातांची बोटे, नखे तसेच बालसिंहाप्रमाणे पुष्ट भरदार व वाटोळे खांदे यांचे वर्णन तेथे नाही. तसेच शंखाप्रमाणे मान, गळा याचे जे वर्णन येथे आहे तेही बालकाण्डात नाही.

८) बोल बोबडे अरूण वराधर । वारिक युगयुग दशन विशद वर ।। ललित गाल नासिका मनोहर । हास्य सकल सौख्यद सम शशिकर ।। इथे हास्याचा उल्लेख करण्यात

शशिकलासारख्या हास्याचा उल्लेख नाही. इंदु अनुग्रह हृदिं प्रकाशे। गृचविति किरण मनोहर हासे। असे पूर्वी दाखविले आहे.

९) सुंदर कर्ण सुचारु कपोल। प्रिय अति मधुर तोतरे बोल ॥ १/१९९/९.

सुंदर कान, सुरेख गाल आणि अत्यंत मधुर अशा बोबड्या बोलांच्या वर्णनाचा उल्लेख आहे.

१०) चिक्कण काळे कुरळे जावळ। मातें रचित करूनि विविधा कळ ॥

सुरेख अशा जावळाची (काळ्या कुरळ्या केसांची) सुरेख अशी केशभूषा मातेने वत्सलतेने केली आहे.

११) वपवुरि पिवळें पातळ झबलें। रांगत दुड् दुड् प्रिय मज गमले॥ १/१९९/११

झिरझिरित पीत वस्त्रातूनही त्यांच्या नीलवर्ण कांतीची पसरलेली आभा आणि 'दुड्दुड् रांगणे'-हे अतीव मधुर बाल लीलांचे दर्शन होय.

भुशुंडीवर कृपा करण्याची पूर्वसूचना आहे. बोबडे बोल, लालचुटुक ओठ, सुंदर नाक, गाल व मनोहर हास्य सर्व कांही वर्णन तसेच आहे.

९) नीलकंज लोचन भवमोचन। भ्राजत भालिं तिलक गोरोचन।

निलकमलाप्रमाणे सुंदर डोळे असून ते या भवबंधनापासून मुक्त करणारे असे आहेत.गोरोचन चंदन तिलकाने सुंदर अशा कपाळास एक आगळी वेगळीच शोभा येते.

१०) भ्रुकुटि विकट सम सुंदर कान हि। कुंचित कच मेचक छवि छान ही। सम सुंदर कान, धनुष्यासारख्या भिवया यांचे जोडून वर्णन करण्यात 'आकर्णांतनयन' हा भाव आहे. हे सारे गोंडस असे आहे.

११) अंगि तलम रूचि पिवळे झबले। दृष्टि खिदळणे प्रिय मज गमले ॥

तर तोच भाव इथेही अपेक्षित आहे. जणूं निळ्या मेघात पडलेला वीजेचा पिवळा प्रकाशच।

खिदळणे-यात मोठमोठयाने हसणे-यातील बाललीला सूचित केली आहे. कारण 'धर्म मर्यादा पुरूषोत्तमाचा पूर्णावतार' असल्याने पुढे ही संधी नाही- नेहमी मंद मधुर स्मितहास्यावर थांबणे क्रमप्राप्त होणार !

१२)छवि न वर्णवे श्रुति शेषांहि।
तो जाणें स्वप्निही जो पाही।
श्रुति शेषांनाही ज्या बालरूपाचे यथार्थ वर्णन करणे अशक्य, ते जो भगवंत प्रेम-रति-लुब्ध भक्त आहे तो अखंड अनुसंधानामुळे स्वप्नातही हे सुख, हा आनंद पूर्णपणे अनुभवू शकतो.

या (पाच सात=१२) मनोहर चौपाया जाणून जो उरिं धरेल त्याची अविद्या माया -मुक्ती नक्की होईल हे टीकेत सविस्तर चर्चिले आहे.

१२) प्राकृत शिशु इव लीला बघुनि होइ मज मोह। कवण चरित करिती प्रभु चिदानंद -संदोह ।। 'चिदानंद-संदोह' हे शब्द वापरून काकभुशुंडीसारख्या अधिकारी रामभक्तासही सुखद का असेना पण प्रभु-मायेने क्षणभर का होईना ग्रासल्या शिवाय सोडले नाही.

हे परिशिष्ट मुळात नाही. पण साधकांना उपयुक्त होईल हे जाणून नवीन तयार करून घातले गेले आहे.

श्रीसद्गुरुचरणारविंदार्पणमस्तु!

-हरिः ॐ तत् सत्-